# यशवंतराव

## राष्ट्रीय व्यक्तिमत्त्व



संपादक
भा. कृ. केळकर

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई

# यशवंतराव

यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय ग्रंथालय
2901

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ
मुंबई
१९८५

# यशवंतराव

## राष्ट्रीय व्यक्तिमत्त्व

2901

संपादक
भा. कृ. केळकर

M
923.254
CHA/KEL
Cop. 5

प्रथम आवृत्ती
प्रकाशन
२५ नोव्हेंबर
१९८५

प्रकाशक
सूर्यकांत देशमुख
सचिव
महाराष्ट्र राज्य साहित्य
संस्कृती मंडळ, मुंबई

किंमत
नव्वद
रुपये

मुद्रक
चिं. स. लाटकर
कल्पना मुद्रणालय
'शिव-पार्वती', पुणे ३०

सजावट
रवींद्र कुलकर्णी, पुणे

ठसे
मुद्रा इरास, पुणे

मुखपृष्ठ
आईज ॲडव्हेटायजिंग
पुणे



यशवंतराव चव्हाण राष्ट्रीय ग्रंथालय
2901

# अनुक्रमणिका

प्रास्ताविक

संपादकीय निवेदन

## विभाग १

### चरित्र व संपन्न व्यक्तिमत्त्व

१. संपन्न व्यक्तिमत्त्वाचा आदर्श ३
तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

२. कृष्णाकाठचा सुपुत्र ९
शंतनुराव किर्लोस्कर

३. यशवंतरावांचे वेगळेपण १३
वसंतदादा पाटील

४. सह्याद्रीचे लेणे १८
रामभाऊ जोशी

५. लपलेले संपन्न व्यक्तिमत्त्व ३२
नारायण पुराणिक

६. ' समन्वयी ' साहेब ३८
काशीनाथ पोतदार

७. सत्तेवर नसलेले यशवंतराव ४४
राम खांडेकर

## विभाग २

### यशवंतरावांचा राजकीय प्रवास


८. राष्ट्रीय व्यासपीठावर ६५
स्वयंप्रज्ञेने चमकलेले यशवंतराव
द्वा. भ. कर्णिक

९. सोज्वळ मानवतावादी ८४
मोहन धारिया

१०. राजकीय जीवनाचे चार अध्याय ९३
मधू लिमये

११. भारताच्या राजकीय मंचावरील चारुदत्त १०१
ना. बा. लेले

१२. सत्तेवर नसलो तर काय करीन? १०८
( अप्रकाशित गप्पा-चर्चा ) रामभाऊ जोशी


## विभाग ३

### मंत्रालयातील वर्षे


१३. मंत्रालयातील कारकीर्द १२५
शब्दांकन—सुधीर गाडगीळ

१४. बिकट काळातील गृहमंत्रिपद १३८
शब्दांकन—भा. कृ. केळकर

१५. अर्थमंत्रिपदाची चार वर्षे : १४८
एक ताळेबंद
शब्दांकन—केसरी प्रतिनिधी

१६. मुलाखत-पी. व्ही. आर. राव १६१
शब्दांकन—अनिल दांडेकर

१७. मुलाखत—भास्करराव सोमण १६४
शब्दांकन—सुधीर गाडगीळ

## विभाग ४

## सुसंस्कृत रसिक व्यक्तिमत्त्व


१८. हळुवार मनाचा सुसंस्कृत सभ्य राजकारणी १७५
शरद पवार

१९. तुझी साद तुझे आशिर्वाद १८१
ना. धों. महानोर

२०. अंतरी नाना कळा असलेला माणूस १८९
सुधीर फडके

२१. संगीताचा रसिक श्रोता १९४
पं. भीमसेन जोशी

२२. साहित्य क्षेत्रातील स्वयंभू यशवंतराव २०२
भा. द. खेर

२३. दिल्लीतील महाराष्ट्र आणि यशवंतराव २११
भा. कृ. केळकर

२४. एक अतूट नाते २१६
राम खांडेकर

२५. मला दिसलेले यशवंतराव २१९
गंगाधर इंदूरकर

२६. ‘ कृष्णाकाठ ’–यमुनातीरी लिहिलेले एक
अभिजात आत्मचरित्र २२७
प्रा. स. शि. भावे

२७. यशवंतरावांचे ग्रंथप्रेम २३६
तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

२८. साहित्यिकाबद्दल आस्था २३७
आनंद यादव

२९. ग्रंथप्रेमी साहेब २४०
डॉ. सरोजिनी बाबर

३०. ग्रंथवाचन हा नित्यनेम २४१
राम खांडेकर

३१ व्यक्तित्व का सुगंध २४३
अटलबिहारी वाजपेयी

## विभाग ५

### कौटुंबिक जीवन आणि शेवटचा प्रवास


३२. शेवटची भेट — २६१
मो. ग. तपस्वी

३३. श्रीपाद डोंगरे आणि ‘ साहेब ’ — २७७
ग. नी. जोगळेकर

३४. एकरूप दांपत्य — २७६
राम खांडेकर

३५. शेवटचा प्रवास — २८५
शामराव पवार


## विभाग ६

### A Rare National Leader


36. A Rare Natinal Leader — 3
Vasant Sathe

37.. Political Administrator Par Excellence — 6
S. M. Kelkar

38. An Ideal Political Administrator — 12
L. P. Singh

39. Pragmatic Approach to Everything — 22
General P. P. Kumarmangalam

40. Mr. Y. B. Chavan – A Tribute — 25
R. Rangarajan

41. The Defence Years — 29
K. G. Joglekar

42. The Split in the congress — 37
T. V. Kunhi Krishnan

43. The lover of History — 46
Dr. P. N. Chopra

# प्रास्ताविक

महाराष्ट्राच्या जडणघडणीचे एक शिल्पकार, कर्तव्यदक्ष प्रशासक, चतुर राजकारणी, साहित्याचे सहृदय रसिक, संवेदनक्षम माणुसप्रेमी, एक निरलस ज्ञानपिपासू आणि कुटुंब-जनातील सुखदुःखात सहवेदनेने रंगणारा, अशा विविध पैलूंत कै. यशवंतराव चव्हाण यांचे व्यक्तिमत्त्व नटले आहे. संपन्न झाले आहे.

महाराष्ट्राने, खरे म्हणजे जे अनेक महापुरुष निर्माण केले आहेत त्यांपैकी यशवंतराव हे निश्चितच एक होते. मराठी भाषिक राज्याचे पहिले मुख्यमंत्री, राष्ट्राच्या कठीण प्रसंगी पंडित जवाहरलाल नेहरूंच्या हाकेला ओ देणारे संरक्षणमंत्री आणि विशाल दृष्टी असलेला एक धुरंधर महापुरुष या विविध भूमिकांमुळे यशवंतरावजींचे नाव यावच्चंद्र-दिवाकरौ दुमदुमत राहणार आहे. मराठी भाषिक राज्याच्या रौप्यमहोत्सवी वर्षातच, किंबहुना थोडे अगोदरच त्यांना काळाने ओढून न्यावे हे महाराष्ट्राचे दुर्दैव होय.

प्रत्येक महापुरुषाचे कार्य हे देशाकरिता आणि पुढील पिढीकरता न फिटणारे ऋण असते. तरीपण नदीतील पाणी घेऊन आपण नदीतच अर्घ्य सोडत असतो. श्री. यशवंतरावजी यांचा स्मृतिग्रंथही हा अशाच प्रकारचा.

महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे यशवंतरावजी हे जनक. त्यांच्या स्मृति-ग्रंथाच्या रूपाने त्यांच्या स्मृतीस अर्घ्य देणे साहित्य संस्कृती मंडळाची, त्यांच्याबद्दलच्या कृतज्ञतेची केवळ एक छोटीशी जाणीव. श्री. भा. कृ. केळकर यांनी या ग्रंथाचे संपादन करण्याचे मान्य करून आमच्या आणि त्यांच्या कल्पनेला साकार केले याबद्दल

मंडळ त्यांचे आभारी आहे.

श्री. वसंत साठे, श्री. रामभाऊ जोशी, श्री. राम खांडेकर, श्री. ना. बा. लेले, श्री. रवींद्र कुलकर्णी आदींनी या योजनेला सक्रिय साहाय्य केले. त्याबद्दल त्यांचे आभार.

यशवंतराव चव्हाण यांचा स्मृतिग्रंथ काढावा असे जरी आमच्या मनात असले तरी त्यातील संपादनाची योजना ही श्री. भा. कृ. केळकर यांची. ती त्यांनी (१) चरित्र व संपन्न व्यक्तिमत्त्व (२) यशवंतरावांचा राजकीय प्रवास (३) मंत्रालयातील वर्षे (४) रसिक व सुसंस्कृत व्यक्तिमत्त्व (५) ए रेअर नॅशनल लीडर आणि (६) कौटुंबिक जीवन आणि शेवटचा प्रवास या सहा विभागांत सिद्ध केली आहे. अशी ही महत्त्वाकांक्षी योजना सिद्धीस नेण्याकरिता यशवंतरावजींच्या निकट सहवासात आलेल्या लोकांनी लेखन करण्याची आवश्यकता होती. आठवणी सांगावयास हव्या होत्या.

सर्वश्री वसंतदादा पाटील, वसंत साठे, अटलबिहारी वाजपेयी, एस. एम. जोशी, मधु लिमये, मोहन धारिया, एल. पी. सिंग, शरद पवार आणि तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी तसेच, जनरल कुमार मंगलम्, ॲडमिरल भास्करराव सोमण, ले. ज. शंकरराव थोरात व शंतनुराव किर्लोस्कर, श्री. राम प्रधान, डी. डी. साठे, राम खांडेकर आणि कृ. पां. मेढेकर त्याचप्रमाणे पां. वा. गाडगीळ, द्वा. भ. कर्णिक, ना. बा लेले, नारायण पुराणिक, गंगाधर इंदुरकर, एस. एम. केळकर, रामभाऊ जोशी आणि डॉ. सरोजिनी बाबर, रणजित देसाई, शिवाजी सावंत, भा. द. खेर, मो. ग. तपस्वी, आनंद यादव, ग. नी. जोगळेकर, स. शि. भावे व ना. धों. महानोर. तसेच, पं. भीमसेन जोशी, सुधीर फडके, सुलोचना, शामराव पवार, शंकरराव साळवी आणि भा. कृ. केळकर, टी. व्ही. उन्नीकृष्णन्, पी. व्ही. आर. राव अशा अनेकांनी लेख, आठवणी आदी साहित्य उपलब्ध करून दिले याबद्दल सर्वांचे आभार.

कै. यशवंतरावजी यांच्याशी त्यांच्या शेवटच्या दिवसांत माझा बराच जवळचा आणि जिव्हाळ्याचा संबंध आला. त्यातून माझ्या मनात त्यांच्याबद्दल निस्सीम श्रद्धा उत्पन्न झाली. त्यांच्या निधनामुळे व्यक्तिशः माझी फार मोठी हानी झाली आहे. याही दृष्टीने यशवंतरावजींवरील स्मृतिग्रंथ माझ्या अध्यक्षीय कारकीर्दीत प्रसिद्ध व्हावा हे पण माझे त्यांच्याबद्दलच्या कृतज्ञतेचे गमक समजतो.

हा ग्रंथ विक्रमी वेळात मुद्रित करून दिल्याबद्दल कल्पना मुद्रणालयाचे मालक श्री. चिं. स. लाटकर आणि कामगार यांचे मनःपूर्वक आभार.

सुरेंद्र बारलिंगे
अध्यक्ष
महाराष्ट्र-राज्य साहित्य संस्कृती मंडळ

# संपादकीय निवेदन

कै. यशवंतराव चव्हाण यांच्या अचानक निधनाने आधुनिक महाराष्ट्राचा प्रमुख शिल्पकार नाहीसा झाला आहे.

१९६२–८४ या २२ वर्षांत यशवंतराव राष्ट्रीय पातळीवर वावरत होते. या २२ वर्षांतील त्यांच्या कर्तृत्वाचा, त्यांच्या राजकीय जीवनातील चढ उतारांचा, वादळांचा इतिहास त्यांच्या आत्मचरित्राच्या दुसऱ्या आणि तिसऱ्या खंडात ते सांगणार होते. कृष्णा–कोयनेचा हा सुपुत्र आता 'कृष्णाकाठा'वर कायमचा विसावला आहे. त्यामुळे मराठी साहित्य एका विदग्ध आत्मचरित्राला मुकले आहे. भारतीय इतिहासाचे एक प्रकरण लुप्त झाले आहे.

या कालखंडाचे यशवंतरावांच्या निकटवर्तीयांच्या सहाय्याने चित्रण करावे असे उत्कटतेने मला वाटले आणि त्यातून अशा सामूहिक चित्रणाची कल्पना मनात उद्‌भवली. हा इतिहास संबंधितांकडून मिळवून संग्रहित केला पाहिजे असे वाटले.

यशवंतराव चव्हाण यांचे व्यक्तिमत्त्व कॅलीडोस्कोप सारखे होते. ते पाहाणाऱ्याला त्यांच्या वेगवेगळ्या रंगाकृती दिसत. अशा व्यक्तित्वाचा शोध हे अत्यंत कठीण काम आहे. असे असले तरी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे ठळक रंग मनात भरत. या पुस्तकात त्यांच्या संपन्न व्यक्तिमत्त्वाचे हे रंग, त्यांचे विविध पैलू, लेखांतून आणि आठवणींतून दाखविण्याचा प्रयत्न केला आहे.

यशवंतराव हे सत्ताधीश राजकारणी असल्यामुळे त्यांचे राजकारण आणि सत्तेतील

जीवन असे त्यांच्या राजकीय जीवनाचे दोन भाग पडतात. सत्तेचे राजकारण हा रोचक, औत्सुक्य व उत्कंठा निर्माण करणारा भाग असतो. पण सत्ताधीश मंत्री म्हणून त्याने केलेले उपक्रम आणि कार्य उपेक्षित राहते. राजकारणी स्पर्धेच्या आणि वादांच्या दृष्टीने यशवंतराव हे विवाद्य व्यक्तित्व असले तरी स्वातंत्र्योत्तर काळातील उत्तम, कार्यक्षम आणि लोकाभिमुख राजकीय प्रशासक म्हणून त्यांनी केलेले कार्य निर्विवाद आहे. अधिक सखोल अभ्यास करण्यासारखे आहे. या दृष्टीने 'मंत्रालयातील वर्षे' हा स्वतंत्र विभाग केला आहे. त्यात यशवंतरावांच्या मुलाखतीच्या आधारे लिहिलेले लेख आहेत. तसेच त्यांच्या बरोबर विविध खात्यांत काम केलेल्या काही सनदी व संरक्षण अधिकाऱ्यांचे लेख, मुलाखती विभाग ३ आणि ५ मध्ये आहेत.

संरक्षण आणि गृहमंत्रालयात असताना चव्हाण यांनी जे कार्य केले ते भारताच्या विविध समस्यांचा इतिहास म्हणून आजही अभ्यासणे आवश्य आहे. असा अभ्यास केला तर चव्हाणांचे या क्षेत्रातील योगदान काय होते ते नेमके कळेल.

चव्हाणांनी घेतलेले राजकीय निर्णय किंवा सत्तेच्या राजकारणातील डावपेच यासंबंधी आपापली मते सांगणारे राजकीय नेत्यांचे लेख दुसऱ्या, पाचव्या विभागात आहेत. नेता ( लीडर ) आणि नेतृत्व ( लीडरशिप ) याचे मूल्यमापन स्वतंत्रपणे व्हावयास हवे. तसे ते झाले तर चव्हाणांच्या लोकशाही नेतृत्वाचे गुण स्पष्टपणे दिसू शकतील. या दिशेने अभ्यास करण्यासाठी काही लेख उपयोगी पडतील. चव्हाणांचे रसिक, सांस्कृतिक व्यक्तिमत्त्व आणि त्यांची साहित्यसाधना, ज्ञानसाधना हे त्यांच्या जीवनाचे अनुकरणीय भाग आहेत. त्याची माहिती विभाग चारमधील लेखांतून मिळेल. माणुसकी न हरवलेला, कुटुंब–वत्सल राजकारणी ही त्यांची प्रतिमा विभाग पाच मधील लेखातून उमजेल. या संग्रहात काही अप्रकाशित मुलाखती आणि नवी माहिती काही लेखातून देण्यात आली आहे. सारांश, विवाद्य व्यक्तिमत्त्वातील वादातीत गुणांचा हा शोध आहे.

या संग्रहासाठी लेख पाठविण्याची विनंती ७५ संबंधित नेते, सरकारी अधिकारी, पत्रकार, साहित्यिक, कलावंत आदींना केली होती. लेख लिहिण्याची सर्वांची इच्छा असली तरी वेळेच्या अभावी काहीजणांना जमलेले नाही. तरीही पुष्कळांनी प्रतिसाद दिला. ज्यांनी लेख लिहिले, ते यशवंतरावांचे समिप दर्शन घडविणारे आहेत. त्या सर्व लेखकांचा मी अत्यंत ऋणी आहे. त्या सर्व लेखकांचीही सामूहिक श्रद्धांजली असली तरी ती डोळस आहे. तसेच या ग्रंथातील प्रत्येक विभागात, यंदा प्रसिद्ध झालेल्या विशेषांकातील काही आठवणी पुर्नमुद्रीत केल्या आहेत.

या ग्रंथाची कल्पना प्रथम सुचली ती यशवंतरावांचा २५ वर्षे निकटचा सहवास लाभलेले त्यांच्या विश्वातील निजी सचिव राम खांडेकर व दिल्लीतील जेष्ठ पत्रकार श्री. ना. बा. लेले यांच्याशी बोललो. त्यांचे बहुमोल साहाय्य व लेखनसहकार्य मिळाले. पूर्वीचे यशवंतरावांचे निजी सहाय्यक श्री. राम प्रधान, शरद केळकर, शरद काळे

यांच्याशी विचारविनिमय केला. त्यांच्या सहकार्याबद्दल त्यांचे आभार. यशवंतरावांचे निकटचे सहकारी व त्या वेळचे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री. वसंतदादा पाटील यांनी स्मृति-ग्रंथास सर्व प्रकारचे साहाय्य करण्याचे आश्वासन दिले. त्यामुळे हुरूप येऊन तयारीस सुरुवात केली. नंतर मुख्यमंत्री शिवाजीराव पाटील निलंगेकर यांनीही या ग्रंथाची कल्पना मान्य केली. याबद्दल या दोघांचा मी ऋणी आहे.

ही ग्रंथाची तयारी चालू असताना महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ. सुरेंद्र बारलिंगे यांचे हा ग्रंथ, मंडळ प्रकाशित करण्याची तयारी दाखविणारे पत्र जुलै १९८५ मध्ये आले. तेव्हा आनंद झाला. त्यांच्या उत्स्फूर्त सहकार्याने व बहुमोल मदतीमुळे हा ग्रंथ प्रकाशित होऊ शकला. तसेच मंडळाचे सचिव श्री. सूर्यकांत देशमुख यांनी अत्यंत आस्थेने व तत्परतेने ग्रंथाची छपाई इत्यादी बाबत हालचाली केल्या. मंडळाचा यंदा रौप्यमहोत्सव आहे. तेव्हा या वर्षात या मंडळाच्या जन्मदात्यासह ही ग्रंथांजली मंडळातर्फे वाहिली जात आहे ही अत्यंत उचित आदरांजली आहे. मंडळाचे, डॉ. बारलिंगे, सूर्यकांत देशमुख यांचे मनःपूर्वक आभार मानतो.

या ग्रंथासाठी संदर्भ साहित्य गोळा करताना व इतर बाबतीत दिल्लीतील पत्रकार मित्र सर्वश्री अशोक जैन, विजय नाईक, मधू साटे, मदन जाधव, काशीनाथ जोगळेकर, मनोज वाघ, श्रीमती प्रेम गुलाटी, सौ.शैलजा केळकर यांची मदत झाली. यशवंतरावांचे इंग्रजी चरित्रकार श्री. कुन्नीकृष्णन् यांनी लेखन सहकार्य तर केलेच पण त्यांच्या ग्रंथातील यशवंतरावांच्या मुलाखतीचा वापर करण्याची परवानगी दिली. महाराष्ट्र परिचय केंद्राचे श्री. दा. मो. हेजीब व त्यांचे सहकारी यांचे सहाय्य मिळाले. या सर्वांचा मी आभारी आहे.

पुणे येथे या ग्रंथाची पूर्वतयारी आणि छपाई करण्याचे योजिले तेव्हा तेथील माझे मित्र श्री मा.कृ. पारधी, यशवंतरावांचे चरित्रकार श्री. रामभाऊ जोशी, 'मानसन्मान' प्रकाशनचे श्री. रविंद्र कुलकर्णी यांच्यामुळेच हे काम शक्य झाले. हा ग्रंथ वेळेवर, नीटनेटका आणि उत्तम रीतीने छापला जावा म्हणून या मित्रांनी तळमळीने मदत केली, वेळ खर्च केला आणि आवश्यक ते सर्व कष्ट उचलण्याची तयारी दर्शवली या-बद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

या ग्रंथाचे मुद्रण करण्याची प्रत्यक्ष जबाबदारी ग्रंथ मुद्रणात आघाडीवर असलेले कल्पना मुद्रणालयाचे श्री. चिं. स. लाटकर यांनी आपुलकीने स्वीकारली. काम अंगावर घेतले आणि समर्थपणे पूर्ण केले. एक सुंदर स्मृती ग्रंथ त्यांनी वाचकांच्या हाती दिला. त्यांचे मनःपूर्वक आभार.

ग्रंथात यशवंतरावांची छायाचित्रे समाविष्ट करावी लागणार होती. त्यासाठी दुर्मिळ छायाचित्रे उपलब्ध करून देण्याची जबाबदारी श्री. अनंत देसाई यांनी स्वीकारली. त्याचप्रमाणे आपल्या वैयक्तीक संग्रहातील अशीच दुर्मिळ छायाचित्रे कवी श्री.ना. धों.

महानोर, रामभाऊ जोशी, शेख सरवर यांनी दिली. ग्रंथाची सजावट हे कल्पकतेचे, महत्त्वाचे काम असते. पुणे येथील आईज ॲडव्हर्टाईजचे प्रमुख श्री. ईश्वर दिघे यांचे या कामी बहुमोल सहकार्य लाभले. दिल्लीचे चित्रकार श्री. पी. डी. अभ्यंकर यांनी ग्रंथसजावटीसाठी सल्ला दिला. या सर्वांना मनःपूर्वक धन्यवाद.

ग्रंथासाठी काही मुलाखती घ्याव्या लागणार होत्या. मुलाखती घेऊन त्या लिहून देण्याचे काम श्री. सुधीर गाडगीळ, श्री. अनील दांडेकर, हिंदी पत्रकार श्री. राजकुमार यांची या कामी बहुमोल मदत झाली. त्यांचे अंतःकरणपूर्वक आभार. ग्रंथाची मुद्रणप्रत तयार करण्यासाठी त्याच्या लेखनाचे काम करणारे श्री. नाईक, श्री. शेखर जोशी यांनाही धन्यवाद. तसेच या ग्रंथाला सर्वांगीण स्वरूप यावे म्हणून श्री. ना. बा. लेले, राम खांडेकर व रामभाऊ जोशी यांनी जे लेखन सहाय्य केले त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

१९६९–७० मध्ये यशवंतरावांशी चर्चा करूनच लोकशाहीत तळाचा कार्यकर्ता राष्ट्रीय पातळीवर लोकनेता व सत्ताधीश कसा होऊ शकतो या संदर्भात स्वतः श्री. चव्हाणांच्या राजकीय नेतृत्वाचाच अभ्यास करून ग्रंथ लिहिण्याचा माझा विचार होता. यशवंतरावांना माझी ही कल्पना पसंत पडली होती. त्या दृष्टीने दोन प्रदीर्घ चर्चा झाल्या पण तो संकल्प तडीस नेता आला नाही. आता त्यांच्या निधनानंतर हा ग्रंथ तयार झाला.

आधुनिक महाराष्ट्र आणि स्वतंत्र भारत याच्या गर्भकाळात यशवंतरावांचे राजकीय जीवन सुरू झाले आणि त्याच्या घडणीत त्यांना विशिष्ट स्थान मिळालेल्या या सर्वांचा अभ्यास करण्यासाठी आणि त्यांच्या व्यक्तीमत्त्वाची श्रीमंती जनतेच्या नजरेत भरावी या हेतूनेच स्मृतीग्रंथाचा संकल्प केला. यशवंतरावांच्या पहिल्या वर्षश्राद्धाला त्यांना ही ग्रंथांजली अर्पण करता आली याचेच आम्हास समाधान वाटते. यशवंतरावांच्या महाराष्ट्रातील चहात्यांना व चरित्र अभ्यासकांना हा ग्रंथ, त्यांच्या दिल्लीतील बावीस वर्षांचे सर्वांगीण दर्शन घडवील, निदान त्यामुळे प्रकाशझोत पडेल असा विश्वास वाटतो.

पुणे, २ ऑक्टोबर १९८५ **भा. कृ. केळकर**

# भारतसेवक महाराष्ट्र

## यशवंतराव चव्हाण

महाराष्ट्राची सेवा करण्यात मी रंगून गेलो असतानाच मला दिल्लीचे बोलावणे आले. तसा असंख्य वेळा मी दिल्लीला आलो असेन. दिल्ली काही मला अनोळखी नव्हती. पण कुठल्याही गावचा होणे ही एक वेगळीच भावना आहे. महाराष्ट्रात असताना मी त्याच्या आशा-आकांक्षांशी समरस झालो होतो. त्याच्या राग-लोभाचा मी अनुभव घेत होतो. स्वतःच्या मनातील काही निश्चित ध्येयवादा-नुसार महाराष्ट्राची घडण व्हावी या भावनेने नवे नवे बेत रचीत होतो. तसे करतानाही भारतीय जीवनाचा, भारतीय दृष्टीचा विसर पडला नव्हता. किंबहुना असा दृष्टिकोण स्वीकारल्यामुळे थोडीशी नाराजीही निर्माण केली होती.

पण मी आता येथे आलो आहे. भारताच्या भवितव्याशी अत्यंत निगडित असलेल्या अशा प्रश्नांची उकल चालू असताना मी येथे आलो आहे. राजकारणाचे सगळे रंग दिसत आहेत. विविध वर्तुळांत वावरणारी दिल्ली ही तशी मोठी उद्-बोधक नगरी आहे. इथल्या प्रशस्त आणि आलिशान इमारतींकडे पाहताना किंवा येथे वावरणाऱ्या विविध भाषिकांच्या हालचाली पाहतानाही अनेकदा महाराष्ट्रा-संबंधीचे विचार मनात येत असतात. या विचारांची गर्दी झाली की मी कोठेतरी ते बोलतो. तसे केले म्हणजे मोकळे वाटते. शेवटी माणसाच्या व्यक्तित्वात त्याच्या विचारांनाही महत्त्व आहेच. महाराष्ट्राशी माझे नाते कृत्रिम नाही. म्हणून त्याच्यापुढे प्रकट चिंतन करणे मला आवडते. ही देवाण-घेवाण आहे. उपदेशाचा आव नाही. तसा त्यात खोटा विनय नाही आणि खोटी अदबही नाही.

मी आता महाराष्ट्राबाहेर हिंडतो. अन्य भाषिकांत वावरतो. हिमालयात जातो. पूर्वेच्या आसामच्या टेकड्या पाहतो. सारा देश हिंडत असताना भारताच्या व्यक्तिमत्त्वाचे दर्शन होते. पण त्याच वेळी न कळत महाराष्ट्राच्या व्यक्तिमत्त्वाचा विचार मनात येतो. भारताच्या प्रश्नांचा विचार करीत असताना महाराष्ट्राच्या प्रश्नांची पार्श्वभूमी नेहमीच डोळ्यांपुढे येते.

माझा अनुभव असा आहे की, महाराष्ट्राबद्दल खूप अपेक्षा बाहेरच्या लोकांत

आहेत. या अपेक्षा आपण पुऱ्या करू का असे अनेकदा मनात येते. महाराष्ट्राबद्दल या अपेक्षा का निर्माण झाल्या? याचे कारण असे की, महाराष्ट्राने या राष्ट्राच्या जीवनसंग्रामात अत्यंत हिरीरीने भाग घेतला आहे. इतिहासकालात आणि अगदी अलीकडच्या काळातही महाराष्ट्राने राष्ट्रीय जीवनातील उदात्त ध्येयवादासाठी तादात्म्यतेने प्रयत्नांची शर्थ केली. पराक्रम केला. त्याग केला. शिवाजी, टिळक, रानडे, गोखले, फुले—आंबेडकर ही त्यांची प्रतीके. मी परवा बिहारमध्ये गेलो होतो. तेव्हा अगदी घरच्या माणसाची चौकशी करावी तशी टिळकांची आठवण लोकांनी काढली. हाच अनुभव सर्वत्र येतो. उत्कट देशभक्ती म्हणजे महाराष्ट्र असे जणू समीकरण त्यांच्या मनात असते. अशा विविध भावना भारतीयांच्य मनात आपल्याविषयी आहेत.

या ठिकाणी पं. नेहरूंची आठवण सांगण्यासारखी आहे. प्रतापगडाच्या निदर्शनांच्या वेळची ही गोष्ट आहे. महाराष्ट्राच्या रागाचे नि अनुरागाचे ते प्रदर्शन होते. कारण जशी उग्र, शिस्तबद्ध प्रदर्शने त्या वेळी झाली तसा प्रतापगडच्या डोंगर-कपारीत भरलेल्या नेहरूंच्या दर्शनार्थ जमलेल्या हजारो लोकांचा प्रचंड मेळावाही त्या वेळी झाला होता. तो कार्यक्रम आटपून आम्ही परत येत होतो. निदर्शक परतत होते. कोणी सायकलीवर, कोणी पायी. नेहरूंची मोटार पाहिली की निदर्शक पुन्हा घोषणा करीत. नेहरू हसतमुखाने त्यांच्याकडे पाहून हात हालवीत. असे हे २० मैल चालू होते. न कळत पंडितजींच्या मनात महाराष्ट्र जनतेसंबंधी विचार येत होते. थोडेसे विचारमग्न असताना एकदम ते मला म्हणाले, " मी विचार करतो आहे तुमच्या लोकांबद्दल. पंजाबी लोकही रागावतात. पण ते रागावले तरी एकदम थंडही होतात. मराठी लोकांचे तसे नाही. ते लवकर रागावत नाहीत—पण एकदा रागावले की लवकर शांत होत नाहीत." मीही म्हटले " खरे आहे ". लगेच मला आठवण झाली लोकमान्यांची. या महापुरुषाने असंतोषाची लाट भारतात पसरविली आणि साम्राज्यशाहीला धक्के दिले. ती महाराष्ट्रात जन्मली याचे कारण हेच असावे. अशा या इतिहासातील अनेक घटनांनी हे अनुकूल पूर्वग्रह निर्माण होतात. बाहेरच्या लोकांच्या अपेक्षा वाढतात.

सर्वत्र पूर्वग्रह अनुकूल असतात असेही नाही. प्रतिकूलही असतात. पण मला वाटते की, महाराष्ट्राने प्रतिकूल पूर्वग्रहांचा विचार अवश्य करावा. ते काढून कसे टाकता येतील यासाठी पद्धतशीर प्रयत्न करीत राहावे. पण त्यामुळे गोंधळून

जाऊ नये. केवळ त्यांचाच विचार करून मनातल्या मनात कुढत बसू नये.

मग महाराष्ट्राने काय करावे ? संयुक्त महाराष्ट्र झाला त्या वेळी मी म्हणालो होतो की, महाराष्ट्र निर्मितीसाठी शिवशक्ती निर्माण झाली आहे तर ती कायम टिकवली पाहिजे. ते आनंद सोहोळ्याचे दिवस साजरे करीत असतानाही माझ्या मनात हे विचार होते. कारण मला मनापासून वाटते की, महाराष्ट्राला राष्ट्रसेवेचे वेड होते म्हणून तो मोठा झाला. ते वेड, ती जिद्द, तो कणखरपणा, ते शुद्ध चारित्र्य, ती विद्वत्तेपुढे नमणारी राजकीय नम्रता या देशाला हवी आहे आणि या गोष्टी महाराष्ट्राच्या परंपरेत आहेत. कसदार जमीन असणाऱ्या शेतकऱ्याला आपल्या शेताचा अभिमान असतो तसा मला महाराष्ट्राचा अभिमान आहे. हे सारे गुण देशात सर्वत्र असावेत असे मला वाटते. म्हणून महाराष्ट्राने या गुणांची जोपासना करावी—त्या गुणांना अनुकूल असे वातावरण सरकारने निर्माण करावे, असे मला वाटते. महाराष्ट्राने कोण व्हावे असे मला कुणी विचारले तर मी म्हणेन भारताचा पुरोगामी व कणखर ध्येयवाद असलेला नम्र सेवक व्हावे. कारण अशा सेवकांची आज देशाला गरज आहे. आपण सध्या फार मोठ्या संक्रमण काळातून जात आहोत. गेल्या तीन वर्षांत देशाला धक्के बसले. देशाने उराशी बाळगलेल्या मूल्यांना आव्हान दिले गेले. आपले अस्तित्व धोक्यात आणण्याचे प्रयत्न झाले आणि भविष्यकाळातही तसे होईल. म्हणून अशा वेळी केवळ सरकार नव्हे तर सारे राष्ट्र कणखर व ध्येयवादी व्हावयास हवे.

भारताच्या सध्याच्या संक्रमणकाळातही काही मूलभूत ध्येयावर त्याला ठामपणे उभे राहावे लागणार आहे. भारताला राष्ट्र म्हणून मानाने जगावयाचे असेल तर दोन ध्येयसूत्रांवर त्याची उभारणी करावी लागेल. एक स्वावलंबी व समाजवादी अर्थव्यवस्था व दुसरे राष्ट्रीय स्वाभिमानावर व मानवतेच्या मूल्यांनी प्रसिद्ध झालेला प्रखर राष्ट्रवाद. या दोन्ही ध्येयवादांची साधना वाटते तेवढी सोपी नाही. त्यात अडचणी आहेत. काही भक्कम आर्थिक विचार व त्यासाठी लागणारी लोकावरील श्रद्धा असल्याविना आर्थिक समता येणार नाही. मला वाटते महाराष्ट्रात या दृष्टीने अनुकूल वातावरण आहे. समाजवादाची ती आदर्श प्रयोगभूमी ठरण्याची शक्यता आहे. तेथील सहकारी चळवळ, तेथील मध्यमवर्गीय जनतेची, कामगारांची, शेतकऱ्यांची राजकीय जागृती व त्याचा कार्यक्षम कारभारासाठी होणारा उपयोग हे लक्षात घेता तेथे समाजवादी विचार प्रबळ होईल.

दुसरे ध्येयसूत्र राष्ट्रीय ऐक्याचे. महाराष्ट्राला राष्ट्रवादाचे बाळकडू आहे. शिवाजी महाराजांच्या काळापासून ही राष्ट्रीय प्रेरणा, ते राष्ट्रीय चैतन्य, आपल्या जीवनात सळसळत आहे. अगदी अलीकडे हिंदीच्या प्रश्नावर भारतात एवढा वादविवाद झाला, पण महाराष्ट्राने याबाबत मुळीच शंका व्यक्त केली नाही. महाराष्ट्राने हे केले ते राष्ट्रीय ऐक्याच्या दृष्टीतून आणि तेही स्वयंस्फूर्तीने. एक राष्ट्रीय भाषा हे राष्ट्रैक्याचे महत्त्वाचे साधन आहे या श्रद्धेने महाराष्ट्राने हिंदीला पाठिंबा दिलेला आहे. ही त्याची उपजत राष्ट्रीय वृत्ती ही भारताची आजची मोठी निकड आहे.

पण हे राष्ट्रीय किंवा सांस्कृतिक ऐक्य हे केवळ घोषणांनी होणार नाही. त्यासाठी नित्य संस्कार हवेत. तसे संस्कार करणाऱ्या व त्यासाठी विविध उपक्रम करणाऱ्या संस्था हव्यात. महाराष्ट्राच्या भूमीत आंतरभारतीसारखा ध्येयवाद आणणारे साने गुरुजी किंवा दुसऱ्या प्रांतात जाऊन काम करणारे बाबा राघवदास, बाबूराव पराडकर किंवा सखाराम देऊसकर यांच्यासारखे देशभक्त ही अशा महाराष्ट्राच्या विशाल दृष्टिकोणाची प्रतीके आहेत. पण हे कार्य आता व्यक्तींचे नाही. अशा संस्था निर्माण केल्या पाहिजेत. त्यांच्याभोवती बुद्धिमंतांचे जाळे विणले पाहिजे. महाराष्ट्रातील बुद्धिमंतांनी या कामी पुढाकार घेतला तर पुन्हा एकदा राष्ट्रीय पातळीवर महाराष्ट्राच्या बुद्धिवादी राष्ट्रनिष्ठ परंपरेचा प्रभाव पडू लागेल.

भारताच्या राष्ट्रीय ऐक्याची ही भावनिक बाजू संभाळणे हे महाराष्ट्राला शक्य आहे. तसेच त्याची सामाजिक बाजूही महत्त्वाची आहे. सामाजिक विषमता कायम राहिली तर कोणतीही राजकीय रचना वा आर्थिक रचना टिकणार नाही. कधीतरी त्या विषमतेतून असंतोष निर्माण होईल आणि त्या असंतोषाचा स्फोट होऊन ती रचना उडवली जाईल. म्हणून सामाजिक समता आणि सामाजिक न्याय यांची काळजीपूर्वक जोपासना या देशाला करावी लागणार आहे. म. फुले–आगरकर–आंबेडकर अशी पुरोगामी सामाजिक विचारांची परंपरा असणाऱ्या महाराष्ट्राला आता ते पुरोगामी विचार राष्ट्रीय जीवनात आणले पाहिजेत. आपली संतांची आणि आधुनिक समाज-सुधारकांची परंपरा ही काही केवळ महाराष्ट्रासाठी नाही. त्यांचे विचार मानव्याचे होते. त्यांची स्वप्ने विश्वव्यापी होती. त्यांची तळमळ, त्यांची करुणा सगळ्या मानवतेतील दीन-दुःखितांसाठी होती. आता हे पर्याय आपण भारताच्या या विचारप्रवाहात आणून सोडले पाहिजेत. त्यासाठी महाराष्ट्राने समाजसुधारणेची आपली परंपरा जागृत ठेवली पाहिजे.

अर्थात महाराष्ट्राला या ध्येयसूत्रांचा पाठपुरावा करावयाचा असेल तर केवळ उपदेशकाची भूमिका घेऊन चालणार नाही. अहंतेने स्वतःच्या भूतकाळाची किंवा श्रेष्ठत्वाची स्तोत्रे गाऊन भागणार नाही, उलट त्यामुळे गैरसमज वाढतील. आता भारतापुढे महाराष्ट्राने यावयाचे ते नम्रतेने, परंतु कणखर पुरोगामी ध्येयवाद घेऊन. हा ध्येयवाद स्वतःच्या जीवनात महाराष्ट्राने बाणला तर सारे राष्ट्र त्याच्या प्रगतीकडे उत्सुकतेने पाहील. नव्हे, त्याचे अनुकरण करण्याची इच्छा निर्माण होईल. पण जे कित्ता घालून देतात त्यांचे वर्तन व प्रेरणा निर्विवाद पाहिजेत. लोकशाहीमध्ये – विशेषतः अप्रगत देशांतील लोकशाहीमध्ये राज्यसंस्थेच्या कल्पकतेवर व तिच्या कार्यक्षमतेवर जनतेची सर्वांगीण प्रगती अवलंबून असते. महाराष्ट्राने असा ध्येयवाद स्वीकारला तर त्याचे शासनही तो पार पाडायला बद्धपरिकर राहील.

शासनाची कसोटी केवळ कार्यक्षम कारभार ही नाही. तसेच राज्य ही काही उपभोग्य वस्तू नाही. ती समाजपरिवर्तनाची यंत्रणा झाली पाहिजे. केवळ नियोजनातील आकडेवारीने हे होणार नाही. पैसा खर्चून समाजनिर्मिती होत नाही. त्याला सर्वांगीण व जनतेच्या हृदयाला हात घालणारा ध्येयवाद लागेल व तो पेलणारे तळमळीचे नेतृत्व लागेल. राजकारण हा सत्तास्पर्धेचा आखाडा करणे हे या दरिद्री असलेल्या देशात महापातक आहे. ही अवस्था फार काळ टिकू शकणार नाही. म्हणून कोणत्याही शासनाला लोकाभिमुख राहावेच लागेल. या ध्येयवादामुळे चारित्र्यशुद्धी होईल. नवी ईर्षा निर्माण होईल. क्षुद्र आकांक्षा वितळून जातील.

महाराष्ट्राच्या भविष्यकाळातील त्याचे हे कार्य आहे. कार्य ठरले की त्याचा क्रम ठरला पाहिजे. त्याविना सगळी घोषणाबाजी ठरेल. महाराष्ट्र परिपूर्ण नाही. त्याच्या सामाजिक जीवनात काही उणिवा आहेत. पण माझी श्रद्धा आहे की, त्या उणिवा भरून काढण्यासाठी हा ध्येयवाद आपल्याला उपयोगी पडेल. एका महाकवीची काव्यपंक्ती मला आठवते–' महत्कार्याचे कंकण धरिले। आता महत्तमत्वचि पाहिजे बाणिले ॥ ' असे होईल हे नक्की. महाराष्ट्र या शब्दातच राष्ट्रीयत्वाचा सत्त्वांश आहे. तो शब्दच आपणाला या ध्येयवादाकडे ओढीत राहील.

## स्मृति संकलन

पृष्ठ ६०
सर्वश्री एस. एम्. जोशी
शरद पवार

पृष्ठ १०९–१२१
पां. वा. गाडगीळ
ना. वा. लेले
रणजित देसाई
रामभाऊ जोशी

पृष्ठ १६६–१७१
ले. ज. शंकरराव थोरात
राम प्रधान
डी. डी. साटे
कृ. पां. मेढेकर
श्री. विनोदराव

पृष्ठ २४८–२५७
शं. ना. अंधृटकर
शंकरराव साळवी
शिवाजी सावंत
यशवंतराव चव्हाण ( स्वागताध्यक्षीय भाषण )
अभिनेत्री सुलोचना
डॉ. काशिनाथ घाणेकर

पृष्ठ २९४
सरवर शेख

## ॥ १९६३ चा शांती–मोर्चा ॥



शांति मोर्चा - प्रजासत्ताकदिन संचलन १९६३
सत्यनारायण सिन्हा, लालबहाद्दूर शास्त्री, पं. नेहरू, मोरारजी देसाई
जगजीवन राम, अटलबिहारी वाजपेयी यांचे समवेत



सत्यम् शिवम् सुंदरम्

यशवंतरावांचे वाढ-
दिवसानिमित्त अभीष्टचिंतन.
↓





↑
संपन्न व्यक्तिमत्त्वाचे शिल्पकार



हिमालय आणि सह्याद्री



राष्ट्रपती भवनात पंतप्रधान आणि उपपंतप्रधान



तर्कतीर्थांना ' पद्मश्री ' लाभल्याचा आनंद



समाधानी कुटुंब - सौ. वेणुताई, यशवंतराव, श्रीपाद डोंगरे, राम खांडेकर, सरवर शेख



नॅशनल डिफेन्स कौन्सिलची बैठक



दिल्लीतील पश्चिम महाराष्ट्र परिचय केंद्रात लामण दिवा उजळला. शेजारी श्री. भा. कृ. केळकर




दिल्लीत छत्रपतींच्या पुतळ्याचे अनावरण



ब्रिटनच्या पंतप्रधान श्रीमती मार्गारेट थॅचर यांच्या समवेत



रशियातील युद्ध स्मारकाला चव्हाण पति-पत्नीची भेट




जागतिक बँकेच्या अधिवेशनाचे उद्घाटन

# १

# चरित्र व संपन्न व्यक्तिमत्त्व

# यशवंतराव चव्हाण : संपन्न व्यक्तिमत्त्वाचा आदर्श

## तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

सातारा जिल्ह्यातील मागासलेल्या ग्रामीण भागात म्हणजे देवराष्ट्रे या लहानशा गावात १२ मार्च १९१३ ला अत्यंत गरीब शेतकरी कुटुंबात श्री. यशवंतरावांचा जन्म झाला. स्वातंत्र्यपूर्व काळातल्या भारतात ग्रामीण जीवनात जन्मणाऱ्या आणि जगणाऱ्या व्यक्तींचे जीवन सामान्यपणे खुरटलेलेच राहात असे. त्यातील माणसांची मने जन्मभर मुकुलित स्थितीत राहावयाची, कारण त्या ग्रामीण जगतात शतकानुशतके महत्त्वाचा असा बदल घडतच नव्हता. व्यक्तीच्या विकासाची कसलीही साधने उपलब्ध नव्हती. विशेषत: गरिबांची कुटुंबे पिढ्यान्‌पिढ्या परिस्थितीच्या कचाट्यातून बाहेर पडण्याचा प्रयत्न क्वचितच करीत. बंधनातून मुक्त होण्याकरता आवश्यक असा संस्कृतीचा प्रकाशच त्या कोंडलेल्या जीवनात शिरू शकत नव्हता. यशवंतरावांचे वडील बळवंतराव यांनी हिंमत धरली आणि नशिबाची परीक्षा पाहण्याकरिता त्या खेड्याची हद्द कायमची ओलांडली. नागरी जीवनाचा आश्रय केला. कराड या तालुक्याच्या शहरात राहावयास गेले. यशवंतरावांच्या वडिलांचे प्राथमिक शिक्षणही जेमतेमच झाले होते. त्यामुळे चवथ्या श्रेणीचीच नोकरी शोधावी लागली.

कराड येथे ठाण मांडले. बेलिफाची नोकरी पत्करली. दोन मुले व दोन मुली होत्या. यशवंतरावांची आई विठाबाई. यशवंतरावांचे वडील बळवंतराव ऐन उमेदीत १९१८ साली इहलोक सोडून गेले. यशवंतरावांचे वडील बंधू गणपतराव यांच्या खांद्यावर प्रपंचाची धुरा आली. यशवंतरावांच्या मातुश्री विठाबाई या तर अगदी निरक्षर होत्या. मुलामुलींचे शिक्षण व्हावयास पाहिजे असा निश्चय त्यांनी मनाशी पक्का बांधला. यशवंतरावांचे बंधू गणपतराव यांना इंग्रजी शिक्षणाचे माहात्म्य उमगले होते. गणपतरावांनी यशवंतरावांना कराड येथे टिळक हायस्कूलमध्ये घातले.

टिळक हायस्कूलमधील त्या वेळचे शिक्षक आदर्शवादी होते. "सर्वं हि तपसा साध्यम्" हे व्यासवचन या शाळेचे ध्येयवाक्य होते. शिक्षक राष्ट्रवादी

विचाराचे होते. केवळ वर्गाचाच अभ्यासक्रम विद्यार्थ्यांनी पुरा करावा आणि उत्तीर्ण व्हावे अशा मर्यादित उद्देशाने आपला शिक्षकाचा व्यवसाय चालवीत नव्हते. टिळकयुग सुरू झाले. हे युग राष्ट्रवादाच्या मंत्राने भारलेले होते आणि या युगाच्या प्रेरणांनी अस्वस्थ झालेले ध्येयवादी शिक्षक हे टिळक हायस्कूल चालवत होते. यशवंतरावांचे बंधू गणपतराव सत्यसमाजी, ब्राह्मणेतर चळवळी-मध्ये मोठ्या हिरीरीने भाग घेत होते. सत्यशोधक समाजाच्या दणदणीत प्रचाराने सामाजिक परिवर्तनाचा आदेश महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात दुमदुमत होता. या प्रचाराला प्रखर स्वरूप पुणे, सातारा, कोल्हापूरमध्ये प्राप्त झाले होते. १९१९–१९३० या कालखंडात याच वेळी राजकीय स्वातंत्र्याच्या आंदोलनाने महा-राष्ट्रासह अखिल भारत व्यापून टाकलेले होते. भगतसिंगासारखे सशस्त्र क्रांतीचे वीर फासावर लटकले होते. त्या सुमारास क्रांतिवीर जतींद्र दास यांनी कारागृहात आमरण अन्नत्याग करून देशातील तरुणांची आणि सगळ्या नागरिकांची मने सचिंत आणि शोकाकुल करून टाकली. याचा परिणाम यशवंतरावांच्या संवेदन-शील मनावर अत्यंत खोलवर झाला. जतींद्रांच्या उपवासाच्या दिवसांत यशवंतराव वेदनांनी विव्हल झाले आणि जतींद्राच्या निधनाने ते शोकाकुल होऊन अश्रू ढाळत बसले. त्यांच्या अशिक्षित मातुश्रीला दिसले की आपला मुलगा घरातलंच कोणी जिव्हाळ्याचं दगावलं तसा रडतो आहे. तिला यशवंतरावांच्या रडण्याचा उलगडा झाला नाही. या परिस्थितीचा स्वाभाविक परिणाम म्हणजे यशवंतराव सत्यशोधक ब्राह्मणेतर चळवळीत सामील न होता राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या आंदोलनात अगदी कुमारवयात १४–१५ व्या वर्षीच ओढले गेले. महाराष्ट्राच्या राजकीय व सामाजिक इतिहासातील स्थित्यंतराच्या कालखंडाचे एक उत्कृष्ट प्रतीक म्हणून हे यशवंतरावांचे उदाहरण लक्षात घेता येते.

१९३० आणि १९३२ सालच्या कायदेभंगाच्या चळवळीत यशवंतरावांनी उडी घेतली. १८ महिन्यांचा कारावास भोगला. घरची गरिबी, शिक्षण अपुरे अशा स्थितीत सविनय कायदेभंगाच्या चळवळीत ते सामील झाले. या चळवळीच्या प्रारंभीच्या आठवड्यांमध्ये म्हणजे म. गांधींच्या दांडी मोर्चाच्या आठवड्यांमध्ये आम्ही स्वत: कराड येथे आणि कराडच्या भोवतालच्या खेड्यांमध्ये कायदेभंगाचा प्रचार करीत होतो. या प्रचारात १५–१६ वर्षांचे कुमार वयातले यशवंतराव आमच्या सहकारी मंडळींत सामील झाले होते. त्या वेळी आमचे व यशवंतरावांचे

जे अनेक विषयांवर बोलणे झाले. त्यांत शिक्षण पुरे करण्याचा प्रश्न उपस्थित झाला. शालान्त परीक्षा पुरी करून पदवी परीक्षेपर्यंत जावयाचे असा निर्णय यशवंतरावांनी घेतला. राजकीय वा सामाजिक चळवळीमध्ये सार्वजनिक निधीवर जगण्याची पाळी येऊ नये म्हणून काही झाले तरी शिक्षण पुरे करायचे असा निर्णय त्यांनी त्या वेळी केला. १९३४ मध्ये ते शालान्त परीक्षा उत्तीर्ण झाले. १९३८ मध्ये इतिहास व अर्थशास्त्र हा विषय घेऊन मुंबई विद्यापीठाची बी. ए. ही पदवी त्यांनी घेतली. १९४० मध्ये एलएल. बी. ही कायद्याची पदवी घेऊन वकिलीस प्रारंभ केला.

१९३० ते १९४५ या कालखंडात यशवंतरावांनी स्वातंत्र्याच्या आंदोलनात कारावासाच्या शिक्षा वारंवार भोगल्या. त्या भोगत असता कारागृह हे सुद्धा एक प्रकारचे विद्यापीठ असे समजून त्यांनी राजकीय आणि सामाजिक तत्त्वज्ञानांचे व समाजवादाचे मौलिक अध्ययन केले. बंदिशाळा हे त्यांचे विद्यापीठ बनले. लो. टिळक, म. गांधी, एम. एन. रॉय, कार्ल मार्क्स, जवाहरलाल नेहरू इत्यादिकांच्या लेखनाचे परिशीलन त्यांनी मोठ्या आस्थेने केले. त्यामुळे स्वातंत्र्योत्तर कालात व्यावहारिक राजकारणामध्ये राजकीय सत्तेच्या गाभाऱ्यात शिरून प्रादेशिक राज्याचे मंत्री, मुख्यमंत्री व केंद्र शासनाचे संरक्षणमंत्री, गृहमंत्री, अर्थमंत्री व विदेशमंत्री म्हणून यशस्वी रीतीने कामे केली. अशा स्थितीत बहुतेक सत्ताधारी सत्तापिपासेने आणि धनलालसेने ध्येयापासून दूर जातात तसे यशवंतराव दूर गेले नाहीत. आदर्शाच्या प्रकाशात राहून शासनाला नवीन कार्यक्रम आणि प्रशासनाला पद्धती प्राप्त करून दिल्या.

१९४२ सालच्या 'भारत छोडो' या अखेरच्या आंदोलनात यशवंतरावांनी त्या वेळच्या विशाल सातारा जिल्हयाचे नेतृत्व केले. या सातारा जिल्हयात विद्यमान सांगली जिल्हयाचाही बराच भाग अंतर्भूत झालेला होता. १९४० साली वकिलीची सनद हातात पडली, परंतु न्यायालयामध्ये वकील मंडळींच्या दालनामध्ये अशिलांच्या दरखास्ती आणि कायद्यांचे जाडेजाडे ग्रंथ वाचत न बसता किंवा गप्पा छाटत न बसता सातारा जिल्हयाच्या राजकारणाची सूत्रे हातात घेतली. याच वेळी २ जून १९४२ ला फलटण येथील सुखवस्तू घरंदाज मुलीशी म्हणजे वेणूताईंशी ते विवाहबद्ध झाले. दिसायला नीटनेटक्या, सुरेख आणि शालीन वेणूताईंशी झालेल्या विवाहाचा सोहळा मोठ्या थाटामाटात पार

पडला. परंतु लगेच भूमिगतांचे नेतृत्व सुरू झाले. सातारा जिल्हयातील कार्यकर्त्यांना प्रतिसरकार स्थापन कसे करावे याचे मार्गदर्शन केले. छोडो भारत चळवळीला अत्यंत उग्र स्वरूप भारतातील ज्या काही ग्रामीण केंद्रांत प्राप्त झाले, त्यांपैकी सातारा जिल्हा गणला जातो. या चळवळीच्या इतिहासात जयप्रकाश नारायणांनी बिहारमध्ये ज्या प्रकारची कामगिरी बजावली, त्याच प्रकारची कामगिरी यशवंतरावांनी सातारा जिल्हयात बजावली. या अखेरच्या स्वातंत्र्य संग्रामातील महाराष्ट्रात गाजलेल्या आघाडीच्या कार्यकर्त्यांतील सर्वांत तरुण, यशवंतराव हेच होते.

कौटुंबिक जीवन गरिबीचे आणि कष्टाचे, परंतु कौटुंबिक जीवनातील आणि परिवारातील व्यक्तींचे संबंध परस्परांच्या विश्वासाचे आणि जिव्हाळ्याचे होते. त्या स्थितीत देशाकरता त्याग केला आणि विद्येची साधना केली. देशाकरता त्याग करीत असताना देशाचे प्रश्न शास्त्रीय दृष्टीने समजावून घेण्याचा प्रयत्न केला. त्याकरता नित्य विद्याव्यासंग अखंडपणे चालू ठेवला. माणसे जोडावी कशी आणि त्यांची मने सांधावी कशी, याची कला साध्य करून घेतली. सत्तेच्या गाभाऱ्यामध्ये उच्च स्थानी जाण्याकरता आणि त्या ठिकाणी यशस्वी रीतीने राज्याची प्रचंड कामे हिंमतीने आणि दूरदृष्टीने पार पाडण्याकरता बौद्धिक व मानसिक सामर्थ्य मिळविले. वयाच्या ३८ व्या वर्षी म्हणजे १९५२ साली ते मुंबई राज्याचे पुरवठामंत्री झाले. प्रशासनाची शिस्त आणि प्रशासनपद्धती यांचे सक्रिय अध्ययन करण्याची संधी मिळाली. मोरारजी देसाई हे मुख्यमंत्री होते. संयुक्त महाराष्ट्राचा लढा व्यापक स्वरूपात लढला जाऊ लागला होता. १९४६ सालापासून संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीचे आंदोलन सुरू झाले. या आंदोलनात महाराष्ट्राच्या साहित्यकारांनी प्रथम पुढाकार घेतला आणि राजकारणी नेत्यांनी त्याची सूत्रे हाती घेऊन जनतेच्या आंदोलनात त्याचे रूपांतर केले. भाषिक राज्याची मागणी ही नैसर्गिक सामाजिक तत्त्वावर आधारलेली अशी मागणी असल्यामुळे तिला खरेखुरे गंभीर रूप प्राप्त झाले.

भाषा ही सामाजिक शक्ती आहे. ती सामाजिक शक्ती आहे याचे कारण माणसाची माणुसकी भाषेतून निर्माण होते. माणसाला सामाजिक प्राणी म्हणून भावनिक आणि बौद्धिक अलौकिक शक्ती भाषेने प्राप्त झालेली असते. म्हणून माणुसकीची ती अधिष्ठान ठरते आणि म्हणूनच ती राजकीय शक्तीही बनते. हा

लढा वाढत गेला. १०५ बळी या लढ्याने घेतले. याचे कारण या लढ्याचा प्रतिकार मोरारजी देसाई यांच्या शासनाने कठोरपणे केला. १९५६ मध्ये सार्वत्रिक निवडणूक झाली. त्यात महाराष्ट्र काँग्रेस पक्षात फूट पडली. त्या वेळी मोरारजी देसाई यांनी माघार घेतली. पक्षनेता या नात्याने यशवंतराव चव्हाण बहुमताने निवडून आले. लगेच १ नोव्हेंबर १९५६ ला विशाल द्वैभाषिक मुंबई राज्य निर्माण झाले. त्या द्वैभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्री म्हणून यशवंतराव चव्हाणांनी सत्तेची सूत्रे हाती घेतली. यशवंतरावांनी मुंबई राज्याची धुरा खांद्यावर घेतली. हे मोठेच धाडस होते. कारण महाराष्ट्र पेटला होता. या धाडसाच्या पाठीमागे आत्मविश्वास होता. तो आत्मविश्वास त्यांनी दूरदर्शित्वामुळे प्राप्त करून घेतला होता. भाषिक राज्य होणे अपरिहार्य आहे हे त्यांनी मनोमनी जाणले होते, परंतु ही जाण पंडित नेहरूंसारख्या केंद्रीय सत्ताधाऱ्यांमध्ये त्या वेळी आली नव्हती. सत्तेची सूत्रे हातात घेतल्याबरोबर त्यांनी मुंबई राज्याच्या जनतेला व राजकीय पक्षोपपक्षांच्या नेत्यांना आश्वासन दिले की, मी बंदुकीची गोळी न वापरता राज्य चालवणार आहे. विरुद्ध मने सांधावी कशी आणि विरोधाला बगल कशी द्यावी यासंबंधी त्यांनी मनोमनी काही आडाखे बांधले होते आणि त्याप्रमाणे घडत गेले. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनाच्या बाहेर ते राहिल्यामुळे एक प्रकारची जनतेमध्ये अप्रियता निर्माण झाली होती, ती त्यांच्या मनाला डाचत होती. काही कालपर्यंत ही जनतेची नाखुषी सोसली पाहिजे असे त्यांनी ठरवून राजकीय प्रपंचाचा कारभार चालविला. महाराष्ट्र व गुजराथ या दोन्ही प्रदेशांमध्ये भाषिक राज्याची मागणी ज्वलंत स्वरूपात प्रभाव गाजवू लागली. मधून मधून काँग्रेस पक्षाला पोट-निवडणुकांच्या मध्ये अपयशाचे तडाखे बसू लागले. १९५७ साली प्रतापगडाला शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याचा उद्‌घाटन समारंभ प्रचंड उत्साहाने साजरा झाला. पंडित नेहरू उद्‌घाटनास आले तेव्हा वाईपासून प्रतापगडापर्यंतच्या ३० मैलांच्या मार्गावर संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीचे मोर्चे ललकारत उभे राहिले होते. पंडित नेहरूंना संयुक्त महाराष्ट्राच्या, भाषिक राज्याच्या मागणीची तीव्रता आणि प्रखरता प्रत्यक्ष नेत्रांनी पाहावयास मिळाली आणि हळू-हळू केंद्रीय नेतृत्वाला भाषिक राज्याची गरज पटवण्याची परिस्थिती निर्माण होत गेली. महाराष्ट्र व गुजरातमध्ये यापुढे सार्वत्रिक निवडणुकीत काँग्रेस पक्ष पराभूत होणार, याची लक्षणे दिसू लागली. यशवंतरावांनी ही परिस्थिती अगोदरच

हेरली होती. पंडित नेहरूंना आपले धोरण बदलणे भाग पडले आणि परिणामत: १ मे १९६०ला महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये ही एक अभूतपूर्व घटना झाली आणि या घटनेच्या पाठीशी असलेल्या शक्तींचा अर्थ अलिप्तपणे केल्यास हे लक्षात येते की, दे. भ. शंकरराव देव, एस. एम.जोशी, भाऊसाहेब हिरे इत्यादिकांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्राच्या भाषिक राज्याची निर्मिती करणारी जशी चळवळ होती त्याबरोबर यशवंतरावांसारखे दूरदर्शी नेतृत्व होते, हे नाकारून चालणार नाही. हे यशवंतरावांचे राजकीय दूरदर्शित्व म्हणजे मुत्सद्दीपण भारताच्या संसदीय लोकशाहीला मान्य झाले आणि पंडित नेहरूंच्या विश्वासातले संरक्षणमंत्री कृष्ण मेनन ह्यांना पदत्याग करावा लागून त्या स्थानी यशवंतराव चव्हाणांना बोलवून घ्यावे लागले. यात यशवंतरावांच्या असाधारण संपन्न व्यक्तिमत्त्वाचे प्रत्यंतर मिळते.

# कृष्णाकाठचा सुपुत्र

## शंतनुराव किर्लोस्कर

यशवंतराव चव्हाणांचा आमच्या किर्लोस्करवाडी गावाशी फार जुना संबंध होता. यशवंतराव कराडचे. किर्लोस्करवाडीपासून कराड तीस-बत्तीस मैलांवर. यशवंतरावांच्या ओळखीचे कितीतरी लोक आमच्या किर्लोस्करवाडीत राहात. माझा व यशवंतरावांचा व्यावसायिक संबंध मात्र सुरुवातीला फारसा नव्हता. ते लहान वयातच राजकारणात शिरले तर मी कारखानदारीत.

मी स्वत: राजकारणात शिरलो नसलो तरी आमचे किर्लोस्कर कुटुंब आणि किर्लोस्करवाडी मात्र राजकारणात भाग घेई. माझी आई कै. ममा ( राधाबाई किर्लोस्कर ), माझी पत्नी सौ. यमुनाताई ह्यांनी पुढाकार घेऊन सूत कताईचे वर्ग चालविले होते. किर्लोस्करवाडीत प्रभात फेऱ्या निघत त्यांत दोघीही पुढाकार घेत. माझे वडील कै. लक्ष्मणराव ( पपा ) किर्लोस्कर हे तर निष्ठेने खादी वापरीत. त्या वेळचे राजकीय पुढारी किर्लोस्करवाडीला भेट देत, प्रचार करीत, व्याख्याने देत. महात्मा गांधींनी पुकारलेल्या प्रत्येक लढ्याला किर्लोस्करवाडीने प्रत्यक्ष कार्य करून सक्रिय पाठिंबा दिला होता. पपांनी किर्लोस्करवाडीला अस्पृश्यता पाळलीच नाही व त्यासाठी शेजारच्या कुंडल गावच्या ब्राह्मणांनी टाकलेला बहिष्कारही सहन केला. राजकीय दृष्टीने किर्लोस्करवाडी जागृत होती. माझे वडील पण स्वातंत्र्य संग्रामाला पैशाची आणि इतरही खूप मदत करीत.

१९४२ सालच्या स्वातंत्र्य युद्धात किर्लोस्करवाडीला विशेष महत्त्व आले. ह्या काळात यशवंतरावांचा आणि किर्लोस्करवाडीचा संबंध वाढला. ह्या स्वातंत्र्य युद्धात किर्लोस्करवाडीचे विशेष स्थान होते. सांगली, सातारा, कराड आणि भोवतालची गावे ही हिरीरीने १९४२ च्या स्वातंत्र्य युद्धात भाग घेत होती. त्या वेळी ही गावे ब्रिटिशांच्या हद्दीत होती तर किर्लोस्करवाडी औंध संस्थानात होती. वाडीची माणसे प्रत्यक्ष चळवळीतही होती. इस्लामपूरच्या तहशील कचेरीवर राष्ट्रीय ध्वज फडकावण्यासाठी गेलेल्या मोर्चात किर्लोस्करवाडीचे एक तरुण एंजिनिअर उमाशंकर पंड्या हे डी. एस. पी. येट्स यांनी केलेल्या

गोळीबारात ठार झाले. त्या मोर्चात किर्लोस्करवाडीच्या गोविंदराव खोत व इतर बऱ्याच राजकीय कार्यकर्त्यांनी भाग घेतला होता. पुढे ब्रिटिश विरुद्ध 'चले जाव' चळवळीतले बरेच पुढारी व कार्यकर्ते 'भूमिगत' झाले, आणि वाडीला विशेष महत्त्व आले. किर्लोस्करवाडी औंध संस्थानात असल्याने राजकीय पुढाऱ्यांना पकडण्यासाठी ब्रिटिश शासनाखाली असलेल्या पोलिसांना औंध संस्थानच्या शासनाच्या सहकार्याशिवाय वाडीला येता येत नसे. त्यात वेळ लागे व शिवाय वाडीला येऊन राहणाऱ्या राजकीय पुढाऱ्यांना आधी सूचना मिळे व ते निसटून जात. यशवंतरावही त्या वेळी 'भूमिगत' होते. त्यांच्या विशेष ओळखीचा एक तरुण किर्लोस्करवाडीला राहात असे. पुष्कळदा यशवंतराव त्याच्या घरी येऊन राहात. वाडीच्या लोकांना हे माहीत होते. पण कोणीही बोलत नसे किंवा पोलिसांना पत्ता लागू देत नसत.

१९४७ साली भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही काही वर्षे राजकीय पुढारी आणि कारखानदार आपल्या देशाच्या आर्थिक प्रगतीसाठी एकत्र काम करीत होते. नंतर समाजवादाचे वारे जोरात आले आणि दोन वर्ग दूर जाऊ लागले. १९६० ते ७० ह्या दशकात ह्या दोन्ही वर्गातले मतभेद वाढत गेले. यशवंतराव महाराष्ट्रातून केंद्रीय मंत्रिमंडळात गेले. केंद्रीय सरकारची धोरणे ते आपल्या प्रभावी वक्तृत्वाने मांडू लागले व त्या धोरणांचा आग्रह करू लागले. मी भारतीय उद्योग-व्यावसायिकांच्या मध्यवर्ती संघटनेचा (फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज) प्रथम उपाध्यक्ष व नंतर अध्यक्ष झालो (१९६४–६६). त्या वेळी आर्थिक धोरणात मतभेद असले तरी व्यक्तिगत संबंधांत अंतर पडले असे नाही. यशवंतराव भारत सरकारची धोरणे मांडीत हे खरं असलं तरी त्या धोरणावर मी करीत असलेली टीका आमच्या व्यक्तिगत संबंधाच्या आड आली नाही. जेव्हा आमच्या भेटी होत, तेव्हा थट्टाविनोद भरपूर होत. त्याला यशवंतरावांचा स्वभावही कारणीभूत होता. विरोधक असले तरी त्यांचं म्हणणंही शांतपणे ऐकून, नीट समजून घ्यायचा त्यांचा स्वभाव होता. काही वेळा त्यांना एखादं म्हणणं पटे, मग सरकारी धोरणाला धक्का न लावता काय करता येईल याचा विचार करीत. एकदा छोटी विमाने बनवायचा कारखाना काढण्याची योजना त्यांच्या विचारार्थ पाठविली. त्यांनी ती समजावून घेतली. वास्तविक ही विमाने ही लहान प्रवासी विमाने होती पण आधुनिक होती.

शेतीच्या कामासाठी, प्रवासासाठी व अशा इतर अनेक कारणांसाठी त्यांचा उपयोग उद्योगप्रधान देशात होत असे. ही लष्करी उपयोगासाठी नव्हती आणि आपल्या देशात त्यांची गरज होती. हे सर्व यशवंतरावांना पटलं आणि त्यांच्या पद्धतीने त्यांनी खटपटही केली. मग निरोप पाठविला, "कुठलीही विमाने बनवायची असली तरी ती सरकारी मालकीच्या कारखान्यातच बनवायची हे सरकारी धोरण आहे व त्यात बदल होणार नाही. आमच्या ब्रह्मवाक्यापुढे तुमच्या विचारांचा उपयोग नाही."

एकदा काही गोष्टी मोकळ्या वातावरणात बोलायला मिळाव्यात म्हणून मी यशवंतराव, वसंतदादा, आबासाहेब कुळकर्णी (खेबुडकर) ह्यांना निरोप पाठविला की एका जागी भेटू, बोलू. यशवंतरावांनी आणि दादांनी मला निरोप दिला की शंतनुरावांना सांगा "कृष्णाकाठची ज्वारीची भाकरी आणि वांग्याची भाजी खाऊन वाढलेले आपण, आपल्याला शिष्टाचार कशाला हवेत? जागा ठरवा आपण एकत्र येऊ."

भेटीत यशवंतराव फार खेळकरपणे वागायचे, अगदी आपलेपणाने बोलायचे. एकदा मी त्यांना त्यांच्या दिल्लीच्या घरी भेटलो. मी नुकताच अमेरिकेतून आलो होतो. अमेरिकेत तेव्हा अध्यक्षीय निवडणुकीची गडबड होती. यशवंतराव मला म्हणाले, "शंतनुराव, ह्या निवडणुकीत निक्सन पडणार असं माझं मत आहे." मी म्हटले, "तुमचा अंदाज जर भारत सरकारच्या मतावर आधारलेला असला तर तो चुकणार!" ते म्हणाले, "तुम्ही सरकारवर नेहमीच टीका करता. पण ह्या वेळी निक्सन येणार नाही असं मलाही वाटतं." माझे मत निक्सन निवडून येणार असं होतं. त्यांना ते पटले नाही. वादात शेवटी पैज लावली. निक्सन निवडून आल्यास यशवंतरावांनी एक रुपया द्यायचा व निक्सन पडल्यास मी त्यांना एक रुपया द्यायचा असं ठरलं.

अमेरिकन अध्यक्षांच्या निवडणुकीचा निकाल लागला तेव्हा मी पुण्यास होतो. यशवंतराव दिल्लीत होते. आमच्या कारखान्याचे एक अधिकारी दिल्लीला गेले होते. कामासाठी यशवंतरावांना भेटले. त्यांच्या बरोबर यशवंतरावांनी एक रुपया पाठवून दिला आणि निरोप दिला, "निक्सन निवडून आल्यामुळे मी पैज हरलो त्याचा रुपया."

कोल्हापूर ते कराड या भागात किर्लोस्कर कारखान्यामुळे झालेली प्रगती

यशवंतराव अभिमानाने इतरांना सांगत. कै. पपांच्या जन्मशताब्दीच्या समारंभात आम्ही सर्वांनी पपांचा पुतळा किर्लोस्करवाडीला उभा केला. त्याच्या उद्‌घाटनाच्या वेळी यशवंतरावांनी केलेल्या भाषणात त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. ते म्हणाले, " आज एखादा कारखाना उभा करायचा तर प्रथम आपण वीज, पाणी, रस्ता, फोन ही सारी आहेत का ह्याची खात्री करून घेतो. आजची तरुण पिढी सर्व सोयी असल्या तरी कारखाने काढावेत का नाही हयाचा विचार करते. कै. लक्ष्मणरावांनी किर्लोस्करवाडीत कारखाना काढला तेव्हा कारखान्याला अनुकूल असे काहीच नव्हते. प्यायला पाणी सुद्धा नव्हते. उजाड रान होते. पण लक्ष्मणरावांचा निश्चय कडवा होता, चिकाटी दांडगी होती, आत्मविश्वास पक्का होता. त्यांनी कारखाना काढला, यशस्वी केला आणि इतरांना शिकवून, स्फूर्ती देऊन आणखी कारखाने काढावयास मदत केली. हे कर्तृत्व असामान्य आहे. " तसेच मी कारखाने वाढवले, जगभर महाराष्ट्रात तयार केलेला माल पोचवला, हयाचेही तोंड भरून कौतुक केले. त्या समारंभाला दादाही होते. दोघेही एकाच आपलेपणाने आले, बोलले.

मला वाटते यशवंतराव जितके मोठे झाले त्यापेक्षा आणखी कितीतरी मोठे व्हायला पाहिजे होते. मला राजकारणातल्या अंतर्गत वाटा, प्रवाह हयांचा अनुभव नाही. ह्या प्रवाहांचा, वाटांचा यशवंतरावांच्या आयुष्यावर जो परिणाम झाला असेल त्यामुळेही पुढे पुढे त्यांच्या मोठ्या पदाला धक्का पोचला असेल. ते गेले तेव्हा मला वाटले, यशवंतरावांच्या कर्तबगारीच्या मानाने त्यांना आणखी मोठे स्थान मिळावयास पाहिजे होते. कदाचित माझी ही भावना व्यक्तिगत असेल. त्यांच्याच भाषेत सांगायचे तर कृष्णाकाठची ज्वारीची भाकरी आणि वांग्याची भाजी खाऊन वाढलेले आम्ही. आमच्यातून ते गेले तेव्हा त्यांची जागा रिकामी झाली, रिकामीच राहिली.

# यशवंतरावांचे वेगळेपण

## वसंतदादा पाटील

यशवंतरावजी चव्हाण हे एका गरीब कुटुंबामध्ये जन्माला आले होते. त्यामुळे शिक्षणाचा प्रश्न किंवा आयुष्यातील काही महत्त्वाकांक्षा बाळगण्याबद्दल काही मर्यादा होत्या. परंतु मनात महत्त्वाकांक्षा फार मोठी होती....आणि आपण शिकले पाहिजे याबद्दल त्यांच्या मनात विश्वास होता. श्रद्धा होती. त्यामुळे ते शिकत राहिले. शिकताना आलेल्या अनेक अडचणींवर त्यांनी मात केली आणि अखेरीस ते एलएल. बी. झाले. शिक्षणासंबंधात जरी त्यांच्या मनात महत्त्वाकांक्षा होती तरी सार्वजनिक जीवनाची त्यांना आवडही लहानपणापासून होती. विशेषत: कॉंग्रेस पक्षामध्ये काम करावयाचे आणि त्याद्वारे, त्या·आधारे देशामध्ये चांगले काम करून घ्यावयाचे यासाठी आपले सारे आयुष्य ते खर्च करीत होते. राज-कारणात त्यांनी अगदी तरुणवयापासूनच भाग घेतला. त्यामुळे त्यांना सभांमध्ये बोलण्याची चांगल्या प्रकारे जाण होती. एका बाजूला ते वाचनही करीत होते. त्यामुळे ते आपले विचार लोकांपुढे अतिशय प्रभावीपणे आणि उत्तम रीतीने मांडत असत.

१९४६ साली प्रथमतः ते निवडणुकीला उभे राहिले आणि निवडून आले. त्यानंतर त्यांनी येथे पार्लमेंटरी सेक्रेटरी म्हणून काम केले. १९५२ साली पुन्हा एकदा ते निवडणुकीस उभे राहिले व निवडून आले. आणि त्यानंतर त्यांनी पुरवठा खात्याचे मंत्री म्हणून काम केले. मध्यंतरीच्या काळात संयुक्त महाराष्ट्राच्या रूपाने एक ज्वलंत प्रश्न या महाराष्ट्रात निर्माण झाला होता. त्या वेळेस दोन विचार त्यांच्या मनात पूर्वीपासून होते. एक म्हणजे सबंध देशात चाललेल्या एका प्रवाहाबरोबर जायचे की स्वतंत्रपणे आपले याबाबतचे विचार मांडून त्याबद्दल आग्रह धरायचा, त्यासाठी पडेल तो त्याग करायचा काय हे ते दोन विचार त्यांच्या मनात त्या वेळेस होते. अर्थात कोठलाही त्याग करण्याच्या बाबतीत ते कधीच पाठीमागे राहिले नव्हते. १९३० साली जेव्हा प्रथमत: यशवंतरावजी स्वातंत्र्याच्या चळवळीत पडले तेव्हा वयाने लहान असूनही त्यांना शिक्षा झाली

होती. पुढे १९४२ ची क्रांती सुरू झाली आणि त्या वेळेसही त्यांना तुरुंगवास घडला. कोठल्या तरी कामामध्ये दबून राहण्याचा त्यांचा स्वभाव नव्हता. उलट एखाद्या कारणाने ते दाबले गेले तर उफाळून येऊन नेटाने कामाला लागत असत. संयुक्त महाराष्ट्राच्या बाबतीत शेवटी त्यांनी निर्णय घेतला की, विशाल महाराष्ट्र चालवावयाचे. त्या काळात ते महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले ही एका बाजूला आनंदाची गोष्ट होती, पण त्यामध्ये महाराष्ट्र सुखी नव्हता, समाधानी नव्हता, तर नाराज होता. त्या वेळच्या त्यांच्या विचारप्रणालीमुळे चळवळ करणारे तसेच अन्य लोकही यशवंतरावांना चांगले म्हणत नसत, तर त्यांना सूर्याजी पिसाळ म्हणत असत. म्हणजे एका बाजूला त्यांना या गोष्टीचे दुःख होत असे आणि दुसऱ्या बाजूला त्यांना राज्यही चालवावे लागत होते. हे करीत असताना त्यांनी असा विचार मांडला होता की, देशाच्या नेतृत्वाबरोबर राहायचे. जे काही प्रश्न सोडवून घ्यावयाचे ते त्या वेळच्या नेतृत्वाला बरोबर घेऊन सोडवायचे असा त्यांचा स्वभाव होता. त्यासाठी जो प्रश्न सुटला पाहिजे असे त्यांच्या मनाला वाटत असे त्याकरिता तो प्रश्न नेतृत्वाला बरोबर घेऊन सोडवावयाचा. त्यासाठी त्यांना पंडित जवाहरलाल नेहरूंना बरोबर घेऊन राहावे लागले. त्यांच्यानंतर इंदिरा गांधी त्या वेळी अखिल भारतीय काँग्रेस पक्षाच्या अध्यक्षा होत्या. त्यांना बरोबर घ्यावे लागले. जी गोष्ट घडली होती ती त्यांना बदलावयाची होती. त्यासाठी पंडितजींना बरोबर घेऊन त्यांचे मन वळविणे आवश्यक होते. त्याकरिता त्यांनी योग्य संधी साधली व पंडितजींना बरोबर घेऊन सांगितले की, "आपल्या येथे विशाल महाराष्ट्र चालणार नाही, संयुक्त महाराष्ट्र झाला पाहिजे." त्या वेळीच संयुक्त महाराष्ट्र झाला. तेव्हा या मंडळींचे साहाय्य झाले. असे करताना राज्य चालविण्याच्या कामात अडचण निर्माण होणार नाही याची दक्षता घेतली व संयुक्त महाराष्ट्र निर्माण करण्याच्या कामामध्ये ते यशस्वी झाले. महाराष्ट्राचा मंगल कलश महाराष्ट्रामध्ये यशवंतरावजींनी आणला.

यशवंतरावजींच्या लहानपणीच्या काळातली एक गोष्ट सांगितली जाते. यशवंतरावजी शाळेमध्ये शिकत होते. टिळक हायस्कूलमध्ये शिकत होते. त्या वेळी कोणी तरी पाहणी करणारे अधिकारी वा शिक्षक किंवा वरिष्ठ माणूस वर्गात आला असता त्यांनी यशवंतरावजींना विचारले की, तू कोण होणार? वास्तविक पाहता त्या वेळी ते सातवीपर्यंतचे शिक्षण संपवून नुकतेच इंग्रजी

शाळेत हायस्कूलमध्ये गेले होते. त्यांनी सांगितले की, " मी यशवंतराव चव्हाण होणार. " इतक्या लहान वयात मी यशवंतराव चव्हाण होणार ही आत्मविश्वासाची गोष्ट त्यांनी बोलून दाखविली.

यशवंतरावजींच्या बाबतीत असे सांगता येईल की, एखादी गोष्ट त्यांच्या मनाला पटली नसेल व नाइलाजाने करावी लागली तर ते बेचैन होत असत. हुतात्मा चौकामध्ये हुतात्म्यांचा पुतळा उभारून हुतात्मा स्मारक उभे करावयाचे होते व तो कार्यक्रम ठरला होता. त्या वेळी ते महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते. परंतु त्यांना त्या कार्यक्रमाचे आमंत्रण नव्हते. अर्धा तास अगोदर एकदम यशवंतरावजी उठले व कपडे करून तयार झाले. कुठे जावयाचे काही कार्यक्रम ठरला नव्हता. कोणाच्या काही लक्षात येईना की, साहेब कुठे चालले. त्यांनी गाडी बाहेर काढली व ड्रायव्हरला सांगितले की, हुतात्मा चौकामध्ये चला व ते हुतात्मा चौकामध्ये पोहोचून गेले. लोकांमध्ये राहण्याची त्यांना हौस असे. लोकांपासून बाहेर जावयाचे, दूर राहावयाचे, त्यांची पर्वा करावयाची नाही असे त्यांना कधी वाटले नाही. सत्तेवर आल्यानंतर आपल्याला वाटेल ते करावयाचे वा कसेही चालावयाचे असे त्यांनी कधी कोठे केले नाही. संयुक्त महाराष्ट्र झाला त्या वेळी एक वाद निर्माण झाला. त्या वेळी " हे राज्य कुणाचे, मराठ्यांचे की मराठीचे " असा तो वाद होता. सांगलीमध्ये सभा होती. त्या वेळी यशवंतरावजी उभे राहिले व स्पष्ट-पणे, खंबीरपणे सांगितले की, हे राज्य मराठ्यांचे नाही, हे राज्य मराठीचे आहे. त्या वेळी हा वाद श्री. माडखोलकरांनी निर्माण केला होता. एखादा वाद निर्माण केला गेला तर तो लवकर थांबवावयाचा, तोडावयाचा व त्या वाढलेल्या वादातून पुन्हा नवे काही प्रश्न निर्माण होता कामा नयेत असे पाहावयाचे असा त्यांचा दृष्टिकोण होता. आम्ही सर्व प्रांतांतील लोक एकत्र आलो. त्यात विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र, कोकण सर्व प्रांतांतील लोक होते. तेव्हा कोठलीही गोष्ट पाहावयाची झाली तर तिच्याकडे माणुसकीच्या दृष्टिकोणातून पाहिले जात असे. काही लोकांना बरोबर घेताना दुसऱ्यांना दुखविणार नाहीत, ते अपमानित होणार नाहीत, कुठे तरी त्यांच्या मनाला लागेल अशी गोष्ट घडणार नाही अशी, बारीक पद्धतीने ते प्रत्येक वेळी पाहणी करीत असत, बघत असत. एकदा आम्ही शिबिराच्या निमित्ताने महाबळेश्वरला जमलो होतो. यशवंतरावजी नवा विचार आम्हाला देत असत. ते एकदा बोलू लागले की, एकेक घंटा, दोन घंटे बोलत असत.

कोणताही प्रश्न ते अशा पद्धतीने मांडत असत की, त्यामुळे एक वेगळेच आकर्षण निर्माण होत असे. त्या वेळी महाबळेश्वर येथे त्यांनी अॅग्रोइंडस्ट्रीजचा विचार मांडला. त्यापूर्वी आम्ही कुठे तरी सॉ-मिल चालविणे म्हणजे अॅग्रोइंडस्ट्रीज सुरू करणे या विचारात होतो. परंतु शेतमालावर आधारित असे कारखाने काढले पाहिजेत, त्यासाठी भांडवल उभे केले पाहिजे अशी कल्पना आमच्या मनात त्यापूर्वी आली नाही. आम्हाला त्यांनी ती सांगितली व अनेक लोकांच्या, कार्यकर्त्यांच्या मनामध्ये ती रुजली. सुरुवातीला त्यांनी जेव्हा ही कल्पना मांडली त्या वेळी एक प्रकारच्या हवेत आम्ही तरंगत होतो. त्यासाठी किती त्याग करावा लागेल हे आम्हाला कळले नव्हते. त्याची जाणीव यशवंतरावांनी करून दिली. आज महाराष्ट्रामध्ये जी अॅग्रो-इंडस्ट्रीज दिसत आहे ती यशवंतरावजींच्या एका स्वप्नातून निर्माण झालेली आहे. नवेनवे कार्यकर्ते निर्माण झाले पाहिजेत व त्यांनी जबाबदारी घेतली पाहिजे, लोकांना जबाबदारीने काम करता येईल या दृष्टीने त्यांचे शिक्षण झाले पाहिजे असे त्यांना वाटत असे. त्यामधून पंचायत राज्याची कल्पना पुढे आली. ती प्रथम महाराष्ट्रामध्ये अंमलात आणली. महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनामध्ये आज जी शेकडो माणसे दिसतात ती यामुळेच. जर पंचायत राज्य निर्माण झाले नसते तर जिल्हा परिषदा निर्माण झाल्या नसत्या. पंचायत समित्या निर्माण झाल्या नसत्या. त्या संस्था चालविणारी शेकडो माणसे आपल्याला दिसली नसती. आपले हे राज्य चालविण्यासाठी कोणी सुशिक्षित माणूस आहे का ते पाहण्याचा प्रयत्न करावा लागला असता. यशवंतरावजींनी ही गोष्ट केली व तिचा परिणाम चांगला झाला. आज सार्वजनिक जीवनात जे चैतन्य दिसत आहे ते यामुळेच निर्माण झाले आहे. यशवंतरावजी मुख्यमंत्री झाले पण अभिमानाने, गर्वाने ते कधी वागले नाहीत. त्यांच्याकडे कोणीही यावे, भेटावे, चर्चा करावी, सांगावे. नवनवी पुस्तके वाचण्याचा छंद त्यांना होता. त्यातून सारखे ज्ञान शोधत. त्यांच्या पाठीमागे काय आहे असे पाहावयाचे ठरविले तर सदैव पुस्तकांचे गठ्ठे आपणास दिसतील. नवनवे वाचायचे त्यांना वेड होते. पैसे हातामध्ये आले की, १०–१२ नवी पुस्तके आणीत व वाचून काढीत असा त्यांचा स्वभाव. मिरजेला पूर्वीपासून एक राजे होते, त्यांना वाचनाचा छंद होता. त्यांनी एकदा यशवंतरावजींना चहाला बोलाविले. आपण किती पुस्तके वाचतो हे त्यांना दाखवायचे होते. तेव्हा ते त्यांच्याशी बोलत

बसले व मी हे नवे पुस्तक वाचले, ते नवे पुस्तक वाचले असे यशवंतरावांना सांगू लागले, परंतु त्यांच्याशी जेव्हा यशवंतराव चर्चा करू लागले तेव्हा त्यांना कळून चुकले की, या माणसाला आपल्यापेक्षा काही कमी ज्ञान नाही, वाचनाची अधिकच आवड आहे.

---

(महाराष्ट्र विधान परिषदेत मार्च १९८५ मध्ये शोक प्रस्ताव मांडताना केलेल्या भाषणावरून संकलित)

# सह्याद्रीचे लेणे

## रामभाऊ जोशी

यशवंतरावांचं व्यक्तिदर्शन हा अभ्यासाचा स्वतंत्र विषय आहे, कारण त्यांचे व्यक्तित्व व कर्तृत्व हे सह्याद्रीचे कोरीव लेणे होते. यशवंतराव चव्हाण यांचे व्यक्तिरूप, त्यांच्या संवयी, त्यांच्या आवडी-निवडी, सर्वसामान्य वागणं, बोलणं, तत्त्वज्ञान, त्यांच्या देशनिष्ठा, राष्ट्रभक्ती, स्वभाव, सामाजिक व राजकीय व्यवहार, या सर्वांना एक कलात्मक आकार होता. तुकड्या-तुकड्यांनी ते समजणार नाही. त्यातले देखणेपण भावणार नाही. कारण या प्रत्येकाचा त्यांच्यामध्ये एक विशेष आढळतो.

यशवंतरावांच्या साऱ्या आयुष्याचं आणि चरित्राचं महत्त्व असं आहे की मानव्याचे आजवर जे प्रचंड प्रतिनिधी झाले आहेत त्यांतच यशवंतरावांची गणना करायला हवी. राजकारणात अहर्निश राहूनही यशवंतराव माणुसकीची एक दृश्य मूर्ती होती. मानवी मनाची ती एक बेरीज होती. त्यांच्या चरित्रात आणि कर्तृत्वात उत्तरोत्तर प्रगल्भ होत जाणारे मानवी मनाचे अनेकानेक अनुभव कोंडून धरलेले होते. कस्तुरीचा सुगंध कोंडून धरावा तसे.

माणसाच्या मनाला पडणारे सगळे प्रश्न त्यांना पडलेले असणारच, कारण ते माणूस होते. यातील अधिकांत अधिक प्रश्न त्यांनी सोडविले हे त्यांचं खरं वैभव. हे वैभव उठून दिसतं हे खरं परंतु लोकहिताचं कार्य आघाडीवर राहून करणाऱ्या राजकारणी नेत्याला किती आणि कशा अनंत यातना भोगाव्या लागतात याचं यशवंतराव हे एक प्रतीक आहे. प्रारंभापासूनच त्यांचं जीवन पाहिलं तर अविश्वास, अवमान, फितुरी, निंदा, टीका अशा अनेक प्रसंगांतून त्यांच्या जीवनाचा प्रवास घडलेला आढळतो. जनतेच्या उन्नतीला आवश्यक आणि सदैव उपकारक होणारे उपाय सुचतील त्यांचा लोकांना उपदेश आणि राज्ययंत्रणेद्वारे प्रयोग करीत राहणं हे त्यांनी जीविताचं इतिकर्तव्य मानलं होतं. ते राजकारणी निश्चित होते. परंतु आपल्या दिनक्रमाला त्यांनी धंदेवाईक राजकारणाचं स्वरूप प्राप्त होऊ दिलं नाही. धंदेवाईक राजकारणी स्वार्थाकडे लक्ष ठेवून असतात.

यशवंतरावांचं लक्ष होतं जनतेच्या उन्नतीकडे. यशवंतराव आणि अन्य पुष्कळसे राजकारणी यांच्या दृष्टिकोणात मुळातच ही तफावत होती.

राजकीय क्षेत्रात वावरणारांच्या दृष्टिकोणात अशी मूलभूत तफावत असेल तर त्यातून विधायक दृष्टिकोणाचा पाठपुरावा करणाराला कोंडीत पकडून नेस्तनाबूत करण्यासाठी धंदेवाईक राजकारणी टपून बसलेले असतात. लोकांच्या मनात गैरसमज निर्माण करून देण्याच्या कामात आघाडीवर राहतात. यशवंतराव गैरसमजाचे बळी ठरावेत अशासाठी अनेकदा प्रयत्न झाले. त्यांच्या बाबतीत त्यांच्या राजकीय शत्रूंचाच गैरसमज होता असं नव्हे, चांगले मित्र म्हणविणाऱ्यांचाही गैरसमज होता. दृष्टिकोणात तफावत हे त्याचं मुख्य कारण. त्यातून कठोर टीका झाल्या, अवमान करण्यात आला, निंदानालस्ती करण्यात आली. विश्वासाला तडा जाईल असेही प्रसंग उभे राहिले. राजकारणातील अन्य एखाद्या माणसाचा या टीकेनं चोळामोळा झाला असता. टीकेचा मनावर परिणाम हा होतोच. यशवंतरावांचं मन कठोर नव्हतं. परंतु त्यांनी टीका सहन केली याचं कारण जबरदस्त आत्मसंयमन ! टीकेचा उपयोग त्यांनी क्षमाशीलता वाढविण्याकडेच केला. टीकेतून नवा विचार, नवा मुद्दा शोधला. टीका ही मार्गदर्शक ठरते, स्वतःला त्यांतून सुधारणा घडवून आणता येते हा त्यांचा सिद्धान्त ! देशात आणि जगात होणाऱ्या दैनंदिन घडामोडींचा मागोवा, रोज प्रातःकाळी समोर येणाऱ्या वर्तमानपत्रांतून ते घेत असत. त्याचप्रमाणे त्यांनी स्वतः केलेल्या निर्णयांतून समाजात कोणा व्यक्तीवर, कोणा गटावर अन्याय झाला नाही ना याचा शोध, टीकात्मक लिखाणांतून, विचारांतून घेत असत. टीकेतून स्वतःमध्ये सुधारणा घडवून आणता येते हा त्यांचा सिद्धान्त यातूनच तयार झाला असला पाहिजे. हा सिद्धान्त त्यांच्या मनीमानसी पूर्णत्वानं रुजला होता. टीकापटू समक्ष त्यांच्या तोंडावर टीका करीत असत. दुराग्रहानं काही सांगत असत पण अशा वेळी ‘ अरे ला कारे ’ असं न करता ‘ तुम्ही म्हणता अशीही एक बाजू असू शकते ’ असं अगदी माफक अन् मृदू शब्दांत बोलून टीकापटूला ते गप्प करीत. टीकाटिप्पणीचे अधिकाधिक काळ चर्वितचर्वण होत राहणं हे राजकारणाच्या आणि समाजकारणाच्या दृष्टीने कोणालाच फलदायी ठरत नाही. राजकारणातले विरोधक जरी झाले तरी ते जनतेच्या उन्नतीच्या तळमळीपोटीच टीकेचा अवलंब करीत असतात. अशा टीकेतील विधायक आशय यशवंतराव आत्मसात् करीत

असत. जनतेची उन्नती हीच एक गोष्ट त्यांना अभिप्रेत होती. त्यामुळे कमालीची कठोर टीका झाल्यावरही वर उल्लेख केलेले मृदू शब्द त्यांच्याकडून ऐकावयास मिळत असावेत.

यशवंतरावांच्या निघून जाण्यानं खरं खरं नुकसान झालं असेल तर समाज-परिवर्तनवादी, लोकशाहीवादी राजकारणातील विरोधकांचं ! विरोधकांचा विरोध व्यवहारी भूमिकेतून समजून घेऊन त्यांना मुत्सद्दीपणानं हाताळणारा आणि त्यांच्या कठोर टीका बोथट बनवून देशाच्या प्रगतीच्या कामात विरोधकांचा सहभाग निर्माण करून घेणारा मुत्सद्दी, संसदपटू अशी त्यांनी आपली प्रतिमा दिल्लीत निर्माण केली होती. पार्लमेंटमध्ये त्यांनी विरोधकांचे चौफेर हल्ले हसत हसत झेलले आणि परतवले ते आत्मसंयमनामुळे आणि देशहिताला प्राधान्य देण्याच्या दूरदृष्टीमुळेच होय.

यशवंतरावांचा जन्म सामान्य कुटुंबात झाला आणि गरिबीत, प्रतिकूल सामाजिक परिस्थितीत राहून त्यांच्या मातोश्रींनी त्यांचं लालनपालन केलेलं असलं तरी यशवंतराव जन्मतःच काही गुण घेऊन आलेले असावेत. नंतरच्या काळात विद्यालयातील, महाविद्यालयातील अभ्यास, वाचन, मनन-चिंतन सतत सुरू राहिल्यानं जन्मतः असलेल्या गुणांवर या साऱ्यांचे संस्कार होत राहिले आणि मूळ गुण अधिक तेजस्वी, कार्यक्षम ठरण्यास मदत झाली. ते मोठे हुषार विद्यार्थी म्हणून गणले गेले नव्हते. परंतु विविध विषयांच्या वाचनाचे त्यांनी अत्यंत परिश्रम घेतले, ज्ञान हस्तगत केलं. त्यामुळे नंतरच्या काळात त्यांना ज्ञातेपण मिळविता आलं. या ज्ञातेपणाची सोबत त्यांनी आयुष्याच्या अखेरीपर्यंत कायम राखिली.

एकाहत्तर वर्षांच्या आयुष्यातील पन्नास-पंचावन्न वर्षांचा काळ त्यांनी राजकारणावर, राजकीय जीवनावर स्वार होऊन काढला. याचं कारण त्यांचं सखोल ज्ञातेपण. राजकारणात असले तरी त्याबाहेरच्या लोकांचे विचार ऐकण्यात आणि ते पचविण्यात कधी कंटाळा केला नाही. विद्वानांच्या संगतीची आवड तर होतीच पण त्याचबरोबर सामान्य, अडाणी, गावरानी माणसांची आवड त्यांनी सोडली नव्हती. गरिबांकडं अधिक लक्ष द्यायचं हा त्यांचा स्वभावच होता. सामान्यांची सुखदुःखं, त्यांच्या अडचणी, त्यांच्या भावना, वासना, यांची त्यांना ते स्वतः त्या अनुभवांतून गेलेले असल्यानं जाणीव होती. या साऱ्यांकडे, मग तो विद्वान

असो वा अडाणी, मानवतेच्या भूमिकेतून पाहात आणि बोलत. त्यामुळं त्यांच्या बोलण्याला वास्तवतेचं अधिष्ठान प्राप्त झालेलं असे. ती भाषा अंत:करणाचा ठाव घेत असे. ऐकणारा त्यांचा होऊन जात असे. लोकांवर निष्कपट, मोकळे-पणानं प्रेम करायला शिकणं हे समाजावर, राष्ट्रावर प्रेम करायला शिकण्याची पहिली पायरी आहे असा त्यांचा आणखी एक सिद्धान्त !

माणसाला प्रेमानं आपल्याकडं वळविण्याची कला त्यांनी आत्मसात् केलेली होती. निष्कपट प्रेम कसं करावं याचं दर्शन ते स्वत:च्या वागणुकीतून घडवीत. अडाणी शेतकरी, कामगार, विद्वान शास्त्री-पंडित, सनातनी, किंवा आधुनिक सुधारक, इंग्रजी शिकलेले न शिकलेले, तरुण-तरुणी, महिला, कलावंत, व्यापारी, नोकरदार, डॉक्टर, इंजिनिअर, राजकारणी, उद्योगपती, मुत्सद्दी, अर्थतज्ज्ञ, समाजधुरीण, साहित्यिक, कवी—कुणाशीही बोलायचं असो त्यांच्या त्यांच्या भाषेत ते बोलत असत. विचारविनिमय, चर्चा करीत असत. त्यामुळे त्यांचं म्हणणं प्रत्येकजण प्रसन्नपणानं ऐकत असे. राष्ट्रप्रेमाचं, देशभक्तीचं, देशाच्या विकासाचं, समृद्धीचं, कार्यकर्त्यांच्या वागणुकीचं स्पष्टीकरण करताना त्यांच्या वाणीला स्फुरण चढत असे. त्यांचं भाषण तसं सहजमधुर होतं. उत्तम उत्तम दृष्टान्त ते सहज बोलून जात. भाषण सहजमधुर असलं तरी त्यातून व्यासंगाचा प्रत्यय येत असे. सहजपणा आणि अर्थवत्ता हे त्यांच्या वाणीचे मुख्य धर्म होत. उत्तम वक्तृत्व, उत्कृष्ट रसिकता आणि तर्कनिष्ठ बुद्धी यामुळे कोणतेही प्रमेय नवीन तऱ्हेनं, सोप्या शब्दांत मांडणं त्यांना साध्य झालं होतं. त्यांचं भाषण ऐकून झाल्यावर त्याचा सुगंध नेहमीच मागे दरवळत राहिलेला असायचा. या भाषणाचा आणखी एक विशेष असा की, एखाद्या वाहयाताला खडसावून ताळ्यावर आणण्याचं सामर्थ्यही प्रसंगी प्रचीतीला यायचं.

एखाद्याला खडसावायचा असलं तरी मुखातून कधी अपशब्द बाहेर पडायचा नाही. सगळं कसं संयमशील ! स्वत:चा बडेजाव कधी सांगितला नाही. राग, लोभ, मद, मत्सर त्यांनी गिळला होता असं नव्हे. पण संयमानं या विकारांना इष्ट असं वळण त्यांनी लावलं असलं पाहिजे. मत्सरानं, द्वेषानं पेटले आहेत असं त्यांच्या जिभेनं कधी दाखवलं नाही. असं नसतं तर दुसऱ्याची मनसोक्त प्रशंसा त्यांच्या वाणीतून प्रकट होणं अशक्य ठरलं असतं. एखाद्यानं हलकं-फुलकं काम केलेलं असलं तरी त्याची ते मुक्तपणे प्रशंसा करीत. यातून त्याला

अधिक काम करण्याची प्रेरणा सहजगत्या मिळे. उत्तेजन देण्याची वृत्ती राष्ट्राभिमानी, निरहंकारी माणसाच्या ठिकाणीच असू शकते.

स्वातंत्र्योत्तर काळात यशवंतराव सत्तेच्या स्थानी आरूढ झाले, ज्येष्ठ-श्रेष्ठ सत्ताधारी बनले; परंतु स्वातंत्र्यपूर्व काळात, तुरुंगात असताना किंवा बाहेर समाजात मिसळताना, स्वातंत्र्य कशासाठी, याचं सखोल चिंतन करून कामाची दिशा निश्चित केली होती. त्यामुळे सत्तेच्या ठिकाणी पोहोचताच सामाजिक परिवर्तन, महाराष्ट्राची आणि संपूर्ण देशाची सर्वांगीण प्रगती आणि त्यासाठी समाजातील सर्व थरांतील लोकांना प्रोत्साहन देऊन शेकडो-हजारो लोकांना कामाची संधी प्राप्त करून देणं आणि विकासाच्या कामात जास्तीत जास्त लोकांचा सहभाग राहील यासाठी जागरूक राहणं या ध्येयाची बांधिलकी त्यांनी स्वीकारली. सत्याग्रही समाजवादी आणि प्रगतिशील लोकशाहीवादी असं त्यांच्या वैचारिक जडणघडणीचं यथार्थ स्वरूप होतं. क्रियावान, कर्तृत्वपूर्ण आंदोलकांचं नेतृत्व त्यांनी केलं. म. जोतिबा फुले, शाहू महाराज, लो. टिळक, विठ्ठल रामजी शिंदे, कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. बाबासाहेब आंबेडकर ही त्यांची स्फूर्तिस्थाने होती. विचारांचा पक्केपणा आणि धडाडीने ते व्यक्त करण्याचा बाणा ही त्यांची दोन वैशिष्ट्ये त्या स्फूर्तीतूनच निर्माण झाली असली पाहिजेत.

सत्तेत पोहोचल्यावर, उत्कृष्ट प्रशासक म्हणून त्यांचा लौकिक झाला. याचं एक महत्त्वाचं कारण आहे. प्रशासक हा शिस्तीचा असावा, पण हृदयशून्य नसावा हे यशवंतरावांनी कृतीनं दाखविलं. सत्तेत श्रेष्ठ ठिकाणी असतानाही त्यांनी समाजातील सामान्यांनाही थारा दिला. एकदा थारा दिल्यावर त्याची अवहेलना केली नाही. गुण आणि अवगुण पाहून त्यांच्यासाठी कामाची, कार्याची योजना केली. जे त्यांच्या सहवासात आले आणि कामाला वाहून घेतले ते त्या त्या क्षेत्रात पावन झाले, विधायक कार्य करू लागले. यापैकी कितीतरी असे असतील की त्यांना सहवासात येण्याचा आणि मार्गदर्शन मिळण्याचा योग प्राप्त झाला नसता तर त्यांचं आयुष्य कदाचित कायमचं बरबाद होण्याची शक्यता होती. यशवंतरावांनी महाराष्ट्रात आणि देशात ज्या अनेकांना संधी दिली, मार्गदर्शन केलं त्यांच्यातील कित्येकजण पुढच्या काळात लाखो रुपयांच्या, व्यापारी किंवा औद्योगिक उलाढाली करण्यात तरबेज बनले. काहींनी ग्रामीण भागाचा कायापालट करण्यात, उत्पादन वाढविण्यात उच्चांक प्रस्थापित केले. कोणी सहकारमहर्षी, उद्योग-

महर्षी, कृषि-पंडित बनले. यशवंतरावांनी या सर्वांमध्ये चढाओढ लावली ती अधिक चांगलं काम कोण करतो याची ! त्यांचं बोट धरून जे राजकारणात अवतरले त्यांच्यातील अनेकजण राज्याच्या किंवा देशाच्या सत्तास्थानापर्यंत पोहोचले.

विद्वान, बुद्धिवान यांना साहाय्य करण्यास सारेच सरसावतात. परंतु सारा समाज हा बुद्धिमानांचा असत नाही. वाल्मिकीची पूजा करताना वाल्याचा वाल्मिकी कसा होईल आणि सारा समाज सुखी कसा होईल याकडेच जो लोकनेता असेल त्याला लक्ष द्यायचं असतं. हे कार्य सर्वाधिक महत्त्वाचं असतं. परंतु हे घडायचं तर लोकनेत्याच्या अंगी योजकता हा गुण असावा लागतो.

योजकता हा यशवंतरावांचा सर्वांत मोठा गुण होता. ते नेते बनताच अनेक माणसं जवळ आली. यामध्ये हौसे, गवसे, नवसे असणं स्वाभाविकच होतं. टीकाकारांनी त्याचं वर्णन शंभुमेळा असं केलं. यशवंतरावांनी ही टीका सहन केली. सामान्यांना जवळ करण्यातील हेतू त्यांना विकासाच्या, समृद्धीच्या कामात संधी प्राप्त करून देणं, ग्रामीण भागाचा, तेथील कृषिउद्योगाचा कायापालट घडविणं हा होता. अर्थातच हे नागरी भागातील टीकाकारांच्या कल्पनेच्या पलीकडील होतं. राजकीय, पक्षीय यशासाठी यशवंतराव सामान्यांना जवळ करीत आहेत असं सोईस्कर उत्तर नागर टीकाकार काढीत राहिले. परंतु यशवंतरावांच्या स्वभावाची घडण आणि वृत्ती, लोकांकडे पाहण्याचा, त्यांना समजून घेण्याचा दृष्टिकोण ज्यांना समजला त्यांनाच या कोड्याचं उत्तर सापडण्याची शक्यता.

म. फुले, शाहू महाराज, विठ्ठल रामजी शिंदे, कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. आंबेडकर यांच्यापासून स्फूर्ती घेतलेले यशवंतराव सामान्यांपासून दूर राहणे केवळ अशक्य. कारण या सर्व विचारवंतांनी सामान्यांच्या जीवनाला उजाळा देण्याचा संदेशच दिला आहे. डॉ. आंबेडकरांनी तर पददलित आणि छळवाद सोसणाऱ्या समाजात स्वाभिमानाची ज्योत पेटविली. माणुसकीचे हक्क संपादन करण्यासाठी त्यांना प्रवृत्त केले, त्यांची मने तयार केली. त्यांच्या या कार्याबद्दल यशवंतरावांना आदर असे. त्या आदराच्या पोटी त्यांनी महार वतनाचा कायदा रद्द केला. नवबौद्धांना न्याय देण्यासाठी ते सरसावले. त्यासाठी त्यांनी केंद्र किंवा इतर प्रदेश राज्ये यांच्या प्रतिक्रियांची तमा बाळगली नाही. म. फुले आणि कर्मवीर भाऊराव पाटील यांना समोर ठेवूनच महाराष्ट्रात असताना, त्यांनी समाजातील सर्व थरांसाठी शिक्षणाची दारे खुली केली. औद्योगिक वसाहती निर्माण केल्या.

साहित्यिक, कलाकार, चित्रपट व्यावसायिक यांच्यात आत्मविश्वास निर्माण केला.

या संदर्भातही त्यांनी टीका सहन केली. समाजपरिवर्तनाचा, लोकांना शिक्षित बनवून जातिपातीच्या, उच्चनीचतेच्या बंधनातून त्यांना बाहेर काढणे याचा ध्यास त्यांनी घेतलेला असल्यानं टीकेमुळं ते विचलित होणं शक्य नव्हतं. मिळतं घेऊन पुढं जाण्याचा स्वभाव बनलेला असल्यानं प्रमुख ध्येयावर लक्ष केंद्रित करून ते एका पाठोपाठ एक निर्णय घेण्यात आणि त्याची अंमलबजावणी करण्यात गुंतून राहिले. आपल्या ध्येयपूर्तीसाठी मुद्दाम कोणाला दुःख द्यावे, कोणाचा अवमान करावा हे त्यांच्या स्वभावात नव्हते. कोणी अवमान केला तरी त्यांनी त्याच्याशी पराकोटीचे शत्रुत्व केले नाही. कटुता न ठेवणं आणि कटुता ठेवणारं वातावरण स्वतः निर्माण न करणं, त्याचबरोबर कटुता नसणारं वातावरण वाढविणं हा स्वभावधर्म बनला होता

महाराष्ट्रातील अनेकांना त्यांनी दिल्ली दरबारात पोहोचविले. याचं कारण, महाराष्ट्राच्या कर्तृत्वाचा आणि बुद्धीचा उपयोग संपूर्ण देशासाठी व्हावा आणि देशातील अन्य राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्र कमी पडू नये अशा उदात्त हेतूनं होय. स्वातंत्र्यपूर्व काळापासून देशहिताला त्यांनी स्वतः वाहून घेतलं होतं. देशहिताच्या या दिंडीत महाराष्ट्रातील बुद्धिवंतांना, अभ्यासकांना, कर्तृत्व दाखविण्याची उमेद असलेल्या तरुणांचा सहभाग त्यांना अपेक्षित होता. त्यासाठी संधी मिळण्याची आवश्यकता होती. यशवंतरावांनी तशी संधी उपलब्ध करून दिली. महाराष्ट्रात ' यशवंत युग ' अवतरलं होतं. राजकारणात त्यांचा शब्द, त्यांचे विचार, त्यांचे निर्णय हे अखेरचे मानण्याचा तो काळ होता. त्याचा लाभ त्यांच्या कॉंग्रेस पक्षातील कार्यकर्त्यांनी घ्यावा यात नवल कसले ! पण कट्टर विरोधकही अशा लाभापासून मुक्त राहू शकले नाहीत ! एरवी त्यांच्यातील काहींना दिल्ली दरबार दिसता ना ! यशवंतरावांची मात्र या संदर्भातील भूमिका व्यक्तिगत स्वरूपाची नसून राष्ट्रवादी राहिली.

ही भूमिका त्यांनी संधिसाधूपणानं स्वीकारलेली नव्हती. महाराष्ट्राचं स्वतंत्र राज्य अस्तित्वात आलं त्याच वेळी त्यांनी स्पष्ट केलं होतं की, " मराठी भाषिकांच्या जवळ जे देण्यासारखं आहे, त्यांच्या जीवनामध्ये जे चांगलं आहे, त्याचा त्याग करायचा असेल, उपयोग करायचा असेल, तर तो आम्ही भारतासाठी प्रथम करू. भारत राहिला तर महाराष्ट्र राहील. भारत मोठा झाला, तर महाराष्ट्र

मोठा होईल. भारताचं आणि महाराष्ट्राचं हित जेव्हा एकरूप होतं तेव्हा भारतही मोठा होतो आणि महाराष्ट्रही मोठा होतो, हा इतिहास आहे."

याच भूमिकेतून, भारत आणि महाराष्ट्र दोन्ही मोठे होण्यासाठी गुणी व्यक्तींना, मग ते स्वतःच्या काँग्रेस पक्षातील किंवा विरोधी असोत, ते दिल्लीत पोहोचावेत आणि त्यांच्या अंगच्या गुणांचा लाभ देशाला आणि महाराष्ट्राला व्हावा अशासाठी, कधी गुप्त, तर कधी उघडपणे, सहकार्याचा त्यांनी हात दिला. संधीचा लाभ घेतला आणि दिला.

उदात्त हेतूनं यशवंतरावांनी असे निर्णय केले परंतु ज्यांच्यासाठी हे घडविलं त्यांच्यातील कित्येकजण नंतरच्या काळात यशवंतरावांना आणि त्यांच्या उदात्त हेतूला विसरले, पाठमोरे झाले. इतकेच नव्हे तर दिल्ली दरबारच्या फंदफितुरीच्या आणि भाऊबंदकीच्या स्वार्थी राजकारणात रस घेऊ लागले, त्यातच रंगले. यशवंतरावांचा ज्यामुळे आणि जेणेकरून अवमान घडेल, महाराष्ट्रातील त्यांच्या मान्य नेतृत्वाला सुरुंग लागेल अशा कारवायांसाठी फंदफितुरांना राबवणे, त्यांना सत्तेचे तोबरे देणे, कागाळ्या करण्यास प्रवृत्त करणे हा तर दिल्ली दरबारचा पिढीजात वारसा! दिल्ली दरबारचा आणि अस्तन्यातील निखाऱ्यांचा शह-काटशहाचा असा जाच यशवंतरावांनी आयुष्याच्या उत्तरार्धात, एक तपाहून अधिक काळ सहन केला.

महाराष्ट्रात आणि दिल्लीत यशवंतरावांच्या नेतृत्वाच्या पाठीशी सारे एकसंध राहते तर महाराष्ट्राची नंतरच्या काळात जी वाताहत झाली तिला आळा बसण्याची शक्यता होती. पण हे घडायचं नव्हतं.

"मला आता माझ्या नेत्यांकडून किंवा जनतेकडून काही मिळवायचं नाही, मी तृप्त झालो आहे" असं यशवंतरावांनी खाजगीरीत्या आणि जाहीर सभांतून, मुलाखतीतून अनेकदा सांगितलं. परंतु दिल्लीनं त्याकडं दुर्लक्ष केलं. महाराष्ट्रातील जे कोणी दिल्ली दरबारी भाट बनले आणि सत्तास्थानात अधिक ज्येष्ठ स्थानाची हाव धरून राहिले त्यांनी 'मराठा नेता' हे बुजगावणं पुढं करून दिल्ली दरबारशी कानगोष्टी करण्यापर्यंत मजल मारली. "यशवंतरावांनी महाराष्ट्रात 'मराठा' राज्य प्रस्थापित केलं अन् त्यांचा दिल्लीवर डोळा आहे तेव्हा सावध!" असा हा इशारा होता. अशा कानगोष्टी करणारांत मराठेतर असतील तर एकवेळ समजू शकते, पण मराठेतरांच्या या कानगोष्टीत त्यांचे सहकारी म्हणविणारेही दंड

थोपटून सामील झालेले पाहताना ‘ हेच फळ काय मम तपाला ’ असं म्हणण्याची पाळी यशवंतरावांवर आली असल्यास नवल नव्हे. “ मी सर्वांकडे मित्रत्वाच्या भावनेनं पाहतो, परंतु माझा शत्रू कोण आणि मित्र कोण हे मला उमगत नाही. दिल्लीत तर कधीच उमगले नाही ! ” असं यशवंतराव सांगत असत ते अशा विचित्र अनुभवामुळेच सांगत असावेत.

यशवंतराव बहुजन समाजाचे नेते होते हे सूर्यप्रकाशाइतके स्वच्छ आहे. परंतु बहुजन समाज म्हणजे एक विशिष्ट समाजाचा वर्ग असं काही मंडळी गृहीत धरतात. यशवंतरावांना याचीही जाणीव होती. त्यामुळे बहुजन समाज म्हणजे नेमका कोणता समाज हे बहुजन समाजाला आणि अन्य समाजालाही त्यांनी समजून सांगितलं ते असं की, ‘ज्यांची सुखदु:खं समान आहेत तो बहुजन समाज. ’ वस्तुत: यशवंतराव या समाजाचे प्रतिनिधी होते. परंतु ‘ मराठा नेता ’ असा शिक्का मारणारांना त्याचे काय !

बहुजन समाज या शब्दाबद्दल म्हणजे एका विशिष्ट वर्गाबद्दल यशवंतरावांना मनापासून कधी प्रेम वाटलं नाही. महाराष्ट्राच्या आणि देशाच्या समाजजीवनातले सर्व थर शहाणे व्हावेत, त्यांना विकासाची संधी मिळावी यासाठीच त्यांनी प्रयत्न केले. व्यक्तिपूजा आणि एकाच माणसाचं नेतृत्व ही कल्पना त्यांना असह्य वाटे. निश्चित अशा कार्यक्रमावर आधारलेलं सामुदायिक नेतृत्व त्यांना मान्य होतं. अशा नेतृत्वाच्या मार्गदर्शनामुळेच त्यांचा पिंड घडला. त्यामुळे महाराष्ट्रात असताना आणि दिल्लीत पोहोचल्यावरही राजकीय क्षेत्रात नेतृत्व प्रस्थापित करण्यासाठी त्यांनी निरनिराळ्या जिल्ह्यांतील जिद्दीच्या कार्यकर्त्यांना मोठ्या प्रमाणात संधी मिळवून दिली. राजकारणाच्या मुख्य प्रवाहात त्यांना सामील करून घेतले. महाराष्ट्रात नेत्यांची आणि कार्यकर्त्यांची एक नवी पिढी त्यातून जन्माला आली. याच पिढीतील काहीजण पुढच्या काळात यशवंतरावांना अपमानित करण्यास धजावले. हे त्यांचं दुर्दैव ! महाराष्ट्रातलं राज्य हे ‘ मराठी ’ राज्य आहे, ‘ मराठा ’ नाही असं त्यांनी उच्च रवानं सांगितलं होतं, परंतु दिल्लीकरांनी आणि त्यांच्या कच्छपी असलेल्यांनी त्याकडं सोयीस्कर दुर्लक्ष केलं.

असं असलं तरी अपमानित करणाऱ्यांनाही कटुतेची वागणूक द्यायची नाही हे व्रत त्यांनी अखेरपर्यंत पाळलं. राजकीय क्षेत्रात त्यांच्याविषयी कठोरपणानं बोलणाऱ्यांना आणि वागणाऱ्यांनाही त्यांनी सन्मानानं वागवलं. याचं कारण

त्यांच्यासमोर, बोलणाऱ्या, लिहिणाऱ्या किंवा वागणाऱ्या माणसांपेक्षा देशहित हे प्रकर्षानं होतं. त्यांनी आपल्या स्वभावधर्माला मुरड पडू दिली नाही. अगदी आयुष्याची संध्याकाळ समीप आलेली असताना, एकाकी आयुष्य घालवीत असताना, दिल्लीनं त्यांना अपमानास्पद वागणूक दिली. महाराष्ट्रातील एकेकाळचे सवंगडी कुत्सितपणे हसत आहेत हेही त्यांनी पाहिलं. तरी यशवंतरावांनी कोणा-बद्दलच आपल्या मनात कटुता ठेवली नाही. उलट ज्यांच्या मनात कटुतेनं घर केलं होतं ती त्यांची कटुता नाहीशी करण्याचाच आपल्या शांत वागणुकीनं प्रामाणिक प्रयत्न केला.

स्वभावाचा हा एक आगळा पैलू म्हणावा लागेल !

यशवंतरावांच्या व्यक्तिमत्त्वात जागोजागी आशावादित्व आढळतं. निराशेच्या निबिड अंधकारातून त्यांचा आयुष्याचा प्रवास घडला. परंतु निराशेचा कोणताही कठोर अनुभव त्यांना निराशेत दडपू शकला नाही. याचं कारण, त्यांनी आपली दृष्टी नेहमीच प्राप्त परिस्थितीच्या आणि प्राप्त काळाच्या पलीकडे ठेवली. दृष्टीची गती पल्लेदार राखल्यानं निराशा त्यांना रोखू शकली नाही. प्राप्त कर्तव्य करीत राहिलं तर संकटाचा अंत घडवून आणता येतो हा अनुभव त्यांच्या राजकीय आणि सामाजिक वाटचालीत भरपूर जमा झालेला आढळतो. ते स्वतः लोक-संग्राहक आहेत. स्वतःच निराश बनते तर त्यांना इतरांना प्रेरणा देता आली नसती. सर्वसामान्य लोकांसाठी त्यांनी अखंड काम केलं आणि हे करीत असताना प्रतिकाराचे तीव्र आघात सोसले. तरीही ते आशावादी राहिले.

कर्तृत्ववान माणसांचा सहवास हा त्यांचं व्यक्तिमत्त्व घडण्यास पुष्कळच उपयुक्त ठरला. शांत व गंभीर वृत्ती ठेवून आपल्या कार्यक्षेत्रात अनेक कर्त्या माणसांना त्यांनी सामावून घेतलं. शुद्ध विचाराचा सतत पाठपुरावा केला. टीका झाली, हेत्वारोप झाले, शिवीगाळ झाली तरी लोकनेत्याला आवश्यक असलेली मनाची शांतता ढळू दिली नाही. स्वतः माणुसकीनं जगायचं आणि सभोवताल च्यांना जगवायचं तर मनाची शांतता अथांग ठेवावी लागते. तशी ही शांतता होती. राजकीय आणि सार्वजनिक जीवनात त्यांनी यशाचा जो पल्ला गाठला त्याचं मूळ त्यांच्यातील व्यक्तिगत गुणवत्तेचा दर्जा, सचोटी, प्रामाणिकपणा, चारित्र्य आणि अंगीकृत कार्याबद्दलची निष्ठा यांत सापडते. त्यांच्या ठिकाणची विनम्रता आणि शिष्टाचार या गोष्टी तर सर्वमान्य होत्या. त्यांचे मित्र आणि

राजकारणातले विरोधक देखील त्यांच्या शिष्टाचारपूर्ण वागणुकीवर खूष असत. टीकाकारांनी एखाद्या प्रश्नाच्या संबंधात त्यांचे वाभाडे काढले असतील, पण हा एक उद्धट, चढेल माणूस आहे असे उद्‌गार चुकूनही कोणी काढले नाहीत.

यशवंतरावांचं कार्य आणि त्यांनी केलेले निर्णय यांची ज्यांना जवळून माहिती आहे त्यांना या नेत्याच्या स्वभावात दृढमूल झालेला दुर्मिळ असा राज्यकारभार-विषयक ध्येयवाद आढळतो. पं. नेहरूंप्रमाणे ते मध्यममार्गी होते. झटकन एखाद्याची बाजू घेत नसत. कसलीही समस्या निर्माण झाली, वादाची स्थिती निर्माण झाली तर शांत राहून उभयपक्षी शांततेनं तडजोड घडवून आणण्यावर त्यांनी नेहमीच लक्ष केंद्रित केलं. प्राधान्ये करून त्यांची फिलॉसफी ही प्रत्यक्ष कार्य उभं करणं ही होती ( Philosophy of action ). मुख्यत: ते प्रॅग्मॅटिक होते. त्यांचा विश्वास होता तो मानवी मूल्यांवर, गुणांवर, माणसाच्या चांगुल-पणावर, माणसाच्या चांगल्या विचारावर, शब्दांवर आणि प्रत्यक्ष त्याच्या कृतीवर. त्यांच्या मध्यममार्गी स्वभावामुळे त्यांना कोणी ' कुंपणावर ' बसवलं परंतु मानवी मूल्यांवरील विश्वासाला त्यांनी तडा जाऊ दिला नाही.

कॉंग्रेस पक्षाने उदारमतवादी, समाजवादी दृष्टिकोण स्वीकारावा आणि तो अंमलात आणावा यासाठी यशवंतरावांनी केलेलं पक्षांतर्गत कार्य मौलिक स्वरूपाचं आहे. पक्षानं वचनपूर्तीचं राजकारण करावं असा आग्रह धरणारा जो पुरोगामी कार्यकर्त्यांचा संच होता त्याला त्यांनी पाठिंबा दिला. सामान्य जनतेच्या पक्षाकडून ज्या अपेक्षा होत्या त्या पूर्ण व्हाव्यात यासाठी पक्षाच्या धोरणात आणि अंमलबजावणीत बदल घडवून आणावा लागणार होता. यशवंतरावांनी आपल्या पक्षातील प्रतिष्ठेचा त्यासाठी उपयोग केला.

भारताच्या भविष्यकाळाबद्दल त्यांची नजर पल्लेदार होती. त्यांची काही भव्य स्वप्ने होती. राजकीयदृष्ट्या स्थिर आणि आर्थिकदृष्ट्या, संरक्षणाच्या दृष्टीनं भारत स्वयंपूर्ण बनण्याचं स्वप्न ते पाहात होते. समाजातील विषमता नजिकच्या काळात नाहीशी होईल असा त्यांचा विश्वास होता, विकासासाठी सर्व प्रकारच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात आणि लोकांना आर्थिक स्थैर्य, समाधान प्राप्त करून द्यावं यावर त्यांचा कटाक्ष होता. भारतीयांना, भारताचं सार्वभौमत्व सांभाळता येईल एवढं त्यांना सर्व दृष्टीनं शक्तिमान बनवावं, एक समर्थ राष्ट्र, जागतिक शांतता प्रस्थापित करण्याच्या कामात महत्त्वाची भूमिका बजावणारं समर्थ राष्ट्र,

ही त्यांची भारताबाबतची प्रतिमा होती.

समर्थ, समाजवादी, लोकशाहीनिष्ठ, सर्वधर्मसमभाव राखणारं राष्ट्र, देशांतर्गत शांतता राखणारा जगातील एक आदर्श देश, अशीच भारताची प्रतिमा त्यांनी समोर ठेवली. भारताची सांस्कृतिक मूल्यं, कला, साहित्य, संगीत आणि जे खास भारतीय आहे त्या सर्वांचा विकास कसलाही प्रतिबंध न येता अखंड होत राहावा, लोकजीवन सर्वांगानं संपन्न बनावं यासाठी त्यांनी आपल्या आयुष्यातील प्रत्येक क्षण सार्थकी लावला. व्यक्तिगत जीवनात ते पूर्ण भारतीयच राहिले आणि भारतीय पोषाखातच निघून गेले.

यशवंतरावांनी अखेरपर्यन्त महाराष्ट्र धर्माची जोपासना केली. त्यांच्या राजकारणात सौंदर्य होतं, साहित्य होतं, संस्कृती होती, शान होती, शहाणपण होतं. पुरोगामी विचार होते. देशाला भूषणभूत ठरलेल्या या व्यक्तीनं पंचवीस-तीस वर्षे भारताच्या राजकीय इतिहासावर प्रभाव गाजवला. आधुनिक महाराष्ट्राचे ते शिल्पकार बनले. महाराष्ट्रात सर्वप्रथम समाजवादाची प्रस्थापना केली. ग्रामीण महाराष्ट्राचे पुनरुत्थान घडविले. शासनाचा रोख ग्रामीण, दलित जनतेकडे वळविण्याची अजरामर कामगिरी केली. मनात सामान्य माणसांविषयी जिव्हाळा असल्यानं आणि या जिव्हाळ्याला चौफेर अभ्यासाची जोड मिळाल्यानं ते ' यशवंत ' ठरले.

यशवंतरावांची जीवननिष्ठा रसिक व्यक्तिमत्त्वाची होती. लोकमान्य टिळकांनंतर यशवंतरावांइतके प्रेम दुसऱ्या कोणत्याही नेत्यावर महाराष्ट्रानं केलं नाही ही त्यांची थोरवी सर्वांत मोठी होय. केंद्र सरकारात त्यांच्याइतकी महत्त्वाची खाती सातत्याने चालविणारा दुसरा मंत्री उभ्या हिंदुस्थानात तरी दाखविता येणार नाही. त्यांच्या काळात तर निश्चितच नाही. मानवेंद्रनाथ रॉय यांच्या मानवतावादी विचारांचा पगडा असलेले यशवंतराव हे एक वैचारिक नेतृत्व होतं. बुद्धिमंतांच्या बैठकीत ते शोभून दिसले. साहित्य शारदेच्या मंदिरात पावन झाले. राजकीय आखाडयात लढून यशस्वी ठरले. राष्ट्रीय स्वातंत्र्य चळवळीत क्रांतिवीर झाले. त्यांचा पिंड व्यासंगी विचारवंतांचा होता. अष्टपैलू व्यक्तिमत्त्व, धुरंधर मुत्सद्दी, विचारवंत, स्वतःच्या तेजाने तळपलेल्या पिढीतील अग्रभागी चमकतील असे गुणग्राहक, सौजन्यानं विरोधकांची मनं जिंकणारे नेते, दिलदार मित्र, असे असूनही पाय सदैव जमिनीवर राहावेत हे पथ्य त्यांनी कटाक्षानं

पाळलं. राजकारण म्हणजे सर्व जीवन असं कधीच मानलं नाही. साहित्य, संस्कृती, संगीत, प्रबोधन या सर्व प्रवाहांशी ते सतत संबंधित राहिले. मराठी भाषा त्यांनी आत्मीयतेनं जोपासली. भाषेला ते नटवीत नसत पण झुळझुळ झरा वाहात राहावा असं त्यांचं वक्तृत्व होतं. त्यांच्या भाषेला तोल आणि ताल असायचा, विचारांची जाण आणि अभिव्यक्तीचा जोम असायचा. कारण त्या मधुर शब्दामागे एक नवा सामर्थ्यवान संदेश देणारं मन होतं. पिंडानं ते कवी होते. सुसंस्कृत, संवेदनशील व्यक्तित्वात लालित्य होतं.

आता यशवंतराव नाहीत म्हटल्यानंतर त्यांच्या विचाराचा वारा प्यावा असं मागं राहिलेल्यांना वाटत आहे. याचं कारण स्पष्ट आहे. मुंगीच्या मार्गानं चालणारे जे होते त्यांतील अनेकांना त्यांनी कर्तृत्वाच्या विहंगम मार्गावरून चालतं केलं. यशवंतरावांची गरुड भरारी त्यांना पेलणारी नव्हती तरी अनेकजण मुक्कामाला पोहोचले.

जनसंमर्दाच्या कोलाहलात बसूनही तटस्थतेचं सुख अनुभवणं आणि तरीही लोक आणि आपण यांतील अद्वैत कायम ठेवणं हा निर्लेपपणाचा अनुभवही त्यांनी सेवन केला.

असा हा थोर देशभक्त, रसिक मनाचा मोठा नेता आणि व्यवहारी राजकारणी कृष्णा-कोयनेच्या संगमाच्या ठिकाणी निरंतरचा पहुडला आहे. आत्मीयता निर्माण करणारं संगमावरील हे स्थान म्हणजे त्यांच्या भूतकाळाच्या वाटेवरील विश्रांतीची जागा. त्या संगमाचं महत्त्व आता अनंत पटीनं वाढलं आहे. यशवंतरावांच्या पार्थिव देहावर तेथे अग्निसंस्कार झाला हा सर्वमान्य इतिहास आहे. हजारो लोकांच्या हृदयाचे कंद त्या दिवशी उन्मळून आले. जीव गलबलून गेले. महाराष्ट्रातील राजकीय आणि सामाजिक लोकशाही खऱ्या अर्थानं त्या दिवशी संगमाच्या काठी जमा झाली.

मागे होऊन गेलेल्या माणसांच्या संबंधानं कोणा कोणा लोकांच्या मनात क्षुद्र बुद्धीची जाणीव असते. यशवंतरावांच्या बाबतीत तसा एक लेशही कोणी मनात ठेवण्याचं कारण संभवत नाही. पुढे होणारे कोणी आभाळातून पडणार आहेत असे नाही. मानवी जीविताचा कालानुक्रमाने विस्तार हा होतच राहतो, विशाल बनतो. हा स्रोत अखंड चालणारा आहे. पण पुढल्या विस्ताराला मागला विस्तार कारणीभूत झालेला आहे व होणार आहे ही वस्तुस्थिती कोणालाच

विसरता येत नाही.

ज्यांच्या कर्तृत्वाची व बुद्धीची, विचारांची झेप मोठी, ते या विस्ताराला कारण होत आलेले आहेत. अर्थात त्यांचं स्मरण मनात होत राहावं हे मानवी जीवनाच्या सामंजस्याच्या दृष्टीनं ओघानेच येते.

यशवंतरावांचे स्मरण मराठी मनाला सतत होत राहील हे तर खरेच, पण त्याचबरोबर त्यांनी संग्रहित केलेले ज्ञानभांडार, विचारभांडार कोठे तरी गळबटून पडलेले आहे अशी स्थिती राहता उपयोगी नाही. त्यांच्या विचाराचे पाट महाराष्ट्रात, देशात, जिकडे तिकडे वाहात राहिले पाहिजेत. त्यासाठी आता कोण पुढे सरसावतो ते पाहावयाचे ! हे माझे म्हणणे भावनातिरेकाचे वाटेलही कदाचित, परंतु पंचवीस-तीस वर्षे त्यांच्या सान्निध्यात राहिलेल्या माझ्या-सारख्यानं खरं हे सांगितलंच पाहिजे.

यशवंतरावांच्या जीविताचं साऱ्या लोकांना नवल वाटतं ते हे की, महा-राष्ट्राच्या मातीत, एका सामान्य घरात जन्मलेल्या या माणसानं नाना प्रकारच्या विचारांची आणि कर्तृत्वाची क्षेत्रं उल्लंघिली तरी कशी ? ज्या समाजात ते जन्मले तिथं तरी काही अनुकूलता ? रेम्याडोक्या माणसांचे, भुईला नाक टेकवून जगणारी माणसे, असे भोवतालच्या माणसांचं जीवन ! गेलेल्या आणि येणाऱ्या दिवसांत फरक असा नाहीच. आजचा दिवस कालच्या सारखा आणि उद्याचा आजच्या-सारखा अशी स्थिती !

अशा या सामाजिक वातावरणात जन्म घेऊन लहानाचे मोठे झालेल्या यशवंतरावांनी मात्र नित्य नवा दिवस पाहावा, कर्तृत्वाचं एकेक दालन झपाझप मागं टाकून पुढील स्तबकात प्रविष्ट होत राहावं हे घडलं तरी कसं ? आश्चर्य वाटावं, अचंबा वाटावा असं जरी हे असलं तरी एक गोष्ट मात्र खरी की, यशवंतरावांच्या मनानं, बुद्धीनं जे चापल्य दाखविलं ते महाराष्ट्राच्या आणि देशाच्या इतिहासात, माणुसकीच्या इतिहासात अद्भुत वाटावं असं आहे.

# लपलेले संपन्न व्यक्तिमत्त्व

**नारायण पुराणिक**

माझा व यशवंतरावांचा परिचय कै. ह. रा. महाजनी ह्यांनी करून दिला. मी तेव्हा लोकसत्ता–नॅशनल स्टॅंडर्डचा वार्ताहर होतो. ह. रा. महाजनी लोकसत्तेचे संपादक होते. मी आणि महाजनी दोघंही 'किर्लोस्कर' मासिकाचे लेखक असल्याने आमचे संबंध तसे जुने होते. यशवंतराव तेव्हा पार्लमेंटरी सेक्रेटरी होते, पुढे मंत्री झाले. एकदा ओळख झाल्यावर संबंध वाढत गेले. त्यांना भेटून अनेक विषयांवर आम्ही बरेच वार्ताहर चर्चा करीत असू.

परिचय वाढला तसे व्यक्तिगत संबंध वाढत गेले. अनेकदा त्यांच्या कार्यालयात भेटी होत. पण बऱ्याच वेळी कार्यालयाबाहेरही होत. यशवंतरावांचे वाचन भरपूर, मनाची घडण साहित्याची, वृत्ती राजकारणाची आणि जाणीव मात्र चतुरस्त्र. माझ्यातला त्यांच्यातला औपचारिक शिष्टाचाराच्या पद्धतीने बोलण्याचा काळ फारसा टिकला नाही. दोघंही अगदी खेड्यात, गरिबीत जन्मलेले. गरिबीचे चटके कुठे, कसे बसतात ह्याची खूप मोठी जाणीव यशवंतरावांना होती. त्यांचा अनुभव राजकारणाचा, माझा लष्कराचा आणि वृत्तपत्रांचा. आम्ही मराठी इंग्रजीचे मिश्रण करून अनेक विषयांवर बोलत असू. त्यातून मला जाणीव झाली की यशवंत-रावांच्याकडून मला खूप शिकायला मिळत होतं. लहान वयातच मी लष्करात गेलो आणि सहा वर्षे ब्रिटिशांच्या सैन्यात व मुख्यतः ब्रिटिश सैनिकांत काढले. महाराष्ट्राची माहिती मला फारशी नव्हती. महाराष्ट्रीय राजकीय पुढाऱ्यांचीही नव्हती. यशवंतराव मला ती देत आणि प्रत्यक्ष राजकीय घटनेखालील प्रवाह समजावून सांगत.

माझ्या स्वभावाची पूर्ण जाणीव असल्यामुळे यशवंतराव पुष्कळदा मला मुद्दाम बोलायला लावीत. म्हणत, "तुझ्या पद्धतीने तू बोल." यामुळे अनेकदा आमच्या चर्चांना शाब्दिक सामन्यांचे स्वरूप येई. भोवताली इतर माणसे असली तर त्यांना आमची ही पद्धत बरीच अनुचित वाटायची. एकदा मुकुंदराव किर्लोस्करांच्या घरी यशवंतरावांना जेवायचे आमंत्रण दिले. काही विषयांवर

मोकळेपणी बोलता यावे म्हणून मुकुंदरावांच्या घरची माणसे व आम्ही किर्लोस्कर मासिकात काम करणारे दोघेतिघेच होतो. यशवंतराव तेव्हा महाराष्ट्राचे मुख्य-मंत्री होते. कुळकायद्याचा विषय निघाला. उदाहरण देताना वतनदार–जमीनदार ह्यांच्या वागण्याची उदाहरणे यशवंतरावांनी दिली. ती सांगली, सातारा, कराड भागातली होती. त्यात “ कुळकर्णी ” वर्गाचा उल्लेख आलाच. मी म्हटलं की गरीब आणि विधवा ह्यांना तरी काही रक्षण दिले पाहिजे. विधवा ब्राह्मण असो की मराठा, तिचे प्रश्न सोडवणं सोपं नसतं. बहुतेक विधवा जुन्या वळणाच्या, निरक्षर, कायद्याच्या बाबतीत अज्ञानी असतात. बोलता बोलता यशवंतराव म्हणाले, “ हो, काही अशा असतात आणि त्यांच्याबद्दल मला सहानुभूती वाटते. ” मी म्हटलं, “ अहो, पण मुख्यमंत्र्यांची सहानुभूती वाण्याला देऊन माल मिळत नाही किंवा बँकेत दिल्याने रुपये मिळत नाहीत. तेव्हा नुसत्या सहानुभूतीने काय होणार. ”

भोवतालच्या लोकांना माझा प्रश्न शिष्टाचार मोडणारा वाटला. यशवंतराव दोन मिनिटं माझ्याकडे पाहात राहिले, हसले आणि लगेच म्हणाले, “ नारायणची पद्धत मला चांगली माहीत आहे. रागावण्यासारखं यात काही नाही. ”

यशवंतराव मुख्यमंत्री असताना एखाद्या कामासाठी भेटायला गेलो तर निरोप देत, “ तासभर थांबावे लागेल, नाहीतर रात्री घरी ये, मोकळेपणाने बोलता येईल. ”

संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीच्या वेळी मी ‘ लोकमान्य ’ दैनिकात होतो. लोकमान्य दैनिक ‘ जन्मभूमि ’ गटाचे व जन्मभूमि गटाचे प्रमुख तेव्हा शांतिलाल शहा होते. शांतिभाईंना मराठी चांगले येत असे आणि शांतिभाई हे मुंबईच्या जुन्या काँग्रेस पुढाऱ्यांपैकी. संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीचा जोर वाढला आणि ‘ गुजराती ’ गटाचे मराठी दैनिक म्हणून ‘ लोकमान्या ’ला निंदा व नुकसान सोसावे लागले. पुढे ‘ जन्मभूमि ’ ‘ जन्मभूमीच्या ’ विश्वस्तांनी ‘ लोकमान्य ’ बंद करायचे ठरविले. आम्ही सगळेच बेकार होणार होतो. शांतिभाईंनी मला व माझे मित्र कै. शंकरराव सालये ह्यांना सचिवालयात बोलावून ( ते मंत्री होते ) सारे समजावून सांगितले. आम्ही लोकमान्याच्या कार्यालयात गेलो व साऱ्या सहकाऱ्यांना ते सांगितले. सर्वांनी सूचना केली की महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेस कमिटीने लोकमान्य दैनिकाची जबाबदारी घ्यावी. यशवंतरावांना भेटून हे सारे

सांगायचे काम माझ्यावर आले. मी लगेच फोन केला व वेळ ठरवून गेलो. यशवंतरावांनी सांगितले, " हा निर्णय मालोजीराव नाईक निंबाळकरांनी घ्यायचाय. त्यांना भेट. मी सांगतो भेटशील म्हणून. " दुसऱ्या दिवशीची वेळ ठरली व मी नाईक निंबाळकरांना भेटलो. मी सगळे आकडे घेऊन गेलो होतो. ते सारे " लाखातले " आकडे पाहून निंबाळकर म्हणाले, " इतका पैसा लागेल असे मला वाटलं नव्हतं. " मी म्हटले, " दैनिक गुजरात्यानं चालवलं काय अन् महाराष्ट्रीय माणसानं चालवलं काय, जमाखर्चाचे आकडे तसेच राहणार. "

दोन दिवसांनी म. प्र. काँ. कमिटी ' लोकमान्या 'ची जबाबदारी घेऊ शकत नाही असा नाईक-निंबाळकरांनी निरोप दिला. पुन्हा यशवंतरावांकडे गेलो. यशवंतराव म्हणाले, " सरकारची आणि माझी मदत मिळेल असे समजून चालायला हरकत नाही, तू आणि तुझे सहकारी काय करायचे ते ठरवा, मग पुन्हा भेट. " वास्तविक सर्व मराठी वर्तमानपत्रे तेव्हा यशवंतरावांच्यावर तुटून पडत होती. रोज ते ही सर्व टीका वाचत होते, ऐकत होते तरीही म्हणाले, " मदत करीन. " मी सरळ विचारले, " तुमच्यावर आम्ही टीका केली तरी." यशवंतराव हसून म्हणाले, " टीका करा की, शिव्या देऊ नका म्हणजे झाले. " शिवराळ शिव्यांचा संदर्भ माझा आणि कै. आचार्य अत्रे ह्यांचा जो संबंध होता त्याबाबत होता.

यशवंतराव व्यक्तिशः फार भावनाप्रधान होते. कृष्ण मेननंतर ते संरक्षणमंत्री झाले. १९६२, १९६५ व १९७१ ह्या चीनचे आक्रमण व भारत-पाक युद्धात मी गेलो. १९६२ साली यशवंतराव पंडित जवाहरलाल नेहरूंच्या बरोबर तेजपूरला आले. पंडितजी फार थकलेले, कष्टी दिसत होते. मी यशवंतरावांना विचारले, " काय झाले ?" यशवंतराव म्हणाले, " प्रेस कॉन्फरन्स झाल्यावर भेट, सांगतो. " काही वेळाने आम्ही सारे वार्ताहर प्रेस कॉन्फरन्सला गेलो. माझ्या गळ्यात कॅमेरा होता. तसेच आणखी काही देशी–परदेशी वार्ताहरांच्याजवळही कॅमेरे होते. मला पाहताच यशवंतराव उठले आणि मला बाजूला बोलावून म्हणाले, " नारायण, पंडितजी हॉस्पिटलमध्ये गेले होते. फार हळवे आहेत. त्यांच्या मनाला यातना झाल्याचं मी पाहिलं. तेव्हा सांगतो ते ऐक. त्यांचे फोटो घेऊ नकोस आणि फोटो घ्यायचे नाहीत असं इतरांना सांग. प्रेस कॉन्फरन्स संपल्यावर वेळ असला तर बोलू. "

मी सगळ्यांना सांगितलं. पण स्वतः मात्र मी पंडितजींचे, मला वाटतं

चोरून दोन फोटो घेतले. प्रसिद्ध केले नाहीत, पण पुण्याला आल्यावर प्रती तयार केल्या व दिल्लीला गेल्यावर यशवंतरावांना दाखवल्या. ते म्हणाले, " तू फोटो घेतलेस ते पंडितजींच्या लक्षात आलं. पण ते काही बोलले नाहीत. तू प्रसिद्ध करणार नाहीस असं मी त्यांना सांगितलं होतं. "

१९६५ च्या युद्धात यशवंतरावांनी मला एक व्यक्तिगत पत्र दिलं होतं. त्यात मला सर्व प्रकारे मदत द्यावी असं लिहिलेलं होतं. आवश्यक वाटलं तरच मी पत्राचा उपयोग करी.

त्यांच्या मदतीमुळे रणांगणावरचे सेनानी मोकळेपणाने बोलत. १९६५ साली पहिली फेरी करून आघाडीवरून मी परत आलो तो संतापून. संध्याकाळी यशवंतरावांना भेटलो. मला विचारलं, " काय काय केलंस ?" मी मोकळेपणाने सांगितलं, चिडून म्हटलं, " आमचे काही अधिकारी चैनी, भेकड, हलकट आहेत. " मग उदाहरणं दिली. यशवंतराव म्हणाले, " तू जनरल चौधरींना भेटणार आहेस का ?" मी म्हटलं, " भेटायचं ठरलं पण 'वेळ नाही' असं उत्तर देतात. " यशवंतरावांनी डोंगरेंना वेळ ठरवायला सांगितली. रात्री जन. चौधरींना भेटलो. तासभर मोकळं बोलणं झालं. दुसऱ्या दिवशी दिवसभर यशवंतराव नव्हते. संध्याकाळी " भेटायला बोलावलंय " म्हणून डोंगरेंचा फोन आला. गेलो. यशवंतराव पार बदलले होते, दुःखी होते. मला म्हणाले, " आज मी व्यक्तिगत अनुभव घेतला. जखमी सैनिकांना भेटायला आघाडीवरच्या हॉस्पिटल-मध्ये गेलो. एक आवाज आला, ' मामा, मला ओळखलं नाही. ' मागे पाहिलं, कराडचा तरणा बांड पोरगा. खूप जखमी झाला होता. युद्धातली ही व्यक्तिगत दुःखं. " काही वेळाने म्हणाले, " डोंगराईला जा. तू ताबडतोब गेलास तर तुला सगळी माहिती मिळेल अन् प्रत्यक्ष पाहता येईल. "

१९७२ च्या दुष्काळाच्या वेळी काही कारणांनी यशवंतराव औरंगाबादला आले. बरोबर वसंतराव नाईक व इतर मंत्री होते. दुष्काळाच्या परिस्थितीवर लेख लिहिण्यासाठी मी खानदेशात फिरून वेरूळला आलो. तेव्हा ताई बस्तीकरांनी ( वेरूळच्या कैलास ट्रस्टच्या संस्थापक ) मला यशवंतराव आल्याचं सांगितलं. ताईंची व यशवंतरावांची ओळख जुनी. ताईंनी कैलास ट्रस्टची योजना आखली तेव्हा यशवंतराव महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते. त्यांच्याच कार्यालयात ताई, शंकरराव आडिवरेकर, यशवंतराव त्यांना विजी म्हणत आणि मी बसून चर्चा करून ट्रस्टच्या

कार्याचं स्वरूप ठरवलं होतं. यशवंतराव त्या अर्थाने ताइच्याच सारखे कैलास ट्रस्टचे संस्थापक होते. मी आणि ताई खुल्ताबादला जाऊन सरकारी अतिथि-गृहात यशवंतरावांना भेटलो. ताई मुद्दाम मागे राहिल्या. मी पुढे गेलो. मला पाहताच " अरे इथे कसा " विचारीत ते जवळ आले. भोवताली खूप राजकीय पुढारी मंडळी बसली होती. मी म्हटलं, " फार वेळ घेत नाही, पण आठवण देतो. कैलास ट्रस्ट वेरूळला काम करतो, ताई तिथेच आहेत. पण राजकारणात तुम्हाला हे काही आठवलं नसणार. " " विसरलो आणि चूकही झाली, " यशवंतराव म्हणाले, " तू एकटाच चिडून आलास का ·ताई पण रागावल्या आहेत ?" मी ताईंना पुढे यायला सांगितलं. ताईंना पाहताच "ताई, चुकलो पण चूक सुधारतो. आम्ही सर्व उद्या सकाळी वेरूळला येणार आहोत " आणि तसे ते आलेही.

नंतर काही वर्षांनी मी आणि ताई दिल्लीला गेलो होतो. ताईंनी यशवंत-रावांना फोन केला. त्यांनी भेटायला बोलावलं. तसे आम्ही त्यांच्या घरी गेलो. त्या वेळी ताईंच्या मनात एक मोठी काळजी होती. प्राप्तिकराचे नियम बदलल्यामुळे कैलास ट्रस्टवर एक लाखाच्यावर प्राप्तिकराची मागणी आली. ज्या रकमेसोबत मागणी होती, ती रक्कम दुष्काळी कामासाठी देणग्या मिळवून खर्च झाली होती. पण प्राप्तिकर अधिकाऱ्यांनी काही तांत्रिक मुद्दे काढून खर्च झालेली रक्कम, व्याज, दंड असा आकार केला. बोलणाऱ्या ताई हे सारं वेणूताईंना सांगत होत्या, यशवंतराव ऐकत होते. बोलताना ताई म्हणाल्या, " कोणत्या अर्थमंत्र्यांनी हा गाढवपणा केला कुणास ठाऊक ?" मी ताईंना खुणवू लागलो. तसं यशवंतरावांनी मला गप्प बसायला खुणवलं. ताईंचं म्हणणं शांतपणे ऐकून घेतलं, मग उठून उभे राहिले, ताईंच्या पुढे हात जोडून उभे राहात म्हणाले, " ताई, तो गाढव अर्थमंत्री आपल्यापुढे हात जोडून उभा आहे. " ताईंचा राग पळाला. त्या काही बोलणार तेवढ्यात यशवंतराव म्हणाले, " अहो ताई, प्रेमाने शिव्या देणारी बहीण आहे ते तुमच्या बोलण्यानं कळलं. "

शंकरराव आडिवरेकरांवर असंच भावासारखं प्रेम ते करीत. मी कधीही भेटलो तर प्रथम विचारीत, "अरे, बिजीची प्रकृती कशी·आहे ? खूप दिवसांत भेट नाही."

यशवंतराव राजकारणात होते आणि सरकारी धोरणे ते आपल्या भाषणात, लेखनात मांडीत. पण व्यक्ती म्हणून ते उत्तम वक्ते होते. खूप खूप वाचीत. जे

नव्हे शिकायला मिळेल ते शिकत. त्यावर चर्चा करीत. भाषेवर त्यांचं प्रभुत्व होतं. आम्ही तासन्तास एखाद्या ग्रंथावर बोलायचो. एकदा ते म्हणाले, " नारायण, मला खूप लिहायचंय. पण स्वतः लिहिणं वेळेमुळे जमत नाही. " मग चर्चा झाली. शेवटी म्हणाले, " दिल्लीला राहून तू माझ्याबरोबर काम करायला तयार असलास तर इंग्रजी–मराठी दोन्ही भाषांत आपण लेखन पुरं करू. " मी हो म्हटलं. पुण्याहून काही दिवसांनी आठवणीचं पत्र लिहिलं. त्याचं उत्तर आलं, " अडचण आहेच. जमेल ते मी स्वतःच करतो. "

काही लेखन त्यांनी केलंही, पण त्यात यशवंतराव ही व्यक्ती मला दिसली नाही. भेटीत मी म्हटलं तसं म्हणाले, " अरे, परिस्थिती बदलली आहे. " मी काहीच बोललो नाही. मी पुष्कळदा त्यांना म्हणे, " राजकीय पुढारी यशवंतराव चव्हाण म्हणून फार काळ वावरत लेखन करायचं त्यापेक्षा कराडच्या विठाबाई चव्हाणांचा मुलगा म्हणून बैठक मारून मोकळ्या मनाने लिहा. " विठाबाईंच्या गुणी यशवंतने ते केलं नाही. परिस्थितीमुळे शक्यही झालं नसेल. पण ते गेले तेव्हा वाटलं, " यशवंतरावांना बैठक मारून मनमोकळेपणाने लिहिणं शक्य झालं नाही. सारं शब्दसामर्थ्य बरोबर घेऊन गेले. "

# ‘ समन्वयी ’ साहेब

## काशीनाथ पोतदार

“ हो सकता है, यशवंतरावजी ॲटली जैसे अच्छे पंतप्रधान बने ” जयप्रकाश खाजगी बैठकीत सहज बोलून गेले. चव्हाणांचे नाव संभाव्य पंतप्रधानांच्या यादीत कित्येक वर्षे झळकत होते. जयप्रकाश नारायण तर जाहीर-पणे सुद्धा तसे म्हणाले. संयत, सुसंस्कृत, विचारी, कृतिशील नि जनतेबद्दल उपजत जिव्हाळा असलेल्या यशवंतरावांबद्दल अनादर असलेली मंडळी क्वचित. त्यांच्या राजकीय धोरणाबद्दल मतभेद असलेली माणसे पुष्कळ; बुचकळ्यात पडलेली तर विपुल. मोहिनी मंत्राचा गोष्टीतल्या अलगूजवाल्याप्रमाणे उपयोग करणाऱ्या व्यक्तिमत्त्वाची बहुतेक देशांना भुरळ पडते. अशा भुलवण्या नेत्यांची शेकडो उदाहरणे आढळतात. हिटलर, मुसोलिनी सोडाच, या देशात देखील थोडासा अनुभव आपण घेतलाच आहे. तेव्हा मोहक, दिव्य-भव्य व्यक्तित्वाच्या मागे जाणारा देश प्रगतिपथावरच असतो असे हमखास म्हणता येणार नाही. कृष्ण मेनन यांच्या पाठोपाठ ‘ साहेब ’ संरक्षणमंत्री झाले तेव्हा उभयतांच्या कार्यशैलीतील भिन्नता सैनिकदलांनाही चक्रावून गेली. एक एककल्ली, रागीट, मनस्वी व्यक्ती तर दुसरी सर्वांना बरोबर घेऊन सामोपचाराने कार्यसिद्धी करणारी सौजन्य मूर्ती. ‘ प्रति-शिवाजी ’वर सैनिक उगीच खूष नव्हते.

“ इंडिया विन्स फ्रीडम् ” या मौलाना आझादांच्या आत्मचरित्राचा अद्याप सीलबंद असलेला दुसरा भाग प्रकाशित झाला की कित्येक रहस्यांवर नवा प्रकाश पडण्याची शक्यता आहे. म. गांधी, प. नेहरू, माऊंटबॅटन पति-पत्नी, जीना, सरदार पटेल, मौ. आझाद आदी राष्ट्रीय पातळीवरील प्रमुख व्यक्ति-मत्त्वांच्या क्रिया-प्रतिक्रियांनी स्वातंत्र्याच्या संधिप्रकाशात विविध रंग भरले. अलीकडे काही कथा उजेडात येत आहेत. यशवंतरावांनी सातारा जिल्ह्यातील सामान्य कार्यकर्त्यापासून तो केंद्रस्थानी सर्व प्रमुख खाती हाताळून उप-पंत-प्रधानपदाची मजल गाठली. पाकिस्तान-युद्ध ( १९६५ ), बांगला देश निर्मिती ( १९७१ ), काँग्रेसमधील अंतर्गत संघर्ष—आणीबाणी—जनता राज नि चरण-

चव्हाण कारकीर्द (१९७९ ते ८०) हा पंधरा वर्षांचा काळ कित्येक दृष्टींनी महत्त्वाचा आहे. त्या पर्वासंबंधी यशवंतरावांनी केलेल्या विश्लेषणाबद्दल मला व्यक्तिगत माहिती आहे. त्या राजकीय विवेचनात न पडता मी एवढेच म्हणेन की, या झंझावाती काळातच चव्हाणांच्या राजकीय वा आर्थिक नीतीला विशेष उजाळाच मिळाला नाही. ते स्वतः अर्थमंत्री असतानादेखील. घरात ते नोकर–चाकर असे भेद मानीत नसत. जणू सर्व सहकारी. सर्वांची मुले साहेब–वेणूताईंशी खेळत. सर्वांच्या आरोग्य शिक्षणाची सोय केली जाई. तोच ढोबळ मानवतावाद किंवा नेहरूप्रणीत उदारमतवाद; "समाजवादी समाजरचने"चा पुरस्कार, यशवंतरावांच्या धोरणातून प्रतीत होई. नवमानवतावाद ते बोलत नव्हते; जगत होते.

चव्हाण साहेबांच्या सार्वजनिक जीवनातील कवडसे मी सतत चाळीस वर्षे पाहिले. त्यातील अर्धाअधिक काळ जवळून दर्शन घेतले. परंतु मी त्यांच्या "अति निकट" गटात नव्हतो. त्यांच्या १९४२ च्या कार्याबद्दल ऐकून माहिती होती. स्वातंत्र्याच्या संधिप्रकाशात बाळासाहेब खेरांच्या मंत्रिमंडळात मोरारजीभाई 'सूत्रधार' मंत्री बनले नि साहेब त्यांचे संसदीय सचिव. मी एक वर्ष उमेदवारी केली व्यक्तिगत सचिवाची. श्री. एस्. एम्. जोशींच्या सांगण्या-वरून साने गुरुजींच्या 'कर्तव्य' दैनिकाची जबाबदारी स्वीकारण्यासाठी वर्षभरात सरकारी सेवा सोडली. सचिवालयातील त्या अल्प काळात चव्हाण, पी. के. सावंत, बाबुभाई पटेल, एस. आर. कंठी, बी. डी. जत्ती आदी संसदीय सचिवांशी बऱ्यापैकी व खेर–मोरारजी–नंदा यांच्याशी ओझरता संबंध आला. पुढे ही मंडळी आपापल्या राज्यात मुख्यमंत्री नि केन्द्रात प्रमुख स्थानी गाजली. श्री. नंदा हंगामी पंतप्रधान, मोरारजी पंतप्रधान व चव्हाण उपपंतप्रधान झाले. पण कालचक्राने गंमत केली १९७७ साली; जनता राज्याच्या प्रारंभ काळात तेव्हा श्री. जत्ती हंगामी राष्ट्रपती, श्री. मोरारजीभाई पंतप्रधान नि श्री. यशवंतराव विरोधी पक्षनेते होते. मुंबईचा हा 'त्रिकोण' दिल्लीत प्रमुख पदी असताना मी त्यांच्याशी मराठीतूनच बोलत असे. तिघांच्या वाचनालयात महाराष्ट्र सरकारने कै. पु. म. लाडांच्या प्रेरणेने प्रकाशित केलेली तुकारामाची गाथा व दोन-तीन संतवाङ्मयावरील पुस्तके आढळली. (जत्तींचा त्या विषयाचा उत्तम व्यासंग आहे.) तो असा विचित्र काळ होता की, मित्रांतही किंचित

राजकीय कटुता निर्माण झालेली दिसली. मोरारजीभाईंच्या एका टीकाप्रहाराबद्दल खाजगीत बोलताना साहेब म्हणाले, " वडिलकीच्या नात्याने त्यांना हक्क आहे... नि मोरारभाजीभाईंना हक्क गाजविण्याची हौसही आहे." तेच परिचित स्मित हास्य ! दुसऱ्यांच्या मतांना मान देणे; नव्हे टीकेचीही कदर करणे त्यांच्या स्वभावात होते.

पहिल्या मुंबई राज्य विधानसभेपासून तो जीवनाच्या अखेरपर्यंत आपल्या मतदारांचा सतत पाठिंबा मिळविण्याचा विक्रम यशवंतरावांनी केला. संयुक्त महाराष्ट्राच्या संघर्ष काळात, आणीबाणीच्या आसपासच्या समयी उलटसुलट लाटांच्या प्रवाहांवर ते सहजतया स्वार झाले. लोकानुनय नव्हे पण जन-संपर्काची कला त्यांना अत्यंत उत्तम रीत्या अवगत झालेली होती. एक परिचित, पत्रकार व वस्तुनिष्ठ अभ्यासक म्हणून जेव्हा मी त्यांच्या कारकीर्दीचे विश्लेषण करतो, तेव्हा मला तरी सर्वात मोठा गुण हाच वाटतो. मला हे सुद्धा माहीत आहे की, ते १९६०–६१ नंतरच जास्त मनमिळाऊ झाले, आणीबाणीनंतर अधिक परिपक्व व अखेरच्या काळात लोण्यासारखे मऊ नि सागरासारखे शांत–गंभीर. शोकांतिकांमागून शोकांतिकांचा सामना केला त्यांनी. कबूल करतो की त्यांच्यात देदीप्यमान असे काही आढळले नाही. परंतु प्रभावी, ऋजू, विवेकशील अशा छटा बघावयास मिळाल्या. विरोधकांशीसुद्धा सलोखा. निकराचे, हिरीरीचे, आत्यंतिक असे काही नाही. हा दुर्मिळ गुण नव्हे काय ? किमानपक्षी कटुतेच्या काळात ?

साहेब ' धोरणी ' होते, परंतु विचार करूनसुद्धा त्यांच्या आर्थिक धोरणाची साचेबंद सूत्रे मला गवसली नाहीत हे मान्य. मानवेंद्र रॉय अन् जवाहरलाल नेहरू यांच्या विचारांचा मागोवा घेत परिस्थितीनुसार पावले टाकणे हे सामान्य तत्त्व; म्हणजे तत्त्वावडंबर नव्हे तर तथ्य व कार्यसिद्धीवर अधिक भर. चौगुले उद्योगसमूहात सामील झाल्यापासून सतत वीस वर्षे त्यांच्याशी अनेकदा आर्थिक विषयांवर बोललो. कामगार कार्यकर्त्यांपासून तो देशांतील प्रमुख उद्योगपतीपर्यंत सर्वांशी त्यांचे व्यक्तिगत स्नेहसंबंध होते. महाराष्ट्र–मराठा-गोवा चेंबरची वार्षिक संमेलने बऱ्याचदा त्यांच्या निवासस्थानी भरावेली. गप्पा-गोष्टी हास्य-विनोद झाले. पण सूत्रवजा काही लागले नाही. यालासुद्धा वैशिष्टय म्हणता येईल का ? समन्वयवादी, संयत, ॲटलीसमान नेतृत्वाचा व्यक्तिविशेष हाच तर नव्हे ? त्याशिवाय प्रथम मोरारजी, नंतर नेहरू, त्यानंतर शास्त्री–इंदिरा–चरणसिंग यांच्या-

सारख्या अतिभिन्न व्यक्तिमत्त्वाच्या, निश्चित नीति–दिशा असलेल्या वा नसलेल्या नेत्यांबरोबर चव्हाणसाहेबांना काम करता आले नसते. त्यांच्या मध्यममार्गी, सुसंवादी वृत्तीला ' कुंपण-नीती ' म्हणून हिणवले गेले. ' स्वगृही ' परतण्याची, " संयुक्त महाराष्ट्रापेक्षा नेहरू श्रेष्ठ " घोषणेप्रमाणेच टिंगल झाली. इतिहासात मात्र नोंद असेल की, संयुक्त महाराष्ट्र स्थापनेत नि महाराष्ट्राचा पहिला यशस्वी मुख्यमंत्री म्हणून यशवंतरावांनी अपूर्व कार्य केले. घटना-क्रमांच्या वरवरच्या दर्शनाने मते बनविणे विचारवंतांना शोभत नाही. नृपनीती जर वारांगनेप्रमाणे असेल तर जन-रीतसुद्धा काही कमी चवचाल नसते. सुरुवातीला शास्त्रीजींना हसणाऱ्यांनी १९६५ मध्ये पाकिस्तानवर विजय मिळविताच त्यांच्यावर पुष्पवृष्टी केली. ' गुंगी गुडिया ' इंदिराजी दुर्गा बनल्या. आज पायलट देशाचा तडफदार युवा नेता ठरला आहे. यशवंतरावांच्या राजकीय जीवनाबद्दल असेच घडले असते. कुणी सांगावे, आर्थिक क्षेत्रातील त्यांच्या समन्वयवादी व जबाबदार धोरणाचे अधिक सुपरिणाम दिसले असते. फायनान्स कमिशनचे अध्यक्ष म्हणून केन्द्र व राज्यांमधील आर्थिक तणाव कमी करण्यासाठी त्यांनी कित्येक शिफारसी केल्या. त्यानंतर नव्या जबाबदाऱ्या येण्याची चाहूल लागली होती. पण मृत्यूने अकस्मात झडप घातली. बरीचशी रहस्ये त्यांच्याबरोबरच लुप्त झाली. समोर उभी राहते ती स्मित हास्य करणारी स्नेहमूर्ती; काही समज अन् काही गैरसमजांचा वसा घेऊन. वाटते, देश तणावांनी होरपळून समन्वयी साहेबांमागे आला असता.

मागे वळून पाहता मतभेदाचे क्वचित प्रसंग आठवतात; नाही असे नाही. मी ' कर्तव्यात ' गेलो, समाजवादी पक्षाबद्दल सहानुभूती ठेवून होतो, ( अखेर अखेर जनता पक्ष ) ' महाराष्ट्र टाईम्स 'च्या संपादकपदाबाबत ठिणगी उडाली, ' नवशक्ति ' पत्राने संयुक्त महाराष्ट्र प्रकरणी त्यांच्यावर जे टीकाप्रहार केले त्यामुळे थोडी शब्दाशब्दी झाली. ते सारे आज आठवते. पण प्रेम कायम होते. चौगुले कंपनीच्या कोकण जहाज सेवेमुळे तर क्वचित " चकमक "च होई. साहेबांच्या प्रेरणेने, गोवा-मुक्तीनंतर चौगुले उद्योगसमूहाने ती सेवा सुरू केली. त्या सेवेचा नि साहेबांचा असा तिढा पडला की, दैवयोगाची गंमत वाटते. १९६५ साली पहिले जहाज युगोस्लाव्हियाहून आले. मुंबईहून उद्घाटन फेरी ठरली. निमंत्रणे गेली. साहेब उद्घाटक. सांताक्रूझ विमानतळावर घ्यावयास गेलो. विमानतळावरच बिनतारी संदेश मिळाला, " पंतप्रधानांनी तातडतोब दिल्लीला बोलावले आहे. "

समारंभ श्री. बाळासाहेब देसाईंच्या हस्ते पार पाडावा लागला.

पुढे त्याच कोकण-सेवक जहाजावर कॉंग्रेस कार्यकारिणी व अन्य प्रमुख नेत्यांना बोलावले. कामराज, संजीव रेड्डी, स. का. पाटील इ० सर्व आले. साहेबांचे येणे ऐनवेळी रद्द. या कोकण जहाज सेवेमुळे महाराष्ट्र सरकार व चौगुलेसमूह यात खाडी निर्माण झाली. केंद्रात परिवहनमंत्री सारखे बदलत होते. राजबहादुर, प्रा. व्ही. के. आर. व्ही. राव, संजीव रेड्डी आणि कमलापति त्रिपाठी असे ६ वर्षांत ४ मंत्री झाले. परंतु त्या खात्याचे सचिव डॉ. नागेन्द्र सिंग आणि उभय पक्षांचे, म्हणजे महाराष्ट्र सरकार व चौगुले यांचे अनधिकृत सल्लागार साहेब केंद्रीय मंत्री होतेच. दरवेळी त्यांच्याकडे गेलो की म्हणत " नाईकांनी प्रश्न काढला तर मी माझे मत सांगेन. " पण श्री.वसंतराव नाईक असे वस्ताद की, ते हा प्रश्न काढीतच नसत. आमच्या आवाहनांचा विशेष परिणामच निघत नसे. अखेर भारत सरकारने कोकण-सेवेचे राष्ट्रीयीकरण केले. बोटी गेल्या त्या दिवशी साहेबांकडे सहज गेलो. नेहमीप्रमाणे हसून म्हणाले, " घ्या पोतदार, सिगरेट घ्या. " ( त्या काळी ते क्वचित ओढत ). कोकण-सेवेचा विषयच नाही. कित्येकदा वाटे अवघड प्रश्नांना साहेब सफाईने बगल देतात की काय !

महाराष्ट्रातील उद्योगपतींपैकी श्री. शंतनुराव किर्लोस्कर, श्री. आबासाहेब गरवारे, बेळगावचे श्री. बा. म. गोगटे ( हे बालमित्र म्हणून नेहमी असत ), भारत फोर्जचे श्री. कल्याणी, श्री. रामकृष्ण बजाज, श्री. माधवराव आपटे तसेच गोव्याचे श्री. चौगुले-साळगावकर-धेंपे त्रिमूर्ती साहेबांना प्रसंगवत भेटत असत. पण त्यांचा ओढा तरुण पिढीकडे अधिक असे. श्री. भाऊसाहेब नेवाळ-करांचे पुत्र श्री. अनिल व श्री. गोगटे, श्री. चौगुले, श्री. साळगावकर यांच्या तरुण पिढीबद्दल साहेब नेहमी चौकशी करीत. मी पाहिले की, बेनेट कोलमनच्या श्री. अशोक जैनांकडे अधिक प्रेमदृष्टी असण्याचे कारणदेखील साहेबांच्या शब्दात " तडफदार तरुण उद्यमी " हेच असेल. तीच गोष्ट कामगार नेत्यांची. विरोधी पक्षातील श्री. मधु लिमये, श्री. मधु दंडवते, श्री. जॉर्ज फर्नांडिस किंवा त्या काळच्या कॉंग्रेसमधील ' तरुण तुर्क ' चंद्रशेखर-धारिया-कृष्णकांत साहेबांना जवळचे वाटत. मतभेद शिक्यावर टांगले जात. अगदी मनमोकळी चर्चा होई.

पत्रकारांपैकी जुन्या पिढीतील गाडगीळ-पाध्ये-महाजनी परिचित. पण

प्रेमाचे झुकते माप युवा मंडळी मुकुंदराव किर्लोस्कर, नारायण पुराणिक, माधव गडकरी, गोविंद तळवलकर आदींकडे. हा साहेबांच्या लोकसंग्रहाचा भाग. यांतही काही सूत्र शोधू लागल्यास मान्यार्थाने काही नाही. अंतरीची तळमळ केवळ इतक्या वर्षांत खाजगी बैठकीत दोनतीनदा कारखानदारांबद्दल साहेबांचे वक्तव्य ऐकण्याची संधी मिळाली. ( जाहीर भाषणे अनेक, पण औपचारिक ) एका कामगारनेत्याला किंचित स्वर चढवून ते सांगत होते : " भांडवलदार म्हणजे दुभत्या गाई; पवित्र ( होली काऊ ) नव्हे ! पण आमच्या सरकारला कसाईही होता येणार नाही. सामोपचाराने घ्या. नाहीतर सारेच हातचे जाईल. "

राजकीय, सामाजिक, आर्थिक नि साहित्य क्षेत्रातील नव्यात नवी प्रकाशने श्री. चव्हाणांच्या टेबलावर असत. वाचन अथांग, मनन भरपूर. मात्र कुठलेही साचेबंद किंवा लेबल-बाज धोरण नाही. गोव्याचे पहिले मुख्यमंत्री कै. भाऊसाहेब बांदोडकर यांना साहेब म्हणाले : " त्याचं असं आहे भाऊ, जेथे ज्या प्रकारचे उद्योगधंदे निघू शकत असतील ते स्थापित होऊ देत. ज्यांना काढावयाचे असतील त्यांना काढू द्यावे. सरकारने शक्य तेवढे उत्तेजन द्यावे. मी तर म्हणेन सुशिक्षित बेकारांना काम मिळो म्हणजे झालं ! " अर्थात हे फार धोपट सहजोद्गार होते. एका परदेशी औषध कंपनीच्या शिष्टमंडळाशी बोलतानासुद्धा साहेब खोलवर शिरले नाहीत. शांतपणे त्यांचे म्हणणे ऐकून घेतल्यावर म्हणाले, " आमचे तरुण तंत्रदृष्ट्या शिकवून किती वर्षांत तयार कराल ? अन्य मुद्द्यांपेक्षा आमच्या लोकांची कुशलता वाढविण्यास मी अधिक महत्त्व देतो. डेव्हलपमेंट ऑफ ह्यूमन रिसोर्सेस. " अशा प्रकारे नाही म्हटले तरी साहेब गाभ्याला हात घालीत. हा कमकुवतपणा नसून कार्य-कुशलता आहे. उगीच शब्दावडंबरापेक्षा किती तरी श्रेयस्कर. हेच त्यांच्या राजकीय वा आर्थिक नीतीचे सूत्र वाटले. मानवी आधार !

# सत्तेवर नसलेले यशवंतराव

## राम खांडेकर

सत्ताकारण आणि राजकारण या दोन्ही एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत असे म्हणणे चुकीचे होणार नाही. ज्या नाण्याच्या या दोन बाजू भक्कम आहेत अशी नाणी बऱ्याच कालावधीपर्यंत चलनात राहतात असाच अनुभव आहे. अर्थात याला अपवादही आहेत. केवळ राजकारण खेळणारी मंडळी फार काळ प्रकाशात असलेली दिसत नाहीत किंवा केवळ सत्ता मिळालेली मंडळी फारशी लोकप्रिय झालेली दिसत नाहीत. ज्या व्यक्तींच्या या दोन बाजू भक्कम आहेत त्याला इतर गुणांची जोड मिळाली तर ती व्यक्ती अविस्मरणीय अशीच असते. यशवंतराव चव्हाण यांची गणना यात करावी लागेल.

यशवंतराव जवळपास ३० वर्षे सत्तेवर होते. या काळात असंख्य लोक त्यांना भेटत होते, त्यांच्याजवळ येत होते. साधारणतः सत्तेवरून माणूस खाली आला की लोक त्याच्याकडे ढुंकूनही पाहात नाहीत असा अनुभव आहे. पण यशवंतरावांच्या बाबतीत असे झाले नाही. थोडा फार फरक पडला असेल. माणसांचा राबता चालूच होता. विरोधी पक्षाचे लोकही त्यांच्याकडे येत होते आणि तासन्‌तास बसत होते. यशवंतरावांशी झालेल्या चर्चेतून त्यांना विचारांची शिदोरी मिळत होती. सत्तेवर नसतानाही यशवंतरावांना अनेक कार्यक्रमांची बोलावणी येत होती. महाराष्ट्रातच नव्हे तर बाहेरचे लोकही भेटून त्यांना आमंत्रण देत होते. कवी, साहित्यिक व राजकीय क्षेत्रातील मंडळी यशवंतरावांकडे आपल्या विषयासंबंधी चर्चा करीत होते. खरे म्हणजे आता यशवंतराव विचारांनी मोकळे झाले होते. ते यात जास्तीत जास्त रस घेऊ लागले होते. यशवंतराव सत्तेवर नाहीत म्हणून लोकांनी त्यांना सोडले नव्हते. या कालावधीत यशवंतरावांचा पत्रव्यवहार जवळपास जशाचा तसाच होता. प्रत्येक पत्राला उत्तर गेले पाहिजे हाच यशवंतरावांकडचा प्रघात होता. तो त्यांनी पुढेही चालू ठेवला. फरक एवढाच होता की कधी कधी मराठी पत्रांना इंग्रजीत पोच जाऊ लागली. कारण दिल्लीत मराठी शीघ्रलेखक किंवा टंकलेखक कमी आहेत. याच

खुलासा यशवंतरावांनी अनेकदा केलाही होता.

१९७७ च्या फेब्रुवारीत काँग्रेसला हादरा देणाऱ्या निवडणुकी झाल्या. त्यानंतर यशवंतराव दिल्लीत आले. निवडणुकीच्या निकालाचा त्यांनाही धक्काच बसला होता. आल्याबरोबर त्यांनी प्रथम आपल्या खाजगी सचिवांना बोलावून घरातील सर्व सरकारी कागदपत्रे त्यांच्या स्वाधीन केली. गुप्त कागदपत्रे कोणाला पाठवावयाची याच्या सूचना दिल्या. त्याचबरोबर बंगल्यावरील स्वीय सहायकास सरकारी फर्निचर वगैरे ताबडतोब परत करण्याच्या सूचना दिल्या. घरातील एअर कंडिशनर्स कमी करण्यात आले. सरकारी अंगरक्षक, पोलिस, कर्मचारी यांना प्रेमाने निरोप दिला. सत्तेवर नसलेल्या यशवंतरावांनी आपल्या पुढील जीवनाचा, दिनचर्येचा आराखडा तयार केला. पहिले तीन-चार महिने काँग्रेस पक्षाच्या अनेक बैठकी झाल्या. पराभवाची मीमांसा, पुढील कार्यक्रम याबाबत चर्चा झाल्या. श्रीमती इंदिरा गांधींचा पराभव झाल्यामुळे लोकसभेत काँग्रेस पक्षाचे नेतृत्व यशवंतरावांकडे आले. पक्षाच्या कार्याला वेळ देऊन राहिलेल्या वेळात यशवंतराव दोन सख्यांच्या सहवासात आपला वेळ घालवू लागले. संघटना व देश यांच्या भवितव्याबाबत त्यांना चिंता होती. परंतु त्यांच्या सख्या त्यांना पुष्कळदा यापासून दूर नेत होत्या. यशवंतरावांच्या दिवाणखान्यात दोन सोफ्याच्या खुर्च्या होत्या. यशवंतरावांची एक सोफ्याची खुर्ची निश्चित केलेली होती. त्यांच्या डाव्या बाजूला जी खुर्ची होती त्यावर वेणूताई बसायच्या. ही स्थाने निश्चित केलेली होती. खुर्च्या बदलून ही उभयता बसली असे कधी झाले नाही. साहेब दौऱ्यावर असतानाही कधी वेणूताई साहेबांच्या खुर्चीवर बसल्या नाहीत. एवढेच नव्हे तर सौ. वेणूताईंच्या निधनानंतर ही खुर्ची नेहमी रिकामीच राहिली. साहेब फारसे त्या खुर्चीवर बसले नाहीत किंवा त्यांनी ती खुर्ची बाहेर ठेवली नाही. यशवंतरावांच्या डाव्या बाजूला त्यांची सखी वेणूताई होत्या तर उजव्या बाजूला एका छोट्या टेबलावर दुसरी सखी होती. ती म्हणजे पुस्तके. या टेबलावर २५-३० पुस्तके, ६-७ मासिके नीट लावून ठेवलेली असत. सौ. वेणूताई व यशवंतराव यांना त्यांचा संसार सुरू झाल्यापासून एवढा निवांत वेळ प्रथमच मिळत होता. वेणूताईंची दिनचर्या याही काळात फारशी बदलली नव्हती. पण यशवंतरावांच्या जीवनात फार फरक पडला.

दिल्लीत आल्यापासून यशवंतरावांना दिल्लीतील रस्त्यासंबंधीची किंवा दुकाना-

संबंधीची फारशी माहिती नव्हती. पायातील चप्पल-बुटापासून तो डोक्यावरील केस कमी करण्यापर्यंत सर्व गोष्टींकडे वेणूताईंचे लक्ष असे. सकाळ झाली की वेणूताई स्वतः किंवा नोकराकडून साहेबांचे कपडे, जोडे, चपला, रुमाल, गुंड्या सर्व काढून मांडून ठेवत. त्यांच्यावर नजर टाकत. आता सायंकाळचा मोकळा वेळ यशवंतरावांना मिळू लागला. कधी कधी वेणूताई यशवंतरावांना आपल्या-बरोबर बाजारहाट करण्यास नेऊ लागल्या. पण यशवंतरावांची एक अट असे ती म्हणजे ते गाडीतून खाली उतरावयाचे नाहीत. १९७७ मधील जून महिन्यातील गोष्ट आहे. सौ. वेणूताई काही नातेवाइकांच्या मंगल कार्यासाठी मुंबईस गेल्या होत्या. दिवसभर यशवंतराव बंगल्यात एकटे होते. सायंकाळी ६ चा सुमार होता. त्यांनी गाडी लावण्यास सांगितले. गाडीत बसल्यानंतर गाडी सुरजकुंडाकडे घेण्यास सांगितली. सुरजकुंड बंगल्यापासून १६, १७ किलोमीटर होते. इथे छोटेसे पाण्याचे कुंड असून आजूबाजूला पर्यटन स्थळ केले आहे. इथे साधारणतः सुटीच्या दिवशी गर्दी असते. साहेब इथे कधी आल्याचे माझ्या स्मरणात नव्हते. जवळपास ७ च्या सुमारास आम्ही तिथे पोहोचलो. साहेब गाडीतून खाली उतरले आणि जवळपास ३५ ते ४० मिनिटे साहेबांचा तो नवा अवतार पाहून मी आश्चर्यचकित झालो. साहेब अगदी स्वच्छंदपणे हिंडत होते. बागडत होते. सुरजकुंडाच्या बाजूला असलेल्या पायऱ्या ते भरभर उतरत होते. चढत होते. त्यांचा तो जोश नवा होता. पिंजऱ्यातून सुटलेल्या हरिणासारखी साहेबांची स्थिती झाली होती. साहेब परत आले ते ताजेतवाने होऊन. साहेबांना कंटाळा आला की ते एखाद्या निसर्गरम्य ठिकाणी जायचे. विशेषतः राजघाट, शांतिघाट वगैरे त्यांची आदराची स्थाने. मृत्यूपूर्वी काही दिवस अगोदरच ते असेच राजघाटावर जाऊन आले होते.

यशवंतरावांनी सत्तेवर नसताना जनसंपर्क जास्तीत जास्त ठेवण्याचा प्रयत्न केला. सत्तेवर असताना बहुतेक सकाळी पर्यटकांची रीघ त्यांच्या दारी असे. ही प्रथा पुढेही चालू राहिली. आता यशवंतराव त्यांची अधिक जिव्हाळ्याने चौकशी करू लागले. त्यांच्यासाठी अधिक वेळ देऊ लागले. येणाऱ्यांपैकी कोणी ओळख सांगितली की ते त्यांच्या घरातील इतर माणसांबद्दल चौकशी करीत. यशवंतरावांची स्मरणशक्ती पाहून तो माणूस थक्क व्हायचा. यशवंतरावजींचा जिव्हाळा, माणुसकी व अगत्य पाहून लोकांचा त्यांच्याविषयीचा आदर वाढायचा. मुलांपासून वयस्कर

लोकांपर्यंत बहुतेकजण त्यांच्यासमोर अतिशय आदराने बसायचे. निरोप घेताना पायावर डोके ठेवायचे. सत्तेवर असतानाही यशवंतराव दोन मिनिटे का होईना या लोकांना भेटायचे. हे महाराष्ट्राचे कुलदैवत होते. त्याची सर्वांना कल्पना होती.

महाराष्ट्रातून, देशातून येणाऱ्यांना यशवंतराव भेटू लागले. ९--३०, १० ला आंघोळ करून ते भेटायच्या खोलीत येऊन बसत. कोणी आला तर बोलत बसत, नाहीतर पुस्तकाचे वाचन चालू राहायचे. पूर्वीपेक्षा अधिक पुस्तकांची भर लायब्ररीत पडू लागली. यशवंतरावांना त्यांनी आत्मचरित्र लिहावे अशी असंख्य पत्रे येऊ लागली. पण राजकीयदृष्ट्या यशवंतरावांना हा काळ मनस्ताप देणारा होता. आत्मचरित्राच्या चिंतनापेक्षा राजकीय चिंतन करण्याची वेळ होती. काही वेळा यशवंतराव तासन् तास विचारात गढून गेलेले असत. शेजारी कोणी आहे याचे भानही त्यांना राहात नव्हते. याच काळात दोन कॉंग्रेस झाल्या. यशवंतरावांना हे विभाजन पसंत नव्हतं. पण इलाज नव्हता. जवळपास अडीच वर्षांचा काळ यात गेला. सामान्यजनाला न समजणारे धक्के बसत होते. जनता पक्षातील आपसातील भांडणामुळे या पक्षाविरुद्ध अविश्वासाचा ठराव आणून पुन्हा जनतेचा विश्वास मिळविण्याचा प्रयत्न कॉंग्रेस पक्षाने करावा असा विचार सुरू झाला. अर्थात ही जबाबदारी कॉंग्रेस पक्षाचे जुने नेते म्हणून यशवंतरावांवर आली. पार्लमेंट अधिवेशनाच्या अखेरच्या दिवसांत ८ मे १९७९ रोजी यशवंतरावांनी लोकसभेत हा ठराव मांडला आणि तो खरोखरच ऐतिहासिक ठरला. अविश्वासाचा ठराव मांडताच जनता पक्ष एकत्र येऊन याला तोंड देण्याच्याऐवजी तो विभागला गेला आणि पुन्हा चरणसिंगांच्या नेतृत्वाखाली यशवंतराव सहा महिन्यांसाठी उपपंतप्रधान झाले.

यशवंतरावांनी १९७७ ते जून १९८२ पर्यंत त्यांचा कॉंग्रेस पक्ष विरोधात होता म्हणून विरोधी पक्षात काम केले आणि या कालावधीत विरोधी पक्षाने कसे वागायचे, विशेषतः विरोधी पक्षात काम करणाऱ्या अध्वर्यू नेत्यांनी कसा आदर्श लोकांपुढे ठेवायचा याचे अनुकरणीय उदाहरण घालून दिले. त्यांच्या कार्याचा अभ्यास आजही व्हायला हवा. त्यांनी या कालावधीत केलेली सरकार-वरील टीका वाजवी स्वरूपाची होती. पण ते टीकेसाठी टीका करीत नव्हते. वेळप्रसंगी त्यांनी सरकारची तोंड भरून स्तुतीही केली आहे. विशेषतः त्यांनी जनता पक्षाच्या व नंतर इंदिरा गांधी सरकारच्या परराष्ट्र भूमिका उचलून धरल्या.

अर्थात या त्यांच्या स्तुतिपर भाषणामुळे त्यांच्यावर त्यांच्या पक्षातील संसदेतील मित्र नाराज असायचे. पण यशवंतरावांनी त्यांना स्पष्ट बजावले होते की, मी वाईटाला वाईट व चांगल्याला चांगले म्हणणार! १९७९ सालीही जनता पक्षाविरुद्ध अविश्वासाचा ठराव मांडतानाही हा ठराव कठोर भाषेत लांबलचक असावा अशी विरोधी पक्षाची भूमिका होती. यशवंतरावांना हे मान्य नव्हते. जनता राज्यातील चांगल्या गोष्टींची त्यांना जाणीव होती. ठराव आणायचा म्हणून ते मांडणार होते आणि शेवटी हा ठराव एका ओळीत मांडण्यात आला. अर्थात हाही सहकाऱ्यांचा रोष पत्करून! यशवंतरावांनी खाजगी, राजकीय जीवनातही कोणावर टीकेसाठी टीका केली नाही, म्हणूनच ते सर्वांचे आदराचे स्थान ठरले.

यशवंतरावांना सत्तेचा गर्व कधी झाला नाही. आपल्या बरोबरच्या लोकांना त्यांनी कधी मी मंत्री आहे याची जाणीव होऊ दिली नाही किंवा करून दिली नाही. सत्तेवर नसतानाही त्यांनी कोणाला मी अमुक एक होतो असे सांगितले नाही. ते नेहमीच हाताखालच्या लोकांशी सौम्यतेने व जिव्हाळ्याने वागत. वड्याचे तेल वांग्यावर कधी जर काढले गेले तर त्यांना त्याची जाणीव व्हायची. १९८० ते १९८२ च्या काळात मजेदार गोष्ट घडली. श्री. शरद पवार, यशवंतराव ज्या काँग्रेसमध्ये होते त्याचे महाराष्ट्रात नेतृत्व करीत होते. शेतकऱ्यांचे प्रश्न घेऊन श्री. शरद पवार महाराष्ट्रातून दिंडी घेऊन नागपूरला निघाले होते. या दिंडीला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत होता. यशवंतरावांनी थोड्या वेळासाठी का होईना या दिंडीत सामील व्हावे अशी श्री. शरद पवार यांनी इच्छा व्यक्त केली. श्री. यशवंतराव शरद पवार यांच्या कार्याला प्रोत्साहन देत होते. यशवंतरावांनी नागपूरपूर्वी या दिंडीत भाग घ्यायचे ठरविले आणि ते नागपूरला गेले. तेथून ते १०० ते १२५ किलोमीटर अंतरावर असलेल्या अमरावती येथे गेले. दुसऱ्या दिवशी सकाळी ते दिंडीत सामील व्हायला गेले आणि तिथेच पोलिस अधिकाऱ्यांनी दिंडीत सामील होणाऱ्यांना पकडायचे आदेश आहेत असे यशवंतरावांना सांगितले. यशवंतरावांना हा अन्याय होत आहे याची जाणीव झाली. तरीपण शांतपणे त्यांनी अधिकाऱ्यांना आदेशातील शब्द नीट वाचून मग पुढील कार्यवाही करण्यास सुचविले. पोलिस अधिकाऱ्यांनी त्यांना स्पष्ट आदेश असल्याचे सांगितले. इतरांना या कार्यवाहीची चीड आली, पण यशवंतराव शांतपणे बसमध्ये बसले. एवढेच नव्हे तर दिंडीतील इतरांना

दुपारच्या वेळी दिलेली भाजी पुरी सर्वांसोबत आवडीने खाल्ली. दिवसभराच्या प्रवासात त्यांनी कुठे ब्र काढला नाही. तसे पाहिले तर दुसऱ्याच्या कारभारात हस्तक्षेप न करण्याचा यशवंतरावांचा स्वभाव होता. एकदा ते गंगोत्रीस हेलिकॉप्टरने सरकारी कामानिमित्त गेले होते. हिमालयाच्या रांगांत हेलिकॉप्टर साधारणत: दरीतून आपला प्रवास करते. गंगोत्री सोडताना पाऊस पडत होता. पावसात हेलिकॉप्टर प्रवास करीत होते. साधारणत: ४० ते ४५ मिनिटाच्या प्रवासानंतर काही अंतरावर काळे ढग दिसू लागले. पायलटने आपल्या शेजारच्या सहकाऱ्याला पुढे काही दिसते का विचारले. त्याने नाही म्हणताच १५ सेकंदांत हेलिकॉप्टर मागे वळविले. पायलटशेजारी यशवंतराव बसले होते. हेलिकॉप्टर मागे परतत आहे याची त्यांना कल्पना आली. पण का हे लक्षात आले नाही. त्यांनी शेजारच्या पायलटकडे सुद्धा बघितले नाही. समोर पाहात राहिले. मंत्री आपणास आता परत का फिरता असे विचारतील म्हणून पायलट त्यांच्याकडे पाहात होता. पण यशवंतराव समोर पाहात होते. ५-७ मिनिटांनंतर एक शाळेचे मोठे मैदान पाहून हेलिकॉप्टर खाली उतरविले. यशवंतराव खाली उतरले. तरीपण यशवंतरावांनी त्याला विचारले नाही. शेवटी तोच म्हणाला, सर, पुढे खराब हवा असण्याची शक्यता होती. ढगातून प्रवास करणे जोखमीचे होते म्हणून परत आलो." यशवंतराव म्हणाले, " हेलिकॉप्टरमध्ये तुम्ही सुपीरिअर आहात. माझ्यापेक्षा तिथे तुमची जबाबदारी मोठी आहे. तुम्ही योग्य तोच निर्णय घ्याल म्हणून मी बोललो किंवा विचारले नाही. " मोटारीतही यशवंतराव गाडी चालू असताना ड्रायव्हरला काही बोलत नसत. सौ. वेणूताईंची स्वतंत्र गाडी होती. ड्रायव्हरही स्वतंत्र होता. त्याला गाडी वेगात चालविण्याची सवय होती. अर्थात काळ वेळ पाहून. एकदा यशवंतरावांना महत्त्वाच्या बैठकीसाठी जायचे होते. वेळ अतिशय थोडा होता. ते खाजगी गाडीतून गेले. ड्रायव्हरला, उशीर झाला आहे याची कल्पना होती. त्याने इतक्या वेगात गाडी नेली की यशवंतराव वेळेवर पोहोचले. परंतु परत आल्यानंतर त्यांनी सौ. वेणूताईंना सांगितले की तुमच्या ड्रायव्हरला गाडी थोडी हळू चालवायला सांगा. अर्थात त्याने वेळेवर नेल्याबद्दल त्याचे कौतुक करण्यास ते विसरले नाहीत.

यशवंतरावांच्या राहणीत सत्तेवर असताना व नसताना फारसा काही फरक पडला नाही. त्यांना कडक परीटघडीचे कपडे आवडायचे. साधारणत: दिवसातून

ते दोनदा कपडे बदलत. ही सवय सत्तेवर नसतानाही यशवंतरावांना होती. साहित्य, माणसं, प्रवास यातच यशवंतराव सत्तेवर नसताना वेळ घालवू लागले. विशेषत: या कालावधीत त्यांनी लिखाण बरेच केले. लहान मोठे लेख, प्रस्तावना त्यांनी बऱ्याच लिहिल्या. आत्मचरित्राचा विचार घोळत होता पण त्यासाठी लागणारी मन:शांती नव्हती. ती मिळाली जेव्हा त्यांनी इंदिरा कॉंग्रेसमध्ये प्रवेश केला तेव्हा. त्यांचा कॉंग्रेस प्रवेश विवाद्य ठरला. ही नाराजी पत्रद्वारे, अग्रलेखाद्वारे व्यक्त झाली. प्रत्यक्ष यशवंतरावांना भेटून काहींनी सांगितली. पण नेहमीच्या सवयीप्रमाणे कोणतीही गोष्ट नीट विचार केल्याशिवाय करायची नाही या स्वभावाप्रमाणे यशवंतरावांनी आपल्या मनातील कॉम्प्युटरपुढे हा प्रश्न मांडला. सर्व बाजूंनी त्यांनी विचार केला. विरोधी पक्षाची भूमिका, त्यांचं भवितव्य पाहून यशवंतरावांनी कॉंग्रेसच्या मुख्य प्रवाहात प्रवेश करावयाचे ठरविले. अर्थात याचा फायदा त्यांच्या अनुयायांना मिळाला. किंबहुना, अवघडलेल्या स्थितीतून त्यांना बाहेर पडता यावे म्हणून त्यांनी हा मार्ग मुख्यत: स्वीकारला. आता पक्षासाठी व देशासाठी काही करता आलं तर करायचं ही दिशा त्यांनी या कालावधीत ठरविली. म्हणूनच आठव्या अर्थ आयोगाचे अध्यक्षपद मिळाल्यानंतर, त्यांना कॅबिनेट मंत्र्याचा दर्जा मिळूनही सरकारची एक पैशाचीही वस्तू त्यांनी बंगल्यात येऊ दिली नाही. एव्हढेच नव्हे तर सरकारी टेलिफोनही त्यांनी घेतला नाही. त्यांचा स्वत:चा टेलिफोन हा बऱ्याच वेळा खराब असायचा. विशेषत: सौ. वेणूताईंच्या आजारपणात तो खराब झाला की फार त्रास व्हायचा म्हणून सरकारी टेलिफोन घ्यावा असे सुचविण्यात आले. परंतु यशवंतरावांनी स्पष्ट नकार दिला. त्यामुळे रात्री बेरात्री सुद्धा बंगल्यासमोरच्या टॅक्सी स्टॅंडवर जाऊन टेलिफोन करावा लागायचा.

कॉंग्रेस प्रवेशानंतर यशवंतरावांवरील मनावरचं ओझं हलकं झालं. त्यांच्या पाठीराख्यांना त्यांनी प्रवाहात आणून सोडलं. यशवंतरावांनी या कालावधीत आत्मचरित्राचा आराखडा तयार केला. आत्मचरित्र तीन खंडांत प्रकाशित करण्याचे ठरविले. पहिल्या खंडाची रूपरेषा तयार केल्यानंतर त्यांनी जवळपास ३-४ महिने सतत बसून आत्मचरित्र डिक्टेट केले. त्याचा प्रारूप तपासला. हा काला-वधी अर्थ आयोगाची सूत्रे हाती घेतली त्याच्या सुरुवातीचा होता. आत्मचरित्राची पाने तयार झाली की ती ते सौ. वेणूताईंना वाचून दाखवीत. सौ. वेणूताईंची

2401

प्रेरणा त्यांचे आत्मचरित्र पूर्ण करण्यास स्फूर्ती देत होती. आत्मचरित्र प्रकाशित झालं परंतु त्यांच्या आत्मचरित्राचे महाराष्ट्रात स्वागत होत होतं तेव्हा यशवंतराव दु:खाच्या दाट छायेत वावरत होते. तसं पाहिलं तर अर्थ आयोगाची जबाबदारी स्वीकारण्यास यशवंतराव फारसे उत्सुक नव्हते. पण नेत्यांचे आदेश केवळ दोन तासांत विचार करून निर्णय द्यायचा होता.

यशवंतरावांनी सर्व परिस्थितीचा विचार करून होकार कळविला. अर्थ-आयोगाचे काम पहिल्या ४-५ महिन्यांत फारसे नव्हते. परंतु ते सुरू झाल्यानंतर यशवंतरावांना एकसारखे कौटुंबिक धक्के बसू लागले. १९८३च्या मार्च महिन्यातील त्यांच्या वाढदिवसाची तयारी सुरू असतानाच त्यांचा पुतण्या— डॉ. विक्रम चव्हाण ऊर्फ राजा याच्या अपघाती निधनाची बातमी दिल्लीत धडकली. त्यांच्या निधनाचे दु:ख चव्हाण दांपत्याला अतिशय झाले. कारण या पिढीत एवढा शिकलेला हा त्यांचा एकच पुतण्या. यशवंतरावांचे स्वप्न त्याने साकार केले होते. ते पुण्यास त्याच्या अंत्यविधीसाठी गेले आणि तिथे जमलेला अफाट जनसमुदाय पाहून त्यांना आपल्या पुतण्याच्या लोकसंपर्काची व जनसेवेची प्रथम कल्पना आली. ते पाहून तर त्यांना झालेले दु:ख शब्दांत व्यक्त करता येणारे नाही. सौ. वेणूताईंनी तर धसकाच घेतला. कर्तृत्ववान तरुण पुतण्या गेला व त्याची तरुण पत्नी विधवा झाली. तिची दोन मुले तीही लहान. या कल्पनेने त्यांचे मन सुन्न झाले. त्यांच्या डोळ्यातील अश्रू आटेनात. याच वेळी दिल्लीत त्यांच्या निवासस्थानी महाराष्ट्र चेंबर्स ऑफ कॉमर्सतर्फे दिल्लीतील महाराष्ट्रीयनांचा मेळावा भरला होता. सौ. वेणूताईंनी यशवंतरावांना विनंती केली, साहेब मला बाहेर येण्याचा आग्रह करून नका. नकली हसू आणून चार लोकांत मिसळणे मला शक्य नाही. यशवंतरावांनी पण याला मान्यता दिली. जमलेल्या लोकांना या दु:खाची कल्पना नसल्यामुळे किंवा ती येण्याची शक्यता नसल्यामुळे सौ. वेणूताईंची प्रकृती ठीक नाही असेच सांगण्यात आले. हे दु:ख इतके होते की सौ. वेणूताईंची प्रकृती हळूहळू खालावत गेली. केवळ औषधावर जगणाऱ्या वेणूताई पहाडाएवढं दु:ख कसे सहन करणार ? त्यातच त्या ४-५ दिवस आजारी पडल्या आणि १ जून १९८३ रोजी सकाळी ११–३०च्या सुमारास त्यांची प्राणज्योत यशवंतरावांच्या मांडीवर मालवली. अर्थ आयोगाची जबाबदारी स्वीकारल्यापासून त्यांच्यावर एकामागून एक येणाऱ्या दु:खाचा हा जबरदस्त

फटका होता. यशवंतरावांनी त्यांचा पार्थिव देह खाली ठेवला. बाहेरच्या हॉलमध्ये म्लान वदनाने बाजूला बसून राहिले. मंत्री, राष्ट्रपती येऊन आपली श्रद्धांजली वाहून गेले. पण यशवंतरावांच्या डोळ्यातून एक टिपूस पाणी आले नाही. मी सौ. वेणूताईंच्या निधनाची बातमी ऐकताच तातडीने तिथे गेलो. मला पाहताच साहेब म्हणाले, " खांडेकर, बाई गेल्या हो ! " त्यांच्याकडे पाहण्याची माझी हिम्मत झाली नाही. पाचच्या सुमारास सौ. वेणूताईंचा मृतदेह मुंबईस विमानाने नेण्यासाठी बाहेर काढला. त्या वेळीही साहेब न रडता सर्वांचा हात जोडून निरोप घेत होते. मनात येत होते साहेबांच्या डोळ्यांतील अश्रूंना वाट मिळवून देण्याचे काम कोणी तरी केले पाहिजे. कॉलेजात असताना एक कविता वाचली होती तिची तीव्रतेने आठवण झाली. एका सैनिकाचा मृतदेह त्याच्या गावी आणला जातो. तो पाहून त्याची पत्नी हंबरडा फोडेल असे सर्वांना वाटत होते. पण झाले उलटेच. तो देह पाहून ती शांत बसलेली. या स्थितीत बराच वेळ गेला. जमलेल्या लोकांनी तिने रडावे म्हणून अनेक प्रयत्न केले. ती रडल्याशिवाय तिचे दु:ख कमी होणार नाही याची सर्वांना खात्री होती. ती रडल्याशिवाय मृतदेह बाहेर नेणे योग्य वाटेना. शेवटी एका वृद्ध स्त्रीने तिच्या लहान मुलाला तिच्या मांडीवर ठेवले आणि त्याच क्षणी त्या स्त्रीने हंबरडा फोडला. यशवंतरावांनी असेच आपले दु:ख दाबून ठेवले. त्यानंतर १०-१२ दिवस ते मुंबईत अंत्यविधी व इतर विधीसाठी असेपर्यंत फारसे रडू शकले नाहीत. आपले दु:ख दाबून ठेवले. सर्व विधीनंतर सौ. वेणूताईंच्या अस्थी गंगेच्या पवित्र पाण्यात विसर्जिण्यासाठी हरिद्वारला नेण्यासाठी दिल्लीला बंगल्यात आणल्या आणि यशवंतरावजींच्या नजरेसमोर पूर्वीचा इतिहास उभा राहिला. त्यांनी खरोखरच हंबरडा फोडला आणि डोळ्यातून गंगा यमुना येऊ लागल्या, त्या कधी आटल्याच नाहीत. १९७७ च्या काँग्रेस पराभवानंतर यशवंतरावजींच्या राजकीय जीवनाला जशी ओहोटी लागली तशीच त्यांच्या वैयक्तिक जीवनातही लागली होती. १९७७ च्या डिसेंबरमध्ये त्यांचे उजवे हात आणि ज्यांचा यशवंतरावजींच्या यशात फार मोठा वाटा होता ते श्री. श्रीपाद डोंगरे-यशवंतरावजींचे निजी सचिव, सर्वांना सोडून गेले. १९८० च्या सुरुवातीस ऐन निवडणुकीच्या धामधुमीत ज्या वेळी यशवंतरावजींचे पुढारीपण पैज लावून होते त्या वेळी त्यांच्या जिल्ह्यातील पक्षाचे व यशवंतरावजींचे काम पाहणारे यशवंतरावजींचे डावे हात श्री. आबासाहेब ऊर्फ किसन वीर त्यांना

सोडून गेले. १९८४च्या सुरुवातीस पुतण्या व नंतर सौ. वेणूताईंच्या निधनामुळे यशवंतरावजींचे सर्वच जीवन संपुष्टात आले. थोड्याच दिवसांत पंतप्रधान इंदिरा गांधींच्या मृत्यूमुळे तर यशवंतरावांनी हाय खाल्ली. सौ. वेणूताई गेल्यामुळे संसारात ते एकाकी पडले होते तर इंदिराजींच्या निधनामुळे राजकारणातील त्यांच्या तोलामोलाची व्यक्ती नाहीशी झाली. यशवंतराव २३ ऑक्टोबरच्या सुमारास ५-६ दिवसांसाठी आपल्या मतदारसंघात जाणार होते. कार्यक्रमही तयार झाला होता पण त्याच सुमारास इंदिराजींचे निधन झाल्यामुळे त्यांनी हा कार्यक्रम रहीत केला. ७-८ नोव्हेंबरच्या सुमारास मी त्यांना विचारले, "साहेब, आपण आता मुंबईस केव्हा जाणार?" डोळ्यांत पाणी आणून ते म्हणाले, "खांडेकर, खरं सांगू, मी आता दिल्लीत का राहतो हेच मला समजत नाही. इंदिराजी आणि माझ्यात बरेच मतभेद होते हे खरे आहे, पण खाजगी जीवनात आम्हाला एकमेकांबद्दल नितांत आदर होता. आता अशी व्यक्ती नाही की जिच्याजवळ जाऊन आपले सुखदु:ख प्रेमाने, रागाने व्यक्त करता येईल. नवीन पिढीच्या हातात नेतृत्व गेले आहे. त्याला बाहेर राहून शुभेच्छा देण्यातच सर्वांचे हित आहे." अर्थात हे शब्द नियतीने आपल्या विचारांची त्यात भर घालून खरे केले. कारण यशवंतराव त्यानंतर केवळ १०-१२ दिवसांतच जग सोडून गेले. राजीवजींच्या पंतप्रधान म्हणून झालेल्या नियुक्तीची बातमी मी टेलिफोनने यशवंतरावांना दिली. त्या वेळी ते म्हणाले, "पक्षाने गेल्या काही वर्षांत घेतलेल्या निर्णयात हा सर्वांत चांगला निर्णय घेतला आहे."

एक गोष्ट मात्र खरी की यशवंतरावांनी राजकारण आणि खाजगी जीवन यात नेहमीच फारकत केली. दोन्ही जीवनांतील विचारसरणी आणि मते नेहमीच वेगळी राहिली. राजकारणातील मतभेदांना खाजगी जीवनात त्यांनी स्पर्श होऊ दिला नाही. एवढेच नव्हे तर दुसऱ्यांनी पण ही विचारसरणी ठेवावी अशी त्यांची नितांत इच्छा होती. त्यांनी कधीही दुसऱ्याचे वाईट चिंतिले नाही. सर्वांना प्रेम व आदर दिला. कोणतीही व्यक्ती गरीब आहे किंवा लहान आहे म्हणून तुटकतेने ते वागले नाहीत. म्हणूनच सत्तेवर नसतानाही यशवंतरावांकडे विविध क्षेत्रांतील अनेक मंडळी येत राहिली. मनमोकळ्या गप्पा मारीत राहिली. विचारांची देवाणघेवाण चालू राहिली. यात विरोधी पक्षातील लोक होते. अनेक पत्रकार होते. राजकारणी होते. इंदिराजींबद्दल, त्यांच्या कार्याबद्दलही त्यांना आदर होता.

इंदिराजीही त्यांना आदराने वागवत. संजय गांधींच्या मृत्यूची बातमी यशवंतरावांना समजताच ते तात्बडतोब इंदिराजींना भेटायला १ सफदरजंगवर गेले. त्यांची गाडी बंगल्याच्या आवारात जाण्यास व इंदिराजींची बाहेर पडण्यास एकच गाठ पडली. पण इंदिराजींचे लक्ष यशवंतरावांकडे गेले आणि त्यांनी तात्बडतोब गाडी थांबवून यशवंतरावांची भेट घेतली व परत गाडीत जाऊन बसल्या. पंतप्रधानांची गाडी एकदा चालू झाल्यानंतर थांबण्याच्या घटना फारच थोड्या असतात. इंदिराजींच्या निधना अगोदर राजीवजींशी, काही काँग्रेसच्या वरिष्ठ मंडळींची संघटनेबाबत चर्चा झाली होती. दुसऱ्या दिवशी वर्तमानपत्रात काही केंद्रीय मंत्र्यांना ताटकळत बाहेर बसावे लागले अशी बातमी वाचली. सहज यशवंत-रावांना विचारले तर ते म्हणाले माझ्या बाबतीत असे झाले नाही, सर्वांना माझ्या-बाबत विशेष सूचना दिल्या असल्यामुळे मला गाडीतून उतरवून घेण्यापासून तो परत गाडीत बसेपर्यंत एका वरिष्ठ पदाधिकाऱ्याने जबाबदारी घेतली होती. त्यामुळे माझा एक सेकंदही व्यर्थ खर्च झाला नाही. यशवंतरावही इंदिराजींच्या शब्दाला मान देत होते. पंजाबमधील घटनेनंतर यशवंतरावांनी चंदीगडला जाऊन काँग्रेस कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करावे अशी इंदिराजींची इच्छा होती. काँग्रेसश्रेष्ठींनी यशवंतरावांना सांगितले तेव्हा त्यांनी नकार दिला. पण जेव्हा इंदिराजींनी सांगितले तेव्हा ते तयार झाले. तिथून आल्यानंतर त्यांनी आपल्या भेटीचा वृत्तान्त स्पष्ट शब्दांत व काहीशा नाराजीने सांगितला. इंदिराजी यशवंतरावांच्या भावना समजू शकत होत्या. त्यानंतर व्हाईट पेपरबद्दल यशवंत-रावांनी लोकसभेत बोलावे अशी इच्छा इंदिराजींनी व्यक्त केली. यशवंतरावांनी ती मान्य केली ती एका अटीवर. ती म्हणजे कोणत्याही सरकारी अधिकाऱ्याने येऊन त्यांना " ब्रीफिंग " करावयाचे नाही किंवा काहीही सरकारी कागदपत्रे भाषणासाठी द्यावयाची नाहीत. ही अट इंदिराजींनी मान्य केली. परिणामस्वरूप यशवंतरावांचे व्हाईट पेपरवरील भाषण इतके अप्रतिम झाले की, पंतप्रधानांनी भाषण संपल्याबरोबर दोन ओळी प्रशंसेच्या लिहून त्या यशवंतरावांकडे पाठवून दिल्या. यशवंतरावजींच्या आयुष्यातील पार्लमेंटमधील हे शेवटचेच भाषण ठरले.

यशवंतरावजींनी या कालावधीत काही भाषणमालिकेतही भाग घेतला. या निमित्ताने ते औरंगाबाद, नाशिक, नागपूर भागातही जाऊन आले. नागपूरच्या विदर्भ साहित्य संघात बारलिंगे स्मृतीनिमित्त त्यांनी दिलेले शेवटचे भाषण होते.

विदर्भातील लोकांच्या औदार्याबद्दल, जिव्हाळयाबद्दल व आदरातिथ्याबद्दल यशवंतरावांना माहीत होती, नव्हे त्यांनी अनुभव घेतला होता. १९६२ साली विधान सभेचे पहिले अधिवेशन नागपूरला भरले असताना यशवंतरावांचा जवळ-पास दोन महिने मुक्काम नागपूरला होता. त्यानंतर एवढे मोठे अधिवेशन अजूनपर्यंत तरी झाल्याचे आठवत नाही. या मुक्कामात यशवंतराव विदर्भातील जनतेच्या फार जवळ आले. आयुष्यातील शेवटच्या घटकेपर्यंत यशवंतराव विदर्भातील जनतेचे आदरातिथ्य विसरले नाहीत.

यशवंतरावांनी या कालावधीत सर्वांत जास्त पुस्तके वाचली असली तर ती कवितांची! अनेक कवींनी आपल्या पुस्तकाला यशवंतरावांनी प्रस्तावना लिहावी म्हणून कितीतरी पुस्तकें पाठवून दिली होती. यशवंतरावांनी बऱ्याच पुस्तकांना प्रस्तावना लिहून पाठवून दिल्या होत्या. यशवंतरावांना काव्य, नाट्य वाचनाची हौस होती. यशवंतरावांचे बाह्य व आतील अंतःकरण यात जमीन अस्मानाचा फरक होता. वरून धीर गंभीर, शांत दिसणारा हा माणूस अतिशय विनोदी होता हे सांगूनही खरे वाटणार नाही. यशवंतराव साहित्याचा आनंद मनापासून लुटत होते. यशवंतराव नाटक पाहायला बसले की त्यातील विनोदा-वर ते मनसोक्त हासत असत. पण त्याचबरोबर नाटकातील दुःखाचे क्षण पाहून त्यांच्या डोळयांत अश्रू उभे राहात. यशवंतराव दिल्लीत आल्यानंतर पार्लमेंट सेशन असताना साधारणतः दर बुधवारी ते काही संसद सदस्यांना रात्री जेवण्यास बोलावीत. एक बुधवार केवळ महाराष्ट्रातील संसद सदस्य जेवावयास असत. एक प्रकारचे हे गेट-टू-गेदर होते. जेवण झाल्यानंतर ही सर्व मंडळी गोलाकार बसत असत आणि नंतर गप्पाविनोदांना ऊत येत असे. प्रत्येकजण विनोदपूर्ण अनुभव सांगत असत. हा कार्यक्रम तास दीडतासापेक्षा जास्त चालत असे. या वेळी यशवंतराव मंत्री राहात नसत. त्यांनी सांगितलेल्या विनोदपूर्ण गोष्टी ऐकून हसता हसता मुरकुंडी वळत असे. या संसद सदस्यात श्री. तुळसीदास जाधव, शंकरराव मोरे, के. के. शहा सारखे रथी महारथी होते. यशवंतरावांनी या वेळी सांगितलेले एक दोन किस्से आजही माझ्या लक्षात आहेत. आपली वकिली कशी चालली होती या संदर्भात यशवंतरावांनी सांगितलेला किस्सा असा—

वकिली सुरू झाल्यानंतर कराड, साताऱ्याच्या आसपास राहणारे लोक त्यांच्याकडे कोर्टातील केसेसच्या संदर्भात येऊ लागले. कोणी माणूस आला की

यशवंतरावांना आनंद होत असे. त्यांच्या स्वभावाप्रमाणे ते आदरातिथ्य करीत असत. परंतु कोर्टात गेल्यानंतर हा अशील दुसऱ्या कोण्या वकिलाबरोबर दिसत असे. निवडणुकीतील प्रचाराच्या लांब भाषणाबद्दल त्यांनी सांगितले की एका वक्त्याला लांब भाषण देण्याची सवय होती. एकदा तर तो भाषण देण्यात इतक रंगून गेला आणि ते इतके लांबले की सर्व श्रोते निघून गेले. एकच शेवटपर्यंत पेंगत बसला होता. भाषण संपल्यानंतर वक्त्याने विचारले की माझे भाषण तुला आवडलेले दिसते. तो म्हणाला साहेब आपण काय सांगितले ते माहीत नाही. पण आपण ज्या ठिकाणी उभे आहात ती सतरंजी माझी असल्यामुळे मी थांबलो आहे.

या गप्पा चालू असताना जर एखादा बाहेरचा माणूस आत आला तर त्याला मंत्री कोण आहे हे सांगूनही खरे वाटले नसते. यशवंतरावांना कंटाळा आला की ते काव्य व नाट्य वाचन मोठ्याने करीत. मुख्य श्रोता असायच्या सौ. वेणूताई. वेणुताईनंतर ते कविता मोठ्याने म्हणत पण त्यात रस नसे.

यशवंतरावांनी कोणाशीच शत्रुत्व केले नसल्यामुळे त्यांची जिव्हाळ्याची माणसे खूप होती. ते दुसऱ्याच्या भावनांना फार जपत. कोणाचेही मन स्वप्नातही आपल्या-मुळे तुटू नये याची ते काळजी घेत. त्यांनी नेहमी प्रेम दिले आणि घेतले. ते कोणाला टाकून बोलले आहेत असे सहसा झाले नाही. कामगारवर्गावर त्यांचे नितांत प्रेम होते. माथाडी कामगार तर त्यांच्या जिव्हाळ्याचा वर्ग होता. माथाडी कामगार संघटनेचे मुख्य स्वर्गीय श्री. अण्णासाहेब पाटील यांच्यावर त्यांचे बंधुवत प्रेम होते. हा वर्ग यशवंतरावांच्या पाठीशी सदैव उभा राहिला. अण्णा-साहेबांच्या मृत्यूची बातमी यशवंतरावांना कळली तेव्हा त्यांचे डोळे अश्रूंनी भरून आले आणि तातडीने त्यांचे अंत्यदर्शन घेण्यासाठी ते मुंबईस गेले. सप्टेंबर-आक्टोबर महिन्यातील गोष्ट आहे. मुंबईतील माथाडी कामगारांनी सौ. वेणूताईंच्या स्मारक ट्रस्टसाठी निधी देण्याचा कार्यक्रम ठरविला. यशवंतरावांनी यासाठी मुंबईस जाण्याचे मान्य केले. परंतु एक दिवस अगोदर त्यांची प्रकृती फार बिघडली. सकाळीच डॉक्टरांनी त्यांना तपासल्यानंतर दिवसभर पूर्णपणे झोपून दिवस काढला तर रात्रीपर्यंत प्रकृतीत फरक पडण्याची शक्यता बोलून दाखविली. दुसऱ्या दिवशी मुंबईस जायचे किंवा नाही याचा निर्णय रात्री घेण्याचे ठरविले. रात्री ८ च्या सुमारास मी साहेबांना भेटण्यास गेलो तेव्हा ते सोफ्यावर बसले होते. ५-१० मिनिटांनंतर

ते म्हणाले, "खांडेकर तुमची हरकत नसेल तर मी झोपून बोलू का?" मला अर्थबोध झाला नाही. माझ्या चेहऱ्याकडे पाहात साहेब म्हणाले की डॉक्टरांनी मला दिवसभर झोपून राहण्याचा सल्ला दिला. परंतु झोपून कंटाळा आला म्हणून मी उठून बसलो. आता डॉक्टर यायची वेळ झाली आणि त्यांनी मला बसलेले पाहिले तर उद्या ते जाऊ देणार नाहीत, आणि झाले तसेच. ५ मिनिटांत डॉक्टर आले. प्रकृती तपासली. अर्थात त्यांचे समाधान झाले नाही व दुसऱ्या दिवशी सकाळी परत तपासण्यास येत असल्याचे सांगितले. डॉक्टरना सोडण्यास मी बाहेर आलो तेव्हा ते म्हणाले, काळजी घेण्याची आवश्यकता आहे. साहेबांनी जाऊ नये असाच सल्ला मी देणार आहे. डॉक्टर गेल्यानंतर मी साहेबांना डॉक्टरांचे मत सांगितले. साहेब म्हणाले, डॉक्टराला काय कळतं; उद्या माझा प्राण गेला तरी मी मुंबईस जाणार. गेल्या महिनाभर माथाडी कामगारांनी खपून कार्यक्रम आखला आहे. त्यांच्या भावना मी दुखवू इच्छीत नाही. साहेब मुंबईस गेले आणि दिल्लीत आल्यानंतर ४-५ दिवस अंथरुणावर पडून राहिले.

यशवंतरावांचा विवाह जरी २ जून, १९४२ रोजी झाला असला तरी यशवंतरावांनी संसार केला तो केवळ एक वर्ष चार महिने. लग्नानंतर सर्व संसाराची जबाबदारी सौ. वेणूताईंवर होती. कारण लग्न होताच साहेब भूमिगत झाले आणि नंतर सत्तेवर आले. सौ. वेणूताईंच्या निधनानंतर जवळपास महिना, दोन महिने कोणी ना कोणी दिल्लीत होते. जवळपास ऑगस्ट महिन्यात ते एकटे राहू लागले. संसाराचा श्रीगणेशाही यशवंतरावांना माहीत नव्हता. पाहुणे मंडळी दिल्ली सोडून गेल्यानंतर नोकराने त्यांच्याकडे भाजीसाठी पैसे मागितले. यशवंतरावांना अतिशय मोजक्याच भाज्या आवडत होत्या. हंगाम नसताना त्या फार महाग असायच्या. यशवंतरावांनी १० रुपये नोकराच्या हातावर ठेवले. १० रुपयांत ५ माणसांची २-३ दिवसांची भाजी कशी येणार याचा तो विचार करीत राहिला. पण बोलणार कसे? थोड्या वेळाने त्यांनी साहेबांना समजविण्याचा प्रयत्न केला. त्यांनी मोठ्या कष्टाने आणखी १० रुपये दिले. आणखी पैसे मागण्याची नोकराची हिम्मत झाली नाही. त्याने आपल्या जवळचे १०-१५ रुपये टाकून २-३ दिवसांची भाजी आणली व बिल साहेबांना दाखविले. साहेबांनी नेहमीप्रमाणे बिल टोपलीत टाकले. २ दिवसांनी पुन्हा भाजी आणण्याची वेळ आली तेव्हा साहेबांनी असेच केले. नोकराने

मोठ्या मुश्किलीने साहेबांना भाजीचे भाव, भाजी किती लागते वगैरे समजावून दिले. पण साहेबांना हे खरे वाटेना व अर्थबोधही होईना. भाज्या इतक्या महाग असतात हे साहेबांना पटणार कसे ? कारण त्यांनी कधी विचारपूस केली नव्हती. त्याचो गरजही नव्हती. संसाराचा हा महत्त्वाचा भाग सौ. वेणूताईंनीच सांभाळला होता. संसाराच्या कटकटीची झळ त्यांनी यशवंतरावांना कधीच लागू दिली नव्हती. दीड वर्षाच्या कालावधीत यशवंतरावांवर संसाराचे असे अनेक प्रसंग आले. देणं-घेणं ही कठीण बाब आहे, संसार म्हणजे तारेवरची कसरत आहे हे त्यांना तेव्हा समजले.

सत्तेवरून खाली आल्यानंतर यशवंतरावांच्या वैयक्तिक जीवनाला ओहोटीच लागली असे म्हणणे चुकीचे होणार नाही. राजकीय परिस्थितीचे फासे जसे त्यांच्या विरुद्ध पडत गेले तसेच सांसारिक जीवनही उद्ध्वस्त होत गेले. अर्थात याही परिस्थितीत एका कुशल वैमानिकाप्रमाणे ते आपले राजकीय जीवन स्थिर ठेवण्याचा प्रयत्न करीत होते. त्यात यशस्वीही होत होते. या कालावधीत अनेक दुरावलेली माणसे त्यांच्या जवळ येत होती हा त्यांच्या जीवनातील प्लस पॉईंट होता. उदाहरण द्यावयाचे असेल तर स्व. वसंतराव नाईक यांचे देता येईल. त्यांना मुख्यमंत्रिपदावरून काढण्यात यशवंतरावांचा हात होता असा त्यांचा गैरसमज होता. सत्य परिस्थिती अशी होती की, यशवंतरावांचे निजी सचिव श्री. डोंगरे यांनी त्यांना ५-६ महिने अगोदर अशा प्रकारच्या हालचाली होत आहेत तरी सावध राहा असा इशारा दिला होता. काही दिवसांनंतर श्री. नाईक यांचा गैरसमज दूर झाला. त्यांनी यशवंतरावांची माफी मागितली आणि सतत यशवंतरावांबरोबर छायेसारखे वागण्याचे अभिवचन दिले. दुर्दैवाने ते सिंगापूरला गेले असताना तिथेच त्यांचे निधन झाले. दुरावलेली माणसे जवळ येत गेल्यामुळे यशवंतरावांना आनंद होत होता.

१९७७ ते १९८० पर्यंत यशवंतराव नवीन उत्साहाने काँग्रेसची उभारणी करण्याकरिता प्रयत्नशील होते. परंतु नंतर त्यांनी हळूहळू राजकारणातून अंग काढून घेण्यास सुरुवात केली. याला कारण ज्या काही घटना घडत होत्या त्यात ते समाधानी नव्हते. त्यांना काही घटनांनी वेदना होत होत्या. पण इलाज काही नव्हता. प्रथमतः जिल्हा, नंतर राज्यस्तरीय व नंतर केन्द्रस्तरावरील राजकारणातून ते बाहेर पडत होते. अर्थात राजकारणातून पूर्णपणे बाहेर पडणे त्यांना शक्य

नव्हते. तो त्यांचा पिंड नव्हता.

सत्तेवर नसलेले यशवंतराव शेवटपर्यंत यशवंतरावच राहिले. त्यांना तोच सन्मान मिळत होता, तोच आदर मिळत होता. त्यांनी आपली ध्येये सोडली नाहीत किंवा तत्त्वापासून दूर गेले नाहीत. म्हणूनच महाराष्ट्राने आणि देशाने त्यांचा नितांत आदर केला. त्यांच्या निधनामुळे महाराष्ट्र दुःखी झाला. स्वातंत्र्य-प्राप्तीनंतर कोंदणातून गळून पडलेला असा हा अष्टपैलू हिरा !!

## 'दैनिक प्रभात'चे विश्वासार्ह व्यक्तिमत्त्व

प्रकाशक आणि संपादक यांना हक्कभंग समितीसमोर हजर राहण्यासाठी बोलावले. हे सर्व घडत असता यशवंतरावांनी आदल्या रात्री साडेदहा वाजता मला फोन करून माझे मत काय आहे ते जाणून घेतले. मी त्यांना सांगितले, "कोठारींकडून हक्कभंग तर झालाच आहे, पण मला असे वाटते की, हे प्रकरण वाढवू नये. या प्रकरणी जी किमान शिक्षा असेल ती द्यावी व प्रकरण मिटवावे." यशवंतरावांचा मोठेपणा हा की त्यांनी हे मानले. आपण अग्रलेख लिहिला तेव्हा विधानसभा रीतसर अस्तित्वातच आलेली नव्हती असा एक न टिकणारा मुद्दा कोठारींनी काढला होता. तो अर्थातच फेटाळला गेला. २० जुलै रोजी जेव्हा कोठारींना शिक्षा सुनावण्याची वेळ आली तेव्हा सबंध सभागृह माझ्या भूमिकेने आश्चर्यचकित झाले. अपवाद फक्त यशवंतरावांचा. कारण त्यांचे माझे आधीच बोलणे आले होते. "कोठारींची कडक कानउघाडणी करावी." अशी सौम्य शिक्षा त्यांना देण्यात आली. गंमत अशी की कोठारींनीही मला नंतर पत्र लिहून "तुम्ही विशिष्ट धोरणाने हे केलेत हे मी समजू शकतो. माझा तुमच्यावर राग नाही." असे मला कळविले. लोकशाहीच्या आणि शांततेच्या मार्गाने आम्ही संयुक्त महाराष्ट्र मिळवू ही आमची भूमिका होती. बखेडे माजविणे, अर्वाच्य लिहिणे हे बरोबर नाही हे जनतेला कळायला हवे होते. या सर्व प्रकरणातील सर्वांत महत्त्वाचा मुद्दा हा की, या प्रश्नाबद्दल काय करावे यासंबंधाने यशवंतरावांनी माझ्याशी आधी विचारविनिमय केला. लोकशाहीचे जतन विरोधकांना विश्वासात घेतल्याने होते हे यशवंतरावांना मंजूर होते.

## तो प्रश्नच गैरलागू

विशाल द्वैभाषिक चालवायचे होते म्हणून यशवंतराव विरोधी पक्षनेत्यांशी सल्लामसलत करून मार्ग काढीत होते. त्यांचा खरोखरीच अशा मार्गावर विश्वास होता. कशावरून असे कोणी विचारू नये. कारण मग यशवंतरावांच्या सुसंस्कृतपणाबद्दलच शंका घेतल्यासारखे होईल. यशवंतरावांचा या मार्गावर विश्वास होताच. याच संयुक्त महाराष्ट्र आंदोलनात आम्ही आणि कम्युनिस्टांनी एकत्र येऊन गिरणी कामगारांची युनियन काढली व एक-दोन दिवसांत एक लाख सभासद केले. कशासाठी? काय आवश्यकता होती? आंतरिक चांगुलपणा अशा वेळी संस्कारी मनाला स्वस्थ बसू देत नाही. शिवाय अशा प्रवृत्तीमुळे

परस्पर विश्वासही वाढतो. सोलापूरच्या नरसिंगगिरजी मिलचा प्रश्न उभा राहिला त्या वेळी आम्हा उभयतांत वाढलेला हा विश्वासच ती समस्या सोडवावयास उपयोगी पडला. पाच हजार कामगार बेकार झालेले होते आणि सरकारने गिरणी ताब्यात घेऊन स्वतः चालविली नाही तर सत्याग्रहाचे आंदोलन करू असे मी सोलापूरला जाहीर केले होते. मजूर मंत्री शांतिलाल शहा औदार्याने गिरणी कामगारांकडे बघायला तयार नव्हते. ५० टक्के वेतन घेऊन कामगार गिरणी चालविण्यास तयार असतील तरच सरकार हायकोर्टाकडून गिरणीचा ताबा स्वतःकडे घेईल असे ते म्हणू लागले. मजुरीत पन्नास टक्के कपात कामगारांना परवडणारी नव्हती. यशवंतरावांना प्रश्न सुटायला हवा होता. शांतिभाईंनी तत्त्वतः गिरणी ताब्यात घेण्याचे मान्य केले ही जमेची बाजू होती. आम्ही २० टक्के मजुरी कपातीस कबूल होतो. अखेर प्रश्न मिटायचा कसा असे शांतिलाल शहांनी विचारले, "यशवंतरावांचा लवाद मान्य आहे काय?" आम्ही लगेच 'होय' म्हणालो व एक-तृतीयांश कपातीवर तडजोड झाली.

## कधीही धोका नाही

जी गोष्ट नरसिंगगिरजी मिलची तीच नासिकच्या सिक्युरिटी प्रिंटिंग प्रेस-बाबतची. यशवंतरावांबद्दल वाटणाऱ्या विश्वासावर विसंबून मी कामगारांना संप मागे घ्यायला लावला आणि केंद्र सरकारच्या मजूर खात्याशी संबंधित असा तो प्रश्न असतानाही यशवंतरावांनी कामगारांना न्याय दिला. आम्ही यशवंतरावांवर विश्वास टाकीत गेलो आणि त्यांनी आम्हाला कोठेही धोका दिला नाही. म्हणून मला म्हणायचे आहे की देहाला जशी देहधारणेसाठी श्वासोच्छ्वासाची आवश्यकता आहे त्याचप्रमाणे समाज चालायचा असेल तर परस्पर विश्वासाची आवश्यकता आहे.

**—श्री. एस. एम. जोशी**
महाराष्ट्र टाइम्सवरून

## बहुरंगी व बहुसुरी व्यक्तिमत्त्व

भारताचा समर्थ गृहमंत्री, एवढ्या-वरच त्यांचे मूल्यमापन करणे अशक्य आहे. किंबहुना यशवंतरावांच्या व्यक्ति-मत्त्वाचे हेच वैशिष्ट्य आहे की, ते एक-सुरी नाही, एकरंगी नाही; ते बहुरंगी, बहुसुरी आहे. एखाद्या कुशल संगीत-तज्ज्ञाचा संच आपल्या सर्व वाद्यवृंदासह सुरेल झंकार एका लयीत छेडून एक नादमधुर सुरकाव्य मनःपटलावर कोरतो, त्या वेळी एक निर्व्याज आनंदाचा क्षण आपल्या अंतरंगात चिरंतन बनतो. तसेच यशवंतरावांच्या व्यक्तिमत्त्वाबाबत वाटते. ते राजकारणात राजकारणी आहेत, अर्थकारणाचे जाणकार आहेत, सामाजिक समस्यांचे चिंतक आहेत तसेच समाजातल्या विविध प्रवृत्तींचे अभ्यासू आणि रसिक टीकाकार आहेत. कवि-लेखकांच्या मेळाव्यात,

साहित्यिकांच्या मेळाव्यात ते हळुवार व सौंदर्यसंपन्न शब्दांचा शिडकावा करतील, तर राजकारणाच्या मैदानात कडव्या निष्ठेने भडिमार करतील. यशवंतरावांबद्दल प्रा. ना. सी. फडके यांनी एकदा सांगूनही टाकले आहे की, यशवंतराव राजकारणात न पडते तर मराठीला एक समर्थ लेखक लाभला असता. यशवंतरावजींच्या स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर राजकीय जीवनाकडे पाहिले तर असे दिसून येते की, त्यांचे आजवरचे राजकारण हे व्यापक सामाजिक हित, समाजवादी अर्थकारणाचा पुरस्कार, लोकशाही जीवननिष्ठा आणि व्यक्तिस्वातंत्र्यवादी दृष्टिकोण या चार प्रमुख सूत्रांचा आचार करणारे आहेत.

—शरद पवार

( महाराष्ट्र टाइम्स, १२ मार्च १९७०

२

# यशवंतरावांचा राजकीय प्रवास

# राष्ट्रीय व्यासपीठावर स्वयंप्रज्ञेने चमकलेले यशवंतराव

**द्वा. भ. कर्णिक**

> Bliss was it in that dawn to be alive
> But to be young was very heaven

हे एका कवीचे गौरवोद्‌गार ज्या कालखंडाला सार्थ ठरले होते त्या कालखंडात यशवंतराव चव्हाण यांच्या राजकीय जीवनाची सुरुवात झाली. उज्ज्वल असेच ते दिवस होते. तरुण पिढी त्या दिवसांच्या आव्हानाने तशाच आवाहनाने भारून गेली होती. भारतीय राजकारणातील गांधीयुगाला त्या सुमारास उणीपुरी दहा वर्षे उलटून गेली होती. पण गांधीजींच्या कायदेभंगाच्या आणि प्रतिकाराच्या, संघर्षाच्या, सत्याग्रहाच्या मोहिमेला आता परिपक्वता आली होती. त्यांच्या जोडीला पंडित जवाहरलाल नेहरू हे भारतीय राजकारणाच्या प्रांगणात चमकू लागले होते आणि त्यांनी तरुण मनाला मोहिनी घालण्यासाठी जो संदेश दिला होता तो ' लिव्ह डेंजरसली ' हा होय. गांधीजींचा संदेश सत्याग्रहाचा होता. पंडितजींचा क्रांतीचा होता. त्या क्रांतीच्या कल्पनेमागे रशियन राज्यक्रांतीचे वलय उभे होते. रशियन क्रांतीने आपली संघर्षमय दहा वर्षे पुरी केली होती त्या वेळी सोव्हियट सरकारच्या आमंत्रणावरून मोतीलाल व जवाहरलाल नेहरू यांनी मॉस्कोला भेट दिली होती. त्या क्रांतीने उभ्या जगाला असे हादरवून टाकले होते की Ten days that shook the world या नावाने एक वृत्तान्तवजा त्या रोमांचकारी घटनेचा इतिहास लिहिला गेला. जवाहरलाल नेहरू यांचे संस्कारक्षम मन साहजिकच या क्रांतीने भारून गेले. यशवंतरावांचा राजकीय पिंड त्या क्रांतीच्या तत्त्वज्ञानावरच पोसला गेला असे म्हणावयास हरकत नाही. त्यांचेच काय पण साऱ्याच तरुणांची मने त्या क्रांतीच्या विचारातूनच राजकीय घटनांची चिकित्सा करू लागली होती. मला आठवते कॉ.बुखारिन यांचे ' ABC of Communism ' हे पुस्तक आम्हाला जणू क्रमिक पुस्तकासारखे वाटू लागले होते. त्या पुस्तकाच्या आधारे आम्ही मार्क्सिझमच्या मूलभूत सिद्धान्ताकडे वळलो होतो.

योगायोग असा की पंडितजींनी ज्या वेळी मॉस्कोला भेट दिली त्या सुमारास

सुप्रसिद्ध क्रांतिकारक एम्. एन्. रॉय हे मॉस्कोमधे उच्चपदावर आरूढ झालेले होते. इतिहासाचा आढावाच घ्यावयाचा म्हटले तर वसाहतीतील स्वातंत्र्य आंदोलनाच्या बाबतीत कम्युनिस्ट इंटरनॅशनलने कोणती भूमिका घ्यावी याबद्दल लेनिन यांनी जो प्रबंध सादर केला होता त्याच्याशी काही बाबतीत मतभेद व्यक्त करणारा प्रबंध एम. एन. रॉय यांनी लेनिनला सादर केला होता. लेनिन यांच्या मनाचा थोरपणा असा की भारतामधून आलेल्या एका विशीतील तरुणाने सादर केलेला प्रबंध आपल्या जोडीने कम्युनिस्ट इंटरनॅशनलपुढे मांडण्याचे स्वातंत्र्य त्यांनी रॉय यांना दिले. पुढे हे दोन्ही प्रबंध विचारासाठी अधिवेशनापुढे ठेवण्यात आले. यावरून एक गोष्ट स्पष्ट होते ती ही की रॉय यांनी कम्युनिस्टांच्या सर्वोच्च पीठात आपल्यासाठी एक स्थान निर्माण केले होते. तत्त्वज्ञानात्मक चर्चेच्या बाबतीत आणि चिकित्सक विचारपद्धतीचे दर्शन घडवून आणण्याच्या बाबतीत रॉय यांनी आपली जी प्रज्ञा प्रकट केली होती तिचा आविष्कार त्यांच्या 'India in Transition' या विद्वज्जनांनी मान्य केलेल्या पुस्तकात दिसून येतो. मार्क्सवादी विचारपद्धतीची पहिली ओळख भारतीय बुद्धिवंतांना करून देण्याचे श्रेय रॉय यांनाच द्यावे लागेल. पंडित नेहरू यांनी समाजवादासाठी भावनात्मक पाया या देशात घालून दिला हे खरे आहे. पण त्यासाठी वैचारिक दृष्टिकोण तयार करून दिला तो रॉय यांनीच होय. यशवंतराव चव्हाण हे आपल्या राजकीय जीवनाची सुरुवात करताना रॉय यांच्या प्रभावाखाली आले हे त्यांच्या भावी राजकीय जडणघडणीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे मानावे लागेल.

तसे पाहिले तर यशवंतरावांच्या राजकीय भूमिकेवर एकाच वेळी दोन तात्त्विक विचारपद्धतींनी ठसा उमटविलेला दिसून येईल. ते राजकीय प्रांगणात उतरले ते गांधीजींच्या कायदेभंगाच्या आंदोलनात सामील होण्यासाठी. हे आंदोलन भारताच्या स्वातंत्र्यासाठी पुकारण्यात आलेले सविनय कायदेभंगाचे आंदोलन होय. स्वातंत्र्याची आकांक्षा त्यामागे होती. या स्वातंत्र्याची मूलभूत कल्पना ही की परकीय सत्तेचे त्यातून उच्चाटन झाले पाहिजे. भावनात्मक ऊर्मीच ही कल्पना होती आणि यशवंतरावांच्यासारख्या असंख्य लोकांनी या कायदेभंगात भाग घेतला तो निखालस भावनोत्कटतेनेच होय. गांधीजींनी त्या वेळी ज्या ज्या काही घोषणा केल्या, कायदेभंगासाठी जे जे कार्यक्रम आखले त्यात अक्षरश: अंधभक्तीने लोकांनी त्यांना साथ दिली. उत्स्फूर्त जनआंदोलन म्हणूनच या कायदेभंगाची,

सत्याग्रही लढ्याची चिकित्सा करावी लागेल. गांधीजींचे श्रेष्ठत्व असे की सबंध देशाला त्यांनी आपल्या घोषणांनी जाग दिली आणि कायदेभंगासाठी वाटेल त्या हालअपेष्टा सोसण्याचीही प्रेरणा दिली. एवढे खरे की आसेतुहिमाचल अशी एक प्रचंड चळवळ उभारण्याची ताकद फक्त गांधीजींमधेच होती. त्यांनी जनमनावर अशी मोहिनी घातली की एकीकडे सत्याग्रह, दुसरीकडे चरखा व टकळी याभोवती गुंफला गेलेला आर्थिक कार्यक्रम आणि तिसरीकडे अस्पृश्यता निवारणाची सामाजिक चळवळ यासारख्या भिन्नभिन्न कार्यक्रमांची गुंतागुंत गांधीजींनी प्रचलित केली असतानाही निरनिराळ्या लोकांनी निरनिराळ्या भावुक ओढीने गांधीजींचे नेतृत्व स्वीकारलेले दिसून आले. राष्ट्राचे स्वातंत्र्य हाच एक गांधीजींचा, इतर नेतृत्वाचा आणि जनतेचा ध्यास होता.

पंडित जवाहरलाल नेहरू यांनी तात्त्विक दृष्टीने गांधीजींच्यापेक्षा काहीसा निराळा ठसा उमटविण्याचा प्रयत्न केला. त्यांची प्रेरणा समाजवादाकडे झुकणारी होती आणि आधी सांगितल्याप्रमाणे रशियन राज्यक्रांतीने त्यांच्या विचारांना काहीसे ठाम रूप दिले. त्यांच्या भाषणात आणि लेखनात हळूहळू असा विचार डोकावू लागला की, परकीय सत्तेचे उच्चाटण करणे हे ठीक आहे. पण गोऱ्यांची सत्ता गेली आणि तिच्या जागी देशी सत्ता आली एवढाच स्वातंत्र्याचा अर्थ होणार आहे काय. त्यांनी ‘ व्हिदर इंडिया ’ हे एक छोटेखानी पुस्तक लिहिले आणि त्यात स्वराज्यानंतर कोणत्या प्रकारची अर्थव्यवस्था निर्माण केली पाहिजे आणि त्यात श्रमजीवी जनतेच्या हितसंबंधांना कोणत्या प्रकारचे संरक्षण दिले गेले पाहिजे याची चर्चा केली. यशवंतरावांच्या राजकीय भूमिकेला कलाटणी देणारे हे बालबोध धडेच होते असे म्हणता येईल. त्या वेळी त्यांचे कॉलेजातील शिक्षण चालू होते आणि त्याच वेळी राजकीय शिक्षणाचेही त्यांना बाळकडू पाजले जात होते. या राजकीय शिक्षणाचा पाया गांधीजींनी घातला. त्याचा विकास नेहरूंनी घडविला.

पण या शिक्षणाला परिपक्वता एम्. एन्. रॉय यांच्या विचारांनी आणली, निदान आणावयाचा प्रयत्न केला असे म्हणणे अधिक सयुक्तिक होईल. रॉय यांची विचारसरणी निखालस कम्युनिस्ट पंथाची होती. कम्युनिस्ट इंटरनॅशनल या संघटनेने पूर्वेकडील विभागाचे प्रमुख म्हणूनच त्यांची नेमणूक केली होती. त्यांचे कार्य अर्थातच प्रामुख्याने भारतामधे कम्युनिझमचा प्रचार करणे हे होते.

पुढील काळात पूर्वेकडील भारत व चीन या दोन खंडप्राय देशातील क्रांतीला चालना देण्याचेच कार्य त्यांनी केले. रॉय यांनी कम्युनिस्ट इंटरनॅशनलच्या दुसऱ्या अधिवेशनात जो प्रबंध सादर केला होता त्यात भारताच्या स्वातंत्र्य लढ्याच्या बाबतीत कम्युनिस्टांनी कोणती भूमिका घ्यावी यालाच त्यांनी प्राधान्य दिले होते. त्यांच्या विचारांचा दुवा यशवंतरावांच्यासारख्या स्वातंत्र्य सैनिकांशी जुळला याचे कारण असे होते की, भारताच्या स्वातंत्र्यलढ्याचे नेतृत्व काँग्रेस या संस्थेनेच आपल्या हाती ठेवले पाहिजे असा त्यांचा आग्रह होता. साम्राज्यशाही विरोधी लढ्याचे साधन म्हणूनच त्यांनी काँग्रेसची निवड केली होती. रॉय यांच्या मागे वलय होते ते रशियन राज्यक्रांतीचे. त्यापूर्वीचा त्यांचा जीवनेतिहासही तसाच स्फूर्तिदायक होता. कारण पहिल्या महायुद्धात ब्रिटिश साम्राज्यशाहीला शह देण्यासाठी क्रांतिकारकांचे प्रतिनिधी म्हणून त्यांनी जर्मनीशी संगनमत करण्याचा प्रयत्न केला होता. जर्मन शस्त्रास्त्रांच्या साहाय्याने भारतात बंड घडविण्याची या क्रांतिकारकांची योजना होती. ती अयशस्वी झाल्यानंतरचे रॉय यांनी मार्क्सवादी तत्त्वज्ञानाचा स्वीकार करून रशियन राज्यक्रांतीच्या माहेरघरी म्हणजे मॉस्कोमधे पाऊल टाकले होते. तेथूनच नंतर ते भारतातील क्रांतीचे कम्युनिस्ट मतांनुसार मार्गदर्शन करू पाहात होते. यशवंतराव यांच्यासारख्या संस्कारक्षम तरुणावर या विचारसरणीचा प्रभाव पडला असल्यास नवल नाही. रॉय हे त्या सुमारास गुप्त रीतीने अनेक पत्रके आणि जाहीरनामे प्रसृत करीत होते. पण त्यांच्या भारताबद्दलच्या सुस्पष्ट भूमिकेचे दिग्दर्शन करणारे जे एक पुस्तक Future of Indian Politics या नावाने त्यांनी प्रकाशित केले होते ते यशवंतरावांच्या वाचनात आल्यानंतर यशवंतरावांच्या भूमिकेला निराळीच दिशा मिळाल्याशिवाय राहिली नाही.

अर्थातच त्या काळचा विचार केला तर हे सारे विचारमंथनच होते. एकीकडे गांधीवादी विचारसरणी, त्यानंतर समाजवादाकडे झुकलेली जवाहरलाल नेहरूंची विचारसरणी आणि त्याच्याही पुढे जाणारी रॉय यांची विचारसरणी यांच्यामधील एक प्रकारचा संघर्ष, आणि कधी कधी समन्वय यांचा प्रत्यय त्या काळच्या यशवंतरावांच्या जीवनात दिसून येतो. गांधीजी आणि रॉय यांच्यामधे उघड उघड वैचारिक संघर्ष होता. त्याच्या उलट गांधीजी व जवाहरलाल यांच्या विचारसरणीत फरक असला तरी समन्वयाच्याच भावनेने ते परस्परांशी वागत

असलेले दिसून आले. तशाच प्रकारचा समन्वय जवाहरलाल व रॉय यांच्याही आचारविचारात दिसून येत असे. यशवंतरावांचे राजकीय जीवन या छाया-प्रकाशाच्या, संघर्ष समन्वयाच्या प्रवाहातून वाहात असलेले ठायीठायी आढळून आले आहे. या तीन प्रकारच्या वारशातून ते समृद्धही झाले असे म्हणावयास हरकत नाही.

एका परीने यशवंतराव व जवाहरलाल यांच्या राजकीय जीवनात बरेचसे साम्य दिसून येते. अर्थात यशवंतरावांनी खरेखुरे गुरुस्थानी पंडित नेहरूंनाच मानले असल्यामुळे त्यांच्यामुळे त्यांच्या पावलावर पाऊल टाकण्याचीच यशवंत-रावांची प्रवृत्ती दिसून आली. या प्रवृत्तीचे मोठ्या अभिमानाने कौतुक करीत असताना यशवंतरावांनी वेळोवेळी जाहीर केले की "राष्ट्रीय प्रवाहापासून मी कधीच फारकत करून घेणार नाही." त्यांच्या राजकीय जीवनाच्या सुरुवातीलाच ते मानीत असलेला राष्ट्रीय प्रवाह आणि रॉय यांच्या विचारसरणीचा प्रवाह यात निवड करण्याची त्यांच्यावर वेळ आली. त्यांचा राष्ट्रीय प्रवाह हे गांधी नेहरूंच्या नेतृत्वाखाली संघटित होणारे कॉंग्रेसचे राजकारण होते. या राजकारणाला शह देऊ पाहणाऱ्या कार्यक्रमाचा रॉय यांनी १९३६ साली तुरुंगातून सुटल्यानंतर पुरस्कार करावयाला सुरुवात केली. रॉय हे कॉंग्रेसमध्येच सामील झाले होते. पण कॉंग्रेसचे स्वरूप अधिक लढाऊ बनावे, कॉंग्रेसचा कार्यक्रम खराखुरा साम्राज्यशाही विरोधी बनावा, त्या कार्यक्रमात साम्राज्यशाहीबरोबर होणाऱ्या तडजोडीला स्थान राहू नये असा रॉय यांचा आग्रह होता. गांधीजींचे नकारात्मक आणि हृदयपरिवर्तनाचे राजकारण रॉय यांना मान्य नव्हते. म्हणून कॉंग्रेसमधेच राहून तिचे नेतृत्व बदलण्याचा विचार त्यांनी उघडपणे जाहीर करावयाला सुरुवात केली होती. साहजिकच गांधीजी की रॉय अशी निवड करावयाची कॉंग्रेस-जनांवर वेळ आली. रॉय यांनी महाराष्ट्रामधे त्यातल्यात्यात चांगले पाय रोवले होते आणि सातारा जिल्ह्यात तर तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, आत्मारामबापू पाटील, भय्याशास्त्री वाटवे, ह. रा. महाजनी यांच्यासारख्या मातबर नेत्यांनी रॉय यांच्या बाजूने त्या वेळी आपला कौल दिला होता. यशवंतराव चव्हाण यांचे हे सारे मित्र आणि विशेषतः तर्कतीर्थ हे त्यांनी गुरुस्थानी मानले असल्यामुळे रॉयपंथाच्या तेही बरेच जवळ आले होते. एम्. एन् रॉय यांच्याविषयी तर त्यांच्या मनात विलक्षण आदरभावच नव्हे तर भक्तिभावही निर्माण झाला होता

आणि पुढेही सत्तास्थानी आरूढ झाल्यानंतरही तो तसूभरही कमी झाला नाही याची मी नि:शंकपणाने ग्वाही देऊ शकतो.

पण त्या वेळी यशवंतरावांचे राजकीय जीवन नुकतेच सुरू झाले असल्यामुळे गांधी-जवाहरलाल यांच्या राष्ट्रीय तशाच लोकप्रियतेच्या लाटेवर आरूढ झालेल्या प्रवाहाविरुद्ध उभे राहणे त्यांना श्रेयस्कर वाटले नाही आणि ते रॉयपंथीयांपासून अलग झाले. यशवंतरावांच्या जीवनातील हा पहिलाच महत्त्वाचा निर्णय होता. तो त्यांनी पूर्ण विचारांती घेतला असेल यात शंका नाही. कारण पुढे ज्या ज्या वेळी काँग्रेसमधे मतभेद निर्माण झाले, संघटनेत दुफळी पडली आणि निरनिराळ्या गटांनी काँग्रेसचा त्यागही केला त्या वेळी यशवंतराव कधीही विचलित झाले नाहीत. काँग्रेसच्या अधिष्ठित नेतृत्वाला त्यांनी अव्यभिचारी निष्ठेने पाठिंबा दिला. त्या काळच्या राजकारणाकडे दृष्टिक्षेप टाकला तर रॉय म्हणा, कम्युनिस्ट म्हणा, काँग्रेस समाजवादी, फॉरवर्ड ब्लॉक, शेतकरी कामगार पक्ष, किसान मजदूर पक्ष, किसान सभा, वगैरे कितीतरी प्रभावी पक्ष व पंथ आपापल्या निरनिराळ्या कार्यक्रमांच्या पायावर देशात उभे राहिलेले दिसून येतील. त्यांचा वाद जसा काँग्रेस व तिच्या नेत्यांशी असे त्याचप्रमाणे परस्परांमधे तर त्याहीपेक्षा तीव्र स्वरूपात तो दृग्गोचर होत असे. त्यातून त्यांच्यामधेही दुफळ्या पडत असत आणि वैयक्तिक हेवेदावे, द्वेष आणि परस्परांवर विषारी हल्ले यांना तर ऊत आलेला दिसून येत असे. काँग्रेस समाजवादी पक्षातच पाहा ना! जयप्रकाश नारायण एका बाजूला तर डॉ. लोहिया दुसऱ्या बाजूला आणि अशोक मेहता यांचा तिसराच पंथ अशी चिरफाड झालेली दिसून येते आणि मग समाजवादी पंथाचेही अगदी एकमेकांचे शिरकाण करू पाहणारे पक्षही तयार झाले. त्या पक्षांच्या अनुषंगाने नंतर कामकरी क्षेत्रात, किसानांच्या क्षेत्रात भिन्नभिन्न आघाड्याही स्थापन होणे अपरिहार्य होते. आश्चर्य म्हणजे काँग्रेसचा मोठ्या हिरीरीने त्याग केलेले नेतेही अधूनमधून काँग्रेसमधे परत येत असत. त्याचे मात्र मुख्य कारण असे होते की, अनुभवांती या पश्चात्तापदग्ध नेत्यांना कळून येत असे की काँग्रेसच्या बाहेर आपल्याला स्वतंत्र स्थान निर्माण करता आले नाही. या संदर्भातच एका काँग्रेस नेत्याने काँग्रेसचा त्याग करणाऱ्या लोकांना मोठ्या मार्मिकपणे संदेश दिला होता "Depart in haste and repent at leisure" म्हणजे "घिसाडघाईने सोडून जा आणि मग सावकाश पश्चात्ताप करा."

यशवंतरावांच्या राजकीय जीवनाचा आलेख पाहिला तर त्यात ते कधीही द्विधाचित्त झालेले दिसून येणार नाहीत. निष्ठा हे त्यांचे राजकीय जीवनातील सामर्थ्य होय. अर्थातच ते कालांतराने ज्या उच्च पदावर चढले तेथे नुसत्या निष्ठेने काम भागण्यासारखे नव्हते. ती निष्ठा स्वातंत्र्याच्या चळवळीत मात्र त्यांना उपयोगी पडली आणि या चळवळीत गांधीजी, नेहरू वा सरदार पटेल यांनी जे जे पवित्रे घेतले आणि त्या पवित्र्यांसाठी जो त्याग, कष्ट, यातना, बंदीवास, भूमिगत जीवन या दिव्यातून पार पडण्याचा जो जो त्यांनी संदेश दिला त्याला तोंड देण्याच्या बाबतीत यशवंतरावांनी कधीही माघार घेतली नाही. चळवळींमधे निष्ठा आणि त्यागवृत्ती हेच दोन महत्त्वाचे निकष असतात. या निकषांवर आपले अनुयायी कसे व किती प्रमाणात टिकू शकतात हे पाहण्यासाठीच गांधीजींनी १९४२ साली ‘ चले जाव ’ चळवळीचा पुकारा करताना ‘ करा वा मरा ’ असाच निकराचा संदेश दिला होता. यशवंतरावांनी प्राण पणाला लावून चले जाव चळवळीत भाग घेतला आणि राजकारणात ते तावून सुलाखून बाहेर पडले.

रॉय पंथापासून ते अलग झाले ते त्यांच्या दृष्टीने किती मोलाचे ठरले हे दुसऱ्या महायुद्धाच्या संदर्भात रॉय व काँग्रेस नेतृत्व यांच्यामधे जी मतभेदाची अनुल्लंघनीय दरी निर्माण झाली त्यातून प्रकर्षाने प्रत्ययास आले. दुसऱ्या महायुद्धाच्या बाबतीत रॉय यांनी अशी भूमिका घेतली की, हे युद्ध दोन साम्राज्यशाह्यांमधील युद्ध नव्हे, हे फॅसिझमविरुद्ध पुकारण्यात आलेले युद्ध आहे. रॉय यांची तत्त्वशुद्ध भूमिका अशी होती की, हिटलर व मुसोलिनी यांच्या फॅसिझमविरुद्ध प्राणपणाने लढणे हे प्रत्येक देशातील प्रत्येक लोकशाहीवाद्याचे कर्तव्य आहे आणि या युद्धात जे जे देश फॅसिझमविरुद्ध उभे ठाकलेले आहेत त्यांना सक्रिय सहकार्य देण्यापेक्षा आपल्यापुढे दुसरा पर्यायच उरलेला नाही, मग ते देश ब्रिटन वा फ्रान्स यांच्यासारखे साम्राज्यवादी देश का असेनात. रॉय यांना फॅसिझमची जी कल्पना होती, त्या तत्त्वज्ञानाबद्दल जी घृणा होती आणि फॅसिझमच्या रूपाने जगावर जे संकट कोसळले होते त्याचे परिणाम किती भयानक होतील त्याची जी जाणीव होती, त्यामुळे त्यांनी निःसंकोचपणाने जाहीर केले की, फॅसिझमचा पराभव करणे हे जगाचे पहिले उद्दिष्ट असले पाहिजे; आणि ते साध्य करण्यासाठी आपला शत्रू जो ब्रिटन त्याच्याशी सहकार्य करावयालाही आपण मागेपुढे पाहता कामा नये. रॉय यांनी त्याच वेळी दोन भाकिते केली

होती. पहिले हे की फॅसिझमचा विजय झाला तर सारे जग काळ्याकुट्ट गुलामगिरीत कायमचे गाडले जाईल. दुसरे भाकित हे की फॅसिझमचा पराभव झाला तर साम्राज्यवादी राष्ट्रांना आपल्या वसाहतींना स्वातंत्र्य देणे भाग पडेल. रॉय यांनी तात्त्विक समस्येच्या संदर्भात आणखी एक महत्त्वाचे भाकित केले की फॅसिझमचा खरा शत्रू सोव्हिएट युनियन हाच आहे; आणि युरोपखंडावर प्रभुत्व प्रस्थापित केल्यानंतर हिटलर सोव्हिएट युनियनवर हल्ला चढवील. रॉय यांची आकांक्षा जशी फॅसिझमच्या पराभवाने सफल झाली त्याचप्रमाणे त्यांची इतर दोन भाकिते भारत व इतर वसाहतींच्या स्वातंत्र्यातून साकार झाली. त्याचप्रमाणे हिटलरच्या सोव्हिएट युनियनवरील हल्ल्यातून प्रत्ययास आली.

आता भारतात रॉय यांची ही भूमिका मान्य केली जाणे शक्यच नव्हते. काँग्रेसच्या नेत्यांना फॅसिझमबद्दल आस्था नव्हती. उलट गांधीजी आणि त्यांच्यापेक्षा पंडित नेहरू यांना फॅसिझमबद्दल घृणाच वाटत असे. या घृणेपायी स्पेनमध्ये जेव्हा लोकशाही व फॅसिझम यांच्यामधे यादवी युद्ध पेटले तेव्हा पंडितजींनी लोकशाहीवादी स्पॅनिश सरकारच्या मदतीसाठी एक वैद्यकीय पथक स्पेनमधे पाठविले होते. स्पेनचे लोकप्रिय सेनानी ला काबायेरो आणि त्यांना साथ देणारी 'ला पॅशानारिया' म्हणून जगप्रसिद्ध झालेली स्त्री हे दोघेही पंडितजींचे आवडते वीरपुरुष होते. त्याहीपेक्षा लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट ही की फॅसिझमच्या वैभवाच्या काळात जेव्हा पंडितजी युरोपला गेले होते तेव्हा मुसोलिनीचे भेटीचे आमंत्रण त्यांनी झिडकारून दिले होते. या पठडीतील गांधीजी व पंडितजी या दोघांनाही मनोमन ही इच्छा होती की, हिटलरचा पराभव व्हावा आणि ब्रिटनसहित दोस्त राष्ट्रांचा विजय व्हावा.

पण त्यांना ब्रिटनच्या लोकशाही निष्ठेची कसोटी पाहावयाची होती. म्हणून गांधीजींनी ब्रिटिश सरकारला ही अट घातली की, भारताचे हार्दिक सहकार्य दोस्त राष्ट्रांना हवे असेल तर भारताला याच वेळी स्वातंत्र्याचे हक्क प्रदान करण्यात यावे. ब्रिटनकडून या बाबतीत प्रतिसाद मिळाला नाही, उलट भारतामधे दडपशाहीचे राज्य सुरू झाले तेव्हाच गांधीजींनी 'चले जाव' चळवळीचा पुकारा केला. निष्ठावंत काँग्रेसजन म्हणून यशवंतरावांनी या आंदोलनात अटीतटीने भाग घेतला. विचारात घेण्यासारखा प्रश्न हा आहे की, यशवंतराव जर त्या वेळी रॉयवादी पंथाबरोबर राहिले असते तर त्यांचे पुढे विकसित झालेले

सारे राजकीय जीवन त्याच क्षणी उद्ध्वस्त झाले असते आणि रॉयवाद्यांबरोबर तेही राजकीय वनवासात गेले असते.

या प्रसंगी यशवंतरावांनी जी दूरदृष्टी दाखविली तिची फळे कालांतराने महाराष्ट्रालाच नव्हे तर उभ्या राष्ट्राला चाखावयाला मिळाली. यशवंतरावांनी राष्ट्रीय प्रवाहापासून अलिप्त न होण्याचा जो निर्णय घेतला त्यातूनच त्यांचे भवितव्य घडले आणि त्यांच्या अंगचे सारे गुण राष्ट्राच्या उपयोगी पडले. वर मी म्हटले की निष्ठा आणि त्याग एवढया भांडवलावर राज्याच्या कारभाराची धुरा उचलणे शक्य नसते. त्याच्या जोडीला मुत्सद्दीपणा, लोकसंग्रह करण्याची वृत्ती, राज्य-कारभार सांभाळण्याची पात्रता, नवनवीन पायंडे पाडण्याची क्षमता, राष्ट्रीय धोरणात फेरबदल करण्याचे कौशल्य आणि विशेषतः विरोधकांनाही आपल्या ध्येयधोरणात सहभागी व्हावयाला लावणारी समन्वयवादी प्रवृत्ती यांचेही पाठबळ असावयाला पाहिजे. यशवंतरावांनी या सर्व गुणांचा तर प्रत्यय आणून दिलाच, पण आपल्या ध्येयदृष्टीला व्यवहार्यतेची जोड देऊन एक उत्कृष्ट प्रशासक म्हणून कीर्ती संपादन केली.

अर्थात त्यांचा मार्ग हा निष्कलंक होता असे मुळीच नव्हे. काट्याकुट्यांतून त्यांना उभा जन्म मार्गक्रमण करावे लागले. कसोटीचे अनेक प्रसंग त्यांच्यापुढे उभे राहिले. पण यशवंतराव हे अविचल राहिले याचे मुख्य कारण असे आहे की, त्यांनी नेतृत्वावर जी निष्ठा ठेवली ती प्रगट करताना लोकक्षोभाचीही त्यांनी क्षिती बाळगली नाही. संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेचा प्रश्न जेव्हा उभा राहिला तेव्हा यशवंतरावांना अतिशय धैर्यानेच नव्हे तर धीमेपणाने आपले ध्येयधोरण आखावे लागले. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची स्थापना महाराष्ट्राला हवी होती आणि ते उद्दिष्ट साध्य करण्यासाठी मराठी माणसांना अटीतटीने लढावयाची वेळ आली होती. त्या वेळी महाराष्ट्रात इतके प्रक्षुब्ध वातावरण तयार झाले होते की, त्या आगीत खुद्द पंडितजींची प्रतिमा जळून जाईल की काय अशी भीती वाटू लागली होती. पंडितजी हे यशवंतरावांचे दैवतच होते. त्यांनी परिस्थितीचा अंदाज बांधला आणि संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेसाठी त्यांचे अंतरंग जळत असतानाही, देशाचे व्यापक हित आणि पंडितजींचे त्यातील स्थान यांचा विचार करून त्यांनी महाराष्ट्राच्या प्रक्षुब्ध भावनांची तमा न बाळगता फलटणला भाषण देताना असे उद्गार काढले, " मला संयुक्त महाराष्ट्र हवा आहे, पण संयुक्त

महाराष्ट्रापेक्षाही पंडितजींची इभ्रत ही मला अधिक मोलाची वाटते. " त्या क्षणी यशवंतरावांच्यावर जी आगपाखड सुरू झाली ती सहन करणे त्यांच्याखेरीज दुसऱ्या कोणत्याही नेत्याला शक्य झाले नसते. यशवंतरावांच्या नेहरूनिष्ठेची त्या क्षणी जी प्रचीती आली तीतूनच कालांतराने पंडितजींचे हृदयपरिवर्तन झाले आणि संयुक्त महाराष्ट्राचा मंगल कलश त्यांच्या हातून महाराष्ट्राला सादर केला गेला. यशवंतरावांच्या स्वभावातील निर्धार, त्यांची सोशिकता आणि त्यांची मुत्सद्देगिरी यांचे जे दर्शन त्या वेळी घडले ते खरोखरीच विचारप्रवर्तक मानावे लागेल.

अर्थात संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेचे सारे श्रेय यशवंतरावांकडेच जाते असे मला म्हणावयाचे नाही. जनतेच्या प्रक्षुब्ध भावना, अनेक नेत्यांची धीरोदात्तता आणि हुतात्म्यांचे बलिदान यांच्या पायावर संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन उभे राहिले. पण यशवंतरावांनी ज्या संयमपूर्ण आचाराने व आपल्या गुणांच्या दर्शनाने या लढ्याला कलाटणी दिली तिच्याशिवाय हे स्वप्न साकार झाले नसते असे मात्र म्हणणे भाग आहे. यशवंतराव यांचे वैशिष्ट्य असे की ते भावनावेगाबरोबर वाहवत जात नसत. विचारांचा बांध घालून ते प्रत्येक परिस्थितीतून कौशल्याने मार्ग काढत. विचारीपणाने त्यांनी संयुक्त महाराष्ट्र संपादन केला. पण त्यानंतर विरोधकांशी विचारविनिमय करण्याची, जनतेला विश्वासात घेण्याची, साहित्य, कला वगैरे क्षेत्रांतील गुणीजनांचा आदर करण्याची आणि बहुजनसमाजाच्या प्रश्नांना प्राधान्य देण्याची वगैरे जी त्यांनी पावले टाकली त्यांतून त्यांच्या प्रज्ञेची जशी ग्वाही मिळाली त्याचप्रमाणे त्यांच्या राजनीतीतील नैपुण्याचीही साक्ष पटून आली. यशवंतरावांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून जे यश मिळविले त्याची कल्पना करावयाची झाली तर नेहरूंच्या नंतर कोण असा प्रश्न विचारला जात असताना भारताचे भावी पंतप्रधान होण्याची योग्यता यशवंतराव चव्हाण यांच्यामधे आहे असे गौरवोद्गार जयप्रकाश नारायण यांच्यासारख्या श्रेष्ठ नेत्याने काढले होते असा निर्वाळा देता येईल.

यशवंतरावांनी हे जे कर्तृत्व गाजविले त्याला त्यांच्यामधील गुण जसे कारणीभूत झाले आहेत त्याप्रमाणे त्यांच्या सामाजिक विचारसरणीचाही त्यात बराच मोठा वाटा आहे. ज्या काळात ते राजकारणात आले तो गांधीयुगाचा काळ होता हे तर वर म्हटलेच आहे. गांधीजींनी सारा समाज खडबडून जागा केला आणि पूर्वी

जे कधीही कॉंग्रेसमधे नव्हते त्या बहुजनसमाजातील लोकांना गांधीजींनी आकर्षित केले. गांधीजींचा राजकारणात प्रभाव पडण्यापूर्वी कॉंग्रेस ही ब्राह्मणांच्या म्हणा किंवा पांढरपेशा वर्गाच्या नियंत्रणाखाली होती. टिळकांचे जे अनुयायी कॉंग्रेसमधे होते त्यांना गांधीजींची असहकारिता किंवा सत्याग्रहाचे तत्त्व मान्य नव्हते. त्यांनी प्रतियोगी सहकारितेचे एक तत्त्व असहकारितेविरुद्ध म्हणून पुढे केले. कालांतराने या गटाने कॉंग्रेसचा त्याग केला आणि लोकशाही स्वराज्य पक्षाची स्थापना केली. या गटाचा महाराष्ट्र कॉंग्रेसवर इतका पगडा होता की त्यांच्यावर हल्ला चढविताना मोतीलाल नेहरू यांनी कडाडून म्हटले होते, "Congress is not going to be the hand–maid of Maharashtra." पुढे शंकरराव देव, काकासाहेब गाडगीळ वगैरे पुढाऱ्यांनी गांधीवादाची ध्वजा आपल्या हाती घेतली आणि त्यानंतरच्या जनआंदोलनात बहुजनसमाज हिरीरीने पुढे सरसावला. बहुजनसमाजात बहुश: ब्राह्मणेतरांचाच समावेश होता आणि त्याचे नैसर्गिक पुढारी केशवराव जेधे, शंकरराव मोरे वगैरे मंडळी होती. केशवराव जेधे हे एक मातब्बर तसेच मनस्वी नेतृत्व होते. त्यांचे निवासस्थान असलेले जेधे मॅन्शन हे एकेवेळी ब्राह्मणेतर चळवळीचे केंद्र होते तसेच ते पुढे कॉंग्रेसचे केंद्र झाले.

जेधे मॅन्शनला एकेवेळी एवढे महत्त्व होते की रॉय हे तुरुंगातून बाहेर आल्यानंतर प्रथम जेव्हा पुण्याला आले तेव्हा जेधे मॅन्शनमधे आपली सभा घेण्याची त्यांनी आवर्जून सूचना केली. रॉय यांचा कल बहुजनसमाजाकडे कसा झुकलेला होता याचे हे एक प्रसादचिन्हच मानता येईल. नाहीतरी 'India in Transition' या आपल्या पुस्तकात त्यांनी टिळकांचे ध्येयधोरण प्रतिगामी आहे असेच म्हटले होते. मॉस्कोमधे आणि त्यापूर्वी अमेरिकेतील ग्रंथालयात त्यांनी जे मूलगामी वाचन केले होते त्यातून त्यांच्या विचारांची दिशा अशी बनली होती की राजकारणात जहालमतवादी त्याचप्रमाणे समाजकारणात पुरोगामी अशी मानता येईल. रॉय यांचा सिद्धान्तच असा होता की, स्वातंत्र्यात जर आशय आणावयाचा असेल तर भारतात तत्त्वज्ञानात्मक क्रांतीही घडवून आणावी लागेल. ही क्रांती समाजपरिवर्तनाची क्रांती व्हावी हीच रॉय यांची आकांक्षा होती.

या आकांक्षेला साथ देण्याचे प्रत्यक्ष कार्य यशवंतरावांनीच महाराष्ट्रात प्रामुख्याने केले. यशवंतराव यांना समाजप्रबोधनाचे बाळकडू पाजणाऱ्या

नेत्यांमधे महात्मा जोतीराव फुले, कोल्हापूरचे शाहू महाराज यांना अग्रेसरत्व द्यावे लागले. यशवंतराव कॉलेजच्या शिक्षणासाठी कोल्हापूरमधे राहिले होते. त्या वेळी शाहू महाराजांच्या समाजकारणाचे त्यांना दर्शन होणे अपरिहार्य होते. बहुजनसमाजाच्या शिक्षणाला खरी चालना दिली ती शाहूमहाराजांनीच होय. त्याकरता प्रत्येक समाजासाठी त्यांनी वसतिगृहे निर्माण केली आणि सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे अस्पृश्यांना आपला दरबार खुला करण्याचे महत्कार्य शाहूमहाराजांनीच प्रत्यक्षपणे करून दाखविले. जोतीबा फुले यांनी तर सत्य-शोधक समाज स्थापन करून समाजपरिवर्तनाची एक प्रचंड लाट समाजामधे निर्माण केली. यशवंतरावांनी राजकीय दृष्टिकोण गांधी, नेहरू, रॉय यांच्याकडून स्वीकारला तर सामाजिक दृष्टिकोण जोतीबा फुले, शाहूमहाराज, भाऊराव पाटील, आगरकर, विठ्ठल रामजी शिंदे या द्रष्ट्या समाजसुधारकांकडून घेतला. साहजिकच यशवंतरावांची स्फूर्तिस्थाने उज्ज्वल असल्यामुळे भावी काळात जेव्हा सत्ता त्यांच्या हाती आली तेव्हा इतर कोणत्याही मुख्यमंत्र्यापेक्षा त्यांनी समाज-हिताची कार्ये जितकी वेगाने केली तितकीच हेतुपूर्वक पार पाडली.

यशवंतराव हे सत्तास्थानी सहजासहजी स्थानापन्न झाले असे मुळीच नव्हे. त्यांच्यामधे संयम होता तशीच सहनशीलताही भरपूर होती. त्यांनी राजकारणात पावलेही संथपणे तशीच सावधानतेने टाकली. काँग्रेसच्या राजकारणात त्यांनी प्रवेश केला तो स्वयंसेवक म्हणून. स्वातंत्र्यासाठी जे लढे झाले त्यात त्यांनी निष्ठेने भाग घेतला आणि त्यातून त्यांना जे शिक्षण तसाच अनुभव मिळाला तो त्यांनी गाठी बांधला आणि कृपणाप्रमाणे जतन केला. त्या अनुभवाच्या आधारे त्यांनी लोकसंग्रह केला आणि प्रथम आपल्या जिल्ह्यात स्वतःसाठी स्थान निर्माण केले आणि हळूहळू महाराष्ट्राच्या राजकारणात प्रवेश केला. तसे पाहिले तर यशवंतरावांचे जीवन आर्थिक दृष्टीने गरिबीचे होते. काळे कांबळे जमिनीवर अंथरून त्यावर अंग टाकून झोपलेले मी त्यांना कराडला पाहिले आहे. पण त्यांची जिद्द दांडगी आणि उच्च शिक्षण मिळविण्याचा त्यांचा निर्धारही तसाच पक्का. त्यांनी चळवळीत भाग घेतानाच पदव्या संपादन केल्या. पण अवांतर वाचनाची सवय तर त्यांच्या अंगी मुरल्यासारखीच झालेली होती. त्यांनी हे जे वाचन केले ते इतिहासाचे, अर्थशास्त्राचे, मार्क्सवादाचे आणि तत्त्वज्ञानाचे वाचन होय. काँग्रेसमधे सखोल वाचन केलेले फारच थोडे लोक दिसून येतील. पण म्हणूनच

महाराष्ट्रातच नव्हे तर अखिल भारतीय राजकारणात पाऊल टाकल्यानंतर एक विचारवंत म्हणूनच यशवंतरावांकडे मोठमोठे राजकीय नेतेही पाहू लागले. यशवंतरावांना गुरु लाभले ते तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्यासारखे. पुढील काळात शास्त्रीबुवा त्यांचे गुरू झाले तसेच सल्लागारही झाले. शास्त्रीबुवांच्या सहवासात यशवंतरावांनी ज्ञान संपादन केले आणि त्याबरोबर त्यांची ज्ञानलालसाही वाढली आणि मग सत्तेचा उपयोग करण्याची वेळ आली तेव्हा साहित्य संस्कृती मंडळासारख्या संघटना स्थापना करण्याचीही त्यांना स्फूर्ती झाली. यशवंतरावांच्या-बद्दल विचार करताना पंडितजींशी असलेले त्यांचे साम्य अधूनमधून डोळ्यांसमोर आल्यावाचून राहात नाही. ही काही तुलना नव्हे, पण गुरुस्थानी मानलेल्या एका युगपुरुषाच्या पावलावर पाऊल टाकण्याचा जो यशवंतरावांनी प्रयत्न केला त्याबद्दल त्यांचे कौतुक करण्याचा मोह मात्र मला आवरता येत नाही. पंडितजींनी आपल्या समोर देशाच्या सर्वांगीण उन्नतीचे चित्र उभे केले होते आणि म्हणून आर्थिक वा शेतीविषयक नियोजनाबरोबर विज्ञान, साहित्य, कला आणि खेळ यांनाही उत्तेजन देण्याच्या योजना त्यांनी आखल्या. यशवंतरावांनी महाराष्ट्रात त्याच प्रकारच्या प्रथा रूढ करण्याचा प्रयत्न केला आणि विशेष म्हणजे त्यांनी सामान्य जनतेचे जीवन समृद्ध करण्यावर भर दिला. महाराष्ट्राचे मुख्यमंत्रिपद त्यांना फारच लवकर सोडावे लागले. कारण महाराष्ट्र-स्थापनेचा उत्सव साजरा करताना त्यांनी भाकित केले होते त्याप्रमाणे हिमालयाच्या संरक्षणासाठी त्यांच्या रूपाने महाराष्ट्राच्या सह्याद्रीला उत्तरेकडे धावून जावे लागले. पण मुख्यमंत्री म्हणून थोडक्याच काळात त्यांनी जो ठसा उमटविला होता तो इतका दाट रुजला होता की त्यांनी हाती घेतलेल्या योजना त्यांच्यानंतर मुख्यमंत्रिपदावर आरूढ झालेल्या नेत्यांना सिद्धीस नेणे भागच पडले.

यशवंतरावांचा महाराष्ट्रावर जो ठसा उमटला तो प्रत्येक क्षेत्रात चमकून उठल्याशिवाय राहिला नाही. नुसता काँग्रेसचा विचार केला तर महाराष्ट्रातील बहुजनसमाजाची पकड काँग्रेसवर प्रस्थापित करण्याचे श्रेय यशवंतरावांनाच द्यावे लागेल. त्यांनी बहुजनसमाजाला नुसते काँग्रेसमधे नेले नाही. त्यांनी बहुजन समाजाच्या हाती काँग्रेसची सूत्रे सुपूर्द करण्याची कामगिरी पार पाडली. यशवंतरावांची ही कामगिरी ते मुख्यमंत्री झाल्यानंतर काही लोकांच्या डोळ्यांत इतकी सलत गेली की माडखोलकरांच्या सारख्या प्रथितयश साहित्यिकाने खवचट-

पणे यशवंतरावांना सवाल केला की " हे मराठी राज्य आहे की मराठा राज्य आहे. " खरे म्हटले तर यशवंतराव हे जातीयवादी भावनेपासून कटाक्षाने अलिप्त राहिले होते. पण बहुजनसमाजाचे राज्य म्हटले की बहुसंख्य लोकांना त्यात मानाचे प्रतिनिधित्व मिळणे क्रमप्राप्त आहे हे सांगावयाला नको. यशवंतरावांनी राज्याची जी घडी उभारली ती मात्र सर्वसंग्राहक स्वरूपाची होती. म्हणजे त्यात अठरापगड जातींना समान महत्त्व देण्यात आले होते. त्यांच्या डोळ्यांसमोर जे ध्येय होते ते म्हणजे उभ्या महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाचे होय. म्हणून त्यांनी उद्योगधंद्यांच्या स्थापनेला सर्व सोयीसवलती उपलब्ध करून दिल्या आणि त्यात गुजराती, पारशी, सिंधी, मुसलमान यांना प्राधान्य मिळत आहे त्याचे वैषम्य मानले नाही. त्याहीपेक्षा अधिक महत्त्व त्यांनी शेतीविकासाला दिले आणि बहुजनसमाजाला त्यात महत्त्वाचे स्थान मिळावे म्हणून सहकारी कारखाने, सहकारी बँका, सहकारी वितरण संस्था यांच्या स्थापनेला उत्तेजन दिले. यशवंतरावांनी महाराष्ट्राला अग्रेसरत्व मिळवून दिले ते विकेन्द्रीकरणाच्या प्रक्रियेला खरीखुरी चालना देऊन होय. यशवंतरावांचे भारतीय राजकारणात जे स्थान अढळ झाले आहे ते पंचायती राज्य व जिल्हा परिषदा आणि सहकारी साखर कारखाने यांच्या अलौकिक यशामुळेच होय. या तिन्ही क्षेत्रांत महाराष्ट्र हा आदर्श मानला जात आहे हे लक्षात ठेवण्यासारखे आहे.

यशवंतराव हे काँग्रेसमध्ये अखिल भारतीय नेतृत्वात चमकू लागले आणि त्याच वेळी चीनचे भारतावर आक्रमण झाले. त्या युद्धाच्या संदर्भात संरक्षणमंत्री कृष्ण मेनन यांच्याविरुद्ध प्रक्षुब्ध वातावरण निर्माण झाले आणि त्या वेळी संरक्षण-मंत्री होण्याच्या पात्रतेचा एकच नेता पंडितजींच्या डोळ्यांसमोर आला. तो नेता म्हणजे यशवंतराव चव्हाण हे होत. वस्तुतः यशवंतरावांना महाराष्ट्र सोडावयाचा नव्हता. कारण मुख्यमंत्रिपदी आरूढ झाल्यानंतर त्यांनी बऱ्याच महत्त्वाकांक्षी योजना आखल्या होत्या, त्या त्यांना आपल्या डोळ्यांसमोर पुऱ्या करावयाच्या होत्या. साहजिकच त्यांनी नाइलाजाने पंडितजींचे आवाहन स्वीकारले. काय आश्चर्य पाहा, ते दिल्लीला पोचतात न पोचतात तोच चीनने नेफामधून एकतर्फी माघार घेतली. यशवंतरावांचा हा पायगुण भारताच्या दृष्टीने संकट निवारणाचा ठरला. पण त्याबरोबर यशवंतराव अखिल भारतीय आघाडीवर आले एवढेच नव्हे तर जागतिक आघाडीवरही त्यांचे पदार्पण झाले.

कारण त्यानंतर लगेच त्यांना ब्रिटन, अमेरिका, रशिया, जर्मनी या राष्ट्रांबरोबर शस्त्रास्त्रांच्या आयातीविषयी किंवा संभाव्य लष्करी हालचालींविषयी वाटाघाटी कराव्या लागल्या. यशवंतराव यांचा आत्मविश्वास असा की त्यांनी ही बोलणी अगदी समानतेच्या नात्याने केली. त्यांनी एक पथ्य पाळले आणि ते म्हणजे पंडितजींशी जमवून घेऊन आपले ध्येयधोरण ठरविण्याचे. संरक्षणमंत्रिपद स्वीकारल्यानंतर चीनच्या आक्रमणाबद्दल त्यांनी जी चिकित्सा केली ती अशी की हे कम्युनिझमचे या देशावरील आक्रमण होय. म्हणून या आक्रमणाला विरोध करण्याच्या बाबतीत त्याच पंथाच्या सोव्हिएट युनियनची मदत होणार नाही. यशवंतरावांच्या या भूमिकेला सोव्हिएट युनियनने दुजोराच दिल्यासारखा होता. कारण क्रुश्चॉव्ह याने चीनचा बंधुराष्ट्र आणि भारताला मित्रराष्ट्र म्हणून संबोधिले होते. पण पंडितजींचे मत निराळे पडले. त्यांना जी गुप्त माहिती कळली होती तिच्यावरून त्यांनी असे मत बनविले होते की, चीनचे हे आक्रमण हा चीनचा राष्ट्रवादी आक्रमणाचा पवित्रा होता. पुढे थोड्याच दिवसांत चीन व सोव्हिएट युनियन यांच्यामधे संघर्ष पेटला. त्यातून पंडितजींच्या निष्कर्षालाच पाठिंबा मिळाला. यशवंतराव यांनी पंडितजींच्या बाबतीत ही खूणगाठ बांधली की, त्यांना आंतरराष्ट्रीय संबंधाच्या बाबतीत अधिक गुप्त माहिती उपलब्ध होऊ शकते तेव्हा त्यांच्या मताला अधिक महत्त्व देणे आवश्यक आहे. आपले निदान चुकले तर त्यात सुधारणा करण्याचा जो मनाचा मोठेपणा यशवंतराव दाखवीत आले त्यामुळेच दिल्लीच्या कारस्थानाने गजबजलेल्या केंद्रस्थानी यशवंतराव खंबीरपणे पाय रोवून बसू शकले.

राजधानीने आणि त्यातील नेत्यांनीही त्यांचा चांगला मान राखला. दिल्लीच्या मुक्कामात यशवंतरावांनी संरक्षणानंतर, गृह, अर्थ, परराष्ट्रसंबंध अशी मुख्य मुख्य खाती सांभाळली. त्यांचा गौरव असा की एकाही खात्याच्या बाबतीत त्यांना कधीही मान खाली घालावयाची वेळ आली नाही. उलट प्रत्येक वेळी आणीबाणीच्या प्रसंगी पंडितजी, शास्त्रीजी आणि इंदिरा गांधी या तिन्ही प्रधान-मंत्र्यांना यशवंतरावांच्यावरच साऱ्या नाजूक जबाबदाऱ्या सोपवाव्या लागल्या. यशवतरावांचे हे कर्तृत्व असाधारणच नव्हे तर अलौकिक मानावे लागेल. इंदिराजींच्या कारकीर्दीत जेव्हा पार्लमेंट स्ट्रीटवर साधूंनी दंगल उडविली तेव्हा गुलझारीलाल नंदा यांना गृहमंत्रिपद सोडावे लागले. कारण आणीबाणीची ती

परिस्थिती होती. पण यशवंतरावांकडे ते मंत्रिपद आले आणि त्यांनी गोंधळाची परिस्थिती फार चांगल्या रीतीने हाताळली. यशवंतरावांचा हा दिल्लीतील वैभवाचा काळ होता. काँग्रेसमधील श्रेष्ठी म्हणून त्यांची राष्ट्रीय नेत्यांत आधीपासूनच गणना झालेली होती. मुख्यमंत्र्यांमधे त्यांनी कामराज आणि बिधनचंद्र रॉय यांच्याबरोबरीने स्थान संपादन केले होते त्यानंतरच्या काळात केंद्रातील एक मानधन मंत्री म्हणून राष्ट्रीय व्यासपीठावर ते अधिकच प्रकर्षाने चमकू लागले. इतके की पंडितजींच्या तसेच शास्त्रीजींच्या निधनानंतर प्रधानमंत्री म्हणून कोणाची निवड करण्यात यावी याबद्दल त्यांच्याशी खल केल्यावाचून दोन्ही तिन्ही वेळा निवड केली गेली नाही. यशवंतरावांचे वैशिष्ट्य असे की त्यांनी कधीही आपले स्वतःचे प्यादे पुढे सरकविण्याचा प्रयत्न केला नाही. त्यांच्या अपरोक्ष मात्र त्यांचे नाव या ना त्या रीतीने प्रधानमंत्रिपदाच्या रस्सीखेचीत पुढे आणले जातच होते.

आता राजकारणात हेवेदावे निर्माण होतातच. यशवंतरावांना इतके मोठेपण प्राप्त झाले होते की त्यांना हितशत्रूंचा ताप होणे क्रमप्राप्त होते. यशवंतराव तसे सावध आणि तितकेच अबोल. पण वावड्या उडविणाऱ्या लोकांना आळा कोण घालू शकणार? मला आठवते हैदराबाद काँग्रेसमधेच एक वावडी उडविण्यात आली की यशवंतराव आणि सिंडिकेट यांचे साटेलोटे जमले असून सिंडिकेटने त्यांना भावी प्रधानमंत्रिपद देण्याचे आमिष पुढे केले आहे. या वावड्या हितशत्रूंकडून उडविल्या जात असत. दुसरे हितशत्रू सत्तास्थानी असलेल्या प्रमुख लोकांमधे कलुषित वातावरण तयार करण्याचा प्रयत्न करीत असत.

या कलुषित वातावरणातच झाकिर हुसेन यांच्या निधनानंतर राष्ट्रपती म्हणून कोणाची निवड करण्यात यावी याबद्दलचा खल सुरू झाला. बंगळूरच्या अखिल भारतीय काँग्रेस समितीच्या आणि पार्लमेंटरी बोर्डाच्या बैठकीत यावर निर्णय घेण्यात आला. संजीव रेड्डी यांचे नाव पाच विरुद्ध चार अशा मतांनी मुक्रर करण्यात आले. यशवंतराव व इंदिरा गांधी यांच्यामधील मतभेद या मतदानात प्रथमच प्रकट झाले. तोवर त्यांच्यामधील संबंध इतके जिव्हाळ्याचे होते की 'किचन कॅबिनेट' म्हणून म्हटल्या जाणाऱ्या सल्लागारांत यशवंतरावांचाही समावेश केला जात असे. शिवाय रुपयाचे अवमूल्यन किंवा बँकांचे राष्ट्रीयीकरण या वादग्रस्त झालेल्या अत्यंत महत्त्वाच्या प्रश्नांच्या बाबतीत यशवंतराव

आणि इंदिरा गांधी यांचे पूर्ण एकमत होते. जुन्या इतिहासावर दृष्टिक्षेप टाकावयाचा झाला तर बँकांच्या राष्ट्रीयीकरणाची शिफारस करणारा पाहिला ठराव यशवंत-रावांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र काँग्रेसनेच मंजूर केला होता. तेव्हा बंगळूरच्या अधिवेशनानंतर लगेच इंदिरा गांधी यांनी १४ बँकांचे राष्ट्रीयीकरण केल्याची जी घोषणा केली त्याबद्दल यशवंतरावांनी लगेच प्रशस्तिपत्र दिले यात आश्चर्य असे काही नव्हते. तथापि संजीव रेड्डी यांची राष्ट्रपतिपदाचे उमेदवार म्हणून जी निवड करण्यात आली होती तिला पाठिंबा देण्याचे धोरण यशवंतरावांनी चालूच ठेवले. इंदिरा गांधी यांना त्याबद्दल वैषम्य वाटले असले तर त्यातही नवल नाही. पण त्याच्या जोडीला यशवंतरावांनी काँग्रेसमधे फूट पडू नये म्हणून एकीचा एक ठराव काँग्रेसपुढे ठेवला. राष्ट्रीय प्रवाहापासून अलिप्त न होण्याच्या यशवंत-रावांच्या धोरणाशी सुसंगत असाच हा ठराव होता. त्या ठरावाचा सिंडिकेटने अधिक्षेप केला आणि मग यशवंतराव यांनी इंदिरा काँग्रेस हीच खरी काँग्रेस आहे असा ठाम निर्वाळा देऊन इंदिराजींच्या गोटात स्वतःला समाविष्ट करून घेतले. त्यानंतर घडलेला इतिहास अगदी ताजा आहे. त्यात आणीबाणी, निरनिराळ्या घटनात्मक सुधारणा आणि इंदिराजींनी निर्वाणीच्या म्हणून केलेल्या उपाययोजना यांचा समावेश होतो. त्याच वेळी जयप्रकाशजींची आंदोलने, नवनिर्माण समितीने गुजरात व बिहारमधे पुकारलेले सत्याग्रह, आणीबाणीच्या संदर्भातील दडपशाही, त्या सर्वांचे पर्यवसान म्हणून १९७७ साली इंदिराजींचा झालेला दारुण पराभव यांचीही त्यात भर पडते. विचार करण्यासारखा प्रश्न आहे तो हा की, हा इतिहास घडत असताना एक विचारवंत राष्ट्रीय नेते म्हणून यशवंतरावांनी आपली अशी स्वतंत्र भूमिका का घेतली नाही आणि प्रधानमंत्र्यांचे केवळ एक दुय्यम सहकारी म्हणून या साऱ्या घडामोडींकडे निरीक्षकाच्या दृष्टिकोणातूनच का पाहिले? त्यांना स्वतंत्र भूमिका दोन्ही बाजूंनी घेता आली असती. म्हणजे आजवरच्या त्यांच्या निष्ठावंत परंपरेनुसार इंदिराजींच्या कृतींचा बचाव करताना त्यांना म्हणता आले असते की, जयप्रकाशजींनी जी भूमिका घेतली ती अतिरेकी आणि लोकशाहीचे संकेत मोडणारी होती. कारण लोकनियुक्त प्रतिनिधींना कायदेमंडळातील वा कायदेमंडळाबाहेरील कर्तव्य पार पाडण्याला प्रतिबंध घालणारी ही चळवळ जयप्रकाशजी व त्यांच्या अनुयायांनी सुरू केली होती आणि ती लोकशाही संकेतात बसण्यासारखी नव्हती. इतकेच

नव्हे तर गांधीजींच्या सत्याग्रहाशीही सुसंगत नव्हती. त्या बचावानुसार यशवंतरावांना इंदिराजींच्या दडपशाहीचेही समर्थन करता आले असते आणि आपल्या प्रधानमंत्र्यांना निर्वाणीच्या वेळी पाठबळ दिल्याचेही समाधान त्यांना अनुभवता आले असते. त्या सुमारास अलाहाबाद हायकोर्टाने इंदिराजींची निवडणूक फेटाळून लावल्यामुळे जो पेचप्रसंग निर्माण झाला होता त्याबद्दलही जाहीर मत व्यक्त करताना यशवंतरावांना म्हणता आले असते की, इंदिराजींना दोषी ठरविण्यात आले आहे ते तांत्रिक कारणामुळे ठरविण्यात आले असल्यामुळे तेवढ्या कारणासाठी प्रधानमंत्रिपदाचा त्यांनी राजीनामा देण्याचे कारण नाही. मंत्रिमंडळातील एक सदस्य म्हणून यशवंतरावांनी प्रधानमंत्र्यांच्याबद्दल निष्ठेची अशा रीतीने प्रचीती आणून द्यावयाला पाहिजे होती.

दुसऱ्या बाजूने भूमिका घ्यावयाची तर घटनात्मक सुधारणा, एकतंत्री राजवट आणि आणीबाणी व तिच्या अनुषंगाने करण्यात आलेली दडपशाही याबद्दलची आपली नापसंती व्यक्त करून यशवंतरावांनी मंत्रिमंडळातून स्वतःला मोकळे करून घ्यावयाला पाहिजे होते. पण या दोन्ही भूमिका यशवंतरावांनी घेतल्या नाहीत. सावधपणाने ते स्वस्थ राहिले आणि त्यापलीकडे आणीबाणीची जबाबदारीही मंत्रिमंडळाचे एक सदस्य म्हणून त्यांनी इंदिराजींच्या जोडीने स्वीकारली नाही. पुढे लोकसभेतील विरोधी पक्षाचे नेते म्हणून त्यांनी सन्मान उपभोगला. पण इंदिराजींवर जे हल्ले होत होते, त्यांच्याबर जे खटले भरण्यात येत होते, यांच्या कृतींची चौकशी करण्यासाठी जे कमिशन नेमण्यात आले होते आणि एकंदरीने इंदिराजींचे जे चारित्र्यहनन केले जात होते त्याबद्दल निषेधाचा एक शब्दही यशवंतरावांनी काढला नाही. साहजिकच ज्याला ते राष्ट्रीय प्रवाह म्हणत होते त्याच्यापासून अलग होण्याच्या धोरणांचाच त्यांनी या वेळी अवलंब केला असा निष्कर्ष काढणे भाग आहे.

या निष्कर्षाला पाठबळ मिळाले ते यामुळे की चरणसिंग यांच्या मंत्रिमंडळात उपप्रधानमंत्रिपद भूषविल्यानंतर आणि स्वर्णसिंग, वा अर्स, वा ब्रह्मानंद रेड्डी यांच्या अध्यक्षपदाखाली कॉंग्रेसमधे काही काळ व्यतीत केल्यानंतर यशवंतरावांनी अखेर 'स्वगृही' म्हणजेच इंदिरा कॉंग्रेसमधे समाविष्ट होण्याचा जो निर्णय घेतला, त्यामुळे आधीच्या थोड्याशा कालखंडात आपल्याकडून चूक केली गेली याची यशवंतरावांनी जणू कबुलीच दिली असे म्हणता येईल. यशवंतरावांच्या

एकंदर उज्ज्वल राष्ट्रीय जीवनाला गालबोट लावणाराच हा कालखंड होता असे आता प्रांजलपणे म्हणावयाला हरकत नाही.

त्यात यशवंतरावांना कमीपणा येतो असे मला मुळीच वाटत नाही. यशवंतरावांनी महाराष्ट्रावरच नव्हे तर राष्ट्रावरही ऋणाचा जो बोजा टाकला आहे तो उतरवून टाकणे कठीण आहे. त्यांचे उतराई होण्याचा प्रयत्न करणेही तितकेच कठीण आहे. त्यांच्या जीवनाकडे दृष्टिक्षेप टाकला तर आश्चर्याने मन कुंठित झाल्याशिवाय राहात नाही. सामान्य शेतकऱ्याच्या घरातील हा मुलगा अठराविश्वे दारिद्र्याला तोंड देत असतानाही उच्च विद्याविभूषित होतो हीच एक मोठी किमया आहे. त्यासाठी जी जिद्द त्याने दाखविली त्याच्यापेक्षाही कितीतरी पटींनी मोठी जिद्द दाखवून हा गरीब मुलगा एकीकडे ऐरणीवरील घाव सोशीत, तावून सुलाखून निघत असताना राष्ट्रीय आंदोलनात स्वतःसाठी एक स्थान संपादन करतो ही तर अधिकच कौतुकास्पद घटना होय. त्यानंतरचा यशवंतरावांचा जीवनपट जेव्हा माझ्या डोळ्यांसमोर तरळतो तेव्हा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, केंद्राचे संरक्षणमंत्री, गृहमंत्री, अर्थमंत्री, परराष्ट्रमंत्री अशी एकापेक्षा एक मोठी पदे त्यांनी भूषविलेली मला दिसतात आणि कौतुकाने तसेच आदरमिश्रित आनंदाने माझे मन भरून येते. अर्थात ही झाली सन्मानपदे. त्यापेक्षा अधिक अभिमानास्पद असे कामगिरीचे जे डोंगर यशवंतरावांनी उभे केले आहेत ते राष्ट्रावरील यशवंतरावांचे ऋण होय. ते ऋण फेडले जाऊ शकत नाही. यशवंतरावांच्या स्नेहाचा, त्यांच्यामधील सहृदयतेचा, त्यांच्या निरागस प्रेमाचा लाभ घेण्याचे भाग्य लाभलेला एक सुहृद म्हणून मी एकच ग्वाही देईन की महाराष्ट्रात जे काही थोर पुरुष निर्माण झाले त्यांत कराडच्या यशवंतराव चव्हाण यांना मानाचे स्थान प्राप्त झाले आहे आणि ते तसेच अढळ राहील.

# सोज्ज्वळ मानवतावादी

**मोहन धारिया**

१९६२ सालच्या सार्वत्रिक निवडणुका झाल्या. महाराष्ट्रामध्ये यशवंतरावजी चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसपक्षाला प्रचंड बहुमत मिळाले. मुख्यमंत्री म्हणून यशवंतरावजी यांची एकमताने निवड झाली आणि त्यांनी आपल्या कारभारास सुरुवात केली. निवडणुकीच्या काळामध्ये पक्षांच्या प्रचारयंत्रणेचा मी प्रमुख होतो. निवडणुका संपल्यानंतर प्रदेश काँग्रेसची पुनर्रचना झाली. १९६२ पासून १९६७ पर्यंत महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचा मी सरचिटणीस होतो. त्याच काळात यशवंतरावजींबरोबर माझे जवळचे संबंध प्रस्थापित झाले.

काँग्रेस पक्षाचे संघटन आणि शासन यामध्ये कायम सुसंवाद असावा असा यशवंतरावजींचा कटाक्ष असे. शासन आणि संघटन यांचे नाते अगदी निकटचे असावे म्हणून यशवंतरावजी व शासनाचे प्रमुख सहकारी आणि प्रदेश काँग्रेसचे पदाधिकारी यांच्या बैठका सह्याद्री बंगल्यावर वारंवार होत असत. शिवाय महत्त्वाचे प्रश्न निर्माण झाल्यास आम्ही वेळोवेळी भेटत असू. पक्षाची धोरणे व पुढील दिशा स्पष्ट करण्यासाठी आणि प्रमुख कार्यकर्त्यांना त्या प्रक्रियेत सहभागी करून घेण्यासाठी शिबिरांचा उपक्रम यशवंतरावजींच्या कारकीर्दीत सुरू झाला. १९६० व १९६१ साली महाबळेश्वर येथे झालेली शिबिरे तर देशभर गाजली. काँग्रेस पक्षाला नवे रूप देण्याचा तो प्रामाणिक प्रयत्न होता.

१९६२ च्या निवडणुकीनंतर जनतेला दिलेल्या वचनांची पूर्तता करावी आणि महाराष्ट्रामध्ये आदर्श शासन यावे म्हणून यशवंतरावजींच्या मंत्रिमंडळाने ठोस पावले टाकण्यास सुरुवात केली. कृषी, उद्योग, सहकार व शिक्षण यासंबंधी कित्येक महत्त्वाचे निर्णय निवडणूक जाहिरनाम्याला अनुसरून घेतले गेले. त्यांची अंमलबजावणी सुरू झाली. सत्तेच्या विकेंद्रीकरणाची ग्वाही काँग्रेस पक्षाने दिली होती. त्याला अनुसरूनच जिल्हा परिषदा व पंचायत समित्या स्थापन करण्याची कारवाई सर्व देशात राजस्थानानंतर प्रथमच महाराष्ट्राने केली. राजस्थानमधील जिल्हा परिषद कायदा श्री. बलवंतराय मेहता समितीच्या अहवालाच्या आधारावर

झाला होता. परंतु त्यामध्ये कित्येक मूलभूत दोष राहिले होते. ते दोष दूर करून जिल्हा परिषदांचा कारभार अधिक जनताभिमुख व्हावा म्हणून महाराष्ट्र शासनाने श्री. वसंतराव नाईक यांच्या नेतृत्वाखाली एक समिती नेमली होती. त्या समितीच्या अहवालानुसार महाराष्ट्रातील जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांचा कायदा जारी करण्यात आला. जुलै १९६२ च्या शेवटच्या आठवड्यात जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या रीतसर निवडणुका झाल्या. त्या वेळी मुंबई सोडून महाराष्ट्राचे २५ जिल्हे होते. त्यांपैकी २३ जिल्ह्यांमध्ये काँग्रेसला स्पष्ट बहुमत मिळाले आणि जिल्हा परिषदांचा कारभार काँग्रेस पक्षाच्या हाती आला.

जिल्हा परिषदांचे अध्यक्ष व अन्य पदाधिकारी निवडताना सर्व जातिजमातींना विशेषतः मागासवर्गीय जातींना योग्य प्रतिनिधित्व मिळावे असा यशवंतरावजींचा खास आग्रह होता. त्यासाठी महाराष्ट्रातील प्रमुख जिल्ह्यांमध्ये मला पाठविण्यात आले. सर्व ठिकाणी मागासलेल्या समाजाचा किमान एक पदाधिकारी झालाच पाहिजे असा आदेश प्रदेश काँग्रेसने दिला आणि तितक्याच चोखपणे त्याची अंमलबजावणी झाली. हे करत असताना अल्पसंख्य जमातीमधील अध्यक्ष व्हावा असाही माझा प्रयत्न होता. दुर्दैवाने मागासलेल्या समाजातील अध्यक्ष करणे विविध कारणांस्तव अवघड झाले. कुलाबा जिल्ह्याच्या अध्यक्षपदी कै. दादासाहेब लिमये यांची निवड सर्वानुमते होऊ शकली. मात्र मागासवर्गीय जमातीचा अध्यक्ष कोठेही होऊ शकला नाही. काही जिल्ह्यांत अध्यक्ष सोडून अन्य पदाधिकाऱ्यांमध्ये संख्या कायद्यात बदल करून, चारवरून पाचवर नेण्यात आली. एक पदाधिकारी मागासवर्गीय असलाच पाहिजे असे बंधन घातले गेले. जिल्हा परिषदांमध्ये मागासलेल्या समाजाचा अध्यक्ष होऊ शकला नाही ही खंत माझ्या मनाला लागून राहिली. म्हणूनच पुणे महानगरपालिकेच्या महापौरपदी श्री. भाऊसाहेब चव्हाण यांची निवड करावी असा आग्रह मी सहकारी मित्रांजवळ धरला. तसा निर्णय माझ्याच निवासस्थानी झाला आणि माझे मित्र रिपब्लिकन पक्षाचे नेते श्री. भाऊसाहेब चव्हाण यांना पुणे महानगरपालिकेचे मागासलेल्या वर्गातील बुद्ध समाजाचे पहिले महापौर होण्याचा मान मिळाला.

मुख्यमंत्री या नात्याने यशवंतरावजी यांनी महाराष्ट्राच्या सामाजिक व आर्थिक प्रगतीसाठी भक्कम पाया उभारण्याचे काम केले. महाराष्ट्रभर महत्त्वाच्या ठिकाणी औद्योगिक वसाहती निर्माण केल्या आणि कारखानदारीला चालना दिली.

सहकाराचा खास पुरस्कार केला. सहकारी चळवळीचा फायदा तळागाळातील गरीब शेतकऱ्याला मिळावा म्हणून सहकारी क्षेत्रात प्रक्रिया करणारे साखर कारखाने, स्पिनिंग मिल्स, ऑईल मिल्स यासारखे कित्येक उद्योग त्यांच्या कारकीर्दीत सुरू झाले. सहकारी पतपेढ्या आणि विविध प्रकारच्या सहकारी संस्थांचे जाळे महाराष्ट्रभर निर्माण करण्यामागे यशवंतरावजींचीच प्रेरणा होती. जिल्हा परिषदां-मार्फत सत्तेचे विकेंद्रीकरण करण्याची सुरुवात महाराष्ट्रातच झाली. हा महत्त्वपूर्ण कार्यक्रम घोषणा होऊनही कित्येक राज्यांत अद्याप सुरू झालेला नाही. सर्व जाति-जमातींना जवळ घेण्याचे आणि नवबौद्धांना शासकीय सवलती देण्याचे पुरोगामी धोरण यशवंतरावजींच्या कारकीर्दीत साकार झाले. संयुक्त महाराष्ट्र झाला तरी भावनात्मकदृष्ट्या विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, कोकण व मुंबई हे प्रदेश त्या अर्थाने अलग होते. त्या सर्वांमध्ये भावनात्मक ऐक्य साधण्याचे उठावदार कार्य यशवंतरावजींच्या नेतृत्वाखाली झाले. त्याची नोंद महाराष्ट्राच्या इतिहासात सुवर्णाक्षरानेच करावी लागेल.

१९६२च्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर महाराष्ट्रातील शासन संघटनेचे यशवंत-रावजी एकमुखी नेते होते. निवडणुकीच्या काळात जाहिरनाम्यामार्फत आणि भाषणाभाषणांतून जनतेला दिलेली वचने पूर्ण करण्याचे काम मुख्यमंत्री झाल्या-बरोबर यशवंतरावजींनी व काँग्रेस पक्षाने जोमाने हाती घेतले. मोठ्या वेगाने ती कार्यवाही सुरू झाली. त्याच काळात चीनचे भारतावर आक्रमण झाले आणि पराभवाची नामुष्की भारताला पत्करावी लागली. पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांच्यावर त्यांच्या कारकीर्दीत झालेला तो असह्य आघात होता. त्या वेळचे संरक्षणमंत्री श्री. कृष्ण मेनन हेसुद्धा त्या अपयशाला तितकेच जबाबदार होते. श्री. कृष्ण मेनन यांच्या राजीनाम्याची मागणी खुद्द काँग्रेस पक्षात सुरू झाली. महावीर त्यागी, रामसुभग सिंग आदी नेत्यांच्या " इंद्राय स्वाहा तक्षकाय स्वाहा " या खंबीर भूमिकेपुढे मान झुकवणे पंडितजींना क्रमप्राप्त झाले आणि श्री. कृष्ण मेनन यांना संरक्षणमंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला. त्या वेळी सैन्यामध्ये निर्माण झालेले वैफल्य घालवून त्यांच्यात नवा आत्मविश्वास निर्माण करील अशा खंबीर व कार्यक्षम नेत्याची गरज होती. पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू आणि सर्व देशाच्या नजरेसमोर अग्रक्रमाने कोणते नाव आले असेल तर ते यशवंत-रावजींचे होते. त्यांनी केलेल्या कुशल कार्याचा आणि संघटनाचातुर्याचा तो

खास गौरव होता.

यशवंतरावजींची संरक्षणमंत्री म्हणून नियुक्ती होताच सर्व सैन्यामध्ये विश्वासाचे वारे संचारू लागले. सेनादल, वायुदल व नौदलाच्या प्रमुख सेनानींना यशवंतरावजींनी विश्वासात घेतले. त्यांच्या कारभारात कोणत्याही प्रकारे ढवळाढवळ होणार नाही असा दिलासा दिला. भारतीय संरक्षणाच्या आधुनिकीकरणास प्राधान्य देऊन संरक्षण व्यवस्थेची त्यांनी पुनर्रचना केली. त्या काळात यशवंतरावजींच्या नेतृत्वाखाली आपल्या संरक्षण विभागाने जी चतुरस्त्र प्रगती केली त्यामुळेच १९६५ साली पाकिस्तानने केलेल्या आक्रमणाला चोख उत्तर देणे शक्य झाले. त्या युद्धात आपल्या सैन्याने पाकिस्तानवर बिनतोड मात केली. लाहोर अथवा रावळपिंडी येथील विमानतळावर विमाने उतरवण्यासाठी अथवा त्या तळावरून विमानांचे उड्डाण करण्यासाठी भारताची पूर्वपरवानगी घेण्याचा अवमानकारक प्रसंग पाकिस्तानवर आला. संरक्षणमंत्री या नात्याने यशवंतरावजींची कारकीर्द मध्यवर्ती शासनातील त्यांच्या अन्य कोणत्याही मंत्रिपदापेक्षा सर्वश्रेष्ठ ठरली असे मला वाटते. हिमालयाच्या संरक्षणासाठी सह्याद्री धावून गेला हे विधान किती बरोबर होते ते यशवंरावजींनी आपल्या कर्तृत्वाने सिद्ध केले.

यशवंतरावजी संरक्षणमंत्री असताना महाराष्ट्र प्रदेशच्या संसदीय मंडळाची बैठक सुरू होती. पाकिस्तानने आक्रमण केले तेव्हा ती बैठक त्यांच्या मुंबईतील निवासस्थानी सुरू होती. पाकिस्तानचे हल्ल्याचे वृत्त समजताच ताबडतोब दिल्लीला जाणे आवश्यक होते. त्या वेळी मी सुद्धा त्यांच्या बरोबर होतो. खास लष्करी विमानाने आमचा प्रवास सुरू झाला. सर्व शहरांमध्ये व विमानतळावर ब्लॅकआऊट होता. विमानतळावर कोठेही उजेड दाखवण्याची परिस्थिती नव्हती. एक क्षणभरही न थांबण्याचा आणि दिल्लीला रातोरात परतण्याचा निर्णय यशवंतरावजींनी घेतल्यामुळे त्यांची सर्व व्यवस्था करणे अपरिहार्य झाले. प्रवासात धोक्याचा इशारा मिळाल्यामुळे आमचे विमान आग्रा विमानतळाकडे वळवावे लागले. आग्र्याला आम्ही उतरलो. तेथूनच मोटारीने दिल्लीला जाण्याचे आम्ही ठरवले. तितक्यात लष्करी अधिकाऱ्यांकडून क्लिअरन्स मिळाल्यामुळे त्याच विमानाने रातोरात आम्ही दिल्लीला पोहोचलो. त्या प्रवासात यशवंतरावांची प्रक्षुब्ध मन:स्थिती व निर्धाराचे दर्शन मी जवळून घेऊ शकलो. यशवंतरावजींचा निर्धार पुढील काळात मी केव्हाही पाहू शकलो नाही.

गृहमंत्री, अर्थमंत्री व परराष्ट्रमंत्री म्हणून यशवंतरावजींनी चांगल्या प्रकारे कार्य केले असले तरी संरक्षणमंत्रिपदासारखे उठावदार कार्य ते केव्हाही दाखवू शकले नाहीत. गृहमंत्री म्हणून इंदिरा गांधी यांच्या सर्व निर्णयांची समर्थपणे मल्लीनाथी करण्याचे कार्य यशवंतरावजींनी कुशलतेने केले. मात्र त्या काळात स्वतःची वेगळी छाप ते केव्हाही पाडू शकले नाहीत. ठिकठिकाणी राष्ट्रपतींची राजवट लागू केल्यानंतर संसदेच्या सभागृहात जी चर्चा चालत असे त्यामध्ये घटनेचा सोइस्कर अर्थ लावण्याची संसदपटुता यशवंतरावजींनी जरूर दाखवली. परंतु ते कार्य एखाद्या वकिलासारखे होते. कित्येक प्रकरणी स्वतःच्या मनाविरुद्ध त्यांना वकिली करावी लागत होती हे मी जवळून पाहिले आहे. संस्थानिकांचे तनखे आणि सवलती रद्द करण्याचा निर्णय माझी उपसूचना मान्य करून ऑल इंडिया काँग्रेस कमिटीने घेतला. गृहमंत्री म्हणून त्याची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी यशवंतरावजींवर आली. त्या कामी सर्व अधिकार काँग्रेस संघटनेने दिलेले असतानाही संस्थानिकांचा वापर आपल्या राजकारणासाठी करण्याचा जो प्रयत्न इंदिराजींनी केला त्याला विरोध करण्याचे सामर्थ्य यशवंतरावांनी केव्हाही दाखवले नाही. उलट भरपूर नुकसानभरपाई देण्यास मान्यता देऊन ज्या उद्देशाने संस्थानिकांचे तनखे व सवलती रद्द करण्याचा निर्णय झाला त्याची पायमल्ली करण्यालाच त्यांचे हातभार लागले.

अर्थमंत्री या नात्याने यशवंतरावजी यांची कारकीर्द प्रभावी ठरली नाही. देशाच्या आर्थिक धोरणांना नवी दिशा देण्याचे सामर्थ्य अर्थमंत्र्याच्या हाती असते. त्या दृष्टीने विचार करताना काँग्रेसने जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार आर्थिक धोरणांमध्ये धडाडीचा पुरोगामी बदल यशवंतरावजी केव्हाही करू शकले नाहीत. हाताखालील नोकरशाहीने पंतप्रधानांच्या सचिवालयाच्या आदेशानुसार निर्णय घ्यावे आणि त्याचा पाठपुरावा अथवा समर्थन करावे यापलीकडे यशवंतरावजी जाऊ शकले नाहीत. सुशिक्षित बेरोजगारांची समस्या सोडवण्याच्या दृष्टीने राष्ट्रीयीकृत बँकांनी ठोस पुढाकार घ्यावा असे मी सुचवले होते. बँकेच्या प्रत्येक शाखेने दरमहा किमान दोन सुशिक्षित बेकारांना स्वयंरोजगार देऊन स्वतःच्या पायावर उभे करावे अशी माझी सूचना होती. खिरापतीसारखे पैशाचे वाटप बँकांनी करू नये, मात्र बेकार तरुणांना मार्गदर्शन करून पैसे परत करू शकतील असे छोटे व्यवसाय करण्यासाठी व स्वतःचे पायावर उभे करण्यासाठी

त्यांना मदत करावी अशी व्यवहार्य योजना होती. यशवंतरावजी अर्थमंत्री होते तेव्हा देशामध्ये राष्ट्रीयीकृत बँकांच्या ३० हजार शाखा होत्या. माझ्या सूचनेची अंमलबजावणी व्यवस्थित झाली असती तर दरमहा ६० हजार तरुणांना अथवा प्रतिवर्षी ७ लाखापेक्षा अधिक तरुणांना स्वयंरोजगार उपलब्ध करून देणे शक्य होते. माझ्या सूचनेवर चर्चा करण्यासाठी बँकेच्या अध्यक्षांच्या एका बैठकीमध्ये यशवंतरावजींनी मला बोलावले होते. सिंडिकेट बँकेसारख्या काही राष्ट्रीयीकृत बँकेच्या अध्यक्षांनी माझी सूचना उचलून धरली. बँक ऑफ महाराष्ट्रच्या अध्यक्षांनी ती अंमलात आणण्याचा निर्धार व्यक्त केला. अशा प्रकारे पाठिंबा मिळत असतानाही बँकांना तसा आदेश देण्यास यशवंतरावजी अथवा रिझर्व्ह बँक तयार झाली नाही. सामाजिक व आर्थिक बदलासाठी थोडा फार धोका पत्करून खंबीर व निर्धारपूर्वक भूमिका घेणे आवश्यक असते. त्याखेरीज सामाजिक व आर्थिक परिवर्तन होण्याची सुतराम शक्यता नाही. तशा प्रकारचा ठोस निर्णय घेण्याचे कार्य अर्थमंत्री या नात्याने यशवंतरावजी केव्हाही करू शकले नाहीत. गरिबीत जन्माला आलेला व गरिबीची जाण असलेला नेता संधी मिळाली असतानाही गरिबीविरोधी लढाईमध्ये अग्रभागी राहून खंबीरपणे लढला नाही ही जाणीव नेहमीच क्लेश देऊन जाते.

यशवंतरावांची परराष्ट्रमंत्रिपदाची कारकीर्द मध्यवर्ती शासनातील त्यांच्या सर्व कारकीर्दीमध्ये सर्वांत कमी प्रतीची ठरली. परराष्ट्र मंत्रालयातील कॅबिनेट दर्जाच्या चेअरमनच्या नेतृत्वाखाली काम करणारे फॉरेन पॉलिसी कमिशन आणि पंतप्रधान इंदिरा गांधींचे सचिवालय यांच्या मार्फत ते खाते चालविले जात होते. त्या सर्व काळात यशवंतरावजी केवळ नामधारी परराष्ट्रमंत्री होते. त्यातच आणीबाणी पुकारली गेली आणि त्या निर्णयाचे समर्थन करण्याची पाळी यशवंतरावजींवर आली. मुख्यमंत्री म्हणून महाराष्ट्राच्या अस्मितेला आणि संरक्षणमंत्री म्हणून देशाच्या अस्मितेला साज चढविणारा नेता आणीबाणीच्या काळात अगदी निस्तेज ठरला. इंदिराजींनी जी लाचारांची फौज निर्माण केली तिच्या अग्रभागी राहण्याचा दारुण प्रसंग जगजीवनराम व यशवंतराव यांच्यासारख्या धुरंधर नेत्यांवर आला आणि खुर्चीसाठी त्यांनी आपली मान खाली झुकवून प्रत्यक्ष लाचारीलाच कुर्निसात केला.

उभा महाराष्ट्र यशवंतरावजींबरोबर होता. त्याचबरोबर मुख्यमंत्रिपद व संरक्षण

मंत्रिपदाचे यशस्वी वलय त्यांचे भोवती होते. तरीही यशवंतरावजी भारतीय सरकारचे केवळ मंत्री म्हणून वावरले. सर्व भारताचे लोकनेतृत्व ते केव्हाही करू शकले नाहीत.. पंतप्रधान लालबहादुर शास्त्री यांना हृदयविकाराचा झटका आल्यानंतर काँग्रेसमधील पुरोगामी शक्तीचे नेतृत्व करण्याची सुसंधी यशवंतरावजींना मिळाली होती. आम्हा सर्व तरुण मित्रांचा तो आग्रह होता. हा आग्रह त्यांच्यापर्यंत पोहोचवण्याचे काम मी स्वतःच केले होते. दुर्दैवाने आपल्या सत्तेला धोका निर्माण होईल असे कोणतेही पाऊल उचलण्यास यशवंतरावजी तयार नव्हते. " सत्तेवर राहून सर्वसामान्य समाजाचे जितके भले करता येईल ते सर्व मी करीन परंतु सत्तेला धोका निर्माण होईल असे कोणतेही काम मी करू शकणार नाही " ही यशवंतरावजींची सरळ भूमिका होती. साहजिकच आणी-बाणीच्या काळात धावत्या रेल्वेतून उडी घेण्याऐवजी त्या रेल्वेबरोबरच जाणे अधिक पसंत केले. त्या उलट इंदिराजींनी पडेल तो धोका पत्करण्याचे मान्य केले. म्हणूनच आम्ही सर्व मित्रांनी त्यांना साथ देण्याचे ठरविले. काँग्रेसमध्ये आम्हा तरुण मित्रांची शक्ती हळूहळू वाढत असली तरी त्या वेळी काँग्रेसमधील एस. के. पाटील, अतुल्य घोष, मोरारजीभाई आदी नेत्यांबरोबर समर्थ मुकाबला करण्यासाठी तितक्याच तोलाच्या नेत्यांची आम्हाला गरज होती. ते नेतृत्व देण्यास यशवंतरावजी तयार झाले असते तर इंदिरा गांधींऐवजी त्यांचेच नाव आम्हाला अधिक जवळचे होते. त्यांनी नकार दिल्यामुळेच आम्हाला इंदिराजींना पाठिंबा द्यावा लागला. यशवंतरावजींनी मान्यता दिली असती तर काळाच्या ओघात ते या देशाचे पंतप्रधान झाले असते आणि भारतीय राजकारणाला चांगले वळण लागले असते.

आणीबाणीच्या काळात यशवंतरावजींना पुन्हा एकदा चांगली संधी प्राप्त झाली होती. मंत्रिमंडळाला विश्वासात न घेता इतका मूलभूत निर्णय घेतल्यानंतर त्याला सनदशीर विरोध करणे आणि त्या मुद्द्यावर मंत्रिमंडळापासून अलग होणे निश्चित शक्य होते. त्या वेळी धावत्या गाडीतून खाली उडी मारण्यास यशवंत-रावजी तयार झाले नाहीत. परंतु १९७७ च्या निवडणुका पुकारल्यानंतर जगजीवनरामप्रमाणे जनता पक्षाबरोबर सहकार्य करण्याची भूमिका यशवंतरावजींना घेता आली असती. तसे झाले असते तर काळाच्या ओघात पंतप्रधान होण्याचा मान यशवंतरावजींना निश्चित मिळू शकला असता. त्यानंतर इंदिरा काँग्रेसचे

विभाजन झाल्यानंतर जनता पक्षाचे शासन अडचणीत असताना यशवंतरावजींनी सहकार्याची भूमिका घेतली असती अथवा विरोधी पक्ष नेता म्हणून इंदिराजींपुढे मान तुकवण्याऐवजी खंबीरपणे काम केले असते तर पुढील काळात सर्व विरोधी पक्षांना बरोबर घेऊन पंतप्रधानकीकडे वाटचाल करणे शक्य झाले असते. त्यासाठी लागणारी हिंमत व निर्धार यशवंतराजींनी केव्हाच दाखवला नाही. त्याऐवजी काँग्रेस प्रवेशासाठी महिनो न् महिने रांगेत उभे राहणे त्यांनी अधिक पसंत केले. या भूमिकेमुळेच यशवंतरावजींचे नव्हे तर सर्व देशाचे व लोकशाहीचे नुकसान झाले असे मला वाटते. त्या काळात झालेल्या मानहानीमुळे यशवंतरावांच्या कारकीर्दीला कायमचा डाग लागला.

यशवंतरावजींच्या सोयीच्या राजनीतीऐवजी तत्त्वज्ञानावर आधारित वचनपूर्तीचे राजकारण करावे असा माझा आग्रह होता. किंबहुना त्यावरच त्यांचे माझे तीव्र मतभेद झाले. राजकीय दृष्टया आम्ही दूर गेलो. हे खरे असले तरी यशवंतरावजींच्या अंगी कित्येक मौलिक गुण होते. मानवतेवर आणि मानवतावादावर त्यांची श्रद्धा होती. त्यांचा वाचनाचा व्यासंग गाढा होता. संगीत, साहित्य, नाट्यकला, शिक्षण यांचे ते चहाते होते. आजारी असतानाही जीवनभर वेणूताईंवर यशवंतरावांनी केलेले नितांत प्रेम म्हणजे एक महाकाव्यच होते. कार्यकर्त्यांची त्यांना जाण होती. समाजातील सर्व थरांतील व्यक्तींशी त्यांची जवळीक होती. त्यामुळेच कामगार, पददलित, साहित्यिक, कलाकार, कारखानदार, शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ, अधिकारी, कार्यकर्ते, नेते आदी सर्वांच्याच मनात भावनाप्रधान यशवंतरावजींविषयी नेहमीच आदराची भावना होती आणि अद्यापही तीच भावना कायम आहे.

यशवंतरावजी व वेणूताई आणि माझ्या सर्व कुटुंबाचे आपुलकीचे व प्रेमाचे नाते होते. माझ्या राजकीय जीवनात यशवंतरावजींनी दिलेली साथ मी केव्हाही विसरू शकणार नाही. दिल्ली महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे यशवंतरावजी अध्यक्ष होते. १९७७ साली त्यांना मंत्रिपदापासून दूर व्हावे लागले. सर्वसाधारणपणे मध्यवर्ती शासनातील कॅबिनेट दर्जाचा मंत्री संस्थेचा अध्यक्ष असे. यशवंतरावजींनी आपल्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला आणि मला संस्थेचे अध्यक्ष करावे असे सुचवले. त्याप्रमाणे संस्थेचे कार्यकर्ते, मी संस्थेचा अध्यक्ष व्हावे अशी विनंती करण्यासाठी माझ्याकडे आले. मी त्यांची विनंती अमान्य

केली. " यशवंतरावजी मंत्री नसले तरी महाराष्ट्राचे ज्येष्ठ नेते आहेत. तेच अध्यक्ष राहतील व मी चेअरमन म्हणून काम करीन. " असे मी निक्षून सांगितले. त्यानुसार व्यवस्था करण्याचे ठरले आणि यशवंतरावजींचा राजीनामा परत करण्यात आला. त्या वेळी यशवंतरावजींना भेटण्यासाठी मी गेलो होतो. वेणूताईही उपस्थित होत्या. घटना साधी होती परंतु यशवंतरावजींच्या डोळ्यांत आलेले पाणी मी पाहिले. माझ्या मनाचीही कालवाकालव झाली. आम्ही अधिकच जवळ खेचलो गेलो. जनता राजवटीत मंत्रिपदावर असताना आम्ही सर्वजण वेळोवेळी भेटत होतो. एकत्र कॉफीपान करताना अथवा जेवताना जीवाभावाच्या गोष्टी मोकळेपणे बोलत होतो. त्या काळातही कळत नकळत आमच्या मित्रत्वाचे वस्त्र अधिक मजबूत व सुंदर बनत गेले.

डॉ. विक्रम चव्हाण व वेणूताईंच्या निधनानंतर यशवंतरावजी खूपच खचले. त्या जबरदस्त तडाख्याने दिलेल्या आघातामधून यशवंतरावजी केव्हाही बाहेर पडू शकले नाहीत. त्यांच्या जीवनातील संध्यासमयीचा तो काळ त्यांना व सर्वांनाच वेदना देणारा ठरला. इंदिराजींच्या निर्घृण हत्येनंतर यशवंतरावजी अधिकच व्यथित झाले आणि त्या हळव्या बेसावध अवस्थेतच चपळ काळाने त्यांच्यावर अखेरची झेप घेतली. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात आणि घराघरांत आदरणीय ठरलेल्या त्या महान नेत्याला काळाने दुसऱ्या विश्वात खेचून नेले. महाराष्ट्राच्या कीर्तिमंदिराचे छप्परच कोसळून खाली यावे असा सर्वत्र भास झाला. त्या शोकसागरात अवघा महाराष्ट्र बुडून गेला. ते स्वाभाविकच होते. कारण छत्रपती शिवाजीमहाराजानंतर महाराष्ट्राला तसेच महाराष्ट्रातील बहुजन व पददलित समाजाला एवढे भव्य नेतृत्व केव्हाही लाभले नव्हते.

# राजकीय जीवनाचे चार अध्याय

मधू लिमये

यशवंतराव चव्हाण यांची व माझी अखेरची भेट झाली ती एका गाण्याच्या कार्यक्रमात. त्या वेळचे केंद्रीय मंत्री एन. के. पी. साळवे यांच्या घरी पं. जसराज यांचे गायन होते. साळवे यांनी या कार्यक्रमासाठी यशवंतरावांना व मलाही बोलावले होते. जसराजांचे गाणे त्या दिवशी खूपच रंगले. यशवंतराव गाण्यात पूर्णपणे रमले होते. गायनाच्या कार्यक्रमानंतर, कधी तरी संध्याकाळी गप्पा मारायला घरी या, असे ते म्हणाले होते. दुर्दैवाने त्यांच्या भेटीसाठी जाणे जमले नाही. अचानक त्यांच्या निधनाचे वृत्त वर्तमानपत्रात वाचले आणि अत्यंत हळहळ वाटली.

यशवंतरावांचा आणि माझा बराच जुना परिचय होता. त्यांच्या केंद्रीय सरकार-मधील कामगिरीची सुरुवात व माझ्या संसदीय जीवनाची सुरुवात साधारणपणे एकाच वेळी झाली. त्यांच्या जीवनाचे चार अध्याय पडतात. पहिला अध्याय स्वातंत्र्य चळवळीशी निगडित आहे. एक ध्येयवादी तरुण या नात्याने ते राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या चळवळीकडे खेचले गेले. स्वातंत्र्य चळवळीतील पुढारलेल्या विचारसरणीचे जे अनुयायी होते त्यामध्ये यशवंतरावांची गणना करावी लागेल. समाजवादी व रॉयवादी विचारांचे त्यांना बरेच आकर्षण होते. यशवंतरावांनी १९४२ च्या भूमिगत चळवळीत हिरीरीने भाग घेतला. त्यानंतर ते विधान सभेवर निवडून आले. संसदीय सचिवापासून ते स्वतंत्र खाते सांभाळणाऱ्या मंत्र्यांपर्यंत त्यांनी अल्पावधीत प्रगती केली.

यशवंतरावांचा जीवनाचा दुसरा अध्याय १९५६ मध्ये सुरू झाला. प्रथम महाद्वैभाषिकाचे व नंतर महाराष्ट्राचे ते मुख्यमंत्री झाले. मुख्यमंत्री झाल्यानंतर यशवंतरावांनी प्रशासनाच्या धोरणाला नवीन वळण दिले. गोळीबार, लाठीमार इत्यादी दडपशाहीच्या उपायांचा अवलंब न करता विरोधी पक्षांशी व चळवळी करणाऱ्या नेत्यांशी सौजन्याने वागायचे व शक्यतो तडजोडीने मार्ग काढायचा, असे नवीन तंत्र त्यांनी सुरू केले. मोरारजींची अरेरावी राजवट व यशवंतरावांची

सौम्य राजवट यातला फरक जनतेला व विरोधी पक्षांना एकदम जाणवला. अन्यथा संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या झंझावातात ते तीन-चार वर्षे टिकून राहिले नसते. इंदिरा गांधींशी संधान बांधून त्यांनी संयुक्त महाराष्ट्राची मागणी पदरात पाडून घेण्याच्या दृष्टीने यशस्वी प्रयत्न केले. एस्. एम्. जोशी यांच्यानंतर संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीचे श्रेय यशवंतरावांनाच ब-याच प्रमाणावर मिळते.

समितीच्या कालखंडात म्युनिसिपल व बेस्ट कामगारांचे संप मिटवून सन्माननीय तडजोड घडवून आणण्यात एस्. एम्. जोशी यांच्या इतकीच यशवंतरावांची मुख्यमंत्री या नात्याने मदत होत असे. अवघ्या चार-पाच वर्षांत यशवंतरावांनी एवढी कीर्ती संपादन केली की, चिनी आक्रमणाच्या संकटकाळात कृष्ण मेनन यांना राजीनामा देणे भाग पडले तेव्हा संरक्षणमंत्री म्हणून त्यांची केंद्रस्थानी निवड झाली व अशा रीतीने त्यांच्या जीवनाचा तिसरा अध्याय सुरू झाला.

यशवंतराव संरक्षणमंत्री असल्यापासून मी त्यांना जवळून पाहात आहे. कृष्ण मेनन यांच्या बोचऱ्या व्यक्तिमत्त्वामुळे सैन्यामध्ये गटबाजीचा चंचुप्रवेश होऊ लागला होता. यशवंतरावांच्या सौम्य व मृदू व्यक्तिमत्त्वामुळे सैन्यातील वातावरण निवळण्यास निश्चित मदत झाली.

संरक्षण मंत्रिपदाच्या कारकीर्दीत यशवंतरावांनी सैन्य प्रबळ करण्याचे दुसरे कार्य केले. चिनी आक्रमणामुळे भारतीय सैन्याची जी वाताहात झाली त्यामुळे संरक्षणाच्या आतापर्यंत दुर्लक्षिलेल्या प्रश्नाकडे विशेष लक्ष देणे केंद्र सरकारला भाग पडले. मोरारजीभाईंचे नवीन अंदाजपत्रक करवाढीमुळे व अनिवार्य नव्या करयोजनेमुळे ज्याप्रमाणे वादग्रस्त बनले त्याचप्रमाणे संरक्षण खात्याच्या मागण्यात झालेल्या प्रचंड वाढीमुळेही ते गाजले. १९६१–६२ सालच्या अंदाजपत्रकात संरक्षण खात्याचा खर्च रु. ३११ कोटी होता. म्हणजेच तो एकूण सरकारी प्राप्तीच्या २८ टक्के इतका होता. पुढील वर्षात १९६२–६३ च्या वित्तीय वर्षात हा खर्च रु. ३७६ कोटीपर्यंत वाढला. पण संरक्षण खर्चात झालेल्या वाढीपेक्षा सरकारी उत्पन्न अधिक प्रमाणात वाढल्यामुळे टक्केवारीचे प्रमाण २४·९ इतके खाली आले. पण १९६३–६४ च्या अंदाजपत्रकात संरक्षण खात्याचा खर्च रु. ८६७ कोटीपर्यंत वाढला. म्हणजेच सरकारी उत्पन्नाचा एकूण ४१ टक्के भाग संरक्षण खात्यावर खर्च होऊ लागला.

संरक्षण खर्च एकदम एवढा वाढला असला तरी सर्व विरोधी पक्षांनी त्याचे

समर्थन केले. स्वावलंबन व अलिप्ततेचे धोरण चालविण्यासाठी इतकी किंमत दिलीच पाहिजे असे इंद्रजित गुप्ता म्हणाले. अमेरिकेच्या काश्मीरबाबतच्या धोरणाचा त्यांनी निषेध केला हे खरे आहे. पण वातावरण इतके बदलले होते की चीन विरुद्ध अमेरिकेने भारताला केलेल्या मदतीबद्दल गुप्तांनी कम्युनिस्ट असूनही आभार व्यक्त केले. भारताची पत जगात केवढी कमी झाली होती त्याचा उल्लेख करून शारदा मुखर्जी म्हणाल्या की न्यू स्टेटसूमनचे संपादक किंग्जले मार्टीन यांनी भारतीय सेना आता खतम झाल्यासारखीच आहे असे उद्गार काढल्याचे सभागृहाच्या निदर्शनास आणले.

यशवंतराव दिल्लीला आले खरे, पण तेव्हा सरकारमध्ये व काँग्रेसच्या राजकारणात त्यांना विशेष महत्त्व देण्यात येत नव्हते हे अगदी स्पष्ट होते. सीमावर्ती सडकांच्या निर्मितीसाठी स्थापन झालेल्या संघटनेत कृष्ण मेनन यांच्या नावाचा समावेश करण्यात आला होता व चव्हाणांना समितीचे उपाध्यक्ष बनवण्याच्या ऐवजी ते पदच रद्द करून टाकण्यात आले होते. चव्हाणांच्या वर समन्वयमंत्री म्हणून टी. टी. कृष्णम्माचार्य यांना आणून बसवण्यात आले होते. ओरिसाचे मुख्यमंत्री बिजू पटनाईक यांना परराष्ट्रीय खात्यात एक स्वतंत्र खोली देण्यात आली होती. अशा रीतीने संरक्षणाच्या क्षेत्रात यशवंतरावांना विभागीय स्वायत्तता तर नव्हतीच मग खुद्द मुखत्यारी कोठून असणार ?

टी. टी. विरोधी पक्षाच्या काही खासदारांनी कृष्णम्माचारी, बिजू पटनाईक व कृष्ण मेनन यांच्या सरकारवर टीका केली व संरक्षणमंत्र्यांना जर विश्वासात घ्यायचे नसेल, त्यांच्यावर जर जबाबदारी टाकायची नसेल, संरक्षण प्रश्नांची चर्चा करण्यासाठी भारतात आलेल्या परदेशी पाहुण्यांना चव्हाणांना जर भेटूनही द्यायचे नसेल तर मग संरक्षणमंत्री हवेत तरी कशाला ? अशी पृच्छा विरोधी पक्षाच्या सभासदांनी केली. कोलंबो शक्तींचे प्रतिनिधी भारतात आले असताना ते सर्वांना भेटले. पण संरक्षणमंत्र्यांची व त्यांची भेट झाली नाही. अशी भेट आवश्यक आहे असे नेहरूंपासून कोणत्याच वरिष्ठ मंत्र्याला वाटले नाही.

विरोधी पक्षांनी यशवंतरावांना अडचणीत टाकणारे प्रश्न उपस्थित केले, त्यांना "चढवण्याचा"ही काही लोकांनी प्रयत्न केला. पण नेहरू जिवंत असताना यशवंतराव दबून राहात. तरीही संरक्षण खात्याच्या वरील चर्चांना कोणालाही न दुखवता यशवंतराव परिणामकारकरीत्या उत्तरे देत. एकदा राममनोहर लोहिया

व यशवंतराव चव्हाण यांची समोरासमोर थोडीशी चकमक झाली. लोहियांनी खोचकपणे विचारले, "भारतीय सैन्याचा तुम्ही इतका गौरव करीत आहात पण चीनबरोबर झालेल्या लढाईत आपल्या सैन्याने फक्त पळ काढला का काही चिनी सैनिकांना पकडले?"

यशवंतरावांनी प्रश्नाचे उत्तर द्यायचे टाळले. लोहियांनी प्रश्नांची सरबत्ती चालू ठेवली, "किती सैनिक पकडले, हजार, शंभर, एक डझन का एकही नाही?"

यशवंतरावांनी स्तब्धता धारण करणे योग्य आहे असे मानले. कारण खरोखरच भारतीय सैन्याने एकही चिनी सैनिकाला पकडले नव्हते.

चीनबरोबरच्या लढाईत जरी भारताला नामुष्की पत्करावी लागली असली तरी पुढल्या दोन वर्षांत सैन्याची शिक्षण, नैतिक बळ व आधुनिक हत्यारे या दृष्टीने परिस्थिती खूपच सुधारली होती. १९६५ च्या संरक्षण खात्यावरील चर्चेच्या वेळी यशवंतरावांनी "गेल्या दोन वर्षांत आम्ही गाजावाजा न करता चांगली तयारी केली आहे" असे आत्मविश्वासाने सांगितले.

त्याच वर्षी शास्त्री पंतप्रधान असताना कच्छवर आक्रमण झाले व काही महिन्यांनंतर काश्मीरात पाकिस्तान्यांनी घुसखोरही घुसवले. तेव्हा लढाईला तोंड द्यावे लागले. भारताला फार प्रचंड यश मिळाले अथवा पाकिस्तान चारी मुंड्या चीत झाले अशातला भाग नाही. पण तरीदेखील भारतीय सैन्याने एकूण पाकिस्तानी लष्कराला चांगलाच धडा शिकवला यात शंका नाही. १९६६ च्या अंदाजपत्रकी चर्चेतील आपल्या भाषणात ह्या घटनांचा गौरवपूर्ण उल्लेख करायला यशवंतराव चुकले नाहीत. तरीदेखील युद्धसंचालन असो अथवा परराष्ट्रीय राजकारण असो यशवंतरावांना बरोबरीचा वाटा लालबहादूर शास्त्रींच्या कारकीर्दीतही मिळू शकला नाही.

भारत पाकिस्तान लढाईत लाहोर सियालकोट आघाडीवरील पाकिस्तानचे लष्करी दडपण कमी करण्यासाठी सिंधच्या दिशेने भारत सरकारने उंटावर स्वार झालेल्या सैनिकांच्या मदतीने नवीन आघाडी उघडली. पण हवाई दलाच्या पाठिंब्याच्या अभावी त्या 'कॅमल कोअर'ची कत्तल करण्यात आली. भारताच्या युद्ध संचालनावरचा हा एक कलंक होता.

प्रारंभी म्हटल्याप्रमाणे संरक्षणमंत्री म्हणून नेहरूंच्या उत्तुंग व्यक्तिमत्त्वापुढे

चव्हाण आपले प्रशासकीय गुण प्रकर्षाने प्रकट करू शकले नाहीत, हे सत्य आहे. कॉंग्रेसच्या अखिल भारतीय नेतृत्ववर्गात त्या काळात त्यांना महत्त्वाचे स्थान नव्हते. तेव्हा राजकीय नेते म्हणून ते चमकले नाहीत यात काहीच आश्चर्य नाही.

पण ते महाराष्ट्रात मुख्यमंत्री असताना प्रमुख प्रशासकीय होते व महाराष्ट्र कॉंग्रेसचे सर्वश्रेष्ठ पुढारीही होते. त्यामुळे त्यांचे हे दोन्ही गुण लोकांपुढे आले होते. दिल्लीच्या त्यांच्या वास्तव्यात प्रशासकीय कौशल्याची चमक त्यांनी काही प्रमाणात संरक्षण खात्यात व प्रामुख्याने पुढे गृहखात्यात दाखवली होती. पण राजकीय नेतृत्वाच्या दृष्टीने त्यांची कर्तृत्व व परिणामकारकता उपेक्षणीय होती. बंगलोरच्या संसदीय मंडळाच्या बैठकीत १९६९ मध्ये प्रथम राजकीय नेतृत्व देण्याचा त्यांनी प्रयत्न केला. ज्या नेत्यांशी त्यांचे कधीच पटले नाही त्या सिंडिकेटला व व मोरारजीभाईंना त्यांनी साथ दिली. गिरी निवडून आल्यानंतर कॉंग्रेस ऐक्याच्या नावाखाली त्यांनी इंदिरा गांधींशी तडजोड केली. त्यामुळे त्यांच्यावर धरसोडीचा आरोप करण्यात येऊ लागला. कॉंग्रेस अंतर्गत संघर्षात कोण विजयी होणार यासंबंधीचा त्यांचा कयास चुकला म्हणून म्हणा अथवा आपला राजकीय वकूब वेळीच न ओळखल्यामुळे त्यांच्याकडून ही चूक झाली.

गुलझारीलाल नंदा यांची गृहमंत्री म्हणून कारकीर्द संपूर्णपणे अयशस्वी ठरली होती. मार्क्सवादी कम्युनिस्टांविरुद्ध त्यांनी योजलेल्या दडपशाही उपायांमुळे ते बरेच बदनाम झाले. या उपायांचे त्यांनी केलेले समर्थनदेखील आचरटपणाचे असे. साधूंच्या निदर्शनाच्या प्रकरणात अश्रुधूर, गोळीबार आदी जे प्रकार झाले त्यामुळे नंदांची पक्की नाचक्की झाली. गृहमंत्री बदलणे तर आवश्यक होऊन बसले होते. नवे गृहमंत्री कोण होणार, स. का. पाटील की यशवंतराव, अशी चर्चा संसदेच्या लॉबीत चालू होती. पण इंदिरा गांधींनी यशवंतरावांची गृहमंत्रिपदासाठी निवड केली. तेथून तिसरा अध्याय सुरू झाला.

माझ्या मते १९६७ व १९६८ ही दोन वर्षे स्वतंत्र भारताच्या राजकारणातील क्रांतिकारक वर्षे होती. आपल्या राजकीय पद्धतीत एक प्रकारचा अननुभूत समतोल या वर्षात निर्माण झाला होता. केंद्रीय मंत्रिमंडळात कोणीही डोईजड नव्हते. इंदिरा गांधींच्या सत्तेवर मोरारजी व चव्हाण यांचे बंधन होते. कॉंग्रेस पार्टीची अमर्याद सत्ता व दोनतृतीयांश बहुमत तेव्हा संपुष्टात आले होते. अनेक

राज्यांत बिगर काँग्रेस मंत्रिमंडळे होती. केंद्र राज्य संबंधात एक नवीन प्रकारचा समतोल उत्पन्न झाला होता. आमच्या सहकार्याशिवाय घटनादुरुस्ती करणे काँग्रेसला अशक्य होते. काँग्रेस पक्ष संघटना व प्रशासन यामध्येही एक मजेदार समतोल होता. इंदिरा गांधी काँग्रेस सरकारच्या पंतप्रधान होत्या हे खरे, पण त्यांना काँग्रेस संघटनेचा शह कामराज यांच्यामुळे बसला होता. लोकसभेत विरोधी पक्ष देखील संख्येने व बुद्धिबळाने मजबूत होते. या संधिकाळात गृहमंत्रि-पदाची जबाबदारी सांभाळणे हे येरा गबाळ्याचे काम नव्हते. पण यशवंतरावांनी ती धुरा उत्तम रीतीने सांभाळली. हा काळ त्यांच्या मंत्रिपदाचा सुवर्णकाळ होता. त्या वर्षात झालेल्या निरनिराळ्या वादविवादांत यशवंतरावांचे व्यक्तिमत्त्व खूपच चमकले. आयाराम-गयाराम हा शब्दप्रयोग त्यांनीच लोकप्रिय केला होता. विरोधी पक्षाच्या भडिमाराला शांतपणे, उत्तेजित न होता ते उत्तर देत. अडचणीचे प्रश्न ते शिताफीने टाळीत.

पण १९६९ च्या काँग्रेस पक्षाच्या विभाजनानंतर सर्वच बदलले. यशवंत-रावांच्या जीवनाचा चौथा दुर्दैवी अध्याय सुरू झाला. एक प्रकारे त्यांच्या जीवनाला उतरती कळा लागली. त्याचे मुख्य कारण यशवंतरावांच्या व्यक्तिमत्त्वा-मध्ये काही लक्षणीय उणिवा होत्या. एक म्हणजे त्यांची अनिर्णयाची अवस्था. दुसरी गोष्ट म्हणजे त्यांचेजवळ राजकीय विरोधी पक्षनेत्यास आवश्यक असलेली प्रदीर्घ वनवासात जाण्याची तयारी व आक्रमकता नव्हती. यशवंतरावांचे एकूण व्यक्तिमत्त्व सौम्य होते. वनवासातील परिश्रम व कठोर निर्णय घेण्याची तयारी या गोष्टी त्यांना मानवणाऱ्या नव्हत्या. तिसरी उणीव म्हणजे राजकीय साहस करण्याची त्यांची अक्षमता.

केंद्रीय संसदीय बोर्डाच्या बैठकीत १९६९ साली यशवंतरावांनी सिंडिकेट व मोरारजीभाई यांची बाजू घेऊन संजीव रेड्डींच्या उमेदवारीला पाठिंबा दिला. त्यामुळे इंदिराजींची इतराजी त्यांच्यावर झाली. पंतप्रधानापदासाठी १९६६ साली त्यांनी मोरारजीभाईंना पाठिंबा न देता इंदिराबाईंना आपला पाठिंबा दिला होता. पण तीन वर्षांनंतर राष्ट्रपतींच्या निवडणुकीत त्यांनी आपला पवित्रा बदलला. कारण श्रीमती इंदिरा गांधींच्या बरोबर दोन हात करायची त्यांची तयारी नव्हती.

बँकांचे राष्ट्रीयीकरण, संस्थानिकांचे तनखे रद्द करणे, गिरींचा राष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीतील विजय इत्यादी नेत्रदीपक घटनांमुळे इंदिरा गांधींची लोकप्रियता

अतोनात वाढली आहे, हे निदर्शनाला येताच यशवंतरावांनी परत आपले धोरण बदलले.

इंदिरा गांधींच्या बरोबर त्यांनी समझोता केला. त्यामुळे सिंडिकेटचे पुढारी त्यांच्यावर नाराज तर झालेच, शिवाय इंदिरा गांधींच्या गोटातही या धरसोडीच्या धोरणामुळे त्यांचे वजन खूप कमी झाले. गृहमंत्री म्हणून त्यांच्या अधिकाराला प्रथम कात्री लावण्यात आली, नंतर त्यांची गृहमंत्रिपदावरून उचलबांगडी करून त्यांना अर्थखाते देण्यात आले. अर्थमंत्री म्हणूनही त्यांचे अधिकार मर्यादित होते. आणीबाणीच्या काळात आम्ही तुरुंगात असताना ते परराष्ट्रमंत्री म्हणून काम पाहात होते. पण यशवंतरावांचा लोकसभेतील "परफॉर्मन्स" आता पूर्वी-सारखा राहिलेला नव्हता. यशवंतराव निस्तेज होऊ लागलेल्या ताऱ्याप्रमाणे वाटत असत. इंदिरा काँग्रेसचा १९७७ च्या निवडणुकीत पराभव झाला व यशवंतराव विरोधी पक्षनेते बनले. ही नवी भूमिका त्यांना मानवणारी नव्हती. विरोधी पक्ष या नात्याने लक्षात राहण्यासारख्या त्यांनी दोन गोष्टी केल्या आणि या दोन्ही कृत्यांमुळे ते व आम्ही दोघेही संकटात सापडलो. राष्ट्रपतींच्या अभि-भाषणावर ते बोलत असताना आणीबाणीबद्दल मी त्यांना थोडेसे डिवचले. तेव्हा त्यांच्या मुखातून इमर्जन्सी वॉज ॲन अबरेशन ( अपकृती ) असे प्रसिद्ध उद्गार बाहेर पडले. त्यामुळे इंदिरा गांधी यांच्याबरोबरचे त्यांचे संबंध बिघडले. विरोधी पक्षाचे नेते या नात्याने त्यांचे दुसरे कृत्य म्हणजे त्यांनी जुलै १९७९ मध्ये लोकसभेत मांडलेला अविश्वासाचा ठराव. आमच्या पक्षाची स्थिती नाजूक आहे, तुम्ही हा ठराव मांडू नका. "टाईम बॉम्ब" आहे असे मी त्यांना आदल्या दिवशी टेलिफोनवर परोपरीने विनवले. पण ते म्हणाले, "नाही, विरोधी पक्षनेता म्हणून माझे कर्तव्य मला पुरे करायचे आहे." सुरुवातीला इंदिरा गांधी देखील या ठरावाच्या बाजूला नव्हत्या. जनता पक्षाला मजबूत करण्यासाठी अविश्वासाच्या ठरावाचे हे नाटक यशवंतराव करीत आहेत, असे त्यांचे मत होते. पण सत्य परिस्थिती काय आहे हे मला माहीत होते. त्यामुळे मोठा अनर्थ ओढवला. यशवंतराव चरणसिंगांच्या हंगामी मंत्रिमंडळात उपपंतप्रधान व गृहमंत्री होते. पण ही कारकीर्द कोणालाच सुखाची झाली नाही. विरोधी पक्षाच्या तिकिटावर यशवंतराव नव्या लोकसभेवर निवडून आले. पण दोन वर्षांच्या अनुभवामुळे यशवंतरावांनी विरोधी पक्षाचा धसका घेतला होता. त्यामुळे त्यांनी आपल्या

राजकीय जीवनाच्या अखेरीस " स्वगृही " परत येण्याची इच्छा केली. इंदिरा गांधींच्या हत्येनंतर यशवंतराव या दुनियेत एक महिना देखील राहिले नाहीत ही नियतीची लीला आहे.

यशवंतरावांच्या राजकीय अपयशाची आणखीही काही कारणे आहेत. एक म्हणजे यशवंतरावांच्या स्वभावातील उणिवांमुळे दिल्लीच्या आपल्या प्रदीर्घ वास्तव्यात त्यांनी भारताच्या विभिन्न प्रांतांत मित्र व अनुयायी निर्माण केले नाहीत. त्यांचे नेतृत्व महाराष्ट्रापुरतेच मर्यादित राहिले. त्याला राष्ट्रीय अधिष्ठान प्राप्त होऊ शकले नाही. ठरावीक मंडळींच्या सहवासात ते मोकळेपणाने बोलत, गप्पागोष्टी करीत. मात्र हातचे राखून, मोजूनमापून, जेवढ्यास तेवढेच बोलत. तसेच सत्तेच्या राजकारणात शिकारी कुत्र्याची, संधीचा वास येण्याची उपजत बुद्धी लागते व ती इंदिरा गांधींच्या तुलनेने कमी पडली. सर्वांत महत्त्वाची गोष्ट जो निर्भयपणा, निर्दयपणा लागतो त्यात यशवंतराव त्यांच्यावरील बौद्धिक संस्कारामुळे कमी पडले. या सर्व कारणांमुळे त्यांना खाली मान घालून ' स्वगृही ' परतावे लागले.

शिवाय दिल्लीचा राजकीय रंगमंच फारच मोठा आहे. त्याचा आटोप येण्यासच वेळ लागतो. अंगात गुण असून भागत नाही, लोकरंजनाची कलाही लोकशाहीत लागते. या सत्याची प्रचीती घेणारे उत्तम उदाहरण म्हणजे यशवंतरावांचे सत्ताकारणातील अपयश.

यशवंतरावांना संगीत, नाट्य व साहित्य यांत रस होता. त्यांचे व्यक्तिमत्त्व अनेकरंगी होते. त्यांचे आत्मचरित्र अपुरे राहिले याची खंत वाटते. त्याचा पुढील भाग मनाने राजकारणातून निवृत्त झाल्यानंतर जर त्यांनी लिहिला असता तर तो निश्चितच रंगतदार झाला असता, यात शंका नाही.

अशा बहुरंगी व्यक्तित्वाचा अस्त, अखेर हीच दु:खद घटना असते. त्यामुळेच यशवंतरावांचे जाणे मनाला चुटपुट लावते.

# भारताच्या राजकीय रंगमंचावरील चारुदत्त

**ना. बा. लेले**

भारतीय राजकीय रंगमंचावरील धीरोदात्त नायक श्री. यशवंतरावजी चव्हाण हे आधुनिक ' चारुदत्त ' होते. बव्हंशी त्याच्या समान होते, असे मूल्यांकन जर कोणी १९६२ ते १९८४ या कालखंडाचे सिंहावलोकन करताना करील तर ते विशेष वावगे ठरू नये. कारण ' मृच्छकटिक ' नाटक तल्लीन होऊन पाहणाऱ्या ' सर्व श्रोत्यांची सहानुभूती प्राप्त करून घेणाऱ्या ' या धीरोदात्त नायकाला ' यश:प्राप्ती मात्र कष्टसाध्य ' होत असल्याचे प्रसंग पाहून क्षणभर हवालदिल झालेल्या श्रोत्यांची चारुदत्ताविषयीची आपुलकी व आदर मात्र वृद्धिंगतच होत जातो. ' अयं वसंतसेनाघातकः चारुदत्तः वधस्तंभम् नीयते ', असे शब्द कानी पडल्यावर नाटक पाहणाऱ्या सामान्य जनांच्या भावना सहजपणे उचंबळून येऊन ' निष्पाप नायक ' नाहक बळी पडत असल्याची तीव्र सहानुभूतीची लाट रंगमंदिरातील सर्वच श्रोत्यांच्या मनाची पकड घेते. अल्पस्वल्प अंतराने वा फरकाने हाच भाव बहुतेक सर्व राजकीय निरीक्षकांच्या ठायी आधुनिक ' चारुदत्त ' श्री. चव्हाण यांच्या भारताच्या राजधानीतील सुमारे बावीस वर्षांच्या राजकीय जीवनाचे समालोचन करताना अगदी सहजपणे जागृत झाल्याविना राहात नाही. नायकाची ' कष्टसाध्य यशप्राप्ती ' पाहून शेवटी श्रोत्यांना हायसे वाटत असतानाच नायकाविषयीचा आदर द्विगुणित होत असल्याचा अनुभव आला तरी या आदराला प्रचंड ' सहानुभूतीची झालर ' असल्यागत वातावरण न कळत निर्माण होत जाते. श्री. यशवंतरावजींच्या दिल्लीतील कारकीर्दीचे पक्षातीत भूमिकेवरून समालोचन करतानाही हाच अनुभव उत्कटतेने आल्याविना राहात नाही !

१९६६ च्या जानेवारीत द्वितीय पंतप्रधान श्री. लालबहादूर शास्त्रीजींच्या अचानक निधनानंतर ' पंतप्रधान ' पद जेव्हा श्री. यशवंतराजींना हुलकावणी दाखवून इंदिराजींना प्राप्त झाले त्या वेळी अथवा १९६९ मधील राष्ट्रपती निवडणूक-प्रसंगी श्री. चव्हाणसमर्थित वा पुरस्कृत श्री. नीलम संजीव रेड्डी पराभूत होऊन

श्री. वेंकट वराह गिरी विजयी झाले त्या वेळी वर उल्लेख केलेलाच अनुभव सर्वांना आला. ' यश:प्राप्ती ' सकृद्दर्शनी इंदिराजींना लाभली तरी प्रचंड सहानुभूती व आदर मात्र यशवंतरावजींच्याच पदरी पडला. १९६६ मध्ये तत्कालीन राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यशवंतरावजींची गणना " अविवादास्पद व्यक्तिमत्त्व ' या श्रेणीत करीत असल्याचे ( नॉन कॉन्ट्राव्हर्सियल पर्सनॅलिटी ) सर्वश्रुत असल्याने बहुतेक सारे संसदसदस्य व पत्रकार यांच्या लेखी तेच पंतप्रधानपदी येणार अशी अटकळ असताना घडले मात्र अगदी वेगळे व अनपेक्षित ! १९६९ मधील राष्ट्रपति-निवडणूक निमित्ताने जो बनाव घटित झाला त्यामुळे श्री. रेड्डी पराभूत होऊन श्री. गिरींना विजयश्रीने वरिले तरी वरील दोन्ही महत्त्वपूर्ण ऐतिहासिक प्रसंगी यशवंतरावजींचे व्यक्तिमत्त्व व राजकीय महत्त्व सामान्यजनांची अपार सहानुभूती लाभल्याने वृद्धिंगतच झाल्याचा अनुभव राजधानीतील राजकीय निरीक्षकांना आला. अपयशाचा आरोप वा कलंक पदरी पडलेला असूनही धीरोदात्त नायकाचे संदर्भात सहानुभूतीच प्रकट होत राहिल्याचा अनुभव श्री. यशवंतरावजींना आधुनिक ' चारुदत्त ' श्रेणी प्राप्त करून देणारा असा नाही का ?

यशवंतरावजींच्या मनोरचनेत धीरोदात्तता ओतप्रोत भरलेली असल्याची प्रचीती ते संरक्षणमंत्रिपदी वा गृहमंत्रिपदी असताना अनेक प्रसंगी अनेकांना येऊन त्यांच्याविषयीच्या अपेक्षा दिल्ली दरबारात वाढतच गेल्या. भारत–चीन संघर्षसमयीची संरक्षणमंत्री कृष्ण मेनन यांची काळीकुट्ट कारकीर्द संपुष्टात येऊन यशवंतरावजी संरक्षणमंत्रिपदी आरूढ होण्याचे सुमारास ' हिंदुस्थान समाचार ' वृत्तसंस्थेचा वार्ताहर या नात्याने लेह विमानतळाचे आसमंतात थेट चुसूल वा डुंगटीपर्यंत सुमारे चौदा हजार फूट उंचीवर डोळ्यांत तेल घालून प्रहरी म्हणून सतत वावरणाऱ्या व प्रत्यक्ष संघर्षसमयी ' महार रेजिमेंट 'चे पाईक बनून ज्या जवानांनी अतुलनीय शौर्य प्रकट करून आक्रमक चिनी सेनेला चातुर्याने खडे चारले होते अशा मंडळींना जेव्हा सुमारे चार दिवस भेटलो होतो त्या वेळी अनेक सेनाधिकाऱ्यांनी मोठ्या अपेक्षेने व आशेने मला एकान्तात गाठून संरक्षण आघाडीवरील काही महत्त्वपूर्ण पैलूंच्या संदर्भात नव्या संरक्षणमंत्र्यांच्या कानी काही ' विशेष माहिती ' घालण्यासाठी निवेदने

केली. दिल्लीत परतल्यानंतर मनात विचार केला की यशवंतरावजींना भेटून हे सर्व सांगणे सोपे काम नाही. म्हणून सर्व निरोप लिहून काढावेत व सादर करावेत. परंतु व्यावहारिक अडचण अशी होती की यांपैकी बऱ्हंशी पैलू 'गोपनीय' सदरातील होते म्हणून शेवटी प्रत्यक्ष भेट घेऊन सांगणेच इष्ट असे ठरविले. एका सायंकाळी त्यानुसार आधी वेळ ठरवून यशवंतरावजींना भेटलो. भेटीअंती सुखद आश्चर्याचा धक्का अनुभवला. कारण सुमारे चाळीस मिनिटे माझे कथन चालू होते व ते सर्व नव्या संरक्षणमंत्र्याने आत्यंतिक आस्थेने व अधूनमधून काही पूरक प्रश्न विचारीत मोठ्या धैर्याने श्रवण केले! या प्रदीर्घ भेटीअंती त्यांना जेव्हा मी म्हटले की एवढा आपला वेळ न घेता सर्व लिहूनच सादर करणार होतो तेव्हा त्यांनी मलाच धीर देत आश्वासनपर सांगितले की, नाही; हे सारे आपण नीट स्मरणपूर्वक व नावनिशीवार तपशिलासह कथन केले तेच अधिक श्रेयस्कर झाले. शब्दांकित न करणेच उचित होते! पराभवानंतरच्या परिस्थितीची गंभीरता व त्या समयी आवश्यक असलेली सावधानताच त्यांच्या या धीरगंभीर व्यवहारातून प्रकट झाल्याचा पहिला अनुभव मला लाभला आणि त्यामुळेच त्यांच्या दिल्लीतील संपूर्ण वास्तव्यात आत्यंतिक आत्मीयता व विश्वासाने त्यांचेशी अगदी अनौपचारिकरीत्या आडपडदा न ठेवता 'संवाद' साधणे शक्य होत असे. राजकीयदृष्ट्या अवघड प्रसंगीही यामुळेच त्यांचा तोल जात नसे व 'सर्व विषयी सावधपण' अगदी न कळत प्रकट होत असे. या सदरातले अनेक अनुभव अनेकांना दिल्लीत लाभलेले असल्याने त्यांपैकी काही ठळक व वेचक प्रसंगांचाच उल्लेख करणे समयोचित ठरेल. ते केंद्रीय गृहमंत्रिपदी असताना श्रीशंकराचार्यांनी उपोषणास प्रारंभ करून नाजूक अवस्था निर्माण केली असतानाही यशवंतरावजींनी संसदेत व संसदेबाहेर वागण्याबोलण्यात जी सावधानता प्रदर्शित केली होती ती अशीच नमूद करण्याजोगी आहे. तत्कालीन द्वारकापीठाचे श्रीशंकराचार्य यशवंतरावजींच्या जुन्या (द्वैभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्री असल्यापासूनचे) व घनिष्ठ परिचयाचे होते. त्यांच्यामार्फत उपोषण करणाऱ्या पुरीच्या श्रीशंकराचार्यांशी संधान बांधून उपोषणसमाधी साधावी की काय, अशी व्यूहरचना गृहमंत्री या नात्याने करण्याचा विचार चालू असताना यशवंतरावजींच्या आत्यंतिक विश्वासातले व ज्यांना ते अगदी धाकट्या भावासमान वागवीत असत असे निजी सचिव श्री. श्रीपाद डोंगरे, द्वारकापीठ

श्रीशंकराचार्यांना नित्याच्या पद्धतीनुसार अगदी आदरपूर्वक भेटून आले होते. असे चांगले संबंध व अनुकूल वातावरण असूनही प्रत्यक्ष व्यूहरचनेच्या कार्यवाहीची वेळ येऊन ठेपली तेव्हा यशवंतरावजींनी आपला मनोदय मजजवळ प्रकट केला की ' द्वारकापीठ श्रीशंकराचार्यांशी संपर्क करणेचे काम श्री. डोंगरे यांवर सोपवून चालणार नाही. श्री. डोंगरे यांनी आपल्या चांगल्या स्वभावाने व व्यव-हाराने द्वारकापीठाशी नित्य संपर्क ठेवला असला तरी त्यांचा हा चांगुलपणा राजकीय वाटाघाटींसाठी वा बोलणी करण्यासाठी उपयोगी नाही. कारण अखेरीस हे राजकारण आहे ! स्वतःवरचे दायित्व दुसऱ्यावर न ढकलण्याचाच उदात्त गुण यातून प्रकर्षाने जाणवत नाही का ? तिसरा प्रसंगही असाच बोलका आहे. प्रथम पंतप्रधान श्री. जवाहरलालजींच्या निधनानंतर श्री. लालबहादूर शास्त्रीजींचा द्वितीय पंतप्रधान म्हणून शपथविधी ज्या दिवशी झाला त्याच रात्री यशवंत-रावजींना जेव्हा त्यांची प्रतिक्रिया मी विचारली तेव्हा तात्काळ प्रसन्नपणे त्यांनी सांगितले की ' भारताचे भवितव्य शास्त्रीजींच्या हाती सुरक्षित आहे ' ( The future of country is safe in his hands ). अर्थात ही प्रतिक्रिया प्रका-शनार्थ नव्हल्याने मी त्या उद्‌गारांचे स्मरण त्यांना श्रीमती इंदिराजी पंतप्रधान झाल्या त्या सायंकाळी देऊन पुन्हा यशवंतरावजींची प्रतिक्रिया विचारली. राजकीय घडामोडींचा वेध घेऊन परिपक्वतेने प्रतिक्रिया व्यक्त करतानाही ते ' सावध ' असल्याने त्या वेळी मजजवळ म्हणाले की ' आजच प्रतिक्रिया नको. काही काळ थांबणेच इष्ट ! ' नंतरचा सर्व घटनाक्रम ध्यानी घेता श्री. यशवंतरावजींचे ' सावधपण ' किती सार्थ होते याचाच प्रत्यय येत नाही का ?

नेत्यावरील निष्ठा ही श्री. यशवंतरावजींच्या लेखी ' नेहरूनिष्ठा ' या सदरातच सदा जमा असे. संरक्षणमंत्रिपदी निवड होत असताना ही निष्ठा हा त्यांचा गुण ( प्लस पॉईंट ) स्वाभाविकच ठरला. परंतु लालबहादुरजींच्या अचानक निधनानंतर हा गुणच दोष ठरून त्यांच्या भवितव्याला आगळी कलाटणी देणारा ठरला. १९६६ च्या जानेवारीत तृतीय पंतप्रधानाची निवड करण्याची धुमश्चक्री चालू असताना श्री. यशवंतरावजींना त्यांचा ' चारुदत्ती ' स्वभावच नडला, असे आज निःसंदिग्ध शब्दांत म्हणता येईल. आजपर्यंत हा घटनाक्रम प्रकाशित न होऊ देणे हा पण त्यांच्या चांगुलपणाचाच एक पैलू होता. घटनाक्रम थोडक्यात असा होता की, चार मुख्य मंत्री ( सर्व काँग्रेसी ) श्री. यशवंतरावजींच्या निवास-

स्थानी त्या वेळचे महाराष्ट्र मुख्यमंत्री श्री. वसंतराव नाईक यांच्या नेतृत्वाखाली घट्टपणे बसून एकच मागणी आग्रहपूर्वक करीत होते की आपणच पंतप्रधान-पदाच्या ( संसदीय काँग्रेस पक्षाच्या नेत्याच्या ) निवडणुकीसाठी उभे राहणे इष्ट. कारण मोरारजीभाई या पदासाठी उभे राहणारच व त्यांना आपल्याविना अन्य कोणी समर्थपणे टक्कर देऊ शकणार नाही. श्री. वसंतराव नाईक यांनी त्यांचे जे पूर्वीचे ( सी. पी. अँड बेरार राज्यातील ) संबंध पं. द्वारकाप्रसाद मिश्रा यांच्याशी होते ते पणाला लावून त्यांनाही यशवंतरावजींसाठी अनुकूल करून घेतले होते, यामुळे ' एक रेसकोर्स रोड ' या निवासस्थानी काही तास जणू असे वातावरण निर्माण झाले की, आत्ता पंतप्रधानपद निर्विवादपणे यशवंतरावजींकडेच येणार. कारण कोणीही काँग्रेसी वरिष्ठ पुढारी त्या क्षणापर्यंत श्रीमती इंदिराजींच्या नावाचा वा उमेदवारीचा विचारही करीत नव्हते. नेमक्या अशा प्रसंगी वर उल्लेख केलेला गुण ( नेहरूनिष्ठा ) उफाळून येऊन मोठ्या थाटात श्री. यशवंतरावजी नेहरूकन्या श्रीमती इंदिराजींना भेटून त्यांचा पाठिंबा मिळविण्यासाठी त्यांच्या निवासस्थानी गेले आणि अवघ्या काही मिनिटांत तेथून परत येऊन तिष्ठत बसलेल्या चार मुख्य मंत्र्यांना सांगते झाले की, श्रीमती इंदिराजी या पदासाठी उमेदवार असून त्यांना माझा पाठिंबा राहणार आहे ! काही मिनिटांत ही कलाटणी का व कशी मिळाली ? याची चिकित्सा करताना दोष परिस्थितीकडे का व्यक्तीकडे, हे सांगणे वा याची चिरफाड करणे या घटकेला सोपे असले तरी त्या काही मिनिटांत जे घडले ते मात्र जणू श्री. यशवंतरावजींच्या जीवनातील ( त्यापूर्वी घडलेल्या राजकीय जीवनातील अपघातात ) अपघातात भर पडल्या-गतच होते ! त्यांनी श्रीमती इंदिराजींची भेट होताच त्यांना वस्तुस्थिती सांगून नम्रपणे ( नेहरूकन्या म्हणून ) निवेदन केले की, चार मुख्य मंत्र्यांच्या व अन्य सहकारी मित्रांच्या आग्रहानुसार या पदाच्या निवडणुकीसाठी मी उमेदवारी घोषित करण्यापूर्वी आपणांस सांगण्यास आलो आहे. यावर श्रीमती इंदिराजींनी विचारणा केली की मला हे सांगण्याचे कारण काय ? त्यावर श्री. यशवंतरावजींनी त्यांना सांगितले की, एकतर ही घोषणा करण्यापूर्वी आपले समर्थन प्राप्त व्हावे व दुसरे म्हणजे आपण स्वत: उमेदवार नसल्यानेच मी उमेदवार आहे. हे उत्तर ऐकून क्षणार्धातच त्या म्हणाल्या की, तुम्हा मंडळींची इच्छा असेल तर मी उमेदवार आहे ! अर्थात यावर ' नेहरूनिष्ठ ' यशवंतरावजींजवळ काहीच उत्तर नसल्याने

त्याच पावली ते परतले व निवासस्थानी बसलेल्या मंडळींना मोजक्या शब्दात वरील संवाद सांगून मोकळे झाले ? हा एकूण घटनाक्रम वेगवेगळ्या संदर्भात यशवंतरावजींसमोर स्मरण्याचा, त्याला उजाळा देण्याचा, उपक्रम मी करून पाहिला होता. परंतु प्रत्येक वेळी त्यांची याला प्रकाशित करण्याची अनिच्छा असल्यानेच आजपर्यंत कोठेही याचा उल्लेख केलेला नाही. कारण त्यांची अनिच्छा ही चांगुलपणाच्याच पोटी उद्भवलेली होती. आज मात्र त्यांच्या जीवितकार्याचे मूल्यमापन करण्यासाठीच हे सारे अनुभव उपयुक्त ठरावेत म्हणून येथे शब्दांकित करीत आहे कारण भावी पिढीला व एकूण ऐतिहासिक घटनाक्रमाचा अन्वयार्थ लावण्यास त्याचा उपयोग होऊ शकेल.

राजकीय रंगमंचावरील या 'चारुदत्त' व्यक्तिमत्त्वाच्या संदर्भात आणखी एका ठळक प्रसंगाची नोंद करणे उचित ठरेल. 'जनता' सरकारच्या विरुद्ध म्हणजेच मोरारजी मंत्रिमंडळाच्या विरुद्ध अविश्वास ठराव मांडण्याचा मान इतिहासाने जणू विरोधी पक्ष पुढारी या नात्याने श्री. यशवंतरावजींसाठीच राखून ठेवला होता. (ऐतिहासिक दृष्ट्या या राजकीय घटनाक्रमाला असाधारण महत्त्व आहे) कारण बरोबर या अविश्वास ठरावाच्या सुमारे वीस वर्षांपूर्वी मुंबईत (द्वैभाषिक राज्यात) श्री. मोरारजींनीच मुख्यमंत्रिपदाच्या स्पर्धेतून स्वतःचे अंग काढून घेऊन ऐनवेळी यशवंतरावजींचे नाव या पदासाठी सुचवून त्यांचेवरील आपला 'विश्वास' व्यक्त करून 'हिरे विरुद्ध चव्हाण' लढतीत श्री. यशवंतरावजींचे पारडे जड केले होते. शिवाय, हा अविश्वास ठराव अन्य एका परीने ऐतिहासिक ठरला. कारण तो मांडताना खुद्द श्री. यशवंतरावजींनाही पुसटशीसुद्धा कल्पना नव्हती (हा त्यांचा स्वतःचाच अभिप्राय आहे) की यामुळे 'मोरारजी मंत्रिमंडळ' गडगडणार आहे! परंतु त्यानंतर जे घडले ते अभूतपूर्वच होते. कारण ह्या अविश्वासाच्या ठरावावर मतदान न होताच ते मंत्रिमंडळ (जनता पक्ष फुटल्यामुळे) गडगडले! अभूतपूर्व म्हणण्याचे अन्य कारण असे आहे की प्रत्यक्ष हे मोरारजी मंत्रिमंडळ गडगडण्यापूर्वी एक अखेरचा प्रयत्न म्हणून खुद्द पंतप्रधान मोरारजीभाईंनीच श्री. यशवंतरावजींना 'खाजगी' निरोप धाडला की 'आपण हातमिळवणी करू शकू तर मंत्रिमंडळ तर टिकेलच पण इतिहासालाही आगळी कलाटणी लाभेल'! हा निरोप जणू पुरेसा आश्वासक नव्हता असे वाटून मोरारजीभाईंनी त्यांच्या मंत्रिमंडळातील सहकारी व परराष्ट्रमंत्री श्री. अटलबिहारी

वाजपेयी यांस श्री. चव्हाणांच्या भेटीस धाडले, या भेटीत श्री. अटलबिहारीजींनी स्वच्छ शब्दात श्री. चव्हाण यांस आश्वासन दिले की आपण जर श्री. पंतप्रधान मोरारजी देसाई यांचेशी सहकार्य करून, व उपपंतप्रधानपद स्वीकारून, मंत्रिमंडळाला गडगडण्यापासून वाचविण्यास सिद्ध असाल तर आम्ही (म्हणजेच 'जनता' पक्षातील जनसंघीय खासदार सुमारे नव्वद) मंत्रिमंडळात सामील न होता आपणांस पूर्ण पाठिंबा देऊ ! 'हा अखेरचा प्रयत्नही विफल ठरून' ते मंत्रिमंडळ गडगडलेच ! अशा प्रकारे इतिहासाला कलाटणी देण्याची संधी प्राप्त झाली असताना प्रांजळपणी व प्रामाणिकपणे चव्हाण यांनी एकच उत्तर दिले की 'माझे व मोरारजींचे वैचारिकदृष्ट्या कसे जमले असते ?' ( We are not on the same wavelength ) हा सारा ताजा इतिहास असल्याने आधुनिक भांबावलेल्या 'चारुदत्त' ने श्री. मोरारजींना जरी नकार दिला तरी नंतर श्री. चरणसिंगांना 'होकार' देऊन आपल्या स्वतःचे भवितव्य वा विधिलिखित आपल्याच चांगुलपणापायी वेगळ्या दिशेने भरकटू दिले ! आणि तरीसुद्धा सर्वांची सहानुभूती श्री. चव्हाण प्राप्त करू शकले ती केवळ वैयक्तिक चांगल्या व्यवहारामुळे. एकूण काय तर या सहानुभूतीलाही कारुण्याची झालर लागलेली होतीच !

# सत्तेवर नसलो तर काय करीन ?

( यशवंतरावांशी झालेल्या अप्रकाशित गप्पा-चर्चा )

**रामभाऊ जोशी**

" सत्ता ही अशी वस्तू आहे की, ती केंद्रित बनते. सत्ताधीशाकडून अधिकाधिक सत्ता ताब्यात घेण्याचा प्रयत्न सुरू होतो. सत्ताधीशाचा सारा नूरच बदलून जातो. द्वेष, स्पर्धा, जातीचे, मोठेपणाचे संस्कार, हितसंबंध हे सर्व सत्ताधीशाच्या ठिकाणी जमा होत राहतात. त्यातून काही अपुरेपणा निर्माण होतो. वस्तुतः सत्तेची जबाबदारी सांभाळत असताना काही पथ्यं ही सांभाळावीच लागतात. ही पथ्यं सांभाळणं न सांभाळणं हे, तो सत्ताधारी जेव्हा सत्तेच्या ठिकाणी नव्हता तेव्हा त्याच्या प्रेरणा कोणत्या होत्या, मूल्यं कोणती होती, कोणत्या उद्देशानं त्यानं सत्तेचा स्वीकार केलेला आहे यावर बरंचसं काही अवलंबून असतं. "

दिल्लीत १ रेसकोर्स रोड, या यशवंतरावांच्या निवासस्थानी गप्पा सुरू होत्या. अगदी मोकळेपणानं. १९७५ साल, अन् फेब्रुवारी महिना असावा. मोकळेपणानं गप्पा सुरू होत्या. १९४२ ची स्वातंत्र्य चळवळ, भूमिगत अवस्थेत राहून करावं लागलेलं कार्य, १९४६ ची सार्वत्रिक निवडणूक, पार्लमेंटरी सेक्रेटरी-पदाच्या कामातील अनुभव आणि १९५२ च्या निवडणुकीनंतर मंत्रिपदाचा लाभ मिळून सत्तेमध्ये प्रत्यक्ष पदार्पण...असा गप्पांचा ओघ सुरू होता.

पार्लमेंटरी सेक्रेटरीपदापासून तो मुख्यमंत्रिपदाच्या जबाबदारीपर्यंत आणि नंतर दिल्लीत एकाहून एक जबाबदारीची मंत्रिपदे स्वीकारल्यानंतर केलेले निर्णय, मूळ प्रेरणांची, मूल्यांची जपणूक, कामाची निश्चित केलेली दिशा याविषयी यशवंतराव खुल्या मनानं सांगत होते. जणू काही मन मोकळं करण्याचा ' मूड ' होता.

यशवंतराव तीस वर्षांहून अधिक काळ सत्तेत राहिले. महाराष्ट्रात असताना सर्वश्रेष्ठ सत्तास्थान त्यांनी भूषविले. केंद्रामध्ये ज्येष्ठ-श्रेष्ठ सत्तास्थानांपर्यंतची मजल गाठली. अनेकविध भल्याबुऱ्या अनुभवांनी त्यांची शिदोरी काठोकाठ

भरलेली. नाना देशींच्या नाना लोकांची संगत लाभलेली. स्वतः प्रत्युत्पन्नमती आणि पराकाष्ठेचे संयमी ! ते मन मोकळं करीत आहेत असं दिसलं तेव्हा सावरून बसणं क्रमप्राप्तच ठरलं. ते मोकळेपणानं बोलण्याची आणि मोकळेपणानं ऐकायला मिळण्याची अशी संधी मिळणं विरळा ! प्रारंभीच्या जुजबी बोलण्यातून गप्पा मूलभूत गोष्टींकडे झुकत चालल्या त्याच वेळी खरं म्हटलं तर मी स्वतःला सावरलं होतं. त्यांचं बोलणं वेगानं होत होतं. टाचण करून घेणंही अवघड होतं. अन् समोरचा कोणी टाचणं घेतोय असं दिसलं तर यशवंतरावांचं बोलणं सूत्ररूप धारण करीत असे किंवा सांधा बदलून भलत्याच रुळावरून प्रवास सुरू होत असे. याचा अनुभव माझ्या संग्रही त्यापूर्वी जमा झालेला होता. भल्या-भल्यांशी गप्पा करताना, त्या वेळी यशवंतरावांच्या सन्निध असण्याची संधी वर्षानुवर्षे मिळत राहिलेली असल्यानं त्यांच्या लकबी परिचयाच्या होत्या.

तरीपण त्या दिवशी एक धाडस करायचं ठरवलं. यशवंतरावांच्या समोरच, त्यांच्या चहाच्या मेजावर टेपरेकॉर्डर होता. मी तिथं पोहोचलो तेव्हा ते एक अप्रतिम सुरेल ठुमरी ऐकण्याच्या स्वानंदात होते. ठुमरीची अखेरी झाली, वेणुताईंचं चहाचं दाक्षिण्य पूर्ण झालं...त्या दिवशी यशवंतराव विशेष प्रसन्न वाटले. मग तो संगीताचा परिणाम असो किंवा मनावर ओझं यावं असं त्या दिवशी काही घडलेलं नसो, प्रसन्न दिसले एवढं खरं !

प्रसन्नपणानंच मग गप्पा सुरू झाल्या. गप्पांचा ओघ स्वातंत्र्य चळवळीकडे, विशेषतः बेचाळीसच्या चळवळीकडे वळला तेव्हा कायम लक्षात राहाव्यात अशा काही घटनांची हकिगत त्यांनी सांगितली. सातारा जिल्ह्यातील बेचाळीसच्या चळ-वळीचा उठाव सामान्य थरातील माणसांच्या सहकार्यानं प्रामुख्यानं झाला आणि तो दीर्घकाळपर्यंत टिकून राहिला याचं यशवंतरावांना समाधान होतं. चळवळीला उठाव यायचा तर मोठं मनुष्यबळ जतन करावं लागतं. माणसं मिळवणं आणि विश्वासानं टिकवणं हे पथ्य ज्याला पाळता आलं तोच चळवळीचं नेतृत्व करू शकतो, चळवळीला जोर प्राप्त करून देऊ शकतो, सातत्य टिकवू शकतो !

बेचाळीसची चळवळ ही स्वातंत्र्याची " करेंगे या मरेंगे " अशी चळवळ असली तरीही परक्या इंग्रज सरकारची इतराजी होऊ नये म्हणून, रावसाहेब, रावबहादूर, सावकार, वतनदार, श्रीमंत शेतकरी यांचा चळवळ्यांना सुप्त विरोध होताच. चळवळ नेटानं पुढं न्यायची आणि ईप्सित साध्य करायचं तर कुणी

विरोधी असतील तर त्यांना प्रेमानं जिंकावं लागतं. आपल्या काही चुकांमुळे विरोध निर्माण होत आहे काय, आणि तसा तो होत असेल तर, चूक सुधारून विरोध नाहीसा होऊ शकेल काय, निदान तो पातळ करता येईल का, याकडेही लक्ष ठेवणं अवश्य असतं हे दुसरं सूत्र !

स्वातंत्र्याची चळवळ आणि त्याच पायवाटेनं वाटचाल करीत यशवंतराव सत्तेत पोहोचले. मोठ्या शक्तिमान घराण्यातून, घरातून किंवा राजकारणाची देदीप्यमान परंपरा असलेल्या कुटुंबातून सत्तेत सहजगत्या पोहोचलेली ही असामी नव्हे. "लोकांच्या साहाय्यानं सत्तेत पोहोचलो आणि कामातल्या अनुभवाच्या शिदोरीवर सत्तेत टिकलो, विशेषतः दिल्लीतल्या सत्तेवर टिकलो. आयुष्यात मनुष्याला अनुभव हाच मोठा गुरू असतो ".... यशवंतरावांनी वाक्य पूर्ण केलं आणि समोर भिंतीकडं एकटक पाहात राहिले. चेहऱ्यावर गांभीर्य साठलं.

पण एक क्षणभरच ! त्यांनी माझ्याकडं पाहिलं. तुम्हाला काय म्हणायचंय, असंच जणू त्यांची नजर मला विचारीत असल्याचं भासलं. चर्चा पुढं न्या असंच त्यांना सुचवायचं असावं. टेपरेकॉर्डरवरील ठुमरीची ध्वनिफीत बदलून मी नवी ठेवली होती आणि बोललेलं सारं मुद्रित होत आहे याकडं त्यांचं लक्ष होतं. एरवी 'सावध' असलेले यशवंतराव तरीही गप्पा करीत होते – अगदी मोकळेपणानं ! गप्पांचा टप्पा आता मुख्यमंत्रिपदापर्यन्त पोहोचला.

"मुख्यमंत्री झालो तो विरोधातूनच, वादातून झालो. मुख्यमंत्री कुणी व्हायचं याचा कॉंग्रेसपक्षातच वाद होता. पक्षांतर्गत झटापटीतून मुख्यमंत्रिपदासाठी माझी निवड झाली हे खरं परंतु त्याचा परिणाम होण्याची शक्यता होती. भाऊसाहेब हिरे सरकारात नव्हते. नाराज होते. हे सर्व का घडलं, कशामुळं घडलं ते तुम्हाला आता सांगत नाही. या साऱ्याबद्दल मलाच केव्हा तरी सविस्तर 'इन् टोटॅलिटी' लिहावं लागेल. ते मी लिहिणार आहे. एक गोष्ट खरी की, मला मुख्यमंत्री बनवा, आशीर्वाद द्या किंवा मुख्यमंत्री होऊ द्या असं विचारण्यासाठी आपण दिल्लीला गेलो नाही किंवा दिल्लीतील कुणाच्या आशीर्वादाचीही अपेक्षा केली नाही. त्या काळात तशी वहिवाटही नव्हती. मुंबई राज्याच्या पातळीवरच निर्णय झाले." पथ्यं कोणती पाळली हे ते सांगत होते.

"मुख्यमंत्रिपद स्वीकारताच असं लक्षात आलं की सत्ता मिळणं सोपं पण टिकणं अवघड ! विशेषतः कारस्थानं न करता सत्ता टिकणं आणि टिकवणं

अधिक अवघड. राजकारणात वाद हे अपरिहार्य असतात. सत्तेतील प्रमुख व्यक्ती वादग्रस्त ठरतेच. पण त्या वेळी त्यांच्या अंगच्या गुणांची कसोटी लागून जाते. परंतु सत्तेत येण्यापूर्वी, कार्यकर्ता म्हणून, स्वातंत्र्य चळवळीत, सातारा जिल्ह्याच्या ग्रामीण भागातला म्होरक्या म्हणून काम करत असताना जे अनुभव जमा झाले, ज्या कसोटीतून जावं लागलं ते अनुभव माझा त्या वेळी आधार ठरला. मुख्यमंत्रिपद स्वीकारताच ज्यांचा त्यासाठी किंवा अन्य कारणांसाठी विरोध होता त्या लोकांना जवळ करण्यावर त्यामुळेच मी लक्ष केंद्रित करू शकलो. विचारांची देवाण-घेवाण खुलेपणानं करीत राहिल्यामुळे स्वातंत्र्याची चळवळ, निदान माझ्या जिल्ह्यापुरती तरी मी पुढं नेऊ शकलो. सत्तेमध्ये आल्यानंतरही तेच पथ्य पाळलं. सत्तेत स्थिर व्हायचं आणि सत्तेचा वापर सामाजिक स्वास्थ्यासाठी करायचा तर, सर्व पातळीवर विचारांची देवाण-घेवाण खुलेपणानं करता येईल असं वातावरण असावं लागतं. ते वातावरण निर्माण करण्याकडे कटाक्षानं लक्ष दिलं. राज्य रागाने चालविता येत नाही. रागाचे काही परिणाम होऊ नयेत म्हणून पराकाष्ठा केली. राजकारण कोणत्या पद्धतीने, विचाराने चालवावे हा मतभेदाचा प्रश्न होता. हा प्रश्न काँग्रेस पक्षामध्ये त्यापूर्वी म्हणजे संयुक्त महाराष्ट्राची चळवळ सुरू होती त्याच वेळी निर्माण झाला होता. चळवळ कोणत्या पद्धतीनं चालवावी हा प्रश्न होता. त्याविषयी मतभेद होते.''

''महाराष्ट्रातला, मुंबईतल्या या अनुभवाचा लाभ दिल्लीत काम करतानाही झाला. दिल्लीत वाद निर्माण झाले, मतभेद निर्माण झाले. राजकारणात काम करताना हे घडतेच. राजकारणातल्या माणसाला वादाच्या बाहेर राहणे अवघड असते. परंतु वादळातसुद्धा मन शांत ठेवण्याचा प्रयत्न केला. शांत राहिलो याच कारण आहे.

ते असं आहे की, सत्तेत राहताना मनात कुणाबद्दल शत्रुत्व ठेवायचं नाही, निर्णय करताना कसलाही पूर्वग्रह ठेवून निर्णय करायचा नाही हे स्वत:ला शिकवण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न केला. माझे काही निर्णय कदाचित चुकले असतील परंतु एखादा निर्णय केल्याबद्दल मला कधी पश्चात्ताप झाला नाही. महत्त्वाचा निर्णय करण्यामागे काही कारणेही असतातच. परंतु वैयक्तिक कारणा-साठी निर्णय करण्यापासून दूर राहिल्यानं कधी सटपटलो नाही.

मुख्यमंत्री असताना किंवा दिल्लीत सत्तेमध्ये काम करीत असतानाही मी जो विचार जपला तो असा की लोक जवळ येण्यासाठी आतुर असतात त्यांना

आपण संधी देतो का ? रोज सकाळी वृत्तपत्र वाचताना आज महत्त्वाचं काय आहे किंवा आपल्या एखाद्या निर्णयाची प्रतिक्रिया कोणती उमटली आहे याकडे लक्ष ठेवावंच लागतं. प्रतिक्रियांसंबंधी मनाला सवय लावून घेतली ती अशी की, एखाद्या निर्णयावर टीकाटिप्पणी होणं वेगळं आणि त्यावर एकांगीपणाचा शिक्का मारला जाणं वेगळं. मनात शत्रुत्व ठेवून किंवा पूर्वग्रह राखून निर्णय केला तर तो एकांगी होण्याची शक्यता अधिक. असं काही होऊ द्यायचं नाही हे स्वतःला शिकवायचा, सत्तेत नसल्यापासूनचा माझा जाणीवपूर्वक प्रयत्न होता. त्यामुळे प्रतिक्रियांसंबंधात कधी धास्ती वाटली नाही.

त्याचबरोबर सत्ता स्वीकारण्यापूर्वी, स्वातंत्र्य कशासाठी, याबाबतच्या आपल्या जुन्या प्रेरणा काय होत्या, त्या ध्येय-धोरणाची कसोटी राहते की नाही या गोष्टी सातत्यानं समोर असल्यामुळे लहान माणसासाठी, सामान्य माणसांसाठी काही केलं का ? काम करताना, निर्णय करताना या प्रश्नाकडं दुर्लक्ष करून केलं का ? जातीच्या प्रश्नावर न्याय कुणाला नाकारतोय का, असं घडू नये याची काळजी घेतोय का ? यासंबंधीच्या जुन्या प्रेरणा, मूल्यं समोर ठेवूनच निर्णय करीत राहिलो. स्वतःशी प्रतारणा केली नाही. मन शांत राहिलं याचं मूळ कारण हे आहे.

आता ही पथ्यं पाळण्यात किंवा सत्तेत राहिल्यानंतर जी पथ्यं पाळायची असतात त्यामध्ये किती यशस्वी झालो असं कुणी मला विचारलं तर मी म्हणेन, याचा निर्वाळा लोकांनी द्यायचा आहे. स्वतः स्वतःबद्दलचं जजमेंट करू नये. स्वतः बोलणंही बरोबर नाही. इतरांनी निर्णय करावा. मला माझ्या मर्यादा माहिती आहेत. चुका माहिती आहेत.

एक गोष्ट मात्र खरी की, माणसं मिळवणं, टिकवणं हा स्वभाव बनून गेला. मन मोकळं ठेवायचा प्रयत्न करायचा, कुणाबद्दल विरोधी भावना ठेवायची नाही. अनेकांनी विविध कारणांसाठी विरोध केला, परंतु त्या प्रत्येक वेळी या माणसाचा विरोध आपल्याला कमी करता येणार नाही का, त्याला जिंकता येणार नाही का, आपलंच काही चुकलं असलं पाहिजे, त्यामुळं समोरचा माणूस विरोध करायला उभा ठाकला असावा, आपल्या स्वतःमधे सुधारणा करता येणार नाही का असं आत्मसंशोधन करण्याची मनाला सवय जडून गेली.

सत्ता आणि सत्तेत पाळावयाची पथ्ये याबद्दल आपण बोलत आहोत परंतु

अखेरीस, सत्तेमध्ये येणारी माणसं, त्यांच्या प्रेरणा, सामाजिक मूल्यांची जाण, लोकशाहीच्या प्रेरणा, सामाजिक परिवर्तनाची खरीखुरी तळमळ यावर हे सारं पथ्य पाळणं किंवा त्यांना फाटा दिला जाणं हे अवलंबून आहे.

महाराष्ट्रात असताना पंचायती राज्य, जिल्हा परिषदा स्थापन करण्याचा, सत्तेच्या विकेंद्रीकरणाचा निर्णय केला. शिक्षणप्रसाराचा निर्णय केला. सहकारी चळवळ वृद्धिंगत होऊन समाजाच्या सर्व थरांत, सामान्य जनांपर्यंत, दलितांपर्यंत अस्पृश्यांपर्यंत तिची पाळंमुळं पोहोचावीत आणि सर्व थरांना आर्थिक लोकशाहीचा लाभ मिळावा यासाठी काही निर्णय केले.

विकासाच्या शासनाचं काम जनतेच्या जवळ जाऊन केल्याशिवाय होत नाही. तसं ते व्हावं हा जिल्हा परिषदा स्थापन करण्यामागचा खरा उद्देश. महाराष्ट्रात नवीन काही घडवायचं असा विचार सुरू झाला, प्रयत्न सुरू झाला, त्यावेळच्या चर्चेमध्ये,:पंचायती राज्य, हातचं काही शिल्लक ठेवून करू नका, लोकांवर संपूर्ण विश्वास ठेवून करा, लोक विश्वासास पात्र नाहीत अशी भीती ठेवून यासंबंधीचा निर्णय करणं उपयुक्त ठरणार नाही हे आवर्जून सांगावं लागलं. वसंतराव नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली त्यासाठी एक समिती स्थापन झाली होती. सत्तेच्या विकेंद्रीकरणाची योजना जेव्हा अंतिम टप्प्यापर्यंत आली, अन् त्या वेळी नाईकांशी चर्चा झाल्या त्या वेळी हे सूत्र मी त्यांना सांगितलं. जो अंतिम आराखडा तयार व्हायचा तो 'वर्केबल' होईल याची काळजी घ्यावी लागणार होती. त्याचबरोबर प्रत्यक्ष कार्यवाही सुरू झाल्यानंतरच्या काळात त्यामध्ये काही दोष निर्माण होतील हे लक्षात ठेवून हे सर्व करावं लागणार होतं.

सत्तेची नवी स्थानं निर्माण झाली म्हणजे तेथे काही चुकीच्या गोष्टी घडतात. चुकीची माणसं तिथं येऊन बसतात. सत्तेचं स्थान निर्माण करण्यामागचा उद्देश सोईस्कररीत्या बाजूला ठेवून निर्णय करीत राहतात. असे काही दोष निर्माण झाले का हा विचाराचा, तपासणी करण्याचा प्रश्न आहे. दोष निर्माण झाले असतील तर यंत्रणा राबवून घेण्यासाठी तिथं जी माणसे येतात किंवा आली आहेत, त्यांची सामाजिक, राजकीय मूल्यं तपासावी लागतील. लोकशाहीमध्ये अखेरीस संस्था ही फक्त मदत करू शकते. कामाची जबाबदारी माणसांची असते.

जिल्हा परिषदा, सहकार, शेती (कृषि औद्योगिक समाज), शिक्षण यासंबंधातील निर्णय, महाराष्ट्रात सामाजिक परिवर्तन घडून यावे या प्रमुख

उद्देशाने केले. या साऱ्या नव्याने सुरू होणाऱ्या प्रवाहात, समाजातील सामान्य थराला, मुख्यत: दलितांना सामावून घेणे शक्य झाले, या प्रवाहात अशी जर सांगड घालता आली तर समाजपरिवर्तनासाठी आवश्यक ते वातावरण निर्माण होईल; किंबहुना तसे ते व्हावे अशी मनात तळमळ होती.

मी ज्या समाजात वाढलो, त्या समाजाचे जे चित्र पाहिले तेथे शिक्षणासाठी लढाई करावी लागत होती. महाराष्ट्रात शिक्षणाविषयी तीव्र तळमळ होती. म. फुले, लो. टिळक, आगरकर, डॉ. आंबेडकर, महर्षी कर्वे, भाऊराव पाटील, पंजाबराव देशमुख, भाऊसाहेब हिरे या माणसांनी शिक्षणाच्या क्षेत्रात ऋषितुल्य काम केले. परंतु महाराष्ट्रात खालच्या थरापर्यंत जेवढे शिक्षण पोहोचायला पाहिजे तेवढे पोहोचत नव्हते. याचं कारण आर्थिक स्थिती. शिक्षण घेण्यामागे आर्थिक स्थितीचा अडसर असायचा. यातून बाहेर पडावं म्हणून काही निर्णय घेतले.

प्रचलित शिक्षणपद्धती योग्य आहे की नाही, योग्य नसेल तर बदल कसा घडवून आणता येईल, गुणवत्ता कशी राखता येईल याबाबत तज्ज्ञांनी जरूर खल करावा, निर्णयापर्यंत पोहोचावे. परंतु चर्चा आणि निर्णय या गोष्टी दीर्घकाळ चालत राहतात हा अनुभव जमेस धरून महाराष्ट्रात सर्वप्रथम शिक्षणप्रसाराचा निर्णय आम्ही केला. शिक्षणाचे काही संस्कार घडतात, इष्ट परिणाम होतात. शिक्षण हे एक असं शस्त्र आहे की माणसाची मूल्यं बदलायला त्याची मदत होते. माणसाची मूल्यं बदलणारेच हे शस्त्र आहे. गुणवत्ता वाढावी हा तर शिक्षणाचा मूळ हेतू असतोच. पण त्यात सुरुवातीला संख्यात्मक प्रयत्नही करावे लागतात. शिक्षण हे समाजात प्रत्येक घटकापर्यंत पोहोचले पाहिजे. हरिजन, ब्राह्मण, दलित, मराठा कोणीही असो, शिक्षणाच्या माध्यमातून नवा, शक्तिमान माणूस तयार होतो हे गृहितकृत्य जर मान्य असेल तर शिक्षण सर्वदूर पोहोचण्यासाठी शिक्षणप्रसाराचा नवा रस्ता तयार करण्याचा निर्णय करावा लागणार होता. तसा तो केला. त्याचा मला आनंद आहे. मला अशी भीती घालण्यात आली की, या शिक्षणप्रसाराच्या हव्यासामुळे वेगळ्या विचाराची माणसे तयार होतील. काही बंडखोर निर्माण होतील ! मी मनाशी अन् जाहीरपणानंही म्हटलं, ठीक आहे, अडाणी बंडखोरापेक्षा सुशिक्षित बंडखोर मला चालेल !

शिक्षणाप्रमाणंच सहकार ही महाराष्ट्राला लाभलेली शक्ती आहे. सहकारी चळवळ आम्ही सुरूं केली असा आमचा दावा नाही. पन्नास वर्षांपूर्वी महाराष्ट्रात

हे काम सुरू झालं. माणसांना एकत्र आणून त्यांच्या शक्तीतून काम उभं करणारी ही लोकशाही चळवळ आहे. शासनातर्फे करायच्या विकासाच्या कामाची गाठ या चळवळीशी घालण्याच्या हेतूनं महाबळेश्वर येथील शिबिरात 'कृषि औद्योगिक समाज' या शब्दप्रयोगाचा उच्चार केला. शेती हा उद्योग आहे. या उद्योगाची नवी तंत्रे, व्यवस्थापकीय कुशलता, आर्थिक साधने शेतकऱ्यांना उपलब्ध करावी आणि ग्रामीण जनतेची शहराकडील धाव, गर्दी रोखण्यासाठी शेतमालावर प्रक्रिया करणारे उद्योग तेथेच सुरू करण्यास प्रोत्साहन द्यावे हा त्या मागचा हेतू.

सहकारी चळवळ ही आर्थिक लोकशाही तत्त्वानं चाललेली चळवळ असल्यानं जनतेनंच ती चालविली पाहिजे. याचा सामाजिक संदर्भ जो मी मनात ठेवतो त्यात खेड्यातला सगळा वर्ग, विशेषत: दुबळे लोक या चळवळीच्या प्रवाहात आणावेत, तेथे त्यांची भागीदारी तयार व्हावी हा आहे. यातील किती घडले असे विचाराल तर मनात खंत आहे असं मी म्हणेन. जे काही घडलं, घडतंय त्यात अपुरेपणा आहे असं म्हणेन.

सहकारी चळवळीत सहभागी झाल्यामुळं खेड्यात काही कुटुंबं सुखी झाली. परंतु त्यांची शहरी धनपतीशी तुलना करणं चूक आहे. त्याचबरोबर खेड्यातल्या सुखी माणसाला जागा मात्र केला पाहिजे. जागा ठेवला पाहिजे. त्यानं खालच्या थराचा विचार करून त्याच्यापर्यंत जायला हवं. सहकारी चळवळीतही मक्तेदारी निर्माण करण्याची जी प्रवृत्ती निर्माण होत आहे किंवा झाली आहे ती रोखावी लागेल. सहकारी सोसायटीचे सभासदत्व द्यायचे नाही, दलित, लहान माणूस, याला भागीदारी मिळू द्यायची नाही या प्रवृत्तीविरुद्ध लढावे लागेल. लोकशाही प्रेरणा दुरुस्त करावी लागेल. सहकारी चळवळीला चांगल्यांनी मार्गदर्शन केलं आहे. सहकार ही एक मूलभूत शक्ती आहे. सत्ता केंद्रित होण्यामुळे काही अनिष्ट घडत असेल, घडणार असेल तर या चळवळीला नवीन शक्ती, विचार द्यावे लागतील. सहकारी चळवळीची म्हणून सत्ता असली तरी पथ्य ही पाळलीच पाहिजेत. सत्तेत राहून मी तरी तसा प्रयत्न केला.

सत्तेचं असं असतं की, आज आहे उद्या नाही असं गृहीत धरूनच काम करावं लागतं. बराच काळ सत्तेवर राहणं ही अपवादात्मक परिस्थिती म्हटली पाहिजे. सत्ता नाही असाही क्षण येतो केव्हा केव्हा! आयुष्याला जर अखेरी

आहे तर सत्तेला का नसावी ! सत्तेवर राहू नये असा कित्येकदा जाणूनबुजून निर्णय करावा लागतो. अर्थात असा निर्णय घ्यावा लागेल तेव्हा काय करावं किंवा काय करीन असा प्रश्न मनात अशा वेळी येणं साहजिक ठरतं. माझ्यापुरते विचाराल तर या प्रश्नानं माझ्या मनाला कधीच त्रास झालेला नाही. याचं कारण, जेव्हा सत्ता नव्हती, सत्तेच्या ठिकाणी बसणार आहोत याची पुसटशी कल्पनाही नव्हती, तेव्हापासून मी माझी कामाची दिशा निश्चित केली होती.

सत्तेत असल्यामुळं, उद्या मी सत्तेत नसलो तर काय करीन यासंबंधी बोलणं बरं नव्हे. परंतु सत्तेत नसताना पूर्वी जे काम पुढं नेण्याच्या प्रयत्नात होतो, त्याच दिशेनं सत्तेत असतानाही प्रयत्न सुरू ठेवला. सत्तेत असताना शासकीय क्षेत्रात काम करावं लागतं. पण सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात करता येण्यासारखं पुष्कळ काम आहे. या क्षेत्रात साध्य करण्याचं जे स्वप्न होतं त्यापासून अजून माझ्यासारखा माणूस पुष्कळ लांब आहे. जाति-जातींमधील स्पर्धा, तेढी लोकशाहीत वाढत आहेत. महत्त्वाकांक्षी माणसं त्याचा खेळ करीत आहेत. मागासलेल्या वर्गाचा प्रश्न अजूनही सुटलेला नाही. या क्षेत्रात माझ्यासारख्याला पुष्कळ काम करता येण्यासारखं आहे. सत्तेत नसेन त्या वेळी असंच काही काम करीन. सत्तेत नसलं म्हणजे दुर्बलता येते, शक्ती कमी पडते, साधनं, माणसं कमी होतात हे खरं, परंतु लोकांची मला थोडीफार मान्यता आहे त्याचा उपयोग करून सामान्यांचं स्थान उंचावेल, जाति-जातींमधील तेढी कमी होतील, मागासलेल्या वर्गाच्या प्रश्नाला चालना देता येईल, लोकांच्या मदतीनं असं काम करता येईल असा विश्वास वाटतो.

एक मात्र निश्चित-सत्तेतून बाजूला गेलो, बाजूला होण्याचा निर्णय मला करावा लागला तरी राजकारणातून बाजूला होईन असं नव्हे. राजकारणातून बाजूला होणे नाही. परंतु आपल्या स्वत:साठी काही करायचंय अशी भावना राहणार नाही. स्वत:साठी काही मागावं असंही नाही. पक्षानं, नेत्यांनी, जनतेनं मला भरपूर दान दिलं आहे. त्यामुळे सत्तेच्या बाहेर राहिल्यानं दु:ख राहणार नाही. खंत राहणार नाही. कोणाबद्दल कटुता, कडवटपणा असणार नाही. आजवर राहिलेला मनाचा समतोलपणा त्या वेळीही राहील अशी आशा आहे. माझं मन तसं स्वच्छ आहे."

गप्पांचा ओघ सत्तेकडं वळला आणि सत्तेत राहणारानं काही पथ्यं पाळली

पाहिजेत असं यशवंतरावांनी सांगितलं तेव्हा तीस वर्षांहून अधिक काळ सत्तेत असणाऱ्या तुम्ही किती पथ्यं पाळली आणि किती यशस्वी झाला यासारखे किंवा अन्य काही सवाल मी करणं स्वाभाविकच होतं. परंतु सवाल जोखण्याची बौद्धिक हिंमत पैदा केलेल्या यशवंतरावांसारख्याशी गप्पा करताना मनात असलेल्या अन् नसलेल्या सगळ्याच सवालांची इतिश्री घडायची ती ही अशी !

## महाराष्ट्रातील ब्राह्मण–ब्राह्मणेतर वाद आणि चव्हाण

यशवंतरावांची पहिली मुख्य कामगिरी म्हणजे, ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादात जी तीव्रता त्यांच्या सार्वजनिक आयुष्याच्या पहिल्या १५–२० वर्षांत आलेली त्यांना दिसत होती तिची तीव्रता, दोन्ही बाजूंना न दुखवता आणि दोन्ही बाजूंना जवळ जवळ आणून त्यांनी नाहीशी केली आणि महाराष्ट्रातील वातावरणात गोडवा व स्नेह निर्माण केला असे माझे निरीक्षण आहे. महाराष्ट्रातील अनेक ब्राह्मण पुढाऱ्यांनी यशवंतरावांना त्यांच्या या कामगिरीबद्दल धन्यवाद दिले आहेत. दोन ठळक नावेच सांगायची असली तर सातारचे भाऊसाहेब सोमण आणि कऱ्हाडचे विद्वान श्री. आळतेकर यांनी यशवंतरावांच्या या कामगिरीबद्दल माझ्याजवळ गौरवोद्गार काढलेले आहेत. त्या जुन्या काळच्या उलट–सुलट घडलेल्या घटना उकरून काढून हा विषय मांडला तर तो कदाचित अधिक बोधप्रद होईलही पण त्या स्मृती विसरण्यायोग्य असता, जिवंत केल्यासारख्या होतील म्हणून मी ते टाळतो. १९५६ साली यशवंतराव महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले, त्या वेळी द्वैभाषिक जन्माला आले होते, तेव्हापासून ब्राह्मण-ब्राह्मणेतर वादातील तीव्रता कमी करण्याचा त्यांनी प्रयत्न केला असे मला म्हणायचे नाही. ४९ सालापासून मी त्यांना ओळखू लागलो आणि तेव्हापासूनच यशवंतराव हा सलोखा निर्मिण्यात रस घेत होते आणि कार्यरत होते असा माझा अनुभव आहे. भाऊसाहेब सोमण यांचे यशवंतरावांवर विशेष लक्ष होते. यशवंतरावांना ते माहीत होते की नाही ते मला ठाऊक नाही. भाऊसाहेब सोमणांना ब्राह्मण–ब्राह्मणेतर वादातील तीव्रता दुःखदायी वाटे आणि 'हा मुलगा पुढे येईल तर ही तीव्रता, तो कमी करील' असे उद्गार भाऊसाहेबांनी माझ्याजवळ काढले होते. आणि नंतर केव्हातरी आपले हे म्हणणे खरे झाल्याचेही त्यांनी मला सांगितले. त्या वेळेपर्यंत यशवंतराव फार थोर पुढारी झालेही नव्हते. मुख्यमंत्री झाल्यापासूनच्या काळात ते मुंबईत थोडीच वर्षे राहिले होते. पुढील काळात त्यांची दिल्लीतच अधिक वर्षे गेली. पण 'घार उडते आकाशी तरी तिचे लक्ष पिलापाशी...' असे यशवंतराव, हेच केंद्रीय मंत्री होते. दिल्लीस राहून ते सतत महाराष्ट्राची काळजी करीत असत आणि महाराष्ट्रातील ब्राह्मण–ब्राह्मणेतर वादाची तीव्रता त्यांच्या विशिष्ट स्वभावप्रदर्शनामुळे, साहित्यप्रीतीमुळे आणि सामाजिक समता निर्वैरतेने निर्माण करण्याच्या त्यांच्या

प्रयत्नामुळे त्यांना या कामी बरेच यश मिळाले, असे माझे मत आहे.

**—पां. वा. गाडगीळ**

( गावकरी, ३–१२–८४ )

( महाराष्ट्राच्या इतिहासात यशवंतराव चव्हाणांचे स्थान )

## गोळवलकर गुरुजींशी विचारविमर्श

लोकमान्य टिळकांचे व्यवहारी राजकारणातील सूत्र होते ' साधनानाम् अनेकता ' आणि त्या सूत्राबरहुकूम व्यवहार भारताच्या राजधानीत कै. श्री. यशवंतरावजी व रा. स्व. संघाचे द्वितीय सरसंघचालक श्री. गुरुजी (मा. स. गोळवलकर ) यांच्याद्वारे सुमारे सहा वर्षेपर्यंत (१९६३ ते १९६९) घडून येत होता. परस्पर विश्वासाने या कालखंडात दोघेही अनेक प्रसंगी भेटून विचारविमर्श करीत असत. श्री. यशवंतरावजींची राजकीय विचारसरणी ज्ञात असूनही या भेटी ज्या वेळी होत त्या वेळी रा. स्व. संघातील आपल्या सहकारी कार्यकर्त्यांना या भेटीमागील हेतू विशद करताना श्री. गुरुजी सांगत असत की, देशाचे संरक्षण व आंतरिक सुरक्षा व व्यवस्था हे दोन्ही राष्ट्रजीवनाचे पैलू पक्षातीत भूमिकेवरूनच विचारात घेतले गेले पाहिजेत. तेव्हा राजकीय मतमतांतरे दूर ठेवून संरक्षणमंत्री ( वा केंद्रीय गृहमंत्री ) श्री. चव्हाण यांना भेटून, त्यांचे कानी आपले भारतभ्रमणातील निरीक्षण व अनुभव घालणे हे आवश्यकच आहे. उचित वाटल्यास त्यांनी या माहितीचा उपयोग प्रशासनासाठी करून घ्यावा. कारण राष्ट्रजीवनाचे हे दोन्ही पैलू नित्य विशुद्ध राष्ट्रवादी भूमिकेवरूनच साकल्याने विचाराधीन राहिले पाहिजेत.

श्री. गुरुजींची ही जी भूमिका होती तिचा आदर करीतच कै. यशवंतरावजी त्यांना भेटण्यासाठी नेहमी सिद्ध असत; उत्सुक असत. शिवाय या भेटीगाठी वा हा विचारविमर्श नेहमीच अनौपचारिक स्वरूपाचा असल्याने ' प्रकाशनार्थ ' ( पब्लिसिटी ) नसे. त्यामुळे बोलणेही मनमोकळेपणी व आवश्यकतेनुसार अगदी अवघ्या दहा मिनिटांपासून तो कधी तासभरही होत असे, आणि त्याची वाच्यता उभयपक्षी कोठेही होत नसे. कारण ' राष्ट्रहित ' सर्वोपरि हेच सूत्र या व्यवहारात अनुस्यूत असे !

या परस्पर विश्वासाचा प्रारंभ मुंबईस मुख्यमंत्री म्हणून श्री. यशवंतरावजी वावरत होते त्याच वेळी झालेला होता. त्या कालखंडातच एका अनौपचारिक गप्पागोष्टींच्या ओघात श्री. गुरुजींनी भविष्यवाणी केल्यागत मुख्यमंत्र्यांना सांगितले होते की, आपणाला लौकरच दिल्लीस जावे लागेल ! पुढे तसेच घडल्याने श्री. यशवंतरावजींची स्वाभाविकच श्री. गुरुजींच्याकडे श्रद्धायुक्त भावनेने पाहण्याची रीत झालेली होती.

**ना. बा. लेले**

## पं. नेहरू आणि यशवंतराव

" पंडितजींनी मला फार जिव्हाळ्यानं वागवलंय " एकदम त्यांना ( यशवंतरावांना ) काही तरी आठवलं, ते म्हणाले, " रणजित, मी एकच आठवण सांगतो; मी त्या वेळी डिफेन्स मिनिस्टर होतो. पण त्या खात्याचा एक सैन्यप्रमुख सदैव विरोध करीत असे. त्यामुळे मी त्रासलो होतो. आणि त्या त्रासातच एके दिवशी नेहरूंच्या नावे मी माझ्या संरक्षणमंत्रिपदाचा राजीनामा खरडला आणि तो नेहरूंच्या हाती जाण्याची व्यवस्था केली. नेहरूंनी मला रात्री नऊ वाजता बोलाविलं मला वाटलं, पंडितजी आता राजीनामा स्वीकारणार. मी त्या तयारीनंच तिथे गेलो आणि नेहरूंच्या भेटीला जात असताना लिफ्ट मध्येच बंद पडली. अर्धा पिंजरा मजल्यावर, अर्धा खाली अशा अवस्थेत मी अडकलो. पळापळ सुरू झाली. पंडिजींना हे कळलं. ते धावत खालच्या मजल्यावर आले. मी पंडिजींना पाहात होतो आणि पंडितजी मोठ्यामोठ्यानं हसत होते. पंडितजींना मी एवढ्या मोठ्यानं हसताना कधीच पाहिलं नाही. सेवक पळत होते. शेवटी एकदाची लिफ्ट सुरू झाली. पंडितजी आणि मी त्यांच्या चेंबरमध्ये गेलो. काही क्षणापूर्वी मला लिफ्टमध्ये अडकलेला पाहून खळखळून हसणारे पंडितजी, त्यांनी दरवाजा बंद केला. त्यांच्या चेहऱ्यावरचं हास्य लोपलं. गुलाबासारखा चेहरा सूर्यबिंबासारखा लाल झाला. आपल्या शेरवानीच्या खिशातून माझ्या राजीनाम्याचा कागद माझ्या तोंडासमोर फडफडवत ते म्हणाले, " ये क्या बदतमीजी है, ये क्या करते हो । मला राजीनामा पाठवतोस ! " कशासाठी ते मी त्यांना सांगितले. ते हसून म्हणाले, " मूर्ख आहेस. तो ऑफिसर आहे ना. जो त्रास देतो आहे त्याला संरक्षणमंत्री व्हायचं होतं. म्हणून मी त्याला तुझ्या हाताखाली घातलं. तू मला सांगितलं असतंस तर मी सारं निभावून नेलं असतं. पण यापुढे असा राजीनामा पाठविण्याचा खुळेपणा करू नकोस. त्यांनी तो राजीनामा माझ्यादेखत टराटरा फाडला आणि माझ्या तोंडावर फेकून ते म्हणाले, ' पुन्हा असा मूर्खपणा करू नको.' " असे होते पंडितजी.

**श्री. रणजित देसाई**
' लोकराज्य '

## ' तो ' निर्णय यशवंतरावांच्या घरीच झाला !

१९६५च्या भारत–पाकिस्तान युद्धात विजय संपादन करताच यशवंतरावांच्या युद्धकुशल युद्धनेतृत्वाचे एक आगळे दर्शन भारतवासीयांना घडले. चव्हाणांच्या भोवती कीर्तिवलय तयार झालेले असतानाच पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांचे ताश्कंद येथे अकस्मात निधन झाले.

पंतप्रधानपद रिकामे झाले. पंतप्रधानपदासाठी रीतसर निवड करावी लागणार होती. त्यामुळे दरम्यानच्या काळासाठी हे पद श्री. गुलझारीलाल नंदा यांच्याकडे

सोपविण्यात आले. पं. नेहरूंच्या निधनानंतर त्यांनी असेच हे पद स्वीकारले होते.

नव्या पंतप्रधानाची रीतसर निवड करण्याचे मनसुबे सुरू होताच दिल्लीत काँग्रेसपक्षांतर्गत चलबिचल सुरू झाली. दिवस उलटेल तशी हवा तापू लागली. दिल्लीत ज्याला अनुकूल निर्णय करून घ्यायचा असतो त्याला आपल्या पाठीशी भक्कम—लॉबी उभी करावी लागते. उत्तर प्रदेशचे खासदार ज्या लॉबीत असतील ती लॉबी भक्कम हा दिल्लीचा परंपरागत शिरस्ता. कारण त्या प्रदेशाचे खासदार संख्येने सर्वाधिक. ते वळतील तिकडे बिहार आणि उत्तर भारतातले बहुसंख्य खासदार वळतात.

मोठा बाका प्रसंग निर्माण झाला. शास्त्रीजींच्या मंत्रिमंडळात दुसऱ्या क्रमांकाचा दर्जा न मिळाल्यामुळे मोरारजी देसाई रुष्ट होते. बिहारच्या दिल्लीतील लॉबीने जगजीवनराम यांच्या नावाची दवंडी पिटली होती. यशवंतरावांची भूमिका काय, यावर अंदाज व्यक्त होऊ लागले होते. वृत्तपत्रांना रोज नवा मसाला मिळत राहिला.

निवडणुकीचा दिवस जवळ येत चालला त्याबरोबर खलबतखाने सुरू झाले. टेहळणी पथकाच्या भेटीगाठी, त्यातून अंदाज घेऊन डावपेचांची आखणी, शत्रु-मित्रांची बेरीज-वजाबाकी, दिशाभुलीचं तंत्र या सर्वांना जोर चढला.

यशवंतराव शांत होते. काहींनी त्याचा अर्थ ते दबा धरून बसले आहेत असा केला. त्यांचा अंदाज घेण्यासाठी खासदारांची ये-जा सुरू होती. ते कोणता पवित्रा घेणार आहेत याबद्दल त्यांच्या मनाचा ठाव कोणालाच लागत नव्हता. त्यावरूनही तर्कवितर्क केले जात होते.

वस्तुस्थिती अशी होती की, निवडणुकीतील उमेदवार निश्चित करण्याचा अखेरचा टप्पा आला असताना यशवंतरावांचे निवासस्थान हे गुप्त खलबतखान्याचे प्रमुख केंद्र बनलं होतं. त्या अखेरच्या चार-पाच दिवसांत, रोज रात्री ८॥ वाजता सी. सुब्रह्मण्यम्, इंदिरा गांधी आणि अशोक मेहता यशवंतरावांच्या १ रेसकोर्स रोड, या कोठीवर मौजूद असत. रात्री ९॥ पर्यंत, म्हणजे एक तासभर मंडळी खलबतखान्यात असत. रात्री ८ नंतर यशवंतरावांकडील अन्य रहदारी बंद असायची. स्वीय सचिव श्रीपाद डोंगरे यांचा त्याविषयी अगदी कटाक्ष.

खलबतखान्यातील मंडळी पांगली आणि आमचे (डोंगरे आणि मी) प्रश्नांकित चेहरे पाहिले की यशवंतरावांचं उत्तर, 'पाहू या, चर्चा चाललीय...!'

त्या दिवशी असेच आम्ही बंगल्यात गेलो. यशवंतराव भोजनगृहात पोहोचले होते. आम्हाला पाहताच यशवंतराव शांतपणानं उद्गारले—"इंदिराजी."

"बरं झालं..."–वेणूताईंचा अभिप्राय.

हा ऐतिहासिक निर्णय यशवंतरावांच्या निवासस्थानीच झाल्यानं उत्सुकता संपली.

—रामभाऊ जोशी

# ३

# मंत्रालयातील वर्षे

यशवंतरावांच्या शब्दांत संरक्षण, गृह, अर्थ खात्यातील कारकीर्द, समीक्षालेख, संबंधित अधिकाऱ्यांच्या मुलाखती

# मंत्रालयातील कारकीर्द

श्री. यशवंतराव चव्हाणांनी भारत सरकारात संरक्षण, गृह, अर्थ व परराष्ट्र संबंध ही चार अत्यंत महत्त्वाची खाती समर्थपणे संभाळली व उत्कृष्ट प्रशासक व पेचप्रसंगात नेतृत्व करणारे कार्यक्षम मंत्री म्हणून स्वतंत्र भारताच्या प्रशासकीय इतिहासात स्थान मिळविले. त्यांचे चरित्र-कार श्री. टी. व्ही. उन्हीकृष्णन् यांनी त्यांच्या प्रदीर्घ मुलाखती घेऊन 'चव्हाण अँड द ट्रबल्ड डीकेड' हे पुस्तक १९७३ मध्ये प्रकाशित केले. एक प्रकारे चव्हाणांचेच ते आत्मकथन होते. या पुस्तकातील संरक्षण व गृहखात्याविषयी या प्रकरणात चव्हाणांच्या शब्दांत व त्यांच्या कारकीर्दीचे जे वर्णन केले होते त्याचा अनुवाद येथे दिला आहे. 'अर्थमंत्रिपदाची चार वर्षे' हीसुद्धा 'केसरी'च्या प्रतिनिधीने घेतलेली चव्हाणांची मुलाखतच आहे. ती १९७२च्या 'केसरी'च्या दिवाळी अंकात प्रसिद्ध झाली होती.

## संरक्षणदलांना पुन्हा आत्मविश्वास देणारे संरक्षणमंत्री

नोव्हेंबर १९६२ मध्ये, 'हिमालयाच्या साहाय्याला सह्याद्री धावून गेला' अशा शब्दांनी वर्णन केली गेलेली एक घटना घडली. चिनी आक्रमणाच्या अनपेक्षित आपत्तीला तोंड देण्यासाठी नेहरूंच्या विनंतीवरून, यशवंतराव चव्हाणांनी संरक्षण खात्याची जबाबदारी स्वीकारली. नेहरूंना त्या वेळी चव्हाणांनी असे सांगितले होते, की एक देशभक्ती सोडली, तर या पदासाठी आवश्यक अशी अन्य कोणतीही विशेष पात्रता त्यांच्याजवळ नाही. मुंबईहून दिल्लीला जाण्याचा आपला निर्णय कितपत शहाणपणाचा आहे याबद्दलही ते थोडे साशंकच होते. सुरुवातीच्या काळात तर अनेकदा त्यांना आपले मुंबईतले दिवसच बरे होते असे वाटण्याचे प्रसंग आले. परंतु संरक्षण व्यवस्थेत उपयुक्त बदल आपण करू शकत आहोत आणि सैन्याच्या मनामध्ये आत्मविश्वास आणि अभिमान निर्माण करण्यातही आपल्याला यश येत आहे, ही गोष्ट ध्यानी आल्यावर राष्ट्राच्या सेवेला चव्हाणांनी आपल्या आयुष्यातला एक फार महत्त्वाचा कालखंड स्थिरबुद्धीने अर्पण केला. संरक्षणमंत्री म्हणून काम करत असताना 'भारत काय

आहे ' ही गोष्ट जशी चव्हाणांच्या लक्षात आली; तशीच ' चव्हाण ही काय चीज आहे ' ही गोष्टही उभ्या भारताला समजली. चार वर्षांच्या कारकीर्दीनंतर नोव्हेंबर १९६६ मध्ये खात्याची सूत्रे खाली ठेवताना, तो वियोग त्यांना त्रासदायक वाटला होता. ते म्हणाले होते, " तसा मी थोडासा हळवाच आहे. संरक्षण खात्यातली माझी ही वर्षे अतिशय फलदायी ठरलेली आहेत. "

—चव्हाणांना संरक्षण खात्याबद्दल ही जी ओढ निर्माण झाली होती ती उगीच नव्हे. खात्याची जबाबदारी स्वीकारल्यापासून पहिल्या काही दिवसांतच नेफा, काश्मीर, राजस्थान इ. आघाड्यांना भेटी देऊन सैनिक आणि अधिकारी यांच्याशी प्रत्यक्ष संपर्क त्यांनी साधला. त्यांच्या अडचणी समजून घेण्याचा प्रयत्न केला. नुकत्याच घडलेल्या काही घटनांमुळे सेनादलातील अधिकाऱ्यांचा आत्मविश्वास डळमळीत झालेला होता, तो बळकट करायला हवा होता. एकंदर सर्वच सैन्यात निराशा आणि एक प्रकारची अपमान झाल्याची खंत निर्माण झालेली होती. सैनिकांच्या प्रशिक्षण केंद्रांना भेटी देऊन, त्यांच्याशी गप्पागोष्टी करून, त्यांच्याबरोबर खाना घेऊन, त्यांच्याशी जवळीक साधण्याचा चव्हाणांनी प्रयत्न केला.

—यशवंतरावांना हे खाते तसे नवे होते. देशाच्या एकंदर संरक्षण स्थितीचा नेमका अंदाज त्यांना करता येईना. दिल्लीतल्या, संरक्षणाचे डावपेच आखणाऱ्या तज्ज्ञांचाही प्रारंभी त्यांना फारसा उपयोग होऊ शकला नाही; कारण या तज्ज्ञ मंडळींनाच चीनची नेमकी उद्दिष्टे कोणती ते लक्षात येत नव्हते. युद्धबंदीनंतर चीनने केलेल्या काही कृतींचा तर त्यांना अर्थच लागत नव्हता. उदा. भारतीय सैन्याने माघार घेताना जागेवरच सोडून दिलेली अमेरिकन स्वयंचलित शस्त्रे आणि रशियन हेलिकॉप्टर्स चिन्यांनी गोळा केली; ती साफसूफ केली आणि त्यांची नीट यादी वगैरे करून भारतीयांना परत केली. या असल्या कृतींनी आपले तज्ज्ञ सतत गोंधळातच पडत होते. चव्हाणांनी पार्लमेंटमध्ये असे सांगितले होते—" चीन आज काय करेल, उद्या काय करेल, या आठवड्यात आणि मग त्याच्या पुढच्या आठवड्यात काय करेल ? एवढाच विचार आम्ही सतत करीत होतो. "

—चव्हाणांच्या असे लक्षात आले की, सैन्यात आणि प्रत्यक्ष संरक्षण मंत्रालयातही तट पडलेले आहेत. खात्याच्या तांत्रिक पैलूंचा आवाका येऊन त्यावर प्रभुत्व मिळवायला त्यांना थोडा वेळ लागला. कारण राज्याचा मुख्यमंत्री म्हणून चव्हाणांना अवगत असलेल्या गोष्टींपेक्षा या खात्यांची परिभाषा, कार्य-

पद्धती वगैरे गोष्टी अगदीच वेगळ्या होत्या. " माझ्यासमोरच्या समस्या वेगळ्या होत्या. चर्चिल्या जाणाऱ्या समस्यांची व्याप्ती निराळीच होती, भाषा वेगळी होती आणि शासनपद्धतीही " असे स्वतः चव्हाणांनीच म्हटले आहे.

चव्हाणांनी सर्वप्रथम आपले खाते स्वच्छ करून त्यात आत्मविश्वास निर्माण करण्याची आणि आज्ञापालनाची शिस्तबद्ध साखळी पुन्हा प्रस्थापित करण्याची कामगिरी हाती घेतली. तिन्ही सैन्यदलांच्या प्रमुखांशी जवळचा संपर्क ठेवला. १९६३ सालच्या ३६५ दिवसांपैकी १६९ दिवस चव्हाण आणि हे प्रमुख यांच्या बैठकी झाल्या होत्या. ' सकाळच्या बैठकी 'ची परंपरा त्यांनी सुरू केली. तिन्ही दलांचे प्रमुख, संरक्षण आणि संरक्षण उत्पादन खात्यांचे सचिव या सकाळच्या बैठकींना उपस्थित असत. जवळ जवळ चार वर्षे, रोज सकाळी ९-३० ला या बैठकी भरत असत. सैन्यदलाच्या दैनंदिन समस्या, प्रगती, चिनी आणि पाकिस्तानी सैन्यांची अवस्था, पुरवठा व्यवस्था, अंतर्गत कारभाराचे नियोजन आणि अडचणींचे अडथळे नष्ट करण्याचे मार्ग असे विविध विषय त्यांच्यापुढे असत. चव्हाण तर या बैठकींना ' प्रातःस्मरण ', ' प्रार्थनासभा ' ( प्रेयर मीटिंग ) म्हणत असत.

सैन्यदलांपुढील संघटनविषयक समस्या अनेक प्रकारच्या होत्या. स्थल-सेना, वायु-सेना आणि नौ-सेना या तिन्हीही दलांची गतिसुलभ रचना करून त्यांचे पूर्णपणे भारतीयीकरण करणे आवश्यक होते. याचे कारण आपल्या सैन्यदलांची संघटना ब्रिटिश मार्गदर्शी सूत्रानुसार करण्यात आलेली होती. भारत स्वतंत्र झाल्यानंतरही तिच्यात बदल केलेला नव्हता. श्री. बलदेवसिंग, एन्. गोपालस्वामी अय्यंगार आणि कृष्ण मेनन या तीनही माजी संरक्षणमंत्र्यांनी सेनादलांचे आधुनिकीकरण आणि भारतीयीकरण करण्याचे प्रयत्न केलेले होते. मंत्री म्हणून संरक्षण खात्याचा भार उचलणारे पहिले भारतीय श्री. फिरोझखान नून हे होते. अर्थात त्यांच्या कालखंडात म्हणजे दुसऱ्या महायुद्धाच्या कालखंडात स्थापन केल्या गेलेल्या संरक्षण खात्याच्या कार्यमर्यादा फारच थोड्या होत्या. अंतर्गत सुरक्षितता, नागरी संरक्षण आणि सैनिकी तळांची व्यवस्था एवढ्याच गोष्टींचा त्यात समावेश होता. भारत स्वतंत्र झाला त्या वेळचा ब्रिटिश कमांडर-इन्-चीफ हा स्थलसेनेचा आणि जी काही नौसेना आणि वायुसेना अस्तित्वात होती, तिचाही प्रमुख होता.

१९४७ साली भारत स्वतंत्र झाला तेव्हा सैन्यदलात अनेक भारतीय ज्यूनिअर ऑफिसर्सच्या हुद्दयावर होते, परंतु मेजर-जनरलपदापर्यंत पोहोचलेला एकही अधिकारी नव्हता. पुढे सेनादलाचे प्रमुख बनलेले जनरल करिअप्पा आणि थिमय्या हे केवळ ब्रिगेडिअर्स होते. ब्रिटिशांनी हा देश सोडल्यावर अनेक अधिकाऱ्यांना अचानकपणे उच्च पदांवर बढत्या मिळाल्या. परिणामी वरिष्ठ दर्जाच्या व्यवस्थापनाचा दर्जा आणि प्रभावीपणा यात थोडीफार घटच झाली. " १९६२ च्या समस्येपर्यंत, सैन्याच्या आक्रमक आणि संरक्षक बलामध्ये जी कमतरता अथवा प्रगतीचा अभाव दिसून आला त्याचे हे एक प्रमुख कारण होते. " ( एस. एस. खेरा, इंडियाज् डिफेन्स प्रॉब्लेम, पृष्ठ ४२ )

आपल्या मर्यादित सेनादलांचे वाजवीकरण करण्याकडे भारताने फारसे लक्ष दिलेले नव्हते. न्हावी, धोबी, सफाई-कामगार अशा दहा-दहा हजार बिन-लढाऊ कामगारांचा सैन्यात भरणा करून ठेवण्याची जुनी ब्रिटिश परंपरा भारताने चालू.ठेवली होती. सैनिकांची भरती केली होती, पण त्यांना पुरेशी साधन-सामग्री, शस्त्रास्त्रे आणि आधुनिक प्रशिक्षणाच्या सोयी नव्हत्या. म्हणूनच कृष्ण मेनन आपल्या सैन्याचा उल्लेख ' कवायतीच्या मैदानावरील सैन्य ' असा करीत. १९५७ साली कृष्ण-मेनन भारताचे संरक्षणमंत्री बनले. सैन्यदलांना त्यांनी एक नवी प्रतिष्ठा मिळवून दिली आणि राष्ट्राला या दलांच्या अस्तित्वाची जाणीव करून दिली. पण याबरोबरच मेनन यांनी " आपली एक वेगळीच राजकारणी शैली आणि अविश्वास, गटबाजी आणि संशय यांना खतपाणी घालणारी वागणूक " या गोष्टीही संरक्षण-यंत्रणेत आणल्या. " ऑक्टोबर १९६२ पूर्वीच्या ऐन अडचणीच्या कालखंडात, संरक्षण-यंत्रणेत अगदी कृष्ण मेनन यांच्या-पासून खालच्या थरापर्यंत सर्वत्र संशय, अविश्वास, खिन्नता यांचे सावट सर्वत्र पसरलेले होते. सर्वांची मने त्याने अगदी ग्रासून टाकलेली होती. " ( एस. एस. खेरा, इंडियाज डिफेन्स प्रॉब्लेम, पृष्ठ २०४ )

चव्हाणांनी संरक्षण खात्याची जबाबदारी स्वीकारल्यावर अल्पावधीतच अनेक समित्यांची स्थापना करण्यात आली. संरक्षणविषयक समस्यांचे सखोल परीक्षण करण्याची कामगिरी त्यांच्यावर सोपविण्यात आली. पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखाली व राष्ट्रीय संरक्षण समितीचाही समावेश असणारी एक आणीबाणी समिती यापूर्वीच अस्तित्वात आलेली होती. संरक्षण समितीने सेना–व्यवहार समिती

नावाची एक उपसमित्ती नेमलेली होती. जनरल थिमय्या, जनरल थोरात इ. प्रमुखांचा व निवृत्त सेनादलप्रमुखांचा तिच्यात समावेश होता. चव्हाण म्हणतात, " यांतील अनेक समित्यांचा उद्देश संरक्षणविषयक विचाराला चालना देणे आणि आजवर सैन्यदलांमध्ये अभावानेच दिसून येणारी जनसंपर्काची प्रभावी यंत्रणा प्रस्थापित करणे, हा होता. " त्यांचे असेही मत होते—" कोणत्याही देशाचे संरक्षणविषयक धोरण ही केवळ लष्करी बाब नसते, ती सैनिकी, राजकीय आणि आर्थिक अशी, काहीशी तिहेरी स्वरूपाची घटना असते. " देशातील उद्योगधंदे आणि सेना यांच्यातील सुसूत्रीकरणाचे महत्त्व त्यांनी सभासदांना प्रतिपादन केले आणि सर्वसामान्य जनतेच्या मनात सेनादलाच्या भूमिकेविषयी एक नवी जाणीव निर्माण केली.

सेनादलांचे पुनर्घटन करण्याच्या चव्हाणांच्या या प्रयत्नांचे वर्णन ब्रिगेडिअर दळवी असे करतात—" मेनन यांच्या कारकीर्दीत गेलेले तडे भरून काढण्याचे काम चव्हाणांनी सुरू केले. जनरल जे. एन्. चौधरी या नव्या सेनादलप्रमुखावर त्यांनी विश्वास टाकला, त्यांना योग्य तो मान दिला.......सैन्याचा गमावलेला आत्मविश्वास त्याला पुन्हा मिळवून देणे आणि सुरक्षा मंत्रालयात व सैन्यदलाच्या मुख्य कचेरीत कामकाजाच्या बाबतीत शिस्तबद्धता निर्माण करणे या गोष्टींत चव्हाणांनी फार मोलाची कामगिरी बजावली.......सैन्यदलाची पुनर्रचना व पुनः सुसज्जता या बाबतीत सैन्यदलाने आखलेल्या योजनांमध्ये त्यांनी स्वतः ढवळाढवळ केली नाही व इतर नागरी अधिकाऱ्यांनाही करू दिली नाही........ जुनाट कल्पना व संघटनपद्धतींवर त्यांनी हेतुपुरस्सर हल्ला चढवला. यामुळे काही थोड्याच महिन्यांत पायदळाची पुनर्रचना झाली, नव्या डोंगरी तुकड्या उभ्या केल्या गेल्या आणि सैनिकांच्या हातात नवीन शस्त्रास्त्रे व अन्य साधनसामग्री आली. त्यांनी कोणालाही बळीचा बकरा बनवला नाही. जुने सारे विसरून जा आणि लढाईची पाळी आलीच तर त्यासाठी सुसज्ज व्हा अशी कळकळीची विनंती केली. "

आपले विमानदलही फारसे सामर्थ्यवान नव्हते. अनेक देशांकडून वेळोवेळी मिळालेल्या, अनेकविध प्रकारांच्या विमानांचा त्यात समावेश होता. एखाद्या विशिष्ट देशाकडे, एखाद्या विशिष्ट जातीच्या विमानाचे सुटे भाग मागितले तर ते मिळत नसत; कारण तोपर्यंत त्या देशाने तसले विमान वापरायचे सोडून देऊन

नवीन ' मॉडेल 'चा स्वीकार केलेला असे. काही वेळा त्या त्या देशाचे राजकीय धोरणही याच्या आड यायचे. हे सारे घोटाळे विमानांच्या बाबतीत भारत परावलंबी असल्यामुळे होत आहेत ही गोष्ट चव्हाणांनी उघड उघड बोलून दाखवली. हे घोटाळे टाळण्यासाठी विमानांचे व त्यांच्या सुट्या भागांचे उत्पादन याच देशात व्हायला हवे असा त्यांचा ठाम विश्वास होता.

याच काळात ' मिग–२१ ' ही विमाने तयार करणाऱ्या सार्वजनिक क्षेत्रातील कंपनीची स्थापना करण्यात आली. विमान उत्पादनाला अधिक चालना देण्यासाठी नाशिक, कोरापुट आणि हैदराबाद येथे अनुक्रमे या विमानांचे सांगाडे, एंजिन व विद्युत्यंत्रणा निर्माण करणारे कारखानेही सुरू करण्यात आले. ' नॅट ' विमानांच्या उत्पादनाला गती दिली गेली. ' एच्. एफ. २४ ' व ' मॅक–१ ' या विमानांत सुधारणा घडवून त्यांचेही उत्पादन सुरू केले गेले.

नौदलाच्या दृष्टीने देशाच्या सीमा उत्तरेत नसल्यामुळे त्या वेळी नौदलाकडे अग्रक्रमाने लक्ष देणे शक्य नव्हते. तरीही चव्हाणांच्या कारकीर्दीत फ्रिगेट्सूचे उत्पादन सुरू करण्यात आले. १९७१ ते ७३ च्या दरम्यान तीन फ्रिगेट्स् तयार व्हाव्यात या दृष्टीने कामाची आखणी करण्यात आली. नौदलोपयोगी अन्य छोट्या नौकांचे उत्पादनही सुरू झाले.

नेफामधल्या पराजयाची चौकशी करण्यासाठी सरकारने चौकशीचे आदेश दिलेले होते. मेजर-जनरल हॅंडरसन ब्रुक्स आणि ब्रिगेडियर पी. एस. भगत यांनी अशी चौकशी केली. चव्हाणांच्या मते, " ही चौकशी म्हणजे नेफा मोहिमेत सामील झालेल्या किंवा या मोहिमेशी संबंधित असलेल्यांच्यावरील दोषारोपणांची चौकशी नव्हती. " कोणाही व्यक्तीच्या दोषांची ही चौकशी नव्हती. प्रशिक्षण, साधनसामग्री, आज्ञापालनाची साखळी, सैन्याची शारीरिक क्षमता आणि सर्व स्तरांवरील नेत्यांची कुवत या पाच अंगांमधील त्रुटी शोधून काढणे हा या चौकशीचा उद्देश होता. या चौकशीचा अहवाल गुप्त स्वरूपाचा असल्यामुळे आजवर तो खुला केलेला नाही. अर्थात या संदर्भात २ सप्टेंबर १९६३ रोजी लोकसभेत चव्हाणांनी एक निवेदन केले. हा अहवाल अतिशय अस्वस्थ करणारा आहे याची त्यांनी कबुली दिली. चौकशीतून स्पष्ट झालेल्या गोष्टींचा थोडक्यात गोषवारा असा होता—कनिष्ठ अधिकाऱ्यांचा एकंदरीत दर्जा उत्तम होता. काही अपवाद सोडले तर ब्रिगेड-दर्जाच्या अधिकाऱ्यांचा दर्जाही पुरेसा समाधानकारक होता.

मात्र "वरिष्ठ दर्जाच्या अधिकाऱ्यांमध्ये अधिकारविषयक त्रुटी अधिक स्पष्टपणे दिसून येत होत्या." उच्च दर्जाचे अधिकारी "स्वयंस्फूर्तीवर फारसे अवलंबून राहात नव्हते, त्यांच्यापेक्षा कनिष्ठ असलेल्या अधिकाऱ्यांना मिळालेल्या सैन्याविषयीच्या आणि युद्धभूमीविषयीच्या ज्ञानाचाही उपयोग करून घेत नव्हते; आणि धोरणविषयक बारीक-सारीक तपशिलातही ढवळाढवळ करीत होते."

हेंडरसन-ब्रुक्स अहवाल हा सैन्याच्या चुकांवर सफेदी फासण्यासाठी नक्कीच तयार केलेला नव्हता. सरकारने स्वतःवर होणाऱ्या आघाताचा तडाखा थोडासा सौम्य करण्यासाठी तो वापरला. "आम्ही संकटाच्या अंतिम टोकापाशी उभे नसून, मध्यावरच आहोत" हेही चव्हाणांनी मान्य केले. त्यांनी पार्लमेंटला सांगितले की, सैन्यातील अधिकारी आणि जवान यांच्यातील संबंधांना एक नवीन स्वरूप देण्यासाठी आदेश दिले गेले आहेत. हे संबंध लोकशाही परंपरांना सुसंगत असेच राखण्यात येतील. नेतृत्वगुणाच्या कसोटीवरच पदोन्नती दिली जाईल. हेंडरसन-ब्रुक्स अहवालाच्या संदर्भातल्या चव्हाणांच्या या निवेदनावर लोकसभेत गरमागरम चर्चा झाली. चव्हाणांनी या अग्निदिव्याला, संरक्षणमंत्री म्हणून सफाईने तोंड दिले आणि कुठलाही डाग न लागता त्यातून ते सुरक्षितपणे बाहेरही पडले.

१९६४ च्या मे महिन्यात अमेरिकेचे संरक्षण-सचिव रॉबर्ट मॅक्नामारा यांच्या निमंत्रणावरून चव्हाणांनी अमेरिकेला भेट दिली. या भेटीबद्दल ते म्हणतात— "अमेरिकन सरकारचे अधिकारी अतिशय 'समंजस' होते. भारताने आपले संरक्षण सामर्थ्य जरूर वाढवावे असे त्यांचे मत होते. मात्र भारताच्या आर्थिक विकासाची किंमत त्या मोबदल्यात द्यावी लागू नये. मी बहुतेक ठिकाणी हाच सूर ऐकला. मथितार्थ असा की भारताला आधुनिक प्रकारची विमाने मिळू नयेत अशी त्यांची इच्छा दिसली. काय मदत करता येईल ते पाहण्यापेक्षा मदत न देण्याकरता कारणे शोधून काढण्याचा प्रयत्न ते करीत. अमेरिकेने पाकिस्तानला F–१०४ प्रकारची लढाऊ विमाने दिली होती. आपल्याकडे मिग–२१ विमाने होती. पण ही केवळ हवाई युद्धासाठी उपयोगी पडणारी होती. हवाई युद्ध आणि जमिनीवर हल्ला या दोन्हींसाठी उपयुक्त अशी विमाने आपल्याला हवी होती. अमेरिकनांकडे ही एफ–१०४ विमाने मागण्यासाठी आम्ही गेलो होतो, पण मला यश आले नाही. दोन वर्षे वाटाघाटी करूनही "भारतीय हवाई दलाचा आधुनिकीकरण

कार्यक्रम हा अडथळाच बनून राहिला."

भूतलिंगम् आणि कृष्णम्माचारी समित्यांनाही सुपरसॉनिक विमाने मिळविण्याबाबत अमेरिकनांचे मन वळविण्यात यश आले नाही. भारताला ही जेट विमाने मिळण्यात अडसर यावा म्हणून अमेरिकनांनी एका प्रसंगी विमानांची किंमत डॉलर्समध्ये मागितली. चव्हाणांनी रॉबर्ट मॅक्नामारा आणि अमेरिकन सरकारच्या अन्य वजनदार अधिकाऱ्यांची भेट घेतली आणि भारताची बाजू प्रभावीपणे मांडण्याचा प्रयत्न केला. चव्हाणांनी अनेक प्रयत्न करूनही एफ–१०४ विमाने मिळविण्यात भारताला यश आले नाहीच.

२८ ऑगस्ट १९६४ ला चव्हाणांनी रशियाला दोन आठवड्यांसाठी भेट दिली. निकिता क्रुश्चेव्ह यांच्याबरोबर त्यांच्या एकंदर तीन बैठका झाल्या. कोणताही संकोच न बाळगता खुल्या दिलाने भारताला मदत करण्याची रशियाची इच्छा आहे आणि क्रुश्चेव्ह यांच्या रूपाने भारताला एक चांगला मित्र मिळाला आहे अशी चव्हाणांची समजूत झाली. परंतु चव्हाण भारतात आल्यावर थोड्याच दिवसांत क्रुश्चेव्ह यांची रशियाच्या पंतप्रधानपदावरून हकालपट्टी झाली. रशियाबरोबर आपण केलेल्या वाटाघाटी आणि ११ सप्टेंबर १९६४ ला केलेला करार या दोन्ही गोष्टींची कल्पना चव्हाणांनी मंत्रिमंडळाला दिली. भारतीय नौदलाच्या बाबतीत रशियाची मदत किती प्रमाणात घ्यावी याबाबत पंतप्रधान लालबहादुर शास्त्री थोडे साशंक होते. त्यांच्याच सांगण्यावरून नोव्हेंबर १९६४ मध्ये ब्रिटनमध्ये जाऊन चव्हाणांनी पंतप्रधान हॅरॉल्ड विल्सन यांची भेट घेतली. मजूरपक्ष तेव्हा नुकताच सत्तेवर आला होता. ब्रिटन स्वतःच्याच संरक्षणसामर्थ्याची एकंदर अजमावणी त्या वेळी करत असल्यामुळे भारताला मदतीविषयी निश्चित आश्वासन देता येणार नाही असे त्यांनी चव्हाणांना सांगितले. चव्हाणांनी ब्रिटनचे परराष्ट्रमंत्री, संरक्षणमंत्री, क्लेमंट ॲटली, लॉर्ड माउंटबॅटन इ. अनेकांच्या भेटी घेतल्या, चर्चा केल्या परंतु ब्रिटिश नौदलप्रमुखांपासून बहुतेक सर्वांचाच प्रतिसाद निराशाजनक होता. त्यामुळे चव्हाणांच्या प्रयत्नांना अपेक्षित यश मिळू शकले नाही.

शस्त्रास्त्रांच्या खरेदीसाठी चव्हाणांनी हे जे परदेश दौरे केले त्यामुळे भारताच्या परराष्ट्र संबंधांना एक नवीन दिशा मिळाली. चव्हाण परराष्ट्रमंत्री झाले तेव्हा भारताचे रशियाशी असलेले संबंध सौहार्दाचे होते. त्यापूर्वी कृष्ण मेनन यांनी

मिग विमानांचा व्यवहारही यशस्वीपणे पार पाडला होता. तरीही भारताच्या चीन-बरोबरच्या तंट्यामध्ये जी भूमिका रशियनांनी घेतली, त्यामुळे रशियाच्या हेतू-विषयी अंदाज करीत बसणे हेच भारताच्या वाट्याला आले. त्यामुळेच नेहरूंना नापसंत असले तरीही ब्रिटन आणि अमेरिकेच्या लष्करी वर्तुळात प्रवेश करण्याची तयारीही भारताने केली होती. परंतु चीनबरोबरच्या युद्धानंतर आणि दीर्घकालीन साहाय्याबद्दलची पाश्चिमात्य राष्ट्रांबरोबरची बोलणी फिसकटल्यानंतर भारताने आपल्या पाश्चात्त्य राष्ट्रांबरोबरच्या संबंधांचा पुनर्विचार केला. पाकिस्तानला अमेरिकेने पाणबुडी आणि एफ-१०४ सुपरसॉनिक जेट विमाने दिली होती; पण सतत २ वर्षे खटपटी आणि वाटाघाटी करूनही, भारताला ज्यांची तीव्र गरज होती, ती विमाने किंवा पाणबुड्या पाश्चिमात्य देशांनी भारताच्या पदरी पडू दिली नाहीत. भारत रशियाच्या अधिक निकट गेला तो केवळ गरजेपोटीच, इंग्लंड आणि अमेरिकेकडून विनाअट, भरघोस संरक्षण साहाय्य मिळू शकणार नाही असा ठाम विश्वास निर्माण झाल्यामुळेच ! चिनी आक्रमणानंतर भारता-विषयीच्या आस्थेचे जे भडक प्रदर्शन अमेरिकेने केले आणि त्यानंतर जो तटस्थ-पणा आणि हिशेबीपणा स्वीकारला -त्यामुळेच भारताला रशियाच्या साहचर्यात अधिक प्रमाणात जावे लागले.

भारत-पाकिस्तान संबंधांचा इतिहासही, ( चव्हाणांच्या संदर्भात ) पाहण्या-सारखा आहे.

२४ एप्रिल १९६५ रोजी एका पूर्ण ब्रिगेडच्या सामर्थ्यानिशी पॅटन रणगाडे आणि १०० पौंडी तोफांसह पाकिस्तानने कच्छच्या रणात चार ठिकाणी हल्ला चढवला. " कच्छ आणि सिंधच्या सीमेवर अघोषित युद्ध सुरू झाले आहे " अशी घोषणा दिल्लीहून करण्यात आली. " पाकिस्तानी सेनांनी भारतीय प्रदेशात खोलवर घुसून आपली संरक्षण-ठाणी उद्ध्वस्त केली आहेत " असेही सांगितले गेले. यातली काही ठाणी आपल्याला सोडून द्यावी लागली. चव्हाणांनी उद्गार काढले ते असे, " कच्छच्या रणातील घटनांमुळे मंत्रिमंडळाला खेद होत आहे. काही ठिकाणी आपल्याला माघार घ्यावी लागली आहे. " पाकिस्तानची मखलाशी अशी होती की एकीकडे हल्ले चढवीत असतानाच दोन्ही बाजूंनी आपापली सैन्यदले मागे घ्यावीत अशी सूचनाही पाकिस्तानने केली होती. २८ एप्रिलला लोकसभेमध्ये लालबहादुर शास्त्रींनी स्पष्ट इशारा दिला की " पाकिस्तानने

आपली सदसद्विवेकबुद्धी गहाण टाकून आपल्या आक्रमक कारवाया अशाच चालू ठेवल्या, तर आमचे सैन्य जरूर आमच्या देशाचे संरक्षण करील. युद्धनीती, मनुष्यबळाचा उपयोग आणि आवश्यक ती युद्धसामग्री यांचा वापर आम्ही आम्हाला योग्य वाटेल त्या पद्धतीने करू." पाकिस्तानने कच्छच्या रणामधील आक्रमण थांबवले नाही तर ८०० मैल लांबीच्या पंजाब सीमेवर सोयीस्कर अशा कोणत्याही ठिकाणी भारत हल्ला चढवेल असाच या धमकीचा गर्भितार्थ होता. चव्हाणांनी लष्करप्रमुखांना पंजाब सीमेवरील सैन्यांना सावध करण्याच्या सूचना दिल्या. पंजाब-सिंध सीमांवर सैन्याच्या तुकड्या उभ्या राहिल्या.

शास्त्रींच्या घोषणेमुळे अर्थातच आयुबखानांचे पित्त खवळले. त्यांच्या १ मे १९६५ च्या भाषणात ते गरजले "भारताच्या या अशा रणनीतीची परिणती भारत आणि पाकिस्तान यांच्यामधील सर्वंकष युद्धात होईल ही गोष्ट भारताच्या डोक्यात शिरते आहे का?" चव्हाणांनी आयुबखानांच्या या आक्षेपाला सणसणीत उत्तर दिले. त्यांनी सांगितले, "जर कोण्या देशाने भारताविरुद्ध युद्ध पुकारले तर भारताला ते आव्हान स्वीकारावेच लागेल आणि त्याला प्रत्युत्तरही द्यावे लागेल." सर्वंकष युद्धाच्या आयुबखानांनी दिलेल्या धमकीबाबत ते म्हणाले, "शब्दांनी काही कुणाची हाडं मोडत नाहीत. असल्या शाब्दिक वल्गनांना आम्ही भीका घालत नाही!"

कच्छच्या रणामधील घटनांच्या संदर्भात चव्हाण म्हणतात, "कच्छच्या रणामधील आक्रमणामुळे भारतीय सैन्याच्या तयारीची आणि बळाचीही कल्पना पाकिस्तानला आली असेल." अर्थात त्याच वेळी अशीही कबुली चव्हाणांनी दिली होती, "आमचे लक्ष मुख्यतः उत्तरेकडील सीमांवर होते, कारण तिथे कुठलाही धोका पत्करण्याची आमची तयारी नव्हती. पाकिस्तानची खुमखुमी नेहमीच जागृत आहे हे आम्हाला ठाऊक होते. कच्छच्या रणाच्या समस्येबाबत आम्हाला अधिक वास्तववादी भूमिका स्वीकारावी लागली. तडजोडीच्या बाबत आम्हाला समाधानकारक म्हणावे इतपत यश मिळालेले आहे." अर्थात हे यश समाधानाइतपतच होते; संपूर्ण समाधान देणारे नव्हते!

काश्मीरमधील युद्धबंदी रेषेचा भंग करणारी प्रकरणेही एकीकडे चालू होतीच. पाकिस्तानने भारतीय हद्दीत केलेल्या आक्रमणांना भारतीय सेना चोख उत्तर देत राहिल्या होत्या. अर्थात यामुळे पाकिस्तानच्या लष्करी महत्त्वाकांक्षांना कोणत्याही

प्रकारे आळा बसणे अर्थातच शक्य नव्हते. चव्हाणांनी म्हटले होते–" कच्छच्या रणासंबंधातील करार झाल्यावर आम्हाला असे वाटले होते की पाकिस्तान आता शांततामय सहजीवनाचा मार्ग स्वीकारील आणि लष्करी धाडस करण्याचा मार्ग पुन्हा स्वीकारणार नाही." परंतु मे १९६५ मध्येच रावळपिंडीमध्ये मोठ्या गनिमी आक्रमणाच्या नव्या योजना पुन: आकार घेऊ लागल्या होत्या. या योजनेचा एक भाग म्हणून, आझाद काश्मीरमधील १६ ते २५ या वयोगटातील तरुणांना लष्करी प्रशिक्षण द्यायला पाकिस्तानने सुरुवात केली होती. एका खास 'मुजाहिद' दलाची उभारणी केली होती आणि मुलकी व्यवसायातील १,५०,००० नागरिकांनाही लष्करी प्रशिक्षण देऊन एक राखीव दल निर्माण केले होते. प्रशिक्षण पूर्ण करून हे लोक पुन्हा आपापल्या नोकरी–व्यवसायात रुजू झाले होते. त्यांच्या धन्यांना अशी कल्पना दिलेली होती की अल्प सूचनेवरूनही या लोकांना देशसेवेसाठी नोकरीतून मुक्त करावे लागेल. याशिवाय सैन्याच्या नियंत्रणाखाली राहणारे ८,५०० लोकांचे एक स्वयंसेवक दलही निर्माण केले होते.

चव्हाण सांगतात, " ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात विझगापट्टमच्या नौदल-केंद्राला भेट देण्यासाठी मी गेलो होतो. मी तेथे पोहोचलो त्याच दिवशी दुपारी मला तातडीने दिल्लीला बोलावून घेणारा पंतप्रधानांचा संदेश आला. त्या वेळ-पर्यंत पाकिस्तानी गनिमी सैनिक भारतात घुसले होते." चव्हाण दिल्लीला पोहोचताच शास्त्रीजींच्या निवासस्थानी मंत्रिमंडळाची एक बैठक भरली. चार तास चर्चा होऊन भारताने या युद्धाला तोंड देण्यासाठी काय योजना करावी ते ठरविले गेले. दिल्लीहून असे सांगितले गेले होते की, ९ ऑगस्टपर्यंत सुमारे ३,००० गनिमी सैनिकांनी युद्धबंदी रेषा ओलांडून भारतात प्रवेश केला आहे. ७ ऑगस्टला या गनिमी सैनिकांनी पूंछजवळचे मंडी हे शहर जिंकले व सुमारे चार दिवस आपल्या ताब्यातही राखले. त्याच दिवशी रात्री 'बारामुल्ला' गावाजवळ श्रीनगरकडे जाणाऱ्या रस्त्यावर अनेक गनिमी सैनिकांना भारतीय तुकड्यांनी पकडले. ८ ऑगस्ट रोजी शेख अब्दुल्ला यांना अटक होऊन पदच्युत केल्याच्या घटनेला वर्ष पुरे होत होते. त्या निमित्ताने आयोजित केलेल्या निदर्शनांमध्ये भाग घेण्यासाठी गनिमी सैनिकांचा एक मोठा गट श्रीनगरच्या दिशेने निघाला होता.

पाकिस्तानच्या या छुप्या लष्करी आक्रमणांना तोंड देण्याच्या अनेक योजना

दिल्लीमधील आर्मी हेडक्वार्टर्समध्ये तयार होत्या. काश्मीरवर सशस्त्र सैनिकी दबाव आणल्यास प्रतिहल्ल्यांना तोंड देण्यास तयार राहा अशा अर्थाच्या सूचना नेहरू आणि त्यांच्यानंतर शास्त्री, यांनी रावळपिंडीला वारंवार दिलेल्या होत्याच. नेहरूंनी तर १९६२ मध्येच सांगितले होते, "पाकिस्तानने जरी 'चुकून' सुद्धा काश्मीरवर आक्रमण केले तरी त्याची परिणती भारत आणि पाकिस्तानमधील सर्वंकष युद्धात होईल." वेगवेगळ्या परिस्थितींना तोंड देण्याची वेळ आली, तर त्यासाठी आपल्या सैन्यदलाची काही निश्चित धोरणे अथवा योजना तयार आहेत का असा प्रश्न जनरल चौधरींना विचारला होता, तेव्हा ते म्हणाले होते की जुलैच्या मध्यालाच, म्हणजे काश्मीरमध्ये घूसखोर सैनिक येण्यापूर्वीच अशा योजना तयार होत्या. जुलैमध्ये एका सकाळी पंतप्रधान, संरक्षणमंत्री व सेनादल-प्रमुख, पंतप्रधानांच्या कचेरीत भेटले होते तेव्हाच निर्णय घेतले गेले होते.

चव्हाण म्हणतात, "शास्त्री हे मला एक अतिशय उत्तम नेते वाटले. ते निर्णय घेत असत आणि घेतलेल्या निर्णयाला चिकटूनही राहात असत. त्यांनी मला अपार सहकार्य दिले आणि मी त्यांना माझ्या संपूर्ण निष्ठा वाहिल्या. एखाद्या विशिष्ट विभागात आपण एखादी हालचाल केली तर त्याबाबत पाकिस्तानची प्रतिक्रिया काय होईल असा प्रश्न पंतप्रधान मला नेहमी विचारत. पाकिस्तानच्या शक्य त्या सर्व हालचालींबाबत आम्ही विचार करत असू. १९४७ मध्ये केले त्याप्रमाणे संपूर्ण काश्मीर खोऱ्यावर सरळ हल्ला करणे त्यांना शक्य होते; किंवा छांब विभागावरही ते हल्ला चढवू शकत होते. आम्ही एक गोष्ट निश्चित केली होती—कोणत्याही दिशेने पाकिस्तान्यांचा हल्ला येवो, आपण प्रत्युत्तरादाखल हल्ला चढवायचा तो पंजाबमध्येच! या हल्ल्याच्या योजनाही तयार करून ठेवण्यात आलेल्या होत्या."

काश्मीरमधील या घटना, पाकिस्तानी आक्रमण आणि त्याला तोंड देण्यासाठी भारताने योजलेले उपाय इ. बाबतचे एक अतिशय समर्पक निवेदन १६ ऑगस्ट १९६५ च्या लोकसभेत चव्हाणांनी केले. भारताची संपूर्ण बाजूच त्यांनी मांडली. २३ ऑगस्टला लोकसभेसमोर ते अधिक आत्मविश्वासाने उभे राहिले. त्यांनी घोषणा केली की सर्व पाकिस्तानी हल्ले भारताने पूर्णपणे परतवून लावले आहेत आणि शत्रुसेना मोठ्या प्रमाणावर जायबंदी केली आहे. ते म्हणाले, "जम्मू-काश्मीरमधील या मोहिमेचे एक प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे युद्धबंदी रेषेच्या

भारतीय बाजूला घूसखोरांना पाकिस्तानी सेनेने दिलेला भरभक्कम आधार! छांब आणि टिथवाल विभागात पाकिस्तानी सैन्याने तोफखाना दल घुसवून भारतीय ठाण्यांवर भडिमार करायला सुरुवात केली होती. अर्थात या युद्धाचा निकाल पाकिस्तानच्या बाजूने लागू शकलेला नाही. पाकिस्तानचे सर्व हल्ले परतवून लावण्यात आलेले आहेत. त्यांच्यातील जखमींची संख्याही भरपूर मोठी आहे आणि युद्धबंदी रेषेवरील आपली सर्व ठाणी आपण आपल्याकडेच राखलेली आहेत."

१ सप्टेंबर ला छांब विभागात एक नवीनच संकट भारतीय सैन्यासमोर आ वासून उभे होते. सरसेनापती जनरल चौधरी यांच्या असे लक्षात आले होते की, इतर सर्व तांत्रिक गैरसोयींइतकीच घातक गोष्ट म्हणजे या विभागातील हल्ल्याला तोंड देण्यासाठी आवश्यक तेवढा भरभक्कम दारूगोळ्याचा साठा सैन्याजवळ नव्हता. प्रत्यक्ष रणांगणावरील सेनानींच्या विनंतीनुसार दुपारी ४ वाजता त्यांनी भारतीय हवाई दलाची मदत घेण्याचे ठरविले. आपली गरज त्यांनी संरक्षण-मंत्र्यांना कळवली. ही मदत घेतली नसती तर पाकिस्तानी रणगाडे झपाट्याने पुढे घुसले असते. पश्चिम विभागाचे लष्करप्रमुख लेफ्टनंट जनरल हरबक्ष सिंग यांनी असा आग्रह धरला की हवाई दल मदतीला बोलवाच. फारसा वेळ नव्हताच. हवाई-दल प्रमुखांशी संपर्क साधून त्यांची संमती मिळवली. चव्हाणांनीही लगेच 'आगे बढो 'चा इशारा दिला.

चव्हाण या युद्धाच्या संदर्भात अशी प्रतिक्रिया व्यक्त करतात—

" भारत पाकिस्तान युद्धाने आर्थिक दृष्ट्या आपल्यावर ताण निर्माण झाला. आर्थिक आघाडीवर अनेक ठिकाणी आपणास माघार घ्यावी लागली. पण आपल्यापेक्षा पाकिस्तानला जास्त नुकसान सोसावे लागले आहे. त्याच्या आर्थिक योजना धुळीस मिळाल्या. १९६५ च्या युद्धानंतर आयुबखान सतत धोक्यात होता. पाकिस्तान आपल्या सैनिकी शक्तीवर वाजवीपेक्षा जास्त भर देत असे. पाकिस्तानी पद्धतीतील हा सर्वांत मोठा दोष होता. युद्धसमाप्तीनंतर हा दोष उघडच झाला. शेवटी आयुबखानचाच त्याने बळी घेतला."

"प्रारंभी आर्थिक आघाडीवर चांगले यश मिळाले. हुकुमशाही नवीनच होती आणि तीच आपल्याला फायदेशीर आहे अशी भावना तेथील जनतेत निर्माण करण्यात पाकिस्तान सरकार यशस्वी झाले. पण त्यांचे सर्व नियोजन

सामाजिक उद्दिष्टांना बाजूला ठेवून झाले. किंमती वाढल्या. बेकारी वाढली. त्यामुळे असंतोषही वाढला."

"पाकिस्तानने एक पंचवार्षिक योजना तयार केली आहे. सामाजिक ध्येयाचा ते आता विचार करू लागले आहेत. पूर्व आणि पश्चिम पाकिस्तानात प्रादेशिक आर्थिक असमतोल आहे. आज त्यांनी आर्थिक विकास, सामाजिक न्याय आणि प्रादेशिक आर्थिक असमतोल कमी करणे ही तीन उद्दिष्टे ठेविली आहेत. त्यांना ती साध्य करण्यात किती यश मिळेल हे मला सांगता येणार नाही. निवडणुकीनंतर पाकिस्तानात राजकीय लोकशाही येईल अशी मला आशा आहे. पण मी जेव्हा भविष्य काळाचा विचार करतो तेव्हा मला धोकेच जास्त दिसतात. कदाचित पाकिस्तान आपल्या सीमेवर पुन्हा हल्ला करील."

१९६५ च्या भारत-पाकिस्तान युद्धाने चव्हाणांना एक कीर्तिवलय दिले. सैनिक आणि जनता चव्हाणांच्याकडे एक समर्थ नेता म्हणून पाहू लागली. यशवंतरावांचे युद्ध-नेतृत्व हा त्यांचा अभिमानाचा विषय झाला.

शब्दांकन : **सुधीर गाडगीळ**

## विकट काळातील गृहमंत्रिपद

यशवंतराव चव्हाणांनी दि. १४ नोव्हेंबर १९६६ या दिवशी भारताचे गृहमंत्रिपद स्वीकारले तेही अनिच्छेने. कारण संरक्षणमंत्री म्हणून ते यशस्वी होत होते. त्या खात्याच्या प्रश्नात अनोखेपण होते. युद्धकाळातून ते यशस्वी रीत्या बाहेर पडले होते. त्या यशाचे वलय होते. पण त्या यशामुळेच व त्या काळात दाखविलेल्या निर्णयक्षमतेमुळेच गृहमंत्रिपद घ्यावे लागले होते. श्री. गुलझारीलाल नंदा यांनी गोवध बंदीचा प्रश्न ज्या रीतीने हाताळला होता त्यामुळे संसदीय काँग्रेसने त्यांचा राजीनामा मागितला होता. त्यांनी तो दिल्यावर इंदिराजींनी तत्क्षणी स्वीकारला व यशवंतरावांना आपण गृहमंत्री करणार असल्याचे त्या वेळचे काँग्रेस अध्यक्ष श्री. कामराज यांना कळविले. या त्यांच्या निवडीबद्दल अर्थातच चव्हाणांच्या प्रतिस्पर्ध्यांना हेवा वाटला, पण इंदिराजींनी आपला निर्धार कायम ठेवला आणि १४ नोव्हेंबर १९६६ ला यशवंतराव गृहमंत्री झाले.

गृहमंत्रिपद स्वीकारल्यावर तीन तातडीचे प्रश्न समोर होते. त्याविषयी यशवंतराव म्हणाले, "मला निकडीच्या तीन प्रश्नांना तोंड द्यावे लागले. विद्यार्थ्यांचे आंदोलन, गोवधाविरुद्ध चालू असलेले आंदोलन व तिसरा संत फत्तेसिंगांचे उपोषण व आत्मदहनाचा निर्धार." चंदिगड हे पंजाबला मिळाले पाहिजे ही फत्तेसिंगांची मागणी होती.

चव्हाण गृहमंत्री झाल्यावर चारच दिवसांनी संसदभवनासमोर आंदोलक विद्यार्थ्यांचा प्रचंड मोर्चा आला होता. चव्हाण हे कायदा व सुव्यवस्था या दृष्टीने विद्यार्थ्यांच्या आंदोलनाकडे पाहावे या मताचे नव्हते. त्यांनी आपल्या खात्याच्या सल्लागार समितीपुढे आपली भूमिका स्पष्ट केली. ते म्हणाले, "वृद्धांची पिढी तरुणांच्या आशा, आकांक्षा व त्यांचे नैराश्य समजून घेण्यास तयार नाही. आपण तरुणांना नवा ध्येयवाद दिला पाहिजे व तो व्यवहारात आणण्याची संधी दिली पाहिजे. भारताची समृद्धी व प्रगती यासाठी आपल्या देशाचा जो महान प्रयत्न चालू आहे, त्यात त्यांना सहभागी करून घेतले पाहिजे. विद्यार्थ्यांतील असंतोष आजच्या सामाजिक, आर्थिक परिस्थितीतून निर्माण झाला आहे आणि तो केवळ भारतातच आहे असे नाही."

मोर्चे, निदर्शने यांना हाताळण्यासाठी पोलिसांनी नवे मार्ग, नवी साधने शोधली पाहिजेत असे चव्हाणांचे मत होते. याविषयी बोलताना चव्हाण म्हणाले, "निदर्शने झाली की जमाव जमतो. तो पांगवण्यासाठी पोलिस बंदूक वापरतात. विद्यार्थ्यांविरुद्ध असाच आपल्या शक्तीचा बेछूट वापर पोलिसांनी केला म्हणून जमाव नियंत्रणाचा अभ्यास करण्यासाठी मी एक समिती नेमली. जपान-मध्ये जमाव थोपविण्यासाठी प्रचंड पोलिस दल उभे करतात. ती कल्पना मला आवडली. पोलिसांना मार खाण्याचीही तयारी ठेवावी लागते. मी तसे आदेश दिले आहेत. पण पोलिसांनी ही पद्धत अद्याप स्वीकारली आहे असे मला वाटत नाही. बंदुकीऐवजी लाठ्या वापरा असे आम्ही पोलिसांना सांगितले आहे. पण झाले असे की पोलिसांनी लाठ्याच बंदुकीसारख्या वापरावयास सुरुवात केली. बदल घडून येण्यासाठी दीर्घ प्रशिक्षणाची गरज असते. केवळ आदेश देऊन भागत नाही. ही अखंड चालणारी प्रक्रिया असते. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी असे प्रशिक्षण द्यावयास हवे व त्या पद्धतीसाठी त्यांनाही तयार करावे लागेल. तरच त्यांना आपल्या हाताखालच्या पोलिसांना शिकविता येईल. मला वाटते हा उपक्रम

दीर्घकाळ चालणारा आहे."

चव्हाणांना गृहमंत्रिपदाच्या सुरुवातीच्या महिन्यात गोवधबंदी आंदोलनास तोंड द्यावे लागले. याविषयी चव्हाण म्हणाले, "आता निवडणुकी आल्या आहेत. स्वाभाविकपणे जनसंघ या आंदोलनाचे नेतृत्व करणार. मला याविषयी शंका नाही. या आंदोलनामुळे जातीय दंग्यांना निमित्त मिळाले. जातीय भावना चेतविल्या गेल्या. वरवर पाहता हे आंदोलन गोहत्याबंदीसाठी असले तरी त्याबाबत दोन गोष्टी लक्षात ठेवावयास हव्यात : एक म्हणजे ही चळवळ सरकारविरोधी आहे, दुसरे म्हणजे ती मुस्लिमविरोधी आहे. मी असे म्हणत नाही की या आंदोलनाच्या संघटकांनी मुस्लिम-विरोधी भाषणे केली. पण सर्व प्रवृत्ती प्रबळ हिंदुत्वाची होती. या मागणीचा हेतू समजून घेता येईल पण ज्या पद्धतीने हे आंदोलन चालविण्यात आले त्यावरून यामागे त्याचा हेतू असला पाहिजे. म्हणूनच ही चळवळ जातीय होती."

पाच दिवसांनी गोवध बंदीच्या मागणीस पाठिंबा दर्शविण्यासाठी पुरीच्या शंकराचार्यांनी दिल्लीत आमरण उपोषण करण्याची घोषणा केली. हे शंकराचार्य पूर्वाश्रमीचे श्री. चंद्रशेखर द्विवेदी. हे रामराज्य परिषदेचे सचिव होते. चव्हाणांचे मत होते की हे उपोषण दिल्लीत चालू राहिल्यास धार्मिक भावना उत्तेजित होतील. तेव्हा चव्हाणांनी एक अत्यंत धाडसी निर्णय घेतला तो म्हणजे शंकराचार्यांना दिल्लीतून हलविण्याचा. यासंबंधी अधिक माहिती देताना चव्हाण म्हणाले, "हा निर्णय घेणे अत्यंत जोखमीचे होते. कारण दिल्लीतले वातावरण तंग होते. सर्व पक्षांत परंपरावादी लोक आहेत. ते माझ्यावर रागावले होते. मी पंतप्रधानांना माझा निर्णय सांगितला होता. त्यांनी लगेच संमती दिली. महाराष्ट्रातील थोर नेते लोकनायक माधवराव अणे यांनी मला सांगितले की, हिंदू धर्माला वाईट रीतीने वागविले जात आहे व शंकराचार्यांची मुक्तता करून परत फिरून दिल्लीत आणले गेले नाही तर मी प्राणांतिक उपोषण सुरू करीन. मला परत शंकराचार्यांना दिल्लीबाहेर न्यायचे होते. कोणालाही न कळत त्यांना मी पाँडिचरीस हलविले. काही दिवसांनी त्यांना पुरीला नेण्यात आले व नंतर मुक्तता केली. या घटनेनंतर निषेधाच्या व अभिनंदनाच्या पत्रांचा माझ्यावर पाऊस पडला."

आणखी एका पेचप्रसंगाची माहिती चव्हाणांनी दिली. ती म्हणजे चंदिगड पंजाबला मिळावे म्हणून संत फत्तेसिंगांनी दिलेली उपोषणाची व आत्मसमर्पणाची

धमकी. याही काळजीत चव्हाणांची सत्त्वपरीक्षा झाली. पण हेही संकट टळले. तेव्हा दिल्लीच्या इंडियन एक्सप्रेसने लिहिले. " गृहमंत्री म्हणून चव्हाणांबद्दल झालेले संसदेचे मत चांगले होते. जी स्फोटक परिस्थिती चव्हाणांनी ज्या थंडपणे व कौशल्याने हाताळली तिने कसलेल्या मंत्र्यांची सुद्धा गाळण उडाली असती. "

हा पेच प्रसंग सुटतो न सुटतो तोच दिल्लीतील पोलिसांनी आंदोलन सुरू केले. यासंबंधी बोलताना चव्हाण म्हणाले, " मी गृहमंत्री झाल्याबरोबरच पोलिसांतील धुमसत्या असंतोषास मला तोंड द्यावे लागले. पोलिस अगदी बेशिस्त झाले होते. ते पोलिस ट्रकमध्ये बसूनच घोषणा करू लागले. त्यामुळे निदर्शनाचा बंदोबस्त करण्यासाठी आले आहेत की त्यांची सरकारविरोधी निदर्शने चालू आहेत हे कळत नसे. पोलिस इन्स्पेक्टर जनरल परेड घ्यायला म्हणून बराकीत गेले तेव्हा त्यांना शिस्तभंग करणाऱ्या पोलिसांचे ' दर्शन ' झाले. "

या अविश्वसनीय परिस्थितीत राष्ट्रपतिभवन, पंतप्रधानांचे निवासस्थान आदी ठिकाणांचे रक्षणासाठी ठेवलेले पोलिस तेथे राहू न देणे आवश्यक होते. या कृतीने पोलिस अधिक चवताळले व त्यांनी प्रचंड मिरवणूक काढली. माझ्या घराकडे ती मिरवणूक येत होती. तेव्हा वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांशी मी चर्चा केली. ते मिरवणूक माझ्या घरापर्यंत पोहोचण्याआधीच अडवणार होते, मला त्यांनी असे करणे पसंत नव्हते. कारण असा प्रतिबंध करण्याचा प्रयत्न केला की संघर्ष अटळ असतो. माझ्या घरापर्यंत येणारी पोलिसांची मिरवणूक अधिकारी आडवू शकले नाहीत. पोलिसांनी माझ्या घराला वेढा घातला होता, आणि रात्रभर त्यांच्या घोषणा मी ऐकत होतो. मी दुसरे दिवशी निदर्शने करणाऱ्या पोलिसांना बाहेर येऊन सांगितले की " तुम्ही जे करीत आहात ते गैर आहे. आता दोन तासांत पोलिस ठाण्यावर जाऊन कामावर हजर व्हा. तर तुम्हाला झाल्या गोष्टीची मी क्षमा करीन. नाहीतर सरकारला योग्य कारवाई करणे भाग पडेल. "

या आंदोलकांना संयुक्त समाजवादी पक्ष व डॉ.लोहिया चिथावणी देत होते. या परिस्थितीचे वर्णन करताना चव्हाण म्हणाले, " त्या वेळी पंतप्रधान उत्तर प्रदेशात होत्या. मी त्यांना निरोप पाठवून परिस्थिती गंभीर असल्याचे कळविले. सूर्यास्त व्हायच्या आत मी सैन्य बोलाविले. ५०० पोलिसांना अटक केली. पोलिसांच्या मागण्यांचा विचार करण्यासाठी एक चौकशी मंडळ नेमले. त्यांच्या काही मागण्या लगेच मान्य केल्या. " चव्हाणांनी पोलिसात ट्रेड युनियन होऊ दिली नाही. पण

त्यांच्या कल्याण योजनेवर देखरेख ठेवणाऱ्या पोलिस कर्मचारी संघास काम करू दिले.

केंद्र सरकारच्या गृहखात्याचे मुख्य काम देशातील सुव्यवस्था सांभाळणे हे असले तरी त्यांच्या जबाबदाऱ्यांची यादी मोठी आहे. नेफा, मणिपूर, केंद्रशासित प्रदेश ही सर्व त्यांच्या कक्षेत येतात. पण यशवंतराव चव्हाण गृहमंत्री झाल्यावर फेब्रुवारी १९६७ मध्ये झालेल्या सार्वत्रिक निवडणुकांनी या देशाचे राजकीय चित्रच बदलले. त्यातून जे प्रश्न निर्माण झाले ते अधिक गंभीर व मूलगामी स्वरूपाचे होते. त्यासंबंधी यशवंतराव म्हणाले, "या निवडणुकीनंतर जे महत्त्वाचे प्रश्न निर्माण झाले, त्यामुळे संसदेत व वृत्तपत्रांत वाद, संघर्ष सुरू झाले. भारताच्या गृहखात्यास अगदी वेगळ्या धर्तीच्या समस्यांना तोंड द्यावे लागले. १९६७ पर्यंत एक चिरेबंदी सत्ता होती. केंद्र व राज्य सरकारे यामध्ये तणाव बहुधा नसतच. १९६७च्या निवडणुकीनंतर भारताचे राजकीय स्वरूप पालटले. विविध विरोधी विचारसरणींची राज्य सरकारे आली. काही अती उजवी तर काही अती डावी. उत्तर प्रदेश, मध्यप्रदेश व राजस्थानमध्ये जी काँग्रेस सरकारे राज्यारूढ झाली त्यांना पुष्कळ अडचणींना तोंड द्यावे लागले. केंद्र व राज्याचे संबंध ही बाब नाजूक झाली. मला अनेक धक्के सहन करावे लागले. गुंतागुंतीच्या प्रश्नांना तोंड द्यावे लागले. राज्यपालांचे अधिकार, राज्य विधानसभांचे कार्य या सर्व बाबत केंद्रीय गृहमंत्र्याला जोखीम पत्करावी लागली. अगदी अनोळखी वाटेने मला जावे लागले."

केंद्रामध्ये काँग्रेस व अनेक राज्यांत काँग्रेसेतर पक्ष सत्तारूढ होते. अशा परिस्थितीत सरकार चालवायचे तर सह-अस्तित्व व सहकार्यानेच ते करणे आवश्यक होते, याची जाणीव इंदिराजींना होती तशीच अन्य पक्षनेत्यांनाही होती. पण परस्पर-विरोधी विचारप्रणालींना बांधलेले हे नेते, शिवाय प्रत्येक राज्याची आर्थिक व सामाजिक स्थिती वेगवेगळी होती. सहकार्य करण्याची इच्छा असली तरी मतभेद होणे अपरिहार्य होते. यशवंतरावांवर केंद्र व राज्यसंबंध सुस्थितीत ठेवण्याची जबाबदारी होती. कारण या कामगिरीचे स्वरूप स्पष्ट करताना यशवंतराव म्हणाले, "सर्व संघराज्य सरणीत केंद्र व राज्य यांचे मतभेद अपरिहार्य असतात. गरज होती ती सहकार्य करायचे या भावनेची. पंतप्रधान नेहमीच सहकार्य करण्याचा विचार करीत. आमचे मतभेद होते ते पश्चिम बंगाल व केरळ या राज्यांतील

संयुक्त आघाडींच्या सरकारशी. तोही प्रवृत्ति-भेद होता. विरोधक कायदा व सुव्यवस्थेच्या समस्येबद्दल आमचे या दोन्ही सरकारशी जमले नाही हे खरे आहे." कधी अन्नप्रश्न, कधी उद्योगधंदे, कधी गोवधबंदी असे मतभेदाचे विषय बदलत राहिले. पण लोकांची राहणी व जीवनपद्धती यांच्याकडे पाहण्याची आमची तत्त्वदृष्टीच भिन्न होती, त्यामुळे संघर्ष अटळ होता. सत्तेचे सर्व अधिष्ठानकेंद्र सरकारात आहे ही काँग्रेस पक्षाची पक्की समजूत.

पहिला तीव्र संघर्ष पश्चिम बंगाल सरकारशी सुरू झाला. त्या सरकारवर डाव्या कम्युनिस्टांचे वर्चस्व होते. तेथे 'घेराव' म्हणून ओळखला जाणारा निदर्शनांचा नवीनच प्रकार सुरू झाला. मार्च ते ऑगस्ट १९६७ या सहा महिन्यांत त्या राज्यात ९१५ घेरावचे प्रकार झाले. पैकी फक्त कलकत्त्यात ३१९ होते. म्हणून चव्हाणांनी लोकसभेत सांगितले की घेराव हा बेकायदेशीर प्रकार असून मालक-मजूर, व राज्य सरकारे यांनी घेरावाचे प्रकार घडू देता कामा नयेत. यावर टीका झाली तेव्हा चव्हाणांनी पुन्हा सांगितले की, घेराव करणे हा दखलपात्र गुन्हा आहे. माहीत होते की मुख्यमंत्री अजय बाबूंना घेराव पसंत नव्हता. पण ते असहाय होते. जाहीरपणे त्यांच्या विरुद्ध काही करण्याची त्यांची हिंमत नव्हती. कारण ते स्वतः संयुक्त आघाडीचे नेते होते. आघाडी जे सांगेल ते करणे त्यांना भाग होते. हे प्रकरण संपले.

१९६७ मध्ये आणखी एक मूलभूत समस्या उभी राहिली.

नक्षलवादीमधे शेतकऱ्यांनी जमिनीचा ताबा घेतला. जून १९६७ मध्ये पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्र्यांनी ही घटना केंद्र सरकारला कळविली. ही चळवळ चीनवादी असल्याचे अनधिकृत रीत्या मुख्यमंत्र्यांनी केंद्र सरकारला कळविले. धर्मवीर त्या वेळी प. बंगालचे राज्यपाल होते. त्यांनी प. बंगालचे मंत्रिमंडळ २१ नोव्हेंबर १९६७ मध्ये बडतर्फ केले. त्यातच दि. २९ ला प. बंगाल विधिमंडळाच्या सभापतींनी अजय घोष यांचे सरकारच घटनाबाह्य आहे असा अभिप्राय देऊन विधिमंडळाचे अधिवेशन बेमुदत स्थगित केले. चव्हाणांनी दि. ३ नोव्हेंबर रोजी लोकसभेत निवेदन करून राज्यपालांचा मंत्रिमंडळ बड-तर्फीचा निर्णय देशहिताच्या व लोकशाहीच्या रक्षणाच्या हेतूने हा घेण्यात आला असल्याचे जाहीर केले. ४ फेब्रुवारी १९६८ ला पुन्हा विधिमंडळाचे अधिवेशन भरले तेव्हा सभापतींनी पुन्हा ते बेमुदत स्थगित केले.

विविध राज्यांतील घटनाविषयक पेचप्रसंगांचा हा प्रारंभ प. बंगालमध्ये झाला होता. चव्हाण याविषयी माहिती देताना म्हणाले, " ज्या राज्यात कोणत्याच पक्षाला स्पष्ट बहुमत मिळाले नव्हते तेथे पक्षसामर्थ्य हे राज्यपालांच्या निर्णयावर अवलंबून असे. उत्तर भारतातील उत्तर प्रदेश, बिहार, हरयाणा, मध्यप्रदेश या राज्यांतील संमिश्र सरकारे कॉंग्रेसच चालवत होती. कारण तेथे कॉंग्रेसमधून बाहेर पडणाऱ्यांची संख्या मोठी होती. पण कोणत्याही दोन राज्यांतील राजकीय स्थिती एकसारखी नव्हती. मात्र गृहमंत्री म्हणून मला प्रत्येक ठिकाणची परिस्थिती पाहून निर्णय घ्यावे लागले. त्यामुळे पक्षपाताचे आरोपही झाले. मुख्य वादाचा मुद्दा राज्यपालाचे अधिकार यासंबंधी घेतलेले निर्णय हा होता."

यासंबंधी चव्हाण म्हणाले, " सामान्यतः राज्यपालाने विवेकानुसार निर्णय घ्यावे की मुख्यमंत्र्यांच्या मताशी बांधले जावे असा मुख्य प्रश्न होता. साधारणपणे मुख्यमंत्र्यांचा सल्ला राज्यपालाने मानावा. परंतु परिस्थितीच असाधारण असेल तर राज्यपाल त्याचा सल्ला नाकारू शकतो. मुख्यमंत्र्यावरच जेव्हा अविश्वासाचा ठराव येत असेल आणि विधानसभा भंग न करता तहकूब ठेवण्याचा त्याचा प्रयत्न असेल तर राज्यपालाने स्वतःच्या मनाप्रमाणे निर्णय घेतला पाहिजे. सदैवच राज्यपालास स्वतःच्या मनाप्रमाणे निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य दिले तर तो संघराज्य सरणीचा ( फेडरल सिस्टम ) अंत ठरेल. मला एकदा असे वाटले होते की, राज्यपालांनी याबाबत कसे निर्णय घ्यावे याची एक सूचना जंत्री तयार करावी. पण तो विचार मी सोडून दिला. घटनाविषयक प्रश्नात राज्यपालांना प्रमुख विधान अधिकाऱ्यांनी ( ॲटर्नी जनरल ) असे सुचविले आणि चांगल्या प्रथा पाडूनच हे प्रश्न सुटतील असा निष्कर्ष मी काढला."

या काळात उद्भवलेला आणखी एक मुख्य महत्त्वाचा प्रश्न म्हणजे पक्षांतराचा किंवा पक्षबदलूंचा. चव्हाणांनी पक्षांतराविषयी केलेला अहवाल ही गृहमंत्री म्हणून त्यांची महत्त्वाची कामगिरी. चव्हाण या प्रश्नाचे स्वरूप व गांभीर्य स्पष्ट करताना म्हणाले, " पक्षांतरामुळे लोकशाहीचा तमाशा झाला आहे. प्रशासन थंड पडले आहे. पक्ष बदलणारे विधानसभा सदस्य केवळ केंद्र सरकारलाच नव्हे तर लोकशाहीच्या कार्यसंचलनास आव्हान देत असतात. पक्षांतराविषयी आम्ही तयार केलेला सूचना–प्रबंध हा भारतीय राजकारणाच्या सर्व अभ्यासकांच्या दृष्टीने उपयुक्त असा दस्तऐवज आहे. सर्व राजकीय पक्षांना स्थित्यंतराच्या अवस्थेतून

जाते लागते. त्या काळात फूट पडणे व विलीनीकरण घडून येणे अपरिहार्य असते. पण सगळ्यात अनिष्ट गोष्ट असेल ती म्हणजे केवळ व्यक्तिस्वार्थासाठी व जवळच्या मार्गाने सत्ता मिळविण्यासाठी केले जाणारे पक्षांतर. आम्ही असे सुचविले आहे की पक्ष बदलणार असेल त्याला एक वर्षभर मंत्री होण्यास अपात्र ठरविण्यात यावे." चव्हाणांना काँग्रेसही या पक्षांतराच्या कर्मात सहभागी झाली होती काय असे विचारता ते म्हणाले, "यात प्रत्येक पक्षाचा वाटा आहे." जवळ जवळ सर्व उत्तर हिंदुस्थान व प. बंगाल येथे राष्ट्रपती शासन होते. यासंबंधी चव्हाण म्हणाले, "माझी स्थिती अशी होती की गृहमंत्री झाल्यावर पहिले सहा महिने मला ८ किंवा १० राज्यपालांच्या नेमणुकीसाठी नावे सुचवावी लागली. राज्यपाल होण्यासाठी मी ज्यांची नावे सुचविली ते सर्वच त्यास राजी होते हे खरे नाही. हे पद स्वीकारण्यासाठी पुष्कळांचे मन मला वळवावे लागले."

१९६६ व १९६८ या दोन वर्षांत गृहमंत्री या नात्याने चव्हाणांना एका पाठोपाठ एक पेचप्रसंगांना तोंड द्यावे लागले. भारताचे राजकीय स्थैर्य, लोकशाही प्रथांची जपणूक, राज्यघटनेचे व्यावहारिक प्रशासन, संघराज्य सरणीचे संरक्षण, केंद्र–राज्य संबंध, बहुपक्षीय राज्यसरकारे या सर्व प्रश्नांनी याच काळात उचल खाल्ली. चव्हाणांचे व्यावहारिक शहाणपण व चतुराई यांच्या कसोटीचा हा काळ होता. याच काळात भारताचे दोन मूलभूत प्रश्न उग्र स्वरूपात पुढे आले. पण चव्हाणांनी या प्रश्नांचा मुळापासून अभ्यास व संशोधन करण्यासाठी गृह-मंत्रालयातील संशोधन विभागास कार्यचालना दिली. त्यांनी जमविलेली माहिती किंवा तयार केलेले सूचना–प्रबंध आजही अभ्यासकांना उपयोगी पडण्यासारखे आहेत, इतके ते व्यासंगपूर्ण आहेत. चव्हाणांनी हिंदु-मुस्लिम दंग्यांचा ७० वर्षांचा अभ्यास करवून घेतला. याची माहिती देताना चव्हाण म्हणाले, "कायदा व सुव्यवस्था यांच्याच दृष्टिकोणातून केवळ या हिंसाचाराचा विचार आम्ही केला नाही. त्याच्या मुळाशी आम्ही गेलो. त्या प्रश्नाची सामाजिक बाजू तपासली. हिंसाचाराची समाजशास्त्रीय व आर्थिक कारणे शोधण्याचा प्रयत्न केला. या अभ्यासाचा आधार आमच्या धोरणाला असे. तसेच आम्ही दिल्लीतील प्रशासन-संस्थेस हरिजनांचे आर्थिक–सामाजिक प्रश्न अभ्यासावयास सांगितले. सामाजिक दृष्ट्या ते कितपत सामावले गेले आहेत याचा अभ्यास करावयास सांगितले."

तसेच पोलिस खात्यात संशोधन विभाग सुरू केला. जमावाची हिंसा नियंत्रित

करण्यासाठी काय केले पाहिजे इत्यादी विषय त्यांनी अभ्यासले.

चव्हाणांच्या कारकीर्दीतील दोन विषयांच्या अभ्यासांचा उल्लेख केला पाहिजे. एक म्हणजे शेतकऱ्यांतील असंतोष व दुसरा हिंदु-मुस्लिम जातीय दंगे.

ग्रामीण शेतमजुरांच्या स्थितीची पाहणी राष्ट्रीय श्रम आयोगाने केली होती. त्यांनी निष्कर्ष काढला तो असा की, १० वर्षांत किमान वेतनात वाढ झालेली नाही आणि किमान वेतन कायदा मृतवत झालेला आहे. गृहमंत्रालयाने जी पाहणी केली तिचा निष्कर्ष असा की, ग्रामीण भारतात दोन वर्गातील, दोन विभागांतील विषमता अधिक नजरेस भरण्याइतकी वाढली आहे. म्हणून गृहमंत्रालयाने राज्य सरकारांना ही विषमता कमी करण्यासाठी तातडीचे उपाय योजण्यास सांगितले. इतकी विषमता असताना ग्रामीण मजुरांनी मजुरीच्या वाढी-साठी आंदोलने केली तर त्यात आश्चर्य नाही. केरळ, आंध्र, तामिळनाडू, बिहार, ओरिसा व प. बंगाल या राज्यांत शेतमजुरांची आंदोलने सुरू झाली होती म्हणून शेतकरी बंड करतील असा इशारा राज्य सरकारांना दिला. प. बंगालमध्ये निर्माण झालेल्या नक्षलवादी चळवळीबद्दल चव्हाणांची भूमिका समंजस होती. चव्हाण म्हणाले, " मार्क्सवादी पक्षातील अतिजहाल पंथाने नक्षलवादी ही चळवळ सुरू केली व एक नवी राजकीय परिभाषा रूढ केली. नक्षलवादी हा एक नवीन शब्द राजकीय शब्दकोशात समाविष्ट केला गेला. त्यांचा ध्येयवाद चिनी ध्येय-प्रणाली आणि तंत्र यांच्याशी निश्चित मिळताजुळता होता. भारताच्या सीमेवरच त्यांचे कार्य चालू असल्यामुळे या चळवळीस अधिक महत्त्व प्राप्त झाले व ती अधिक धोकादायक वाटू लागली. "

केंद्राचे नक्षलवाद्यांसंबंधीचे धोरण काय होते असे विचारता चव्हाण म्हणाले, " आम्ही नक्षलवाद्यांच्या चळवळीची आर्थिक व सामाजिक कारणमीमांसा करण्याचा प्रयत्न केला. मी अधिक मूलगामी पद्धतीने या प्रश्नाचा विचार करू इच्छीत होतो. राज्यसरकार अर्थातच तातडीच्या प्रश्नांचा अधिक विचार करतात. पण आम्हाला केंद्र सरकारमध्ये त्याचा राष्ट्रीय भूमिकेतून विचार करावा लागतो व त्यातून मार्ग काढावा लागतो. राज्य सरकारला हे प्रश्न सोडविण्यासाठी काही मदत करता येईल का हेही पाहावयाचे असते. "

चव्हाणांच्या मते नक्षलवादींतील परिस्थिती ही आजच्या भारताची प्रातिनिधिक आहे. नक्षलवाद हा ऐतिहासिक परिस्थितीचा परिपाक आहे. ध्येयप्रणालीतील

फरकाने तो निर्माण झाला. नक्षलवाद्यांना वाटते की भारतात आता क्रांतीला अनुकूल असा हा काळ आहे. माझ्यापुढे प्रश्न होता तो या नव्या समस्येला तोंड कसे द्यायचे हा. शेतकऱ्यांचा प्रश्न सोडविण्याची ती आता ध्येयवादी विचारसरणी झाली आहे. माओने चीनच्या ग्रामीण भागात क्रांतीला सुरवात केली म्हणून नक्षलवादी आंदोलन खेड्यात सुरू झाले. माओची विचारसरणी व त्याचे तंत्र नक्षलवादी अनुसरत आहेत. आंतरराष्ट्रीय सीमेनजीकचे क्षेत्र त्यांनी चळवळीसाठी निवडले याचे कारण एका बाजूला चीन आहे दुसऱ्या बाजूस पाकिस्तान आहे. आपल्याला चीनमधून चोरून शस्त्रे आणता येतील ही मनीषा ते सदैव बाळगत असत. त्यामुळे क्रांतीला अनुकूल अशी मानसिक परिस्थिती निर्माण होईल असे त्यांना वाटते. पण त्यांना अपेक्षित असलेला परिणाम अद्याप दिसून आलेला नाही.

"सरकार नक्षलवादी चळवळ काबूत आणण्याचा प्रयत्न करीत आहे. पण ज्यामुळे ही चळवळ निर्माण झाली ती कारणे नाहीशी करणे महत्त्वाचे आहे. जेथे जेथे शोषण होत आहे ते थांबविणे हे महत्त्वाचे आहे. पिळवणूक व अन्याय यामुळे अशा विचारसरणी प्रभावी होत असतात. म्हणूनच काँग्रेसच्या पुरोगामी कार्यक्रमावर मी जास्त भर देत असतो."

चव्हाणांची कसोटी पाहणारा दुसरा प्रश्न याच काळात तीव्र झाला तो म्हणजे हिंदु-मुस्लिमांच्या जातीय दंगलीचा. प्रथम श्रीनगर, त्यानंतर बिहारमध्ये रांची, आंध्र, उत्तरप्रदेश, गुजराथ, महाराष्ट्र या सर्व राज्यांत दंगली झाल्या. यासंबंधी आपले मत व्यक्त करताना चव्हाण म्हणाले, "मुख्यतः राजकीय पक्षच एक जमात किंवा जात यांना चिथावणी देतात. त्यामुळेच या दंगली होतात. १९६० नंतर राजकीय पक्षांनी आपल्या राजकीय स्वार्थासाठी धार्मिक भावना चेतवल्या आहेत. म्हणून हे दंगे थांबविण्याचा एकच मार्ग म्हणजे राजकीय पक्षांना सत्ता मिळविण्याचे साधन म्हणून धर्माचा वापर करण्यास मनाई करणे. जनसंघ हा जातीय भावना वाढविण्यास मुख्यतः जबाबदार आहे. दोन जमातींमधील परस्परांना समजून घेण्याची प्रक्रियाच बंद झाली आहे. त्यामुळे मनात असलेली कटुता वारंवार वर येते."

शब्दांकन : **भा. कृ. केळकर**

# अर्थमंत्रिपदाची चार वर्षे : एक ताळेबंद

भारताची आजची आर्थिक स्थिती चिंताजनक आहे. महागाई बेसुमार झाली आहे. सरकारही चिंतेत आहे. लोक गांजले आहेत. तेव्हा अर्थमंत्रिपदातून नुकतेच स्थानांतर केलेल्या श्री. यशवंतराव चव्हाणांचे या प्रश्नासंबंधीचे विचार काय आहेत, हे समजून घेण्याची उत्सुकता होती म्हणूनच त्यांची भेट मागितली. हा विषयही त्यांनी मान्य केला. नुकताच त्यांचा खातेबदल झाला आहे. त्याबद्दल त्यांचे अभिनंदन केल्यावर श्री. चव्हाण म्हणाले, " मला वाटते, दर चार वर्षांनी हा बदल होतो. तो एक चक्रनेमिक्रम झाला होता. ठीक आहे, पण त्यातही नवी क्षितिजे दिसतील. नवी आव्हानेही असतील. "

" अर्थमंत्रिपदाच्या चार वर्षांच्या कारकीर्दीचे सिंहावलोकन करताना आपणास आता काय वाटते. " असे विचारल्यावर श्री. यशवंतराव म्हणाले, " अर्थखाते अधिक रोकड्या व्यवहाराचे खाते आहे. तेथे मला अनेक प्रश्नांना सामोरे जावे लागले. पण त्यात सैद्धान्तिकतेपेक्षा व्यावहारिकतेचे आव्हान असे. त्यामुळे तेथे बरेच नवे करावयास व काहीसे शिकावयासही मिळाले. मी अनेक उपक्रमांना प्रारंभ केला होता. त्यातील बरेचसे क्रियाशील आहेत व काहींचे परिणाम हाती यावयास अवधी लागेल. थोडीशी खंत एवढीच आहे की, त्यातील एक-दोन पुरे करण्यासाठी पुरेसा वेळ मिळाला नाही. उदाहरणार्थ, वांछू कमिटीने केलेल्या अहवालावर आधारलेले काळा पैसा आदीसंबंधीचे विधेयक मी चिकित्सा समितीशी प्रत्येक कलमाबद्दल सखोल, व चौफेर चर्चा करून तयार केले आणि ते या हिवाळी अधिवेशनात मांडणार होतो. असेच गृहमंत्री असताना झाले होते. प्रीव्ही पर्सचे विधेयक तयार करून लोकसभेत मी सादर केले होते. पण त्यावरील पुढचे सोपस्कार होण्यापूर्वी ते खाते मी सोडले. पण असे चालायचेच. राजकीय जीवनात बदल हा नित्यक्रमच आहे. "

" अर्थमंत्री म्हणून आपण जे विविध उपक्रम केले त्यांचा आता साकल्याने विचार केला तर त्याचा काय परिणाम झाला, असे आपणास वाटते ? " असा माझा प्रश्न होता. अर्थात त्याचे दोन भाग होते. यशवंतरावांनी सुरू केलेले उपक्रम हा एक व त्याची आज झालेली फलश्रुती हा दुसरा.

## धोरणसूत्रे

अर्थमंत्री म्हणून आपली कारकीर्द सुरू करतानाच काही निर्णय श्री. चव्हाणांनी मनाशी घेतले. त्याची अंमलबजावणी सुरू केली. यशवंतरावांच्या कार्यपद्धतीची ज्यांना माहिती आहे, त्यांना हे ठाऊक आहे की, त्यांच्या धोरणाला तात्त्विक गाभा असतो. तो व्यवहारात आणताना ते तत्त्वमंथनाचे अवडंबर माजवीत नाहीत. म्हणूनच मी त्यांना विचारले की, " अर्थमंत्री म्हणून आपली धोरण-सूत्रे कोणती होती. " तेव्हा ते म्हणाले, " माझी अर्थसंकल्पावरील भाषणे हीच माझी मार्गदर्शक सूत्रे दर्शवतील. उदाहरणार्थ, १९७१–७२च्या माझ्या अर्थसंकल्पावरील पहिल्या भाषणात मी माझ्या करविषयक धोरणाची त्रिसूत्री सांगितली होती. पहिले सूत्र प्राप्तीतील विषमता कमी करणे. दुसरे कर-योजनेचा पाया विस्तृत करणे आणि तिसरे कर-आकारणी व कर-वसुली यांची प्रशासन यंत्रणा अधिक कार्यक्षम करणे.

प्राप्तीतील विषमता कमी करण्याचा अर्थमंत्र्यांच्या हातातील उपाय म्हणजे कर-योजना. काळा पैसा, काळ्या पैशातून होणारा खर्च व काळ्या पैशाच्या कमाईचे विविध मार्ग यावर नियंत्रण ठेवणे, हा त्यातलाच एक भाग. आज काळा पैसा वेगवेगळ्या रूपांत वावरतो आहे. तो जमिनीत आहे. सोन्यात गुंतवलेला आहे. बँकांतील बेनामी ठेवीत आहे. एका हप्त्यात आयुर्विमे उतरले जातात. ऐषआरामी खर्च, चैनीच्या वस्तू, परदेशी मालाची खरेदी यांच्या द्वारे खर्च होतो तो बराचसा काळा पैसाच. कर चुकवून हाती राहतो तोही काळा पैसाच ठरतो. काळ्या पैशाची गुंतवणूक होत असते तीही विविध मार्गांनी. गुंतवणुकीतून निर्माण होतो तो काळा पैसाच. असे हे वर्तुळ फिरत आहे. तो या देशात नेमका किती आहे हे सांगणे कठीण आहे. कारण, सोने, दागिने, हिरे-माणके, उद्योगोपयोगी कच्चा माल, रोजच्या खपाच्या वस्तू, शेअर्स आदी अनेक गोष्टींचा नेमका अंदाज येतच नाही. वांछू समितीने ज्याच्यावरचा प्राप्तिकर चुकविला जातो त्या मिळकतीचा अंदाज १९६८–६९ साली १४०० कोटी रुपयांचा केला होता. डॉ. रांगणेकरांनी त्याच वर्षाचा अंदाज २८३३ कोटी रुपये केला आहे. "

" पण प्रश्न असा आहे की, सरकार काळ्या पैशाचे अस्तित्व मान्य करते. त्यांच्यापुढे असहाय झाल्यासारखे वाटते. एवढे प्रचंड बहुमत मिळूनही कायद्याच्या

आधारे काळ्या पैशाला आवर का घालत नाही?" थोड्याशा अधीरतेने मी विचारले.

## अपरिहार्य विलंब

तेव्हा यशवंतराव म्हणाले, "संसदीय लोकशाहीत हा विलंब अपरिहार्य आहे. एखादा निर्णय राजकीय पातळीवर घेतला की चौकशी समिती नेमणे अवश्य ठरते. त्या समितीलाही वेळ द्यावा लागतो. त्यानंतर त्या समितीच्या शिफारशींचा प्रशासकीय खात्यात विचार करावा लागतो. त्यांना कायद्याचे स्वरूप देण्यासाठी वेळ लागतो. मी सांगितल्याप्रमाणे काळ्या पैशाला प्रतिरोध करणारे विधेयक आता लोकसभेपुढे येईल. त्यात झडती, जप्ती यांच्यासाठी जादा अधिकार देण्यात येणार आहेत. हिशोबाची तपासणी, कर चुकविणाऱ्यांच्या विविध वाटांना बुजविण्यासाठी उपाय योजण्यास मी सुरुवात केली. १९७३ च्या फायनान्स ॲक्टानुसार शेतीचे उत्पन्न व बिनशेतकी मिळकत यांचा करपात्रतेसाठी एकत्र हिशेब करण्यात येईल.

याखेरीज आता काही प्रशासकीय उपाययोजनाही केली आहे. प्राप्तिकर खात्यामार्फत ज्या झडत्या होतात त्यांची संख्या १९७०–७१ मध्ये १९५ होती. त्यात १४० लाख रुपयांची मालमत्ता जप्त झाली होती. १९७३–७४ च्या पहिल्या नऊ महिन्यांतच ३९५ झडत्या झाल्या आणि ३२७ लाख रुपयांची मालमत्ता जप्त करण्यात आली. तसेच खटल्यांची संख्याही वाढली आहे. प्राप्तिकर चुकविणाऱ्यांची पाहणी चालू आहे. या सर्वांमध्ये आज देशात जी महत्त्वाची मोहीम चालू होती आहे ती म्हणजे स्मगलर्सना पकडण्याची. हीच मोहीम साठेबाजांविरुद्ध चालू होईल. या सर्व प्रशासकीय उपायांचा संकलित परिणाम म्हणजे काळ्या पैशाला आलेले स्थैर्य, किंबहुना प्रतिष्ठाही जाईल. त्यांना हादरा बसेल. प्रत्यक्ष होणाऱ्या आर्थिक फायद्याइतकेच या सामाजिक तिरस्कारांच्या भावनेला व सरकार काही ठाम निर्णय घेऊन पावले उचलते या जनतेमध्ये निर्माण होणाऱ्या विश्वासाला अधिक महत्त्व आहे असे मी मानतो."

"ही सर्व उपाययोजना ठीक असली तरी, काळा पैसा ज्यातून निर्माण होतो त्या अर्थव्यवस्थेचे काय, हा खरा प्रश्न आहे. म्हणजे कृत्रिम टंचाई निर्माण करावयाची, उत्पादनाची पातळी कमी ठेवावयाची आणि हाती असलेली उत्पादन-

क्षमता पुरेशी वापरावयाची नाही, असे उद्योगपतींचे तंत्र असते. यातून जो काळा पैसा येतो त्यावर आपले काय म्हणणे आहे ? " मी विचारले.

## ' क्रेडिट स्क्वीझ '

यावर यशवंतराव म्हणाले, " तुमच्या म्हणण्यात तथ्य आहे. उद्योगपती बँकांकडून पैसे घेतात. व्यापारीही बँकांच्याच पैशावर उलाढाली करतात. साठेबाजी यातूनच होते. तेव्हा ही त्यांची रसद तोडली, तर असल्या ' स्पेक्युलेटिव्ह ऑपरेशन्सना ' आळा बसेल ही माझी भूमिका होती. यालाच लोकांनी ' क्रेडिट स्क्वीझ ' म्हटले. खरे म्हणजे ती पत पुरवठ्याची लोकाभिमुख योजना होती व आहे. गरजेच्या उद्योगांना पतपुरवठा तर चालू ठेवावयाचा, पण तो पैसा अनिष्ट मार्गांनी जाऊ नये म्हणून त्यावर नियंत्रण ठेवायचे, हे आमच्या धोरणाचे मुख्य सूत्र ! गरजेच्या उद्योगक्षेत्रासाठी व शेतीसाठी राष्ट्रीयीकृत बँकांनी जो कर्जाऊ पैसा दिला त्यात वाढ झालेली आढळेल. जून १९६९ मध्ये या विभागासाठी ४४१ कोटी रुपये दिले होते, तर जून १९७३ मध्ये १२९५ कोटी दिले. तसेच निर्यात व्यापारासाठी दिलेली पत जून १९६९ मध्ये २५८ कोटी रुपये होती, तर डिसेंबर १९७३ मध्ये ती ६७७ कोटी रुपये होती. त्यांना व्याजाचा दरही कमी होता. तसेच बँकांचा पैसा अनिष्ट मार्गांनी वापरला जाऊ नये म्हणूनही रिझर्व्ह बँकेने काही उपाय योजले. मला वाटते, या सर्वांचा परिणाम आता दिसू लागला आहे. मी जी प्रारंभी धोरणाची त्रिसूत्री सांगितली त्यानुसारच आम्ही हे सर्व उपाय योजले आहेत. "

" पण इतके सर्व असूनही चलनवाढ कमी का होत नाही ? महागाई का कमी होत नाही ? " माझा पुन्हा मुद्द्याचा प्रश्न. सामान्य माणसाला आज आकडेवारी नको आहे. ' रिलीफ ' हवा आहे. ही हा प्रश्न विचारण्यामागची भूमिका.

" हे थोडेसे विषयांतर होईल. पण सांगतो. भारतातील चलनवाढ हा एकूण जागतिक चलनवाढीचाच एक भाग आहे असे आम्ही म्हणतो, त्याचा अर्थ समजावून घेतला पाहिजे. आपण उद्योगधंद्यांसाठी काही आयात करतो. धान्यही आयात करावे लागते. पेट्रोलच्या किंमती वाढल्या आहेत, हे सर्व अपरिहार्य आहे. परदेशात जी महागाई झाली आहे तिचे परिणाम आपल्या आयातीवर होतात.

आता आपल्या देशातही चलनवाढ होते याची काही अटळ कारणे आहेत. एक तर विसनशील देशांनी साधारणपणे ३ ते ४ टक्के चलनवृद्धी केली, तर ती धोकादायक असत नाही. पण आपल्या देशाची अर्थव्यवस्था ही मुळातच अगदी तोळा-मासा प्रकृती असणाऱ्या माणसासारखी आहे. नैसर्गिक संकटे, युद्ध, यांच्यासारख्या अकस्मिक संकटांनी किंवा संपासारख्या राजकीय कारणांनी त्यात थोडा जरी अडथळा आला, तरी ती लवकर विस्कळीत होते. सगळे अंदाज चुकतात.

## अटळ चलनवाढ

शेतीचा विकास नियमित झाला, औद्योगिक उत्पादन सातत्याने वाढत गेले आणि लोकसंख्येचे प्रमाण कमी होत गेले तरच आपल्या देशात काही आर्थिक स्थिरता येईल. नाहीतर त्यांचा तोल सांभाळणे कठीण होऊन बसते. याच्या जोडीस समाजद्रोही शक्तींच्या कारवायाही आपल्या अडचणीत भर टाकतात हे काळ्या पैशाच्या उदाहरणावरून पाहिलेच आहे. हा काळा पैसा लगेच गरजेच्या वस्तू विकत घेण्यात, त्यांचे साठे करण्यास वापरला जातो. मग महागाई होते, कामगारांच्या मागण्या वाढतात, असंतोष उत्पन्न होतो, उत्पादनाचे तंत्र बिघडते आणि या सर्वांच्या जोडीस दुष्काळासारख्या आपत्ती आल्या, तर चलनवाढीखेरीज दुसरा मार्गच उरत नाही. ''

'' पण मला वाटते, आजच्या परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी केवळ प्रशासकीय उपाय किंवा राजकीय बहुमत अपुरे आहे. अधिक मूलगामी अशी जाणीव समाजात निर्माण होणे आवश्यक नाही का ? '' मी सध्याच्या पेच-प्रसंगाची तात्त्विक चिकित्सा यशवंतराव काय करतात, हे जाणून घेण्यासाठी विचारले. तेव्हा आकडेवारीवरून व आर्थिक व्यवहारावरून चर्चा मूलभूत प्रश्नाकडे वळली.

यशवंतराव म्हणाले, '' मला वाटते, नुसती जाणीव अपुरी आहे. सामाजिक न्यायाची जाणीव निर्माण झाली तरी त्यासाठी प्रत्येक नागरिकाला जी आंतरिक व सामाजिक शिस्त लागते ती नसेल, तर या जाणिवेचा काही उपयोग होणार नाही. मला असे दिसते आहे की, आपण सामाजिक न्यायाच्या किंवा समाज-वादाच्या जाणिवेने काही राजकीय निर्णय घेतले. काही संस्था, काही पद्धती निर्माण केल्या आहेत. पण आपण सामाजाला जेवढे श्रम देतो, जेवढे उत्पादन

देतो, त्यापेक्षा जास्त काही सरकार वा समाज आपणाला देईल, ही आपली अपेक्षाच आपण टाकून दिली पाहिजे. चीनने राष्ट्र उभे केले ते या सामान्य माणसाच्या ताकदीवर–निष्ठेवर! अगदी साधे उदाहरण साखरेचे घेऊ. आता दिवाळीच्या दिवसांत हे उदाहरण थोडे कडूच आहे म्हणा! आपल्या जीवनात गहू, तांदूळ, कापड यांच्याइतकी साखर आवश्यक आहे का? ती काही प्रमाणात कमी वापरून ज्या देशात आपणाला जास्त भाव मिळेल तेथे पाठविली, तर कदाचित आपल्या देशाचा आर्थिक फायदा होईल. रशियाने अनेक वस्तू स्वत:च्या नागरिकांना नाकारल्या, चीनने असेच कडक सामाजिक नियमन केले. त्यातूनच त्या राष्ट्राचे अर्थकारण समर्थ व स्वावलंबी बनले. आपल्यापुढे प्रश्न असा आहे की लोकशाहीमध्ये आपण ही सामाजिक शिस्त, ही कार्यक्षमता आणू शकू का? केवळ राजकीय 'सँक्शन' येथे अपुरे पडते. व्यापक समाजहिताची बुद्धी व त्यासाठी त्यागाची बिनतक्रार सिद्धता यांची आज गरज आहे."

"मग अर्थमंत्री या नात्याने आपण जो अनुभव घेतला, जे न्याहाळले, त्यातून निराशेचे चित्र दिसते की आशेचे? रुपयाचे आजचे क्रयमूल्य २८ पैसे आहे. १९६२ मध्ये ते ८९ पैसे होते. हे कशाचे लक्षण?" मी विचारले.

## अर्थकारणाचे स्थित्यंतर

"आशा-निराशेच्या हिंदोळ्यावर बसून नुसते चालणार नाही, तर आत्मविश्वासाने व निर्धाराने योग्य मार्ग चोखाळण्याचा प्रश्न आहे. त्याचे असे आहे की, केवळ रुपयाचे मूल्य हा आर्थिक विकासाचा निकष नव्हे. कारण कदाचित याच क्रमाने रुपयाची किंमत आणखी घटत गेली, तर देशाचा विकासच झाला नाही असे म्हणावे लागेल. मला वाटते की, सामान्य माणसाच्या दृष्टीने हा विचार गंभीर असला तरी, भारताच्या अर्थकारणाचे स्थित्यंतर आपण घडवून आणले आहे, हा विचार व ही कमाई महत्त्वाची आहे. एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे आपण विकासाची यंत्रणा उभी केली आहे. काही पायाभूत उद्योगधंद्यांचा विकास केला आहे. पण गाडे अडते कुठे, हा खरा प्रश्न आहे. यातच खरे आजच्या समस्यांचे मूळ आहे. ते असे की जी विकासयंत्रणा आपण उभी केली आहे–वीज, पाटबंधारे यांच्यासाठी जो खर्च केला आहे, याचे पुरेसे फायदे आपणास मिळत नाहीत. योजना आखताना 'बेनिफिट कॉस्ट रेशो'–चा विचार

केला जातो. पण त्या योजनांची अंमलबजावणी करताना तो विचार मागे पडतो. त्याला कारणे अनेक देता येतील. पण ते समर्थन होईल. असे समर्थन मला करावेसे वाटत नाही. उदाहरणार्थ, आपण पाटबंधाऱ्यांचे पाणी पुरेसे वापरतो का, वीजउत्पादनाची आपली योजना का कमी पडते, रासायनिक खतांचे उत्पादन पुरेसे का होत नाही, शेतीचा विकास उद्योगधंद्यांना माल पुरवण्याइतका व अन्यत्र स्वावलंबी होण्याइतका वेगाने व समर्थ का होत नाही, आपण व्यवस्थापन, कामगारांचे औद्योगिक संबंध यात कमी पडतो का, या सर्वांचा विचार केला पाहिजे. भारताची अर्थव्यवस्था शेतकीप्रधान राहणार आहे हे गृहीत धरलेच पाहिजे. ती अर्थव्यवस्था सरंजाम युगातील राहिली, आणि बाकीचे सारे आधुनिकीकरण केले तर आपली अर्थव्यवस्था पांगळीच राहील. शेती-विकास हा औद्योगिकदृष्ट्या व शेतीच्या धंद्याच्या दृष्टीनेही महत्त्वाचा आहे."

"येथेच प्रश्न उपस्थित होतो तो असा की जमीन-सुधारणा किंवा तत्सम योजना मागे पडल्या आणि शहरीकरण वाढत गेले तर आर्थिक तोल कधीच साधता येणार नाही. राज्य-सरकारांना याची जाणीव आहे असे आपणास वाटते का?" मी विचारले. कारण यशवंतरावांनीच मागे सांगितले होते की, "भारतात हरित क्रांती होते आहे. पण तेथे असंतोष निर्माण झाला, तर लाल क्रांती होईल."

## आर्थिक तूट

यावर यशवंतराव म्हणाले, "जमीनविषयक सुधारणांबाबत पुरेसे काम झालेले नाही हे खरे. त्याची कारणे अनेक आहेत. पण माझ्या अर्थखात्यापुरता ग्रामीण क्षेत्रातील शेतीवरील प्रत्यक्ष कर-योजनेचा सर्वांगीण विचार १९७२ मध्ये डॉ. राज यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमून केला. शेती-विकासासाठी सरकार जो पैसा खर्च करते त्याची परतफेड ग्रामीण क्षेत्रातील शेती-उत्पादनातूनच झाली पाहिजे, ही त्यामागची भूमिका होती. शेतीवरील प्रत्यक्ष करातून येणारे उत्पन्न १९६७–१९७१ या काळात साधारणपणे १३० कोटी रुपये राहिले आहे. १९७१ मध्ये एकूण करउत्पन्नाच्या ते ६·८ टक्के होते. या प्रश्नांबाबत मी राज्यांच्या मुख्य मंत्र्यांशी चर्चाही केली होती. आता पुढची जबाबदारी राज्यसरकारांची आहे. राज-समितीने जमीनधारण-क्षेत्रावर ( लँड होल्डिंग टॅक्स ) कर बसवावा असे सुचविले होते. त्यानुसार हरयाणा, हिमाचल सरकारांनी

कायदे केले आहेत. तसेच राज्य-सरकारांना पाटबंधाऱ्यांच्या योजनांत आर्थिक तूट येते. १९७१–७२ मध्ये ही तूट १४० कोटी रुपयांची होती. पाटबंधाऱ्यांतून दिल्या जाणाऱ्या पाण्यावर कर बसवून ही तूट भरून काढावी असे आम्ही राज्य सरकारांना सांगितले आहे."

"याच ठिकाणी एक प्रश्न विचारतो. राज्यसरकारांच्याबाबत आपला अनुभव काय आहे ? त्यांच्या आर्थिक प्रश्नांची आपणास कल्पना आहे. राज्य-सरकारांनी रिझर्व्ह बँकेकडून भरमसाट ओव्हरड्राफ्ट काढल्याच्या तक्रारी आहेत." मी विचारले.

"राज्य-सरकारांचे आर्थिक प्रश्न आहेतच. त्यांची आर्थिक कुवत मर्यादित असते. आरोग्य, शिक्षण आदी सामाजिक कल्याण योजनांची जबाबदारी त्यांच्यावर असते. त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी त्यांना मदत लागते. शिवाय दुष्काळ, महापूर यांसारख्या आपत्ती असतातच. राज्य सरकारांच्या आर्थिक समस्यांचा विचार मी प्रत्येक राज्याशी वेगवेगळ्या चर्चा योजून केला. त्यांच्या पंचवार्षिक योजना तयार होण्यापूर्वी त्यांचे उत्पन्न किती आहे, ते किती व कोणत्या क्षेत्रात वाढविणे रास्त आहे, त्यासाठी त्यांनी काय केले पाहिजे, याची तपशिलवार चर्चा केली. त्यांना असेही थोडेसे निर्धारपूर्वक सांगितले की, आता ओव्हरड्राफ्टला मर्यादा असतील. एकेकाळी ४०० कोटी रुपयांपर्यंत ही रक्कम असावयाची, कधी कधी खर्च करावयाचा आणि मग केंद्र-सरकारवर दडपण आणावयाचे, असेही प्रकार घडावयाचे. म्हणून यात काही शिस्त आणण्याचा, त्यांच्या खर्चाचे नियमन करण्याचा आम्ही प्रयत्न केला आहे."

"पण फायनान्स कमिशनने याबाबत काय भूमिका घेतली होती ?"

### राज्यांना साहाय्य

"राज्य-सरकारांच्या अडचणींची ज्यांना कल्पना आहे व ज्यांनी राज्यात अर्थमंत्री व मुख्य मंत्री असे काम केले आहे त्या ब्रह्मानंद रेड्डींनाच आम्ही अर्थ-मंडळाचे अध्यक्ष केले आणि त्यांनी सर्वांगीण अभ्यास करून, आपल्या शिफारशी केल्या व केंद्र-सरकारने त्या सर्व स्वीकारल्या आहेत. राज्य-सरकारांना केंद्राच्या उत्पन्नातून निश्चित वाटा मिळतो. तसेच त्यांना कर्ज-उभारणीची परवानगी दिली जाते. त्यांच्या पंचवार्षिक योजनांना सरकार आर्थिक साहाय्य देतेच."

मला अर्थसंकल्पाविषयीचे सरकारचे धोरण काय असते, त्यामागे काही तात्त्विक दृष्टिकोण असतो का, हे जाणून घेण्याची इच्छा होती. कारण आपली राज्य-सरकारे व केंद्र-सरकारची खाती ही केवळ खर्च करणाऱ्या संस्था आहेत. खर्च किती झाला यावरच अर्थखाते त्याची प्रगती मोजते. तेव्हा यासंबंधी आपला दृष्टिकोण काय आहे असे मी श्री. चव्हाणांना विचारल्यावर ते म्हणाले,

"राज्य-सरकारच्या अर्थसंकल्पांची आम्ही छाननी करतो. नियोजन-मंडळातही ती होते. त्यांच्या राज्यकारभारावरील खर्च, कर्जाची वसुली किती होते, राज्याच्या वीजमंडळांचा कारभार आदीविषयीची पाहणी आम्ही करतो. पुरेसा पैसा ती सरकारे उभारतात की नाही, का केंद्राकडे धाव घेतात हेही पाहतो. राज्य-सरकारांचे प्रश्न किंवा आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या प्रदेशांचे प्रश्न यांचा विचार केंद्र-सरकार करीत असतेच. प्रादेशिक विकास समतोल व्हावा अशी माझी स्वतःची भूमिका आहे. पण त्यासाठी राज्य-सरकारांनीही उत्पन्नवाढीचे प्रयत्न केले पाहिजेत, असा आग्रह मी धरला होता. त्याचा परिणामही चांगला झाला. अनेक राज्यांनी आपले पुरवणी अर्थसंकल्प तयार करून तूट भरून काढली हे त्याचे गमक. विक्री-कर वाढविण्यासारख्या सोप्या उपायापेक्षा अधिक व्यापक अशी कर-योजना राज्यांनी करावी असेही मी राज्य-सरकारांना सांगितले होते. एकूण मला त्यांनी चांगले सहकार्य दिले."

"आपले आणि नियोजन-मंडळाचे संबंध कसे होते? कारण हा एक नेहमीचा विवाद्य प्रश्न समजला जातो." मी विचारले. विशेषतः नियोजन-मंडळ हे कसे असावे याविषयी कै. धनंजयराव गाडगिळांची काही भूमिका होती. याविषयी श्री. यशवंतराव म्हणाले, "कै. धनंजयराव गाडगीळ असताना त्यांच्याशी मी एकूण धोरणाविषयी दोनदा सविस्तर चर्चा केली होती. त्यानंतर श्री. सुब्रह्मण्यम् व श्री. धर यांच्याशी माझा संबंध आला. आमच्या कामकाजात कधी कधी अडचणी आल्या, परंतु मार्ग निघाले. संघर्ष कधीच झाला नाही. मला असे वाटते, अशा प्रकारचे संबंध नेहमी त्या त्या व्यक्तींच्या वागण्यावर अवलंबून असतात."

### उपयुक्त भूमिका

"मागे गाडगिळांनी एक सूचना केली होती की, नियोजनाच्या उद्दिष्टांशी

सुसंगत अशी विविध योजनांची अंमलबजावणी होते की नाही, यावर सतत नजर ठेवणारी यंत्रणा आवश्यक आहे. ही कल्पना उपयुक्त ठरणार नाही का '', असे मी विचारले. कारण गाडगिळांचे म्हणणे मान्य झाले असते, तर नियोजनाची उद्दिष्टे व त्याचे फलित यातील तफावत लक्षात आली असती. या कल्पनेसंबंधी श्री. यशवंतराव म्हणाले, " अशा प्रकारची समीक्षा किंवा चिकित्सा वेळोवेळी होते. पण तुम्ही म्हणता त्याचप्रमाणे केवळ खर्चास संमती देणारे अर्थमंत्रालय ही कल्पनाच प्रबळ असल्याने योजनांची उद्दिष्टे सफल होतात की नाही, यावर त्यांचे नियंत्रण असत नाही. अपरिहार्यपणे ही भूमिका, खर्च केल्यानंतर व्हावयाच्या हिशेबतपासणीसारखी असते. अर्थमंत्रालयाची ही भूमिका बदलून ती अधिक उपयुक्त करावी, यावर माझा भर होता. याचा विचार करण्यासाठी माझ्या सूचनेवरून भारत सरकारने केंद्रीय अर्थ-सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली होती. त्या समितीने काही मूलगामी बदल सुचविले आहेत व केंद्रीय मंत्रिमंडळाने ते संपूर्णतः स्वीकारले आहेत व त्यांची अंमलबजावणी सध्या चालू आहे. या अंमलबजावणीनंतर माझ्या मते अर्थखाते अधिक व्यापक भूमिकेवरून काम करू शकेल.''

ही सगळी तपशिलवार चर्चा संपत आली होती. तेव्हा यशवंतरावांना भारताच्या आर्थिक भवितव्यासंबंधी त्यांचे विचार काय आहेत किंवा नजीकच्या काळात भारताने कोणते धोरण योजावे असे त्यांना वाटते, असा प्रश्न विचारला. कारण यशवंतराव व्यवहारातील समस्या लक्षात घेऊन धोरण आखणारे आहेत. पोथीवादी नाहीत. त्यामुळे त्यांचे विचारही व्यवहारी असतात.

### जमेच्या गोष्टी

भारताच्या आर्थिक भवितव्याविषयी यशवंतराव म्हणाले, " मी प्रारंभी सांगितल्याप्रमाणे आपल्या काही जमेच्या गोष्टी आपण समजावून घेतल्या पाहिजेत. यांपैकी दोन गोष्टींचा मी प्रथम उल्लेख करतो. पहिली म्हणजे राष्ट्रीयीकरण झालेल्या बँकांमुळे आपण जगातील एक भव्य प्रयोग सुरू केला आहे, हे लक्षात ठेवले पाहिजे. राष्ट्रीयीकरण एका विशिष्ट राजकीय पार्श्वभूमीवर झाले. त्यामुळे त्याबद्दलच्या अपेक्षा वाढल्या होत्या. तेव्हा त्या पुऱ्या झाल्या नाहीत, तर अपेक्षाभंग होण्याची शक्यता आहे. तरीही आपल्या बँकांचे प्रश्न

समजावून घेतले म्हणजे हा अपेक्षाभंग होणार नाही. एक तर आपल्या बँकांचा धंदा हा व्यापारी व औद्योगिक क्षेत्रातच होता. त्यामुळे त्यातील धोरण, त्यांचे नेतृत्व, त्यातील प्रशिक्षण हे केवळ शहरी व औद्योगिक स्वरूपाचे, त्या घाटाचे होते. विकासाच्या प्रक्रियेशी त्याचा संबंध जोडणे हे आमचे पहिले कार्य होते. म्हणजे बँकांना काही सामाजिक उद्दिष्टे असली पाहिजेत ही आमची भूमिका आम्हाला राष्ट्रीयीकरण झालेल्या बँकांना समजावून सांगावयाची होती. ग्रामीण क्षेत्राशी त्यांचा संबंध जोडावयाचा होता.

ज्या राज्यात बँका कार्य करतात तेथील राज्य-सरकारे, स्थानिक आर्थिक संस्था यांच्याशी विचारविनिमय करणे आवश्यक होते. म्हणून मी स्वतः हे काम अंगावर घेतले. बँकांचे अध्यक्ष व डायरेक्टर यांच्याशी वर्षातून दोनदा बँकांचे गुंतवणुकीचे धोरण, पतपुरवठा, इत्यादीविषयी चर्चा करीत असे. तसेच प्रत्येक राज्यात जाऊन तेथील राज्य-सरकारचे प्रतिनिधी, बँकांचे प्रादेशिक अधिकारी व केंद्रीय अधिकारी यांच्या संयुक्त बैठकी घेत असे. अशा दोन फेऱ्या मी सर्व राज्यांत केल्या. ग्रामीण अर्थव्यवस्थेस बँकांचा कसा हातभार लागेल, बँकांच्या शाखा सर्वत्र कशा काढता येतील इत्यादींचा विचार आम्ही केला. आमच्यापुढे कोणतेही मॉडेल नव्हते. आमचा आम्हालाच मार्ग आखावयाचा होता. बँकिंग हे जनताभिमुख करून त्याची कार्यक्षमता, उपयुक्तता वाढवावयाची होती. अल्पावधीत घडणारे हे स्थित्यंतर नव्हे. पण मी असे आत्मविश्वासाने म्हणेन की, आम्ही आता योग्य दिशेने जाण्यास, कृती करण्यास, सज्ज आहोत. या साहसी उपक्रमांची फळे आता दिसू लागतील.

### उद्योगक्षेत्र

दुसरी जमेची बाजू म्हणजे सार्वजनिक उद्योगक्षेत्र. याच्यावर बरीच टीका होत आली आहे. ती काही अंशी रास्तही आहे. पण सरकारने स्वतःच या क्षेत्राची चिकित्सा तज्ज्ञांकडून करवून घेतली आहे. काही खासगी उद्योगक्षेत्रांतील तज्ज्ञांना आम्ही आणले आहे. त्यांच्या सल्ल्याप्रमाणे काही बदलही होत आहेत. आपल्या देशाचा इतक्या मोलाचा पैसा या क्षेत्रात गुंतला आहे की, त्यात सुधारणा केल्याविना आपली प्रगती होणार नाही, याची आम्हांला जाणीव आहे. या क्षेत्रामध्ये आता निपुण व्यवस्थापनाला आम्ही अग्रक्रम दिला आहे.

तेथील औद्योगिक संबंध सुधारत आहेत. त्या क्षेत्रातील अंतर्गत सहयोग वाढत आहे. सार्वजनिक उद्योगक्षेत्रातही काही अपयश येते याचे कारण त्यात आपल्याला अनुभव नसतो. माणसे जुनीच असतात. ज्या धंद्यांचे राष्ट्रीयीकरण होते त्यांचेही साचत आलेले काही गुंतागुंतीचे प्रश्न असतात. कोळशाच्या खाणीचे राष्ट्रीयीकरण केले तेव्हा याचा अनुभव आम्हांला आला. त्यात समाजद्रोही माणसे मोक्याची ठिकाणे अडवून बसली होती. त्यांची यंत्रणा जुनी झाली होती. तो धंदा विस्कळीत झाला होता. त्यातील उत्पादन व वाटप यात वाटा रोखून बसलेले दलाल होते. तेव्हा या सर्वांना तोंड देऊन पुढे जावयाचे होते. पण असे अपयश हे तात्कालिक समजले पाहिजे. सार्वजनिक उद्योगक्षेत्राचे भारतीय अर्थकारणातील स्थान हे अटळ आहे आणि अढळही आहे."

"आपणाला भारताच्या आर्थिक नियोजनाची दिशा सद्यःस्थितीत कशी असावी असे वाटते?" हा प्रश्न मध्ये मी विचारला. तेव्हा यशवंतराव म्हणाले, "काही अपरिहार्य अडचणींमुळे, वस्तूंचे भाव वाढल्यामुळे आपली नियोजनाची प्रक्रिया मंदावली आहे, रुद्ध झाली आहे हे खरे आहे. पण तरीही नियोजन अपरिहार्य आहे. किंबहुना माझे म्हणणे असे आहे की, आर्थिक क्षेत्रात विचारपूर्वक धोरण ठरवून त्याची अंमलबजावणी करण्यास पुरेसा अवधी दिला पाहिजे. तात्कालिक अपयशाने किंवा त्यामुळे येणाऱ्या अप्रियतेच्या भीतीने हाती असलेली धोरणे अर्धवट सोडून कोणतेही बदल करता कामा नयेत. ही धरसोड आपल्याला घातक ठरेल. दुसरे सूत्र मी असे सांगेन की, विकासाच्या ज्या क्षेत्रात आपण भांडवल गुंतवीत आहोत ते क्षेत्र तसेच चालू ठेवले पाहिजे. उदाहरणार्थ, विद्युत-उत्पादन, कालवे, रासायनिक खतांचे कारखाने इत्यादी आपल्याला आवश्यक असलेले विकास-प्रकल्प चालूच राहिले पाहिजेत.

### उत्पादनवाढ

तिसरे सूत्र असे की, आपण ज्या क्षेत्रात भांडवल गुंतविले आहे त्यापासून आपला लाभ होतो की नाही, त्या क्षेत्राची क्षमता पुरेपूर वापरली जाते की नाही, यावर सतत लक्ष ठेवून त्याचा अर्थकारणास वाढता उपयोग कसा होईल, यासाठी सतत प्रयत्न केला पाहिजे, म्हणजेच विकासांची जी आयुधे, यंत्रणा आपण निर्माण केली तिचा वापर झाला पाहिजे, तरच आपले औद्योगिक उत्पादन वाढत

राहील. चौथे सूत्र असे की, ज्या कार्यपद्धती, ज्या विकाससंस्था आपण चालू केल्या आहेत त्यात काही अडचणी येत असतील, तेथे काही औद्योगिक संबंधाचे वा अन्य व्यवस्थापकीय प्रश्न उपस्थित होत असतील, तर त्याकडे तातडीने लक्ष दिले पाहिजे.

पाचवे सूत्र म्हणजे आर्थिक विकासात सामाजिक न्यायाला प्राधान्य दिले पाहिजे व प्रादेशिक विषमता न येता समतोल विकास होईल याची सतत काळजी घेतली पाहिजे. सहावे सूत्र, औद्योगिक उत्पादनासंबंधीचे आहे. यात कामगारांचे हितसंबंध हा महत्त्वाचा प्रश्न आहे. पण येथे राष्ट्रीय हिताचा विचार सतत डोळ्यांसमोर ठेवला पाहिजे. संकुचित हितावर जास्त भर देणे कामगारांच्याही हिताचे ठरणार नाही. त्यांचे वेतनाचे इत्यादी सर्व हक्क मान्य करूनही हे पथ्य पाळणे आवश्यक झाले आहे. आता आपले औद्योगिक परवानाविषयीचे धोरण व पद्धती यात सुधारणा होत आहे. त्याचा परिणाम दिसू लागेल. औद्योगिक उत्पादनाचे धोरणही आता कारखानदारांना निश्चित करावे लागेल. समाजाला लागणाऱ्या रोजच्या खपाच्या वस्तूंचे प्रचंड प्रमाणावर उत्पादन करणे, ग्राहकाच्या हिताच्या दृष्टीने महागाई कमी करण्यासाठी आज आवश्यक आहे.

## उत्पादनाची पातळी

गेल्या काही वर्षांत जी महागाई झाली आहे त्यात कारखानदारांनी केलेल्या कृत्रिम टंचाईचा, अल्प उत्पादनाचा व त्यातून वाढविलेल्या बेसुमार किमतीचा वाटा मोठा आहे हे विसरता कामा नये. म्हणून उत्पादनाची पातळी कायम ठेवली पाहिजे एवढेच नव्हे तर त्या उपभोग्य वस्तूंचे प्रकार किंवा त्यांचे वाटपही ग्राहकाला अनुकूल असे केले पाहिजे.

आणि अगदी मला सर्वांत महत्त्वाची वाटणारी गोष्ट म्हणजे आपल्या देशातील प्रत्येक नागरिकाचा निर्धार, त्यातून निर्माण होणारी वैयक्तिक व सामाजिक शिस्त व येणारी कार्यक्षमता ही आहे. आपण समाजाला किती देतो याचा विचार करून, मगच आपण समाजाकडे किती मागावयाचे, हे जर प्रत्येकाने ठरविले, तरच आज दिसणारा असंतोष कमी होईल, आणि आजच्याही आर्थिक संकटावर आपण मात करू शकू असा माझा विश्वास आहे. ”

शब्दांकन : **केसरी प्रतिनिधी**

# मुलाखती

## पी. व्ही. आर. राव

( माजी संरक्षण सचिव )

### मितभाषी, काटेकोर वेळ पाळणारे, प्रगल्भ निर्णयक्षमतेचे संरक्षणमंत्री–यशवंतराव

मोजक्या, अचूक शब्दांत आपले ठाम मत मांडणारे, संपूर्ण आत्मविश्वास असणारे, वेळेचा आणि दुसऱ्यांतील गुणांचा व्यवस्थित उपयोग करून घेणारे, दिलदार व्यक्तिमत्त्वाचे यशवंतराव संरक्षणमंत्री म्हणून माझ्या कायम लक्षात राहिले आहेत असे मुलाखतीच्या सुरुवातीलाच भारत सरकारच्या संरक्षण विभागाचे सचिव म्हणून काम केलेल्या श्री. पी. व्ही. आर. राव यांनी सांगितले. निवृत्त झाल्यानंतर पुण्याबाहेरील पाषाणच्या निसर्गरम्य परिसरात श्री. राव निवृत्त आयुष्य उपभोगीत आहेत.

लक्षात राहण्यासारखा योगायोग म्हणजे ज्या दिवशी चीनने एकतर्फी युद्ध-समाप्तीची घोषणा केली त्याच दिवशी श्री. राव यांची नेमणूक संरक्षण खात्यात करण्यात आली. तुमची नेमणूक आणि शांतता " मोस्ट वेलकम " असे म्हणून श्री. यशवंतरावांनी माझे अभिनंदन केले तो प्रसंग चिरंतन आनंददायक आहे असे राव यांनी दिलखुलासपणे सांगितले.

चीनने हिमालयात आपल्या पायदळाची ससेहोलपट करून, जबरदस्त तडाखा दिलेला तो काळ होता. सर्व थरांवर मनोधैर्य खचलेले होते, आपल्या उणिवा, कमतरता उघड्या पडल्या होत्या. आत्मविश्वासघात झाल्याची बोच अंत:करणात उमटली होती. हिवाळ्याचा कठीण मोसम साधून चीनने युद्ध-समाप्ती घोषणा केली पण चार महिन्यांच्या कालखंडानंतर उन्हाळ्यात पुन्हा चीन युद्धाला सुरुवात करील काय याची टांगती तलवार अदृश्य स्वरूपात भेडसावीत होती. या सर्व पार्श्वभूमीवर अत्यंत कमी काळात श्री. यशवंतरावांनी आत्मविश्वास-पूर्वक ताबा प्रस्थापित केला असे श्री. राव यांचे विश्लेषण. ते सांगतात,

" त्या दिवसांत रोज सकाळी नऊ वाजता संरक्षणमंत्री, तिन्ही दलांचे प्रमुख

आणि मी अशी बैठक होत असे. तोपर्यंत सर्व आघाड्यांवरून आलेले संदेश माहिती यांच्यावर मोजकी चर्चा होऊन निर्णय घेतले जात. आम्हा प्रत्येकाकडून अचूक, योग्य ती माहिती घेऊन अत्यंत काटेकोरपणे, संपूर्ण आत्मविश्वासाने, निर्णय मात्र स्वतःच घेण्यात श्री. यशवंतरावांच्या बुद्धिमत्तेचा कसदारपणा प्रखरतेने जाणवत असे. फुकटची वायफळ, शब्दांचे फवारे उडविणारी चर्चा कधीच होत नसे. एखादा मुद्दा, सल्ला त्यांना पटला नाही तर स्पष्टपणे आपले मतप्रदर्शन करीत. अर्थात त्यामुळे आमच्या वैयक्तिक किंवा शासकीय कार्यप्रणालीत कधीही कटुता मात्र निर्माण झाली नाही."

"संरक्षणमंत्री झाल्यापासून ते थेट १९६४ च्या सुरुवातीपर्यंत परिस्थितीचे अदृश्य "टेन्शन" जाणवत होते. त्या संदर्भात स्पष्टीकरण करताना श्री. राव सांगतात, "चीनने केलेली युद्धबंदी घोषणा आणि पाकिस्तानच्या कारवाया" यांचा साकल्याने विचार करून यशवंतरावांनी राष्ट्राच्या संरक्षणात कायम स्वरूपात कणखरपणा आणण्याचे द्विसूत्री धोरण मनोमन आखले. सर्व सीमांवर भरपूर पायदळ आर्मी आणि निकडीच्या शस्त्रास्त्रांच्या निर्मितीचा वेग वाढविणे यांवर त्यांनी लक्ष केंद्रित केले. प्रॉयॉरिटी ॲट टॉप लेव्हल फॉर डिफेन्स प्रॉडक्शन ॲंड सोल्जर्स नंबर्स हे ब्रीदवाक्य त्या काळच्या त्यांच्या शासकीय चर्चेत, सार्वजनिक व्याख्यानात, सभा-भाषणांत प्रामुख्याने आढळून येत असे. ती दर्जेदार स्वरूपाची असावी या बाबतीत यशवंतरावांनी संपूर्ण काळजी घेतली होती. त्या काळात दरवर्षीचे सैन्यदलाचे बजेट तीनशे कोटी रुपयांवरून काही वर्षांत एक हजार कोटी रुपयांवर पोचल्याचे आणि त्याचा परिपूर्ण उपयोग झाल्याचे श्री. राव यांनी आवर्जून सांगितले. त्या कालखंडात कमी शब्द, वेळेचा समतोलपणा आणि निश्चित कार्य करून दाखवीन ही जिद्दी, समजदार भूमिका यशवंतरावांच्या वागण्या-चालण्या-बोलण्यात निश्चितपणे जाणवत होती.

कोणत्याही मुद्द्यावर आततायीपणाने अहंगंडपणा दाखविणारे शब्दोच्चार नाहीत, विचारांचा फापटपसारा नाही, कमी वेळात अचूक निर्णय घेण्याची क्षमता आणि संपूर्ण आत्मविश्वास त्यांच्या व्यक्तिमत्त्वात सातत्याने डोकावत असे. तुम्हा सर्वांचे विचार ऐकून मला पटेल, रुचेल तोच निर्णय मला घ्यायचा असतो. माझ्या निर्णयाचा जाब विचारणारी भारतीय जनता आहे हे सतत भान ठेवूनच मी वाटचाल करीत राहणार असे विचार त्यांनी अगदी खेळीमेळीच्या स्वरूपात

निकटवर्तीयांसमोर ठेवले होते. ''

संरक्षण विभागातर्फे आलेले रिपोर्ट, लहान मोठ्या बातम्या, प्रसिद्ध झालेली पुस्तके, आम्ही तयार केलेले ब्रीफ्स यांचा ते जाणीवपूर्वक अभ्यास आणि वापर करीत. काही वेळेस लोकसभेत संरक्षण खात्यासंदर्भात प्रश्नोत्तरे होत. आवश्यक असणारी सर्व माहिती आमच्याकडून घेऊन त्यांचा वापर करून ते प्रश्नांना अगदी यथार्थ उत्तर देण्यात वाकबगार, निष्णात होते. युद्ध आणि निरनिराळ्या देशांत प्रसिद्ध झालेली संरक्षणाविषयीची पुस्तके वाचण्याचा त्यांचा छंद सर्वश्रुत आहेच. जगातील युद्धआघाडीवर कोणकोणत्या घटना झाल्या व त्यातून काय घेण्यासारखे आहे याचे चिंतन यशवंतरावांमध्ये सातत्याने चाललेले असे.

वागण्यात, बोलण्यात यशवंतराव '' थरो जंटलमन '' होते. त्यांच्या आपुलकीने तिन्ही संरक्षणदलांचे प्रमुख, उच्चाधिकारी, सचिव यांच्यातील परस्पर सामंजस्य आणि एकसूत्रीपणा लक्षणीय प्रमाणात वाढलेला होता. सर्वांगीण स्वरूपात आत्मविश्वास निश्चितच मोठ्या प्रकर्षाने वाढल्याचे जाणवून येत होते. प्रथम सेनादल त्याला जास्तीत जास्त सहायक ठरणारे वायुदल यांच्यात सुधारणा, आधुनिकीकरण, अद्ययावतता येण्यासाठी यशवंतराव अर्थातच जास्त सखोल लक्ष देत असत. त्या काळात नौदलाकडे आपपरभावाने वागणूक दिली जात आहे असा गैरसमज निर्माण न होण्यात यशवंतरावांच्या व्यक्तिमत्त्वाचा, संपर्काचा, घटना हाताळण्याचा फार यशस्वी वाटा श्री. राव यांनी निदर्शनास आणला. संख्येने कमी असले तरी गुणात्मक मोजपट्टीनुसार भारतीय नौदल कार्यक्षम करण्याचे प्रकल्प यशवंतरावांनीच सुचविले होते. त्यात पाणबुड्यांचा समावेश, डीप सी डीलिंग, ऑईल एक्सप्लोरेशन वगैरेंचा उल्लेख करता येईल.

यशवंतरावांच्या समवेत तब्बल चार वर्षे सल्लामसलत, कार्य करताना फार महत्त्वाचे, अद्वितीय प्रसंग घडले नाहीत असे नव्हे असे सांगण्याचा स्पष्टवक्ते-पणा श्री. रावांनी केला व अर्थात मला तो आवडलाही. एखाद्या मोठ्या व्यक्तीची उगाचच जवळीक निर्माण करणे, व्यक्तिमाहात्म्य वाढविणे, तात्काळ हात जोडण्याची मनोवृत्ती मला राव यांच्यात आढळली नाही.

मुलाखतीच्या अखेरच्या टप्प्यात श्री. राव म्हणाले, '' स्वतंत्र बुद्धिमत्ता आणि तिचा व्यावहारिक वापर करणारे असे फारच थोडे मंत्री असतात. अशा मंत्र्यांच्या यादीत यशवंतरावांचा नंबर खूपच वरचा आहे. '' विचारांशी

प्रामाणिक, वर्तमानकाळाची गरज आणि निकट भविष्यकाळातील मागणी हे विचारात घेऊन त्यांनी संरक्षणमंत्रिपद यशस्वीपणे सांभाळले. घेतलेल्या निर्णयाशी त्यांनी कधीच तडजोड केली नाही किंबहुना तसा प्रसंगच निर्माण झाला नाही. भारतीय जनतेची शक्ती आणि तिच्याशी बांधिलकी यांचा त्यांना कधीच विसर पडला नाही. त्यांचे पाय जमिनीत पक्के झाले होते. त्यामुळे अर्थातच आत्मविश्वासाला कधीच तडा गेला नाही. साधी, पूर्ण विचारांती, आणि झटकन निर्णय घेण्याची त्यांची कुशलता अनेक वेळा प्रकट झाली. भारत देशावर चिनी आक्रमणाने आलेले सावट दूर करण्यात यशवंतरावांची संरक्षणमंत्री म्हणून झालेली कारकीर्द निश्चित स्वरूपात नोंदविली जाईल.

बोलण्यात जितके मृदू तितकेच निर्णयात कठोर, जिद्दीने, प्रसंगावधानाने परिस्थितीचा ताबा घेण्याचा आवाका आणि चिरकाल लक्षात राहण्यासारखा सच्छील प्रामाणिकपणाचा गुणात्मक संगम यशवंतरावांच्या व्यक्तिमत्त्वात झालेला होता. तो जवळून पाहण्याचा मला अनुभव आला हे श्री. राव यांचे समाधान.

शब्दांकन : **अनिल दांडेकर**

## भास्करराव सोमण
(माजी नौदलप्रमुख)

## मंत्री म्हणून त्यांचा, आमच्या कामात कधीच हस्तक्षेप नव्हता

यशवंतरावजी संरक्षणमंत्री असताना मी नौदलाचा प्रमुख होतो. त्या काळात यशवंतरावांच्या स्वभावाचं दर्शन घडलं त्याची मला जाणवलेली विशेषत: म्हणजे ते कुठलाही गंभीर प्रश्न समोर ठाकला तरी ' अस्वस्थ ' होत नसत. शांतपणे तो प्रश्न सोडवण्याचा विचार करत.

ते मंत्री आणि आम्ही प्रत्यक्ष काम करणारे प्रमुख या आमच्या नात्यात तर त्यांच्या सभ्य व्यक्तिमत्त्वाची छटाच पदोपदी जाणवली. ते कधीही, मंत्री असूनही आमच्या निर्णयात हस्तक्षेप करत नसत. एखादं खात्यांतर्गत काम व्हावं, अशी त्यांची जरी इच्छा असली, ते काम आमच्या अखत्यारीत शक्य नसेल आणि

म्हणून आम्ही जर त्यांच्या ‘ कामाला ’ ‘ नको ’ म्हटलं तर ते सक्ती करत नसत. ‘ मंत्री ’ म्हणून स्वत:च्या अधिकारात परस्पर करू शकण्याच्या कामांबाबत परस्पर घेऊ शकण्याच्या आदेशांबाबत, ते आम्हा दलप्रमुखांचा सल्ला घेत. ते आमच्या सूचना कधीही धुडकावत नसत. आमचं सर्व म्हणणं शांतपणे ऐकून घेत. चिनी आक्रमणानंतर आम्ही दलप्रमुख आपआपल्या मागण्या मांडत असू. मी नौदलाचा प्रमुख होतो. त्याच बरोबर तिन्ही दलांच्या प्रमुखांच्या समितीचाही प्रमुख होतो. साहजिकच समितीचा प्रमुख म्हणून, मी माझ्या नौदलाच्या मागण्यांना शेवटच्या क्रमाने प्राधान्य ठेवत असे. वाय. बी. म्हणाले की तुमच्या स्वत:च्या नौदलाचं प्रपोजल जे आहे, त्याला तुम्ही प्राधान्य का देत नाही ? मी त्यांना म्हणालो की, साहेब माझ्या ‘ समितिप्रमुख ’ या नव्या जबाबदारीत, मी माझ्या दलाचं घोडं दामटणं, मला बरं वाटत नाही आणि चीन-पाकिस्तानच्या बाबतीत नौदलापेक्षा ‘ वायुदलाचं ’ महत्त्व जास्त आहे. मला प्रॉयॉरिटी समजते. मी माझ्या खात्यात यामुळे जर अप्रिय झालो तर मी तोंड द्यायला तयार आहे. माझं म्हणणं साहेबांनी शांतपणे ऐकून घेतलं. पुन्हा कधीही हा विषय काढला नाही. त्यांच्या बरोबर काम करताना कधीच अडचण येत नसे. कारण ते परस्परात सुसंवाद उत्तम राखीत.

आम्हा दल-प्रमुखांवर ‘ वाय. बी. ’ चा संपूर्ण भरंवसा होता. १९६५ च्या पाकिस्तान युद्धाच्या वेळी खूप अफवा उठत. आम्ही ‘ आ, डोंट वरी ’ म्हटलं की ते विश्वास ठेवत. त्या काळात अशीच एक अफवा उठली की शत्रुपक्षाचं विमान आपल्या भागात उतरवतायत. त्यांचा रात्री अर्ध्या तासात फोन आला. मला म्हणाले, तुम्ही काय करणार ? मी उत्तरलो, “ मी शांतपणे झोपणार आहे. ह्या साऱ्या अफवा आहेत, घाबरण्याचं कारण नाही. ” सकाळी उजाडल्यावर आमची मीटिंग होती. मीटिंगमध्ये ‘ वाय. बीं. ’ नी पहिला प्रश्न केला, “ सोमण, झोप कशी लागली ? ” रात्रीच्या अस्वस्थ काळातल्या माझ्या फोनवरील उत्तरावरची त्यांची ही दिलखुलास ‘ प्रतिक्रिया ’ आमच्यावरचा विश्वास दाखवणारीच होती.

त्यांच्या संरक्षणमंत्रिपदाच्या काळातील सर्वांत महत्त्वाची घटना म्हणजे ‘ संरक्षण योजना ’ ( डीफेन्स प्लॅन ). या योजनेबाबत त्यांचं मार्गदर्शन खूप झालं. या योजनेनुसार चिनी आक्रमणानंतर लगेच ठरवण्यात आलं की, तिन्ही दलांचं एकत्र को-ऑर्डिनेशन हवे. ‘ वुई वर्क ऑन इट वुई प्रोड्यूस ए प्लॅन. ’

रोज परिस्थितीनुसार निर्णय घेण्याचं ठरवलं गेलं. आमच्या निर्णयावर वाय. बी. पूर्ण विश्वास ठेवत. आत्मविश्वास बाळगत.

युद्धकाळात वा एरवीही, काय झालं तर काय करायचं, त्याबाबत तिन्ही दलांनी संयुक्त विचार करण्याची प्रक्रिया सुरू झाली. याबाबतीतलं 'वाय. बीं.'चं मार्गदर्शन मोलाचं म्हणता येईल.

शब्दांकन : **सुधीर गाडगीळ**

## सैन्याचे मनोधैर्य सावरले

नोव्हेंबर १९६२ मध्ये यशवंतराव दिल्लीस गेले आणि नैतिक धैर्य नष्ट झालेल्या लष्कराची आणि संरक्षण मंत्रालयाची जबाबदारी स्वीकारली. लष्करात मनोधैर्य पुन्हा निर्माण करणे हे आपले आद्य कर्तव्य आहे आणि लष्कर आणि संरक्षण मंत्रालय यातील संघर्षाची कारणे निपटून काढणे हे आपले मुख्य कर्तव्य आहे, हे यशवंतरावांच्या तात्काळ लक्षात आले. आपल्या आधीच्या मंत्र्यांचा उद्दाम स्वभाव आणि अहंमन्य वृत्ती ही असंतोषाचे मूळ आहे हे त्यांनी ओळखले. या बाबतीत यशवंतरावांचा स्वभाव अगदी विरुद्ध होता. आपल्या सौजन्यपूर्ण व्यक्तिमत्त्वाने आणि सुसंस्कृत वृत्तीने दिल्लीच्या राजकीय जीवनावर त्यांनी आपला ठसा उमटवला. संरक्षण मंत्रालयात अभ्यासवृत्ती आणि विद्वत्ता या गुणांमुळे यशवंतरावांबद्दल आदर होता. लष्करात सर्व स्तरांवर त्यांना मान होता, कारण साध्या जवानांपेक्षा आपणास लढाईची अधिक माहिती आहे असा दावा त्यांनी कधीच केला नाही. आपल्या कौशल्याने आणि संयमाने त्यांनी लष्कर आणि संरक्षण मंत्रालय यांना जवळ आणले.

**ले. ज. शंकरराव थोरात**
(लोकराज्य, मार्च ८५)

## असामान्य प्रशासक

एक आठवण सांगताना श्री. प्रधान म्हणतात, "यशवंतरावजी आम्हाला सांगत की, जी साधने दिली आहेत त्यांचा कशा प्रकारे उपयोग केल्यास ही साधने जास्तीत जास्त उपयुक्त व परिणामकारक ठरतील हे ज्यांच्या हातात साधने आहेत, त्यांनीच ठरवावयाचे असते. ते दुसरे असेही म्हणत की, ही माणसे, जे अधिकारी माझ्याबरोबर काम करतात त्यांच्याकडून मी जेवढी निष्ठेची अपेक्षा करतो, तेवढीच निष्ठा मी त्यांना परत दिली पाहिजे. निष्ठा म्हणजे दुहेरी मार्ग आहे. तो कधी एकतर्फी होऊ शकत नाही." यशवंतरावजींची ही आठवण सांगताना श्री. प्रधान म्हणाले, "त्यांच्या या विचारसरणीचा मला कित्येक वेळा अनुभव आला आहे." यशवंतरावजी आपल्या खात्यातील पेचप्रसंग मुत्सद्दीपणाने कसे सोडवीत याचे अनेक दाखले प्रधान यांनी दिले.

## कौशल्याची कसोटी

यशवंतरावजींच्या शासकीय कौशल्याची कसोटी संरक्षणखात्याचे सचिव व लष्करप्रमुख जनरल चौधरी यांच्यातील बेबनावाच्या वेळी दिसून आली. याविषयीची आठवण सांगताना श्री. प्रधान

म्हणाले, "पी. व्ही. आर. राव हे अत्यंत विद्वान, शिस्तप्रिय आणि कडक, त्यामुळे त्यांच्यासमोर सैन्यातील वरिष्ठ अधिकारीही थरथर कापत. पी.व्ही.आर. राव यांचा पिंड सखोल अभ्यास करण्याचा होता. समोरच्या अधिकाऱ्यावर प्रश्नांची सरबत्ती करून ते माहिती घेत. एखाद्या अधिकाऱ्याने प्रश्नांचा सखोल अभ्यास केला नाही किंवा माहिती घेतली नाही असे श्री. राव यांना आढळून आले, तर ते त्या अधिकाऱ्याची हजेरी घेत. मग तो अधिकारी कितीही उच्चपदस्थ असो. याचमुळे जनरल चौधरी हे पी. व्ही. आर. राव यांच्यावर नाराज झाले होते. कारण पी. व्ही. आर. राव यांनी दुसऱ्या अधिकाऱ्याच्या देखत जनरल चौधरी यांचीच हजेरी घेतली असावी. त्यामुळेच जनरल चौधरी आल्या आल्याच मला म्हणाले की, मला आत्ताच संरक्षणमंत्र्यांना भेटावयाचे आहे. मी म्हटले आपण आत जाऊ शकता. अत्यंत गंभीर व निर्धारपूर्वक चेहऱ्याने जनरल चौधरी संरक्षणमंत्र्यांच्या खोलीत गेले. त्यांच्या चेहऱ्यावरून मला वाटले की, आपले म्हणणे संरक्षणमंत्र्यांनी ऐकलेच पाहिजे व आपल्या मनाप्रमाणे होईल या निर्धाराने जनरल चौधरी आत गेले आहेत. चौधरी पाच मिनिटांतच हसत हसत बाहेर आले, तेव्हा मला वाटले की त्यांचा पी. व्ही. आर. राव यांच्या बाबतीत खरोखरच विजय झाला असावा. मी जनरल चौधरींना विचारले, काय आपल्या मनाप्रमाणे झाले ना? त्यावर त्यांनी उत्तर दिले की संरक्षणमंत्र्यांना भेटताच मी ज्या गोष्टीचा राग मनात ठेवून गेलो होतो तो राग कोठल्या कोठे गेला."

**श्री. राम प्रधान यांच्या आठवणी**
(महाराष्ट्र टाईम्स–डिसें. ८४)

## पहिली संरक्षण योजना

भारत-चीन घटनेनंतर यशवंतरावजींना त्या वेळची आव्हानास्पद परिस्थिती हाताळण्यासाठी संरक्षणमंत्री म्हणून केंद्र सरकारने पाचारण केले. त्यांनी तात्काळ संपूर्ण प्रशासनयंत्रणेत आमूलाग्र बदल केला. अन्य काही व्यक्तीं-समवेत मलाही त्यांनी महाराष्ट्रातून नेले. त्या वेळी संरक्षण फळीतील जवानांचे धैर्य खचलेले होते...तसेच साधनसामग्रीही जुनी झालेली होती. संपूर्ण लष्कर, नौदल आणि हवाईदलाच्या साधनसामग्रीचे, त्यांच्या धोरणांचे, योजनांचे पुनर्निर्देशन करणे म्हणजे यशवंतरावजींच्या पुढे मोठा बाका प्रसंग उभा होता. मला सहसचिव नेमले. माझ्यावर धोरण व योजनेची जबाबदारी सोपविली. देशाची पहिली संरक्षण योजना आम्ही आखली आणि यशवंतरावजींनी ती पंतप्रधान आणि मंत्रिमंडळाकडून संमत करून घेतली. या धोरणाच्या कार्यान्वयामुळेच १९७१ मधील स्थिती नुसती सावरलीच नाही तर भारताला निःसंशय विजय मिळाला.

## मध्यवर्ती भूमिका

दूरदृष्टीने धोरणे आखण्यात आणि प्रशासकीय निर्णय घेण्याबाबत यशवंतरावजींनी मोठी महत्त्वाची कामगिरी बजावली. समस्यांची उकल स्वतः सोडवून त्यावर त्वरित व स्वच्छ निर्णय घेण्यात त्यांचा हातखंडा होता. ते आपल्या अधिकाऱ्यांशी मित्रत्वाच्या नात्याने वागत आणि आम्हीही त्यांच्याशी कोणत्याही विषयावर मोकळेपणाने चर्चा करीत असू. एखादा मुद्दा त्यांना पटला नसला तर आपली नापसंतीही ते अशा खुबीने व्यक्त करीत की, आम्हालाही ते मानावेच लागे. त्यामुळे सर्व अधिकारी त्यांच्याशी निष्ठेने, आदराने आणि प्रेमाने वागत. त्यांच्या आकस्मिक निधनाने राजकीय क्षितिजावर एक कायमची पोकळी निर्माण झाली आहे आणि त्याची तीव्रता महाराष्ट्राला प्रकर्षाने जाणवणार आहे. **डी. डी. साठे**

( लोकराज्य, मार्च ८५ )

## प्रशासकांना बहुमोल मार्गदर्शन

कायदा व सुव्यवस्था राखण्यासंबंधी यशवंतरावांचे विचार निर्भय व खंबीर होते. लोकहिताची, भाषणस्वातंत्र्याची चाड त्यांना असूनसुद्धा पोलिसांना त्यांचे अवघड व लोकांना अप्रिय पण अपरिहार्य असे कार्य करताना संरक्षण मिळावे म्हणून त्यांनी पुष्कळ वेळा आपल्या राजकीय पक्षाला न पटणारेसुद्धा निर्णय घेतले व निर्भय धोरण पत्करले. राज्याच्या व लोकसभेच्या लोकप्रतिनिधींपुढे विधानगृहात अगर लोकसभेत बोलताना त्यांनी पोलिसांची बाजू तितक्याच धिटाईने व समर्पक रीतीने मांडली. पोलिसांचे नीतिधैर्य खचू दिले नाही. कधीही घाईघाईने अगर प्रखर टीकेच्या आहारी जाऊन फुकाची आश्वासने देऊन ते मोकळे झाले नाहीत. आम्हाला त्यांचा केवढा आधार वाटायचा, परंतु वेळ पडल्यास उच्च पोलिस अगर मुलकी अधिकाऱ्यास सुद्धा ते खाजगी रीत्या चांगलीच तंबी देत व त्यांचे कुठे चुकते आहे ते दाखवून देत. पण त्यांनी कोठली गोष्ट आकसाने केल्याचे आठवत नाही. पोलिसांच्या प्रशिक्षणात त्यांनी मन घातले व अनेक उत्तम उत्तम सूचना केल्या. ते भारत सरकारचे गृहमंत्री असताना मी केंद्रीय गुप्तहेर विभागात सी. आय. बी. मध्ये होतो. गृहखात्यातील उच्च अधिकाऱ्यास ते नियमाने सकाळी भेटत व त्यांचे म्हणणे ऐकून घेत, फार उद्बोधक असे प्रश्न विचारीत व सल्ला देत.

यशवंतरावांना वाचनाचा आणि सखोल अभ्यासाचा नाद होता. कठीण दुर्मिळ पुस्तके ते प्रवासातसुद्धा भराभर वाचत आणि आत्मसात करीत. समाजवादाचा त्यांच्या तरुण मनावर बराच पगडा होता हे तर सर्वश्रुत आहे. पण ते तेवढेच उदारमतवादी होते. त्यांच्या सुसंस्कृत मनाला धर्मवेडाचा अगर जातीयवादाचा व त्यातून जन्मास येणाऱ्या हेव्यादाव्यांचा कधीच स्पर्श

झाला नाही. ते पूर्णतया देशाभिमानी होते. म्हणूनच संकुचित ब्राह्मणब्राह्मणेतर वादात त्यांची भूमिका स्पष्ट, निर्भीड व उदारमतवादाची होती. सत्यशोधक चळवळीबद्दलचे त्यांचे विचार प्रसिद्धच आहेत. लोकमान्य टिळक, आगरकर, गोखले, केळकर ह्या पुढाऱ्यांबद्दल त्यांना नितांत आदर होता. श्री. लक्ष्मणशास्त्री जोशी, गोगटे ह्यासारखे अनेक विद्वान त्यांच्या खाजगी जीवनात मित्र व चाहते होते. त्यांच्यासारखा निर्भय दूरदृष्टीचा व समंजस नेता त्या वेळी जर महाराष्ट्रात नसता, तर महाराष्ट्रातले जीवन जातीयवादाने दूषित झाले असते. जातिद्वेषाच्या रोगाची भयंकर कीड लागून महाराष्ट्राचा 'मद्रास' झाला असता. ते समंजस तर होतेच, पण खास करून संभाषणचतुर व उत्तम वक्ते होते, म्हणूनच त्यांची ती सौजन्यमूर्ती माणसे जोडत असे, तोडत नसे. त्यांच्या आमदर्शनात दलित-सवर्णवादाला थारा मिळाला नाही. आज जी खेडोपाडी व शहरांत ह्याबाबत शोचनीय कटुता आहे तेवढी तेव्हा नव्हती. "माणसे हेरून त्यांना आपलीशी करून ठेवण्याची यशवतरावांची हातोटी होती" असे प्रसिद्ध पत्रकार श्री. त्र्यं. वि. पर्वते आपल्या स्वानुभवावरून लिहितात. त्यांनी यशवंतरावांची तुलना दुसऱ्या एका महान व्यक्तीबरोबर केली आहे. कै. न. चिं. केळकर आणि यशवंतराव चव्हाण ह्या दोघांमधील साम्य दाखवताना ते म्हणतात, "माझ्या मनासमोर तात्यासाहेब केळकरांची मूर्ती उभी राहते. द्वेष न करता वागणे, होईल तितके आपल्या शक्तीप्रमाणे दुसऱ्याच्या उपयोगी पडणे हे गुण केळकर व चव्हाण यांच्यामध्ये मला सारखेच दिसून येतात. काव्यशास्त्र, विनोद, साहित्यप्रेम हे गुण देखील दोघांमध्ये सारखेच दिसून येतात."

कृ. पां. मेढेकर
(लोकराज्य, मार्च ८५)

यशवंतराव हे स्वतः शासकीय प्रशासनाचं पावित्र्य मानणाऱ्यांपैकी होते. प्रशासनातील जे काही चांगले आहे, हितकारक आहे, ते जपले पाहिजे, असे ते मानीत असत. परंतु असे असले तरीही राजकारण आणि समाजकारणातील अनुभवी माणसं आणि प्रशासनकार्यातील कार्यकुशल व्यक्तींच्या विचारांकडेच त्यांचा कल अधिक होता. ते सतत सनदी अधिकाऱ्यांपुढे कारभाराच्या एकूण पद्धतीबद्दल सदैव आपली मते आणि विचार प्रत्यक्षपणे मांडत असत, आपल्या नवीन धोरणाबद्दल आग्रह धरीत असत आणि प्रसंगी अशा अधिकाऱ्यांची मते पूर्णतः झुगारीत असत. आवश्यक वाटले तर त्याला दटावण्याच्या बाबतीतही मागेपुढे पाहात नसत. क्वचित प्रसंगी सनदी अधिकाऱ्याच्या हटवादीपणाने किंवा हेकेखोरपणाने ते इतके जेरीस येत असत की, शेवटी राग अनावर झाल्याचे वरकरणी दाखवून नंतर त्या अधिकाऱ्याला त्याचं नेमकं कुठे चुकतं आहे हे पटवून देत असत. परंतु असे असले तरीही सनदी अधिकाऱ्यांशी

असलेले आपले स्नेहाचे संबंध त्यांनी कधीच तोडले नाहीत. त्यांच्याबद्दल हृदयात नेहमीच आदरभाव आणि प्रेम त्यांनी कायम राखले होते.

कै. चव्हाण यांचे विचार नेहमी मोठे असायचे परंतु त्यात वादळीपण नसायचे. त्यांची कल्पनाशक्ती उदंड असली तरीही ती हिंसक नसायची. त्यांच्या कल्पनेला व्यवहाराची किनार असायची तर त्यांच्या विचारात आणि आचारात मात्र कल्पकता आणि योजकता असायची. नेहरूंच्या जवळ असलेली स्वप्नं पाहण्याची कल्पकता त्यांच्याजवळ निश्चित नव्हती. नेहरूंची कल्पकता ही परतत्त्वाने भारलेली असल्याने ती पृथ्वीवर आकारूच शकत नसे, तर ती अंतराळातच जमिनीपासून वर धुमारत असे. पण यशवंतरावांच्या बाबतीत परिस्थिती अगदी उलट होती. त्यांच्याजवळ कल्पकता असली तरीही त्यांचे पाय मातीत घट्ट रुतले होते आणि या पायांची पकड अशी घट्ट होती की, इतर सर्वसामान्य माणसाच्या पायापेक्षा त्यांच्या पाऊलखुणा वेगळ्या उमटत गेल्या. मातीशी नातं सांगण्याच्या त्यांच्या वृत्तीमुळेच त्यांचे व्यक्तिमत्त्व आणि कर्तृत्व इतरेजनांपेक्षा उंच होत गेलं होतं. नभाला झाकळून टाकणारं हे व्यक्तिमत्त्व नसलं तरीही ते ज्या ज्या क्षेत्रात वावरले त्या त्या क्षेत्रात त्यांनी आपल्या कार्यात सर्वांना स्तंभित केले होते. महाराष्ट्राचे नेतृत्व करीत असताना त्यांचा सहवास लाभलेली जी अनेक माणसे आहेत त्यांपैकी मी एक आहे. या सर्व माणसांना यशवंतरावांचा सहवास आणि त्यांच्या बरोबर केलेले जे कार्य होते त्यापासून निश्चितपणे एक आगळा आनंद होता. त्यामुळेच त्यांच्याबद्दल आम्हा सर्व मंडळींना नेहमी कृतज्ञता वाटत आली.

**श्री. विनोदराव**

( लोकराज्य, मार्च ८५ )

४

# सुसंस्कृत रसिक व्यक्तिमत्त्व

# हळुवार मनाचा सुसंस्कृत-सभ्य राजकारणी

**शरद् पवार**

सामाजिक आणि राजकीय क्षेत्रांत आघाडीवर राहून कार्य करणाराला केव्हा ना केव्हा समज-गैरसमजाचं धनी व्हावं लागतं. राजकारणातील श्रेष्ठ व्यक्ती सामाजिक किंवा राजकीय बदलाचा निर्णय करीत असताना त्या व्यक्तीला राजकीय आणि सामाजिक परिस्थितीचा सर्वांगीण विचार जबाबदारीनं करणं आवश्यक असतं. त्या निर्णयाचे परिणाम समाजजीवनावर घडणारे असतात. राजकारणाच्या क्षेत्रात कार्य करणाऱ्या सामान्यांपासून श्रेष्ठ कार्यकर्त्यांच्या कार्यशक्तीवर त्याचे परिणाम घडतात. राजकीय प्रतिमा निर्माण होण्यावरही हे परिणाम घडतात. त्यामुळे निर्णय करणाऱ्या व्यक्तीनं निर्णयाबद्दल आणि स्वतःच्या प्रतिमेबद्दलही सावध राहणं स्वाभाविक ठरतं. हळुवारपणा आणि सभ्यता प्रामुख्यानं सांभाळावी लागते; याचं कारण विचारवंत आणि प्रगल्भ बुद्धीच्या श्रेष्ठ राजकारणी व्यक्ती निर्णयासाठी बसतात त्या वेळी त्यांचा निर्णय हा सुसंस्कृत सभ्यतेचं दर्शन घडविणारा असेल किंवा असावा अशी लोकांची वाजवी अपेक्षा असते.

यशवंतराव चव्हाण हे महाराष्ट्र आणि राष्ट्रीय पातळीवरचे श्रेष्ठ राजकीय नेते, विचारवंत. पन्नास वर्षांच्या राजकीय जीवनात आणि त्यातील तीस वर्षांच्या सर्वश्रेष्ठ सत्ताधारी जीवनात त्यांना घडोघडी निर्णय करावे लागले. राजकीय किंवा सामाजिक स्वरूपाचे निर्णय करीत असताना किंवा निर्णय केल्यानंतर त्यांना जबरदस्त आव्हानांना सामोरं जावं लागलं. परंतु निर्णय केल्यावर ते स्वतः कधी सटपटले नाहीत किंवा पश्चात्ताप पावले नाहीत. त्यांच्या कृतीतून किंवा उक्तीतून पश्चात्ताप झाल्याचं त्यांनी कधी दर्शविलं नाही. याचा अर्थ ते दर्शविण्याची ऊर्मी त्यांनी या ना त्या कारणासाठी दाबून ठेवली असं नव्हे. पश्चात्ताप करण्याचा प्रसंग निर्माण झाला नाही किंवा त्यांनी तसा तो होऊ दिला नाही याचं कारण प्रत्येक निर्णय त्यांनी साफ मनानं केला. कोणावर तरी जाणूनबुजून अन्याय करण्याच्या हेतूनं केला नाही. ज्याच्या संबंधात निर्णय करावयाचा तो कोणत्या जातीचा आहे, धनिक आहे की गरीब आहे, स्वपक्षाचा आहे की

विरोधक आहे, या राज्यातला आहे की त्या राज्यातला आहे असली परिमाणे लावण्यापासून ते नेहमीच दूर राहिले. आपल्या एखाद्या निर्णयामुळे समाजातल्या एखाद्या घटकावर अन्याय तर झाला नाही ना याची दैनंदिन जीवनात तपासणी करण्याची सवय त्यांनी मनाला लावून घेतली होती. स्वतःशी प्रामाणिक राहून निर्णय करीत राहिल्यामुळे पश्चात्ताप करून घेण्याची शक्यताच उरली नसावी. त्यांच्याजवळ जे जे काही चांगलं होतं, भव्य होतं, उदात्त होतं ते ते त्यांनी निर्णयाच्या माध्यमातून समाजासाठी दिलं. महाराष्ट्रासाठी, देशासाठी दिलं, राजकारणासाठी दिलं.

संयुक्त महाराष्ट्रनिर्मितीच्या वेळी, पं. जवाहरलाल नेहरू यांच्या साक्षीनं त्यांनी साफ मनानं सांगितलं होतं की " महाराष्ट्राजवळ जे चांगलं असेल, भव्य असेल, उदात्त असेल ते सर्व आम्ही भारतासाठी प्रथम देऊ. भारत मोठा झाला तर महाराष्ट्र मोठा होणार आहे. महाराष्ट्र मोठा झाला तर भारत मोठा होणार आहे." यशवंतरावांनी जाहीरपणानं दिलेल्या या आश्वासनाचं, पुढच्या आयुष्यात त्यांनी स्वतः पालन केलं. सहकाऱ्यांनी आणि तमाम जनतेनं पालन करावं यासाठी किंबहुना तसं ते केलं जाईल यासाठी, ते कटाक्षानं सावध राहिले.

यशवंतरावांनी केलेला प्रत्येक निर्णय अगदी सर्वमान्य असाच ठरला असं म्हणता येणार नाही. काही निर्णय वादग्रस्त ठरले असतील. संशय निर्माण करणारे ठरले असतील. काहींनी त्यांच्या निर्णयशक्तीबद्दलच संशय व्यक्त केला तर काहींनी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा ग्रास घेण्याचा प्रयत्न केला. स्वतःच्या संदर्भात त्यांनी जो पवित्रा स्वीकारला त्याचा अन्वयार्थ लावताना कोणी त्यांना राजकीय संधिसाधू ठरविण्याचा प्रयत्न केला. यशवंतराव हे कुंपणावर बसलेले नेते आहेत असंही कोणी हिणवलं. त्यांच्या मुत्सद्दीपणाला कोणी धूर्त म्हणून संबोधलं.

हे सर्व घडत राहिलं असलं तरी त्याचा प्रतिकार करण्यासाठी यशवंतराव क्वचितच सरसावले. याचं खरं कारण यशवंतरावांचं मन साफ होतं. सारा समाज आणि सारं राष्ट्र हे त्यांनी आपलं आराध्य दैवत मानलं होतं. पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या समाजवादी, लोकशाहीनिष्ठ, पुरोगामी नेतृत्वाचा आदर्श त्यांनी सातत्यानं समोर ठेवला होता. व्यष्टिजीवन समष्टिजीवनात पूर्णपणे एकरूप, एकजीव बनवून आचार-विचारधर्म पाळण्याचं व्रत अंगीकारलं होतं. संपूर्ण राष्ट्र आणि समाजातील प्रत्येक व्यक्ती समर्थ, संपन्न बनली पाहिजे या ध्येयाची बांधिलकी,

स्वातंत्र्यपूर्व काळापासूनच त्यांनी स्वीकारलेली असल्यानं, ते ज्यामुळं साध्य होईल, साध्य करता येईल त्या प्रत्येक साधनाचा त्यांनी प्रामाणिकपणे उपयोग केला. साधनाचा उपयोग सामान्यांसाठी करीत असताना समाजातील ज्यांचा स्वार्थ दुखावला गेला त्यांनी दूषणे देण्यासाठी खडे व्हावे यात नवल ते काय ?

यशवंतराव जेवढे केवढे मोठे झाले त्यापेक्षा अधिक मोठे व्हावेत अशी इच्छा धरणारे अनेक होते. ते योग्यही होतं. तसं अधिक मोठं व्हावं यासाठी त्यांनी धोका पत्करून मोठी झेप घ्यावी असं म्हणणारे आणि सुचविणारेही अनेक होते. धोका पत्करण्याचा किंवा झेप घेण्याचा निर्णय उघडपणे करीत नाहीत असं दिसताच धूर्तपणानं संधीची ते वाट पाहात बसणारे आहेत असा त्याचा अर्थ लावला गेला. राजकीय क्षेत्रात समन्वय साधून काँग्रेस पक्ष एकसंध राखण्याच्या त्यांच्या प्रयत्नाच्या वेळी हितसंबंधीयांनी त्यांनाच कुंपणावर बसविलं.

हे सर्व पाहिलं म्हणजे यशवंतरावांच्या मनाचा, कृतीचा आणि निर्णयाचा शोध घेणं, अन्वयार्थ लावणं अधिकच कठीण ठरतं. दूर अंतरावर राहून यशवंतरावांच्या मनाचा आणि कृतीचा योग्य अर्थ लावता येणारा नाही. त्यासाठी त्यांच्या मनात डोकवावं लागेल. ज्यांनी तसा प्रयत्न केला असेल त्यांना त्यांच्या कृतीचा किंवा निर्णयाचा अर्थ उमजला असण्याची शक्यता आहे.

त्यांचं मन कसं काम करीत होतं हे त्यांच्या राजकीय आयुष्यातील दोन-तीन प्रमुख घटनांवरून लक्षात येण्यासारखं आहे.

१९६६ साली पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांचं ताश्कंद येथे अकस्मात निधन झालं. यशवंतराव हे त्या वेळी संरक्षणमंत्री होते. शास्त्रीजींच्या समवेत होते. शास्त्रीजींचा पार्थिव देह त्यांनीच भारतात—नवी दिल्ली येथे आणला. पाकिस्तानवर विजय संपादन करणारे संरक्षणमंत्री म्हणून त्या काळात यशवंतरावांची प्रतिमा खूपच उंचावली होती.

शास्त्रीजींच्या नंतर पंतप्रधान कोण याची चर्चा सुरू झाली त्या वेळी सर्वतोमुखी प्रामुख्यानं यशवंतरावांच्याच नावाचा उच्चार सुरू झाला. के. कामराज हे त्या वेळी अ. भा. काँग्रेसचे अध्यक्ष होते. ते यशवंतरावांचे जुने मित्र. पंतप्रधानपदासाठी श्री. कामराजांच्या गोटातून यशवंतरावजींचे नाव पुढे आणण्यात आले. स. का. पाटील यांनी यशवंतरावांच्या बाजूनं उभं राहण्याची तयारी दर्शविली. महाराष्ट्राचे त्या वेळचे मुख्यमंत्री वसंतराव नाईक, प्रदेशाध्यक्ष विनायकराव पाटील

आणि कितीतरी नेत्यांनी, कार्यकर्त्यांनी पंतप्रधानपदाची ही निवडणूक यशवंतरावजींनी ठामपणानं लढवावी असा आग्रह धरला. त्यामध्ये मी एक होतो. मोरारजी देसाई उभे राहिले तरी तशी काळजी नव्हती. कारण दिल्लीतील अन्य नेतागण यशवंतरावांचं नेतृत्व मान्य करण्यास राजी होता. खलबतं सुरू होती. परंतु यशवंतराव स्तब्ध होते. आग्रह धरणारांशी ते बोलत होते. त्यांच्या मनाचा थांगपत्ता मात्र लागत नव्हता. कदाचित ते दिल्लीच्या राजकारणाचा अंदाज घेत असावेत.

अटीतटीच्या चर्चा सुरू झाल्या आणि होकारार्थी किंवा नकारार्थी असा काहीतरी निर्णय सांगण्याचा क्षण निर्माण झाला त्या वेळी, दिल्लीत ठाण मांडून बसलेल्या महाराष्ट्रातील लोकांना त्यांनी सांगितलं—" ठीक आहे, इंदिरा गांधींशी मी बोलतो आणि मग काय ते सांगतो. अंतिम निर्णय नंतरच करू. "

" तुम्ही इंदिरा गांधींकडे चर्चेसाठी किंवा त्यांची मदत मागण्यासाठी जाऊ नये असं आम्हाला वाटतं. कारण त्यातून पेच निर्माण होईल. ही संधी तुम्ही घालवू नये. "–महाराष्ट्रीय मंडळी.

" तसं करून चालणार नाही. पंडित नेहरूंच्या त्या कन्या आहेत. पं. नेहरूंनी मला दिल्लीला आणलं. इथं काही महत्त्वाचा निर्णय करताना, एक नैतिक कर्तव्य म्हणून साफ मनानं मला त्यांच्याशी बोललं पाहिजे. "–यशवंतराव.

अखेरीस यशवंतराव स्वतःच इंदिराजींकडे गेले. त्या वेळी त्या माहिती व नभोवाणी खात्याच्या मंत्री होत्या. दोघांमध्ये चर्चा झाली. या चर्चेच्या वेळी यशवंतरावांनी त्यांना स्वच्छ शब्दांत सांगितलं की, " पंतप्रधानपदाची निवडणूक मी लढवावी असा आग्रह होत आहे. ते करायचं तर मला आपला पाठिंबा लागेल. तुम्ही मला पाठिंबा द्यावा. याउप्पर तुम्ही स्वतः इच्छुक असाल तर मला तसं सांगा. माझा तुम्हाला संपूर्ण पाठिंबा राहील. निर्णय मात्र आजच करावयास हवा. "

यशवंतराव चर्चा करून घरी परतले आणि नंतरच्या एक तासातच इंदिराजींनी त्यांना सांगितलं—" मी उभं राहायचं ठरवलं आहे."

त्या निवडणुकीत यशवंतरावांनी आपली सर्व शक्ती इंदिराजींसाठी पणाला लावली. पंतप्रधानपदावर त्या आरूढ झाल्या. यशवंतरावांना चालून आलेली संधी हुकली. पंडित नेहरूंवरील आत्यंतिक निष्ठेमुळं, कृतज्ञतेमुळं ज्यांनी

जीवनातली एक चालून आलेली उत्तम संधी हुकवली त्यांना धूर्त किंवा संधिसाधू ठरविणारांनी अंतर्मुखतेनं विचार करण्याची गरज आहे असं वाटतं.

त्यांच्या राजकीय आयुष्यात दुसऱ्यांदा अशीच एक संधी चालून आली. त्या वेळीही त्यांच्या निष्ठांचा कस लागून गेला. ही संधी आली होती जनता पक्ष केंद्रस्थानी कोसळल्यानंतरची. यशवंतरावांनी संसदेमध्ये जनता पक्षाच्या राजवटी-विरुद्ध अविश्वासाचा ठराव मांडला. ठराव संमत झाला आणि पंतप्रधान मोरारजी देसाई यांची राजवट संपुष्टात आली. दिल्लीत गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली. त्या वेळचा जनसंघ मोरारजींच्या नेतृत्वावर नाखुष होता. पंतप्रधानपद मिळविण्यासाठी चौधरी चरणसिंग आतुर बनले होते. परंतु जनसंघाला, विशेषतः अटलबिहारी वाजपेयी यांना चौधरी चरणसिंगांनी नेतृत्व करावे हे मान्य होण्या-सारखे नव्हते. त्या वेळचे राष्ट्रपती श्री. नीलम संजीव रेड्डी यांनी तर यशवंत-रावांना पाचारण करून पंतप्रधानपद स्वीकारण्याची गळ घातली. या विचाराला श्री. अटलबिहारी वाजपेयी यांनी दुजोरा दिला. इतकेच नव्हे तर यशवंतरावांना आमचा संपूर्ण पाठिंबा राहील असा निरोप एका विश्वासू मध्यस्थामार्फत यशवंत-रावांकडे पाठविला. हा विश्वासू मध्यस्थही काँग्रेस पक्षामधील होता. यशवंत-रावांच्याही खास विश्वासातील तो होता. हा निरोप मिळताच यशवंतराव ज्या काँग्रेस पक्षाचे संसदेत नेतृत्व करीत होते त्या पक्षात चर्चा सुरू झाली.

दुसऱ्या बाजूला चरणसिंग हे पंतप्रधान बनल्यामुळे उत्तर प्रदेश, बिहार वगैरे भागातील शेतकरी वर्गातील ज्या गटाला प्राधान्य मिळणार होते त्या गटाने चरणसिंग यांच्या पाठीशी सर्व शक्ती उभी केली. तरीपण चरणसिंग यांची म्हणून त्या भागात काही शक्ती असली तरी तिचा पाडाव करणे त्या वेळी सहज शक्य ठरणार होते. कारण जनता पक्षातला बहुसंख्येने मोठा असलेला गट चरणसिंगां-पासून अलिप्त होण्यासाठी दबा धरून बसला होता.

काँग्रेस पक्षाच्या संसदीय मंडळानं या गटाचं सहकार्य घेण्याचा निर्णय त्या वेळी केला असता तर संपूर्ण चित्र बदलण्याची शक्यता होती. संसदीय काँग्रेस पक्षानं, चरणसिंगांना बाजूला सारण्याचा पवित्रा स्वीकारला असता तर यशवंतरावजींना त्या वेळी प्रधानमंत्री होणे शक्य होते. परंतु काँग्रेस पक्षाच्या संसदीय मंडळाने चौधरी चरणसिंग यांना सहकार्य देण्याचा निर्णय घेतला. वस्तुतः काँग्रेस पक्षाच्या बहुसंख्य खासदारांना हा निर्णय मान्य नव्हता, परंतु

संसदीय मंडळाच्या निर्णयाचा आदर करण्याचा सल्ला स्वतः यशवंतरावजींनी सर्व खासदारांना दिला. त्यामुळे चौधरी चरणसिंग प्रधानमंत्री झाले. पंतप्रधानपद की पक्षनिष्ठा, पक्षाचा आदेश, असा यशवंतरावजींच्या समोर पेच निर्माण होताच त्यांनी पक्षनिष्ठा आणि पक्षाचा निर्णय याच्या बाजूने कौल दिला. पंतप्रधानपद हातचे निसटले.

अशा प्रकारे पंतप्रधानपदी आरूढ होण्याची पहिली आणि दुसरी संधी हुकली तरी यशवंतरावांना निराशेनं ग्रासलं नाही. स्वतःच्या मोठेपणापेक्षाही पक्षाचा मोठेपणा आणि त्याहीपेक्षा देशाचं स्थैर्य याचं त्यांच्या मनीमानसी सर्वोच्च स्थान होतं. १९८० च्या सार्वत्रिक निवडणुकीच्या निकालानंतर इंदिरा काँग्रेसमध्ये एकरूप होणाऱ्या भूमिकेच्या पाठीशी हाच त्यांचा विचार होता.

यशवंतरावांना, त्यांच्या राजकीय प्रवासात अनेक समस्यांना सामोरं जावं लागलं. संकटांशी सामना करावा लागला, निर्णय करावा लागला. परंतु त्यांच्या हळुवार मनानं कधी तोल जाऊ दिला नाही. सभ्यता त्यांना कधी पारखी झाली नाही. सुसंस्कृतपणा कधी ढळला नाही.

यशवंतराव किती हळुवार मनाचे सभ्य आणि सुसंस्कृत राजकारणी होते त्याची एक आठवण माझ्या मनात निरंतरची राहिली आहे. यशवंतरावजी इंदिरा काँग्रेसमध्ये म्हणजे स्वगृही गेले. त्यांचा स्वगृही पदार्पण करण्याचा निर्णय होताच महाराष्ट्रातील अनेकांनी ती वाटचाल पत्करली. माझ्या बरोबरीने निवडून आलेले काही आमदारही त्यांच्या सांगाती तिकडे गेले.

नंतर दिल्लीत एकदा भेट झाली तेव्हा कसं काय चाललंय म्हणून त्यांनी मला विचारलं. 'सभागृहात पाच-सहा जणांचं नेतृत्व करतोय' असं मी सांगितलं. क्षणभर थांबून त्यांनी माझ्याकडं पाहिलं. डोळ्यात अश्रू तरारले होते !

# तुझी साद तुझे आशीर्वाद प्राणांचे दुवे मेळवीत गेले
# तुझी साथ तुझे आशीर्वाद घर भरून दिवे लावून गेले

**ना. धों. महानोर**

यशवंतरावांचा नि माझा दहा वर्षांचा सहवास, तसा थोडा, पण कितीतरी मोठा. काय लिहावं, किती लिहावं, काही सांगता येईल, काही शब्दांच्या पलीकडलं आहे. एवढ्या मोठ्या मनाचा, उंचीचा, जीवनाच्या सर्वांगाची समृद्धता–विशालता असलेला माणूस नव्या सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक परिणामांचे भान ठेवून देशाच्या, महाराष्ट्राच्या जडणघडणीचा ऐश्वर्यसंपन्न, सुजाण शिल्पकार. सह्याद्रीच्या छातीचा आणि फुलराणीतल्या नाजूक, सुगंधी शब्द-बंधातला सुसंस्कृत नेता. शेवटपर्यंत सामान्य माणसातला नेता. अलवार, कोवळ्या कविहृदयाचा रसिक घरंदाज.

कविता, साहित्य या निमित्तानं आता फक्त थोडं ऋणानुबंधातलं सांगतो.

डिसेंबर १९७४ इचलकरंजी साहित्य संमेलन.

पक्ष्यांचे लक्ष थवे
गगनाला पंख नवे
वाऱ्यावर
गंधभार
भरलेले ओचे
झाडातून लदबदले
बहर कांचनाचे
घन वाजत गाजत ये
थेंब अमृताचे

दोन कविता वाचण्याची मर्यादा कवीला होती. तीस हजार रसिकांच्या पुढे कोणाचेही काही चालेना. रसिकांच्या आग्रहाने मी पाच-सहा कविता वाचल्या. दुसऱ्या दिवशीही वाचल्या. व्यासपीठावर सर्व ज्येष्ठ, श्रेष्ठ कवी होते.

समोर रसिकांत भाऊसाहेब खांडेकरांपासून माडगूळकर इत्यादी, आणखी यशवंतराव चव्हाण. मी कविसंमेलन खूप गाजविले होते.

रात्री नऊ वाजता कुमार गंधर्वांचं गाणं होतं. मंडपाजवळ मला रणजीत देसाई घ्यायला आले. तेथील मुक्कामावर मला चव्हाणसाहेबांनी बोलाविल्याचं सांगितलं. माझी त्यांची साधी ओळखही नव्हती. मी बुजल्यासारखा गेलो. यशवंतराव चव्हाणांनी जवळ घेऊन मिठी मारली. कविता, राहणं, उद्योग, घरचं सगळं विचारलं. हजार वस्तीच्या खेड्यात मी राहतो व घरी कोणीही शिकलेलं नाही हे ते पुन्हा पुन्हा इतरांना सांगत होते.

यशवंतराव त्या वेळी परराष्ट्रमंत्री होते. त्यांनी कोल्हापूरला जाणं रद्द केलं व रात्री माझी व अनेक कवींची मैफल झाली. बोरकर, अनिल, पाडगावकर इत्यादी, तसेच दुर्गाताई, पु. ल. देशपांडे, कुरुंदकर इत्यादी मिळून शंभर लोकांमधली कधीही न विसरावी अशी ती मैफल. त्यांच्या माझ्या ऋणानुबंधाचा हा पहिला धागा.

त्यानंतर बरोबर महिन्याभराने माझ्या जिल्ह्यात एका साखर कारखान्याच्या उद्घाटनासाठी यशवंतराव आले. सोबत मुख्यमंत्री नाईकसाहेब व मंत्रिमंडळ. मला बोलवून आणायला अगोदरच सांगितलं होतं.

सर्व मंत्री, आमदार, खासदार, जिल्हाभर फिरले. परंतु त्यांना चव्हाण-साहेबांनी सांगितलेला तो फार मोठा कवी सापडेना ! समारंभ आटोपल्यानंतर गर्दीत घुसून मी नमस्कारासाठी समोर गेलो तर त्यांनी मला सोडलेच नाही. आमचे आमदार, खासदार, मंत्री थंडगार झाले. दोन दिवस फिरून ते थकले होते.

‘ अहो, हा तर पंचविशीतला पोरगा, पळसखेडचा, हा कुठला थोर कवी वगैरे ’ आमचे लोक. माझ्या खेड्यात धावाधाव, जेवणानंतर पुन्हा शेती, घरचं व गप्पा झाल्या.

चव्हाणसाहेबांनी माझ्या कविता समोरच्या रसिकांना पाठ म्हणून दाखविल्या. नंतर मी म्हटल्या वगैरे. ही रसिकता, साहित्यप्रेम व माणसावर, कलेवर जीव ओवाळून टाकणं फक्त त्यांच्याजवळंच होतं.

एक परराष्ट्रमंत्री, सार्वभौम नेता आपल्याकडे राजकीय प्रणालीत कसा असतो वागतो हे नवीन नाही. एवढं निर्भर, निर्मळ, काहीही संबंध नसताना प्रेम

करायला मन आभाळाएवढं, फार परिपूर्ण लागतं. नंतर दहा वर्षांत मी आणखी अनेक लोक चव्हाणसाहेबांच्या घरातले झालो. कवितेच्या निमित्तानं जवळ आलो. गेली दहा वर्षं एका कुटुंबातले असल्यागत जगलो, प्रेम केले. कविता, साहित्य ह्याशिवाय व्यवहारातलं जग, माझे शेतीचे प्रश्न, कुटुंबातले प्रश्न, माणसं त्यांची झाली.

त्यांच्यात माझ्यात सर्वार्थानं फार मोठे अंतर, ते अंतर मोडून ते सातत्याने माझ्या जवळ राहिले. हे वाटतं तितकं सोपं नाही. एका उन्हाळ्यात बद्रिनारायणाच्या दर्शनानंतर माझे आई-वडील, चव्हाणसाहेबांकडे दिल्लीत मुलाची ओळख आहे, भेटून यावं म्हणून गेले. लाल पगडीचं मुंडासं, धोतर, आईचं नऊवारी लुगडं-चोळी. लिहिणंवाचणं नाव माहीत नाही. पोलिस, पहारेकरी, सर्वत्र आडवा-अडवी, त्रास, पण चव्हाणसाहेबांचा आनंद किती सांगावा. माझ्या कवीचे आई-वडील माझ्या घरी आले! त्यांना थांबवून घेतलं, दिल्ली दाखविली, इंदिरा गांधी, राष्ट्रपती व अनेकांच्या भेटीची वडिलांची व सोबत्यांची इच्छा होती. सगळं काही केलं. हे फक्त तेच करू शकत होते.

नंतर माझे वडील वारल्यावर दिवसावर घरी पळसखेडला आले. मुख्यमंत्री इत्यादी आले याचा मला मोठेपणा वाटत नाही. दरम्यान त्यांना माझे काही प्रश्न माहीत झाले. मी एकाकी, उदास. पत्रं त्यांना मोकळेपणानं पाठवायचो. भेटीत त्यावर ते आवर्जून विचारीत. वयाचं, मोठेपणाचं अंतर, नंतर नव्हतंच. माझ्या घरातले ते वडील माणूस म्हणून अंतःकरणाने होते. वडील वारलेले. मी सगळ्यात मोठा, धाकटी भावंडे, बहिणी, दोन मातोश्री, घरकुलातील भांडणं, अडचणी, पेच, भयाणता व त्यात माझी म्हणून जबाबदारी, भार, त्यांना माहीत होता. घरातला माणूस म्हणून, त्यांनी तो सोडवला. त्यांचा धाक दबाव घरच्यांची डोकी शुद्ध करून गेला. आज प्रश्न नाहीत असं नाही. परंतु त्यांनी संपूर्ण गुंतागुंत काढूनच टाकली. हे खरं तर त्यांच्या आमच्या वयाच्या, मोठेपणाच्या हिशेबात बसत नाही. परंतु आमच्यात हे असं नातं राहिलं. माझी कविता राहावी यासाठी हेही त्यांना जरुरीचं वाटलं होतं.

खरं तर शरदराव किंवा त्यांच्या इतक्याच जवळच्या आपल्या समवयस्क सहकाऱ्यांना सांगितलं नाही ते मी त्यांना सांगितलं.

यशवंतरावांच्या आस्थेवाईकपणाची आणखी एक आठवण आहे. माझ्या

तालुक्यातील वयोवृद्ध स्वातंत्र्य सैनिक हरिभाऊ गोडबोले महाराष्ट्रात मंत्री, मुख्यमंत्री, आमदार, खासदार सगळ्यांना त्यांच्या पारतंत्र्यातल्या जेलमधल्या कागदपत्रांचे भेंडोळे घेऊन दोन-तीन वर्षे भेटत राहिले. फारच विकल आर्थिक स्थिती. मानधन तर सोडाच पण साधे शासनाचे प्रशस्तिपत्रही त्यांना मिळाले नाही. माझ्याकडे आले तेव्हा मी त्यांना चिठ्ठी देऊन यशवंतरावजींकडे पाठविले. दिल्लीला ते सर्व ऐकून, पाहून यशवंतराव फार व्यथित झाले. ज्यांनी या स्वातंत्र्या-साठी यातना भोगल्या त्यांची ही स्थिती पाहून त्यांनी खेद व्यक्त केला. त्यांना लगेचच पाच दिवसांसाठी परदेशात जायचे होते. परराष्ट्रमंत्री म्हणून त्यांनी पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी ह्यांना भेटून सांगितले असा एक स्वातंत्र्य सैनिक हैदराबाद संस्थानात होता. एका फार मोठ्या कवीनं त्यांना पाठविलेलं आहे. चुकीच्या किंवा फालतू माणसाला ते कधीच पाठविणार नाहीत. आपण संबंधित मंत्रालयातील माणसांना सांगून त्यांना मानधन व ताम्रपट इत्यादींची इथल्या भेटीतच व्यवस्था करा, इत्यादी. तसे आदेश स्वतःच्या दिल्लीतल्या खास लोकांना दिले. इंदिराजींनी हरिभाऊ गोडबोले ह्यांना बोलवून जवळपास तेरा मिनिटे चर्चा करून हैदराबाद पोलिस ॲक्शन स्थिती इत्यादीविषयी चर्चा केली. आस्था दाखविली व ताम्रपट, सन्मान इ. बहाल केले गेले. दिल्लीत त्यांची विशेष काळजी घेतली. १९७५ ची ही गोष्ट आहे. तेव्हा मी नुकताच एक छोटा सामान्य कवी, नुकताच परिचय झालेला. परंतु कवितेच्या व कवीच्या नितांत प्रेमापोटी यशवंतराव चव्हाणांनी किती किंमत दिली ! तीही एका साध्या चिठ्ठीवर.

आणखी एक जुनी आठवण आहे. माझा परिचय नव्हता. सभेत मी एक श्रोता म्हणून बसलो होतो. ही १९७२ची गोष्ट असेल. केंद्रामध्ये चव्हाणसाहेब मंत्री होते. महाराष्ट्रातल्या निवडणुकांसाठी जालन्याला सभा होती. सभेपूर्वी तिथले जवळपासचे खेड्यातले शाहीर करमणूक, रंजन इत्यादी करीत होते. चव्हाणसाहेब व्यासपीठावर आले तेव्हा ढोलकीवर जबरदस्त थाप मारून तो खेड्यातला शाहीर सुंदर गाणं म्हणत होता. त्याच्या शब्दांत सामर्थ्य व बाज होता. त्याला थांबवून सभेस सुरुवात करण्याचे आदेश काँग्रेस कमिटीने दिले. त्यांना चव्हाणसाहेबांनी सांगितलं भाषण नंतर करणारच आहोत. भाषणवाल्यांपेक्षा तो अधिक चांगले व प्रभावीपणे सांगतो आहे. त्याला आणखी म्हणू द्या. प्रचंड टाळ्यांचा कडकडाट. मग काय शाहीरानं पटका नीट बांधला व त्यालाही स्फुरण

आलं व त्यानं खऱ्या मराठमोळ्या मातीचं शब्दाचं गाणं गावरान पद्धतीनं म्हटलं. त्याची वारंवार चव्हाणसाहेबांनी नंतर आठवण ठेवली. सभेनंतर त्याला बोलावून घेऊन विचारलं. धन्यवाद दिले. सभेत त्याचा उल्लेख केला. मग त्यांनी लोक-साहित्याचं स्वतंत्र दालन महाराष्ट्रात केलं, त्याचं संवर्धन वाढ व्हावी म्हणून धडपडावं, कला लोककला ह्यासाठी वेगळं काही करावं, शाहीरासाठीची अकादमी व्हावी, त्यांच्या लयींची, रांगड्या प्रादेशिक बोलींचं रेकॉर्डिंग जवळ ठेवावं, संशोधन व्हावं म्हणून सतत संबंधित साहित्यिक संशोधकांशी बोलावं, साहित्य संस्कृती मंडळ आणखी याची कार्यकक्षा वाढावी, नव्या महाराष्ट्रातल्या विशेषत: त्यांनी साहित्याकडे बघावं असं चव्हाणसाहेबांनी सातत्याने ते जातील त्या ठिकाणी सांगितलं. ओतप्रोत प्रेम व रसिकता त्यांचे ठिकाणी पाहिली.

साहित्य सभेच्या उद्‌घाटनासाठी चव्हाणसाहेब औरंगाबादला आले होते. कला, कविता, साहित्य सभा, साहित्य परिषद, पुस्तक प्रकाशन, चर्चा, साहित्य संमेलन हा त्या रसिक माणसाचा खराखुरा आनंदाचा क्षण असायचा. एखाद्या लहान मुलाचा आनंद व उत्साह मी प्रत्येक वेळी पाहिला. या साहित्य सभेच्या उद्‌घाटनाचे सुंदर भाषण त्यांनी केलं. सभागृहात साहित्यिकांचाच भरणा जास्त होता. आपल्या भाषणात त्यांनी अलीकडच्या काळातल्या दोन पाच वर्षांतल्या प्रवाहांचे उल्लेख केले. विशेषत: दलित साहित्य, ग्रामीण साहित्य व एकूण कलासाहित्यावर ते मन:पूर्वक व अभ्यासपूर्ण बोलले. विशेषत: त्यांनी ज्या ज्या नव्या पुस्तकांचे व त्यातील काही व्यक्तिरेखा, चित्रण, जीवन, कवितांचे उल्लेख करून केले. तेव्हा खूपच साहित्यिकांना आश्चर्याचा धक्का बसला व लाज वाटू लागली. कारण बहुतेक तिथे बसलेल्या साहित्यिकांनी ती नवी पुस्तके वाचलेली नव्हती. चार महिन्यांपूर्वी प्रकाशित झालेल्या एका अगदी नव्या कवीच्या कविता-संग्रहातील एक कविता त्यांनी उत्स्फूर्तपणे सहज म्हटली.

अंगावर चिंध्या पांघरून सोने विकायला बसलो तर
गिऱ्हाईक फिरकता फिरकेना
सोने अंगावर पांघरून चिंध्या विकावयास बसलो तर गर्दी
अजिबात आवरेना.

अशा काही तरी त्या ओळी होत्या. चव्हाणसाहेब साधे खासदार होते व राजकारणातले दिवस काहीसे नीट नव्हते. ह्या ओळी म्हटल्यावर चव्हाण-

साहेबांनी त्यांच्या पद्धतीनं विमानतळ ते विश्रामधाम कमी गर्दीचे कसे होते इत्यादी सहज उल्लेख केले. जिथे पूर्वी विमानतळ झाकले जाई तर प्रचंड टाळ्या, " चालायचंच " मी सहज काही कवितेच्या ओळी म्हणालो, असं प्रसन्न हसत हसत सभागृह जिंकले. पुन्हा त्यांनीच प्रश्न विचारला हा कोण कवी कुठे असतो ? माहीत आहे ? सगळ्यांना संभ्रम. त्यांनी सांगितलं देवदूत कविता-संग्रह – नागपुरात पोस्टात हा पोरगा नोकरी करतो. सामान्य स्थिती. अशा सुंदर ओळी लिहितो. दलितांमधून खेड्यापाड्यातून नवीन मुलं येत आहेत. नवा आशय नवा शब्द देताहेत. ही कवितेतील साहित्यातील मोठी क्रांती ! कोण म्हणतंय नव्या साहित्यात दम नाही ? इत्यादी.

त्याच रात्री सुभेदारी विश्रामधामवर रात्री नऊ वाजता पुढारी मंडळींची गर्दी. श्री. भालचंद्र नेमाडेंना भेटीसाठी घेऊन आलो असं मी त्यांना आत जाऊन सांगितलं. मग सगळ्यांना उद्या भेटू. आता काहीच शक्य नाही असं पुन्हा पुन्हा सांगून खोलीतून उठून थेट बाहेरच्या उघड्या दालनापर्यंत चालत आले. अन् हसत हसत भेटून हाती हात घेऊन नेमाडेंना खोलीत आणलं. हे आतिथ्य, साहित्यप्रेम, रसिकता विरळ. ही कुठे सापडत नाही किंवा असते दोन तास. नंतर साहित्यावर त्यांच्याशी चर्चा. नव्या लेखनाचे, स्वतःच्या आत्मचरित्राचे विचारणे इत्यादी.

कऱ्हाड पारितोषिकांचे पहिले पारितोषिक कवितेला दिले गेले ते दिलीप चित्रे ह्यांच्या " कवितेनंतरच्या कविता " ह्या पुस्तकाला. चव्हाणसाहेब स्वतः त्या समारंभाला कऱ्हाडला जातीनं थांबले. सगळं मनासारखं समारंभाचं रूप केलं. कवितेशिवाय काहीच नाही असं दोन दिवसांचं चर्चासत्र, भेटी, आठवणी, काव्यवाचन, इतरांच्या कविता असं स्वरूप ठेवलं. समीक्षेपासून कथा, कादंबरी, नाटक सर्वच वाङ्मयप्रकारात त्यांना रस होता. कविता ह्या प्रकारावर त्यांचा विशेष लोभ होता. एकदा मेघदूतासंबंधित सुंदर बोलत राहिले अशा अनेक घटना.

नॅशनल बुक ट्रस्टचे मराठी-गुजराती केंद्र दिल्लीहून मुंबईत आणलं. तो आग्रह त्यांनीच धरला. साहित्य अकादमीची बक्षिसं, त्यांची पद्धती, याचं स्वरूप बदललं पाहिजे असं ते आवर्जून म्हणाले. अनेकांशी त्यांची आमची चर्चा झाली. कितीतरी नव्या कल्पना कला, साहित्य, संस्कृती, नृत्य, चित्र, शिल्प, यासंबंधात त्यांच्या असायच्या. महाराष्ट्राच्या ह्या संदर्भातल्या जडणघडणीतल्या व्यवस्था,

यंत्रणा, संस्थांसंबंधी, साहित्य संस्कृती मंडळ, लोकसाहित्य समिती, कलाअकादमी इत्यादी आता कालाच्या संदर्भात खूप बदल केला तर पाहिजेच, असं त्यांना वाटे. परंतु निश्चित स्वरूपाचं संशोधन, संपादन काळजीपूर्वक केलं पाहिजेच, असा त्यांचा आग्रह होता.

केव्हा तरी आमदार म्हणून सभागृहात मी काही बोललो तर त्यांच्या मूळ कल्पना, विचार नंतर भेटीत ते बोलून दाखवीत. पदरात फार कमी पडतं. ह्या सगळ्या संस्था स्थापण्यातला हेतू, त्यापासून आपण दूर जातो, किंवा पसरट काही तरी करीत असतो ही खंत त्यांना होती.

हेच चव्हाणसाहेब साहित्यिकांच्या व्यासपीठावरून बोलत, नितळ रसिक साहित्यिक वाणीनं असं बोलत, तेव्हा त्यांचे राजकीय कपडे, त्या दृष्टीने त्यांच्याकडे पाहणं, इत्यादी बदललं पाहिजे, असं अनोळखी साहित्यिक मग जवळ आल्यावर, ऐकल्यावर म्हणत. साहित्यावर अपार प्रेम व जिव्हाळा, साहित्य संस्था, संमेलन इत्यादीविषयी त्यांना खूप अंतःकरणापासून आतून वाटायचं ते त्यासंबंधी सर्व काही करायला तयार असत.

मी काव्यवाचनाला १९८३ मध्ये दिल्लीत २६ जानेवारीला गेलो होतो. त्याच दिवशी नंतर सायंकाळी चव्हाणसाहेबांच्या घरी साधा परंतु फार मोठा व नेटका काव्यवाचनाचा कार्यक्रम त्यांनी घडवून आणला. अशोक जैन ह्यांनी ‘ केसरात भिजलेली एक अविस्मरणीय संध्याकाळ ’ असं त्याचं वर्णन केलं आहे. दिल्लीतले मराठी मंत्री, खासदार, न्यायमूर्ती, महाराष्ट्रातले सचीव, पत्रकार, साहित्यिक असे सर्व उपस्थित होते. ‘ खेडयातली मराठी कविता ’ असे आठ-दहा कवी मी वाचले. चव्हाणसाहेब मुद्दाम समोर बसले. माझ्याजवळ मागं वसंतदादा, सर्वोच्च न्यायमूर्ती यशवंतराव चंद्रचूड यांना सन्मानार्थ बसविले. बहिणाबाई चौधरी, बालकवी, पुन्हा नव्यानं ऐकल्याचा आनंद. दोन तास झकास काव्यवाचन झालं. रात्री चव्हाणसाहेब पुन्हा कवितेवर आले व म्हणाले, बी. रघुनाथ, ना. घ. देशपांडे, भालचंद्र लोकलेकर हे फारसे माहीत नसलेले कवी तुम्ही अशा पद्धतीने वाचले व त्यांच्या कविताही इतक्या सुंदर आहेत की मी तेव्हापासून त्यांच्या ओळीमध्ये गुरफटलेला आहे. मला त्यांच्या पुस्तकांची नावं सांगा. मी म्हणालो ना. घं. ची पुस्तकं मी पाठवितो. उरलेल्यांची पुस्तकं नाहीत. माझा छापण्याचा विचार आहे. ते म्हणाले की मराठी प्रकाशकांना आता काय सांगावं ? मग

चव्हाणसाहेब म्हणाले की, तुमच्याजवळ असलेल्या त्यांच्या कविता तरी मला द्या. मला पुन्हा पुन्हा वाचायला फार आवडेल. केवढे प्रतिभावंत कवी ज्यांचे फार नाव झाले नाही. असे पुन्हा पुन्हा दु:ख, कळकळ. मग मी बी. रघुनाथांची " उन्हात बसली न्हात " व भालचंद्र लोकलेकरांची " चोरलं काठ, पाऊल वाट " अशा कविता पुन्हा त्यांच्या इच्छेसाठी म्हटल्या. तेव्हा घरातून वेणूताई आणखी माझी पत्नी ह्यांना साहेबांनी मुद्दाम बोलवून घेतले व पुन्हा रात्र कवितेची केली.

# अंतरी नाना कळा असलेला मणूस

सुधीर फडके

श्री.. यशवंतराव चव्हाण यांचा माझा निकटचा जरी नाही तरी दाट परिचय होता. अनेक वेळा अनेक कारणांनी त्यांची भेट झाली होती. यशवंतरावांचं व्यक्तित्व अथांग होतं, पण तितकंच लोभस आणि बहुरंगी होतं. अर्थातच त्यांच्या आठवणीने मन उदास व अस्वस्थ झालं. महाराष्ट्राच्या व भारताच्या राजकीय इतिहासात राजकारणापेक्षा जास्त साहित्य, संगीत, कला यात येणाऱ्या पैलूदार व्यक्तित्वाबरोबर जवळचा संबंध आला याचा अभिमान वाटतो. त्यांच्या वागणुकीतील जिव्हाळा माझी राजकीय मतं पूर्णपणे भिन्न असूनही कमी झाला नाही.

यशवंतरावांना संगीताविषयी प्रेम होते. स्वर, सूर, शब्द या तिन्हीवर त्यांचे प्रेम होते. यशवंतराव मुख्यमंत्री असतानाची गोष्ट आहे. नंतरही त्यांनी मला वारंवार बोलाविले. लोभ कायम होता. केवळ गाण्यापुरता नव्हे तर व्यक्ती म्हणूनही.

यशवंतराव हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असताना गणेशोत्सवात दोनदा सह्याद्रि या निवासस्थानी माझ्या गाण्याचा कार्यक्रम झाला होता. एकदा सुगम संगीत, एकदा गीतरामायण. दुसरा कार्यक्रम संपल्यावर मी जायला निघालो तेव्हा यशवंतराव म्हणाले, "थोडं थांबाना". आपणाला कधी मनमोकळ्या गप्पा मारता आल्या नाहीत, असं म्हणून माझ्या साथीदारांना सांगून ते मला बाजूला घेऊन गेले. आम्ही दोघच होतो. यशवंतराव म्हणाले, "सुधीर, मी तुम्हाला केव्हापासून ओळखतो तुम्हाला माहीत आहे ? तुम्ही १९४१ च्या शेवटी कराडला आला होता पंडित देशपांड्यांच्याकडे. त्या वेळी तुम्ही आजारी होता. कासेगावकर वैद्य तुम्हाला औषध देत होते. त्या वेळपासून मी तुम्हाला ओळखतो." महाराष्ट्राचा मुख्यमंत्री इतकी जुनी आठवण ठेवतो याचं मला आश्चर्य वाटलं. वास्तविक त्या वेळी मी कोणीच नव्हतो. एक भटक्या माणूस होतो. त्यानंतर यशवंतरावांनी त्यांच्या लहानपणापासूनच्या अनेक गोष्टी सांगितल्या. अर्धा पाऊण

तास आम्ही बोलत होतो. शेवटी यशवंतरावांनी मला विचारलं, तुम्हाला काही अडचण असली किंवा काही हवं असलं तर मला कधीही सांगा. मी अवश्य ते सर्व करीन. मी म्हटले, " यशवंतराव, मी तुमच्याकडं वर मान करून येतो तसंच नेहमी यायची माझी इच्छा आहे." मला काहीही नको." तरी यशवंतरावांनी विचारलं, " तुमच्याकडं हे आहे का, ते आहे का." मी प्रत्येक गोष्टीला होकार दिला. शेवटी म्हणाले, " टेलिफोन आहे का ?" मी म्हटलं, अजून नाही, पण मी त्यासाठी आवेदन केलं आहे." लगेच त्यांनी श्री. डोंगऱ्यांना बोलावून सांगितलं की दोन दिवसांनी मुंबई टेलिफोनचे मॅनेजर मला भेटायला येणार आहेत, त्या वेळी सुधीरचा टेलिफोन द्यायला सांगायचं आहे याची नोंद करून ठेवा. त्यानंतर दहा-बारा दिवसांनी मी जनरल मॅनेजरला भेटलो त्या वेळी त्यांनी त्यांची डायरी दाखवून यशवंतरावांनी त्यांना तसे सांगितल्याची मला खात्री दिली. त्याच वेळी फ्री प्रेसचे त्या वेळचे संपादक श्री. नायर तिथे भेटले. ते टेलिफोन ॲडव्हायझरी कमिटीचे सभासद होते. त्यांनीही शिफारस केली आणि माझ्या घरी टेलिफोन आला.

यशवंतराव भारत सरकारचे संरक्षणमंत्री झाले त्याच वेळी चीनचे आक्रमण चालू होते. दिल्लीला जायला त्यांना दोनचार दिवस अवधी होता. सह्याद्रि या त्यांच्या निवासस्थानी संरक्षण साहाय्य निधी नानारूपानं देणग्या देण्यासाठी झुंबड उडाली होती. मी त्यांना अगोदर निरोप पाठवून त्यांची एकट्याचीच भेट मिळावी अशी विनंती केली, व त्यांनी होकार कळविला होता. ठरल्याप्रमाणे मी योग्य वेळी सह्याद्रीवर पोचलो. पुष्कळ गर्दी होती. त्यांच्या एका कार्यवाहांनी मला बसायला सांगितलं. यशवंतरावांना ११ वाजता बाहेर जायचे होते. त्यांनी मला १० वाजता बोलावलं होतं. ११ वाजायला आले तरी गर्दी कमी होईना. मी बसूनच होतो. ११ वाजता यशवंतरावांनी मला पाहिलं आणि म्हणाले की मला ब्रिटिश कौन्सिलरला भेटायला जायचं आहे, तुम्ही माझ्याबरोबर चला. मोटारीत आपल्याला बोलता येईल. मोटारीत यशवंतराव, डोंगरे, ड्रायव्हर आणि मी होतो. मी यशवंतरावांना म्हटलं, " चीनच्या आक्रमणाच्या वेळी मलाही काही काम करायची इच्छा आहे. गाण्याच्या रूपानं. परमेश्वरानं मला जी थोडीबहुत शक्ती दिली आहे त्याचा उपयोग करून मी कुठंही उभा राहिलो तरी शेकडो लोक मी माझ्याभोवती जमवू शकतो, प्रचार करू शकतो. एक गोष्ट मात्र स्पष्ट करतो की मी काँग्रेसवाला नाही, त्यामुळे सरकारला हवा असलेला प्रचारच करीन असं

नाही. पण राष्ट्राच्या हिताविरुद्ध कोणताही प्रचार करणार नाही. अशा वेळी मी करणार असलेल्या प्रचारास सरकारी अडथळा होणार नाही ना?" यशवंतराव हसले आणि म्हणाले, "मला तुमची मतं माहीत आहेत आणि तुमच्यावर माझा पूर्ण विश्वास आहे. त्यामुळे तुम्ही काहीही प्रचार केलात तरी तुम्हाला कसलाही अडथळा होणार नाही." मी म्हटलं, "मला तिबेट मुक्तीचा प्रचार करायची इच्छा आहे." त्यावर यशवंतराव म्हणाले, "हा प्रचार या वेळी करू नये असं मला तरी वाटतं. पण तुम्हाला करायचा असेल तर करू शकता." क्षणभर थांबून पुढे ते जे काही म्हणाले ते अत्यंत महत्त्वाचं आहे. यशवंतराव म्हणाले, "आता चीन आक्रमण करू शकला त्याचे कारण आपण तिबेटवर त्याला मुकाटपणाने कब्जा करू दिला हेच आहे. ब्रिटिशांनी अत्यंत शहाणपणाने तिबेट स्वतंत्र ठेवला होता तो का याचा विचार न करता आपण तिबेटचा घास चीनला घेऊ दिला त्याची फळं आता भोगतो आहेत. पण भविष्यात आपल्या फौजा जेव्हा समर्थ होतील तेव्हा तिबेटची मुक्ती आपणाला करावीच लागेल." नेहरूंच्या विचाराशी सतत जुळवून घेणाऱ्या पण मुक्त खऱ्या राष्ट्रीय विचारांच्या यशवंतरावांचं दर्शन स्पष्टपणे आजही माझ्या दृष्टीपुढं आहे.

पुढच्या काळात या ना त्या कारणाने मला दिल्लीला जावे लागले, सरकार दरबारची कामे पुढे सरकायची असतील तर दिल्लीकरांना सलाम करावाच लागतो. अशा वेळी यशवंतराव हेच हक्काचे ठिकाण होते.

श्री. मोहन रानडे आणि डॉ. मस्करेहन्स या स्वातंत्र्य वीरांची पोर्तुगालमधील तुरुंगातून मुक्तता करवून घेण्यासाठी मी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय चळवळ सुरू केली होती. त्या वेळी मला त्यासाठी अनेक वेळा दिल्लीला जावे लागत होते. परराष्ट्र संबंध कार्यालय, अनेक मंत्री, प्रधानमंत्री इंदिरा गांधी, राष्ट्राध्यक्ष राधाकृष्णन् आणि झाकीर हुसेन इतर पक्षांचे विविध नेते याबरोबरच त्या वेळी गृहमंत्री असलेल्या यशवंतरावांचीही भेट मला दोन-तीन वेळा घ्यावी लागली. त्यांपैकी एका भेटीच्या वेळी त्यांनी मुंबईचे कार्डिनल ग्रेशस यांना पोपला या संबंधात पोर्तुगालबरोबर मध्यस्थी करायची विनंती करावी असं सुचवलं. त्यांनी मान्य केलं. माझं काम झालं. मी जायला उठलो तेव्हा यशवंतरावांनी मला थांबवलं आणि म्हणाले, "आपल्याला अनेक दिवसांत गप्पा मारायला मिळाल्या नाहीत. बाहेर अनेक लोक थांबले आहेत हे मला माहीत आहे पण हे रोजचंच

आहे.'' त्यांनी श्री. डोंगऱ्यांना बोलावून सांगितलं की अर्धा तास कुणाला आत पाठवू नका. आमच्या मोकळेपणानं गप्पा झाल्या. त्यात ते म्हणाले, "सुधीर, तुमच्या पुष्कळ रेकॉर्डस माझ्याकडे आहेत, मी अनेक वेळा त्या ऐकतो. पण ज्या वेळी अतिशय गंभीर किंवा चिंतेत असतो त्या वेळी तुम्ही गायलेलं 'डोळ्या-मधले आसू पुसती ओठावरले गाणे' ही रेकॉर्ड लावतो आणि ते ऐकून मला विरंगुळा मिळतो.'' मी चटकन म्हटलं, "यशवंतराव, तुम्हाला हे गाणं वारंवार ऐकावं लागत असेल.'' यशवंतराव दिलखुलास हसले.

पाकिस्तानचा आपण पराभव केल्यानंतर विजयी संरक्षणमंत्री म्हणून यशवंतराव प्रथम मुंबईत आले त्या वेळी त्यांचं शिवाजी उद्यानावर दैवदुर्लभ असं स्वागत झालं. सगळी मुंबई त्यांच्या दर्शनासाठी लोटली होती. त्या सभेच्या सूत्रधारामध्ये प्रामुख्यानं पद्मश्री पु. ल. देशपांडे होते. यशवंतराव येण्यापूर्वी मी एक पद्य म्हटले होते. सभेला सुरुवात झाली. मी स्टेज पुढंच खाली बसलो होतो. सुरुवातीला काही वक्त्यांची भाषणं चालू होती त्या वेळी मी एका कागदावर काही मजकूर लिहिला आणि पु. लं. ना तो कागद यशवंतरावांच्या हातात द्यायला सांगितलं. मी लिहिलं होतं की "लहानापासून थोरापर्यंत सर्व नेते बोलताना हिंदू शीख असा उल्लेख करतात, त्यामुळे मुसलमान, ख्रिश्चनांप्रमाणे शीख हे हिंदूपेक्षा वेगळे आहेत असं लोकांच्या मनावर निष्कारण बिंबतं. विश्वहिंदू परिषदेच्या स्थापनेसाठी स्वामी चिन्मयानंदांच्या पवई आश्रमात जी पहिली बैठक झाली त्याला मी उपस्थित होतो. सुरुवातीचं संस्कृत पद्यं मीच गायलो होतो. त्या वेळी त्या संस्थेचं नाव काय असावं अशी चर्चा चालू असता शिखांचे त्या वेळचे श्रेष्ठ नेते मास्टर तारासिंग स्पष्टपणे म्हणाले की, 'विश्वहिंदू परिषद' हेच नाव योग्य आहे कारण बौद्ध, जैन, शीख हे सारे हिंदूच आहेत, त्यामुळे आपण या वेळी आपल्या भाषणात हिंदू आणि शीख असा उच्चार कृपा करून करू नये ही नम्र विनंती.

तो कागद यशवंतरावांनी वाचला आणि एक सुखद प्रत्यय त्या दिवशीच्या त्यांच्या भाषणात आला. हिंदू आणि शीख असा उल्लेख त्यांच्या त्या भाषणात त्यांनी चुकूनही केला नाही.

यशवंतरावांचं मन खऱ्या राष्ट्रीय विचारांशी सांगड घालण्याचा प्रयत्न काही वेळा कसं करत होतं त्याची ही मूर्तिमंत साक्ष आहे.

# संगीताचा रसिक श्रोता !

**पं. भीमसेन जोशी**

यशवंतराव चव्हाण—मोठा रसिक, उमदा माणूस. राजकारणाच्या क्षेत्रातले मोठे कमालीचे मुत्सद्दी. त्यांच्या मनाचे व्यवहार, त्यांच्या मनासारखी घटना घडल्यानंतरच कळायचे. स्वतः अभ्यासू, विचारवंत असल्यानं मनाशी योजलेले आडाखे बरोबर जुळायचे.

त्यांचा माझा निकटचा परिचय झाला तो, ते महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री झाले तेव्हा. संगीताच्या क्षेत्रातील माझं नाव ते ऐकून होते. त्यांनी मुख्यमंत्री होण्यापूर्वी माझं गाणं ऐकलं होतं. परंतु प्रत्यक्ष परिचय झालेला नव्हता. यशवंतराव हे कराडचे. त्यांचं शिक्षण कराडला झालं. राजकीय कार्यकर्ते म्हणून प्रारंभी कराड, सातारा भागातच त्यांनी काम केले. १९४२च्या भारत छोडो चळवळीत, भूमिगत अवस्थेत राहून सातारा जिल्ह्यात त्यांनी केलेल्या क्रांतिकार्याच्या कथा, कार्यकर्ता म्हणून काम करण्याची, लोकसंग्रह करण्याची शैली मी ऐकून होतो. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल कुतूहल मनात साठत राहिलं होतं.

ओगलेवाडीचे श्री. व्यंकटराव ओगले यांची माझी मैत्री होती. कराड येथील लक्ष्मी प्रिंटिंग प्रेसचे श्री. तमण्णा विंगकर हेही माझे मित्र. ओगलेवाडीच्या ग्लास फॅक्टरीत व्यंकटरावांच्या पुढाकाराने माझे गाण्याचे कार्यक्रम होत असत. कधी गणेशोत्सवाच्या निमित्ताने तर कधी केवळ गाणं ऐकायचंय म्हणून कार्यक्रम व्हायचे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरचा तो काळ होता. कार्यकर्ता म्हणून त्या भागात स्थिरावलेले यशवंतराव चव्हाण मुंबईपर्यंत, आमदार बनून पोहोचले होते. परंतु त्यांचे बहुतेक कुटुंबीय कराडात होते. त्यांच्या पत्नी सौ. वेणूताई चव्हाण यांची प्रकृती ठीक नसायची. म्हणून त्यांचाही मुक्काम कराडलाच अधिक काळ असायचा. व्यंकटराव ओगले, तमण्णा यांच्याबरोबरच्या गप्पांतून मला हे कळायचे. त्या काळात यशवंतरावांचीही कराडला सारखी ये-जा सुरू असायची. ते कराडात असले आणि त्याच वेळी व्यंकटराव ओगले यांनी गाण्याची बैठक जमविली असली तर कराडकर रसिकजण, ओगलेवाडीला येत असत. त्या रसिकांमध्ये

यशवंतराव असायचेच. परंतु हे आम्हाला नंतर माहिती व्हावयाचे. यशवंतराव कराडला आले की, त्यांच्याभोवती कार्यकर्त्यांचा, माणसांचा घोळका जमायचा. त्यातून वाट काढून त्यांना यावे लागे. गाण्याचे ते षोकी होते परंतु आपल्याबरोबर कार्यकर्त्यांचा थवा घेऊन एखाद्या बैठकीला जाऊन बसावे हे त्यांच्या मनाला रुचत नसावे. त्यामुळे गायन ऐकता येईल एवढ्या अंतरावर थांबूनच ते गाण्याचा आस्वाद घेत असत. व्यंकटरावांना हे नंतर समजावयाचे आणि त्यांच्या संबंधात मग गप्पा सुरू व्हायच्या.

मुख्यमंत्री बनून ते मुंबईत खऱ्या अर्थाने सत्ताधारी बनल्यानंतर त्यांचा माझा परिचय झाला तो त्यांनीच आयोजित केलेल्या एका मैफलीमुळे होय. संगीतात रस घेणारे असल्याने मुंबईत सूरसिंगार या संस्थेशी त्यांचा निकटचा संबंध होता. मला वाटते १९६१ साल असावे. खाँ. बडे गुलामअली खाँसाहेब ट्यूमरने आजारी होते. त्यांच्यावर उपचार करावे लागणार असल्याने त्यांना आर्थिक साहाय्य उपलब्ध करून देण्याची गरज निर्माण झाली. यशवंतराव कलेचे आणि कलावंतांचे चहाते. त्यांनी ही गोष्ट मनावर घेतली आणि खाँ. बडेगुलामअलींच्या मदतीसाठी म्हणून संगीताच्या मैफलीचा कार्यक्रम आयोजित करण्याचे ठरविले. या कार्यक्रमासाठी त्यांनी तीन कलाकारांची निवड केली. एक पं. निखिल बॅनर्जी यांचे सतारवादन, दुसरे सितारादेवी यांचं कथ्थक नृत्य आणि तिसरे पं. भीमसेन जोशी यांचे गायन. मुंबईत रंगभवनामध्ये हा कार्यक्रम झाला आणि त्याच्या उत्पन्नातून चाळीस हजारांवर रुपयांची रक्कम खाँ. बडेगुलामअली यांना वैद्यकीय उपचारासाठी उपलब्ध करून दिली. याच कार्यक्रमाच्या वेळी यशवंत-रावांनी मला एक तंबोऱ्याची प्रतिमा भेट म्हणून दिली. ती आठवण आजअखेर मी जपून ठेवली आहे. कलावंतांना यशवंतरावांचं असं सहकार्य असायचं पण त्याचा त्यांनी कधी बभ्रा केला नाही. बभ्रा होऊ दिला नाही!

महाराष्ट्र, कलेनं आणि कलाकारांनी समृद्ध बनावा यासाठी विविधांगी प्रयत्न करणारांमध्ये यशवंतरावांचं नाव अग्रक्रमानं नोंदवावं लागेल. कलेच्या आणि कलावंतांच्या अभिवृद्धीसाठी त्यांनी अनेक उपक्रम सुरू केले. उपक्रमांना गती दिली. सुविधा निर्माण करून दिल्या, कायद्याचे अडसर दूर केले. कला-कारांना सन्मानाची वागणूक दिली. कधी स्वतः कलावंतापर्यंत पोहोचले तर कधी कलावंतांना सन्मानाने आमंत्रित करून जवळीक साधली. कलावंताच्या,

कलाकाराच्या बाबतीत त्यांच्या मनात प्रांतभेद, जातिभेद नसायचा. माझे संगीतातले गुरू सवाई गंधर्व, त्याशिवाय मल्लिकार्जुन मन्सूर, गंगुबाई हनगळ, कुमार गंधर्व आदी आम्ही मंडळी मूळची कर्नाटकातली. जोत्स्ना भोळे या कर्नाटकाला लागूनच असलेल्या गोवा प्रांतीच्या. धारवाड, गदग, हुबळी, गोवा, अशा या शंभर मैलांच्या परिसराबद्दल यशवंतरावांना भारी कुतूहल होतं. अव्वल दर्जाच्या कलावंतांना जन्म देणारी ही सुपीक भूमी परमेश्वराने खास निर्माण केली असली पाहिजे असं कधी कधी गप्पांच्या ओघात म्हणावयाचे. या भूमीनं अनेक कलाकार आणि कर्तृत्ववान माणसं देशाला पुरविली असंही सांगायचे. पुढे ते संरक्षणमंत्री म्हणून दिल्लीत पोहोचल्यावर मोठ्या हुद्द्यापर्यंत पोहोचलेल्या कर्नाटकातल्या अधिकाऱ्यांशी त्यांच्या भेटी-गाठी होऊ लागल्या. त्याचाही उल्लेख ते माझ्याशी बोलताना करावयाचे. पुढं अशीही पुस्ती जोडलेली असायची की, कर्तृत्ववान माणूस, मग तो कुठल्याही प्रांतीचा असो, त्याला मी देशाचं भूषण मानतो.

महाराष्ट्रात मुख्यमंत्री आणि नंतरच्या पंधरा-वीस वर्षांत त्यांनी संरक्षणमंत्री, गृहमंत्री, अर्थमंत्री, परराष्ट्रमंत्री अशी सन्मानाची सत्तेची पदे भूषविली, परंतु या सर्व काळात त्यांना अधिकाराचा, सत्तेचा गर्व झालेला मी कधी पाहिला नाही. गाण्याच्या कार्यक्रमाच्या निमित्तानं माझी नेहमीच देशभर भ्रमंती सुरू राहिली. केंद्रीय जबाबदार मंत्री म्हणून कामाच्या निमित्तानं आणि समारंभाच्या निमित्तानं यशवंतरावांचीही भारतभर भ्रमंती सुरू असे. अशा दौऱ्यात माझ्या–त्यांच्या भेटीचं हमखास ठिकाण म्हणजे विमानतळ! आम्हा दोघांपैकी कोणीतरी येण्याच्या किंवा जाण्याच्या तयारीत असावयाचे. पण भेट व्हायचीच. बोलणंही व्हायचं. त्यांच्याभोवती अधिकाऱ्यांचा, संरक्षकांचा, स्थानिक पुढाऱ्यांचा गोतावळा असला तरी त्यांची नजर फिरती असावयाची. हव्या असलेल्या माणसाला शोधून काढण्यात ते तरबेज होते.

कलकत्ता विमानतळावर एकदा असेच घडले. यशवंतराव त्या वेळी संरक्षण-मंत्री होते. आसामला जाण्यासाठी ते कलकत्ता विमानतळावर आले होते. सकाळी १०ची वेळ असावी. कलकत्त्यातील गाणे संपवून मी परतीच्या मार्गावर विमानतळावर आलो होतो. विमानतळावर संरक्षणमंत्री उपस्थित असल्यानं बंदोबस्त कडक होता. मंत्र्यांच्या विमानाचं उड्डाण होईपर्यंत इतरेजनांनी

कंपाउंडच्या बाहेर थांबले पाहिजे अशी सक्ती होती. संरक्षणमंत्री मला ओळखतात, मला आत जाऊ द्या असे सुरक्षा अधिकाऱ्याला मी सांगितले. परंतु तो हुकुमाचा ताबेदार. त्याने मला बाहेरच रोखून ठेवले. इतर प्रवासी उभे होते त्यातच कंपाऊंडला खेटून मी उभा राहिलो. कसे काय कोणास ठाऊक; परंतु यशवंतरावांनी दुरून मला पाहिले आणि आश्चर्य असे की ते स्वतःच कंपाऊंडपर्यंत, मी उभा होतो तेथपर्यंत, चालत आले. लष्करी व अन्य अधिकाऱ्यांची तारांबळ उडाली. साहेबांच्या बरोबर मी अलगद विमानतळावर गेलो. त्यांनी सर्वांची ओळख करून दिली. माझी आस्थेनं चौकशी केली. संरक्षणमंत्री स्वतः एवढ्या सलगीनं आणि आपुलकीनं बोलत आहेत असं पाहून सर्वजण चपापले. पण तेव्हापासून पुढे केव्हाही, कलकत्ता विमानतळावर मला कोणी कसलाही प्रतिबंध केला नाही. सन्मानानेच वागविले.

माझ्या सार्वजनिक किंवा खाजगी गाण्याच्या बैठकींना यशवंतरावांची आणि त्यांच्या पत्नी सौ. वेणूताई यांची अनेकदा उपस्थिती असायची. मुंबईत किंवा दिल्लीत 'संतवाणी' चा कार्यक्रम असेल आणि यशवंतराव कुठे अन्यत्र दौऱ्यावर असले, कामात व्यग्र असले तरी सौ. वेणूताईंची उपस्थिती निश्चित असावयाची. स्वतः यशवंतराव येणार असले आणि अन्य काही कामामुळे त्यांना वेळेवर पोहोचणे शक्य होणार नसले तर संयोजकांकडे निरोप यायचा की भीमसेनचं गाणं मी पोहोचल्याशिवाय सुरू करू नका. अशा वेळी अन्य गायकांचं गायन संयोजक अगोदर सुरू करीत असत.

यशवंतराव उपस्थित असलेल्या कितीतरी मैफिलींची याद माझ्या मनात ताजी आहे. त्यात नागपूरचा किस्सा नमूद करण्यासारखा आहे. महाराष्ट्र असेंब्ली अधिवेशनला जोडूनच नागपूर येथे महाराष्ट्र राज्यानं सुरू केलेला संगीत महोत्सव आयोजित केला होता. सूरश्री केसरबाई यांना आणि मला त्यासाठी बोलाविले होते. केसरबाईंना कार्यक्रमाच्या ठिकाणी यायला वेळ लागायचा. मी वेळेवर पोहोचलो. परंतु असेंब्लीच्या कामाच्या गडबडीत असलेल्या मुख्यमंत्र्यांकडून–यशवंतरावांकडून निरोप आला की, मी येईपर्यंत कार्यक्रम सुरू करू नका. त्यांना फार तर अर्धा तास उशीर झाला असेल. ते पोहोचताच मी कार्यक्रम सुरू केला. त्या संगीत महोत्सवाच्या ठिकाणी मला एक गोष्ट खटकली ती अशी की, पुढच्या बाजूला बसलेले काही श्रोते वगळता मागच्या बाजूला जे

श्रोते होते ते कोणी कोंडाळं करून बसले होते, कोणी आडवे पसरले होते, कोणी एका अंगावर कलले होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीलाच, धाडस करून मी ध्वनिक्षेपकावरून माझी व्यथा सांगितली. मी सांगितलं की, संगीत ही कला आहे, शास्त्र आहे. या कलेचा आस्वाद कसा घ्यावा याची आपली काही संस्कृती आहे. गायन ऐकण्यासाठी कसे बसायचे याच्या काही पद्धती आहेत. त्याचे या ठिकाणी पालन झालेले बरे. माझं हे बोलणं ऐकताच यशवंतराव ताडकन उठले आणि त्यांनी श्रोत्यांना खडसावलं, "मैफलीची म्हणून काही एक शिस्त असते. ती पाळता येत नसेल तर घरी जा आणि झोपा. आडवं पसरण्याची जागा घर आहे, मैफिलीचं पटांगण नव्हे." त्यांनी स्वतःच असे खडसावल्यामुळे सारेजण सावरून बसले. माझं गाणं संपत आलं तेव्हा यशवंतरावांनी एक भजन म्हणण्याची फर्माइश केली. ते हिंदी भजन त्यांच्या अतिशय आवडीचं होतं. भैरवी रागातलं ते भजन मी गायलो. परंतु त्यामुळे केसरबाईंना घुस्सा आला. बैठक संपवून मी बाहेर येताच केसरबाई रागानं म्हणाल्या, "भैरवीशिवाय दुसऱ्या रागात तुला भजन येत नाही का?" मला एकच राग आणि एकच भजन येतं असं सांगून मी दूर झालो. यशवंतरावांना हेच हिंदी भजन आवडतं हे त्यांना सांगण्यात काही अर्थ नव्हता.

यशवंतरावांच्या ठिकाणी जे कलाप्रेम होतं, रसिकता होती, तेवढं प्रेम आणि रसिकता मला अन्य राजकारणी मंडळींत क्वचितच आढळली. राजकारणातलं त्यांचं स्थान, श्रेष्ठता आणि त्यांचं कलाप्रेम, रसिकता या दोन्ही गोष्टी संपूर्ण वेगळ्या होत्या. त्यांची माझी भेट झाली तर त्यांच्याकडून चौकशी व्हायची ती गाण्याची, कलेची. सध्या नवीन काय, कधी ऐकवणार याची विचारणा. गाणं ऐकण्यासाठी येण्याची त्यांची एक शिस्त होती. संपूर्ण मैफल ऐकण्याइतका वेळ असेल तरच ते मैफलीच्या ठिकाणी यायचे. गाणं ऐकायचं तर संपूर्ण, हा त्यांचा शिरस्ता ठरला होता. मैफल अर्धवट सोडून ते कधी उठायचे नाहीत. दिल्लीत एकदा असं घडलं. खासदार सोहनलाल यांनी स्वतःच्या घरी एक कार्यक्रम आयोजित केला. यामिनी कृष्णमूर्ती आणि मी असे आम्ही दोघेच होतो. खा. सोहनलाल यांनी विद्युत्दीपांचा झगझगाट नको म्हणून सर्वत्र शांत प्रकाशाच्या, समया ठेवल्या होत्या. कार्यक्रमासाठी अत्यंत निवडक मंडळींनाच आमंत्रणे होती. सुरुवातीला यामिनी कृष्णमूर्ती आणि नंतर मी अशी योजना होती. रात्री दहाच्या

रामनाम कायमचे स्मरणात राहील असे झाले. नंतर यशवंतराव मोठ्या खुषीने सर्वांना भेटले. त्यामुळे राजधानीतला तो आनंदसोहळा द्विगुणित झाला.

कलावंत यापेक्षाही व्यक्ती म्हणून माझा त्यांचा जो संबंध आला, त्या प्रत्येक वेळी हा एक निगर्वी, उमदा रसिक, कला आणि कलावंत यांच्याबद्दल जिव्हाळा असलेला थोर मनाचा माणूस याचंच दर्शन घडलं. त्यांची बोलण्याची एक वेगळीच ढब असायची. एखाद्याला त्याच्या मनाविरुद्ध काही सांगायचं असलं तरी आदरपूर्वक बोलत असत. त्यांनी कधी लागट भाषा वापरली नाही. कोणी कितीही जवळीक दाखविली तरी कधी दर्जा सोडला नाही. निःपक्षपाती राहून माणसं सांभाळण्याची हातोटी त्यांना साध्य झाली होती. त्यांचं माझं काही नातं-गोतं नव्हतं परंतु त्यांनी भावापेक्षा अधिक प्रेम केलं. दिल्लीत कसलीही अडचण येवो, आम्हाला त्यांचं घर हे हक्काचं घर होतं. लागेल ती मदत करण्याची त्यांची तयारी असे. त्यांचे स्वीय सहायक श्री. डोंगरे हेही तसेच. अडचणीसाठी धावून येण्यास नेहमीच तयार आणि तत्पर. यशवंतराव स्वतः दिल्लीत नसले आणि सौ. वेणूताई असल्या तरी आदरसत्कारात किंवा अडचण निवारण करण्यात कधी कसूर केली नाही.

राजकारणी असूनही यशवंतरावांसारखा सावध, प्रसंगावधानी, सुसंस्कृत, अष्टपैलू असा दुसरा कोणी राजकारणी मी पाहिला नाही. त्यांना एकदा भेटले की, पुन्हा भेटावे असे वाटायचे. ते दिल्लीत असतील त्या वेळी मी असलो तर समक्ष किंवा फोनवर भेट व्हायची. ते चौकशी करायचे. मी विमानतळावर जाण्यासाठी निघणार असलो तर आपली मोटार पाठवीत असत. शासकीय झेंडा फडफडणाऱ्या त्यांच्या त्या मोटारीतून विमानतळाकडे जाताना किंवा तेथे पोहोचल्यावर आमचा रुबाब काय वर्णावा !

मानसिक दृष्ट्या त्रासलेले असले किंवा अन्य काही कारणाने व्यथित असले तर गाणं ऐकणं हा त्यांचा विरंगुळा असायचा. " लोकांना तुम्ही गाणं ऐकवता, गाण्याचा आनंद देता, फार चांगलं काम करता तुम्ही " असं मला भेटले की म्हणायचे. त्यावर " देव आमची निवड एकदाच करतो, आम्हाला पुन्हा निवडणूक नसते " असं मी म्हटलं की मनसोक्त हसायचे.

सौ. वेणूताई गेल्या आणि हा उमदा माणूस उदास बनला. कधीमधी भेट होई. तेव्हा त्यांचं उदासपण पाहून मनाला यातना व्हायच्या. वेणूताईंच्या

बऱ्याच गोष्टी आल्या. ते सांगत होते त्याला फार मोठा अर्थ होता. अमेरिकेत असतानाच 'बेस्ट सेलर' म्हणून 'प्रिन्सेस' या कादंबरीची कीर्ती त्यांच्या कानावर आली होती. एका मराठी माणसाची गाजलेली इंग्रजी कादंबरी म्हणून ती त्यांनी विकत घेऊन वाचली होती. मराठी लेखकाच्या इंग्रजी लेखनाबद्दल त्यांना अत्यंत अभिमान वाटला होता.

ही सारी हकिगत सांगून ते म्हणाले होते, "मी माळगावकरांचं 'कान्होजी आंग्रे' हे चरित्र पूर्वीच वाचलं होतं. 'प्रिन्सेस' वाचून तर मी थक्कच झालो. हणून म्हटलं की, प्रिन्सेसचं भाषांतर करणं ही फार अवघड गोष्ट आहे."

'प्रिन्सेस' वाचूनच केवळ हा हाडाचा साहित्यिक थांबला नव्हता. तर माळगावकरांचा राहण्याचा, जगलबेटचा पत्ता काढून यशवंतरावांनी त्यांना दिल्लीला भेटीसाठी बोलावून घेतलं आणि त्यांच्याशी साहित्याबद्दल खूप सविस्तर चर्चा केली.

२२ मार्च १९६७ रोजी 'प्रिन्सेस'च्या प्रकाशनासाठी यशवंतराव दिल्लीहून मुद्दाम पुण्याला आले. एका भाषांतरित कादंबरीच्या प्रकाशनासाठी संरक्षण-मंत्र्यानं दिल्लीहून मुद्दाम पुण्याला यावं, याबद्दल त्यांच्यावर काही वर्तमानपत्रांतून थोडी टीकाही झाली. त्या टीकेला उत्तर देताना यशवंतराव आपल्या भाषणात प्रथमच म्हणाले, "माझ्यावर झालेली टीका मला माहीत आहे. मी या प्रकाशना-साठी का आलो हे सांगतो. माळगावकर हे महाराष्ट्रीयन लेखक जगविख्यात झाले आहेत. त्यांच्या कादंबरीचं भाषांतर माझ्या मित्रांनं केलं. माझा मित्रही मराठी माणूसच! मग माझ्यासारखा मराठी माणूस या प्रकाशनासाठी आला तर त्यात आश्चर्य काय? मीच योग्य आहे त्यासाठी!"

त्या वेळी यशवंतरावांनी आपल्या भाषणात एक नवाच साहित्यविषयक मुद्दा मांडला. भल्याभल्यांना तो मांडता आला नसता. यशवंतरावांचा खरा साहित्यिक पिंड दिसला तो त्या ठिकाणी! प्रिन्सेसच्या भाषांतराबद्दल बोलताना ते म्हणाले, "स्वतंत्र लिखाण करण्यापेक्षा भाषांतर करणं हे फार अवघड आहे. कारण भाषां-तरकाराला मूळ लेखकानं निर्माण केलेल्या व्यक्तिरेखांच्या भावभावनांच्या तळाशी जावं लागतं. ही फार अवघड गोष्ट आहे. भाषांतरकर्त्यानं ती गोष्ट यशस्वी-रीतीनं पार पाडलेली आहे."

भाषांतरकाराला दुबार परकायाप्रवेश करावा लागतो, ही गोष्ट साहित्यशास्त्रातला

मर्मज्ञच सांगू शकेल. यशवंतरावांनी ती गोष्ट आपल्या भाषणात अचूक टिपली.

कोणत्याही साहित्यविषयक लेखनात, वाचनात किंवा बोलण्यात अशा मार्मिक गोष्टी अचूक टिपण्यात तर त्यांचा हातखंडा होता. म्हणूनच अत्यंत आटोपशीर लेखन हे त्यांचं वैशिष्ट्य बनलं असावं. 'अमृतपुत्र' आणि 'हिरोशिमा' या माझ्या दोन मोठ्या कादंबऱ्यांना यशवंतरावजींनी प्रस्तावना लिहिल्या त्या अवघ्या चार-पाच पृष्ठांच्या! कुणालाही प्रथम वाटावं की, केवळ उपचार म्हणून लेखकाच्या समजुतीखातर या प्रस्तावना लिहिलेल्या आहेत! पण जेव्हा ते लेखन आपण बारकाईनं वाचतो तेव्हा त्या छोट्या प्रस्तावनालेखनात कसलीही त्रुटी नाही, हे आपल्या ध्यानात येतं. त्यांच्या या अद्भुत लेखनशैलीची भावी टीकाकारांना आवर्जून दखल घ्यावी लागेल.

मॉस्कोला टॉलस्टॉयच्या स्मारकाला भेट दिल्यानंतर त्यांनी लिहिलेला 'शांति-चितेचे भस्म' हा लेख किंवा ग. दि. माडगूळकरांवर लिहिलेला 'पापण्यात गोठविली नदी आसवांची' हे दोनच वानगीदाखल लेख बघावेत. एरवी अत्यंत संयमी आणि समतोल विचाराचा राजकारणी पुरुष हा बघता बघता भावनाकुल असा साहित्यिक बनतो. परंतु त्याही ठिकाणी अत्यंत भावनाविवश साहित्य-काराप्रमाणे आपल्या आसवांची नदी दुथडी भरून टाकीत नाही तर त्या आसवांना पापण्यांचा बांध घालतो. खऱ्या अर्थानं त्यांना संयमी पुरुष असंच म्हणावं लागेल.

'कृष्णाकाठ' या त्यांच्या आत्मचरित्राचा पहिला भाग साकार होताना अनेकांनी बघितला असेल. त्याबद्दल अनेक लोकांशी ते बोलत होते. त्या लेखनात संयम तर होताच पण आत्मचरित्र लिहिताना त्यात कुणाला काही खुपू नये, हा सावधपणाही होता. आत्मचरित्रात कित्येक लेखक आत्मसमर्थन करतात. लोकांचे हेवेदावे उगवून घेतात, आपली प्रतिमा आहे त्यापेक्षा अधिक उजळून टाकण्याचा प्रयत्न करतात. 'कृष्णाकाठ' मध्ये यांपैकी काहीही दिसणार नाही. वास्तवाचं चित्र अत्यंत संयमानं, सावधपणानं पण तितक्याच उत्कटपणानं रेखाटलेलं दिसेल. त्यात कडवटपणा कुठेही दिसणार नाही. स्वतःचा भलेपणा कुठेही आढळणार नाही. त्यांच्या आत्मचरित्राचे 'सागरतळी' आणि 'यमुना-तटी' हे पुढचे दोन भाग पुरे होऊ शकले नाहीत, हे मराठी सारस्वताचं दुर्भाग्य म्हणावं लागेल. कोणतेही कंगोरे नसलेलं समधात, संयमशील मनाचं ते

चित्रण बघायला मिळालं असतं तर आत्मचरित्रांचं दालन फार समृद्ध ठरलं असतं.

समधात, संयमी आणि समृद्ध मन असलेल्या यशवंतरावांना साहित्यसम्राट न. चिं. केळकर यांच्या जन्मशताब्दीला अध्यक्ष म्हणून पुणे येथे पाचारण करण्यात आले आणि ते त्यांनी कर्तव्यभावनेनं स्वीकारलेही! यशवंतरावांचं साहित्यिक कर्तृत्व त्या अध्यक्षपदाला पुरेसं नाही, असंही त्या वेळी काही तथाकथित साहित्यिक मंडळींना वाटत होतं. परंतु त्यांना बोलावण्याचा निर्धार पक्का झाला होता. श्री. मनोहर महादेव केळकरांनी त्यांना समग्र केळकर वाङ्मयाचे ग्रंथ पूर्वीच भेट म्हणून दिले होते. ते त्यांनी चांगलेच अभ्यासले होते हे आम्ही मंडळी जाणून होतो.

केळकर जन्मशताब्दीचा समारंभ पुणे येथील बालगंधर्व रंगमंदिरात होता. यशवंतरावांना घेऊन येण्यासाठी आम्ही गेलो तेव्हा ते म्हणाले, "मी कधी व्याख्यानाची टिपणं काढत नाही. पण आज काढलेली आहेत. कारण फार मोठ्या साहित्यकारावर आज बोलायचं आहे, तेही पुण्यात आणि साहित्यिकांच्या उपस्थितीत. जवळ टिपणं असलेली बरी!"

प्रत्यक्षात मात्र त्या दिवशी ती टिपणं समोर न ठेवताच त्यांनी जे भाषण केलं त्या भाषणातील प्रत्येक शब्दाशब्दातून केळकरांचं साहित्यिक रूप दिसत होतं. ज्या तथाकथित साहित्यिकांना यशवंतरावांची साहित्यिक उंची पुरेशी वाटली नव्हती त्यांनाही ती त्यांची उंची प्रतीत झाली. त्यांनी प्रांजळपणानं तशी नंतर कबुलीही दिली.

केळकर जन्मशताब्दीच्या निमित्तानं त्या दिवशी दहाबारा वृद्ध साहित्यिकांचा त्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. काही साहित्यिकांना आपल्या जागेवरून धड उठताही येत नव्हतं. यशवंतराव स्वतः त्या वृद्ध साहित्यिकांजवळ गेले आणि त्यांना शाल—श्रीफल देऊन त्यांचा जागीच सत्कार केला. स्वतःच्या ठायी साहित्याविषयी आणि साहित्यिकांविषयी अपार आस्था असल्याशिवाय असं कधी घडणार नाही.

त्याच दिवशी त्यांनी आणखी एक साहित्यिक सत्कृत्य केलं. प्रा. दे. द. वाडेकर यांचा मराठी तत्त्वज्ञान कोश द्रव्याभावी खुंटून पडला होता. वाडेकरांची आणि यशवंतरावांची या समारंभानंतर भेट घडवून आणण्यात आली. प्रा. वाडेकरांनी तत्त्वज्ञान कोशाच्या कार्याची माहिती त्यांना सांगितली आणि द्रव्याभावी हे एक

मोठं कार्य खोळंबून राहिलं असल्यानं या संबंधात आर्थिक साहाय्य कसं उपलब्ध होऊ शकेल हे पाहावं अशी विनंती केली. तुमच्यावर आमची सारी मदार आहे असंही सांगितलं. यशवंतरावजींनी हे सारं ऐकलं आणि " पाहुया काय करता येतं ते " असं मोघम आश्वासन दिलं. आणि आश्चर्य असं की पुढं थोडयाच दिवसांत तत्त्वज्ञान कोशासाठी पंचाऐशी हजार रुपये उपलब्ध झाले. हे कसं घडलं ते फक्त यशवंतराव जाणोत ! आम्हा मध्यस्थांना वाडेकरांनी त्याबद्दल धन्यवाद दिले. पण हे सारं कर्तृक साहित्यप्रेमी साहित्यिक यशवंतरावजींचं होतं.

' समग्र टिळक साहित्या 'चा प्रकाशन समारंभ १९७६ साली टिळक स्मारक मंदिरात झाला. इंदिराजींबरोबर यशवंतरावजी त्या समारंभाला उपस्थित होते. त्या दिवशी यशवंतरावजींनी केलेलं भाषण आठवणीत राहील असंच होतं. अंगात साहित्यिक गुण पुरते मिनल्याशिवाय थोर साहित्याची अशा तऱ्हेची साक्षेपी समालोचना सुतराम साधणार नाही.

या माणसानं साहित्यावर आणि तदनुषंगानं साहित्यिकावर पराकाष्ठेचं प्रेम केलं. चीनच्या आक्रमणाच्या वेळी लडाखचा भाग फार गाजला होता. साहित्यिकांनी तो भाग बघून यावा, असं या संरक्षणमंत्र्यानं ठरवलं. लगेच पु. ल. देशपांडे, पु. भा. भावे, ग. दि. माडगूळकर आणि वसंत सबनीस या महाराष्ट्रातील साहित्यकारांना लडाखला खास विमानाने पाठविण्याची व्यवस्था केली. राष्ट्राच्या राजकारणाशी साहित्यिकांचा घनिष्ठ संबंध असतो, हीच गोष्ट त्या वेळी यशवंतरावजींनी दर्शवून दिली. ग. दि. माडगूळकरांना विधान परिषदेत सामावून घेण्याचा हेतूही तोच ! राजकारण आणि साहित्य यांच्या पाळ्या वेगळ्या असूच शकणार नाहीत, अशी त्यांची नेहमी सांगी असे.

कोणतीही साहित्यिक कृती निर्माण करताना लेखकानं त्या त्या परिस्थितीचं, त्या त्या ठिकाणांचं जवळून निरीक्षण केलं पाहिजे, असं ते नेहमी कटाक्षानं सांगत. शास्त्रीजींवर कादंबरी लिहिण्याचा संकल्प प्रस्तुत लेखकानं सोडला, त्या वेळी यशवंतरावजींनी लेखकाची रशियात ताश्कंदला जाण्यासाठी आवश्यक ती सोय केली. त्यानंतर ' हिरोशिमा 'वर कादंबरी लिहिण्याचा संकल्प प्रस्तुत लेखकानं केला. लेखकाला जपानचं निमंत्रण मिळवून देण्यात यशवंतरावजींनी तत्परतेनं पुढाकार घेतला. अशा गोष्टी पार पाडण्यात त्यांचं साहित्यिकांवर प्रेम असेलही ! परंतु खरंखुरं प्रेम साहित्यावर असे. मराठी साहित्य मोठं झालं पाहिजे.

ते साहित्य निर्माण करणाऱ्या साहित्यकारांना आपल्या साहित्याच्या कक्षा विशाल करण्यासाठी हरएक प्रकारची संधी प्राप्त झाली पाहिजे, हा त्यांचा दृष्टिकोण असे. साहित्य संस्कृती मंडळाची निर्मिती याच सद्‌हेतूनं त्यांनी केली. त्या मंडळाच्या प्रपंचाकडे त्यांनी आवर्जून लक्ष दिलं. मंडळाच्या अडीअडचणी निवारण केल्या. अर्थात अशा प्रसंगी माणसं उभी करावी लागतात ती विश्वासातली, अनुभवातली. तेही त्यांनी केलं. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्यावर त्यांनी जो विश्वास टाकला तो सर्वार्थानं सार्थ ठरला. विश्वकोशाचं अवाढव्य कार्य बघून यशवंतरावजींना खरोखरच समाधान वाटत असे, ते तसं बोलूनही दाखवीत असत.

साहित्यक्षेत्रातील नव्या प्रवाहाकडे त्यांचं कटाक्षानं लक्ष असे. लक्ष्मण माने यांचं ' उपरा ' हे पुस्तक प्रसिद्ध झालं तेव्हा त्यांच्या अनेक व्याख्यानांतून आणि खाजगी संभाषणातून ' उपरा ' चा प्रशंसापूर्वक उल्लेख होई. लक्ष्मण माने यांच्या ' बंद दरवाजा ' चं प्रकाशनही त्यांच्याच हस्ते झालं. अशा प्रसंगी एखादा नवा चमकदार विचार मांडणं, हा तर त्यांचा हातखंडा असे. ' टीकेमुळे लक्ष्मण माने चिडतात, त्यांनी टीकाकारांच्या समीक्षेमुळे चिडून जाऊ नये ' असं अनिल अवचट त्या प्रकाशनप्रसंगी म्हणाले. आपल्या भाषणात यशवंतरावजी म्हणाले, " खरं तर आता टीकाकारांनी आपल्या समीक्षेची चाल बदलायला हवी. नव्या नव्या साहित्याचं जुन्या समीक्षेच्या दृष्टिकोणातून परीक्षण करू नये. " साहित्याचा सतत विचार मनात असल्याशिवाय असं परीक्षण खरोखर करता येणार नाही.

' हिरोशिमा ' च्या प्रकाशनासाठी ६ ऑगस्ट १९८४ रोजी टिळक स्मारक मंदिरात आले तेव्हा देखील केलेल्या भाषणात लेखकापेक्षा त्याच्या कलाकृतीवर बोलले. त्या कादंबरीच्या प्रस्तावनेतही तेच ! ' हिरोशिमा ' ही कलाकृती श्रेष्ठ का ? तर भारताच्या शांततेच्या धोरणाचा ती समर्थपणानं पाठपुरावा करते म्हणून ! खाजगी संभाषणातही ते म्हणत असत, " व्यक्तिशः साहित्यिक बाजूला ठेवून त्याच्या साहित्यकृतीचं मोजमाप झालं पाहिजे. " हा त्यांचा विचार सामान्य कसा मानता येईल ? साहित्यनिर्मितीच्या प्रक्रियेचं सातत्यानं चिंतन असल्याशिवाय अशा तऱ्हेचे समर्पक विचार कधी बाहेर पडणारच नाहीत.

साहित्य आवडलं म्हणजे त्या साहित्यिकाची बूजही ते मनापासून राखीत असत. ' उपरा 'कार लक्ष्मण माने यांच्या भटक्या विमुक्त जमातीसाठी साताऱ्याजवळची प्रशस्त जमीन मिळवून द्यावी यासाठी यशवंतराव प्रयत्नशील होते.

लक्ष्मण माने यांच्या बरोबर जाऊन जमीनही पाहिली. यासाठी ते आपली प्रतिष्ठा पणाला लावणार होते. परंतु काळानं त्यांना ते समाधान मिळू दिलं नाही. शिवाजी सावंत यांच्यावरील लोभापायी त्यांची 'छावा' ही कादंबरी प्रतापगडावर भवानी मातेला त्यांनी स्वहस्ते अर्पण केली.

महाराष्ट्रातील सगळ्या प्रकारच्या साहित्य संस्थांच्या वाढीकडे त्यांचे आपुलकीनं लक्ष असे. महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री झाल्यानंतर पुण्याला हिराबागेत झालेल्य तमाशा परिषदेला ते हजर होते. तो कार्यक्रम झाल्यानंतर त्यांनी विचारलं, "कसा काय वाटला कार्यक्रम ?" आमच्यापैकी ज्यांनी कधी तमाशा बघितला नव्हता ते म्हणाले, "सदाशिव पेठेत होणाऱ्या नाटकांपेक्षा हा तमाशाचा प्रकार फार सभ्य वाटला." यावर मनसोक्त हसले. तिथेही पुन्हा एक नवा विचार सांगितला. म्हणाले, "माणूस सभ्य-असभ्य असू शकतो. साहित्य नव्हे !"

हा विचार आजही चकित करणारा आहे. म्हणजे त्यांनी साहित्याचा किती सर्वांगीण विचार केला होता तो पाहा !

१९६१ साली ४३ वे नाट्यसंमेलन दिल्लीला झालं. दुर्गाबाई खोटे अध्यक्ष होत्या आणि मुख्यमंत्री यशवंतरावजी स्वागताध्यक्ष होते. त्या संमेलनासाठी त्यांनी राष्ट्रपती डॉ. राजेन्द्र प्रसाद यांना उद्घाटक म्हणून आणलं आणि मराठी नाट्य-साहित्याचा झेंडा दिल्लीत दिमाखानं फडकावला.

मुंबई मराठी साहित्य संघ मंदिराचं उद्घाटन ६ एप्रिल १९६४ रोजी झालं. त्या वेळी यशवंतरावजी अमेरिकेला जायला निघाले होते. त्यांच्याच हस्ते उद्घाटन करायचं ठरलं होतं. शेवटी अमेरिकेला जाण्याच्या कार्यक्रमात त्यांनी थोडा फेरबदल केला आणि साहित्याला वाहिलेल्या संघाच्या इमारतीचं उद्घाटन केलं, आणि नंतर ते अमेरिकेला गेले.या इमारतीची पायाभरणी त्यांच्याच हस्ते झाली होती. कराडचं साहित्य संमेलन आणीबाणीच्या काळात झालं. यशवंतराव स्वागताध्यक्ष होते. दुर्गाबाई भागवत या अध्यक्ष होत्या. वि. स. खांडेकर त्या संमेलनाला हजर होते. यशवंतरावांनी संमेलनासाठी आलेल्या सर्व थोर साहित्यिकांचा मान ठेवला. त्या संमेलनात अखेरच्या दिवशी आणीबाणीविरुद्ध ठराव आणण्याचा घाट दुर्गाबाईंनी घातला. खाजगीत बरीच भवती न भवती झाली. पण खांडेकरांनी तो ठराव आणायला कसून विरोध दर्शविला. अर्थात तो ठराव येऊ शकला नाही. हे संमेलनाचं भाग्य. एरवी बाका प्रसंग निर्माण झाला असता. राजकारणी लोकांनी,

विशेषत: मंत्र्यांनी साहित्य संमेलनात मानानं मिरवू नये, व्यासपीठावर खुर्ची अडवून बसू नये, अशा तऱ्हेची भाषा काही साहित्यिकांनी हेतुपूर्वक सुरू केलेली असताना कऱ्हाड संमेलनाच्या वेळी किंवा इचलकरंजीच्या संमेलनाच्या वेळी 'राजकारणाचे जोडे मंडपाबाहेर ठेवून मी शारदेच्या मंडपात प्रवेश केला आहे' असं सांगून यशवंतराव साहित्य संमेलनाला हजर राहिले. केवळ श्रोते म्हणूनच प्रेक्षकांतील पहिल्या खुर्चीवर जाऊन बसले. राजकारणी असलो तरी तुमच्याइतकाच मीही साहित्यप्रेमी आहे, साहित्यिक आहे हे त्यांना दाखवून द्यायचं असावं.

कराड येथील साहित्य संमेलनाच्या वेळी संमेलनाच्या अखेरच्या रात्री त्यांच्या निवासस्थानी काव्यवाचनाची सुरेख बैठक जमली. काव्यश्रवणात ते रमले. पु. ल. देशपांडे, रणजित देसाई, नरहर कुरुंदकर, महानोर, वसंत बापट या मंडळींच्या सहवासात त्यांनी काव्यानंद आणि साहित्यानंद मनमुराद लुटला. पहाटेपर्यंत ही मैफिल रंगली.

राजकवी यशवंतरावांना 'महाराष्ट्र कवी'चा बहुमान त्यांनीच शासनाच्या वतीनं दिला. महाराष्ट्र कवींच्या 'शिवराय महाकाव्या'चा प्रकाशन-समारंभ यशवंतरावांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. कवी यशवंतांना मानधन यशवंतरावांनीच सुरू केले. त्यांच्या साहित्यप्रेमाला अशी कृतीची जोड असे.

ना. सी. फडके यांनाही त्यांनीच मानधन सुरू केलं. 'युगप्रवर्तक फडके' या कार्यक्रमालाही यशवंतराव अध्यक्ष म्हणून आले. त्या वेळच्या आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी ना. सी. फडके यांच्या साहित्यसंभाराची अत्यंत समर्पक शब्दांत भलावणी केली. परंतु शेवटी त्यांच्या खास पद्धतीनुसार एक नवा साहित्य-विचार प्रसृत केला. यशवंतराव म्हणाले, "कोणत्याही साहित्यिकाला युगप्रवर्तक म्हणणं कठीण आहे. कारण कोणत्याही व्यक्तीच्या मानानं 'युग' हे फार मोठं, लांबलचक असतं. साहित्यिक कितीही थोर असला, मोठा असला तरी त्या साहित्यिकाच्या कर्तृत्वानं त्या युगाला बांधून ठेवता येणार नाही."

यशवंतरावांच्या या बोलण्यामुळे आप्पासाहेबांना थोडाफार घुस्सा आलाही असेल. पण केवळ तोंडदेखलं बोलण्यापेक्षा यशवंतरावजींना साहित्याची शक्ती कथन करताना एक नवा विचार मांडायचा होता, तो त्यांनी मांडला एवढंच!

स्वत:च्या बाबतही ते तितकेच काटेकोर होते. त्यांच्या पत्नी वेणूताई यांचं छोटेखानी चरित्र रामभाऊ जोशी यांनी लिहिलं. १९८४ च्या जुलै महिन्यात

त्या चरित्राचा प्रकाशन-समारंभ कऱ्हाडला झाला. त्यांनी त्या प्रकाशन-समारंभाचं अध्यक्ष मला बनवलं. तर्कतीर्थांच्या हस्ते प्रकाशन-समारंभ झाला. यशवंतरावजी प्रेक्षकांत एका बाजूला स्वस्थ बसले होते. कोणत्याही प्रसंगी औचित्य किमपि न सोडण्याचा त्यांचा हा स्वभावधर्म सर्जनशील साहित्यातच जमा करावा लागेल.

यशवंतराव महाराष्ट्राचे मुख्यमंत्री झाले. तदनंतर संरक्षणमंत्री म्हणून पं. नेहरूंनी त्यांना दिल्लीला बोलावून घेतलं. तेव्हा त्यांच्यावर फार मोठी जबाबदारी पडली. महाराष्ट्रातील त्यांच्या संचाराला मर्यादा पडल्या. प्रा. ना. सी. फडके यांनी त्यांच्यावर नंतर एक लेख लिहिला होता. त्या लेखात फडके लिहितात, "भावनेनं ओथंबलेलं, प्रभावी भाषेनं नटलेलं लेखन जी लेखणी करू शकते ती साधीसुधी लेखणी नाही. श्रेष्ठ दर्जाच्या अस्सल साहित्यिकाच्या हातात शोभावी अशीच ती आहे....यशवंतरावांच्या लिखाणाचा आस्वाद मी जेव्हा जेव्हा घेतो तेव्हा तेव्हा माझ्या मनात येतं, यशवंतरावांच्या रूपानं महाराष्ट्राला आणि भारताला एक पहिल्या दर्जाचा नेता मिळाला खरा. परंतु त्यांच्यावर पडलेल्या नेतेपणाच्या ओझ्यामुळे यशवंतरावांच्या ठिकाणी जो श्रेष्ठ साहित्यिक आहे त्याचं पूर्ण कर्तृत्व प्रकट होत नाही, ही खेदाची गोष्ट म्हणावी लागेल. असं जरी असलं तरी भावी काळात त्यांच्यावरच प्रचंड साहित्य निर्माण होईल याबद्दल मला तिळमात्र शंका नाही."

एका श्रेष्ठ साहित्यकाराचं हे भाकीत आज खरं ठरू पाहात आहे.

१९८५ सालचे मराठी साहित्य संमेलन नांदेड येथे भरणार असल्याचं ठरलं. त्या संमेलनाच्या अध्यक्षपदाचा मान यशवंतरावजींना देण्याचं घाटत होतं. महाराष्ट्रातून निरोप गेले होते. यशवंतराव या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष झालेही असते. पण त्यामुळे ते साहित्यक्षेत्रात जानेमाने ठरले असते असं थोडंच आहे? इथे तर त्यांच्या ठायी होती साहित्यक्षेत्रातील स्वयमेव मृगेन्द्रता!

# दिल्लीतील महाराष्ट्र आणि यशवंतराव

**भा. कृ. केळकर**

संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनाने १९५४–६० या सहा वर्षांत दिल्लीत महाराष्ट्र राजकीय दृष्ट्या किती पोरका आहे याचा अनुभव आला. महाराष्ट्राची मागणी किती प्रबळ आहे, दिल्ली दरवाजा ठोठावल्याखेरीज, दिल्लीच्या वेशीवर मराठी डफ आणि तुणतुणे वाजवल्याखेरीज दिल्लीश्वरांना समजणार नाही हे स्पष्ट कळले होते. १९५४ मध्ये दिल्लीत आल्यावर मला महाराष्ट्राचे हे राजकीय पोरकेपण उत्कटतेने समजले आणि असे असूनही केंद्रीय सरकारी नोकरीत राहून मला काही करणे शक्य नव्हते. पण अप्रकटपणे काहीतरी करावे व प्रकटपणे सांस्कृतिक क्षेत्र संघटित करावे असे मी ठरविले. यासाठीही राजकीय संरक्षण कवच आवश्यक होते. या काळात श्री. काकासाहेब गाडगीळ यांनी ते दिले. काकासाहेबांचे ३१ फेरोझशहा रोड हेच त्या वेळी महाराष्ट्र केंद्र होते. सगळी खलबते तिथे चालत. सर्वश्री भाऊसाहेब हिरे, शंकरराव देव, एस्. एम्. जोशी, धनंजयराव गाडगीळ यांच्या भेटी तेथेच होत. त्या वेळी दिल्लीत असलेले माझे पत्रकार मित्र 'हिंदुस्थान समाचारचे' श्री. वसंत देशपांडे व केसरीचे श्री. द्वा. भ. कर्णिक यांना काकांचे घर हेच वार्ताकेंद्र, संपर्ककेंद्र म्हणून उपयुक्त असे. या सहा वर्षांत संयुक्त महाराष्ट्र आंदोलनाची व्याप्ती, प्रखरता आणि राजकीय अपरिहार्यता वाढत गेली. दिल्ली हे बॅरोमीटर ( तापमापक ) असल्यामुळे त्याच्यावर नजर ठेवणे आवश्यक होते. महाराष्ट्रातील हवामान दिल्लीश्वरांना कळण्याची अत्यंत गरज होती. खरे म्हणजे त्या वेळी डॉ. केसकर हे माहिती व नभोवाणी मंत्री व पु. म. लाड, त्यांचे स्वीय सचिव महाराष्ट्रीयच होते. पण राजकारणात त्यांचाही उपयोग नव्हता. वृत्तपत्रावर दडपण आणणे किंवा त्यांना महाराष्ट्राच्या मागणीचे महत्त्व व अर्थ उघडपणे समजावून सांगणे त्यांना आवश्यक होते. पु. म. लाड यांची तडफड मी पाहिली आहे. म्हणून वृत्तपत्रांना खरी माहिती पुरविण्याचे काम वैयक्तिक पातळीवरच करावे लागले. राजकीय हवामान महाराष्ट्रात जसजसे तापत होते, तसतशी महाराष्ट्राविषयीची गैरसमज पसरविण्याची

मोहीम जास्त जोरदार होत होती. जेव्हा महाराष्ट्रीय लोक बायकांवर अत्याचार करीत आहेत अशा बातम्या इंग्रजी वृत्तपत्रांतून प्रसिद्ध होऊ लागल्या तेव्हा द्वा. भ. कर्णिकांमार्फत संसदभवनातच शंकरराव देवांची वार्ताहार परिषद योजावी लागली. एकदा महाराष्ट्रीयांसाठी एस्. एम्. जोशी यांचे व्याख्यान ठेवले. पुढे महाराष्ट्रातून मोर्चा आला. त्या दिवशीच चिंतामणराव देशमुखांनी राजीनामा दिला होता. त्यानंतर आचार्य अत्र्यांचे भाषण ऐकले तेव्हा मोकळे वाटले. सत्याग्रहींना उघड उघड मदत करणे हे सरकारी नोकरांना शक्य नव्हते. पण काकासाहेब गाडगीळ हे दिल्लीतील-महाराष्ट्रीयांचे आधारवड होते. त्यामुळे या सर्व प्रसंगांत त्यांचा आधार असे. या सर्व घटना इतक्या वेगाने घडत होत्या, त्याच काळात दिल्लीत महाराष्ट्राचे माहिती व संपर्क केंद्र असणे आवश्यक आहे हा विचार सुचला व एखादा ट्रस्ट करून हे काम सुरू करावे असे ठरवले. एवढ्यात महाराष्ट्र राज्य स्थापन होणार हे दिसू लागले. तेव्हा मी यशवंतराव चव्हाणांना दिल्लीत ' महाराष्ट्र इन्फर्मेशन सर्व्हिस ' सुरू करणे आवश्यक आहे व नव्या महाराष्ट्र शासनाने ही कल्पना स्वीकारावी अशी सूचना करणारे पत्र १० ऑक्टोबर १९५९ रोजी लिहिले. त्याचे उत्तर आले नि ३ डिसेंबर १९५९ त्यांना समक्ष भेटून सर्व कल्पना सांगितली. त्या भेटीतच असे केंद्र दिल्लीत काढायचे आणि ते काम मीच करावे अशी इच्छा यशवंतरावांनी व्यक्त केली. एक वर्षभर मी अनधिकृतरीतीने सर्व कामे करीत होतो. यशवंतरावांनी मुख्य सचीव श्री. नारायणराव मोने व प्रसिद्धिसंचालक श्री. विनोद राव यांना या कामात मला पूर्ण स्वातंत्र्य देण्यास सांगितले व मला म्हणाले, " तुमची ही कल्पना मी ऐकली तेव्हाच मी तिच्या प्रेमात पडलो. " यशवंतराव मुख्यमंत्री असताना सहा महिनेच प्रत्यक्ष त्यांच्या हाताखाली काम करण्याची संधी मिळाली पण या केंद्रास सांस्कृतिक संपर्काचे व आदानप्रदानचे माध्यम समजावे नी राज्यकर्त्या पक्षाच्या लॉबीचे माध्यम बनवू नये किंबहुना हे केंद्र सर्व महाराष्ट्राचे सांस्कृतिक केंद्र व्हावे ही कल्पना यशवंतरावांच्या राजकीय समंजसपणामुळे व उदारतेमुळेच सरकारीरित्या मान्य झाली व पुढचे काम सुकर झाले. यशवंतराव पुढे एकदा जुन्या आठवणी निघाल्यावर मला एकदा म्हणाले, " जाणूनबुजून एक प्रकारची अलिप्तता मी केंद्राबाबत प्रारंभापासून ठेवली होती. आंतरभारतीच्या धर्तीवर तुम्ही केंद्राचे काम चालविले होते. तसेच ते मला चालावयास हवे होते. ते

सरकारी केंद्र होऊ नये अशीच माझी इच्छा होती. म्हणूनच तुम्ही नेहरूंना या केंद्राची मुख्य कल्पना ( १ मे १९६३ रोजी ) सांगितली होती, तीच मी त्यांना आधीच स्पष्ट करून सांगितली होती. " मी त्या वेळचे राष्ट्रपती डॉ. राधाकृष्णन् यांनाही केंद्राच्या कामाची कल्पना दिली. त्यांनाही ती आवडली. शास्त्रीजी पंतप्रधान झाल्यावर मी त्यांना भेटलो तेव्हा महाराष्ट्र परिचय केंद्रासारखे प्रत्येक राज्याचे केंद्र असलेले भारतभवन दिल्लीत बांधावे असे मी त्यांना सुचविले. दोनतीन दिवसांनी शास्त्रीजींनी बिहारच्या माहिती केंद्राचे उद्‌घाटन केले. त्या वेळी भारतभवनाच्या कल्पनेचा जाहीरपणे पुरस्कार केला. तेव्हा यशवंतरावांना आनंद झाला. दिल्लीतील माहितीकेंद्राची स्थापना महाराष्ट्राने केली तेव्हा ती संकुचित प्रांतीयवादाचे उपज केंद्र ठरेल अशी भीती सरकारी व बाहेरच्या वर्तुळात होती. पण ती नाहीशी होऊन पुढे माहितीमंत्री श्री. गोपाळ रेड्डी यांनी ह. ना.आपटे शताब्दी समारंभात जाहीरपणे भारतभवनाची योजना प्रत्यक्षात आणण्यासाठी श्री. केळकरांना महाराष्ट्र शासनाने मुक्त करावे असे सांगितले. न्या. छगला त्या समारंभाचे अध्यक्ष होते. हे सर्व करताना यशवंतरावांचे साहाय्य व उत्तेजन मला १९६७ मध्ये मी परिचय केंद्राचे काम सोडेपर्यंत मिळत होते.

२२ नोव्हेंबर १९६२ रोजी यशवंतराव दिल्लीत आले तेव्हापासून त्यांचे घर हे दुसरे महाराष्ट्र केंद्र झाले. यशवंतरावांकडे जाणे हा नित्य कार्यक्रम असे. म. म. दत्तो वामन पोतदार यांच्यासारखे विद्वान असोत किंवा महाराष्ट्रातील साहित्यिक, कलावंत असोत, या सर्वांना यशवंतरावांकडे घेऊन जाणे हा एक माझा नित्य कार्यक्रम असे.

दिल्लीत आणि कोठेही शिफारशीवजा काहीही पाहिजे ते होत नाही. अगदी रेल्वे तिकिटापासून लोकसभेच्या निवडणूक तिकिटापर्यंत ! महाराष्ट्रातून दिल्लीला गेलेल्या अनेक प्रकरणांची दाद त्याविना लागत नाही. यशवंतरावांची किंवा त्यांचे स्वीय सहायक श्री. श्रीपाद डोंगरे किंवा श्री. राम खांडेकर यांची मदत आणि मार्गदर्शन घ्यावेच लागे. त्यांनी ती मुक्त हस्ताने दिली. त्यात आनंद मानला. भारत सरकार किंवा कुठलेही सरकार असो ते चालविण्याचे काम माणसे करीत असली तरी ती स्वभावतः निर्गुण, निर्विकार असतात. अशा सरकारशी सामान्य माणसे जेव्हा व्यवहार करतात तेव्हा त्याचा हा थंडपणा डोके गरम करतो. त्यामुळे दिल्लीसारख्या शहरात माणसे वैतागतात. अशा वेळी स्वतःची भाषा बोलणाऱ्या

मराठी भाषिकांची मदतीसाठी आठवण होते. दिल्लीत तर राजकीय दबाव असल्याखेरीज काहीच होत नाही. पूर्वी काकासाहेब गाडगिळांचा आणि नंतर यशवंतरावांचा या राजकीय दबावासाठी उपयोग होई. राजकीय दाब हा रक्त-दाबासारखा आवश्यक आहे याचा अनुभव दिल्लीत राहिल्यावर येतो.

महाराष्ट्राच्या कर्तृत्वाला ' भारत मान्यता ' मिळवून देणे हे एक माझे उद्दिष्ट असे. यासाठी मदत करण्यास यशवंतराव सदैव तयार असत. प्रतिवर्षी प्रजासत्ताक दिनाला राष्ट्रपतींकडून केला जाणारा सन्मान हे राष्ट्रमान्यतेचे गमक असते. त्याच्या सूचना राज्य सरकार करीत असले तरीही केंद्रीय गृहमंत्री म्हणून किंवा महाराष्ट्राचे सामर्थ्यवान प्रतिनिधी म्हणून यशवंतरावांच्या शब्दाला प्रतिष्ठा असे. या बाबतीत अनेक सूचना मी योग्य वेळी करीत असे.

असेच एकदा मला वाटले की स्वातंत्र्यवीर सावरकर यांना ' भारतरत्न ' ही पदवी मिळाली तर त्यांच्यासारख्या जिवंत हौतात्म्य जगणाऱ्या महापुरुषाचे ऋण अंशतः फिटू शकेल. एका रात्री मुद्दाम चव्हाणांकडे जाऊन ही कल्पना त्यांना सांगितली. यशवंतरावांनी स्वतःच त्या वेळचे गृहमंत्री गुलझारीलाल नंदा यांना फोन केला. इतकेच नव्हे तर त्याच रात्री त्यांना समक्ष भेटून इच्छा प्रदर्शित केली. परंतु दुर्दैव असे की जानेवारी ६६ मध्ये पंतप्रधान लालबहादूर शास्त्रींचे निधन झाले आणि हा संकल्प पूर्ण होऊ शकला नाही. यशवंतरावांची आर्तता समजावी म्हणून हे उदाहरण दिले.

दिल्लीतील सांस्कृतिक जीवनात मराठी संगीतकार आणि नाटक यांचा ठसा उमटावा असे प्रयत्न महाराष्ट्र परिचय केंद्राने केले. त्या सर्व कार्यक्रमांना यशवंतराव आवर्जून उपस्थित असत. कलावंतांचे समाधान त्यामुळे द्विगुणित होत असे. कलावंतांप्रमाणेच साहित्यिकांच्या भेटी व त्यांची कामेही यशवंतराव करीत. सर्वश्री ग. दि. माडगूळकर, पु. भा. भावे, पु. ल. देशपांडे, वसंत कानेटकर, वसंत सबनीस यांची अशीच एक मैफल संस्मरणीय अशी झाली.

दिल्लीतील महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनाचे यशवंतराव हे आधारस्तंभ होते. त्यामुळे दिल्लीत महाराष्ट्राचे काम करणाऱ्या बृहन्महाराष्ट्र परिषद, दिल्ली महाराष्ट्रीय शिक्षण संस्था, महाराष्ट्र सांस्कृतिक समिती, दिल्ली दरवाजा व बंडोपंत सरपोतदार आदींच्या उपक्रमांना यशवंतरावांचा आधार असे. मराठी नाटके यशवंतराव आवर्डीने पाहात असत. त्याचप्रमाणे शिवाजी महाराज, लोकमान्य टिळक

यांच्याविषयी होणाऱ्या कार्यक्रमांना उपस्थित राहात. या थोर पुरुषांची जी स्मारके दिल्लीत उभी आहेत त्यामागे यशवंतरावांचे मार्गदर्शन आणि मदत उभी होती. महाराष्ट्र ट्रस्ट नावाचे महाराष्ट्राची सांस्कृतिक परंपरा जतन करून ती अन्य भाषिकांना समजावून सांगण्यासाठी एक प्रतिष्ठान काढले होते. न्या. गजेंद्रगडकर हे त्याचे अध्यक्ष होते. यशवंतराव त्याचे एक विश्वस्त होते. तसेच १९६५ मध्ये ' स्वाती ' नावाचे, दैनिक व नियतकालिके यातून प्रकाशित होणाऱ्या साहित्यातील वेचक लेख, कथा संग्रहित करणारे द्वैमासिक मी सुरू केले होते. प्रा. ल. ग. देव त्याचे संपादक होते. १९६५ मध्ये त्याचा प्रकाशन समारंभ यशवंतरावांच्या हस्तेच झाला. अशा रीतीने महाराष्ट्र संस्कृतीचे दिल्लीतील माहेरघर म्हणजे यशवंतरावांचे घर बनले होते. माहेरवाशीण जशी हक्काने आपल्या घरी वागते तसेच मराठी भाषिक दिल्लीत या घरात वागत असत. यशवंतराव आणि त्यांच्या कार्यालयातील मराठी सेवकवर्ग यांचे मोठेपण इतके ' मोठे ' की त्यांना हे कार्य म्हणजे बोजा वाटत नसे.

आता यशवंतरावांचे दिल्लीत स्मारक व्हावयाचे असेल तर महाराष्ट्राचा सांस्कृतिक प्रवाह राष्ट्रीय प्रवाहात आणून सोडणारेच ते झाले पाहिजे.

# एक अतूट नाते

**राम खांडेकर**

श्री. यशवंतराव चव्हाण व महाराष्ट्र यांचे अतूट नाते होते. दोघांनाही एक-मेकापासून दूर करणे कठीण आहे. १९५६ साली द्वि-भाषिक मुंबई राज्याचे व १९६० साली महाराष्ट्र राज्याचे मुख्य मंत्रिपद स्वीकारल्यानंतर त्यांनी महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी स्वतःला वाहून घेतले. उद्योगाचे क्षेत्र, साहित्याचे क्षेत्र महाराष्ट्रात बाळसे धरू लागले. त्याची जोपासना होऊ लागली आणि दिवसें-दिवस त्यात प्रगती होत गेली. आपल्या अडी-अडचणींकडे राज्याचे लक्ष आहे याची जाणीव प्रत्येकाला होऊ लागली. परंतु हा जगन्नाथाचा रथ पुढे सरकत असतानाच या सारथ्याला देशरक्षणासाठी दिल्लीस जावे लागले. परंतु यशवंतराव शरीराने दिल्लीत असले तरी ते नेहमीच मनाने महाराष्ट्रात राहिले. महाराष्ट्रानेही त्यांना नेहमीच प्रेम दिले आणि पाठिंबा दिला. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर अगदी खऱ्या अर्थाने महाराष्ट्राने आपला प्रतिनिधी दिल्लीत पाठविला होता. यशवंतरावांना याची पूर्ण जाणीव होती. म्हणूनच साधारणतः पंधरा दिवसांतून एकदा तरी ते महाराष्ट्रात आले नाहीत असे कधीच झाले नाही. महाराष्ट्रातील भूमिपूजन, उद्घाटन, संमेलने, शिबिरे यशवंतरावांच्या हजेरीशिवाय पूर्ण होत नव्हती. त्यांची ते नेहमीच वाट पाहावयाचे. यशवंतराव केवळ केन्द्रीय मंत्री, महाराष्ट्राचे प्रतिनिधी होते म्हणून नव्हे तर त्यांच्या प्रत्येक भाषणात काही विचार असायचा. आपण हा विचार देऊ शकलो नाही तर भाषण करण्यात अर्थ नाही असेच ते म्हणावयाचे. म्हणूनच ही शिदोरी मिळावी म्हणून महाराष्ट्रातील जनता त्यांची आतुरतेने वाट पाहावयाची. कराड येथील साहित्य संमेलनात त्यांनी स्पष्ट सांगितले होते की, मी मंत्री म्हणून इथे आलो नाही. मंत्रिपदाची वस्त्रं बाहेर ठेवून मी आलो आहे. ज्या साहित्यिकांची आपण पुस्तके वाचतो ते कसे आहेत हे प्रत्यक्ष बघावे म्हणून आलो आहे. विचारांची देवाणघेवाण करण्यासाठी आलो आहे. यशवंतराव महाराष्ट्रातील प्रेक्षणीय स्थळांना वारंवार भेट देत असत. अजंठा–वेरूळची लेणी त्यांनी अनेकदा मोठ्या आवडीने पाहिली आहेत. त्याचबरोबर महाराष्ट्रातील

देवी-देवतांची दर्शनेही त्यांनी वारंवार घेतली आहेत. शिर्डीचे साईबाबा, तुळजापूर, प्रतापगडावरील देवी, पंढरपूरचा पांडुरंग ही यशवंतरावांची पूजनीय देवस्थाने.

१९६२ साली यशवंतराव दिल्लीत आल्यानंतर यशवंतरावांचे निवासस्थान १ रेस कार्स रोड हे महाराष्ट्रातील लोकांकरिता तीर्थस्थान झाले होते. बहुतेक रोज सकाळी ९ वाजता १५-२० लोकांपासून तो १५०-२०० लोकापर्यंत पर्यटक यशवंतरावांचे दर्शन घेण्यास तिथे असावयाचे. यात लहान मुले असावयाची, वृद्ध मंडळीही असायची. ही मंडळी हात जोडून शांत बसलेली असायची. काही तर निरोप घेताना त्यांच्या पाया पडायची. यशवंतरावांबरोबर फोटो काढला म्हणजे त्यांना आपल्या भेटीचे सार्थक झाल्यासारखे वाटावयाचे.

यशवंतरावांना दिल्लीत राजकीय मंडळींबरोबर इतर क्षेत्रांतील मंडळीही भेटावयाची. यशवंतरावांना महाराष्ट्राचे मुख्य मंत्री दिल्लीत येऊन भेटले नाहीत असे कधीच झाले नाही. स्व. दादासाहेब कन्नमवार तर यशवंतरावांकडेच उतरावयाचे. परंतु इतर राज्यांचे मुख्य मंत्री पण अधूनमधून यशवंतरावांना भेटत होते. ही भेट ५-१० मिनिटे नसायची तर जवळपास अर्धा अर्धा तास असायची. राज्यातील प्रश्नांबाबत यशवंतरावांचा सल्ला त्यांना फार उपयोगी पडायचा. महाराष्ट्रातील संसद-सदस्य तर त्यांना अधूनमधून भेटत असत. राज्यातील, देशातील परिस्थितीबाबतही चर्चा करीत असत. त्याचबरोबर इतर प्रांतांतील संसद-सदस्यही त्यांची गाठ घेत असत.

दिल्लीतील महाराष्ट्रीयनांना व महाराष्ट्रीय संस्थांना यशवंतराव व त्यांचे निवासस्थान आपल्या हक्काचे झाले होते. दिल्ली महाराष्ट्रीय एज्युकेशन सोसायटीचे यशवंतराव अध्यक्ष होते. बृहन्महाराष्ट्र मंडळाचे अध्यक्षपदही त्यांनी भूषविले होते.

दिल्लीत येणाऱ्या साहित्यिकांना व संगीत कलाकारांना यशवंतरावांचे घर माहेरघर वाटत होते. यशवंतराव सायंकाळी ७ नंतर आफिसमधून आल्यानंतर या लोकांशी मनमोकळेपणाने गप्पा मारीत असत. ७–३० ते ९ पर्यन्तचा यशवंतरावांचा वेळ केवळ याच विरंगुळ्यासाठी होता. या वेळी भेटणाऱ्यांना वेळेचे बंधन टाकण्यात येत नसे. ९ वाजता मात्र यशवंतराव उठून जात. ती वेळ सौ. वेणूताईंची जेवावयाची होती. यशवंतरावांच्या निवासस्थानी अनेक संगीत मैफली पण झाल्या आहेत. यशवंतराव साहित्यिक व कलाकार यांना

मोठ्या जिव्हाळ्याने भेटत. त्यांच्यासाठी काही करता आले तर ते करण्यात त्यांना आनंद वाटे. मृत्यूपूर्वी काही दिवस अगोदरच त्यांनी शिक्षणमंत्री, भारत सरकार, श्रीमती शीला कौल यांना पत्र लिहून हिराबाई बडोदेकर यांना न मागता मानदेय देण्याची व्यवस्था करणे योग्य होईल अशा आशयाचे पत्र लिहिले होते. त्याचा पाठपुरावाही केला होता.

त्यांचे हे अतूट नाते ते सत्तेवर नसतानाही राहिले. ते मंत्री नसतानाही त्यांनी अनेक उद्घाटन सोहळ्यांत भाग घेतला. अनेक व्याख्यानमाला गुंफल्या. साहित्यिक मेळाव्यात ते गेले. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर महाराष्ट्राने ज्याचा उदोउदो केला त्यात यशवंतरावांचे स्थान अग्रभागी आहे.

# मला दिसलेले यशवंतराव

## गंगाधर इंदूरकर

श्री. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र व केंद्राच्या क्षितिजावर वर्षानुवर्षे तळपले. त्यांचा प्रकाश कधी झळझळीत तर कधी तो मंदावलेलाही दिसला. पण त्यांचा तारा क्षितिजाच्या बाहेर कधीच गेला नाही. त्यांच्याच एका मित्राच्या शब्दांत म्हणायचे तर कुस्तीत पराभव झाला तरी त्यांनी "तालमी"चा आखाडा कधीच सोडला नाही. त्यांचा माझा परिचय १९६२ साली ते दिल्लीत येण्यापूर्वी थोडा-फार होता. दिल्लीत आल्यानंतर तर पुष्कळच वाढला. पत्रकार या नात्याने व सार्वजनिक क्षेत्रातील एक कार्यकर्ता या दोन्ही नात्याने. त्यांच्याच प्रेरणेने स्थापन झालेल्या 'महाराष्ट्र टाइम्स' या मराठी वृत्तपत्राचा मी जवळ जवळ सुरुवातीपासून दिल्लीतील राजकीय घटनांचा आढावा घेणारा प्रतिनिधी होतो, तर सार्वजनिक जीवनात ज्या दिल्ली महाराष्ट्रीय शिक्षण संस्थेच्या अध्यक्षपदाची माळ श्री. काका-साहेब गाडगिळांनी १९६४ साली त्यांच्या गळ्यात घातली त्याच संस्थेचा मी त्याच वर्षापासून १९७७ पर्यंत सरचिटणीस होतो. त्यांच्या राजकीय क्षेत्रातील कार्यप्रणालीविषयी त्यांनी उचललेल्या पावलांविषयी, पत्रकार या नात्याने माझा मतभेद असला तरी दिल्लीच्या सार्वजनिक जीवनातील कामाबाबत मात्र त्यांचा माझा कधीच मतभेद झाला नाही. सार्वजनिक कार्याबाबत त्यांचा माझ्यावर संपूर्ण विश्वास होता. मी करीत असलेल्या कुठल्याही कार्यात त्यांनी आडकाठी आणली नाही. उलट जमेल तेव्हा त्यांनी हातभारच लावला. मला तर असेही वाटते की राजकीय जीवनात त्यांच्यावर बोट ठेवण्यासारखी जी परिस्थिती निर्माण झाली तिला कारण एकच. माझ्यासारख्या सामान्य कार्यकर्त्याला त्यांनी जो विश्वास दिला तो राजकीय जीवनात त्यांच्या वरिष्ठांकडून त्यांना मिळाला नाही, हे आहे. दिल्लीतील आपल्या वरिष्ठांना त्यांनी नीट ओळखले नाही, आणि ज्या वेळी ओळखले, त्या वेळी त्यांचे पंख इतके छाटले गेले होते की, ते फडफडण्याखेरीज काहीच करूच शकत नव्हते. मुख्य प्रवाहात राहण्याच्या गोंडस नावाखाली त्यांना प्रवाहपतिताची भूमिका स्वीकारावी लागली.

यशवंतरावांच्या एका गुणाची न विसरता येण्यासारखी छाप मजवर पडली आहे. ती म्हणजे त्यांच्या माणुसकीची. ज्याच्या बरोबर थोडाफार बरा त्यांचा संबंध आला त्याच्या सुखदु:खात आपुलकी दाखविणे हा माणुसकीचा भाग तर आहेच. भारतीय संस्कृतीचा तो एक अभिन्न भाग आहे. माझ्या मुलीच्या लग्नाच्या निमित्ताने १९७५ साली आयोजित केलेल्या स्वागत समारंभात श्री. यशवंतरावांची सहकुटुंब हजेरी सर्व प्रथम लागली तर १९७८ साली माझ्या मोठ्या सुनेच्या अकाली मृत्यूनंतर त्यांनी फोनवर का असेना जी सांत्वनपर चौकशी केली, त्याने मी भारावलो. ही गोष्ट माझ्या मनावर ठसून राहण्याचे आणखी एक कारण होते. माझा अनेक राजकीय पुढाऱ्यांशी चांगला परिचय होता. अनेकांशी म्हणण्यासारखी जवळीक होती. पण त्यांपैकी एकालाही माझी चौकशी करण्याची गरज वाटली नाही.

"दिल्ली दिनांक" या माझ्या पुस्तकात श्री. यशवंतराव चव्हाणांच्या राजकीय जीवनावर प्रकाश टाकणारे अनेक प्रसंग मी दिले आहेत. त्यामुळे त्यांची फारशी चर्चा इथे करावयाचे कारण नाही. पण त्या घटनेमुळे जे निष्कर्ष निघतात त्याचा थोडक्यात आढावा घेणे अप्रस्तुत ठरणार नाही. वैयक्तिक दृष्ट्या राजकीय जीवनात श्री. चव्हाण यांनी फार मोठी आघाडी मारली. पार्लमेंटरी सेक्रेटरीपदापासून ते महाराष्ट्राच्या मुख्यमंत्रिपदापर्यंत चढले. केंद्रात संरक्षणमंत्री, गृहमंत्री, अर्थमंत्री, पराराष्ट्रमंत्री या पण जबाबदाऱ्या त्यांनी पुढे पार पाडल्या. जनता पक्षात फूट पडल्यानंतर श्री. चरणसिंगांच्या कारकीर्दीत ते उपपंतप्रधान देखील झाले. त्यांची पंतप्रधान होण्याची इच्छा मात्र पुरी होऊ शकली नाही. ती होती याविषयी माझ्या मनात यत्किंचितही संशय नाही. राजकारणात पडलेल्या माणसाची तशी इच्छा असण्यात काही गैरही नाही. पण हेही तितकेच खरे की त्यांच्या या इच्छेमुळेच राजकारणातील त्यांच्या पायऱ्या वर जाण्याऐवजी खाली येऊ लागला.

व्यक्तीचे मूल्यमापन करण्याऐवजी खाली अगर वर जाण्यास तात्पुरते महत्त्व असले तरी त्यास फारशी किंमत नाही. तो अगर ती व्यक्ती देशाच्या, समाजाच्या अगर प्रांताच्या जीवनावर कोणता ठसा कायम ठेवून जाते यास खरे महत्त्व आहे. या दृष्टीने विचार करता यशवंतराव चव्हाणांना अतिशय थोर व्यक्तिमत्त्व लाभूनही समाधान वाटण्यासारखी परिस्थिती लाभली नाही याची खंत वाटते.

त्यांच्या म्हणण्याप्रमाणेच त्यांच्या जीवनाचे एक सूत्र होते. महाराष्ट्रास राष्ट्रीय प्रवाहात कायम ठेवण्याचे. या दृष्टीनेच सर्व महाराष्ट्र ज्या वेळी संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनाने पेटला होता, त्या वेळी ते संयुक्त महाराष्ट्रापेक्षा पं. जवाहरलाल नेहरूंना अधिक महत्त्व देत होते. त्या वेळी त्यांचा निर्णय कदाचित बरोबर ठरला आणि संयुक्त महाराष्ट्राचा मंगल कलश आणण्याचे श्रेय नंतर त्यांना मिळाले. राजकीय दृष्टया संयुक्त महाराष्ट्र झाला, पण महाराष्ट्र मात्र संयुक्त होऊ शकला नाही. महाराष्ट्राच्या सर्व भागांच्या मनाची जुळणी करावयास त्यांना वेळच मिळाला नाही. १९६० साली संयुक्त महाराष्ट्र झाल्यानंतर दोनच वर्षांनी १९६२ साली ते दिल्लीस आले. महाराष्ट्रातला प्रत्येक भाग विदर्भ, मराठवाडा, कोकण आणि दक्षिण महाराष्ट्र आपल्यावर अन्याय होत असल्याच्या भावनेने आज बेचैन आहेत. ज्या मुंबईसाठी एवढा आटापिटा झाला ती मुंबई राजकीय दृष्टया आज महाराष्ट्रात असली तरी मुंबईत महाराष्ट्र आहे किंवा नाही हे सांगता येत नाही असे उद्‌गार श्री. विठ्ठलराव गाडगीळ यांना काँग्रेस पक्षाचे मंत्री असतानासुद्धा काढावे लागले हे फार बोलके आहे. दिल्लीस आल्यानंतर श्री. यशवंतराव चव्हाणांचे महाराष्ट्राकडे लक्ष राहू शकले नाही असेही म्हणता येणार नाही. कारण केंद्रात असताना ते दर आठ दिवसांनी महाराष्ट्रात जातच होते आणि यामुळे त्यांचेवर प्रादेशिकतेचा आरोपही दिल्लीत अनेकांनी केलेला मी ऐकला आहे.

१९६९ साली ज्या वेळी काँग्रेस फुटली, काही काळ यशवंतराव चव्हाण हे कोणत्याच बाजूस नव्हते, ते कुंपणावर बसून आहेत असा विनोद त्या वेळी झाला. पण मला त्या वेळी यशवंतरावांची भूमिका योग्य अशीच वाटत होती. आपल्या भूमिकेचे जाहीरपणे त्यांनी सांगितलेले कारणही पटण्यासारखे होते. फाळणीनंतर मुंबईस भरलेल्या एका काँग्रेस शिबिरात ते असे म्हणाले होते की ज्या शस्त्रांनी लढा द्यावयाचा असतो, ती मोडून तो जिंकता येत नाही. समाजपरिवर्तनाचा जो लढा, त्यांच्या डोळ्यांसमोर होता तो जिंकण्यासाठी काँग्रेस संघटनेस ते शस्त्र समजत होते. पण पुढे एक सामान्य निमित्त झाले आणि शस्त्र मोडणाऱ्या एका गटात ते सामील झाले. त्या निमित्ताचे समर्थन त्यांनाही कधी समर्थपणे करता आले नाही. आज काँग्रेस नावाने अनेक गट वावरतात. त्यांपैकी एकाच्या हाती सत्ताही आहे. पण आता काँग्रेस समाजपरिवर्तनाचे माध्यम राहिले नसून अतिशय खालच्या पातळीवरचे सत्तेच्या राजकारणाचे साधन

झाले आहे. या संदर्भात श्री. यशवंतरावांच्या बाबत अनेक गोष्टी बोलल्या गेल्या. काही खालच्या पातळीचे आरोपही झाले. मी त्यात शिरत नाही. पण त्यासंबंधी जे स्पष्टीकरण महाराष्ट्रातील अनेक पुढाऱ्यांनी दिले तेच मी गृहीत धरतो. त्या काळी इतर कुठल्याही प्रदेशापेक्षा महाराष्ट्रातील काँग्रेस संघटना बलवान होती. ती मोडण्याचे प्रयत्न त्या वेळच्या केंद्रीय नेतृत्वाकडून होत होते. महाराष्ट्रातील काही माणसेही त्यांच्या हाती लागली होती. निदान महाराष्ट्रातली तरी काँग्रेस टिकावी यासाठी यशवंतराव हे ते ज्यास प्रमुख समजत होते अशा गटात सामील झाले. पण त्यामुळे महाराष्ट्रातील काँग्रेस टिकू शकली नाही. काँग्रेसचे अनेक भाग झाले. आज महाराष्ट्रात काँग्रेसचे सरकार आहे, पण संघटना नाही. संघटना ही तळागाळापासून उभी राहावी लागते. पदाधिकाऱ्यांच्या नेमणुका करणे हुकुमशाहीची पद्धत आहे. ज्या लोकशाही काँग्रेसचा झेंडा श्री. यशवंतरावांनी आपल्या खांद्यावर घेतला असे त्यांनी अनेकदा म्हटले त्या लोकशाही काँग्रेसचा नव्हे. महाराष्ट्रातील काँग्रेस टिकविण्याचे यशवंतरावांचे स्वप्नही पुरे होऊ शकले नाही. मला तरी याचे एकच कारण वाटते. अन्यायाशी नेहमी मुकाबलाच करावा लागतो. त्याच्यापुढे आत्मार्पण करून भागत नाही. मुकाबला करीत राहिल्याने अन्यायाचे परिमार्जन जरी करता आले नाही तरी अन्यायापुढे आपण वाकलो नाही याचे सात्त्विक समाधान तरी मनाला मिळते. यशवंतरावांकडून त्यांच्या अनेक मित्रांची निदान एवढी तरी अपेक्षा होती. आणीबाणी संपल्यानंतर काही काळ यशवंतरावांना ती जाणीव झाली आणि त्यांची काँग्रेस काही काळ निराळी काँग्रेस झाली, पण श्री. देवराज अर्स वगैरे जी मंडळी त्यांच्या बरोबर होती तीच तर पहिली काँग्रेस मोडणाऱ्यांत पुढाकार घेणारी होती. त्यांच्याशी यशवंतरावांचे पटणे शक्यच नव्हते. श्री. देवराज अर्स यांनी काँग्रेस अध्यक्ष या नात्याने पत्रकार परिषदेत एकदा जे विचार मांडले, त्याच्याशी मी सहमत नाही असे यशवंतराव चव्हाण हे स्वतःच मला म्हणाले होते. अर्स काँग्रेसमध्ये त्यांचा कोंडमारा झाला होता. महाराष्ट्र काँग्रेसमध्येही दुफळी झाली होती. अखेर त्यांचा नाइलाज झाला आणि बराच वेळ दारावर तिष्ठत राहून ते "स्वगृही" परतले. १९६९ पर्यंत त्यांच्या यशाची पताका सारखी वर जात होती पण त्यानंतरच्या काळाबाबत मात्र तसे म्हणणे अवघड आहे.

१९७९ मध्ये तर त्यांच्या राजकारणाने खालची पातळीच गाठली. त्यांनी

मोरारजी सरकार विरुद्ध अविश्वासाचा ठराव मांडला याबद्दल माझा यत्किंचित आक्षेप नाही. प्रमुख विरोधी पक्ष या नात्याने त्यांचे ते कर्तव्यच होते. जनसंघाचे आणि त्यांचे कधीच बनले नाही. जनसंघ पूर्वपीठिकेचे श्री. अटलबिहारी वाजपेयी हे परराष्ट्रमंत्री होते. आपल्या भाषणात त्यांनी त्यांच्या धोरणावर जर कडक टीका केली असती तर ते त्यांच्या तोपर्यंतच्या भूमिकेस साजेसे असते. पण त्याबाबत मला काही म्हणायचे नाही असे त्यांनी सांगितले. त्यांनी जनता पक्षाच्या आर्थिक धोरणावर कडक टीका केली आणि त्यातील बरीच योग्य होती. त्या धोरणाचे शिल्पकार अर्थमंत्री या नात्याने श्री. चरणसिंग होते हेही त्यांना माहीत होते. पण त्याच चरणसिंगांशी हातमिळवणी करून ते औट घटकेचे उपपंतप्रधान झाले. जे सरकार एक दिवसही लोकसभेस सामोरे गेले नाही त्या सरकारमध्ये ते काही काळ उपपंतप्रधान होते हे लोकशाही परंपरेचा वारसा सांगणाऱ्या श्री. यशवंतरावांना कसे पटले याचे कोणतेच स्पष्टीकरण देता येत नाही.

माझ्या सार्वजनिक जीवनात मात्र श्री. यशवंतरावांच्या काही गोष्टी न उमगण्यासारख्या जरी झाल्या असल्या तरी त्यांच्याकडून मला नेहमी उत्तेजन आणि विश्वासच मिळाला. त्यामुळेच दिल्लीच्या सार्वजनिक जीवनात माझ्या हातून माझ्या सहकाऱ्यांच्या मदतीमुळे काही काम होऊ शकले. ज्या गोष्टी मला न उमगण्यासारख्या वाटल्या, त्यांच्यामुळेही हाती घेतलेल्या कामाचे काहीच नुकसान झाले नाही. ती चर्चा नंतर होईलच. १९६५ सालच्या मे महिन्यातील घटना. यशवंतराव चव्हाण नुकतेच दिल्ली महाराष्ट्रीय शिक्षण संस्थेचे अध्यक्ष झाले होते व मी चिटणीस. श्री. काकासाहेब गाडगीळ हे मंत्री असताना शाळे-साठी तीन एकर जागा मिळाली होती आणि सुरुवातीच्या उत्साहात देणग्या मिळवून एक इमारतही उभारली गेली होती. १९५२ च्या निवडणुकीनंतर काका-साहेब पुन्हा मंत्री झाले नाहीत व शाळेचे दुर्दैव ओढवले. शाळेची जी बाजू देशबंधू गुप्ता रस्त्यास लागून होती त्या बाजूस काही निर्वासितांना आपल्या दुकानासाठी जागा देण्यात आली. त्यांनी आपल्या मागल्या बाजूस शाळेच्या जागेवर अतिक्रमण केले होते. ते हटविण्यात येत नव्हते. दुसरे म्हणजे संस्थेची आर्थिक परिस्थिती देखील अतिशय ओढाताणीची होती. दिल्ली प्रशासनाकडून ९५ टक्के अनुदान मिळत असूनही मास्तरांचे पगार वेळेवारी भागविता येत नव्हते. शाळेच्या इतर खर्चासाठी तर पैसा नव्हताच. मी शाळेचा चिटणीस

झाल्यानंतर मी माझ्या मनापुढे दोनच उद्दिष्टे ठेवली होती. एक तर लाकूड-वाल्यांचे अतिक्रमण दूर करून रस्त्याच्या बाजूला भिंत उभारावयाची आणि संस्थेचा आर्थिक पाया थोडा फार मजबूत करावयाचा.

ही दोन्ही कामे अतिशय अवघड होती. मी प्रथम लाकूडवाल्यांचे अतिक्रमण हटविण्याच्या मागे लागलो. त्यात मला कोणत्या अडचणी आल्या, पोलिसी आणि कार्पोरेशनच्या भ्रष्टाचाराचे किती नमुने मी बघितले, वरून कळ फिरविल्याशिवाय काही काम कसे होत नाही याचा अनुभव मला कसा आला, वरची एक कळ फिरविण्यात मी कसा यशस्वी झालो याचे वर्णन मनोरंजक असले तरी प्रस्तुत नाही. पण अखेर आम्हास तीन दिवस पोलिस संरक्षण मिळाले आणि आम्हासच आपल्या जागेवरील अतिक्रमण हटविण्यास सांगण्यात आले. आम्ही तीन दिवसांत हे काम केले आणि कार्पोरेशनच्या माणसाकडून आपली हद्द आखून घेतली व काटेरी व तारेचे कुंपणही लावले. हे सर्व झाल्यानंतर अध्यक्ष या नात्याने घडलेली हकीगत श्री.यशवंतरावांना सांगण्यास गेलो. साहजिकच त्यांना खूप आनंद झाला.

काम करणाऱ्या कार्यकर्त्यांवर विश्वास टाकण्याच्या यशवंतरावांच्या स्वभावाचे एक दोन नमुने आणखी लक्षात राहिले आहेत. अतिक्रमण हटविल्यानंतर शिक्षण संस्थेचा आर्थिक पाया मजबूत कसा होईल ही चिंता होती. या वेळी महामहोपाध्याय श्री. काणे यांचे चिरंजीव श्री. जी. पी. काणे मला एकदा म्हणाले, शिक्षण संस्थेचा संघटनात्मक पाया संकुचित आहे.. तो थोडा व्यापक केल्या-शिवाय इतरांचे साहाय्य तुम्हास मिळू शकणार नाही. ही वस्तुस्थिती होती. दिल्ली महाराष्ट्रीय स्नेह संवर्धक समाजाने शिक्षण संस्थेची स्थापना केली. आताच्या परिस्थितीला अनुरूप असे स्वरूप तिला देणे आवश्यक होते. तिचा पाया व्यापक करणे आवश्यक होते. आम्ही सभासद संख्या वाढविली.

दुसरे उदाहरण कार्यकर्त्यांच्या मतावर विश्वास टाकण्याच्या श्री. यशवंतरावांच्या स्वभावावर आणखी अधिक प्रकाश टाकणारे आहे. शिक्षण संस्थेची कायमची आर्थिक तरतूद करण्याच्या दृष्टीने सहकाऱ्यांच्या मदतीने काही पावले उचलावयास आम्ही सुरुवात केली होती. शाळेच्या आवारात एक अद्ययावत सभागृह उभारण्याची योजना होती. त्यासाठी महाराष्ट्र सरकारकडून भरपूर मदत मिळण्याचे आश्वासन मिळाले होते. पण महाराष्ट्र सरकारकडून आमच्या सभागृहासाठी पाच लक्ष रुपये मिळण्याचे आश्वासन श्री. यशवंतराव चव्हाणांच्या माध्यमाने

मिळाल्यानंतरची घटना आहे.

महाराष्ट्रावर दुर्दैव ओढवले आणि कोयना परिसरात भूकंप झाला. अनेक कुटुंबे उद्ध्वस्त झाली. युद्धपातळीवर त्यांना मदत करण्यास महाराष्ट्र सरकार कटिबद्ध झाले. दिल्लीकर महाराष्ट्रीयांचीही एक सभा झाली. त्या सभेत यशवंतराव म्हणाले, “दिल्लीकर महाराष्ट्रीयांनी निव्वळ सहानुभूती व्यक्त करून आपली जबाबदारी झटकून टाकू नये. पीडितांच्या मदतीसाठी जेवढी शक्य असेल तेवढी मदतही गोळा करून पाठविली पाहिजे.” यानंतर ते म्हणाले, “मदत गोळा करण्याचे काम श्री. रघुनाथराव खाडिलकर बघतील आणि त्यासाठी जरूर असलेल्या आपल्यापैकी लोकांची ते मदत घेतील.” असे म्हणून यशवंतराव माझ्या शेजारी असलेल्या खुर्चीवर बसले. त्यांनी हळूच मला विचारले, “काय ठीक झाले?” “मी आणि श्री. रघुनाथराव खाडिलकर बाहेरून या कामासाठी सर्व प्रकारची मदत करू. पण प्रत्यक्ष हे काम श्री. अण्णासाहेब शिंदे यांचेवर सोपवावे असे मला वाटते.” असे मी सांगितले. श्री. अण्णासाहेबांच्या नेतृत्वाने आम्ही एक लाखाच्या-वर निधी जमविला.

या संदर्भात शेवटची आठवण महाराष्ट्र रंगायन कसे उभारले गेले याची आहे. शिक्षण संस्थेचा आर्थिक पाया मजबूत करण्यासाठी आम्ही शाळेच्या आमच्या संस्थेच्या वतीने चालणाऱ्या नूतन मराठी शाळेच्या वार्षिकोत्सवासाठी श्री. वसंतराव नाईकांना मुख्य पाहुणे म्हणून बोलावले. श्री. यशवंतराव त्या दिवशी दिल्लीत असतील व कार्यक्रमास हजर राहतील हेही बघितले. महाराष्ट्र सरकारकडून एक लक्ष रुपये मिळाले. आम्ही यशवंतरावांच्या हस्ते पायाभरणीचा कार्यक्रम करून प्रत्यक्ष कामास सुरुवातही केली. अपेक्षा होती की दुसरा लक्ष लौकरच येईल. पण तो येण्याची काही चिन्हे दिसेनात.

आमच्या पुढे मोठाच प्रश्न उभा राहिला. सांगाडा उभा झाला होता. आणखी पैसा आल्याशिवाय सभागृहाचे काम पुरे होणे शक्य नव्हते. काम अर्धवट टाकता येण्यासारखे नव्हते म्हणून आम्ही महाराष्ट्र बँकेकडून तीन लक्ष रुपयांचे कर्ज काढण्याचे ठरविले. कर्ज मिळालेही. यथावकाश काम पुरे झाले. सभागृहाचे नाव महाराष्ट्र रंगायन ठेवण्याचे ठरविले. १४ जानेवारी १९७१ ही उद्घाटनाची तारीख ठरविली. मुख्यमंत्री श्री. वसंतराव नाईकांना उद्घाटनासाठी बोलावले. उद्घाटनाच्या वेळी रंगायन गच्च भरले होते. या वेळी यशवंतरावांनी म्हटल्यामुळे

असो अगर श्री. नाईकांनाच तसे वाटल्यामुळे असो, त्यांनी आणखी दोन लक्ष रुपये देण्याचे जाहीर केले. एक लक्ष इमारतीसाठी व एक लक्ष रंगायन वातानुकूलित करण्यासाठी. हे दोन लक्षही लौकर आले. या रंगायनामुळे आमच्या संस्थेचा आर्थिक प्रश्नही सुटला. यशवंतरावांच्या प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष मदतीनेच हे शक्य झाले.

# ‘ कृष्णाकाठ ’–यमुनातीरी लिहिलेले एक अभिजात आत्मचरित्र

प्रा. स. शि. भावे

कै. श्री. यशवंतराव चव्हाण यांना प्रा. स. शि. भावे यांनी त्यांच्या ‘कृष्णाकाठ’ या ग्रंथाविषयी आपला सविस्तर अभिप्राय लिहून पाठविला होता. त्यांना तो आवडला होता. त्यांना उत्तरादाखल पत्रही पाठविण्याचे ठरविले होते. तसे त्यांनी श्री. राम खांडेकर यांना सांगितले. परंतु श्री. भावे यांचा पत्ता मिळू न शकल्यामुळे ते तसेच राहून गेले. श्री. खांडेकर यांनी हा समीक्षा-लेख जपून ठेवला होता. तो या ग्रंथात समाविष्ट करण्याची श्री. भावे यांनी संमती दिली त्याबद्दल त्यांना धन्यवाद.

आठव्या वित्त आयोगाचे अध्यक्ष खासदार यशवंतरावजी चव्हाण यांचेसंबंधी मराठी मनात उदंड प्रेम आहे. त्याचप्रमाणे एक कुतूहलही त्याच मराठी मनात सतत वागत आले आहे. लोकमान्य टिळकांनंतर मराठी मनावर स्वतःची एक मुद्रा ठसविणारा नेता हे त्यांचे मोठेपण आता इतिहासानेच मान्य केले आहे. इतिहासात सर्वांत विशाल मराठी मुलूख जेव्हा एका राज्यात एकत्र आला त्या वेळचे पहिले मुख्यमंत्री, येथपासून केंद्रात संरक्षणमंत्री, गृहमंत्री, वित्तमंत्री, परराष्ट्रमंत्री, पहिला अधिकृत विरोधी पक्षनेता....आणि शेवटी उपपंतप्रधान अशी यशाची शिखरे हस्तगत करणाऱ्या या नेत्याचा गुणगौरव केवळ महाराष्ट्रात, देशातच नव्हे पण परदेशी अभ्यासक-चिंतकांच्या विश्लेषणातही झाला आहे. अगदी आजही, पंतप्रधान म्हणून कोण जबाबदारी पेलू शकेल अशी चर्चा निघते त्या वेळी जी नावे सहज सर्वांच्या मनात येतात, त्यात यशवंतरावांचे नाव अगदी सहज आणि एकमताने घेतले जाते. गेल्या पन्नास वर्षांच्या सार्वजनिक जीवनात यशवंतरावांनी किती श्रेष्ठ दर्जाची मान्यता आणि विश्वसनीयता प्राप्त करून घेतली आहे ते अशा प्रकारच्या उत्स्फूर्त मताने उत्तम व्यक्त होते.

सुरुवातीस म्हटल्याप्रमाणे या मान्यतेला आणि विश्वसनीयतेला कुतूहलाचे एक अस्तर आहे. १९५६ साली यशवंतरावांनी छोटे द्वैभाषिक का स्वीकारले ?

पंतप्रधान शास्त्रींच्या आकस्मिक निधनानंतर त्यांनी त्याच वेळी सहजसाध्य पंतप्रधानपद का स्वीकारले नाही ? नंतर तीन वर्षांनी त्यांनी अल्पावधीतच दोन परस्परविरोधी निर्णय घेतले, त्या निर्णयांबरोबर महाराष्ट्र राज्याचे विधिमंडळ आणि काँग्रेसपक्ष हे दोन्ही उलटसुलट फिरले, हे का झाले ? १९७५ ते १९८० या काळात त्यांच्या भूमिका वेळोवेळी बदलल्या त्या तशा का बदलल्या ? अगदी अलीकडे ' मुख्य प्रवाहा'त परत येण्याचा निर्णय त्यांनी का घेतला ? स्वातंत्र्य मिळाल्यानंतरच्या भारताच्या इतिहासात यशवंतरावांनी नेमकी कोणती कामगिरी ( role ) बजावली आहे ?...असे कुतूहल माझ्यासारख्या त्यांच्या अनेक चाहत्यांच्या मनामधे सतत वसत आलेले आहे.

यशवंतरावांचे माणूस म्हणून जे व्यक्तिमत्त्व आहे, त्या व्यक्तिमत्त्वाने हे कुतूहल थोडे अधिक वाढलेच आहे. ते पुढारी आहेत, पण सर्वांत कमी बोलणारे पुढारी आहेत.- आधी ते कमी वेळा बोलतील. पुन्हा जे बोलतील ते कमी बोलतील. दुसऱ्या व्यक्तीविषयी बोलणार नाहीत. बोलले तरी कुचेष्टेने, निंदाव्यंजक किंवा मूल्यमापनात्मक बोलणार नाहीत. सामान्यपणे आवाज चढवून किंवा मुठी वळून, बोलणार नाहीत. आक्रस्ताळेपणा तर नाहीच नाही. जे वार्ताहर परिषदेत, तेच कार्यकर्त्यांच्या सभेत, तेच जाहीर सभेत. प्रांजळपणा, मृदू, गोड भाषा, स्वतः सौजन्य ठेवून दुसऱ्यांच्या सौजन्याला आवाहन करण्याची पद्धती. यामुळे ' साहेबां 'चे मत कळते, सौजन्य मनावर ठसते, पण मन कळत नाही.

जे जाहीर तेच खाजगीत. दुसऱ्याशी खाजगीत बोलतानादेखील यशवंतराव दुसऱ्याच्या अडचणी विचारतील, त्याच्या पाठीवर हात फिरवतील, मायेने दुसऱ्याच्या मनाला ऊब देतील. पण दुसऱ्याकडून स्वतः अशी ऊब क्वचितच घेतील. जवळजवळ नाहीच म्हटले तरी चालेल.

यामुळे हे कुतूहल जसे नेता म्हणून, तसे व्यक्ती म्हणूनदेखील आहे. मी स्वतः त्यांचा चाहता आहे तो माझ्या शाळकरी वयापासून. माझे वडील व साताराचे साहित्यिक आणि स्वातंत्र्यसैनिक कै. शिवराम गोविंद ऊर्फ राजाभाऊ भावे हे यशवंतरावांचे वडिलधारे राजकीय सहकारी. त्यांच्यापेक्षा वयाने १३-१४ वर्षांनी वडील. आमच्या घरी यशवंतराव येत-जात असत. उभयतांना परस्परांविषयी आदर होता. माझे वडील १९६७ साली अपघातात वारले. त्यावेळी यशवंतरावांचे मला दीर्घ पत्र आले. त्या पत्रात दादांबद्दलची भावना यशवंतरावांनी उत्कटतेने व्यक्त

केली आहे. या घरोब्यामुळे लहानपणापासून मी यशवंतरावांच्या कार्याकडे व व्यक्तित्वाकडे आपुलकीने व आदराने पाहात आलो आहे. वर उल्लेखिलेले कुतूहलाचे रंग माझ्याही मनात होते—आहेत.

म्हणून, यशवंतराव आत्मचरित्राचा पहिला खंड म्हणून ' कृष्णाकाठ ' प्रसिद्ध झाला आहे असे कळल्यावर मनाची उत्कंठा चांगलीच वाढली. नंतर पुस्तक हातात आले. पाहिल्यावर साक्ष पटली की 'प्रिंटेक्स्ट' व 'प्रेस्टीज पब्लिकेशन्स'चे सर्जेराव घोरपडे व त्यांचे सहकारी यांनी पुस्तक भारदस्त व सुबक करण्यासाठी आपले प्रयत्न वेचले आहेत. सहासष्ट रुपये किंमतीचे, डेमी ३२० पृष्ठांचे हे पुस्तक चांगले छापले व बांधले आहे. पुस्तकाचे मुखपृष्ठ व मांडणी अभिजात व निर्णयसागरच्या जुन्या पुस्तकांची आठवण करून देणारी आहे. पुस्तक ' आईच्या पाठोपाठ माझ्या जीवनाला आकार आणि आशय देणारी माझी प्रिय पत्नी सौ. वेणूताई हिच्या स्मृतीस ' अर्पण केले आहे. पुस्तकाचे सर्वाधिकार ' सौ. वेणूताई चव्हाण स्मारक पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट 'ला दिले आहेत. ही दोन्ही संस्मरणे हृद्य आहेत. या आत्मचरित्राला पुरस्कार किंवा प्रस्तावना नाही. यशवंतरावांच्या वृत्तिविशेषावर या छोट्या तपशिलानेही चांगला प्रकाश पडतो.

' कृष्णाकाठ ' मध्ये १९४६ पर्यंतचे चरित्रकथन आलेले आहे. त्यामुळे नंतरच्या काळाबाबतची कुतूहले या प्रथम खंडाने प्रत्यक्ष पुरी होत नाहीत. पण नंतरचे निर्णय कसे झाले असावेत याचा काही अंदाज या खंडात हाताशी येऊ शकतो.

या खंडात साधारण समसमान अशी तीन प्रकरणे आहेत. ' जडणघडण ' ( १९१३--३० ), ' वैचारिक आंदोलन ' ( १९३०–३७ ) आणि ' निवड ' ( १९३७–४६ ) ही नावे त्या त्या कालखंडातील प्रसंगक्रमाला अन्वर्थक आहेतच. शिवाय, लेखकाची वृत्ती प्रकट करणारी आहेत.

या साऱ्या कथनात यशवंतरावांची वृत्ती भावनात्मकतेपेक्षा वैचारिक आहे, उत्कटतेपेक्षा अलिप्ततेची आहे, आणि, गुंतलेपणापेक्षा तटस्थतेची आहे. आणि हे या आत्मचरित्राचे सामर्थ्य आहे. यात उत्कटतेचे, गहिवरून येण्याचे, प्रसंग नाहीत असे नाही. १९४६ साली, पहिली उल्हासित निवडणूक जिंकल्यावर सौ. वेणूताईंनी यशवंतरावांना ओवाळले. तेव्हा ते लिहितात—

" तेव्हा माझे डोळे पाणावले. मी तिला ऐकू जाईल, असे सांगितले,

' वेणूबाई, या यशात तुझाही वाटा आहे. '

" ती किंचितशी हसली आणि म्हणाली,

' अशी वाटणी करावयाची नसते. ' "

या एका प्रसंगात यशवंतराव या लेखकाची लेखनामागील वृत्ती प्रकट होते. त्यांचे डोळे पाणावतात. तथापि, त्यांची लेखणी पाणावत नाही, तीमुळे पुस्तकाची पाने पाणावत नाहीत. कारण या आत्मचरित्रात महत्त्व ' चरित्रा ' ला आहे, ' आत्म ' ला नाही. यशवंतरावांची ही ' आत्म ' विलोपी वृत्ती जशी आयुष्यात तशी या आत्मचरित्रातही उतरली आहे, हे ' कृष्णाकाठ ' चे मोठे यश आहे.

१९४६ च्या निवडणुकीतील हा वैयक्तिक अनुभव देण्याइतकेच त्या निवडणुकीचे वैयक्तिक व सामाजिक विश्लेषण करणे त्यांना महत्त्वाचे वाटते. ते लिहितात " गेल्या चाळीस वर्षांत दहा निवडणुका मी लढविल्या. प्रत्येक निवडणुकीतील अनुभव वेगळा, राजकीय कसोट्या वेगळ्या, त्या वेळचे विरोधी राजकीय पक्षही वेगळे, अशा होत्या. परंतु इतकी सरळ, बिनखर्चाची, तत्त्वनिष्ठ व जनतेच्या स्वयंस्फूर्त पाठिंब्यावर आधारलेली अशी कोणती निवडणूक असेल, तर ती १९४६ ची निवडणूक होय, हे मला कबूल केले पाहिजे. " गेल्या चाळीस वर्षांत राजकारण कोणत्या दिशेने पालटले आहे यासंबंधीचे यशवंतरावांचे हे भाष्य जितके सौम्य तितकेच विदारक आहे.

आयुष्यक्रमावर, अनुभवावर, सामाजिक प्रवाहांवर यशवंतरावांनी केलेली भाष्ये हे या पुस्तकाचे महत्त्वाचे सौंदर्य आहे. वैयक्तिक भावनांचा आविष्कार यशवंतरावांनी या चरित्रात अपरिहार्य तेव्हाच केला आहे. त्यांच्या मातोश्री, ज्येष्ठ बंधू, थोरले बंधू गणपतराव, पत्नी सौ. वेणूताई, काही जवळचे मित्र यांच्यासंबंधी भावनेचे कढ या लेखनात आहेत. नवीन लग्न करून आलेल्या पत्नीला आपण काहीच देऊ शकलो नाही अशी खंत आहे. याच दुःखातून त्यांनी वेणूताईंना लांब पत्र लिहिले, त्याची नोंद आहे. पण हे सारे सांगताना यशवंतराव संयम सोडत नाहीत. वाहवत जात नाहीत. अथवा, एका वेगळ्या प्रकाराने, ' राजकीय संकटकाळात पुढाऱ्याने पत्नीला लिहिलेले आगळे पत्र ' अशी स्वतःच्या वेगळेपणाची जाहिरातही करीत नाहीत. मराठी साहित्यात असा अलिप्त समतोल दुर्मिळ आहे. या पुस्तकाचा हा गुण, म्हणूनच, विशेष आल्हाददायक वाटतो.

'जडणघडण' या पहिल्या प्रकरणात यशवंतरावांच्या खाजगी जीवनाचे तपशील आहेत. पुढील दोन प्रकरणांतही तसे आहेत. पण एकुणातच, या आत्मचरित्राला खाजगी तपशिलाचे ओझे झालेले नाही. यापाठीमागे यशवंतरावांची एक शहाणी दृष्टी आहे. हजारो सामान्य लोकांपैकी आणि लोकांसारखेच आपण आहोत. आपल्यात असामान्यत्व असलेच तरी त्याची व्याप्ती फार म्हणजे फारच कमी असते आणि शिवाय त्यात हजारो इतरांचे असामान्यत्वच एका ठिकाणी प्रकट होत असते. सर्वसाधारणपणे व्यक्तिमत्त्वाचा प्रधान आणि मोठा भाग सामान्यांसारखा, सामान्यत्वानेच भरलेला असतो. असे हे त्यांचे शहाणपण थोडक्यात सांगता येईल.

आपल्या लहानपणींच्या गरिबीविषयी त्यांनी लिहिले आहे: 'माझे लहानपण हे इतर लक्षावधी गरीब घरातील मुलांच्याप्रमाणे गेले आहे, म्हणून माझ्या जीवनामध्ये इतरांपेक्षा फार काही विशेष होते असे नाही. सर्वसामान्यतः अडी-अडचणी आणि गरिबी यालाच तेव्हा जीवन असे नाव होते.'

यशवंतरावांच्या या दुर्मिळ संयमगुणामुळे हे आत्मचरित्र 'रोमँटिक' होण्या-पासून बचावले आहे. यशवंतरावांची एक विशिष्ट वेचक दृष्टी आहे. लहानपण, शिक्षण, मैत्री, कुटुंब. अगदी सामाजिक कार्य, वकिली, राजकीय चळवळी—अशा साऱ्या अनुभवात एक महत्तम साधारण विभाजक असतो. हा 'मसावि' प्रत्येक अनुभवातून त्यांनी 'कॉमन' म्हणून काढून टाकला आहे. त्याचा केवळ जुजबी उल्लेख केला आहे. पण त्यातून जो विचाराचा, भाष्याचा, तत्त्वाचा 'लसावि' मिळाला तो आवर्जून आणि तपशिलवार सांगितला आहे. अभिजात वृत्तीचेच हे एक वैशिष्ट्य असते. यशवंतरावांच्या अनुभव घेण्यात ही अभिजात वृत्ती आहे. लेखनात तर आहेच. म्हणून हे आत्मचरित्रही अभिजात वृत्तीचे झाले आहे.

अशी काही भाष्ये महत्त्वाची आहेत.

स्वतःच्या लहानपणीच्या जगाचे—ग्रामीण जगाचे—त्यांचे निरीक्षण पाहावे : 'शासनाला भीतीने नमून वागण्याचीही प्रवृत्ती त्या वेळच्या जीवनाचे एक गृहीतकृत्य होते. शिक्षण कमी, बाहेरच्या जगाशी संपर्क कमी, आहे त्यात समाधान मानण्याची वृत्ती, कुणाच्या अध्यात मध्यात न पडावे, असे तटस्थ राहावे हे धोरण हीच तेथल्या जीवनाची रीत होती. त्यामुळे त्यात गतीही नव्हती आणि

'प्रगतीही नव्हती.' पुढे ते असे म्हणतात—'शेतीशी संबंध असलेला माणूस नजीकच्या राजकीय सत्तेला फार वरिष्ठ मानतो.

यशवंतरावांची ही निरीक्षणे सामाजिक इतिहासकाराच्या दृष्टीने महत्त्वाची आहेत. त्यात व्यक्त होणारी चिकित्सक, विवेकी दृष्टी त्यांच्याजवळ मूळचीच दिसते. मराठी सातवीत शिकत असताना, म्हणजे वयाच्या तेराव्या वर्षी त्यांनी दिनकरराव जवळकरांचे भाषण ऐकले. ते ऐकल्यावर त्यांची त्या वयात जी प्रतिक्रिया झाली ती त्यांच्याच शब्दात वाचण्यासारखी आहे. ते लिहितात—'श्री. जवळकरांनी टिळकांच्यावर केलेली टीका ही बरोबर नव्हती असे माझ्या मनाने घेतले. कारण तोपर्यंत मी थोडेफार वाचू लागलो होतो. लोकमान्य टिळक हे इंग्रजांविरुद्ध लढणारे एक सेनापती आहेत, अशी माझी भावना होती.... त्यानंतर तेव्हा मी या संकुचित आणि दूषित क्षेत्रातून प्रयत्न करून बाहेर पडलो.' पुण्याचे 'विजयी मराठा' आणि बेळगावचे 'राष्ट्रगीत' या केवळ मराठा चळवळीच्या वृत्तपत्रांच्या जोडीने आपण पुण्याचे 'मजूर' व मुंबईचे 'श्रद्धानंद' वाचू लागलो, अशी नोंद त्यांनी केली आहे.

विवेकाने बघायचे, वाचायचे, विचारपूर्वक 'निवड' करायची, त्या निवडीची दिशा धरायची ही एक पद्धतच यशवंतरावांनी तेव्हापासून अंगी बाणविलेली दिसते.

'ब्राह्मणेतर चळवळीच्या संकुचित दृष्टिकोणातून बाहेर पडून काही केले पाहिजे' हा त्यांच्या सामाजिक–राजकीय जाणिवेचा पहिला प्रगतीचा टप्पा त्यांनी शाळकरी जीवनातच गाठला. साऱ्या देशासाठी आपण काम करावे हा त्यांचा निश्चय झाला तो जतीन्द्र दासांनी आमरण उपोषण करून शेवटी हुतात्मापद घेतले त्या क्षणापासून. 'मला आयुष्याचे सार समजले व सूर सापडला,' असे त्यांनी म्हटले आहे.

देशासाठी काम करायचे. त्यासाठी वैचारिक भूमिका कोणती घ्यायची, हा प्रश्न त्यांच्या पहिल्या, पंधरा महिन्यांच्या, तुरुंगवासाने सोडवला. आचार्य भागवत ज्याचे कुलगुरू होते अशा त्या मुक्त विद्यापीठातून स्नातक होऊन बाहेर पडताना त्यांची धारणा अशी झाली होती की, 'गौतम बुद्ध आणि येशू ख्रिस्त यांच्यानंतर एवढ्या मोठ्या मानवसमाजाच्या जीवनपद्धतीवर परिणाम करणारा

कोणी एक तत्त्ववेत्ता झाला असेल, तर तो मार्क्सच, हे कबूल करावे लागेल.'

मार्क्सचे महत्त्व समजले तरी देशाच्या स्वातंत्र्याच्या लढ्यात कोणाच्या छावणीत जावे याचा मनाचा निर्णय होत नव्हता. ते लिहितात–' माझे हे वैचारिक प्रकरण इतके साधे नव्हते. गांधींच्या व्यक्तिमत्त्वावर निष्ठा, पंडित जवाहरलाल नेहरूंच्या विचारासंबंधी एक नवी जवळीक आणि माझ्या जिल्ह्यातल्या काही मित्रांच्या साहचर्यापुढे, नाही म्हटले तरी, काहीशा आपुलकीने मानवेन्द्र-नाथ रॉय यांच्या विचाराकडे पाहण्याचा दृष्टिकोण, अशा एका वैचारिक त्रिकोणात मी उभा होतो.' विचारांच्या संघर्षात उपाय कोणता करायचा हेही त्यांना समजले होते. ते पुढे लिहितात—' विचारांचा गोंधळ कितीही असला, तरी प्रत्यक्ष कार्यामध्ये त्यांची कसोटी लावल्याशिवाय, बरोबर काय आणि चूक काय, हे समजत नाही.' तात्त्विकाला व्यावहारिकाची कसोटी हवी ही दृष्टी छत्रपती शिवाजी महाराजांची व लोकमान्य टिळकांची आणि खास मराठी परंपरेची दृष्टी आहे हे मुद्दाम सांगण्याची गरज नाही. पुढे बेचाळिस सालच्या लढ्यात, एका गुप्त बैठकीत, पिके जाळावी, अशी सूचना आली असता यशवंतरावांनी त्या सूचनेला तीव्र विरोध केला होता. ते म्हणाले होते–' ही अत्यंत अव्यवहार्य अशी योजना आहे. पिके जाळण्याचा कार्यक्रम हाती घेणे म्हणजे लोकांशी लढाई सुरू करणे असा त्याचा अर्थ होईल आणि लोक आपल्याबरोबर न येता उलट सरकारला मदत करतील. वर्तमानपत्रात वाचलेल्या पुस्तकी कार्यक्रमांचा अवलंब करून ही चळवळ चालविता येणार नाही.'

यशवंतरावांचा कार्यकर्ता पिंड कसा घडत होता याचे मर्मच या भाषणात आहे. असा हा पिंड केवळ घडलेला नाही. तो विचारपूर्वक, प्रयत्नांनी, कार्याची व्यावहारिक कसोटी वापरीत वापरीत घडवलेला आहे. 'जडणघडण' आणि 'निवड' ही प्रकरणांची नावे या दृष्टीने अर्थपूर्णच नव्हे, तर पूर्ण-अर्थ आहेत.

यशवंतरावांचा हा पिंड समजून घेतला तर त्यांच्या गेल्या चाळीस वर्षांच्या निर्णयामागे कोणते मन होते, आणि ते कसे काम करीत होते, याची बरीच अचूक कल्पना येऊ शकते. कोणताही विचार पक्का करण्यासाठी यशवंतरावांनी स्वत:पुढे काही ठाम आधार ठेवलेले दिसतात. त्यांच्या या आधारांपैकी ( reference ) पहिला म्हणजे सर्व भारताचा एकत्रित विचार. दुसरा म्हणजे भारतातल्या ऐंशी टक्के ग्रामीण जनतेचा–शेतकऱ्यांचा–विचार. तिसरा आधार

समावेशकतेच्या तत्त्वाचा. चौथा सुसंस्कृत सौजन्याचा आणि पाचवा म्हणजे आवश्यक तेव्हा, खळखळ न करता कार्यासाठी स्वतःकडे कमीपणा घेण्याचा.

वर ज्या कुतूहलांचा उल्लेख केला आहे, त्यांपैकी बऱ्याच कुतूहलांची तृप्ती यशवंतरावांच्या या आधारशिलांचा विचार केल्यास आपोआप होईल. यांतही काही निर्णय अपवादभूत वाटू शकतील. सर्वेच निर्णयांचे वेळी सर्वच आधार कार्यकारी होते, असेही म्हणता येणार नाही. मनुष्याचे निर्णय प्रत्येक वेळी तर्कसंगत असतात असे नाही. तर्क, भावना, योगायोग अशा सर्व घटकांचा विचार सम्यक दृष्टीने केला तरीही घटनेचे वा निर्णयाचे पूर्ण मर्म हाती येतेच असेही नाही. तथापि, गेल्या चाळीस वर्षांच्या सार्वजनिक जीवनात यशवंतरावांनी जे जे महत्त्वाचे निर्णय घेतले त्यांचे पाठीमागे या आधारांना मानणारे मन होते एवढे स्पष्ट करण्याचे श्रेय ' कृष्णाकाठ 'ने जोडले आहे.

वर ज्या पाच आधारांचा उल्लेख केला त्यांच्याशी सुसंगत अशीच या पुस्तकाची शैली आहे. अनौपचारिक, प्रांजळ, अतिशयोक्ती टाळून मर्यादेच्या थोडेफार आतच राहून विधाने करणारी, उत्कट भावनेच्या अश्रूंना डोळ्यांच्या कडांबाहेर सांडू न देणारी, आणि विचारांना विवेकाच्या लगामात ठेवणारी, स्वतः-विषयी खूप कमी सांगून जास्त सुचवणारी, आत्मस्तुती कटाक्षाने टाळणारी अशी ही या पुस्तकाची शैली म्हणजे ' कृष्णाकाठ 'चे एक अनमोल लेणे आहे. मूक राहून सारे काही व्यक्त करणाऱ्या, सौ. वेणूताईंच्या, शांत विशाल डोळ्यांशीच यशवंतरावांच्या शैलीची तुलना करता येईल.

' कृष्णाकाठ 'साठी यशवंतरावांचे दिलखुलास अभिनंदन करताना शेवटी एक विचार मांडवासा वाटतो.

यशवंतराव हे महाराष्ट्राचे आणि भारताचे एक आधुनिक ' नायक ' आहेत, हीरो आहेत, याबद्दल कुणाचे दुमत होणार नाही. हीरोची घडण कशी होते हा सनातन कुतूहलाचा विषय आहे. ' हीरो ॲण्ड हीरो-वरशिप ' हे कार्लाइलचे पुस्तक प्रसिद्धच आहे. यशवंतराव चव्हाण या हीरोची जडणघडण कशी झाली याचे मनाला विचारांचे खाद्य देणारे दर्शन या पुस्तकात घडते, हे ' कृष्णाकाठ 'चे आणखी एक विलोभनीय वैशिष्ट्य आहे. या आपल्या हीरोची, या पुस्तकात प्रकट झालेली एकदोन वैशिष्ट्ये पाहावी.

आपण कोण आहोत, याची जाणीव जसजशी हीरोला होते तसतसा, त्या

विरुद्ध गोष्टी तो कटाक्षाने टाळतो. यशवंतरावांनी लहानपणापासून हे केलेले दिसते. व्यायाम, पोहणे, कुस्त्या, तमाशाचे फड, भजनीमंडळे अशा अनेक ओढी त्यांना होत्या. पण स्वतःचा सूर जसजसा सापडत गेला तसतसे त्यांनी हे सारे उद्योग व त्यांचे मोह मनातून दूर केलेले दिसतात. जे या मोहांचे तेच कार्यक्षेत्रांचे. शहर-जिल्हा-राज्य-देश अशी कार्यक्षेत्रांची मर्यादा जसजशी व्यापक होत गेली, तसतसा मर्यादित क्षेत्रांचा विचार त्यांनी मनामागे टाकलेला दिसतो. एकच उदाहरण पाहावे. निष्ठा, कष्ट यांच्या मदतीने त्यांनी कराडची शिवाजी शिक्षण संस्था मोठी केली. पण नंतर ते तीत गुंतले नाहीत. या खंडात या आपल्या संस्थेकरता त्यांनी फक्त एक परिच्छेद दिला आहे.

नायकाचे आणखी एक लक्षण म्हणजे स्वयंभूपणा. स्वयंभू नायक स्वयंपूर्ण असतो. तो दुसऱ्या कोणास नायक मानत नाही. पुढारी किंवा गुरू म्हणून कोणा एकदोघांच्या नावाने गहिवरून येणे हे त्याचेबाबत घडत नाही. ' कृष्णाकाठ ' मध्ये यशवंतरावांचे हे स्वयंभूपण अलगद प्रकट झाले आहे. गांधी, नेहरू, तर्कतीर्थ, मानवेन्द्रनाथ रॉय, एसेम अशा काही थोरांचा रास्त गुणगौरव त्यांनी केला आहे. पण या थोरांचे भक्ताने केलेले भजन नाही. एक त्यांच्या मातोश्री सोडल्या–आणि नंतर सौ. वेणूताई—तर त्यांचा कोणीही weak-point नाही. शेणोलीकर मास्तरांच्या, ' तू कोण होणार ? ' या प्रश्नाला लहानपणीच यशवंतरावांनी उत्तर दिले होते : ' मी यशवंतराव चव्हाण होणार आहे. '

तसेच ते आज झाले आहेत. ' कृष्णाकाठचे यशवंतराव चव्हाण ' एक खरे. नायकात, हीरोत एक अटळ एकटेपणा असतो. ' कृष्णाकाठ ' वाचताना सतत जाणवते की लहानपणापासून यशवंतराव तसे एकटेच आहेत. अर्थात असा एकटेपणा ही नायकाची उणीव नसते. ते त्याचे वैभव असते.

# यशवंतरावांचे ग्रंथप्रेम

## तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

राजकारणाच्या व्यापात ते वाचन कधी करीत ?

वाचनाची गोडी मुळातच होती. त्यामुळे ते रात्री कामकाजाच्या फाइली संपल्यावर नियमितपणे किमान रात्री दोन वाजेपर्यंत वाचनात रमून जात. आमच्या वाईच्या विश्वकोश कार्यालयातील संदर्भग्रंथसंग्रह पाहण्यात रमत. त्यांनी एकदा संग्रहाला भेट दिली, आणि मी त्यांना "वर्ल्ड आर्ट इन् सायक्लोपीडिया" दाखवला, त्यांचे अनेक व्हॉल्युम्स दाखवले. त्यांना तो इतका आवडला की लगेच त्यांनी स्टँड बुक स्टॉलच्या शानभाग यांच्याकडे मागणी नोंदवली. केव्हाही माझ्याकडे आले की नवीन ग्रंथ काय वाचला, हे ते विचारणारच हे गृहीत धरून मी ते आले की त्यांच्यासमोर नवा वाचलेला ग्रंथ ठेवत असे. विज्ञानाचे ग्रंथही ते आवडीने वाचत.

त्यांना सर्वाधिक आवड कुठल्या साहित्यप्रकारात होती ?

✓ यशवंतरावांना सायन्स फिक्शन अतिशय आवडत असत.

प्रत्यक्ष सत्ता हाती आल्यावर, त्यांच्या साहित्यप्रेमाला कोणती निश्चित दिशा मिळाली ?

साठ साली ते मुख्यमंत्री झाल्यानंतर साहित्य संस्कृती मंडळाची त्यांनी केलेली स्थापना हे त्यांच्या साहित्यप्रेमाचेच फलित म्हणता येईल. चांगल्या लेखकांना प्रकाशक न मिळण्याची अडचण दूर व्हावी. वैचारिक लेखन वाढावं, हा त्यामागे हेतू होता. विश्वकोश कार्यालय हेही त्यांच्या सल्ल्यानेच स्थापन केलेले आहे.

# साहित्यिकाबद्दल आस्था

## आनंद यादव

विद्यार्थी झाल्यापासून यशवंतराव चव्हाणांच्या व्यक्तिमत्त्वाचा ठसा मनावर उमटला होता. हे व्यक्तिमत्त्व डोळ्यांसमोर उभे राहिले होते ते प्रामुख्याने त्यांच्या वक्तृत्वाने. सातारा जिल्ह्यात त्यांची खूप भाषणं ऐकली. विद्वत्तपूर्ण, आक्रमक, पल्लेदार अशी कोणतीही " भाषणबाजी " न करता यशवंतराव खास स्वतःच्या शैलीत बोलत. हे बोलणे बहुजनांचेच पण त्यातही वेगळे असे होते. ज्ञानेश्वर जर गद्यात बोलले असते तर ते जसे झाले असते तसे यशवंतरावांचे मृदू बोलणे होते. मृदू बोलणारी माणसे कधी आग ओकणारे बोलत नाहीत. ती दुसऱ्याला समजून घेत घेत दुसऱ्याला आपले म्हणणे समजून देत असतात. कारण मुळातच ही माणसे संवेदनाशील असतात, भावनाप्रधान असतात —यशवंतराव तसे होते. त्यांचे ज्ञान चौफेर होते पण त्याचे त्यांनी कधी " डोस " पाजले नाहीत. शांतचित्ताने, एकचित्ताने ते दुसऱ्याचे जे ऐकत तेच त्यांच्या वाणीतून प्रगट रूप घेई. हे करताना महाराष्ट्र दुभंगणार नाही याची ते काळजी घेत. म्हणूनच पंडित जवाहरलाल नेहरूप्रमाणे त्यांनी गुणग्राहकवृत्ती ठेवली आणि महाराष्ट्राला एका उच्च स्थानावर नेऊन ठेवले.

त्यांचे साहित्याबद्दलचे प्रेमही त्यांच्या बोलण्यातून जाणवत असे. सुमारे पंधरा वर्षांपूर्वी त्यांनी माझी " गोतावळा " कादंबरी वाचली होती आणि तीवर ते खूष होते, हे मला नंतर निर्मलकुमार फडकुले यांच्याकडून कळले होते. फडकुलेंकडे माझी चौकशी करत त्यांनी तेव्हा एकच मार्मिक आणि नेमका प्रश्न विचारला होता, " गोतावळा "तील भाषा मराठी रसिकांना मान्य होईल का पण ? राजकारणात अखंड मग्न असतानाही साहित्य-प्रवाहाकडे त्यांचे किती सूक्ष्म लक्ष होते ! त्याच वेळी त्यांनी येथून पुढे बहुजनांच्या भाषेला महत्त्व येणार आहे याचे समाधान व्यक्त केले होते.

साहित्याप्रमाणे साहित्यिकांबद्दलही त्यांना आस्था होती. रणजित देसाई, ना. सी. फडके, वि. स. खांडेकर, यांचे सारे साहित्य त्यांनी अभ्यासू वृत्तीने वाचले

होते आणि त्या त्या लेखकांशी चर्चाही केली होती. साहित्यिकांबद्दल आदर बाळगण्यात, त्यांचा सन्मान करण्यात त्यांना अवीट आनंद वाटायचा. ग. दि. माडगूळकर, ना. धों. महानोर अशा साहित्यिकांना आमदारकी बहाल करण्यात त्यांचाच जास्त पुढाकार होता. गुणांची कदर व्हावी हीच भावना त्यामागची होती.

कऱ्हाडजवळ कार्वे नावाचे गाव आहे. तेथे संभाजीराव थोरात हा वाङ्मयप्रेमी माणूस राहतो. या संभाजीरावांच्या आत्मचरित्राचा प्रकाशन समारंभ होता. त्याचे अध्यक्ष अर्थातच यशवंतराव होते. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणा म्हणून मला बोलाविणे आले होते आणि यशवंतरावांपुढे आपले विचार मांडता येतील या हेतूने मी ते स्वीकारले होते. आत्मचरित्राबद्दल बोलणे झाल्यावर मी आमच्या ग्रामीण साहित्य चळवळीचे विचार तेथे मांडले आणि आता परिस्थिती बदलली आहे, नव्या पिढीला घडविण्यासाठी यशवंतरावसारख्यांनी दैनंदिन राजकारणातून काढता पाय घ्यावा असेही सूचित केले.

त्यांची-माझी शेवटची भेट कोवाडला रणजित देसाई यांच्याकडे झाली तेव्हाही मी त्यांना हा विचार बोलून दाखविला होता. या दोन्ही वेळेला यशवंतरावांना माझ्या म्हणण्यात तथ्य वाटले होते आणि यशवंतराव म्हणाले होते, "यादव, हे सोडून द्यावं आणि तुमच्या चळवळीमागे लागावं असं मलाही वाटतंय, पण आता राजकारणातून माघारी येणे अशक्य आहे."

दुसऱ्याला मोठेपण देत देत हा माणूस मोठा होत गेला आहे. ते रागवत, चिडत नसत. व्यथित होत, त्यांनी ज्या तडजोडी केल्या त्या या व्यथेमुळेच.

अशी व्यथा साहित्याने दूर होऊ शकते, वाङ्मयातून माणूस घडतो, संस्कृती घडते हे यशवंतराव जाणून होते. परंपरेला वाट पुसतच परंपरा घडते, यावर त्यांचा विश्वास होता. भाषणे करण्याचा ओढा तर होताच. म्हणूनच त्यांच्या भाषणाच्या पुस्तकाला 'निवडक भाषणे' असे नाव न मिळता ते 'सह्याद्रीचे वारे' नावाने लोकांसमोर आले. आपल्या आत्मचरित्राला त्यांनी नाव दिले : 'कृष्णाकाठ!'

या कृष्णाकाठी साहित्य संमेलन व्हावे, अशी त्यांची इच्छा होती. त्याप्रमाणे ऐन संघर्षाच्या काळातच ते झाले. यथास्थित सरबराई होऊनही काही गंगाजळी उरली. हे पैसे साहित्यासाठीच कारणी लागावेत असाच यशवंतरावांचा आग्रह

होता. त्या दृष्टीने त्यांनी अनेक साहित्यिकांशी विचारविनिमय केला. त्यातूनच 'कराड पारितोषिक' आकाराला आले. राजकारणापासून अलिप्त असलेले. कोणाही व्यक्तीचे नाव न चिकटलेले हे पारितोषिक यशवंतरावांच्या कर्मभूमीच्या नावाने आता प्रतिष्ठापात्र ठरले, हेही यशवंतरावांचे एक वेगळेपण.

# ग्रंथप्रेमी साहेब

## सरोजिनी बाबर

आम्ही त्यांना ' साहेब ' म्हणायचो. साहेबांचे पुस्तकांवर मनापासून प्रेम होते. त्यांचे स्वतःचे असे समृद्ध ग्रंथालय होते. साहेबांना भेट म्हणून अनेक पुस्तके मिळत. पण हे ग्रंथालय केवळ या ' भेटीं 'चे नव्हते तर साहेबांनी स्वतः आपल्या आवडीनुसार खरेदिलेल्या असंख्य पुस्तकांचा त्यात समावेश होता. एखाद्या पुस्तकाबद्दल त्यांच्या वाचनात किंवा ऐकण्यात आले की लगेच ते, ते पुस्तक मागवून घेत. भेटीदाखल आलेली पुस्तकेही परस्पर कपाटात जात नसत तर ती वाचली जात, त्यावर अभिप्राय कळविला जाई. एखाद्या पुस्तकाच्या प्रकाशन समारंभाला साहेबांना जायचे असेल तर ते पुस्तक वाचल्याशिवाय, निदान डोळ्यांखालून घातल्याशिवाय साहेब कधीच जात नसत. एखाद्या आवडलेल्या पुस्तकाला उत्स्फूर्तपणे दाद द्यावयाची त्यांना सवय होती. एकदा असा सांगावा घेऊन खास सांडणीस्वार आमच्याकडे आल्याचे मला चांगले आठवत आहे.

तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार अशांसारख्या पंडितांशी त्यांच्या चर्चा होत त्या अभ्यासाची बैठक असल्याशिवाय का ? हा अभ्यास पुस्तकांशिवाय कसा होणार ? साहेबांचे हे ग्रंथप्रेम त्यांच्या आईला आणि बायकोला चांगले माहीत होते. त्या दोघींनाही साहित्याची आवड होती. त्यांनी वाचावीत अशी पुस्तके साहेब त्यांना कधी कधी वाचूनही दाखवीत. त्यावर गप्पाही होत. वेणूताईही साहेबांच्या पुस्तकांची जिवापाड काळजी घेत, ती खराब होऊ देत नसत.

साहित्याप्रमाणेच गाणे, तमाशा, दशावतार याही गोष्टींत त्यांना रस होता. राजकारणात असले तरी या अल्प गोष्टींकडे त्यांचे बारीक लक्ष असायचे. आपल्यात अपुरेपणा राहू नये म्हणून ते कमालीचे दक्ष असायचे. काही वेगळेपण आढळले की लगेच ते टिपण्याकडे त्यांचा कल होता. अशा केवळ राजकारणापलीकडील माणसांचा त्यांचा शोध सतत चाललेला होता.

# ग्रंथवाचन हा नित्यनेम

## राम खांडेकर

यशवंतरावांनी आपल्यातील अनेक गुणांबरोबर साहित्यिक गुणांची जोपासना केली. ते गुण वाढविण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले. साहित्य व साहित्यिकांचा सहवास हा त्यांच्या आयुष्यातील मोठा ‘ विरंगुळा ’ होता. यशवंतरावांवरील जबाबदारीबरोबरच वाढत गेला तो साहित्य-सहवास.

यशवंतरावांना वाचण्याची इतकी आवड निर्माण झाली की रोज १२ ते १५ तास सतत काम केल्यानंतर तास-दीड तास तरी वाचन केल्याशिवाय ते झोपत नसत. कामाचा शीण घालविण्याचे त्यांचे हे फार महत्त्वाचे साधन होते. यशवंतरावांना दोन गोष्टींची फार चीड होती. एक–ते सरकारी काम करण्यास बसले असताना कोणी अडथळा आणला तर व दुसरे वाचन चालू असताना कोणी आले तर.

साधारणत: ते रोज रात्री जेवणानंतर ९–३० च्या सुमारास सरकारी कागद पाहून झाल्यानंतर ते सर्व कागद व्यवस्थित बंद करून नंतर ते पुस्तक हातात घेत. अर्थात घडयाळाकडे लक्ष न देता त्यांचे वाचन चालू असे. डोळे थकले म्हणजेच वाचन बंद करीत. हा कालावधी कधी तास-दीड तास, तर कधी त्यापेक्षा जास्त असे. दिवसाही जशी सवड मिळेल तसे अधूनमधून त्यांचे वाचन चालू असे. पण कमी.

यशवंतरावांची वाचनाची शैली मात्र वेगळीच होती. ते एकाच वेळी पाच-सहा पुस्तके हाती घ्यायचे व प्रत्येकातील काही पाने वाचायचे. प्रवासात वाचण्याची पुस्तके व मासिके निराळी असायची. दिल्लीत आल्यानंतर त्यांच्यावर सोपविण्यात आलेल्या जबाबदारीप्रमाणे पुस्तकांचे विषयही अनेक होत गेले. दर महिन्यात ५-२५ पुस्तके तरी त्यांच्या संग्रही यायची. पुस्तकांची निवड ते बारकाईने करीत. दैनिके, साप्ताहिके, मासिके यांतील पुस्तकांची यादी व परीक्षणे वाचून ती पुस्तके ते त्यांच्या पत्नी सौ. वेणूताईंकडून मागवीत. दिल्लीत जर पुस्तके मिळाली नाहीत तर मुंबईहून मागवत. न्यूज वीक व टाइम ही परदेशी

मासिके त्यांना फार उपयुक्त वाटायची.

पुस्तके ते मनन करून वाचीत असत. त्यांनी वाचलेल्या पुस्तकातील मजकूर ते विसरत नसत. संग्रही असलेल्या पुस्तकाचे व लेखकाचे नाव त्यांच्या लक्षात राहात असे. मृत्यूपूर्वी त्यांनी आपल्या आत्मचरित्राचा दुसरा खंड लिहिण्याची तयारी सुरू केली होती. यासाठी त्यांना संयुक्त महाराष्ट्रावरील ५ पुस्तके हवी होती. त्यातील 'वाटचाल' लेखक नाना कुंटे व 'दैव देते कर्म नेते' शंकरराव देव ही दोन पुस्तके वाचल्याचे व ती घरात असल्याचे त्यांनी मला सांगितले. मराठी पुस्तकांची आलमारी व रजिस्टर शोधूनही ही पुस्तके मिळाली नाहीत. ती पुस्तके घरातच आहेत असा यशवंतरावांना आत्मविश्वास होता. शेवटी ती पुस्तके त्यांच्या सांगण्याप्रमाणे घरातच मिळाली. लेखकाने दिलेले पुस्तक उपयोगी आहे की नाही हे न पाहता त्यांच्या भावना लक्षात घेऊन ते संग्रही ठेवावयाचे हा त्यांचा स्वभाव. कोणतेही पुस्तक रद्दीत द्यायचे नाही असा त्यांचा कडक आदेश.

# व्यक्तित्व का सुगंध

## अटलबिहारी वाजपेयी

देवराष्ट्र से महाराष्ट्र, और महाराष्ट्र से भारत राष्ट्र यह किसी एक सामान्य व्यक्ति की असामान्य जीवन-यात्रा की कीर्तिकथा मात्र नहीं, यह भारतीय लोकतंत्र की गौरवगाथा है।

स्वाधीनता के संघर्ष ने सभी भारतीयों को, फिर वे निर्धन हों या धनवान, ग्रामीण हों या शहरी, उच्चवर्णीय हों या सामाजिक दृष्टि से दलित, त्याग और कष्ट सहन का समान अवसर प्रदान किया था। स्वाधीनता के बाद वयस्क मताधिकार पर आधारित लोकतंत्र की स्थापना ने सैंकडों वर्षों से जमी हुई सामाजिक जडता को जड से हिला दिया और गांव के गरीब तथा साधनविहीन तरुण के लिए भी उज्ज्वल भविष्य के रुद्ध द्वार खोल दिए।

चार वर्ष की अत्यधिक छोटी-सी उम्र में जो बालक पितृस्नेह की छाया से वंचित हो गया, जिसके हितैषियों का सबसे बडा सपना यह था कि उनका लाडला एक दिन मामलेदार बनेगा, वह बालक आर्थिक, सामाजिक और शिक्षा संबंधी सभी सीमाओं को लांघता हुआ एक दिन राष्ट्रीय नेताओं में मूर्धन्य स्थान प्राप्त कर योग्य प्रशासक तथा चतुर राजनेता के रूप में विपुल कीर्ति अर्जित करेगा, यह शायद ही किसी ज्योतिषाचार्य की भविष्यवाणी का विषय रहा हो।

श्री यशवंतराव चव्हाण उन बिरले व्यक्तियों में से थे जो अपना भविष्य आप गढते हैं। जीवन के धरातल पर खडे होकर उन्होंने संस्कारक्षम मन, श्रमसिद्ध शरीर और कुछ करने की संकल्पशक्ति के बल पर, उत्कर्ष के एक-एक सोपान को पार कर नेतृत्व के शिखर तक पहुंचने में सफलता पाई। श्री चव्हाण की यशस्वी जीवनयात्रा उन सभी नौजवानों के लिए प्रेरणादायक हो सकती है जो आज केवल इसलिए हताश या निराश है क्योंकि वे किसी बडे खानदान से संबंधित नहीं हैं।

२३ जनवरी, १९६३

कम्युनिस्ट चीन के हाथों भारतीय सेनाओं की भारी पराजय से उत्पन्न

राष्ट्रीय अपमान के घाव अभी पूरी तरह भरे नहीं थे। प्रधानमंत्री श्री नेहरू की अनिच्छा के बावजूद श्री कृष्ण मेनन को रक्षा मंत्री के पद से हटना पडा था। श्री यशवंतराव चव्हाण नए रक्षा मंत्री बने थे। उनकी नियुक्ति का व्यापक स्वागत हुआ था। कुछ पत्रों ने तो यहां तक लिखा था कि हिमालय की सहायता के लिए सह्याद्रि आ गया है।

गणतंत्र दिवस के अवसर पर प्रतिवर्ष की भांति उस वर्ष भी दिल्ली प्रदेश हिंदी साहित्य सम्मेलन की ओर से एक अखिल भारतीय कवि सम्मेलन का आयोजन हुआ था। कवि सम्मेलन का स्थान लाल किले से बदलकर रामलीला मैदान कर दिया था। सम्मेलन का उद्घाटन करने के लिए श्री यशवन्तराव चव्हाण आमंत्रित थे। रक्षा मंत्री का दायित्व संभालने के बाद शायद भारत की राजधानी में यह उनका पहला सार्वजनिक कार्यक्रम था। कवियों को सुनने के साथ-साथ दिल्ली के नागरिकों में नये रक्षा मंत्री को देखने और सुनने की भी उत्सुकता थी। राष्ट्र की रक्षा के लिए बंदूक उठाने वाले और पहाडी पगडंडियों को पार करने के लिए छडी हाथ में धारण करके चलनेवाले श्री यशवन्तराव चव्हाण का रसों के सागर में अवगाहन करने वाले कवियों से क्या सम्बन्ध ? श्री चव्हाण ने कवि सम्मेलन में आने का निमंत्रण क्यों माना ? मराठी भाषी श्री चव्हाण हिन्दी के कविं सम्मेलन में क्या कहेंगे, किन शब्दों में कहेंगे ?

रामलीला मैदान में बना पंडाल खचाखच भरा था। श्री चव्हाण की प्रतीक्षा हो रही थी। श्री चव्हाण संयोजकों के द्वारा निर्धारित ठीक समयपर पहुँचे। उनके ऊंचे तथा भरेपूरे डीलडौल ने दर्शकों को प्रभावित किया। अपने संक्षिप्त भाषण में श्री चव्हाण ने आयोजकों के प्रति आभार प्रकट किया और कवियों को अपनी रचनाओं द्वारा जवानों तथा जनता का मनोबल बढाने के लिए धन्यवाद दिया। चीन के साथ हुए सीमा संघर्ष का उल्लेख करते हुए श्री चव्हाण ने कहा कि हमें हिम्मत नहीं हारना चाहिए। उहोंने यह भी कहा कि 'अगर चीन, चीन है तो भारत प्राचीन है।

श्री चव्हाण के इस वाक्य को सुनकर सारी सभा में बिजली–सी दौड गई। पंडाल तालियों की गडगडाहट से गूंज उठा। औरों से वाह-वाह सुनने के आदी कवि भी वाह-वाह कर उठे। श्री चव्हाण से लोगों ने जो अपेक्षाएं की थी, पूरी हुई वे यदि वे अन्य राजनीतिक नेताओं की तरह से लम्बा भाषण देने

की भूल कर बैठते तो उन्हें कठिनाई का सामना करना पडता। यदि वे संक्षिप्त भाषण देते, किन्तु उसमें कोई मर्मस्पर्शी बात न कहते, तो भी उनका प्रभाव नहीं जमता। चीन के साथ प्राचीन की पुट जोडकर उन्होंने बता दिया कि उनकी खुरदरी काया में एक रसिक हृदय धडक रहा है। उन्होंने इस बात का भी संकेत दे दिया कि राष्ट्र की नाडी पर उनका हाथ है।

यह तो मुझे बहुत बाद में पता लगा कि श्री चव्हाण एक रसज्ञ व्यक्ति हैं और साहित्य, संगीत तथा अन्य ललितकलाओं में उनकी गहरी रुचि है। चीन की तुलना में भारत को प्राचीन बताने की कल्पना श्री चव्हाण को एक हिंदी कवि की रचना से ही प्राप्त हुई थी।

पहले रक्षा मंत्री, फिर गृह मंत्री, पश्चात् वित्त मंत्री, तदन्तर विदेश मंत्री, और अन्त में उप-प्रधान मंत्री—इन सभी दायित्वों को श्री चव्हाण ने योग्यता के साथ निभाया। विचारणीय विषय को, फिर वह कितना ही जटिल और शुष्क क्यों न हो, हृदयंगम कर उसके सम्बन्ध में अपना मत निर्धारित करने की उनमें अपूर्व क्षमता थी।

अन्तरराष्ट्रीय वित्त एक गहन विषय है। वित्त मंत्री के रूप में श्री चव्हाण ने विश्व की वित्तीय स्थिति, अन्य देशों के साथ भारत के आर्थिक संबन्ध, विभिन्न अन्तर्राष्ट्रीय संस्थाओं यथा विश्व बैन्क तथा अन्तर्राष्ट्रीय मुद्राकोष का दृष्टिकोण इन सभी पेचीदा और उलझे हुए विषयों का अच्छा अभ्यास कर उनसे सम्बन्धित प्रश्नों का संसद में संतोषजनक उत्तर देकर सबका साधुवाद प्राप्त किया। विदेश मंत्री के नाते उन्हें प्रधानमंत्री द्वारा निर्धारित परिधि में रहकर काम करना था और उनके लिये कोई नई पहल करना या नया पग उठाना संभव नहीं था, किन्तु व्यक्तिगत स्तर पर उन्होंने अपने मृदुल स्वभाव से, धैर्यपूर्वक सबको सुनने की तत्परता से तथा सबसे बढकर अपनी मितभाषिता से अनेक राष्ट्रों के नेताओं से व्यक्तिगत स्तर पर मित्रता के सम्बन्ध कायम करने में कामयाबी पाई। सबको सुनना और स्वयं कम बोलना श्री चव्हाण का ऐसा गुण था जो सार्वजनिक जीवन में उनके लिए बडा उपयोगी सिद्ध हुआ। इसका यह अर्थ नहीं है कि वे खुलकर बात नहीं करते थे या मित्रों के बीच बैठकर वे शब्दों में कृपणता से काम लेते थे। किन्तु वे स्वभाव से मितभाषी थे। जो भी बोलते, नाप-तौल कर बोलते थे। इससे उनके शब्दों की कीमत बढती थी।

किंतु उनके कम बोलने और श्रीमती इंदिरा गांधी के मुह न खोलने के बीच एक बुनियादी अन्तर था। चव्हाण जानते थे कि उन्हें क्या कहना है, क्या करना हैं। किंतु अपने मंतव्य और गंतव्य को सदैव प्रकट करना वह आवश्यक नहीं समझते थे, किंतु इंदिरा जी की मितभाषिता एक व्यापक रणनीती का अंग हुआ करती थी, जो अंधेरे में टटोल-टटोल कर आगे बढती थी, और जब तक आगले कदम का निश्चय न हो जाय तब तक सबसे परामर्श करने की भंगिमा बनाये रखती थी, किन्तु स्वहित में क्या है इसका एक बार निर्णय होते ही शब्दों की स्वल्पता का स्थान प्रचार का तूफान ले लिया करता था।

श्रीमती गांधी का नाम आ गया है तो एक ऐसी घटना का उल्लेख करना अप्रासंगिक न होगा जिससे श्री चव्हाण के साथ इंदिरा जी के संबंधों पर छोटासा प्रकाश पडता है। यह उन दिनों की बात है जब हिंदी के विरुद्ध तमिलनाडु में तीव्र आंदोलन उठ खडा हुआ था। श्री चव्हाण गृह मंत्री थे। संसद में राजभाषा से संबंधित एक विधेयक पर चर्चा हो रही थी। अपने दल की ओरसे मैंने प्रधान मंत्री के सामने यह सुझाव रखा कि जल्दी में कानून बनाने के बजाय विधेयक को संसद की संयुक्त प्रवर समिति को सौंप दिया जाय। समिती में सभी दलों के सदस्य होंगे और उनके लिए परस्पर विरोधी सभी दृष्टिकोणों को सुनकर आम सहमती के आधार पर कोई रास्ता निकालना सरल होगा। श्रीमती इंदिरा गांधी ने कहा कि उन्हें मेरा सुझाव मान्य है, किन्तु वे क्या करें, चव्हाण साहब विधेयक को प्रवर समिति को सोंपने के पक्ष में नहीं है। बाद में पता लगा कि श्री चव्हाण को मेरा सुझाव स्वीकार था किन्तु स्वयं प्रधानमंत्री श्रीमती इंदिरा गांधी ही उससे सहमत नहीं थी।

देशवासी जिस चव्हाण को भलीभांति जानते और मानते हैं वह उनका एक सफल राजनीतिज्ञ का रूप है। किंतु चव्हाण के व्यक्तित्व के और भी अनेक पहलू हैं। ये पहलू जितने नये हैं उतने ही आकर्षक भी हैं। " ऋणानुबंध " नामक पुस्तक में उनके व्यक्तित्व के जो नये आयाम उभरे हैं वे मन को मोह लेने वाले हैं। सत्ता का अपना महत्त्व है। किन्तु मनुष्य की वास्तविक पहचान तब होती है, जब वह सत्ता का परिधान त्यागकर, अपने परिवेश के पार जाकर अपने अंतर्मन की परतों को एक-एक कर खोलता है और सूक्ष्मतम भावों को, जो अब तक गुह्य थे, शब्द देकर संसार के बाजार में मूल्यांकन के लिए प्रस्तुत

करता है। कृष्णा और कोयना के पानी में बाल्यावस्था में डूबने और तैरनेवाले चव्हाण इन नदियों के अविरत प्रवाह से कुछ छंद पा सके, कुछ श्रद्धा ग्रहण कर सके, और उन छंदो और श्रद्धाओं को जीवन भर अपने मन में संजोकर रख सके, यह बहुत बडी बात है। यदि श्री चव्हाण के निकट संपर्क में आए हुए लोग उनके विविधतापूर्ण व्यक्तित्व की स्मृति को "अत्तराच्या कुपीसारखी" सुरक्षित रखें तो इसमें आश्चर्य कुछ भी नहीं है।

## दिल्लीतील मराठी नाट्यमहोत्सवासाठी मदत

मराठी नाट्य परिषदेच्या विद्यमाने मार्च १९६१ मध्ये दिल्ली येथे नाट्य-संमेलनाचे ४३ वे अधिवेशन भरले होते. श्रीमती दुर्गाबाई खोटे अध्यक्ष होत्या. यशवंतराव तेव्हा महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते. आमच्या विनंतीस मान देऊन यशवंतराव या संमेलनाचे स्वागताध्यक्ष झाले. त्यांच्या आणि दिल्लीतील कार्यकर्त्यांच्या प्रयत्नाने राष्ट्रपती राजेंद्रप्रसाद यांनी उद्घाटनास येण्याचे मान्य केले होते. १९५४ साली दिल्लीत झालेल्या राष्ट्रीय नाट्यमहोत्सवात मुंबई मराठी साहित्य संघाने सादर केलेल्या 'भाऊबंदकी' नाटकास पारंपरिक विभागाचे पहिले पारितोषिक मिळाले होते व ते पारितोषिक राष्ट्रपतींच्याच हस्ते प्रदान करण्यात आले होते. त्यामुळे मराठी नाटकाचा दर्जा त्यांना विदित होताच आणि त्यांनी संतोषाने अधिवेशनाचे उद्घाटन करण्याचे मान्य केले होते. महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीच स्वागताध्यक्ष असल्याने साऱ्या नाट्यप्रेमी महाराष्ट्राने आपल्या समारंभात राष्ट्रपतींना उद्घाटनाची विनंती केली असाच याचा अर्थ होता. या नाट्यसंमेलनाच्या अधिवेशनाने मराठी रंगभूमीची साऱ्या भारताला नव्याने ओळख झाली, असे म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही असा विश्वास आहे. यशवंतरावांच्या साहाय्यानेच हे होऊ शकले यात शंका नाही आणि या संमेलनाची आर्थिक बाजूही मुख्यमंत्री स्वागताध्यक्षांनी यथोचित सांभाळली यात शंका नाही. तो सोहळा अवर्णनीयच होता यात संदेह नाही.

१९७६ साली दिल्ली येथे नाट्यसंमेलनाचे अधिवेशन भरले होते. नटवर्य दाजी भाटवडेकर अध्यक्ष होते. या वेळी यशवंतराव दिल्लीतच होते. त्यांनी याही वेळी कार्यकर्त्यांना साहाय्य तर केलेच, परंतु संमेलनाच्या सर्व कार्यक्रमांना हजर राहून प्रोत्साहन दिले. याही वेळी राष्ट्रपती आले होते ते संमेलनाच्या दुसऱ्या दिवशी रंगभूमी-दिनाचे अध्यक्ष म्हणून. या साऱ्या गोष्टी घडल्या त्या यशवंतरावांनी संमेलनासाठी आलेल्या सर्व प्रतिनिधींना आपल्या निवासस्थानी चहापानास निमंत्रिले होते त्या वेळी त्यांनी दाखविलेले अगत्य हजर असणाऱ्या प्रत्येकास जाणवले यात संदेह नाही.

—शं. ना. अंधृटकर
(गावकरी, नासिक)

## भारतीय खेळांचा त्राता– यशवंतराव चव्हाण

भारतीय खेळ खुद्द भारतातही उपेक्षिलेले. कुठे संघटना कमी पडते, तर कुठे शासकीय पाठिंबा तोकडा पडतो. यातून खेळाडूंचा उत्साह कमी होत

जातो. या पार्श्वभूमीवर या खेळांच्या विकासासाठी, वाढीसाठी सर्व स्तरावर प्रयत्न करणाऱ्या कार्यकर्त्यांना उत्साह देणारे, नवीन कल्पनांना पुढे नेणारे भूमिकानिष्ठ आणि रसिक नेतृत्व म्हणजे यशवंतराव चव्हाण. त्यांच्या नेतृत्वाची जाण आमच्या धडपडणाऱ्या संघटनांना कार्यक्षम ठेवण्यात नेहमीच उपयोगी ठरली आहे. कबड्डी, खोखो, कुस्ती, आट्यापाट्या या सर्वही खेळांबद्दल त्यांना कळकळ होती. ज्या संघटनांच्या संचालकांनी त्यांची साथ घेतली त्यात अखिल भारतीय स्वरूपात चांगला बदल झालेला दिसतो. यशवंतराव त्या संघटनांमागील खंबीर नेतृत्व होते.

यशवंतरावांनी फक्त प्रेक्षकांचा आणि खेळाडूंचाच विचार केला नाही तर त्याहूनही आपुलकीने त्यांचे कार्यकर्त्यांच्या सोयीकडे बारकाईने लक्ष असे. माझ्या रशिया, इंग्लंड, रोम, पॅरीस अशा परदेशी दौऱ्याची त्यांनी नेहमीच पडद्याआडून काळजी घेतली. कुठेही वाच्यता न करता सहानुभूती म्हणूनच त्यांनी अशा वैयक्तिक गोष्टींकडे लक्ष पुरविले. एखादा विश्वासाचा वा भरवशाचा माणूस मिळाला की त्याच्यामागे यशवंतराव पूर्ण उभे राहात असत. सर्व वैयक्तिक व शासकीय पाठिंबा देऊन.

'गादीवरची कुस्ती' आणि 'मातीतील कुस्ती' हे वाद महाराष्ट्रानी बराच काळ घातले. प्रस्थापितांना नवीन गादी रुचत नव्हती. आपली प्राचीन मल्ल विद्या त्यातून मागे पडत होती. हे यशवंतरावांच्या लक्षात आल्यावर त्यांनी गादीवरील कुस्तीचे तंत्रमंत्र शिकवण्यासाठी शासकीय पाठबळ देण्याची केव्हाच तयारी दाखविली. त्या आधी कै. मामासाहेब मोहोळ, बाळासाहेब देसाई, यांचे तसे प्रयत्न चालू होतेच. पण तसे रांगत, चाचपडतच. पण नंतर कुस्ती परिषदेची नियमित अधिवेशने, शिष्यवृत्ती, कुस्तीवीरांचा खुराक, आदरसत्कार या सर्वांना शासकीय आधार देण्याचा मार्ग यशवंतरावांनी आखून दिला. सध्याचे राज्यक्रीडाखातेही त्याच मार्गावरून पुढे जात आहे. एक कै. खाशाबा जाधव सोडल्यास आंतरराष्ट्रीय पातळीवर आपला मल्ल प्रभाव पाडू शकला नाही, याची त्यांना सतत खंत होती.

बहुगुणी वेगवान खेळ असूनही खो खो तसा मागेच राहिलेला. पण आता मात्र त्यात नियमावलीच्या पुस्तकातून संघटनेपर्यंत बरीच सुधारणा झाली आहे. यशवंतराव काही काळ राष्ट्रीय खो खो संघटनेचे अध्यक्षही होते. त्यांच्या आमदानीत या खेळाची भरीव प्रगती झाली. या काळात कराड या यशवंतरावांच्या गावी झालेले राष्ट्रीय खोखो सामने, त्याचे यजमानपद, त्याच काळात बडोद्याचे सुधीर परब यांना प्रथमच खोखोत मिळालेले अर्जुनपदक, हे केवळ योगायोग नव्हेत. हा यशवंतरावांच्या सक्रिय पाठिंब्याचा परिणाम असे म्हणावेसे वाटते. ते केंद्रीय गृहमंत्री असताना सेंट झेवियर्सच्या सामन्यात खोखो सामन्यांचा शुभारंभ करताना खो देताना घेतलेले

त्यांचे छायाचित्र त्यांच्या खिलाडू वृत्तीचे उदाहरणच.

**शंकरराव साळवी**

## ‘ छावा ’ आणि ‘ यशवंतरावजी ’ – एक ‘ ऋणानुबंध ’

‘ छावा ’ आणि यशवंतरावजी यांचा काही तरी गूढ व मलाही न आकळणारा ऋणानुबंध असावा असं मला वेळोवेळी वाटत आलं आहे. नुकत्याच झालेल्या एका स्कूटर अपघातानं मी १९७८ च्या अखेरीला जबरदस्त व्याधिग्रस्त होतो. छाव्याचे शेवटचे प्रकरण बांधायचे होते. पराकोटीच्या जिद्दीनं सौ. ला ते डिक्टेट करून, छाव्याचं हस्तलिखित पूर्ण करून मी जसलोक रुग्णालयात दाखल झालो.

१९७२ साली ही शंभूकथा मी लिहायला हाती घेतली. तेव्हाच तिचं प्रकाशन यशवंतरावजींच्याच हस्ते करायचं मी मनोमन पक्कं ठरवलं होतं. त्यावर आता १९७९ साल उजाडलं होतं.

‘ जसलोक ’मधून मी एक साधं पोस्ट कार्ड दिल्लीला पाठवून साहित्यप्रेमी व बावन्नकशी मराठमोळं माणूसपण अंगी सहज वागविणाऱ्या यशवंतरावजींना मी माझी तीव्र इच्छा कळविली. ते पोस्टकार्ड त्यांच्याशी खूप बोलून गेलं.

ते दिल्लीहून पुण्याला आले. त्यांनी पूजन व प्रकाशन संपन्न करून कॉंटिनेंटलच्या श्री. अनंतराव कुलकर्णी यांना माझ्या तब्येतीबद्दल विचारलं. माझ्या कुटुंबियांची अत्यंत आस्थेनं व जिव्हाळ्यानं त्यांनी चौकशी केली.

थोड्याच दिवसांत ‘ छाव्याची ’ पहिल्या आवृत्तीतील पहिली प्रत सर्वप्रथम त्यांच्या हस्तेच प्रतापगडावरील तुळजाभवानीच्या चरणी वाहण्याची माझी इच्छा मी त्यांना कळविली. महाराष्ट्राच्या दौऱ्यावर असतानाची एक योग्य तारीख त्यांनी लागलीच पत्राने कळविली. ती उन्हाळयातील तारीख होती. ते कऱ्हाडहून प्रतापगडावर परस्पर आले. मी व कॉंटिनेंटलच्या वतीने अनिरुद्ध कुलकर्णी पुण्याहून गेलो.

यशवंतरावजी देवदर्शन आटोपून प्रतापगडावरील भवानी मंदिरातून बाहेर येत असताना आम्ही पोचलो ! ते हाती छाव्याची प्रत घेऊन पुन्हा परतले. ती भवानीच्या चरणी ठेवून त्यांनी डोळे मिटून हात जोडले.

त्यांच्या मनी तेव्हा नेमके काय विचार आले असतील हे सांगता येणं खरोखरच अवघड आहे.

ते श्रद्धेनं व अकृत्रिम नेकीनं मानत आलेल्या शिवप्रभूंचं व भवानीमातेचं त्यांनी नक्कीच स्मरण केलं असावं.

‘ छावा ’ ची एक प्रत त्यांच्या हाती देऊन मी त्यांना मंदिरातच नमस्कार केला. त्यांच्या ठायी असलेल्या सूक्ष्म व अत्यंत तरल साहित्यिक जाणिवेचा आशयघन प्रत्ययच मला पुढच्या भेटीत त्यांनी दिला— ‘ शंभूजन्माच्या वेळी चिंताग्रस्त जडावल्या फेऱ्या पुरंदरच्या बाळंतिणीच्या दालनासमोर

घेणाऱ्या जिजाऊंच्या नजरेला म्हणून 'चंद्रावळी शांत नजर' असं एक विशेषण मी वापरलं आहे. त्यावर नेमकं लक्ष वेधवून ते त्या भेटीत म्हणाले, "चंद्रावळी नजर" ही तुमची कल्पनाच त्या नजरेला शोभणारी आहे. (मला वाटतं हे वाचताना व आता बोलतानाही त्यांना मातुश्री विठाईंची तीव्र आठवण झाली असावी.)

त्यांच्या जाण्याने महाराष्ट्रातील एक 'बलवंत' 'यश' अंतर्धान पावलं आहे, याच शीर्षकाचा एक लेख दै. लोकसत्ताकडे पाठविला आहे. तो लिहिताना व आजही 'छाव्याच्या' संदर्भात ही एवढीशी आठवण लिहिताना मन व डोळे दाटून आले आहेत. यशवंतरावजींसारख्या अंबाभक्ताला सद्गतीशिवाय काय मिळणार! त्यांच्या, महाराष्ट्राला सदैव प्रेरक ठरणाऱ्या निकोप स्मृतीला नम्र-नम्र अभिवादन!

**शिवाजी सावंत**

## काही साहित्यविचार–

मी साहित्यसमीक्षक नाही. एक रसिक मराठी भाषिक साहित्यप्रेमी आहे. आजच्या विद्वान अध्यक्ष ललित व समीक्षात्मक साहित्याच्या श्रेष्ठ अधिकारी आहेत. तेव्हा साहित्यविषयक प्रश्नांचा ऊहापोह त्या करतीलच. पण साहित्यप्रेमी हाही आजच्या लोकशाही युगात एक नम्र समीक्षक असतोच, आणि या दृष्टीने काही विषयांना मी स्पर्श करणार आहे. प्रथमतः एक समीक्षा करण्यासारखी आहे. ती म्हणजे वैचारिक प्रवर्तन व प्रबोधनाच्या दृष्टीने मराठी साहित्यात काय झाले. एका अर्थाने भारतीय प्रबोधनाची सुरुवात बंगालबरोबर महाराष्ट्रात झाली. काय घडले व काय घडावयास हवे हेही पाहणे सयुक्तिक ठरेल. न्या. रानडे यांनी मराठी ग्रंथकारांचे पहिले संमेलन १८७८ मध्ये पुण्यास भरविले. स्वातंत्र्यपूर्व काळात भारतीय प्रबोधनास मराठी साहित्यिकांनी व पत्रकारांनी हातभार लावला. १९४७ मध्ये भारतीय समाजाचे स्वातंत्र्यपर्व सुरू झाले. आता रचनापर्व सुरू झाले आहे. भारतीय समाजाच्या जागृतीचा नवा काळ आला आहे. जे हक्क राज्यघटनेने आपल्या समाजातील उपेक्षितांना दिले आहेत त्यांची जाण नव्या पिढीत आली आहे. तेव्हा ही स्वातंत्र्यजात नवी पिढी आता जुन्या समाजरचनेविरुद्ध बंड करून उठते आहे. एकेकाळच्या उपेक्षितांच्या अंतरंगात असलेले भावनांचे कढ साहित्यात दिसू लागले आहेत. साहित्य हे थर्मामीटरमधील पाऱ्यासारखे संवेदनाशील असते. निदान असावे. समाजाच्या मानसामध्ये जे असते तेच साहित्यात अवतरते, मराठी साहित्याचा इतिहास हेच सांगतो. आधुनिक काळात जो राष्ट्रवाद आला, जी राष्ट्रीय अस्मिता जागृत झाली, जे स्वातंत्र्याचे नवे विचार आले त्यांचे परिणाम साहित्यावर झाले. भारतीय समाजाच्या या रचनापर्वात नव्या विचारांची व सर्वांगीण ज्ञानाची

बीजे टाकत राहणे हेही साहित्यिकाचे महत्त्वाचे कार्य आहे. कारण त्या विचारांनी प्रेरित झालेले व भारलेले राजकीय कार्यकर्ते समाजाला पुढे नेत असतात. यासाठी वैचारिक व चिंतनशील वाङ्मयाची महती नजरेआड करण्यासारखी नाही. मला वाटते ही सामाजिक जाणीव, आपल्या सामाजिक परिवर्तनाची प्रेरणा असते. म्हणून आता नव्या सामाजिक प्रबोधनाचे चिंतन करणारे साहित्य हेच उद्याच्या मराठी साहित्याचे स्वरूप असणार अशी माझी धारणा आहे. गेल्या ५० वर्षांत भारतात जे व्यक्तिस्वातंत्र्यवादी, मार्क्सवादी व गांधीवादी विचार आले त्या सर्वांनी आपले व्यक्तिमत्त्व घडविले आहे हे नाकारण्यात अर्थ नाही. निदान माझ्या पिढीपुरते मी हे निश्चित म्हणतो. साहित्य कोणत्याही रंगाचे असले तरी चालेल, पण आजूबाजूच्या परिस्थितीचा डोळसपणे अभ्यास करून, समाजात सर्व थरांत निर्माण झालेल्या अस्वस्थतेची जाणीव असणारे समाजचिंतन त्यात असले पाहिजे. आचार्य विनोबा भावे यांनी एकदा म्हटले होते की, लोकशाही हे प्रज्ञेचे राज्य असते. ही प्रज्ञा समाजाभिमुख असली पाहिजे, तरच ती समाजाचे परिवर्तन घडवून आणील, त्याला मार्गदर्शन करीत राहील. बुद्धीची कुवत वाढविणे, मने व्यापक करणे, जगातील नव्या प्रवाहांची समीक्षा करणे, स्वतःच्या संस्कृतीचा व परंपरेचा बुद्धिनिष्ठ अभ्यास करून नव्या परिस्थितीला सुसंगत अशा मूलभूत परिवर्तनासाठी जनमानसाला तयार करणे ही पुढच्या पिढीतील चिंतनशील साहित्याची उद्दिष्टे असू शकतात. गेल्या शतकात मार्क्सने इतिहासाकडे पाहण्याची नवी दृष्टी सांगून एक प्रचंड विचारप्रवाह सुरू केला. या शतकातील टॉयनबीसारख्या इतिहासपंडिताने मानवी संस्कृतीचा अभ्यास करून सर्जनशील चिंतनाचा आणखी एक नमुना आपल्यापुढे ठेवला. आज समाजशास्त्र, अर्थशास्त्र, मानववंशशास्त्र अशा अनेकविध ज्ञानशाखांचा उपयोग करून आपल्या इतिहासाचे, आपल्या समाजाचे पुनरध्ययन करणे शक्य आहे. मराठीमध्ये अशा अभ्यासाची गरज आहे.

दलित समाजातून आलेल्या नव्या मराठी साहित्यिकांनी जे साहित्य निर्माण केले आहे ती मराठीतील एक मोलाची भर आहे, असे मी मानतो. उच्चभ्रू साहित्याचे किंवा त्यांच्या संकल्पनांचे मानदंड लावून त्याला जोखणे चुकीचे आहे. उच्चभ्रू साहित्यात पाश्चात्त्य वळणाची अश्लीलता आपणाला चालते, दलित समाजातून येणाऱ्या साहित्यिकाच्या भाषेस मात्र आपण नाके मुरडतो. हा नैतिक भेदभाव आहे, दुहेरी मानदंडाची भावना त्यामागे आहे, असे मला वाटते. म्हणून ज्या सामाजिक थरातून लेखक आलेला असेल त्याची भाषा त्याच्या साहित्यात आली तर ती स्वागतार्ह मानली पाहिजे. शेवटी भाषेचे माध्यम अभिव्यक्तीसाठी वापरावयाचे

असेल तर तिचा सामाजिक अभिव्यक्ती हाही एक अविभाज्य भाग आहे. हजारो वर्षे दडपल्या गेलेल्या समाजाचा पहिला उद्‌गार हा रूढ कल्पनेप्रमाणे असावा असे मानणे चुकीचे आहे. तो ‘ उद्‌गार’ निघाला हेच सामाजिक दृष्ट्या महत्त्वाचे आहे. तो असेल तसा आला पाहिजे. आपण त्याचे स्वागत केले पाहिजे. मला वाटते आपले हजारो वर्षांचे संस्कार अशा अभिव्यक्तीतून बाहेर पडले तर ते सामाजिक दृष्ट्या आरोग्यदायक ठरेल. आदिवासी व उपेक्षित जाती यांची भाषा आता नव्या मराठी भाषेत येणार आहे. हे सामुदायिक चयन किंवा देवाणघेवाण भाषेच्या दृष्टीने उपयुक्त आहे. त्याने मराठी भाषा समृद्ध होईल. म्हणून दलित साहित्याची भाषा कदाचित वेगळी वाटली तरी तिचा कस, तिच्यातील रग, जर नव्या मराठीत उतरली तर ती हवीच आहे. पण यासाठी जाणकारांनी व सामान्य वाचकांनी स्वागतशील वृत्ती ठेवली पाहिजे.

दुसरा एक मुद्दा दलित साहित्या-संबंधी सांगण्यासारखा आहे. ती एक उपेक्षित सामाजिक स्तरांच्या भावनांची जी कोंडी इतकी वर्षे झाली होती ती आज फुटली आहे. त्याचा सामाजिक सुधारणेसाठी व सामाजिक प्रक्रियेसाठी उपयोग होईल. जी समाजसंस्था जुनी झाली आहे तिच्याविषयी संबंधित सामाजिक गटांना काय वाटत होते, तिचा जाच त्या गटांना कसा होत होता, त्यांचा सामाजिक अनुभव काय होता, याचे जे दर्शन या साहित्यातून घडते ते सामाजिक दृष्ट्या महत्त्वाचे आहे. सामाजिक वास्तवता कितीही कठोर व कटू असली तरी ती समाजसुधारकाला पाहावी लागते. एखाद्याच्या रोगाचे निदान करण्यासाठी डॉक्टरला जशी माहिती हवी असते तसेच हे आहे. म्हणून हे साहित्य हा आरसा आहे. त्याचा सामाजिक उपयोग होण्यासारखा आहे. केवळ साहित्यबाह्य निकष लावून जरी या साहित्याचा विचार केला तरी ते मोलाचे आहे.

**यशवंतराव चव्हाण**

( कराड येथे १९७५ मधे झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य-संमेलनाच्या स्वागताध्यक्षीय भाषणातून )

## प्रशस्ती ऐकून जीवनाचं सार्थक झालं !

यशवंतरावांना मी प्रथम पाहिलं ते ‘ वहिनींच्या बांगड्या ’च्या प्रीमियर शोला. त्यानंतर अनेक मराठी नाटके, मराठी चित्रपट प्रीमियरना यशवंतराव व वेणूताई यांची गाठभेट व्हायची. दोघेही आवर्जून हौसनं येत, सर्वांचं मनापासून कौतुक करीत. यशवंतरावांचं दिलखुलास मनमोकळं हसणं पाहूनच सर्व कौतुक पोहोचत असे. वेणूताईंचं कौतुक मात्र अबोल असायचं. मी लांब असले तरी निरोप पाठवून जवळ बोलावून घेत. मोजक्या शब्दांत चौकशी करीत आणि तीही घरगुती.

यशवंतरावांचा खऱ्या अर्थानं परिचय झाला तो ते संरक्षणमंत्री झाले तेव्हा.

१९६२ च्या चिनी युद्धानंतर मराठी चित्रपट व्यावसायिकांच्यातर्फे महाराष्ट्रातील अनेक शहरी करमणुकीचे कार्यक्रम केले जात. त्याद्वारे होणारे उत्पन्न संरक्षण निधीला दिले जाई. यशवंतराव अशा कार्यक्रमांना स्वतः उपस्थित राहात असत. आण्णा माडगूळकर यांच्यावर त्यांची मर्जी आणि मैत्रीही. आण्णांच्या गळ्यात हात टाकून गुजगोष्टी चालायच्या.

याच सुमारास माझी वहिनी अचानक वारली. संरक्षण निधीला सुवर्णदान करावे असं आवाहन त्या काळात सतत केलं जात होतं. माझ्या वहिनीचे सर्व दागिने संरक्षणनिधीला द्यावेत असं मी ठरविलं आणि एक दिवस भेटीची वेळ न ठरविता यशवंतरावांच्या बंगल्यावर जाऊन हजर झाले. आत निरोप पाठविताच, पाच मिनिटांचाही वेळ गेला नसेल एवढ्यात सौ. वेणूताई बाहेर आल्या आणि मला घेऊन आत गेल्या. चहा वगैरे होईपर्यंत यशवंतरावही दिवाणखान्यात आले. मी ते दागिने त्यांच्याकडे दिले आणि त्यांचा निरोप घेऊन निघाले. त्यांनी मला थांबवले, आणि विचारले, 'फोटोग्राफर नाही का आणला?' मी गोंधळून गेले. म्हणाले 'फोटोग्राफर कशाला?' यावर ते हसले आणि म्हणाले, 'अशा वेळी मराठी माणूस कळतो.' मग समजावणीच्या सुरात म्हणाले, 'अहो, अशा गोष्टींना प्रसिद्धी मिळाली पाहिजे. आम्ही कुणी काही करण्यापेक्षा कलावंतांनी केलेल्या कृतीचं आमजनतेकडून अधिक अनुकरण होतं.' त्यांनी बंगल्यावरल्या फोटोग्राफरला बोलावलं, फोटो घेतला आणि स्मरण ठेवून फोटोच्या प्रती मलाही पाठविल्या.

यशवंतराव त्यावेळी कर्तृत्वाच्या शिखरावर होते. हिमालयाच्या मदतीस सह्याद्री धावून येईल हा पं. नेहरूना दिलेला शब्द त्यांनी शब्दशः खरा करून दाखविला. स्वतःचं यशवंत हे नाव सार्थ केलं. त्यांच्या या विजयी कर्तृत्वानं दिपलेल्या सी. ✓ रामचंद्र यांनी दीर्घकाळानंतर त्यांना झालेल्या प्रथम पुत्राचं नामकरण हौसेनं 'यशवंत' असं केलं.

यशवंतराव दिल्लीत आहेत हा एक मोठा दिलासा असायचा. एकदा एका हिन्दी चित्रपटाच्या चित्रीकरणासाठी दिल्लीला गेले होते. कलाकारांच्या राहण्याची व्यवस्था 'अशोका इंटरनॅशनल' हा हॉटेलमध्ये करण्यात आली होती. पहिले एक-दोन दिवस शूटींग व्यवस्थित पार पडले. मग मात्र चार-चार दिवसांचा खंड पडला. निर्माताही भेटेना. शूटींग संपल्याचेही सांगेना. निर्मात्याचे लक्षण काही ठीक दिसत नाही असे चित्रपटाचे कॅमेरामन राघू कर्मकार मला सांगून गेले. हॉटेलची बिलं वाढत आहेत याची त्यांना काळजी होती. आपल्याकडे परतीची तिकिटे आहेत तेव्हा आपण सारेजण परतूया नाहीतर हॉटेलवाला बिलापोटी अडवून ठेवील असे ते म्हणाले. तेव्हा मी त्यांना ठामपणानं सांगितलं की 'दादा, यशवंतराव चव्हाण दिल्लीत आहेत तोपर्यंत आपल्याला घाबरायचं कारण नाही.' यशवंतरावांनी जनमानसात असा

विश्वास संपादन केला होता.

मराठी चित्रपटांना दिल्लीत सरकारी पारितोषिकं मिळाली होती. बरेच मराठी चित्रपट व्यावसायिक दिल्लीत जमले होते. सर्वांचा मुक्काम पूना गेस्ट हाऊसमध्ये होता. त्याचे मालक श्री. बंडोपंत सरपोतदार हे यशवंतरावांचे स्नेही. त्यांच्यामुळे आम्हाला पंधरा मिनिटे भेटीसाठी वेळ मिळाला. यशवंतरावांच्या बंगल्यावर पोहोचलो तो सौ. वेणूताई चहाफराळाचं तयार ठेवून वाट पाहत होत्या. फराळानंतर यशवंतरावांशी दिलखुलास गप्पा रंगल्या. १५ मिनिटांचा तास कधी होऊन गेला कळलंच नाही. त्यांचा फार वेळ खर्च होऊ नये म्हणून आम्ही उठण्याची चुळबूळ करीत असू तेव्हा 'बसा हो' म्हणून यशवंतरावच आग्रह करीत राहिले. सेक्रेटरीची सारखी ये-जा सुरू झाली तेव्हा यशवंतराव मोठ्या नाराजीने उठले आणि पुढच्या भेटीचे आमंत्रण देऊन आम्हाला निरोप दिला.

ते दिल्लीत होते पण महाराष्ट्रातल्या लहानमोठ्या गोष्टींकडे, घटनांकडे त्यांचे लक्ष असायचे. १९६७ साली माझी आई वारली. त्यांना ते वर्तमानपत्रातून समजले असावे. त्वरित यशवंतरावांचे सांत्वनपर पत्र धावून आले. असा दक्ष आणि जनतेच्या सुखदुःखात धावून येणारा प्रशासक विरळाच !

आक्टोबर ( १९८४ ) मध्ये यशवंतरावांची शेवटचीच भेट. तीसुद्धा फोनवर. फोनवर बोलताना सौ. वेणूताईंच्या मृत्यूचा विषय निघाला. पण त्याबाबतीत मी अधिक हळहळ व्यक्त करण्यापूर्वीच त्यांनी माझा भाचा दिलीप याच्या अकाली निधनाबद्दल माझे सांत्वन सुरू केले. रणजित देसाई आणि सौ. माधवी देसाई यांच्याकडून त्यांना माझ्या भाच्याच्या निधनाचे समजले होते. मोठ्या भावाने धाकट्या भावाला धाकाने सांगावे तसे ते मला प्रकृती सांभाळण्यासाठी सांगत होते. 'तुम्ही महाराष्ट्राची खूप सेवा केली आहे, आता स्वतःला सांभाळा' असं म्हणाले.

मला मात्र संकोचाने शब्दही बोलायला सुचत नव्हता. 'मी कसली सेवा केली आहे ?' असं म्हणताच ते एकदम उद्‌गारले, "अहो, आपली आई, बहीण किंवा वहिनी असावी तर तुमच्यासारखी असं एका चित्रपट अभिनेत्रीबद्दल वाटायला लावणे ही काय समाजाची कमी सेवा आहे ! "

इतक्या श्रेष्ठ दर्जाच्या विचारवंताकडून प्रशस्ती ऐकत असताना जीवनाचं सार्थक झाल्यासारखं वाटलं !

—**सुलोचना ( अभिनेत्री )**

## 'असा माणूस होणे नाही'

यशवंतरावांची व माझी पहिली भेट स्मरते ती १९५८ सालच्या नागपूर येथील कॉंग्रेस अधिवेशनाच्या वेळेची. 'धुळीचे कण' ह्या माझ्या नाटकाचा त्यावेळी प्रयोग झाला होता. यशवंतरावांनी ते नाटक पाहून माझी चौकशी केली आणि भविष्यवाणी उच्चारली.

" हा मुलगा पुढे येणार " यशवंतरावांची व माझी त्यानंतर भेट झाली ती ' रायगडाला जेव्हा जाग येते ' ह्या नाटकाच्या १०० व्या प्रयोगाला. मध्यंतरीच्या काळात यशवंतराव यशाची एकेक पायरी वर चढत होते. पंडित जवाहरलाल नेहरूंच्या चाणाक्ष नजरेने हेरलेला हा ' यशवंत मोहरा ' त्यांनी दिल्लीच्या पदावर नेऊन ठेवला होता. संरक्षणमंत्री यशवंतराव चव्हाण आपल्या धर्मपत्नी सौ. वेणूताई यांच्याबरोबर त्या शतकमहोत्सवी प्रयोगाला हजर होते. नाटक पाहून रंगपटात आल्यावर " वा ! शंभूराजे " म्हणत त्यांनी मला मिठीत घेतले. शब्दांची जरूरच भासू नये इतकी ती कृती बोलकी होती.

यशवंतराव व सौ. वेणूताई त्यानंतर माझ्या ' अश्रूंची झाली फुले ', ' गारंबीचा बापू ', ' मला काही सांगायचंय ', ' इथे ओशाळला मृत्यू ' इ. नाटकांना आवर्जून येत राहिले. मनापासून दाद देत राहिले. कौतुक करत राहिले. माझ्या सगळ्या भूमिका त्यांना आवडल्या असल्या तरी ' रायगड 'मधील माझ्या संभाजीवर त्यांचे अतोनात प्रेम होते. त्यामुळेच यशवंतरावांच्या घराचे दार मला सदैव उघडे असायचे. त्यांच्याकडे मी कधीही गेलो तरी ते प्रचंड कामाचा व्याप, माणसांचा गराडा बाजूला सारून मला एकांतात वेळ देत. मनसोक्त बोलत. अशा तऱ्हेचे अगत्य, आपुलकी त्यांच्या सहवासांत येणाऱ्या सर्वच कलावंतांना, साहित्यिकांना मिळत असे.

यशवंतरावांचा दिल्लीसारख्या दूरच्या ठिकाणी तर किती आधार वाटायचा ! दिल्लीत भरलेल्या मराठी नाट्यसंमेलनाच्या वेळी, घरातील एखादे कार्य असावे, त्याप्रमाणे ते तिथे वावरत. हवे नको पाहत. त्यांच्या बंगल्यावरील चहापानाच्या दिवशी तर मी तिथे पोहोचताच ते लगबगीने उठून पुढे आले, आणि आपल्या खुर्चीवर बसायचा आग्रह करू लागले. त्यांच्या ह्या कृतीने मी पार खजील होऊन गेलो. आणि म्हणालो, ' हे काय सांगता साहेब ! ' त्यावर ते कौतुकाने हसून म्हणाले ' अहो ! तुमचा आज मान आहे. ' कलावंतांची अशी कदर करणारा असा शास्ता दुर्मिळच. त्याच मुक्कामात मला त्वरित मुंबईला परतायचे होते. विमानाचेही तिकीट मिळेना. यशवंतरावांना हे कळताच त्यांनी आपल्या सचिवांना फर्मान सोडले की, सरकारी कोट्यातील तिकिटातून डॉक्टरांच्या तिकिटाची व्यवस्था करा. दिल्लीत कसलीही अडचण आली तरी प्रथम आठवण व्हायची ती यशवंतरावांचीच !

यशवंतरावांचे दिल्लीतील घर पाहुणचारासाठी सदैव खुले असायचे. घरची स्वामिनी नसली तरी ह्या रीतिरिवाजात खंड पडला नव्हता. गेल्याच ऑक्टोबर मध्ये स्वामीकार रणजित देसाई व सौ. माधवी देसाई दिल्लीला त्यांचा पाहुणचार घेऊन परतली. पण ह्या उभयतांना जी प्रकर्षाने जाणवली ती ह्या पहाडासारख्या माणसाच्या आतल्या बाजूला निर्माण झालेली एकाकीपणाची प्रचंड

पोकळी. सौ. वेणूताईंच्या मृत्यूनंतर ते मनाने आणि प्रकृतीनेही खचले. सावली हरवलेल्या माणसासारखी त्यांची अवस्था झाली. वेणूताईंच्या आठवणीवरच ते जगत होते. श्री. रणजित देसाई यांच्याकडे त्यांनी महाराष्ट्रातील मित्रमंडळींची साहित्यिकांची, कलावंतांची अगत्यपूर्वक चौकशी केली. त्यात माझीही आठवण काढली. पुन्हा एकदा माझ्या सर्व भूमिकांची उजळणी केली. देसाई पती-पत्नींच्या तोंडून हे ऐकत असताना माझा जीव गुदमरत होता.

यशवंतराव कलावंतांचे नुसते बोलके चाहते नव्हते तर ते त्यांनी कृती करूनही दाखवून दिले. मृतप्राय होऊ घातलेल्या मराठी रंगभूमीला त्यांनी करमुक्तीचे संजीवन दिले. मराठी नाट्यसृष्टीला पुनः बहर आणायचे अविस्मरणीय कार्य त्यांनी केले. मराठी नाट्यसृष्टी त्यांची याबद्दल सदैव ऋणी राहील. समस्त मराठी नाट्य-व्यावसायिकांनी यशवंतरावांच्या नावाने एक नाट्यमंदिर ह्या महाराष्ट्राच्या राजधानीत उभे करून ह्या कलासक्त नेत्याला मानाचा मुजरा करावा अशी मी सर्वांना विनंती करतो. यशवंतरावांना ही खऱ्या अर्थाने आदरांजली होईल.

थोर मुत्सद्दी, कुशल राजनीतितज्ज्ञ, विद्वत्ता, आणि कलास्वादक मन असे चौफेर व्यक्तिमत्त्व यशवंतरावांना लाभले होते. ज्यांच्यापुढे नतमस्तक व्हावे अशी जी काही मंडळी माझ्या आयुष्यात आली त्यांमध्ये यशवंतराव चव्हाण अग्रक्रमाने आहेत.

—**डॉ. काशिनाथ घाणेकर**

# ५

# कौटुंबिक जीवन आणि शेवटचा प्रवास

# शेवटची भेट

**मो. ग. तपस्वी**

कै. यशवंतराव चव्हाण दिल्लीत आले, तेव्हापासून त्यांचा आणि माझा नकळत एक तार जुळल्यासारखा सुसंवाद निर्माण झाला. आता यशवंतराव इहलोकीचे कार्य आटोपून कायमचे निघून गेले आहेत. त्यांची पहिली भेट झाली २४ नोव्हेंबर १९६२ रोजी. तेव्हा मी आकाशवाणीवरून मराठीतील बातम्या देत होतो. त्यांची शेवटची भेट झाली ती नवी दिल्लीतील आयुर्विज्ञान संस्थेत शनिवार २४ नोव्हेंबर १९८४ रोजी संध्याकाळी ५ वाजता. तेव्हा त्यांचा अखेरचा प्रवास सुरू होऊ पाहात होता. दोन्ही प्रसंगी आमचे थोडेसे बोलणे झाले होते. पहिल्या भेटीत अनोळखीपणाचा किंचित संकोच होता. शेवटच्या भेटीत २२ वर्षांत सतत वाढत गेलेला स्नेह दाटून आला होता. पहिल्या भेटीत ते म्हणाले होते, " वा, वा, तुमचे नाव मी नेहमी ऐकलेले होतेच, आता परिचय झालाय, भेटत चला. तुम्ही मराठी माणसे दिल्लीत महाराष्ट्र राखून आहात. आता मीही दिल्लीत आलो आहे. तुमचं हक्काचं आणखी एक घर दिल्लीत वाढलंय असं समजा. " शेवटच्या भेटीत माझा हात आपल्या दोन्ही हातांत घेऊन आपल्या क्षीण झालेल्या आवाजात म्हणाले होते, " किर्लोस्करच्या दिवाळी अंकातील तुम्ही घेतलेली माझी मुलाखत फारच सुरेख झाली आहे ! " आणि दुसऱ्याच दिवशी यशवंतरावांचे निधन झाले.

या २२ वर्षांत माझ्या अनेक सुखदु:खांच्या प्रसंगी यशवंतराव जातीने हजर राहिलेले मला आठवतात. त्यांच्याही अनेक सुखदु:खाच्या वेळी मीही त्यांच्या घरी जाऊन त्यांच्याशी जिवाभावाच्या चार गोष्टी केल्या आहेत. तो सारा पट, ते सारे प्रसंग बावीसपट वेगाने डोळ्यांपुढून झरझरझर सरकत आहेत. या काळात पत्रकार या नात्याने, व्यक्ती या नात्याने, माणूस म्हणून, त्यांच्यातील बारकावे टिपण्याची संधी मला मिळालेली आहे. त्यांच्यावर टीका करण्याचे प्रसंग अनेक आले आहेत. त्यांच्या अनेक गाजलेल्या मुलाखती मी घेतलेल्या आहेत. ' यशवंतराव : एक मांडलिक ' हा पुण्याच्या ' माणूस ' च्या एका विशेष

अंकातील माझा लेख त्या वेळी बराच खळबळकारक ठरला होता. यशवंतरावांनीही अर्थातच तो वाचला होता. त्यानंतर भेट झाल्यावर आता ते काय म्हणतील याची, नाही म्हटले तरी, थोडी धाकधूक मनात असतानाच मी त्यांना भेटलो. काय म्हणावे या माणसाने? म्हणाले होते, 'माझ्याबद्दलच्या तुमच्या अपेक्षा स्पष्टपणे मांडल्याबद्दल आभार.' माझ्या मनातील सर्व धाकधूक त्यांनी घालवली होती. पण त्याचबरोबर माझी टीका ही त्यांच्यावरील मराठी माणसाच्या प्रेमातूनच आकारली असून त्या प्रेमातून उत्पन्न होणाऱ्या अपेक्षांना आपण कदाचित पुरे पडत नाही एवढेच त्यांनी त्यांच्या शैलीत प्रकट केले होते.

वर 'किर्लोस्कर'च्या दिवाळी-अंकासाठी घेतलेल्या मुलाखतीचा उल्लेख आला आहे. ती मुलाखत ठरवायला गेलो आणि काँग्रेसला आता १०० वर्षे होत आली असल्यामुळे 'काँग्रेस संस्कृती' हा विषय असून हे प्रश्न तयार आहेत, असे मी त्यांना सांगितले. यशवंतराव म्हणाले, "तपस्वी, हा अंक प्रसिद्ध होईल तेव्हा निवडणुकांचे वारे जोरात वाहू लागलेले असणार आहेत. अशा काळात तुम्ही परखड प्रश्न विचारणार. मला त्यांची उत्तरे तितक्याच परखडपणे देता येणार नाहीत. मला खोटे बोलता येणार नाही, खरे सांगताना पंचाईत होईल."

"यशवंतराव, प्रश्न विचारणे माझे कामच आहे. पण त्यांना उत्तरे कशी द्यायची ते तर तुमच्या हातात राहणार आहे ना? शिवाय, तुम्हाला माहीत आहे की तुमचा कोणताही शब्द मी कधीही फिरविलेला नाही की आताही तो तसा फिरवणार नाही. तुमची प्रतिष्ठा मलाही प्यारी आहे, आणि माझी प्रतिष्ठा तुम्हीही जाणताच." "ठीक आहे, शुक्रवारी सकाळी नवाला भेटू, देतो मुलाखत." बुधवारी मला एकाएकी सडकून ताप भरला. तो गुरुवारी रात्री उतरला. यशवंतरावांना वेळ आणि शब्द पाळण्याचे भान फार असे. म्हणून तशाही परिस्थितीत मी शुक्रवारी सकाळी पावणेनवालाच त्यांच्या बंगल्यावर पोचलो. यशवंतराव माझी वाट पाहात बसले होते. म्हणाले, "लवकर आलाहात, तर लवकर संपवून-टाकू या." आणि ही मुलाखत फारच सुरेख झाली आहे असे मला आवर्जून सांगण्याचे भानही त्यांनी जवळजवळ मरणासन्न अवस्थेतही राखले होते.

हिमालयाच्या रक्षणाला सह्याद्री धावून आला तेव्हाचे यशवंतराव, पं. नेहरूंचे निधन झाले तेव्हाचे यशवंतराव, लालबहादुर शास्त्री यांच्या बरोबर संरक्षणमंत्री या नात्याने १९६५ चे पाकिस्तानशी झालेले युद्ध जिंकून ताश्कंद-वाटाघाटीसाठी

गेलेले यशवंतराव, शास्त्रींचे पार्थिव शरीर ताश्कंदहून घेऊन आलेले यशवंतराव अशी त्यांची मजल-दर मजल तेजाळतच गेलेली नाना रूपे मी जवळून न्याहाळलेली आहेत. त्या वेळेपासूनच उद्याचा पंतप्रधान असे एक मोठे वलय त्यांच्या भोवती निर्माण झाल्याचेही मी आणि येथील अनेक पत्रकारांनी पाहिलेले आहे. त्यानंतर ते भारताचे गृहमंत्री झाले आणि सरदार पटेलांच्या जागी विराजमान झाले, तेव्हा सर्वांनाच आता ते क्रमांक २ वर पोहोचले असून योग्य वेळी क्रमांक १ वर पोहोचणे हा आता फक्त काळाचाच प्रश्न उरला आहे असे वाटले होते. ते गृहमंत्री असताना पंजाबात फत्तेसिंगांनी आमरण उपोषण आरंभिले होते. शीख बांधवांनी आंदोलन उभे केले होते. त्यांना पंजाबी सुबा हवा होता. मुख्यमंत्री घाबरले होते. त्यांना बाहेर तोंड काढणे अवघड झाले होते. ते यशवंतरावांचा सल्ला घ्यायला आले, तेव्हा मी योगायोगाने त्यांच्याशी बोलत बसलो होतो. मी एक पत्रकार असूनही यशवंतरावांनी मला तेथेच बसू दिले हा त्यांचा माझ्यावरील विश्वास. तो मी शेवटपर्यंत राखला. त्यातील बातमीचा भाग सोडून एक हृद्य प्रसंग सांगतो. यशवंतरावांनी त्या मुख्यमंत्र्याचे सर्व म्हणणे ऐकून घेतले. नंतर ते त्याला म्हणाले, "मित्रा, लोकांपासून पळू नकोस. जे लोक आज तुला खेटरांच्या माळा घालू पाहात आहेत, तेच तुला उद्या फुलांचे हार घालायला येतील हे लक्षात ठेवून वाग." मुंबईतील संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या वेळी काळ्या घोड्यावर अशाच बेफाम जमावाला याच भावनेने यशवंतराव एकेकाळी सामोरे गेले होते. दिल्लीतील पोलिसांचे आंदोलन त्यांच्या बंगल्यावर मोर्चा घेऊन आले असता सल्लागारांचा सल्ला अव्हेरून गृहमंत्री यशवंतराव त्यांना आपल्या बंगल्याबाहेरील फाटकाशी सामोरे गेले होते. पंजाबी मित्राला ते अनुभवाचे बोलच सांगत होते. यशवंतरावांपेक्षाही अंगापिंडाने धिप्पाड असलेल्या त्या पंजाबी माणसाने यशवंतरावांना अगदी पायाला हात लावून नमस्कार केला हे मी पाहिले. धैर्याचा हिमालय लोकांशी समरस झालेल्या त्या लोकसह्याद्रीच्या पायाशी वाकला होता.

पण असे एकामागून एक दिग्विजय करीत निघालेल्या यशवंतरावांची गेल्या दशकातील वाटचाल मात्र चक्रव्यूहात सापडलेल्या अभिमन्यूसारखी झाली. गृहमंत्रिपदावरून त्यांची उचलबांगडी झाली त्यापूर्वीचा प्रसंग. यशवंतरावांच्या बंगल्याच्या मागच्या हिरवळीवर आम्ही दोघेच फेऱ्या घालीत बोलत होतो. जास्त बोलणे

अर्थातच माझे होते. मी काहीसा वैतागलो होतो, थोडासा संतापलोही होतो. माझा प्रश्न होता, " यशवंतराव मला सांगा, उद्या तुम्हाला अगदी कुटुंब कल्याण खात्याचा मंत्री केले तरी तुम्ही त्याला होच म्हणावे एवढी लाचारी तुम्ही का दाखवायला निघाला आहात ? तुम्हाला काय साधा खासदार राहताच येणार नाही ? सातार्‍याच्या लोकांनी तुम्हाला काय मंत्रिपदावर राहण्यासाठीच निवडून दिले आहे ? आणि असा एकामागून एक अवमान सोसत लाचार होऊन राहण्यापेक्षा तुम्ही राजीनामा देऊन आपल्या गावी जाऊन वकिली नाहीतर मास्तरकी सुरू केलीत तर काय बिघडणार आहे ? "

यशवंतरावांनी माझा खांदा थोपटला आणि त्यावर हात टाकून फिरत असतानाच म्हणाले, " पण मला गृहमंत्रीच राहू द्या, नाहीतर हा घ्या माझा राजीनामा, असे मी म्हटले, तर पदासाठी, विशिष्ट हुद्द्यासाठीच मी इंदिराबाईंबरोबर आलो, असा प्रचार सर्व सरकारी माध्यमे माझ्याविरुद्ध करतील, त्याचे काय ? "

" यशवंतराव, माफ करा, पण कोणतेही पद मिळाले तरी चालेल पण मला मंत्रिमंडळात राहू द्या असे म्हणण्याइतके यशवंतराव लाचार झालेले आहेत असे मराठी मनाला वाटेल त्याचे काय, हा खरा प्रश्न आहे. "

" तुमच्यासारखेच कळकळीने अनेकांनी मला लिहिलेले आहे. " एवढेच यशवंतरावांनी त्या वेळी म्हटले. सगळे संभाषण देण्याचे हे स्थळ नव्हे. पण त्यानंतर झाले ते मात्र हेच की तेव्हापासून यशवंतरावांचे पुढचे सारे दान दिल्लीच्या राजकीय सारीपटावर उलटेच पडत केले. बाजू त्यांच्यावर उलटतच गेली. १९६९ साली त्यांच्या हातून घडलेली एकच चूक त्यांना पुढील काळात सतत चुकीच्याच मार्गाने या चक्रव्यूहात जास्तच खोल खोल बुडवीत गेली. १९६९ मध्ये काँग्रेसच फुटली नाही, तर सारे राजकारणच कुशीमुशीसह बदलून गेले. राजकारणाचा पिंड बदलला, त्याचा धर्म बदलला, त्याची प्रकृती बदलली, त्याची प्रवृत्तीही बदलून गेली. त्याबरोबर यशवंतरावांना बदलता आले नाही. बदलता येणे शक्यही नव्हते. गेल्या दशकात म्हणूनच यशवंतरावांचा राजकारणात विलक्षण कोंडमाराच होत गेला.

सत्तेच्या राजकारणात यशवंतरावांचे नाव क्षितीवर पोचले असतानाच त्यांना तेथून खाली खेचण्याचे डावपेच दिल्लीत सुरू झाले. इंदिराबाईंसारख्या जबरदस्त आणि एकदम तडकतोड निर्णय घेण्यात पारंगत असलेल्या नेतृत्वापुढे, सर्वांना

घेऊन चालण्याचे, दूरगामी आणि पक्षनिरपेक्ष राष्ट्रकारण करण्याचे बाळकडू प्यालेले यशवंतरावांचे नेतृत्व थिटे पडू लागले. राजकारण हे अखेर सत्तेसाठीच असते असे नेहमीच ठासून सांगत आलेले यशवंतराव दिल्लीत तशी संधी आली असताना त्याच सत्तेच्या राजकारणाचे सर्वांत मोठे बळी ठरले. मग आज त्यांचे गोडवे गाणारे लोक, ते मधल्या काळात जेव्हा इंदिराबाईंबरोबर नव्हते तेव्हा त्यांना नाही नाही त्या शिव्यांची लाखोली वाहण्याची अहमहमिका लावताना दिसू लागले. त्यांना कलंक म्हटले गेले. आणि आज ? कुठे आहेत ती माणसं ? आज इंदिराबाई नाहीत. प्रचंड मनस्ताप सोसून, कोंडमारा सहन करून पुन्हा 'स्वगृही' यायला निघालेल्या यशवंतरावांना महिनोगणती दाराबाहेरच्या उंबरठ्या-वरच तिष्ठत ठेवणारे ते नेतृत्व संपले. नवे नेतृत्व पुन्हा यशवंतरावांची कदर करू लागले होते. पण तरीही इंदिराबाईंबद्दल नेहमीच कमालीचा आदरच व्यक्त करणारे यशवंतरावही आता आपल्यात नाहीत. पण स्पष्ट आहे ती एक गोष्ट, की एकदा तत्कालीन सिंडिकेटच्या बरोबर राहण्याचा निर्णय घेतल्यामुळे इंदिराजींच्या मनातून यशवंतराव जे उतरले होते ते पुन्हा काही पहिल्यासारखे इभ्रतीने त्यांच्या मनात पुन्हा स्थानापन्न झाले नाहीत. आणीबाणीसारख्या अतिशय अवघडलेल्या काळातही यशवंतरावांनी इंदिराजींचीच साथ धरली, तरीही तो विश्वास काही पुन्हा आला नाही. दिल्लीतील अत्युच्च सत्तावर्तुळात यशवंतरावांबद्दल दुस्वास, दुरावा, अविश्वास कायमच राहिला. मग यशवंतराव पुन्हा काँग्रेस फुटली तेव्हा इंदिराजीं-विरुद्ध गेले, निवडूनही आले, तरीही 'बूंद से गई वह हौद से वापस नहीं आई.'

सत्तेच्या राजकारणाचा पिंड बदलून गेला. यशवंतराव आपल्या जुन्या संस्कारांनी जुन्या निष्ठांची·शस्त्रे घेऊन तगून राहण्याचा प्रयत्न करताना जिकिरीला आले. टेकीला आले. परत इंकांत दाखल झाले. पण पुन्हा ती रया आली नाही. तशातच वेणूताई गेल्या. पुत्रासारखा वाढवलेला पुतण्या डॉ. विक्रमही गेला. यशवंतराव पार खचले. बदललेल्या राजकारणाच्या दमछाकीच्या लढाईत यशवंतराव केविलवाणे झाले. यशवंतरावांचा दिल्लीतील हा असा उदयास्त आता राष्ट्राच्या मर्मबंधातील गाथा बनून गेला आहे. मला वाटते राष्ट्राच्या मर्मबंधातील एक अतिशय आर्त नेता म्हणून यशवंतरावांची आठवण दिल्लीतील राजकारणाचा नि:पक्ष इतिहास लिहिला जाईल तेव्हा प्रकर्षाने लिहिला जाईल. किंबहुना ती आता आपली अमरगाथा झालेली आहे. कर्तव्यकठोर असतानाही कनवाळू,-

राजकारणात रमत असतानाही कमालीचा रसिक, कार्यक्रमाधिष्ठित राजकारणावर प्राणाहून जास्त प्रेम करणारा नेता, अतिशय सद्विवेकी आणि सदाचारी मित्र, राजकारणाहूनही आपल्या शब्दपालनाचे मर्म पाळणारा नेता, लोकसंग्रही आणि सतत इतरांचे कल्याणच चिंतिणारे मन असलेला माणूस असे नाना पैलू घेऊन यशवंतरावांचे व्यक्तिमत्त्व आणि नेतृत्व फुलले होते. अशा •जीवनाची दिल्लीच्या राजकारणात अखेरीस शोकांतिका झाली असेल तर ती संपूर्ण राजकारणाचीच शोकांतिका आहे, हे यशवंतरावांच्या निधनामुळे गोळा झालेली आंसवे संपल्यानंतर स्वच्छ झालेल्या प्रत्येक राष्ट्रहितैषी दृष्टीला नक्की जाणवेल.

# श्रीपाद डोंगरे आणि ‘ साहेब ’

ॲड. ग. नी. जोगळेकर

मुंबईमधील त्या लक्ष्मी-नारायण मंदिरातील भव्य सभागृहात त्या प्रसन्न सकाळी प्रसन्न वदनाची शेकडो स्त्रीपुरुष मंडळी रंगीबेरंगी उंची वस्त्रे परिधान करून उभी होती. मधूनच इकडे तिकडे हिंडत होती. आपणास हवी असलेली माणसे शोधत होती. अत्तराचे फवारे कुणी हौसेने उडवीत होता. मी पुण्याचा. मला वाटे प्रत्येकास नमस्कार करून स्वागत करावे आणि खुर्चीवर-अथवा-कोचावर बसा म्हणावे. पण त्याची इथे विशेष पर्वा नव्हती. आज डोंगऱ्यांची मुलगी ज्योत्स्ना हिचा विवाह समारंभ होता. मुलीचा सख्खा मामा या नात्याने मी उपस्थित होतो. मंचकावर धार्मिक विधी चालू असतानाच मुहूर्त वेळ आली आणि बाहेर पोलिसांच्या शिट्या ऐकू आल्या. “ साहेब आले—साहेब आले ” असे सारे सभागृहच बोलते आहे असे वाटले आणि चव्हाणसाहेब हसत हसत, नमस्कारांचा स्वीकार करीत करीत आपल्या प्रथम रांगेतील कोचावर आले. त्यांच्या उजव्या बाजूस मुख्यमंत्री वसंतराव नाईक बसले आणि तेवढ्यात गर्दीतून वाट काढीत डोंगरे बाळासाहेब देसाईंना घेऊन आले. मोठ्या आदबीने त्यांना साहेबांच्या डाव्या हाताची जागा दाखवली आणि बाळासाहेब स्मित हास्य करीत बसले. साहेबांनी डोळ्यांच्या कडेने डोंगऱ्यांकडे पाहिले आणि क्षणभर निर्विकार-पणे साहेबांकडे पाहत डोंगरे गर्दीत मिसळून गेले.

श्री. बाळासाहेब देसाईंनी मंत्रिपदाचा अचानक राजीनामा दिला आणि ते मुंबईतून निघून गेले. त्यानंतर त्यांची आणि साहेबांची सहा महिन्यांनंतर पहिल्यां-दाच गाठ पडत होती. अनोळखी पण गुणी माणसांना साहेबांच्या सहवासात नेऊन सोडणे, जिवलग स्नेह्यांच्या वारंवार साहेबांशी गाठी पडतील असे पाहणे आणि समज-गैरसमजाने दुरावलेल्या, दुखावलेल्यांना मोठ्या खुबीने आणि कष्टाने पुन्हा जवळ आणून बसवणे ही सारी कामे डोंगरे कमालीच्या सावधगिरीने करीत असत. ते जेव्हा एखाद्या व्यक्तीची गाठ-भेट टाळीत असत तेव्हा ती व्यक्ती आपल्या हिताची नाही असा साहेबांचा पूर्ण भरवसा असे. दोन शरीरे पण एक

मन, विविध विचार पण एक निर्णय असा हा सुंदर संगम होता. दोघेही त्या बाबतींत निःशंक, निर्भर होते. त्या समारंभात शेकडो लोक भराभर फ्लॅश उडवीत होते. पण दुसऱ्या दिवशी सकाळी धनंजय—त्यांचा मुलगा—वर्तमानपत्र पाहत असताना डोंगऱ्यांनी नुसते विचारले, आहे ना ? आणि तोही खुणावतो ' हो. ' मी पाहिले तर वर्तमानपत्रात पहिल्या पानावर तिघांचा एकत्र बसलेला फोटो होता. आणि ' या विवाहप्रसंगी सहा महिन्यांनंतर पहिल्यांदाच त्यांची भेट झाली ' असा मजकूर होता.

डोंगरे गुजराथमधील धरमपूर संस्थानमधले -- कोकणस्थ ब्राह्मण कुटुंबातले— त्यांचे वडील तिथल्या दरबारचे पशुतज्ज्ञ होते. स्टेनोग्राफर होऊन डोंगरे नोकरीची प्रतीक्षा करीत असतानाच मुंबईच्या गव्हर्नरकडील एका खाष्ट युरोपियन सेक्रेटरीच्या हाताखाली कुणी जाणार का अशी विचारणा झाली आणि डोंगरे मुंबईस आले. अतिशय नियमितपणा, स्वतःच्या कामातील सुबकता, कष्टाळूपणा, गुजराथी धाटणीचे वागणे आणि चेहऱ्यावरील मोहकता यामुळे डोंगरे सरकारी नोकरीत टिकले आणि मुरारजी देसाई हे गृहमंत्री असताना टोणपेकाका, देसाईभाई तसे डोंगरे तिसरे पी. ए. झाले. यशवंतराव चव्हाण नावाचा एक तरुण त्या वेळी राजकारणाच्या क्षितिजावर दिसू लागला होता. तो मोरारजींच्या घरी अथवा कार्यालयात आल्यावर मोरारजींची गाठ पडण्यापूर्वी डोंगऱ्यांशी गप्पा मारीत बसे. आपल्या अंगच्या गुणांनीच हा तरुण मंत्रिमंडळातही येऊन महाराष्ट्राच्या राजकारणात चर्चेचा विषय झाला.

असं म्हणतात की मोरारजींना जेव्हा मुख्यमंत्रिपदावरून दिल्लीस केंद्रीय मंत्रिमंडळात नेले गेले तेव्हा महाराष्ट्रातील हालचालींची खडानूखडा माहिती राहावी या हेतूने त्यांनी डोंगऱ्यांना मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयातच ठेवले. चव्हाणसाहेब मुख्यमंत्री झाले आणि त्यांनी त्यांच्या ब्रह्मे नावाच्या पी. ए. ना सह्याद्रीवर राहण्यास येता का विचारले. ब्रह्मे यांना चोवीस तास बांधिलकी सोसणार नव्हती. मग डोंगऱ्यांना विचारले आणि क्षणाचाही विलंब न लावता डोंगरे ' हो ' म्हणाले आणि सह्याद्रीवरील औटहाऊसमध्ये राहण्यास आले.

पहिल्या पहिल्यांदा गडबड झाली. एकदा सकाळी डोंगरे बंगल्यातून घरी जेवण्यास आले आणि इकडे गाड्या बरोबर ठरल्यावेळी सचिवालयात जाण्यासाठी सुटल्या. एकदोन समारंभांस गाड्या गेल्या तर समारंभाचे ठिकाण सापडण्यास

वेळ लागला. पहाऱ्यावरचे पोलिस शिस्त पाळेनात. म्हणायचे ' आम्ही साहेबांच्या गावचे आहोत. ' पण साहेबांनीच सांगितले की घरच्या मंडळींची राज्यकारभारात लुडबूड चालायची नाही आणि मग सारे काही शिस्तीत चालू झाले. सकाळी सह्याद्रीवर भेटण्यास येणारी खास मंडळी डोंगऱ्यांच्या घरी येऊन बसत. छगला-साहेब येऊन बसत आणि सातआठ वर्षांच्या ज्योत्स्ना-धनंजयशी गप्पा मारीत.

बहुजन समाजातील मुख्य मंत्री मिळाला म्हणून महाराष्ट्रात आनंदीआनंद झाला. खेडोपाडींची माणसे येऊ लागली. आमंत्रणे देऊ लागली. महाराष्ट्राचा चेहरा-मोहरा आता बदलणार याची नांदी वाजू लागली. ह्या प्रचंड वेगाने आव्हान देणाऱ्या प्रगतीच्या लाटांचा पुरेपूर उपयोग करून घेण्यासाठी डोंगरे जिवाचे रान करू लागले. सकाळी पाच-सव्वापाचला फोन सुरू होत. स्नान, पूजा, फराळ, कपडे करणे या सर्ववेळी लांबलचक वायर असलेला फोन ते सगळ्या घरात घेऊन फिरत. रात्री १० वाजता घरी परत आल्यावर कागदपत्रे काढून बसत आणि बारा वाजेपर्यंत गावोगावचे ट्रंककॉल स्वीकारत आणि काम करीत झोपी जात. प्रचंड मानसिक समाधानात दोन माणसे मशगुल होती.

साहेबांचे लहानपण गरिबीत गेले. उमेदीच्या मनास परिस्थितीचे चटके कसे भाजून काढतात हे त्यांनी अनुभवले होते. नुसते साध्या राहणीने जगायचे तरी अशा वेळी किती माणसांचे उपकाराचे ओझे घ्यावे लागते हे त्यांनी पाहिले होते. एक ध्येयवेडा तरुण अंगचे कर्तृत्व देशकारणी वाहण्यासाठी धडपडत असता कौटुंबिक आपत्ती किती छळतात, राष्ट्राचा गाडा पुढे ढकलावा म्हणून सारे बळ एकवटून त्या कार्यात झोकून देऊन काम करणाऱ्या तरुणाच्या घराची आढीच कशी कोसळतात, जग भले पार्लमेंटरी सेक्रेटरी म्हणो पण घरच्या दिवंगत भावांच्या कच्च्याबच्च्यांची आणि स्त्री कुटुंबियांची जबाबदारी एका भाच्याच्या पगारावर निभावून नेली जात आहे ही भयंकर जाणीव त्यांना अस्वस्थ करी.

चव्हाणसाहेब जवळजवळ पंचवीस वर्षे सत्तेवर होते. या काळात समाजातील पददलित वर्गातील, आर्थिकदृष्ट्या गरिबीतील कुणीही तरुण माणूस त्यांच्याकडे आला तर त्यांना अपार सहानुभूती वाटे. त्याचे कारण हेच असावे की परिस्थितीच्या फुफाट्यात होरपळून निघणारा तरुण हा उद्याच्या जनतेच्या आशा-आकांक्षा पुऱ्या करणारा होऊ शकतो हे सत्य त्यांनी अनुभवले होते. त्यामुळे मला इतक्या थरातील तरुण-प्रौढ माणसे भेटतात, साहेबांचा विषय निघाल्यावर

ते म्हणतात माझ्यावर कुणावर नसेल एवढा जीव साहेबांचा होता. ते माझ्या एकट्याशीच मोकळेपणाने बोलत. डोंगऱ्यांचेही एक तत्त्व होते. आलेल्या माणसास त्याचे म्हणणे ऐकून घेतले गेले आहे असे समाधान मिळाले पाहिजे—मग त्यासाठी स्वतःच्या सोयी-गैरसोयीचा विचार गौण.

सह्याद्रीवरील वास्तव्यातच डोंगरे हे चव्हाणसाहेबांचे नुसते पी. ए. न राहता चव्हाण कुटुंबियांत मिसळले गेले आणि डोंगरे काका आणि डोंगरे वहिनी ही दोन माणसे चव्हाण कुटुंबियांची अविभाज्य घटक झाली. आता पुतणे आणि पुतण्या 'काका' पेक्षा डोंगरे काकांच्याच मागे मागे राहू लागली. याच काळात डोंगरे यांनी त्यांची निष्ठा साहेबांना मनोमन वाहिली. मोरारजींच्या घरचा माणूस आता साहेबांनी आपलासाच करून टाकला. डोंगरे स्वामिनिष्ठ होते यात शंकाच नाही, पण त्यांच्या निष्ठेचे मोल जपणारा स्वामी त्यांना मिळाला हे महद्‌भाग्य. साऱ्या महाराष्ट्रभर हिंडताना चोवीस तास डोंगरे साहेबांच्या बरोबर राहिले. साहेबांच्या कपड्याची बॅग भरणे, कामाचे कागद जपून नेणे, जायच्या गावी कुणास भेटायचे, कसे भेटायचे हे सारे ते ठरवू लागले. पुढेपुढे माणसे डोंगऱ्यांनाच भेटू लागली.

अशा गाठी बंगल्यावर होतच असत, पण त्याहीपेक्षा सार्वजनिक सभा-समारंभांत होत. समारंभाच्या ठिकाणी पोहोचेपर्यंत डोंगरे साहेबांच्या आसपास असत. पण ते अशा बेताने की छायाचित्रकारांना त्या दोघांचा फोटो एकदम घेता येत नसे. एकदा साहेब व्यासपीठावर गेले आणि त्यांनी आवश्यक ती कागदपत्रे चाचपून पाहिली की डोंगरे पार टोकाला उभ्या असलेल्या मोटारींच्या ताफ्या-जवळ जात आणि मग कामे घेऊन आलेली माणसे भेटण्यास सुरुवात होई. अशा वेळची खेळीमेळीची वागणूक आणि बोलण्यातला मोकळेपणा मोठा मोहक असे. मग कोणते काम होईल कुठले होणार नाही, साहेबांना आताच भेटावे का नाही—एखादा विषय केव्हा काढावा—हे सारेजण डोंगऱ्यांना विचारत. कारण आता अद्वैत उभे ठाकले होते. निर्णय समान होतो याचा अनुभव साऱ्यांना येत होता. डोंगरे गेल्यावर खा. दंडवते यांनी साहेबांना सांत्वनपर पत्र लिहिले आहे, त्यात ते म्हणतात, 'एकदा आपण माझी डोंगऱ्यांशी ओळख करून दिलीत आणि पुढे अडचणीच्या वेळी त्यांनीच माझी कामे परस्पर करून टाकली.'

काही वेळेस परीक्षेचे क्षण अवचित येत. लंडनमध्ये लोकमान्यांचे स्मारक करावयाचे म्हणून निधी गोळा करण्यास एक गृहस्थ लंडनहून भारतात आले होते. साहेब त्या वेळी काँग्रेसचे कोषाध्यक्ष होते. " पुण्याच्या गडबडीच्या भेटीत गाठ घेऊन उपयोग नाही " असे डोंगरे त्यांना म्हणाले. त्या गृहस्थांनी साहेबांना खाजगी पत्र धाडले व 'डोंगऱ्यांची माझ्याकडून काही अपेक्षा असल्याने ते आपली भेट होऊ देत नाहीत ' असे लिहिले. मग त्यांना मुंबईचे भेटीचे आमंत्रण आले. ते हॉलमध्ये येऊन बसल्यावर साहेबांनी, " डोंगरे, यांचे ते पत्र आणा हो " असे सांगितले. त्या गृहस्थांचा चेहरा पाहण्यासारखा झाला. साहेबांचे यच्चयावत सर्व टपाल डोंगरे प्रथम फोडून पाहात असत. त्यात त्यांच्या स्वतःवर काही आरोप असतील तर ते पत्र आवर्जून साहेबांकडे जात असे. असा विश्वास ! साहेबांची माणसे पारखण्याची आणि त्यांवर विश्वास टाकण्याची हातोटी वाखाणण्यासारखी होती यात काही शंकाच नाही.

महाराष्ट्रात प्रगतीची पहाट उजाडली. गरीब आणि श्रीमंत, सुशिक्षित आणि अशिक्षित, शहरातला आणि खेड्यातला, शेतीवरचा वा गिरणीतला, धंदेवाला आणि व्यावसायिक सारे म्हणू लागले, चव्हाणसाहेब आमचे आहेत. याच वेळी चव्हाणसाहेबांची आणि माझी पहिली गाठ झाली पुण्याच्या सर्किट हाऊसवर. मी लहानपणापासून संघात वाढलेला. त्यामुळे पश्चिम महाराष्ट्रातील संघस्वयंसेवकांच्या मनात असलेली मुसलमानधार्जिण्या काँग्रेसबद्दलची अढी माझ्याही मनात होती. केसरीमध्ये " कॉलेज विद्यार्थी असे का वागतात ? " असा माझा लेख आला होता. साहेबांनी मला तेवढ्यासाठी बोलावले होते. मी त्या मोठ्या हॉलमध्ये गेलो तो साहेब समोरच कोचावर बसलेले दिसले. " या, या, जोगळेकर " म्हणाले. मी अदबीने लांबच्या कोचावर बसलो तर मला म्हणाले, " इथे माझ्या शेजारी या आणि घरात थोरल्या भावाशी जितक्या मोकळेपणाने बोलाल तसे बोला. " मग पंधरा मिनिटे मी माझे मुद्दे सांगितले आणि त्यांनीही तितक्याच तत्परतेने प्रत्येक प्रश्नावरचे मत सांगितले.

महाराष्ट्रातील सर्व भागात यशवंतराव हे नाव सर्वतोमुखी होऊ लागले तो दिल्लीचे बोलावणे आले. परिस्थिती चमत्कारिक होती. साहेबांनी डोंगऱ्यांना विचारले. डोंगऱ्यांनी सासऱ्यांना म्हणजे माझ्या वडिलांना–बाबांना–विचारले. "ते तिथे आपण " असा निरोप बाबांनी दिला आणि डोंगरे दिल्लीत आले. 'सह्याद्री'-

ऐवजी ‘ १ रेसकोर्स ’ हे नामाभिधान आले. संरक्षण, गृह, वित्त, परराष्ट्र अशी खाती बदलत गेली, पण कामाचा खाक्या तोच राहिला. डोंगऱ्यांची मुले शिक्षणासाठी बाबुलनाथ मंदिराजवळ एका जागेत आली आणि त्यांची आजी नातवंडांचे कौतुक करीत तिथली जबाबदारी सांभाळू लागली. चव्हाणसाहेबांची आई रिव्हेरावर राहिली आणि त्यांचे मेव्हणे–वेणूताईंचे सख्खे बंधू–बाबासाहेब मोरे ह्यांनी व त्यांच्या कुटुंबियांनी आईंची सेवा मनोभावे अखेरपर्यंत केली. याबद्दल साहेब नेहमी गौरवोद्गार काढीत.

दिल्लीतील निवासस्थानी कार्यालयात असताना डोंगरेसाहेब आणि घरात आले की डोंगरेकाका अशा भूमिका असत. सौ. वेणूताईंचा कामाचा उरक आणि येणाऱ्याजाणाऱ्यांची देखभाल करण्याची हातोटी वाखाणण्यासारखी होती. डोंगऱ्यांवर त्यांचा पूर्ण विश्वास आणि लोभ होता. वेणूताईंच्या आवडी-निवडी डोंगऱ्यांना समजलेल्या होत्या. पुण्यात आले तर कुठल्या बेकरीतील बिस्किटे घ्यावी, तुळशीबागेतली कुठली वस्तू त्यांना आवडेल, हिंद साडी सेंटरमधील कुठली साडी आवडेल हे सारे त्यांना माहीत. सरळ खरेदी करून घेऊन जात आणि त्यांची पारख खरी ठरे.

दिल्लीतील महाराष्ट्रीय मंडळींना अनेक वर्षांनी–काका गाडगिळांच्या नंतर–आपला माणूस आल्याचे समाधान झाले. १९७० साली–म्हणजे ज्योत्स्नाच्या लग्नाच्या वेळी–बाबुलनाथच्या घरी साहेब, बाईसाहेब भोजनास आले होते. एका शेजाऱ्याच्या ब्लॉकमध्ये बसण्याची सोय होती. शरद पवार, तळवलकर आदी मंडळी होती. डोंगऱ्यांनी मला तिथे नेऊन ‘ हे शोभनाचे भाऊ ’ असे सांगितले. मी करसल्लागार म्हणून व्यवसाय करतो हे कळल्यावर त्यांनी इन्कमटॅक्सबद्दल माझे मत विचारले. साहेब त्या वेळी अर्थमंत्री होते. मी त्यांना पंधरा मिनिटे त्या कायद्यातील अन्यायकारक तरतुदी सांगितल्या. मोरारजींच्या हटवादीपणाने त्या कायद्यातील दंडाच्या तरतुदी म्हणजे न्यायाची थट्टा चालली आहे असे सांगितले. “ सगळे नंतर लेखी पाठवा ” म्हणाले. त्याप्रमाणे मी पाठवले. मग साहेबांनी डोंगऱ्यांना सांगितले की जोगळेकरांना दिल्लीत बोलवा. मी गेलो. चार दिवस राहिलो. माझी कामाची पद्धत त्यांना आवडली आणि मी त्यांचा झालो.

पुण्यात साहेब आले की विमानतळापासून ते परत जाईपर्यंत त्यांच्याबरोबर राहणाऱ्या रामभाऊ जोशी, शामराव पवार, अशोकराव, एस. के. कुलकर्णी,

भा. द. खेर यांच्याबरोबर माझी एक भर पडली. चव्हाण परिवारात मी दाखल झालो. वर्षातून एकदा दिल्लीत डोंगऱ्यांच्याकडे राहून बंगल्यातील ऑफिसात काम करू लागलो. १९७३ साली मी जनसंघाच्या तिकिटावर पुणे महानगरपालिकेत निवडून गेलो. मी विचारले, "आता माझ्यावर जनसंघाचा शिक्का पडला, तरी यंदा दिल्लीस यावे का नाही?" साहेब म्हणाले, "त्याचा याचा काय संबंध?"

एकोणीसशे सत्याहत्तरच्या मे महिन्यात मी दिल्लीस गेलो तेव्हा डोंगऱ्यांची प्रकृती बरी नव्हती. पोटात जड वाटे. पायावर सूज होती. जलोदराचा संभव होता. साधे चहाचेही व्यसन नसलेल्या डोंगरेसाहेबांवर हा भलताच आघात होता. ते तयार नसतानाही मी त्यांना मुंबईला घेऊन आलो. नंतर सहा महिने अतिशय अस्थिरतेचे, कठीण गेले. धड बसता येत नाही, धड झोपता येत नाही अशा अवघडलेल्या स्थितीत डोंगरे आजाराशी लढत होते. ते गेले त्याच्या आधी दोन दिवसाची गोष्ट. कुणीतरी निरोप दिला–साहेब भेटायला येणार आहेत – दिल्ली–पुणे प्रवासात मधेच येणार आहेत. त्या भयंकर आजाराने काळवंडत चाललेल्या चेहऱ्यावर एकदम तजेला आला. त्यांनी तोंड धुऊन घेतले, अंगात नवीन मॅनिला घातला. अंगावर अत्तर-गुलाबपाणी शिंपडून घेतले आणि ते साहेबांची वाट पाहू लागले. थोड्या वेळाने निरोप आला–'प्रोग्रॅम कॅन्सल झाला' आणि डोंगरे त्याही स्थितीत माझ्याकडे पाहून विषण्णपणे हसले. प्रोग्रॅम ठरणे आणि ऐनवेळी कॅन्सल होणे ह्याची किती पारायणे आपण केली याची कदाचित त्यांना आठवण झाली असावी.

त्याच दिवशी पहाटे चारचा सुमार होता. त्या हॉलमध्ये मिळेल त्या जागी – मिळेल तशा स्थितीत – नातेवाईक आणि मित्रमंडळी झोपली होती. डोंगरे श्रांत होऊन तक्क्यावर डोके ठेवून होते. "काय विचार करताय?" मी विचारले. "यशवंतरावांची शान वाढवावी म्हणून अपरंपार कष्ट केले – पण शेवटी थोडक्यात हुकले." – असे म्हणाले आणि त्यांना सावरण्यासाठी पुढे केलेल्या हातावर त्यांच्या डोळ्यांतले अश्रू पडले. डोंगऱ्यांचे एक स्वप्न अधुरेपणी भंगले होते. ते पुरे होते आणि असा प्रसंग येता तर ते सुखाचे अश्रू झाले असते.

त्यानंतर पाच-सहा वर्षे मी दिल्लीत गेलो की साहेबांच्या घरी त्यांचा पाहुणा म्हणून राहू लागलो. त्यांनीच मला पुण्यात फोन करून सांगितले होते की,

आता आमच्याच घरी उतरायचे. मी येणार असलो की घरी स्वयंपाकघरात कांदा लसूण वर्ज्य असल्याचे सांगितले जाई. मी गेलो की मला गडी-गाडी नेण्या-आणण्यास येई. जाऊन पोहोचलो की साहेब आणि बाईसाहेब दोघेही खोलीत येऊन चौकशी करीत. आईची प्रकृती—मुलांच्या अभ्यासाची चौकशी—डोंगऱ्यांच्या धनंजय-ज्योत्स्ना-वहिनींची चौकशी. काम संपल्यावर एक दोन दिवस राहा, जरा गप्पा मारू असे म्हणायचे. धर्मशास्त्र, काव्य, वाङ्मय, लेखक-कवी-राजकारण-समाजकारण सर्व काही निघे आणि तासन्‌तास गप्पा होत.

मी साहेबांपेक्षा कितीतरी लहान आणि नवखा. पण त्यांची साध्या भाषेतील पत्रे मनाला भिडायची. जुलै ८३ मध्ये त्यांनी मला लिहिले,

" प्रिय श्री. जोगळेकर यांसी

स. न. वि. वि.

येथे आल्यापासून तुम्हाला पत्र लिहावे असे सारखे वाटत होते. तरुण भारता-मधील कै. सौ. वेणूताईंवरील तुमचा लेख वाचला. तुम्ही तिला चांगले समजून घेतले होते असा त्याचा अर्थ आहे. आभारी आहे. हे औपचारिक नव्हे.

तुम्हास येण्यास कोणता महिना सोयीचा, ते कळविले म्हणजे मी माझे येथील ओळीने हजर असणारे दिवस तुम्हाला कळवीन. कमिशनचे दौरे सुरू झाले आहेत. या कामात काही वेळ जातो म्हणून बरे. एकटा असलो की आठवणींनी माझे सगळे जागेपणचे जग भरून जाते. तुम्ही चार-दोन दिवस आलात म्हणजे तेवढेच माझे दिवस बरे जातील. नेहमीच्या कामाखेरीज दुसरे अनेक खाजगी प्रश्न तुमच्याशी बोलावयाचे आहेत. "

साहेबांचा सगळ्यांत आवडता पुतण्या म्हणजे राजा. डॉक्टर विक्रम चव्हाण. साताऱ्याहून आरोग्य शिबिर संपवून येताना त्याची ॲम्ब्युलन्स पुलावरून खाली कोसळली आणि मृत्यूने तत्काळ त्या मुलाचा घासच घेतला. साहेब आणि बाईसाहेब या आघाताने घायाळ झाले. साहेब एकदा सांगत होते, " डोंगरे गेले आणि दुसऱ्या दिवशी उठल्यावर दिवस कसा सुरू करायचा हेच मला समजेना. राजा गेला आणि दिल्ली सोडून पुण्याकडे नको आता कधी जायला असे वाटू लागले." अशा हळव्या मनःस्थितीत असतानाच त्या भावनाशील हळव्या मनावर शेवटचा जबरदस्त घाव पडला. ध्यानीमनी नसताना सौ. वेणूताई गेल्या आणि साहेबांच्या दुःखाला पारावार राहिला नाही. " तुम्ही असा धीर सोडू नका,

तुमची देशास जरुरी आहे " असे म्हणताना म्हणाले, " धीर सोडला नाही पण काय करू, दुःखच फार मोठे आहे. "

या आघातानंतर साहेब अधीरपणे आवराआवर करू लागले. त्यांनी आपल्या वुईलमध्ये लिहिले आहे, " माझी पत्नी कै. सौ. वेणूबाई हिचे स्मरणार्थ मी एक सार्वजनिक न्यास करणार आहे. तिने मला खाजगी व सार्वजनिक जीवनात अमोल साथ दिली आहे. त्यासाठी तिची आठवण जागती ठेवणे हा माझ्या जीवनातील उरलेला एकच आनंद आहे. "

वेणूबाई स्मारकासाठी साऱ्या पुस्तकांची, वस्तूंची मोजदाद झाली. त्यावर लेबले लागली. सप्टेंबरच्या ८४ च्या दुसऱ्या आठवड्यात मी आठ दिवसांसाठी दिल्लीत त्यांच्याकडे गेलो. एकदा सायंकाळी परत आलो तो हॉलमधील सोफ्यावर साहेब एकटेच बसलेले. मन गलबलले पण तोंडावर उसने हसू आणत शेजारी जाऊन बसलो. " काय विशेष ? " असे म्हणताना हॉलमधल्या सर्व वस्तूंकडे पाहू लागले. " तुम्हाला काय वाटतंय ? कऱ्हाडला असाच हॉल उभारण्यात आलेला आहे. अशाच वस्तू जिथल्या तिथे मांडल्या आहेत. वेणूताई चव्हाण स्मारक मंदिराच्या त्या वास्तूत आपण निवांत बसलो आहोत. आणि त्यातील एक एक वस्तू, वेणूताई, वेणूताई असे म्हणत आहे – असेच ना ? " " तसंच " माझ्याकडे अश्रूंनी डबडबलेल्या डोळ्यांनी पाहात साहेब कसेबसे उद्गारले.

# एकरूप दांपत्य

## राम खांडेकर

पती आणि पत्नी संसाराच्या रथाची दोन चाके आहेत. या दोघांच्या विचारांची गती आणि आचारांचा आकार सारखा असेल तर संसाराचा रथ जीवनाच्या खाचखळग्यातून यशस्वी रीतीने जाऊ शकतो. याचबरोबर दोघांमध्ये जास्तीत जास्त सामंजस्य असेल तर जीवनातील सुखाचे क्षण अधिक टिपता येतील. श्री. यशवंतराव व सौ वेणूताई यांच्याबद्दल असाच अनुभव आला आणि म्हणूनच या दोघांचे वैवाहिक जीवन सुखा-समाधानात गेले.

सौ. वेणूताई खाऊनपिऊन सुखी कुटुंबातून चव्हाणांच्या घराच्या उंबरठ्यावरील माप ओलांडून २ जून १९४२ रोजी यशवंतरावांच्या जीवनात आल्या. लग्नाचे वय झाल्याबरोबर त्यांनी आपल्या मनाशी देशभक्ताशी लग्न करून त्याचा संसार करण्याचे ध्येय बाळगले होते. ते दिवसही स्वातंत्र्य संग्रामाचे होते. देशभक्ताचा संसार निखाऱ्यावरील पाऊलवाट आहे याची त्यांना त्या वेळी कल्पना नव्हती. याचा अनुभव अंगाची हळद निघालेलीही नव्हती अशा वेळी पोलिसांनी त्यांना यशवंतरावांचा पत्ता मागण्यासाठी केलेल्या छळामुळे आला. त्या कोवळ्या वयात सौ. वेणूताईंनी कठीण प्रसंगाला धैर्याने तोंड दिले. यामुळे त्या टी.बी.ने आजारी पडल्या. परिणाम-स्वरूप एका अल्प दिवसाच्या संततिप्राप्तीनंतर सर्व आयुष्य संततिसुखाशिवाय काढावे लागले. यात खरी कसोटी सौ. वेणूताईंपेक्षा यशवंतरावांची होती. पत्नीविषयी असलेल्या निष्ठेची सत्त्वपरीक्षा होती. यशवंतराव यात पूर्ण उतरले. तरुण वय, सत्ता व अधिकार–अशा व्यक्तीने संततीसाठी दुसरा विवाह केला असता तरी लोकांनी नाके मुरडली नसती. सर्वांनी ते योग्यच मानले असते. पण यशवंतरावांना वेणूताईंनी दिलेल्या साथीची जाण होती आणि म्हणूनच वेणूताईंचे सुख एवढेच त्यांना माहीत होते दुसऱ्या विवाहाची कल्पना त्यांना कधीच शिवली नाही.

यशवंतरावांच्या सुखी कौटुंबिक जीवनाचे श्रेय दोन व्यक्तींना द्यावे लागेल. पहिली व्यक्ती म्हणजे सौ. वेणूताई आणि दुसरी व्यक्ती म्हणजे यशवंतरावांचे

निजी सचिव श्री. श्रीपाद डोंगरे. या दोघांनी यशवंतरावांसाठी केलेल्या त्यागाला तोड नाही. आजारपणातून बऱ्या झाल्यानंतर वेणूताईंवर यशवंतराव व त्यांचे दोन बंधू यांच्या संसाराची जबाबदारी येऊन पडली. पुतणे लहान होते. माहेरी भावंडे लहान होती. सासर माहेर सांभाळणे कठीण बाब. त्यात लहान मुलांचा भार. त्यांच्या आवडी-निवडी. दोन्हीकडील मुलांना समान वागणूक द्यायची. त्यांचे राग-लोभ सांभाळायचे ही तारेवरची कसरत होती. यात अनवधानाने झालेली चूक यशवंतरावांचे मन कष्टी करणारी होती. काही वेळा ही जबाबदारी पेलताना वेणूताईंची परिस्थिती केविलवाणी व्हायची. प्रत्येक पाऊल विचारपूर्वक टाकले जात होते आणि म्हणूनच यशवंतरावांना संसाराच्या सुखदु:खाची जाणीव कधी झाली नाही. तसेच वेणूताई यशवंतरावांच्या जीवनात सखीच्या भूमिकेतही वावरत होत्या. घरात त्या यशवंतरावांची छाया होत्या. सकाळी ५ वाजता उठल्यापासून रात्री १० वाजता झोपेपर्यंत त्या यशवंतरावांच्या बारीकसारीक गोष्टींकडे लक्ष द्यायच्या. सकाळचा चहा, नाश्ता, यशवंतरावांनी ऑफिसमध्ये घालून जायचे कपडे, स्वयंपाकात आवडी-निवडीचे पदार्थ, औषध-पाणी, डॉक्टर वगैरे गोष्टी वेणूताईच पाहावयाच्या. यशवंतरावांच्या कपडयांची, जोडयांची निवडही वेणूताईच करीत असत. एवढेच नव्हे तर सासर-माहेर कडील नातेवाइकांचे वाढदिवस, लग्नाचे वाढदिवस, देणे-घेणे याकडे वेणूताईच लक्ष पुरवावयाच्या. यशवंतरावांचे काम फक्त वेणूताईंनी आणलेल्या वस्तू पसंत आहेत एवढेच सांगण्याचे होते. एकूण संसारात असूनही यशवंतराव सांसारिक नव्हते, आणि म्हणूनच यशवंतराव आपल्या कामात, राजकारणात चोवीस तास रमू शकले. कौटुंबिक जीवनाची महत्त्वाची बाजू वेणूताईंनी चोखपणे सांभाळली.

थोरा-मोठ्यांच्या जीवनात षष्ट्यब्दिपूर्ती एक महत्त्वाची बाब असते. त्यांचे चाहते यानिमित्ताने समारंभ आयोजीत असतात आणि त्यात साधारणत: प्रत्येक जण त्या व्यक्तीच्या कार्याबद्दल बोलताना त्या व्यक्तीच्या यशात त्याच्या पत्नीचा फार मोठा वाटा आहे असे म्हणतो. यशवंतरावांच्या जीवनात हे न सांगताही मान्य करावे लागेल. वेणूताईंनी यशवंतरावांसाठी केलेला त्याग, पाळलेली पथ्ये खरोखरच कौतुकास्पद होती. वेणूताईंनी सगळ्यात मोठे पथ्य पाळले यशवंत-रावांच्या जीवनात–अर्थात राजकीय आणि सरकारी–ढवळाढवळ न करण्याचे. यासाठी त्यांना आपले कार्यक्षेत्र केवळ बंगल्याच्या चार भिंतींतच ठेवावे लागले.

आपला मैत्रिणींचा परिवार जेमतेम बोटावर मोजण्याइतकाच ठेवावा लागला. सहसा त्या गप्पा मारण्यास, चहा-पाण्यास कुठे गेल्या नाहीत किंवा कोणाला त्यांनी बोलाविले नाही. महिला मंडळ वगैरेसारख्या संस्थांत गेल्यामुळे तेथील बायकांच्या ओळखीबरोबरच त्यांच्यासाठी कराव्या लागणाऱ्या कामाची यादी येईल याची त्यांना खात्री होती. शिवाय त्यांच्यांत नकलीपणा नव्हता. थोरा-मोठ्यांच्या बायकांत ज्या सद्‌गुणांचा साधारणतः अभाव असतो अशा सद्‌गुणांनी वेणूताई नटल्या होत्या. त्या कधीही एकट्या किंवा नातेवाइकांबरोबर सिनेमाला गेल्या नाहीत. कधी गेल्या तर साहेबांबरोबर. एक तर त्यांचे विवाहानंतरचे दिवस अतिशय दुःखात गेल्यामुळे दुःख पाहण्याची शक्ती त्यांच्यात नव्हती. शिवाय यशवंतरावांनाही त्याची आवड नव्हती. अपत्य नसलेल्या बाईला चार भिंतींत जीवन काढणे किती कष्टाचे आहे याची कल्पना फक्त त्याच बायका करू शकतात. पण वेणूताईंनी यातून काढलेला मार्ग समाज कल्याणाच्या, महिला मंडळाच्या किंवा गरिबांबद्दल पोकळ जिव्हाळा असलेल्या थोरा-मोठ्यांच्या बायकांना नक्कीच मार्गदर्शक ठरेल. सौ. वेणूताईंनी बंगल्यात राहणाऱ्या नोकरांच्या कुटुंबाला आपले कुटुंब मानले. त्यांच्या मुलांना ममता दिली. बायकांना संसार कसा नीट लावावयाचा हे शिकवले, शिवणकाम, विणकाम शिकवले, कपडे व्यवस्थित व स्वच्छ ठेवल्यामुळे आरोग्याची निगा कशी राखली जाते हे सांगितले. एवढेच नव्हे तर वेणूताईंनी कधी दिल्लीतील थोरा-मोठ्यांच्या बायकांना हळदी-कुंकू वगैरे सारख्या कार्यक्रमास बोलावून आपल्या मोठेपणाचा गाजावाजा केला नाही. आपल्याच बंगल्यातील नोकरांच्या व पर्सनल स्टाफमधील नित्याचा संबंध येणाऱ्यांच्या बायकांना बोलावून त्या हा समारंभ साजरा करीत. दुसरे पथ्य वेणूताईंनी पाळले ते हे की, त्यांनी कधीही साहेबांच्या पुढे पुढे केले नाही. साहेब असताना त्या कधीही साहेबांनी बोलाविल्याशिवाय किंवा भेटायला आलेल्या व्यक्तींनी इच्छा व्यक्त केल्याशिवाय त्या बेडरूमच्या बाहेर आल्या नाहीत. पुष्कळदा भेटणाऱ्यांच्या यादीत त्यांच्या अतिशय ओळखीचे लोक असायचे. पण वेणूताईंनी हे पथ्य सोडले नाही.

यशवंतराव दौऱ्यावर जायचे असले की वेणूताई त्यांना दिवाणखान्याच्या दरवाज्यापर्यंत पोहोचविण्यास यायच्या. हा उंबरठा त्यांनी कधी ओलांडला नाही. यशवंतराव बाहेरदेशी जायचे असले तर मात्र वेणूताई कोणत्याही परिस्थितीत व

कोणत्याही वेळी त्यांना विमानतळावर सोडण्यास जात व आणावयास जात. बेडरूमच्या बाहेर आलेल्या वेणूताईंचा पदर डोक्यावरून कधी ढळला नाही आणि म्हणूनच यशवंतरावांच्या कौटुंबिक जीवनातील यशात सौ. वेणूताईंचा सिंहाचा वाटा होता.

सौ. वेणूताई सखी म्हणूनच वावरत नव्हत्या तर कधी कधी त्या निजी सहायकाचे कामही करीत. अर्थात हे काम ते केवळ सहायक म्हणून करीत. यशवंतरावांची खाजगी कागदपत्रे वेणूताईंकडेच असत. दौऱ्यावर जाताना त्यांच्या बॅगमध्ये ठेवावयाची खाजगी पत्रेही त्या व्यवस्थित ठेवत. रोज घ्यावयाची औषधे वेळेप्रमाणे पुड्या करून देत. सांगून खरे वाटणार नाही, पण यशवंतरावांना टेलिफोनच्या डायलवर एक ते शून्यपर्यंत नंबर असतात हेही कदाचित माहीत नसेल. त्यांनी आयुष्याच्या शेवटपर्यंत कधीही कोणालाही आपणहून टेलिफोन नंबर फिरवून टेलिफोन केला नाही. हे काम सौ. वेणूताईच करत. त्या गेल्यानंतर नोकर करीत.

सांसारिक जीवनात साधारणतः लहान मोठ्या बाबीवरून खटके उडतात ते टाळण्याचे काम वेणूताईंनी नेहमीच केले. स्वप्नातही अशी गोष्ट घडू नये, जेणेकरून साहेब रागावतील याची त्या डोळ्यांत तेल घालून काळजी घेत. काही वेळा ही काळजी दुसऱ्याच्या दृष्टिकोणातून अवास्तव असे. साहेबांच्या शब्दाला फार आदर असे, नव्हे प्रत्येक शब्द हुकुमासारखा मानला जात असे. यशवंतरावांचा आपल्या इथे आलेल्या माणसाचे स्वागत बरोबर झाले पाहिजे असा अट्टाहास असे. यासाठी वेणूताईंना फार धावपळ करावी लागे. आदरातिथ्य हा चव्हाण कुटुंबाचा एक मोठा गुण होता. आलेल्या माणसाची नीट विचारपूस झाली नाही असे कधीच होत नव्हते. यशवंतरावांकडे पाहुणा राहण्यास येणार असला की त्याची खोली, दाढीची ब्लेड, कुंकूसारख्या लहान गोष्टीपासून सज्ज केली जायची. प्रत्येकाला वेळेवर चहापाणी, नाश्ता, जेवण व्यवस्थित दिले गेलेच पाहिजे. चव्हाण कुटुंबाचा आदरातिथ्याचा गुण सांगताना सौ. वेणूताईंनी एक मजेदार गोष्ट सांगितल्याचे आजही स्मरते. यशवंतरावांच्या आई मुंबईत आजारी होत्या. अगदी अंथरुणाला खिळल्या होत्या. फॅमिली डॉक्टर साधारणतः रोज एकदा तरी त्यांची प्रकृती तपासण्यास येऊन जायचे. आईला वयोमानाप्रमाणे कमी दिसायचे. डॉक्टर आल्यानंतर किंवा जाताना चहा, नाश्ता करून जायचे. प्रकृती

तपासल्यानंतर आईला नोकराची किंवा घरातील व्यक्तींची चाहूल लागली नाही तर त्या डॉक्टरच्या हातावर डोक्याखाली ठेवलेल्या चिल्लर पैशातून दोन आणे, किंवा चार आण्याचे नाणे ठेवावयाच्या आणि म्हणावयाच्या, बाबारे, तुला इथे कोणी चहा विचारणार नाही. सर्वजण आपल्या कामात गर्क दिसतात. बाहेर हॉटेलात जाऊन चहा पिऊन घे. डॉक्टरही विनोदी स्वभावाचे असल्यामुळे ते, ते पैसे घेत व दुसऱ्या दिवशी हॉटेलमध्ये न प्यायलेल्या चहाचे मिठास वर्णन करावयाचे. सत्तेवर आल्यानंतर यशवंतरावांनी सुखी जीवनाचा पहिला मूलमंत्र सांगितला. तो म्हणजे आपल्या इथे काम करणाऱ्यांना खायला-प्यायला द्यावयाचे असेल तर आपल्यासाठी जे होईल त्यातलेच द्यावयाचे. वेणूताईंनी हा मूलमंत्र शेवटपर्यंत पाळला.

नोकरांपासून साहेबांपर्यन्त एकच स्वयंपाक व्हायचा. फक्त त्याला अपवाद ठरला तो एकदाच. त्या वेळी साखर काळ्याबाजारात बरीच महाग होती. वेणूताईंनी नोकरांना सांगितले की सकाळचा चहा मी साखरेचा देईन. नंतर मात्र कोणाला चहा लागला तर गुळाचा प्यावा लागेल. महागाईची साखर आणून पुरविणे कठीण आहे.

यशवंतरावांना मोठेपणा मिरविणे आवडत नसे. वेणूताईंमध्येही हा गुण होता. यशवंतराव अधूनमधून वेणूताईंसह लग्नसोहळ्यास जात असत. पण जाताना कधीही कोणतीही भेटवस्तू त्या बरोबर घेऊन गेल्याचे आठवत नाही. कार्याच्या आदल्या दिवशी किंवा निमंत्रण द्यायला येतील त्याच वेळी वेणूताई जे शक्य आहे ते देऊन मोकळ्या होत. त्यांना आलेल्या भेटवस्तूंपैकी कोणतीही वस्तू त्या देत नसत. प्रत्येकाला बाजारातून आणून नवीन वस्तू देण्यात येत असे.

बंगल्यातील नोकर-चाकरांबरोबरच यशवंतरावांकडे असलेला वैयक्तिक सरकारी कर्मचारी (पर्सनल स्टाफ) हा त्यांच्या कुटुंबाचाच भाग होता. चव्हाण दांपत्याचं प्रेम व जिव्हाळा त्यांना सदैव मिळत होता. त्यांची सुख-दु:खं यशवंतराव-वेणूताई आपली मानत. त्यात सहभागी होत. कोणाचेही नख दुखले तरी वेणूताई तन-मन-धनाने धावून जात. एकदा माझ्या पोटातील पेप्टिक अल्सर फुटला. तो तावडतोब न कळल्यामुळे रक्तात विष झाले. डॉक्टरांच्या सल्ल्याप्रमाणे दवाखान्यात भरती करण्यात आले. रोगाचे गांभीर्य डॉक्टरांच्या लक्षात आले. सरकारी डॉक्टर असूनही ते कौटुंबिक डॉक्टर असल्या-

मुळे त्यांनी ग्लुकोज, रक्त आदींची व्यवस्था करून यशवंतरावांना फोन करून परिस्थितीची कल्पना दिली. यशवंतराव तास, दोन तासांपूर्वीच अमेरिकेहून दिल्लीस येऊन पोहोचले होते व विश्रांती घेण्याच्या तयारीत होते. ते वेणूताईसह तातडीने दवाखान्यात आले. डॉक्टरांनी त्या उभयतांना बाजूला घेऊन परिस्थिती सांगितली व काळजी घेण्याची आवश्यकता असल्याचे सांगितले. पोटातील जखमेतून रक्त वाहणे जर बंद झाले नाही तर केव्हाही ऑपरेशन टेबलावर न्यावे लागेल अशी तयारीही ठेवली. परंतु या गोष्टीची कल्पना सौ. खांडेकरांना होऊ दिली नाही. वेणूताईंनी त्यांना बाजूला नेऊन सांगितले की, तुम्हांला सतत दवाखान्यात राहावे लागेल. तरी घरच्या लोकांना बोलावून घ्या. सौ. खांडेकरांचे न ऐकता त्यांनी तशी व्यवस्थाही केली. त्यानंतर त्यांनी ६-७ दिवस सौ. खांडेकरांची घेतलेली काळजी त्यांच्याबद्दल असलेल्या आदरात भर टाकणारी आहे. सकाळी त्या सौ. खांडेकर यांच्याकरिता थर्मासमधून चहा पाठवावयाच्या. ९ च्या सुमारास मोटर पाठवून बंगल्यावर न्यायच्या. त्यांच्या आंघोळीची व्यवस्था करावयाच्या. ११ च्या सुमारास स्वतः ताट पाणी करून स्वतःच्या हातांनी वाढून जेवायला घालायच्या. नंतर दवाखान्यात पोहोचवून ४ वाजता परत चहा. नंतर रात्री ८ ला परत बंगल्यावर बोलावून स्वतःजवळ बसवून जेवावयाला वाढावयाच्या. सौ. खांडेकरांनी हे पाहून डबा दवाखान्यात पाठवायला सांगितले. परंतु दवाखान्यात जेवण जाणे शक्य नाही या सबबीवर त्याला त्यांनी मान्यता दिली नाही. तसेच ते श्रावणाचे दिवस असल्यामुळे घरी आलेल्या नातेवाइकांची उपवासाच्या पदार्थांपासून सोय केली. कोणाचीही अडचण असो, वेणूताईंना कळताच त्या धावून गेल्या नाहीत असे कधीच झाले नाही. एकदा त्यांच्याकडे नुकत्याच आलेल्या वैयक्तिक सहाय्यकाकडे बारसे होते. त्यांच्याकडे पाळणा विकत घेण्याची पद्धत नव्हती. पाळण्याचा शोध घेऊनही पाळणा मिळेना. वेणूताईंना हे कळताच त्या सरळ बाजारात गेल्या. पाळणा आणला व तो त्याच्याकडे पोहोचवून दिला. हा मोठेपणा पाहून त्याच्याकडील वडीलधारी मंडळीही आश्चर्यचकित झाली. दिल्लीत महाराष्ट्रासारखे गोल वरंवटे मिळत नाहीत; म्हणून वेणूताईंनी आपल्या लोकांकरिता मुंबई-पुण्याहून पाटे वरंवटे आणून दिले. त्यांचे हे वागणे मंत्रिणीबाईला शोभेसे नव्हते. पण मानवतावादी दृष्टिकोण असलेल्या स्त्रीच्या कीर्तीत भर घालणारे होते. म्हणूनच त्यांच्या

सान्निध्यात कधी न कधी थोड्या वेळाकरिता आलेली व्यक्ती चव्हाण दांपत्याचे आजही गुण गाते.

चव्हाणांच्या कौटुंबिक जीवनातील तिसरी महत्त्वाची व्यक्ती म्हणजे त्यांचे निजी सचिव श्री. श्रीपाद डोंगरे. वेणूताई बंगल्यात यशवंतरावांची सावली होत्या तर डोंगरे बाहेरच्या वातावरणात. बारशापासून बाराव्यापर्यंत यशवंतराव कुठेही जावोत, डोंगरे त्यांच्याबरोबर नाहीत असे कधीच झाले नाही. यशवंतरावांच्या व वेणूताईंच्या–दोन्हीकडच्या नातलगांना सांभाळण्याचे फार कठीण काम डोंगरे यांनी यशस्वीरीत्या केले आणि यशवंतरावांना त्याची झळ कधीही लागू दिली नाही. डोंगरे यांना सर्वजण काका म्हणत. डोंगरे यांनी काकाचे प्रेम सर्वांना दिले. त्यांचे प्रश्न सोडविले. यशवंतरावांना राजकारणात अप्रत्यक्षरीत्या डोंगरे यांचे फार साहाय्य झाले. हिंदुस्थानच्या राजकारणात कुठे काय घडत आहे, घडण्याची शक्यता आहे याची माहिती ते यशवंतरावांना पूर्ण खात्री करून देत असत. कधी कधी यशवंतराव ती गोष्ट उडवून लावावयाचे पण डोंगरे यांनी त्याचे दु:ख कधी मानले नाही. यशवंतरावांसाठी त्यांनी केलेल्या त्यागाला मोल नाही. डोंगरे यांना सुपारीचेदेखील व्यसन नव्हते. ऐपत असून ते पंचतारांकित हॉटेलमध्ये कधी गेले नाहीत की नाटक-सिनेमास जाऊन बसले नाहीत. यशवंतराव तिथेच डोंगरे व डोंगरे तिथेच यशवंतराव हे समीकरण झाले होते. अर्थात याचा परिणाम सांसारिक असूनही त्यांना वैराग्याचे जीवन जगावे लागले. ते कधीही सौ. डोंगरे यांना घेऊन सुट्टीवर गेले असे झाले नाही. डोंगरे देशाच्या-परदेशाच्या कानाकोपऱ्यात हिंडले परंतु सौ. डोंगरे महाराष्ट्राबाहेर कितपत पडल्या असतील याबद्दल शंकाच आहे. यशवंतरावांना आपल्यामुळे कधीही खाली पाहावे लागणार नाही याची ते काळजी घेत. म्हणून सतत ८ वर्षे वायुदलाची विमाने यशवंतरावांसाठी असतानाही त्या विमानातून सौ. डोंगरे यांनी क्वचितच प्रवास केला असेल आणि केला असेल तर मुंबई-दिल्लीपुरताच. एवढे असूनही डोंगरे यांचा चेहरा हसतमुख. त्यांच्या कपाळावर आठ्या किंवा राग कोणीही पाहिला नसेल. डोंगरे यांच्याबद्दल यशवंतरावांनाही आदर होता. त्यांच्या त्यागाची त्यांना कल्पना होती. म्हणूनच विरोधी पक्षाचे नेतृत्व मिळाल्यानंतर त्यांना कॅबिनेट मंत्र्यांचा दर्जा दिला त्या वेळी त्यांच्याकडे असलेली निजी सचिवाची जागा डोंगरे प्रकृति-अस्वास्थ्यामुळे कामावर रुजू होऊ शकत नसतानाही डोंगरे

हयात असेपर्यंत कोणाला दिली नाही. त्यांच्या निधनाचा धक्का :यशवंतरावांना त्यांचा सख्खा भाऊ गेल्यानंतर होणाऱ्या धक्क्याइतकाच तीव्र होता.

यशवंतराव स्वच्छतेचे फार भोक्ते होते. त्यांना थोडासाही मळका कपडा पाहिला की चीड यायची. वेणूताईंनीही या गुणाची जोपासना केली. वेणूताईंचे स्वयंपाकघर, भांडी-कुंडी, देवघर लखलख चमकायचे. यासाठी त्या स्वतः झटायच्या. वेणूताई व यशवंतराव दोघेही देवावर नितांत श्रद्धा ठेवणारे होते. आंघोळ झाल्यानंतर देवघरात जाऊन देवाला व साईबाबांच्या मूर्तीला नमस्कार केल्याशिवाय यशवंतराव ऑफिसला जायचे कपडे घालत नसत. वेणूताईंच्या देव्हाऱ्यात जवळपास सर्व चांदीचे देव होते, आणि देवघरात सर्व लहानथोर मृत नातेवाईक व जिल्ह्याळ्याच्या लोकांचे फोटो होते.

कर्तृत्वाच्या मोठेपणाला मनाच्या मोठेपणाची झालर लागली तर व्यक्तिमत्त्व आणखी खुलून दिसते. यशवंतराव व वेणूताई यांच्या मनाच्या मोठेपणाचा अनुभव अनेकांनी घेतला आहे. यशवंतराव मुख्यमंत्री असताना त्यांच्या घरी १० दिवस गणपती उत्सव असायचा. त्या वेळी अनेक प्रसिद्ध गायक, कलाकार आदींची हजेरी तिथे लागावयाची. एकदा संगीत कार्यक्रमाच्या मध्यंतरात कॉफी-पानाचा कार्यक्रम असताना एका चपराश्याच्या हातून चुकीने यशवंतरावांच्या नातेवाइकाच्या अंगावर कॉफी सांडली. त्याने चारचौघांत अपशब्द बोलून त्याचा अपमान केला. त्यानंतर तो चपराशी दोन-तीन दिवस कामावर आला नाही. यशवंतरावांना ही घटना कळली तेव्हा त्यांनी त्याला बोलावून स्वतः माफी मागितली व सर्व विसरून जाण्यास सांगितले. हाच गुण वेणूताईंमध्ये होता. सकाळी ५ वाजता रात्रपाळीच्या लोकांना चहा देण्यापासून रात्री १० वाजता रात्रपाळीच्या लोकांना चहा देण्यापर्यंत सर्वांची काळजी घेण्यात येत असे. वेणूताई स्वतः अधूनमधून सर्वांना चहापाणी, जेवण मिळते की नाही हे पाहात असत. चव्हाणांच्या दारात असलेला नवखा पण कधी उपाशी राहिला असे झाले नाही. परंतु कधी कधी नोकर लोक त्यांच्याशी झालेल्या भांडणामुळे कोणाचा चहा बंद करायचे किंवा जेवण द्यायचे नाहीत. ही गोष्ट वेणूताईंचे लक्ष असल्यामुळे त्यांना कळत असे. यात आपल्या नोकराचा कुठे तरी दोष आहे याची त्यांना पूर्ण कल्पना असायची. त्या ते कारण शोधायच्या व नंतर त्या व्यक्तीला स्वतः चहा किंवा जेवण नेऊन द्यायच्या. त्याचबरोबर नोकरातर्फे माफी मागायच्या.

मंत्री किंवा मंत्र्याची पत्नी यांनी माफी मागणे आजच्या जगात आश्चर्यकारकच !

वेणूताईंची यशवंतरावांच्या आवडीनिवडी, स्वभाव याला जोड मिळेल अशी वागणूक होती. तशीच वागणूक यशवंतराव वेणूताईंच्या स्वभावाला जुळेल अशीच ठेवण्याचा प्रयत्न करीत होते. वेणूताईंच्या त्यागाची आणि तपश्चर्येची त्यांना पूर्ण कल्पना होती. त्यांचे मन कधीही दुखवणार नाही याची ते काळजी घेत. ते एकदा म्हणाले होते, आपल्या पत्नीचा आपण आदर केला नाही, चारचौघांत किंवा नोकरवर्गासमोर तिचा दोनचार अपशब्द बोलून अपमान केला तर दुसरे तिच्याबद्दल आदर ठेवतील ही भावना ठेवणे चुकीचे होईल. यशवंतराव कितीही रागावले तरी त्यांच्या तोंडून कधीही अपशब्द निघाले नाहीत.

सुखी कौटुंबिक जीवनाकरिता सर्वांत कशाची जर आवश्यकता असेल तर ती सामंजस्याची. भांड्याला भांडं लागून आवाज होतो हे खरे आहे. परंतु ही भांडी एका अंतरावर असली तर तो आवाज होणार नाही. वेणूताई यशवंतराव असे दूर होते. पण आचरणाने स्वभावाने एक होते. एकमेकांचा स्वभाव पूर्ण ओळखून त्यांनी पावले टाकली. प्रत्येक पाऊल समजून उमजून टाकले. वेणूताईंनी राजकारणात सरकारी कामात यशवंतरावांचे वर्चस्व मान्य करून त्यात हस्तक्षेप केला नाही तर यशवंतरावांनी संसारात वेणूताईंचे वर्चस्व मानून ढवळाढवळ केली नाही. दोघांनाही एकमेकांबद्दल आदर होता. एकमेकांपासून दोघांनीही कधीच काही लपविले नाही. त्याची आवश्यकता त्यांना भासली नाही. दोघेही एकमेकांच्या शरीराबाहेरील प्राण होते. एक फूल होते तर दुसरा त्याचा सुगंध. म्हणूनच यशवंतरावांचे कौटुंबिक जीवन अधूनमधून येणाऱ्या वादळातही सुखाचे व समाधानाचे राहिले. दोघेही एवढे धीरोदात्त होते की ते वादळाने डगमगले नाहीत. देशभक्ताचा संसार करण्याचे ध्येय घेऊन वेणूताई आल्या पण नियतीनं त्यांचे हे ध्येय पूर्ण होऊ दिले नाही. संसाराच्या शेवटच्या अध्यायात त्या भरल्या घरातून भरल्या कपाळी निघून गेल्या. फूल गळून पडले होते. त्याचा सुगंध घरात किती काळ दरवळणार? फुलाबरोबर सुगधही जाणार. यशवंतरावांना एकाकीपणा जाणवू लागला. जगण्यासाठी जगायचे एवढेच त्यांनी ठरविले. सुगंध आपल्या फुलाचा शोध घेत राहिला. वियोगामुळे अश्रूंच्या गंगा सतत वाहू लागल्या आणि लवकरच हा सुगंध आपल्या फुलाला मिळण्यासाठी अचानक निघून गेला.

# शेवटचा प्रवास

## शामराव पवार

मध्यरात्र उलटली होती. दिल्लीत इंडियन मेडिकल इन्स्टिटयूटमध्ये साहेबांचे—यशवंतरावांचे आम्ही नातेवाईक त्यांच्या खोलीत बसून होतो. साहेबांची प्रकृती बरी नाही असा निरोप मिळाल्यानं आम्ही दिल्लीस धाव घेतली होती.

२३ नोव्हेंबर १९८४ च्या संध्याकाळी मी दिल्लीत पोहोचलो. साहेबांचा पुतण्या अशोक तिथं पोहोचला होता. दि. २२ ला दुपारपासून साहेबांच्या प्रकृतीत बिघाड झाला. किडनी काम करेनाशी झाली. रक्तदाब वरखाली होत राहिला. मधून मधून वांत्या होत होत्या. त्यांचे नेहमीचे दिल्लीचे फॅमिली डॉक्टर डॉ. करोली आणि डॉ. विग यांना निरोप गेले. त्यांनी प्रकृती तपासली. उपाय-योजना सुरू झाली, परंतु प्रकृतीत चढ-उतार होत राहिला. डॉ. विग हे भारतीय लष्करातील तज्ज्ञ डॉक्टर. आता ते निवृत्त झाले होते, परंतु साहेबांचा त्यांचा जिव्हाळा कायम होता. सौ. मामी—सौ. वेणूताई आणि साहेब यांचे हे दोघे फॅमिली डॉक्टर. डॉ. विग यांनी दि. २२ च्या रात्री प्रकृती तपासली तेव्हा काही शास्त्रशुद्ध तपासणी आणि उपचार करण्याची आवश्यकता असल्याचा अभिप्राय दिला. त्यासाठी इंडियन मेडिकल इन्स्टिटयूटमध्ये जाऊन सर्व तपासण्या कराव्यात असा सल्ला दिला. डॉ. विग हे या संस्थेचे पूर्वी डीन होते. या संस्थेमध्ये रुग्णाला तपासण्यासाठी अद्ययावत साधनसामग्री असल्याची त्यांना माहिती होती.

डॉ. विग यांच्या सल्ल्यानुसार साहेबांना त्याच रात्री इंडियन मेडिकल इन्स्टिटयूटमध्ये नेण्यात आले. तेथे त्या वेळी उपस्थित असलेल्या डॉक्टरांनी उपचार सुरू केले. त्याच रात्री साहेबांचे मित्र, श्री. रसिकभाई शहा यांनी दिल्ली येथून साहेबांचे पुणे येथे असणारे दुसरे पुतणे दादा यांना फोन करून साहेबांना हॉस्पिटलमध्ये ठेवण्यात आले असल्याचे सांगितले. श्री. रसिकभाई मुंबईत असताना श्री. एन्. के. पी. साळवे यांनी त्यांना साहेबांची प्रकृती बरी नाही असे फोनवरून सांगितल्याने ते तातडीने दिल्लीत पोहोचले होते. निवडणुकीची धामधूम सुरू झाली होती. दि. २६ नोव्हेंबर या दिवशी सातारा

जिल्हाधिकारी कचेरीत उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा साहेबांचा कार्यक्रम निश्चित करण्यात आलेला होता. त्यानिमित्ताने सातारा येथे जिल्ह्यातील कार्यकर्त्यांचा मेळावाही आयोजित करण्यात येणार होता. या संबंधात चर्चा करण्यासाठी दि. २१–२२ च्या दरम्यान मी मुंबईस यावे असेही ठरले होते. साहेबांनीच तसे सुचविले होते. कारण मुंबई-पुणेमार्गे सातारा येथे पोहोचावयाचे असा साहेबांचा कार्यक्रम निश्चित झाला होता.

साहेबांच्या प्रकृतीत अचानक बिघाड निर्माण झाल्यामुळे त्यांच्या सूचनेनुसार श्री. रसिकभाईंनी माझ्यासाठी निरोप दिला की, उमेदवारी अर्ज घेऊन तातडीने दिल्लीस पोहोचावे. मुंबईला जाण्यासाठी कराड येथून निघून मी पुणे येथे थांबलो होतो. साहेबांना हॉस्पिटलमध्ये दाखल केले आहे आणि उमेदवारी अर्ज घेऊन दिल्लीस बोलाविले आहे हा निरोप दादांनी रात्री लगेच माझ्यापर्यंत पोहोचवला.

दि. २२ नोव्हेंबरची उर्वरित रात्र द्विधा मनःस्थितीत घालवावी लागली. साहेबांना हॉस्पिटलमध्ये नेण्याइतपत प्रकृती बिघडली असल्याचे समजल्यापासून मन कमालीचे बेचैन बनले. सौ. मामींच्या—वेणूताईंच्या निधून जाण्याच्या धक्क्यातून साहेब सावरले नव्हते. त्यांचे दैनंदिन व्यवहार सुरू राहिले असले तरी मनाची बेचैनी कमी झालेली नव्हती. समारंभाच्या निमित्ताने महाराष्ट्रात येत होते, भाषणांतून विचार व्यक्त करीत होते, कुटुंबियांशी आणि भेटीला येणारांशी सल्ला-मसलत करीत होते, परंतु या सर्वांमध्ये उत्साह असा क्वचितच दिसावयाचा. किंबहुना उत्साह असा नव्हताच. त्यांच्या मनावरील प्रचंड ताण चेहऱ्यावर दृग्गोचर होत होता. आला दिवस गेला असं सुरू असल्याचं जाणवत होतं.

मी माझ्या लहानपणापासून साहेबांच्या आणि आक्कांच्या–त्यांच्या मातोश्रींच्या छायेत वाढलो. घरातल्या, कुटुंबातल्या प्रत्येक लहान-मोठ्या, सुखाच्या-दुःखाच्या घटनेत त्यांचा बनून राहिलो. सुखाचे दिवस पाहिले अन् दुःखाचे उन्हाळे अंगावर काढले. यापूर्वीही साहेबांच्या प्रकृतीत बिघाड झाला होता. तातडीने शस्त्रक्रिया करण्यापर्यंत दुखणे विकोपाला पोहोचले होते. त्यातून ते सुखरूप सावरले आणि त्यांचे धामधुमीचे राजकीय जीवन सुरू झाल्याचा सुखद अनुभव घेतला होता. साहेबांचं बालपण, लहानपण, तरुणपण कष्टात आणि परिस्थितीची आव्हानं स्वीकारण्यात गेलेलं असलं तरी त्यांच्या महत्त्वाकांक्षी मनानं एक

वेगळीच उभारी धरलेली असल्याचं पावलोपावली जाणवत असे. स्वत:च्या किंवा पत्नीच्या प्रकृतीची आणि कौटुंबिक स्वरूपाची संकटं निर्माण झाली तरी ते कधी सटपटले नाहीत. स्वत:ला धीर दिला आणि इतरांना आधार दिला. परंतु आताचं चित्र वेगळं निर्माण झालं होतं. सत्तरी उलटलेलं वय. ज्या वयात कौटुंबिक आधाराची नितांत गरज, तो आधार संपुष्टात आलेला होता. कौटुंबिक जीवनच उद्ध्वस्त बनलं होतं. कशासाठी, कोणासाठी जगायचं असं ते अलीकडे वर्षभरात बोलू लागले होते. त्यांच्याकडं पाहिलं म्हणजे ते विचारमग्न आहेत असं दिसायचं, वाटायचं, पण मन विचारानं भरलेलं नव्हतं; चिंतेनं, मानसिक कष्टानं ग्रासलं होतं. एकाकीपणाचा कमालीचा ताण दरदिनी वाढत राहिला होता. खोलीमध्ये एकटे बसलेले असले म्हणजे हा ताण डोळ्यांवाटे बाहेर पडायचा. हे सारे मी जवळून पाहात होतो. काळ हेच त्यावर औषध असं समजून दिवस ढकलावे लागले. जसजसा काळ जाईल तसे ते सावरतील अशी आशा धरून होतो.

साहेबांची प्रकृती ठीक नाही हे समजल्यापासून त्या रात्री मनात हीच उजळणी सुरू राहिली. वाटलं तावडतोब दिल्लीत पोहोचावं. मायेचं तसं तिथं कुणी असणं आवश्यकच होतं. साहेबांच्या मनाला त्या यातना होत असणारच. परंतु निवडणुकीचा उमेदवारी अर्ज घेऊन येण्याचा निरोप होता. मन द्विधा झालं. त्या अवस्थेत दि. २३ नोव्हेंबरच्या सकाळी साताऱ्याला परतलो. जिल्हाधिकाऱ्यांना भेटून उमेदवारी अर्ज हस्तगत केला. आवश्यक त्या तांत्रिक गोष्टी पूर्ण करून घेतल्या अन् त्याच पावली पुण्यास येऊन सायंकाळी दिल्लीकडे निघणारं विमान गाठलं. रात्री उशिरा इंडियन मेडिकल इन्स्टिटयूटमध्ये पोहोचलो आणि साहेबांना पाहिलं मात्र, मनाला चरका बसला. उपचारासंबंधी चौकशी केली तेव्हा शिकाऊ डॉक्टर उपचार करीत आहेत असे आढळले. तेथे तज्ज्ञ डॉक्टर कोणी उपस्थित नव्हते.

रात्री एक वाजण्याच्या सुमारास साहेबांना सपाटून थंडी वाजून आली. ते काही हिवतापाने आजारी नव्हते. आमची धावपळ उडाली. डॉक्टरांना बोलवावे म्हणून गेलो तर तेथे एक शिकाऊ डॉक्टर होते. त्यांना प्रकृतीविषयी बोललो आणि तावडतोब कोणातरी तज्ज्ञाला बोलवा असे सुचविले. परंतु ते शिकाऊ डॉक्टर थंड होते. ते कोणाला तरी फोन करतील, बोलावतील, सल्ला घेतील या आशेने थोडे थांबलो. पण काही हालचाल दिसेना. तेव्हा जरा चढ्या आवाजात त्यांना पुन्हा विनंती केली. त्यावर त्या डॉक्टराने जे ऐकवले त्यामुळे तर आम्ही

सर्दच झालो. तो म्हणाला, " चव्हाणसाहेब व्ही. आय. पी. आहेत, ठाऊक आहे. पंतप्रधान इंदिरा गांधी जखमी होऊन येथे आल्या तरी सुद्धा तज्ज्ञ डॉक्टर येथे पोहोचण्यात पंधरा-वीस मिनिटे गेली. तुम्ही उगीच का आरडा-ओरडा करताय ? व्ही. आय. पी. असले म्हणून काय झाले ? "

डॉक्टरांचा कमालीचा निष्काळजीपणा घालविणार कसा ? आम्ही तर अस्वस्थ झालो होतो. त्या डॉक्टरांशी वाद घालण्यात काही अर्थ नव्हता म्हणून मग आम्ही, चव्हाणसाहेबांच्या फॅमिली डॉक्टरशी फोनवरून संपर्क साधला. वस्तु-स्थिती सांगितली. इथे कोणी तज्ज्ञ नाही आणि उपचार ताबडतोबीने होण्याची आवश्यकताही निवेदन केली.

त्यांनी बहुधा तज्ज्ञ डॉक्टरांशी संपर्क साधला असावा. त्यामुळे हालचाली सुरू झाल्या. साहेबांना एक इंजेक्शन देण्यात आले. तासाभराने थंडीचा जोर ओसरला. अर्ध्या-पाऊण तासानंतर साहेब आमच्याशी बोलले.

इंडियन मेडिकल इन्स्टिटयूटमधील उपचार आणि तज्ज्ञ डॉक्टरांची बेफिकिरी, यामुळे आम्ही मंडळी कमालीचे धास्तावलो. बाहेरचे कोणी तज्ज्ञ डॉक्टर आणून उपचार करावेत तर त्याला नियमांची आडकाठी. शिकाऊ डॉक्टर यायचे-जायचे, नर्सची ये-जा व्हायची पण हे सारे वरवरचे सुरू होते. नेमकेपणाने इलाज केला जात आहे किंवा काय याबाबतीत आम्ही अनभिज्ञ होतो. विचारणा करावी तर दुरुत्तरेच ऐकावी लागत. दि. २४ नोव्हेंबरचा दिवस असाच अस्वस्थतेत गेला. परंतु त्या दिवशी श्री. रसिकभाई, साहेबांचे पुतणे अशोक आदी आम्ही मंडळींनी मनोमन असा निर्णय केला की, साहेबांना इंडियन मेडिकल इन्स्टिटयूट-मध्ये उपचारासाठी ठेवण्यात अर्थ नाही. त्यांना तातडीने मुंबईला न्यावे आणि मुंबईत तज्ज्ञांकडून उपचार सुरू करावेत. दि. २४ च्या रात्री साहेबांशी बोललो आणि आम्ही तुम्हास मुंबईला नेण्याची तयारी करीत आहोत असे सांगितले. साहेबांची अनुमती गृहीत धरून रसिकभाई पहाटेच हॉस्पिटलमध्ये आले. मुख्यमंत्री श्री. वसंतदादा पाटील हे त्या वेळी नवी दिल्ली येथे होते. दि. २५ च्या सकाळच्या विमानाने ते मुंबईस परत जाणार होते. लोकसभेच्या महाराष्ट्रातील उमेदवारांची यादी निश्चित करून ते परत चालले होते. कारण उमेदवारी अर्ज दाखल करण्यास दोन दिवसांचाच अवधी उरला होता. मुंबईस जाण्यास निघण्यापूर्वी, साहेबांना भेटावे, प्रकृती पाहावी म्हणून पहाटेच ते इंडियन मेडिकल

इन्स्टिटयूटमध्ये आले. त्यांच्यासमवेत श्रीमती शालिनीताई आणि श्री. मुरली देवरा होते.

साहेबांची प्रकृती आणि उपचारातील हलगर्जीपणा, तज्ज्ञ डॉक्टरांची अनुपस्थिती हे सर्व वसंतदादांना सांगितले आणि उपचारासाठी मुंबईस नेण्याची निकड त्यांच्या नजरेस आणली. दादांनाही ते योग्य वाटले. परंतु त्यांनी सुचविले की, पुढच्या दोन-अडीच तासांत मी मुंबईत पोहोचेन. तेथून विमान पाठविण्याची व्यवस्था करतो. त्याचप्रमाणे मुंबईतल्या तज्ज्ञ डॉक्टरांनाही पाठवितो. ते येथे प्रकृती पाहतील. मुंबईपर्यंत साहेब व्यवस्थित पोहोचतील याची ते काळजी घेतील. मुंबईपर्यंत डॉक्टर त्यांच्याबरोबर असलेले बरे. मुरली देवरा यांनीही त्यास दुजोरा दिला. साहेबांचा निरोप घेऊन दादा तातडीने मुंबईस रवाना झाले.

इंडियन मेडिकल इन्स्टिटयूटमध्ये आवश्यक ती काळजी घेतली जात नाही म्हणून साहेबांना मुंबईला नेण्यात येणार असल्याचे श्री. एन्. के. पी. साळवे यांना समजताच ते अस्वस्थ झाले आणि त्यांनी पंतप्रधान राजीव गांधी यांना भेटून सर्व सांगितले. साहेब आजारी आहेत, इंडियन मेडिकल इन्स्टिटयूटमध्ये त्यांना ठेवण्यात आले आहे याची श्री. राजीव गांधींना माहिती नव्हती. एक-दोन दिवसांतच या साऱ्या घटना झपाट्याने घडल्या होत्या. परंतु श्री. साळवे यांच्याकडून जेव्हा त्यांना साहेबांना मुंबईला हलविण्यात येणार असल्याचे समजले तेव्हा तेही अस्वस्थ बनले.

सकाळी ११ चा सुमार असावा. पंतप्रधानांना त्याच सुमारास हे कळले. त्यासरशी त्यांनी स्वतःच आपली ' बुलेट-प्रूफ ' गाडी काढली आणि श्री. साळवे यांच्यासह ते इंडियन मेडिकल इन्स्टिटयूटमध्ये दाखल झाले. स्वतः पंतप्रधान तेथे आले आहेत ही गोष्ट ते साहेबांच्या रूममध्ये पोहोचल्यावर इतरांना समजली. लगेच धावाधाव सुरू झाली. तज्ज्ञ डॉक्टर तेथे आले. एकूण हलगर्जीपणाबद्दल श्री. राजीव गांधी यांनी त्यांची चांगलीच कानउघाडणी केली. त्यांना आवश्यक त्या उपचाराची सर्व व्यवस्था ताबडतोब करण्याचे फर्माविले. साहेबांची अस्वस्थता पाहून त्यांच्या डोळ्यांत पाणी तरारले. लवकर बरे व्हा, निवडणुका जाहीर झाल्या आहेत, मला तुमची गरज आहे, माताजी तर निघून गेल्या असे राजीवजींच्या तोंडून ऐकताच साहेबांचे डोळे भरून आले. पंधरा मिनिटांनंतर निरोप घेताना राजीवजींनी सांगितलं की, काळजी करू नका. कसलीही गरज भासली तर

कळवा. मुंबईला जायचंच असं ठरविलंत तर विमान तयार ठेवतो !

श्री. राजीव गांधी निघून गेल्यानंतर कितीतरी वेळ साहेब स्वस्थ पडून होते. डोळ्यांतून अश्रू वाहात होते. तो संपूर्ण दिवस त्यांच्या मनात, स्वतःच्या निवडणुकीपेक्षा एकूण देशाच्या निवडणुकीविषयीचे विचारच घोळत असावेत. दिवसभर त्या संबंधातच बोलत होते. निवडणुकीची तयारी कशी करायची यासंबंधी सांगत होते.

दि. २५ नोव्हेंबरच्या सकाळी साहेबांचा निवडणूक अर्जाचा फॉर्म भरला. त्यांनी सह्या केल्या. डॉक्टरांचे आवश्यक ते सर्टिफिकेट त्याला जोडले. त्याच दिवशी फॉर्म घेऊन मी सातारला परतावे आणि २६ ला वेळेवर अर्ज दाखल करावा असा त्यांचा आग्रह होता. दरम्यान त्याच दिवशी सकाळी श्री. प्रतापराव भोसले आणि श्री. शंकरराव जगताप दिल्लीत पोहोचले. साहेबांची प्रकृती पाहावी म्हणून ते आले होते. ते तेथे आल्यामुळे त्यांनी उमेदवारी अर्ज घेऊन जावे आणि तो दाखल करावा असे मी सुचविले. त्यावर साहेब म्हणाले, 'ठीक आहे, ते तर जातीलच पण तूही बरोबर जा.'

माझ्यासमोर मोठाच पेच उभा राहिला. साहेबांना त्या अवस्थेत सोडून दिल्लीतून बाहेर पडणं प्रशस्त नव्हतं. वसंतरावदादा मुंबईहून विमान पाठविणार होते. डॉक्टरांना पाठविणार होते. साहेबांना मुंबईला घेऊन जाणं अधिक महत्त्वाचं होतं. निवडणूक अर्ज वेळेवर दाखल करणं हेही आवश्यक होतं. श्री. प्रतापराव भोसले ते काम निर्विवाद करणारे होते. दुसरे असे की, तशी वेळ निर्माण झाली तर निवडणूक अर्ज वेळेवर दाखल होईल अशी व्यवस्था करण्याचं आश्वासन स्वतः श्री. राजीव गांधी यांनीही दिलं होतं. साहेबांचा तर आग्रह मीही साताऱ्यास जावे असा होता. शेवटी श्री. प्रतापरावांशी चर्चा करून त्यांनीच अर्ज घेऊन जावे आणि पुढची पूर्तता करावी असे ठरविले आणि त्यानुसार श्री. प्रतापराव उमेदवारी अर्ज घेऊन तेथून रवाना झाले. विमानाची आणि डॉक्टरांची प्रतीक्षा करीत मी तेथेच थांबलो.

दि. २५ ची दुपार उलटून गेली तरी मुंबईहून निघणारे विमान किंवा डॉक्टर कोणीच पोहोचले नाही. वसंतरावदादा मुंबईत पोहोचताक्षणीच त्यांनी विमानाची व्यवस्था करून ठेवली, परंतु तज्ज्ञ डॉक्टरांना निरोप पोहोचून त्यांनी निघण्यात बराच वेळ गेला. याचे कारण त्या दिवशी रविवार होता. डॉक्टर

आपल्या घरी नव्हते. दुपारी उशिरा केव्हातरी त्यांना निरोप मिळाले. मात्र निरोप मिळताच लगेच ते विमानतळाकडे जाण्यास निघाले. त्यांना घेऊन विमान दिल्लीच्या विमानतळावर उतरले त्या वेळी संध्याकाळ झाली होती.

इकडे पंतप्रधानांनी खडसावल्यामुळे तज्ज्ञ डॉक्टरांनी थोडा वेळ धावपळीने तपासणी करून ते जे निघून गेले ते पुन्हा फिरकले नाहीत. त्यांच्या सूचनेनुसार शिकाऊ डॉक्टरांकडून उपचार सुरू राहिले. पूर्वीही साहेबांची एकच किडनी काम करीत होती. दोन-तीन दिवसांच्या आजारपणात तेही काम थांबले असावे. कारण नेहमीप्रमाणे नैसर्गिकरीत्या लघवी होणे बंद झाले. त्यामुळे अन्य उपाय करून लघवी मोकळी करण्यात आली. त्या दिवशी त्यांच्या रक्तदाबात एकाएकी चढउतार सुरू झाला. कधी एकदम वाढायचा तर कधी एकदम कमी व्हायचा. रक्तदाब नीट, काळजीपूर्वक तपासला जात नसावा असा माझा संशय होता. कारण रक्तदाबाबद्दल दोन डॉक्टरांचे एकमत नव्हते. एका डॉक्टरला रक्तदाबाचे प्रमाण बरोबर वाटत होते तर दुसरे डॉक्टर रक्तदाब बराच कमी झाला आहे असे समजावून सांगत होते.

प्रकृतीत असा चढ-उतार सुरू होता तरीपण स्वतः साहेबांचा आत्मविश्वास ढळला नव्हता. मधून मधून ते निवडणुकीच्या तयारीविषयी सूचना देत होते. बदलत्या राजकारणाविषयी बोलत होते. दुपार उलटून गेल्यावर मुंबईला जाण्याविषयी बोललो त्या वेळी होकार-नकार त्यांनी काहीच दिला नाही. मुंबईला, साताराला जायचं म्हणून त्यांनी घरी बॅग भरून ठेवली होती. सर्व तयारी केली होती. हॉस्पिटलमध्ये 'चेक-अप' करून परत येऊ आणि लगेच मुंबईला जाऊ याच विचारात ते होते.

दि. २५ च्या संध्याकाळी ७-७-३० पर्यंत ते स्वस्थ निजून होते. मधून मधून बोलत असत तेवढेच. ७॥ वाजता दिल्लीचे माजी गव्हर्नर श्री. पी. जी. गवई प्रकृती पाहण्यासाठी म्हणून आले. त्यांना पाहताच साहेबांनी किंचित हसून त्यांना प्रतिसाद दिला. म्हणाले, "गवई, तुमच्यावर अन्याय झालाय, मला कल्पना आहे. परंतु काळजी करू नका. निवडणुकीनंतर परिस्थिती बदलेल, बदलणार आहे. तुमच्यावरील अन्याय दूर होईल. काळजी करू नका."

"साहेब, मी फक्त आपली प्रकृती पाहावी म्हणून आलोय, तुम्ही विश्रांती घ्या." गवई म्हणाले. चर्चा आणखी लांबली तर साहेबांना त्रास होईल म्हणून

मी श्री. गवईंना खूण केली. ते निरोप घेऊन लगेच बाहेर गेले. श्री. गवई बाहेर पडले आणि श्री. उन्ही कृष्णन आले. त्यांना पाहून साहेब बोलले, " अरे तुम्ही मंडळी इथं दिल्लीत काय करताय? निवडणुका जाहीर झाल्या आहेत, आपापल्या मतदारसंघात जा. " उन्ही कृष्ण निरोप घेऊन बाहेर पडले तेव्हा ७-४५ वाजले होते.

आणि नंतरची पाचच मिनिटं! आम्ही शेजारी बसलो होतो. साहेबांनी पाणी मागितलं. पाणी घेतलं, अन् त्यांच्या श्वासातून वेगळाच आवाज येतोय असं वाटलं. त्याच वेळी एक डॉक्टर आत आले. त्यांनी पाहिलं अन् तसेच ते माघारी धावले. काही सेकंदांतच नर्ससह ते आत पोहोचले. छातीवर दाब देऊन त्यांनी श्वासोच्छ्वास सुरू ठेवण्याचा प्रयत्न केला पण.......७-५० वाजले होते. सर्वांना सोडून साहेब बोलता बोलता निघून गेले. दिवसभर निवडणुकीव्यतिरिक्त काही बोललेच नाहीत. अन् ते बोलणंही बघता बघता खुंटलं...आयुष्याची दोरी तुटली. मुंबईचे डॉक्टर तेथे पोहोचले तेव्हा सारं संपलं होतं. त्यांनी डोक्याला हात लावला. दोरी तुटल्यावर असलेले अन् नसलेले डॉक्टर काय करणार होते!

दहाच मिनिटांत श्री. राजीव गांधी आले. अंत्यदर्शन घेतलं. चौकशी केली. मुंबईला नेणार म्हणून सांगितलं तेव्हा ते म्हणाले, दिल्लीत साहेबांची माणसं आहेत. पार्थिव देह येथे घरी न्या. सकाळपर्यंत ठेवा. सकाळी दोन तीन तास त्यांना इथं राहू द्या. त्यांनीच आपला एक विश्वासू माणूस तेथे ठेवला. पार्थिव देह लवकरात लवकर घरी पोहोचेल अशी व्यवस्था करा असं त्याला बजावलं.

सकाळी १ रेसकोर्स रोड, या साहेबांच्या निवासस्थानी दु:खितांची रीघ लागली. राष्ट्रपती आले, मंत्री आले, लष्करी व शासकीय अधिकारी आले, दिल्लीतले महाराष्ट्रीय आले, पत्रकार आले, नोकरचाकर, सामान्य माणसं यांना आवरणं मुष्कील ठरलं. पार्थिव देह गनकॅरेजवरून पालम विमानतळावर पोहोचला तेव्हा पंतप्रधान श्री. राजीव गांधी यांनी साहेबांना अखेरचा निरोप दिला. तिथं लष्करी विमान तयार ठेवलं होतं.

२२ वर्षांपूर्वी नोव्हेंबरमध्येच साहेब दिल्लीत पोहोचले आणि आता केवळ दिल्लीच नव्हे तर जग सोडून निघून गेले तेही नोव्हेंबरमध्येच! पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांनी बोटाला धरून साहेबांना दिल्लीत आणलं. पंडितजींच्या

नातवाला आपल्या त्याच बोटाचा आधार देऊन दिल्लीत उर्वरित कालक्रमणा करावी असा निश्चित विचार करून उतरत्या वयातही निवडणुकीतील डावपेचांची आखणी करण्यात साहेबांनी आपलं मन गुंतवलं होतं. आजारी स्थितीतही तेच बोलत होते. परंतु ते घडायचं नव्हतं !

सौ. वेणूताईंच्या रूपानं १ जून १९८३ ला चव्हाणांच्या वृंदावनातील तुळस दिल्लीतून निघून गेली; उरलं सुरलं वृंदावनही पृथ्वीनं आता पोटात घेतलं. नियतीला पुढचं काही घडवायचं नसावं ! नशीब महाराष्ट्राचं !

## माणुसकीचा गहिवर असलेले दांपत्य

तीस वर्षांपेक्षा जास्त श्री. यशवंतराव चव्हाणांच्या कुटुंबाची सेवा करणारे श्री. सरवर शेख यांच्या आठवणी आजही त्यांच्या डोळ्यांतील अश्रू सांगतात. त्यांचे श्री. ना. बा. लेले, नवी दिल्ली यांनी केलेले शब्दांकन—

" १९६३ साली माझे लग्न त्यांनी करून दिले आणि दोघेही जातीने हजर राहिले. त्या वेळी मी फक्त दहा दिवस रजेवर राहिलो. अन्य वेळी या दोघांपासून दूर राहणे जडच जात असे. १९६२च्या नोव्हेंबरमध्ये मुंबई सोडून संरक्षण-मंत्रिपदी श्री. यशवंतरावजी दिल्लीस आले त्यावेळी मुंबईतील घरच्या सेवक-वर्गापैकी कोणीच मुंबई सोडून दिल्लीस येण्यास तयार नव्हते. मी एकटाच दिल्लीस आलो. त्यानंतर १९८३ च्या मे महिन्यात माझी आई खूपच आजारी होती म्हणून (वेणूताईंच्या) बाई-साहेबांच्या सांगण्यावरून गावी जाऊन आलो. अन्यथा या दोघांपासून दूर राहण्यास मन तयारच होत नसे. पुढे १९७७ मध्ये ' साहेब ' (यशवंतरावजी) यांनी एकदा सुचविले की ' यापुढे तुला गृहमंत्रालयात चांगली नोकरी लावून देतो. कारण यापुढे मी मंत्री राहणार नाही. ' अर्थात याला मी नकार दिला. तेथे मला अधिक पगार मिळाला असता पण नवी नोकरी करताना या दोघांची सेवा मी मनाप्रमाणे करू शकलो नसतो. दूर राहिल्याने या दोघांच्या प्रेमाला पारखा झालो असतो. हा जिव्हाळा व ही आपुलकी निर्माण करण्यात बाई-साहेबांचा वाटा स्वाभाविकच मोठा होता. कारण साहेबांना घरात विशेष लक्ष देण्यास सवडच नसे."

कधीकाळी घरातील सेवकांपैकी कोणी चुकलामाकला तरी ' साहेब ' रागावू नयेत म्हणून बाईसाहेबच साहेबांना सांगत की, ' आपणच सर्वांना सांभाळून घ्यायला नको का? माणसे आहेत ती. चुका कधीमधी होणारच! ' सेवकांचा असा कैवार घेणाऱ्या त्या माऊलीने मात्र चुकूनसुद्धा कधी कोणावरही राग केला नाही. या त्यांच्या स्वभावामुळेच त्यांच्या सल्ल्यानुसार संसारी जीवनात ' बचत ' (सेव्हिंग्ज) व ' विमा ' उतरविणे आदी करू शकलो. माझ्या मुलाचे (अरुचे) आता बी. ए. पर्यंत आलेले शिक्षणही त्यांनी जणू तो आपल्या परिवारातीलच एक आहे, अशा थाटात चालू ठेवलेले होते. लौकरच तो पदवीधर होईल. त्याचे नाव ' सलीम ' (ऊर्फ हरू पण त्याला अरूच म्हणीत) असून अगदी लहान-पणापासून तो सतत त्यांच्या नजरे-

समोरच वाढला. मोठा होत गेला. 'बाई-साहेबांची' स्वतःची पूजापाठ आदी प्रथा नित्याचीच असे, पण तरीसुद्धा त्या आग्रह करून 'माझेकडून नियमित-रीत्या नमाज पढणे होते की नाही' याची आस्थापूर्वक चौकशी करीत असत. त्यांची ही आस्था इतकी प्रभावी असे की, त्यामुळे त्यांच्या पूजेअर्चेच्या जागी सारवण करणे, रांगोळी घालणे, पूजेची तयारी करणे आदी बारीकसारीक कामे माझी पत्नी आपुलकीने करीत असे व बाईसाहेबांनाही ते विशेष रुचत असे! अशा चांगल्या व्यवहारामुळे त्या 'रमझान', 'बकरी ईद' आदी सण आम्हा दोघांकडून नीट पाळले जातात की नाही याची पण बारकाईने विचारणा करीत असत. एवढा उदार व्यवहार 'साहेब व बाईसाहेब' यांचा असल्या-मुळेच आम्ही सेवक मिळून एक परिवार असल्यागत राहात होतो. यामुळेच एक जण मंगलोरचा तर दुसरा राजस्थानचा तर कोणी पंजाबमधील लुधियानाचा, तर कोणी उत्तर प्रदेशाच्या अलमोडाचा, तर कोणी हरियाणाचा असे विविध प्रदेशांचे व विविधभाषी असूनही अगदी एको-प्याने सेवारत होतो. अर्थात याचे श्रेय सर्वश्री साहेब व बाईसाहेब यांचेच आहे!

सरवर शेखच्या जीवनात अशा अनेकविध आठवणी आहेत, पण त्यापैकी दि. १९ नोव्हेंबर १९८४ ची आठवण म्हणजे कै. श्रीमती इंदिराजी, कै. जवाहर-लालजी, कै. लालबहादूरजी व म. गांधीजी यांच्याप्रती कै. यशवंतरावजींचा आदर व आस्था यांचे प्रतीक होय. दि. १६ नोव्हेंबरलाच ते मुंबईहून दिल्लीस आले होते व दि. १९ ला त्यांनी सरवरला सांगितले की, आज राजघाटावर जाण्याची इच्छा आहे. सरवरने चांगल्यापैकी मोटार चालविणे अवगत करून घेतलेले असल्याने त्याने लगेच गॅरेजमधून मोटर बाहेर काढून तो साहेबांना समाधीच्या दर्शनार्थ घेऊन गेला! सरवर शेख सांगतो की, "त्या दिवशी साहेबांनी (यशवंतरावजींनी) महात्माजींच्या राजघाटावरील समाधी-पासून प्रारंभ करून क्रमशः शांतिवन, विजयघाट व कै. इंदिराजींचा जेथे अग्नि-संस्कार झाला, ते स्थळ—या सर्व स्थानी जाऊन अभिवादन करून मोठे मानसिक समाधान प्राप्त करून घेतले असावे. कारण त्यानंतर अवघ्या एक सप्ताहाच्या आत ते आम्हा सर्वांना 'पोरके' करून गेले!"

(सरवरच्या संस्मरणगाठी अनेक आहेत. त्यापैकी काहींचे हे ओझरते दर्शन आहे.)

—**सरवर शेख**



कवि ना. धों. महानोर यांच्या 'रानातल्या कवितां'ची मैफल



सन्मानाचा सत्कार

द्रण कलेचे राष्ट्रीय पुरस्कार विजेते 'कल्पना'चे श्री. चिं. स. लाटकर यांचा हार्दिक गौरव



आनंदाचे डोही आनंद तरंग-पंडित भीमसेन जोशी यांचा मानसन्मान



मराठमोळी
साहित्य–संस्कृती
समवेत
ग. दि. मा.,
सी. रामचंद्र



मित्रांशी गप्पा–रामभाऊ जोशी, डॉ. बाळासो. देशपांडे, भा.द. खेर, शशिकांत राशिनकर



भालचंद्र पेंढारकर, सुलोचना, सुधीर फडके, वसंत देसाई यांच्या समवेत

॥ आम्ही जातो आमुच्या गावा ॥



पंतप्रधान राजीव गांधींची श्रद्धांजली

# 6

# A RARE NATIONAL LEADER

# A Rare National Leader

*Vasant Sathe*

Nineteen Eighty-Five is the Silver Jubilee Year of the State of Maharashtra and while we were holding celebrations in Maharashtra and outside, the one person we missed was Yashwantrao Chavan who had unfortunately passed away only a few months before. In mid 50's it is difficult indeed to recall the turmoil that had overtaken Western India because of the agitation for a Sanyukt Maharashtra. Almost all major political parties were vertically split on the issue. Sentiments ran highclouding reason and the ultimate objective before the nation. It was indeed difficult to be guided by principles because it was emotion which had become the guiding factor.

In the midst of all this turmoil and unrest, one man — only one man — stood like a rock and had the courage to declare that if the choice was between Sanyukt Maharashtra and Jawahar Lal Nehru, he would unhesitatingly follow Panditji. This did not mean that he was less committed than anybody else to the cause of Sanyukt Maharashtra. He believed in it ardently but wanted the new State to be born not as the child of disruption and unrest but as a child born of love and affection with goodwill from everyone. He suffered lot of humiliation at the hands of people who were in a hurry. He faced all that and ultimately when he succeeded, he was acclaimed even by his bitterest critics as the man who had brought the 'Mangalkalash' of Sanyukt Maharashtra.

The task before him, as the first Chief Minister of Maharashtra and as Congress leader, was much more difficult than was his task as the Chief Minister of bilingual Bombay. The Congress organisation was in shambles. The party had suffered heavily in Western Maharashtra and Bombay during the Lok Sabha and

the Assembly elections in 1957. The administration had also suffered. Development had taken the back place. But much worse were the wounds caused by almost three years of incessant agitation. It needed the healing touch of a physician to heal these wounds and it needed all the skills of a master craftsman to put the economy, industry and agriculture of the State back on the rails.

The success that he achieved in all these tasks was remarkable indeed. Persons who had left the Congress organisation during the Sanyukt Maharashtra agitation were brought back. The co-operative movement was strengthened as a major tool of socio-economic transformation of rural areas. Industry was assured that it would get the necessary opportunity to prosper, labour was promised a fair deal. Vidarbha and Marathwada which had apprehensions about their development found that the young Chief Minister was keen and committed to the development of whole of Maharashtra. With his dynamism and pragmatic approach he laid the solid foundation of agricultural and industrial revolution in Maharashtra. He accorded the highest priority to economic planning with emphasis on labour intensive techniques of production and development of small scale cottage and agro-based industries.

Yashwantrao Chavan was a keen student of Political Science, History, Literature and Fine Arts. It was this grounding which helped him to understand and analyse political, administrative and other issues, in their proper perspective.

His role in Maharashtra was importent but much more important was his role at the Centre. In the four decades of the independence, Yashwantrao Chavan is the only person who has at one time or the other held the most important portfolios of Defence, Home, Finance, External Affairs. There were many in the Capital who were surprised when Jawahar Lal Nehru picked up Yashwantrao Chavan to take Krishna Menon's place as the Defence Minister. No two personalities could be more dissimilar. Chavan had a difficult task because he was well aware of what Krishna Menon had done to lay the solid foundation of India's

defence, particularly in the field of Defence Production and Research. While acknowledging this debt he had to make it clear that under his guardianship defence had entered a new chapter of reorganisation and reconstruction. Above every thing else, what was needed was to instil a new confidence and pride in the nation about its armed forces and in the armed forces about themselves. In a way, it was the same psychological task in Delhi that he had to do in Bombay — creating a sense of pride and confidence.

Not only a freedom-fighter, Chavan was down to earth leader of the masses. He worked for the socio-economic development of Maharashtra keeping always the interests of the whole country. That was his priority. In May 1960, he wrote to the then Prime Minister Pandit Jawahar Lal Nehru, "Maharashtra State will work for the welfare of the people, not only that whatever worth giving we have, whatever best we have in our lives, whatever noble things we have, we will first sacrifice for India".

One aspect of Yashwantrao Chavan's pesonality is often ignored. Even while he was over-burdened with work, he always found time to read and read voraciously. Writers, poets, play-writs all found in him a connoisseur. Some of the speeches that he delivered at the Marathi Sahitya Sammelan are eloquent proof of the depth of his scholarship.

A great philosopher once said, "In life we shall find many men that are great, and some men that are good, but very few men that are both great and good". Yashwantrao Chavan was indeed a rare national leader who was both great and good.

This description aptly sums up the personality of Yashwantrao Chavan.

# Yashwantrao Chavan — Political Administrator Par Excellence

*S.M.Kelkar*

I had the good fortune to work with Yashwantrao Chavan as his Private Secretary when he was Defence Minister and later Home Minister. The services rendered by him to the nation first as Chief Minister of Maharashtra and later as Cabinet Minister holding important portfolios in the Government of India have been narrated many times and are part of the history of modern India. But what are not so wellknown are many facets of his personality which had an intimate bearing on his success as a political administrator. Shri Chavan was a leader in every sense of the word. He successfully practised for thirty years management principles which have only now become part of the modern management text-books. There is therefore little wonder that he could build a competent and high-morale team whichever portfolio he held. The most remarkable thing in Indian context is that he literally built up leaders by dozens — both in the political and administrative fields. Working with Shri Chavan was like learning at the feet of a master. It was a treat to see him reach right conclusions in complicated issues and a consensus in differing and often conflicting views. He could find the right solution because his moral standards were high, national objectives clear and reading of the pulse of the common man perfect. It was often unbelievable to see him turn a dispirited organisation into a high morale and competent one. The difference between Maharashtra of 1956 and 1960 and the difference between the Armed Forces of the country in 1962 and 1965 bears an eloquent testimony to his leadership qualities.

2. When I first called on him in his office, I had no idea that he had already selected me to head his personal staff. As I walked into the Defence Minister's room, I had the natural nervousness of an officer with only six years' service entering the seat of

power in the South Block. As I sat down, Yashwantraoji surprised me by asking me whether I found my mathematics training useful in solving administrative problems and also whether I could keep up my cricket after joining service. He had obviously seen my record and with this informal beginning, I could certainly give off my best. As I soon found out, this incident was nothing special; Yashwantraoji had the ability to establish within seconds a complete rapport with any one whether a political worker, an officer, a general, a scientist or a writer. His voracious reading and wide circle of friends gave him the breadth of vision and depth of knowledge which set him apart from a one-tract politician. Yashwantraoji never demanded blind worship; his friendship was based on mutual respect and trust with complete freedom to express one's views. One could have honest differences of opinion with him without losing his friendship. He was a democrat in every sense of the word. He always persuaded and never forced anyone to accept his views but when opinions differed he accepted the difference without any prejudice, malice or irritation.

3. There is a belief among some that Yashwantraoji had a wavering mind. Several cartoons showed him as a man sitting on the fence who was unable to make up his mind. However, as a Minister, I always found him decisive. He would certainly consider important issues in depth and allow everyone to give his views, but he never avoided his responsibility in taking decisions. What is more important, he could invariably carry people with him.

4. I am reminded of an incident while I worked with him in the Defence Ministry. It was 1st of September, 1965. As a retaliation to our capturing Hajipur area in Kashmir, Pakistan had launched a fulfledged armoured corps attack in Chhamb-Jurian sector. Geographically, this was a difficult sector for us to defend. By afternoon, many of our forward pickets had fallen. I received a call from Air Marshal Arjan Singh at 4.00 PM for an emergency meeting with the Defence Minister. Both he and General Chaudhary were in my room in five minutes. The Defence Minister was holding a large meeting in his room and so, instead of calling them to his office, he came to my room and had discussion with them.

Both pointed out that there was no way of repulsing Pakistani attack without using Air Force. After the 1965 and 1971 wars, use of Air Force looks natural today but it must be remembered that the Sino-Indian war of 1962 was fought without use of air power. Escalation of war through air attacks on civil population was considered dangerous. After listening to the arguments of the Chiefs of Staff, Yashwantraoji agreed that Air Force must be used. He asked me to contact the Prime Minister in the Parliament House on the special phone. Unfortunately, Lal Bahadurji was intervening in a debate in Parliament and it would have taken some time before he could be called out. Yashwantraoji asked the Chiefs of Staff how much time he had to take the decision. They replied that the Air Force, to be effective, must be used before sun-set and considering the time involved in communicating the decision and scrambling the planes, the decision had to be made within 5-10 minutes. Yeshwantraoji looked at them, paused and said, "Order the Air Force to attack". How the Pakistani attack was repulsed is now a part of history. I accompanied Yashwantraoji to the Parliament House where he rushed immediately to meet the Prime Minister. He was with the Prime Minister in his room only for a couple of minutes. As we headed back in the car to South Block, I asked him what happened. He said that Lal Bahadurji merely observed, "Well done, this is the most appropriate decision". The story brings out both the decision-making capability of Yeshwantraoji and the excellent rapport he had with the Prime Minister in terms of general strategy for the war.

5. Another interesting incident occurred prior to the war. Against the background of Pakistani infiltration in Kashmir and the expected Pakistani thrust in Chhamb sector, a high level meeting was held to decide on Indian strategy in the event of war. Gen. Chaudhary recommended a counter-attack on the Punjab front arguing that, on account of geographical handicap, a counter-attack over the cease-fire line in J & K would not be effective. The Foreign Office did not agree to the escalation over the international boundary (as different from the cease-fire line) and insisted that 48 hours ultimatum would be necessary if counter-attack was to be launched

on the Punjab front. Any ultimatum would have removed the element of surprise. Yeshwantraoji strongly supported General Chaudhary and made it clear that the strategy should be determined solely with a view to win the war and the point of attack should be in the area of our choosing. This was approved by the Prime Minister. Six days were required from zero date to put the counter-attack plan in operation. The decision was taken on the 1st of September and the attack on Lahore was launched on the 6th of September. So well-guarded was the secret that the surprise was total; Pakistani thrust in Chhamb-Jurian petered out and it was forced to take a defensive role. As Yeshwantraoji observed later "Two thousand years of Indian history was a history of invasions on India which Indians tried to defend. On 6th Sept. 1965, India changed for the first time from defence to counter-attack and took the initiative." Thanks to these bold tactics, India could defend its honour in 1965 in spite of the more sophisticated armed forces of Pakistan.

